मा १३२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
( जिल्हा वाचनालय )

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक —

सन —

अंक —

( महिने )

खंड ११

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नं.
ता.
ठाणे.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १८ | पौष १८४६ | नवें वर्ष ५ वें |
| मास ५ वा | जानेवारी १९२५ | अंक १ ला |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. २ व व्हीपीनें रु. २८२

मुद्रक:—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३००
येथे आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.




| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... | १–२ |
| २ देवाशीं लडिवाळपणा ... ... ... | ७ |
| ३ पुनर्जन्म व ब्राउनिंग ... ... ... | ८–९ |
| ४ श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या तोंडचीं वचनें ... ... | १०–१६ |
| ५ गीताशास्त्र ... ... ... ... | १७–२० |
| ६ एका चरणाचे वीस अर्थ ! ... ... ... | २१–२२ |
| ७ श्रीकृष्णाची चेंडुफळी ( गाणें ) ... ... | २३–२४ |
| ८ स्फुट विचार ... ... ... | |
| १ राष्ट्रीय जागृतीचीं चिन्हें २ राष्ट्रीय सभा व महात्माजी ३ महात्माजाचें भाषण ४ भागवत धर्माची हीच शिकवणूक आहे ५ ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय. ... ... | २५–३१ |
| ९ पोंच व अभिप्राय ... ... ... | ३१–३६ |
| १० मोतीं आणि हिमबिंदु ( कविता ) ... ... | ३७ |
| ११ करुणाष्टक ( कविता ) ... ... ... | ३८ |
| १२ कनक, कांता व कादंबरी यांचा मोह ... ... | ३९–४० |



## आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्रमहोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ८१२.

पत्ता:—व्यवस्थापक मुमुक्षु, पुणें.



ओव्या.

देवा ! पडिलिया दुःखसागरीं । तूं काढिसी गा जयापरी ।
ते कीर्ति तुझी श्रीहरी । आठवित असे ॥ १ ॥
कीर्ति आठावितां वेळोवेळां । भोगीतसे महासुखाचा सोहळा
तेथ हर्षामृतकल्लोळा-। वरी लोळत आहे ॥ २ ॥
हे येतुले दिवस आह्मां । कांहीं नेणवेचि श्रीरामा ।
आतां देखतसे महिमा । गंभीर तुझा ॥ ३ ॥
जेथूनि नानासृष्टींचिया वोली । पसरती भूतग्रामाचिया वेली ।
तया महत् ब्रह्मातें व्याली । दैविकी इच्छा ॥ ४ ॥
जी तूं त्रिजगतीचिये वोलावा । अक्षर तूं सदाशिवा ।
तूंचि सदसत् देवा । तयाही अतीत तें तूं ॥ ५ ॥
तूं प्रकृतिपुरुषांचिया आदी । जी महत्तत्वा तूंचि अवधी ।
स्वयें तूं अनादी । पुरातन ॥ ६ ॥
तूं सकळ विश्वजीवन । जीवांसी तूंचि निधान ।
भूतभविष्याचें ज्ञान । तुझ्याचि हातीं ॥ ७ ॥
जी श्रुतीचिया लोचना । स्वरूपसुख तूंचि अभिन्ना ।
त्रिभुवनीचिया आयतना । आयतन तूं ॥ ८ ॥
ह्मणोनियां परम । तूतें ह्मणती जी परमधाम ।
कल्पांतीं महत् ब्रह्म । तुजमाजीं रिगे ॥ ९ ॥
किंबहुना तुवां देवें । विश्व विस्तारलें आहे आघवें ।
तरी अनंतरूपा वानावें । कवणे तूतें ! ॥ १० ॥
जी काय एक तूं नव्हसी ? । कवणे ठायीं नससी ? ।

हें असो, जैसा आहासी । तैसिया नमो ॥ ११ ॥
वायु तूं श्रीअनंता । यम तूं नियमिता ।
प्राणिगणीं वसता । अग्नि तो तूं ॥ १२ ॥
वरुण तूं सोम । स्रष्टा तूं ब्रह्म ।
पितामहाचाही परम । आद्य जनक तूं ॥ १३ ॥
आणिकही जें जें कांहीं । रूप आथी अथवा नाहीं ।
तया नमो तुज तैसयाही । श्रीजगन्नाथा ॥ १४ ॥
आणिक स्तुतिही नाठवे । आणि निवांतही न सवे ।
नेणों कैसा प्रेमभावें । गाजोंची लागे ॥ १५ ॥
आतां वेगळालिया अवयवा । नेणे रूप करूं देवा ।
ह्मणोनि नमों तुज सर्वा । सर्वात्मका ॥ १६ ॥
जी अनंत बळसंभ्रमा । तुज नमो अमितविक्रमा ।
सकळकाळीं समा । सर्वदेशा ॥ १७ ॥
आतां माझिया अपराधा । मर्यादा नाहीं मुकुंदा ।
ह्मणोनि रक्ष रक्ष प्रमादां- । पासोनियां ॥ १८ ॥
पुत्राचे अपराध । जरी जाहले अगाध ।
तरी पिता साहे निर्द्वंद्व । तैसे साहिजो जी ॥ १९ ॥
पैं चराचर विनोदें पाहिजे । तेणें सुखें घरीं राहिजे ।
तरी चतुर्भुज रूप तुझें । तो विसांवा आह्मां ॥ २० ॥
आह्मीं योगजात अभ्यासावें । तेणें याचि अनुभवा यावें ।
शास्त्रांतें आलोडावें । परी सिद्धांत तो हाचि ॥ २१ ॥
आणिकही कांहीं जे जें । दान पुण्य आह्मीं कीजे ।
तया फळीं फळ तुझें । चतुर्भुज रूप ॥ २२ ॥

—श्रीज्ञानेश्वरी अ० ११.

ना. भा. १२६८


ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ.

# श्रीसमर्थसजीवनी
## उर्फ
# रामदासी वेचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशे वर्षांपूर्वीं आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. ( १ ) प्रपंच ( २ ) राजकारण ( ३ ) परमार्थ व ( ४ ) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा ' सारांश, प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा मडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सिम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बायडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन, व्ही. पी. नें २।८६

पत्ता—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# समर्थसंजीवनी.

## लोकमत.

**श्री० चौंडेमहाराज वांईकर:**—" श्रीसमर्थांचा दिव्य संदेश महाराष्ट्रांत लोकांच्या घरोघर पोंचविण्याची श्रेष्ठ कामगिरी श्रीसमर्थांनीं आपल्यासाठींच राखून ठेविली होती असें स्पष्ट दिसतें. समर्थमहाराजांच्या एकूनएक उत्कृष्ट शिकवणा आपण संजीवनींत आणल्यानें त्यांची अखंड संगति ह्या एका ग्रंथानें सर्वांस लाभणार आहे."

**केसरी** ( सं. रा. न. चिं. केळकर ):—" श्रीसमर्थांच्या काव्यसागराचें मंथन करून त्यांतून निवडक रत्नें काढून त्यांचा हार गुंफण्याचें कार्य मुमुक्षु-कर्ते पांगारकर यांनीं करून महाराष्ट्रधर्माच्या प्रसारास मोठेंच साधन उपलब्ध करून ठेवलें आहे.... समर्थांच्या वाणीनें मृतप्राय महाराष्ट्रांत चैतन्य उत्पन्न केलें व त्याच्या हातून महाराष्ट्रधर्माचा व राजकारणाचा झेंडा अटकेपर्यंत फडकविला. याकरितांच ग्रंथकारांनीं समर्थांच्या या शिकवणीला ' समर्थसंजी-वनी ' असें सार्थ व साभिप्राय नांव दिलें आहे. तिच्या सेवनानें या देशांत तेज व सामर्थ्य प्रकट झाल्याविना राहणार नाहीं. पुस्तकाचें कोणतेंही पृष्ठ उघडावें व कोणताही उतारा वाचावा, त्यांत महाराष्ट्रधर्माचें तेजस्वी स्वरूप प्रकट झाल्यांवाचून राहत नाहीं! वाचकांच्या सोयीसाठीं त्याचे चार विभाग केले असून आणखीहि पोटविभाग केले आहेत, पण अथपासून इतिपर्यंत सर्वच भाग अस्सल बावनकशी सोनें आहे. श्रीयुत पांगारकर यांनीं पुस्तकास विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे व तींत आपल्या प्रेमळवाणीनें पुढील वेच्यांचें सार उद्धृत केलें आहे. पुस्तकाचें बहिरंगही मनोहर असेंच आहे. महाराष्ट्रीय आबालवृद्धांनीं या पुस्तकाचा नित्यपाठ करण्याचा परिपाठ ठेवावा व त्यांतले कांहीं भाग तर मुखोद्गत करावे अशा योग्यतेचें हें पुस्तक आहे."

**आनंद** (सं.रा. वासुदेव गोविंद आपटे):—"रामदासी वेंचे या नांवावरूनच पुस्तकाचें सामान्य स्वरूप कळतें. विशेष गोष्ट ही कीं आरंभीं ८० पृष्ठांत रा. पांगारकरांनीं सर्व प्रकरणांचा जो सारांश दिला आहे तो इतका व्यवस्थित रीतीनें सुबोध करून चटकदार आणि रसाळ भाषेंत लिहिला आहे कीं हा त्यांचा सारांश हा० बिलोरी कांचेच्या निर्मळ आरशांत पाडलेलें समर्थांच्या शिकवणीचें उत्कृष्ट प्रतिबिंबच होय!"

**नवाकाळ**–( सं. रा कृ. प्र. खाडीलकर ):—" समर्थांच्या अमोघ वर्णाचा लाभ अत्यंत व्यवस्थित रीतीनें करून देऊन श्री. पांगारकर यांनीं ह्या ग्रंथाच्या रूपानें आतांपर्यंतच्या संतवाङ्मयविषयक ग्रंथांत सुंदर भर घातली आहे. श्रीसमर्थवाङ्मयाशीं रा. पांगारकर यांचा २५।३० वर्षांचा परिचय आहे. यांत बहुतेक सर्व महत्वाच्या शिकवणींचा समावेश केला असून निवडक वेंचे विषयवारीनें देण्यांत आले आहेत प्रपंच, राजकारण, परमार्थ व स्फुट प्रकरणें अशीं एकंदर १५० प्रकरणें असून एकंदर प्रकरणांचा 'सारांश" ८० पृष्ठांत आरंभींच घालण्यांत आल्यामुळें विषयसंगति लावणें फार सुलभ झालें आहे. प्रापंचिक, राजकारणी व पारमार्थिक अशा सर्व लोकांना मार्गदर्शक शिकवणूक समर्थांचीच असून ती सुव्यवस्थित व नीटनेटक्या स्वरूपांत पुढें ठेवण्याचें महत्वाचें कार्य पार पाडून श्री. पांगारकर यांनीं महाराष्ट्रीय वाचकांना उपकारबद्ध करून ठेवलें आहे. सर्वांनीं सर्वकाळीं जवळ ठेवण्यालायक अशा या ग्रंथाचें बाइंडिंगही मजबूत व टिकाऊ असून किंमत रुपये दोन बेताचीच आहे."

**गोरक्षण** ( सं. अनंतदास रामदासी ):—" शंकरराव देव यांनीं समर्थवाङ्मयाचा द्रोणागिरी धुळ्यास आणण्याचे परिश्रम केले व लक्ष्मणराव पांगारकर यांनीं त्यावरील दिव्य वनस्पतींचा अर्क मोठ्या परिश्रमानें काढून ही समर्थ संजीवनी बनविली व तिचा प्रथम लाभ मुंबईस श्रीसमर्थचरणीं सतत चार महिने तेरा कोटि रामनामाचा जप करणाऱ्या भाविकांना निरूपणप्रसंगीं घडला ही समर्थकृपाच होय. ज्या संजीवनीनें धादांत पाषाणांतही चैतन्य उत्पन्न होईल अशा त्या अमृतसंजीवनीचे घुटके स्वतः अत्यंत कष्ट घेऊन प्रवचनरूपानें ८।१० दिवस जपयज्ञांतील भाविकांना त्यांनीं पाजले !"

**स्वराज्य**–( सं. रा. शिवराम महादेव परांजपे ):–"रा. पांगारकर यांनीं समर्थांच्या समग्र ग्रंथांचें आलोडन करून जें सार काढलें आहे त्यांत काव्याचें फार मार्मिक वर्गीकरण केलें आहे. त्यांनीं लिहिलेली प्रस्तावनाही वाङ्मयाच्या विवरणाच्या दृष्टीनें फार महत्वाची आहे. 'सारांश' ८० पृष्ठांत दिला आहे त्यायोगें समर्थांची दुर्बोध कविता कळण्याला मदत होते. हें उपयुक्त पुस्तक सर्वांनीं संग्रहीं बाळगण्यासारखें आहे."

**ज्ञानप्रकाशः**–' समर्थसंजीवनी ' हें पुस्तक संतकवींचा सुमारें दोन अडीच तपें अव्याहत व्यासंग असलेले रा. पांगारकर यांनीं केलें असल्यामुळें तें वाचनीय व मननीय झालें आहे हें सांगावयास नकोच."

---

# मुमुक्षुंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पाहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षू' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

भाग पहिला:—१ मंगलाचरण २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४ मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रर्थाना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग १७ व्यसनांतून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ एका भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरा. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरींचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

भाग दुसरा:—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतन्या थमालेले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नी संबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदातांचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद ( या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. )

**पत्ता—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.**

वा. मा. १२५५८

# देवाशीं लडिवाळपणा.

१

देवा! सर्वभावें मी तुला शरण आलों आहें, आतां तुजवांचूनें मी दुसऱ्या कोणाची आशा करावी? तुजवांचून दुसरा कोणी तारक या त्रैलोक्यांत नाहीं अशा विश्वासानें मी तुझे चरण जवळ केले, आणि आतांहि तुझ्याशिवाय इतरांकडे मी पाहिलें तर यांत स्वदासतारक या तुझ्या बिरुदाला कमीपणा येणार नाहीं काय? माझा विचार बाजूला राहो, पण श्रीकृष्णा! तुझ्या बिरुदाला कमीपणा येईल ही कल्पनाही मला अत्यंत असह्य होते. तुझें विरुद रक्षिलें जावें, तुझा बडिवार जगांत वाढावा, तुझ्या नामाचा डिंडिम जगांत वाजावा, तुझ्यावर प्राणिमात्रांचा विश्वास बसावा, याविना हृदयारामा! खरोखर सांगतों कीं, मला या जगांत कोणतीच वासना नको! म्हणून म्हणतों कीं, आत्मब्रीद रक्षणासाठीं या शरणागत दीन दासाला कृतार्थ कर.

२

पक्वान्नांच्या जवळ बसून भुकेनें मरावें, धनराशीवर बसून याचककर्म करावें, गंगाकिनारीं बसून कूपजलाची इच्छा करावी हें काय उचित? तसें नारायणा! निकट, हृदयनिवासी, आत्माराम तूं अगदीं संनिध असतां काय म्यां क्षुद्र वासनांचा दास होऊन रहावें? जीवाच्या जिवलगा! अहो नारायणा! यांत तुह्मांला उणेपणा येऊं पहात आहे!!

भक्तवत्सला! सूर्य मध्यान्हीं तळपत असतां अंधःकारानें काय उजळ माथ्यानें वावरावें? तूं भक्तकामकल्पद्रुम असें तुझें यश श्रुति, शास्त्र, पुराणें व संत गाऊन राहिले आहेत, मग या पामराचे त्वद्व्यतिरिक्त अन्य सर्व काम एकदम दूर करून कां टाकीत नाहींस?

३

भगवंता! तूं अमृताचा सागर आहेस, तुझ्यापाशीं मागावयाचें काय? तूंच पाहिजेस, इतर क्षुद्र काम नकोत. ते आमची कुतरओढ या संसारांत नित्य करीत असतात. त्यांपासून आमचें संरक्षण करणें भवकेसरीला–तुला काय दुर्घट आहे? अमृततीरीं राहून ऐहिक वासनांचे तुकडे चघळीत राहणें हें काय आमचें उचित? देवा! खास नव्हे.

४

देवा! तूं नामरूपातीत असून तुझ्या नामरूपाच्या ठिकाणीं माझें चित्त अतिशय रमलें आहे. तुझें नामरूप, तुझ्या सगुणलीला, तुझ्या अवतारांत तूं प्रकट केलेले तुझे दिव्य गुण, यांची प्रीति माझ्या चित्तांत घुसून राहिली आहे. सगुण निर्गुण हीं दोन्हीं रूपें तुझींच पण तुझ्या सगुण स्वरूपाच्या निदिध्यासांत, तुझ्या नामसंकीर्तनांत हें चित्त विरून जात जात तुझ्या निर्गुणरूपाला पोंचेल असा माझा विश्वास आहे.

# पुनर्जन्म व ब्राउनिंग

पुनर्जन्मावर विश्वास हें हिंदूधर्माच्या प्रमुख लक्षणांपैकीं एक लक्षण आहे व हिंदुमात्राचा पुनर्जन्मावर विश्वास असतो यांत नवल नाहीं. इंग्रजी कवि ब्राउनिंग याचा पुनर्जन्मावर (ख्रिस्तधर्मतत्वाच्या विरुद्ध) विश्वास होता हें त्याच्या कवितेवरून स्पष्ट दिसतें. आपल्याला पूर्वींचे जन्म होते व आपले मनोरथ अपूर्ण झाल्यामुळें त्यांच्या पूर्ततेसाठीं आपल्याला आणखी जन्म घ्यावे लागणार आहेत असें त्यानें म्हटलें आहे. तो म्हणतोः—

A fancy some lean to and others hate—
That, when this life is ended, begins
New work for the soul in another state,
Where it strives and gets weary, loses & wins,
Through life after life in unlimited series.

× × × × ×

At times 1 almost dream
I too have spent a life the sages' way
And tread once more familiar paths ;
Perchance I perished in an arrogant self-reliance
Ages ago ; and in that act, a prayer
For one more chance went up so earnest,
Instinct with better light let in by death
That life was blotted out–not so completely
But scatted wreaks enough of it remain,
Dim memories, as now when once more seems
The goal in sight again.

कवीच्या ' Christina ' and 'Evelyn Hope ' ह्या सुंदर काव्यांत ह्या प्रणयी जोडप्याच्या संवादांत हाच विषय आला आहे. ख्रिस्टिनेचा प्रियकर म्हणतोः—

Doubt you if in some such moments, as
She fixed me she felt clearly
Ages past the soul existed, here an age
It is resting merely
And hence fleets again for ages.

दुसऱ्या काव्यांत इव्हेलिन अगदीं ऐन उमेदींत वारल्यावर तिचा प्रियकर आपला व तिचा समागम पुढील जन्मांतून होईल अशा निश्चयानें म्हणतो:--

Delayed it may be for more lives yet,
Through worlds I shall traverse not a few,
Much is to learn, much to forget
Ere the time will come at last it will,
When Evelyon Hope ... ... ... ...
Ransacked the ages, spoiled the climes;
And I want and find you, Evelyn Hope
What is the issue, let us see !

ब्राउनिंग कवीच्या पुनर्जन्मविषयक कल्पना अन्य पात्रांच्या तोंडून आपणांस पाहायला सांपडतातच, पण स्वतःचा त्याचा विश्वास Speculative नामक त्याच्या काव्यांत निर्विवादरीतीनें त्यानें व्यक्त केला आहे. इतरांना स्वर्गांत सुखभोग घेण्याची इच्छा असेल पण कवी म्हणतो कीं मला ह्या मृत्युलोकांतच पुन्हा जन्म मिळावासें वाटतें:—

Others may need new life in Heaven

* * *

Let Earth's old life once more enmesh us
You with old pleasure, me—old pain,
So we but meet, not part again.

'One word more' ह्या काव्यांत आपल्या मृत पत्नीला उद्देशून कवि म्हणतो:—

Verse and nothing else have I to give you.
Other heights in other lives, God willing.
All the gifts in all the lives, your own, love!

---

ग्रंथ संग्रहालय
नं........

# श्रीगोंदवलेकर महाराजांच्या तोंडचीं वचनें.

ले.:—त्रिं. ना. देशपांडे, पुणें.

॥ श्रीराम ॥

## कलीचा महिमा.

शंकर पार्वतीस सांगतात मात । ऐका देऊनि चित्त । कलियुगीं मनुष्य न होय निभ्रांत । यास्तव करा नामजप ॥ १ ॥ घोर कलियुगांत । अशुद्ध मनुष्याचं चित्त । सर्व राहती पुण्यरहित । दुष्कर्मी जीवप्राण ॥ २ ॥ सत्याचें विरुद्ध बोलती । वेदशास्त्र मिथ्या म्हणती । क्रियेवांचून वेदांत सांगती । ऐसें वर्तती जन ॥ ३ ॥ दुसऱ्यास बोले मूर्ख अज्ञान । झालें म्हणे मज ज्ञान ! सत्य शब्द न बोले मुखानें । ऐसा काळ विपरीत ॥ ४ ॥ जे करिती लबाडी परद्रव्य हरण । कपट करुनि कापिती लोकांची मान । परपीडा विश्वासघात रातंदिन । तयासि शहाणा म्हणती ॥ ५ ॥ जो सत्वशील करी संध्यास्नान । परउपकारी सत्य भाषण । भगवद्भक्ती करी नामस्मरण । त्यासी जन अज्ञान म्हणती ॥ ६ ॥ दुसऱ्यांचे दोष बोलण्यास तत्पर । आपण दोषांचे सागर । सत्य नाहीं तिळभर । द्रव्य लोभी सदा मन ॥ ७ ॥ द्रव्य हेंची ब्रह्मज्ञान । द्रव्यासाठीं घेती प्राण । जीव प्राण धर्म करिती अर्पण । ऐसा कलीचा प्रादुर्भाव ॥ ८ ॥ गर्व ताठा अभिमान । परस्त्रीासक्त मन । वेद वेदांत बोलती शब्दज्ञान । झालों म्हणती जीवनमुक्त ॥ ९ ॥ देही म्हणती आत्मा थोर । पुनः नाहीं येरझार । वेद शास्त्र संत मिथ्या म्हणती वारंवार । परलोक तो नाहींच ॥ १० ॥ असत्य वर्तन परिपूर्ण । द्रव्यदारा चिंती मन । आहार निद्रा मैथून । आतां पुढें नाहीं कांहीं काम ॥ ११ ॥ दृढ झाली कनक कांता अहंभाव ममता । वैरी जाणें मातापिता । द्रव्यचि मानी परमपद ॥ १२ ॥ करी सत्याचें खंडण । असत्यवादीं जडल मन । स्त्री मानी देवासमान । ऐसा वर्ते कळीकाळ ॥ १३ ॥ ब्राह्मण लोभग्रस्त । वेदविक्रय सदा मस्त । अंत्यजासी वेद शिकवीत । ऐसें झालें कलियुगीं ॥ १४ ॥ वर्णआश्रमत्याग । नाहीं नाहीं संतसंग । बुडाले बुडाले यज्ञयाग । ब्राह्मणें सोडिलें वेदाध्ययन ॥ १५ ॥ वैरी देव ब्राह्मण संत । ऐसीयासीं जगीं मानित । ह्मणती भला हाचि सत्य । पहा कलिचा महिमा कीं ॥ १६ ॥ स्त्रिया सासुसासऱ्यासि सांडिती । परपुरुषलंपट होती । न पाहती कुल याती जाती । पति आज्ञा अप्रमाण

॥ १७ ॥ जाती धर्म म्हणती भ्रम । कोण करील सत्कर्म । जिकडे तिकडे अधर्म । प्रजापीडक अधिकारी ॥ १८ ॥ अकालीं पर्जन्य वृष्टी । घोडे म्हसी गाई तृणाविणें कष्टी । भले भले दुःखी पोटासाठीं । वारंवार पडे दुष्काळ॥ १९॥ रोग मृत्यु हानी । प्राणी होती दीनवाणी । भयभीत जनक जननी । कन्या पुत्र प्लेगें मरती ॥ २० ॥ ग्रामचे ग्राम ओस पडती । दीपा नाहीं तेलवाती । ऐसें कलींत पापी होती । कोण पहा प्रसंग ॥ २१ ॥

## कलीवर तोडगा

कलियुग अति दुर्धर । कोणी न पावे पैलपार । एक सद्गुरु कृपेचा आधार । त्यानें जावें पैलतीरा ॥ १ ॥ वेद शास्त्र कर्म उपासन । आत्मज्ञान चारी मुक्ती सद्वर्तन । अष्टांग राजयोग तपोधन । सत्संग गुरुकृपा साधावी २॥ सदगुरुकृपा होय परिपूर्ण । घडे अध्यात्म श्रवण निरूपण । सकल तीर्थांचें स्नान । सप्रेम करावें ॥ ३ ॥ देहातीत ब्रह्मवेत्ता । तें साधन लागे हाता । सहज समाधी साक्षात्कारता । हृदयीं प्रगटे सर्वेश्वर ॥ ४ ॥ ज्ञान भक्तीचा अधिकार । स्वधर्माची निज खूण पूर्ण । पिंडब्रह्मांडाचे ज्ञान । चौदा विद्या चौसष्ट कळा ॥ ५ ॥ चार वेद सहा शास्त्र । गीता भागवताचा निजसार । जो जिज्ञासू असेल सत्वर । त्याणें घ्यावा अनुभव ॥ ६ ॥ मुमुक्षु असेल जो कोणीं । त्या अनुभव देईल चापपाणी । खालीं लिहितो असें वर्तन । हीच आज्ञा प्रमाण ॥ ७ ॥ स्मरणावांचून जाय मन । तें विवेकें आणावें परतोन । स्वधर्म सत्य पूर्ण । सांभाळावें ॥ ८ ॥ पापासि भ्यावे रात्रंदिन । आश्रमधर्मी ठेवावें मन । विश्वास करोनि जतन । दुसरें नाचरावें ॥ अधिकारासारखें वागावें । बायकामुलें आप्तगोत सांभाळावें । अन्यायानें द्रव्य न मिळवावें । औदार्ये वेचावें ॥ १० ॥ धंद्यांत खबरदारी । व्यवस्थेशीर संसारी । सत्य-भाषण कलाकुसरी । नीतिन्याय वर्तावें ॥ ११ ॥ कलियुगीं बहुत परमहंस । संन्यासी साधु विद्वान पंडित । शब्दज्ञानी वेषधारी बहुत । त्यासी नातळावें ॥ १२ ॥ शूद्र गुरुत्व मिरविती । नास्तिक ब्रह्मज्ञानी म्हणविती । स्त्रिया वेदांत बोलती । ऐसा कलियुगाचा प्रादुर्भाव ॥ १३ ॥ मनीं ठेवा मुमुक्षुजना भलत्या भरीं भासूं नका । स्वधर्म सोडूं नका । नवविधा भक्तीं विसरूं नका । स्त्रीजाती अज्ञान भारी । त्यांनीं रहावें पतीच्या घरीं । पति जरी असे नष्ट । तरी त्यांनीं तेथेंच करुनि कष्ट । जन्म काढावा ॥ सत्कीर्ति, सत्कर्म । नीति मर्यादा लज्जा अधीन । लोभ, क्रोध, मत्सर, वैर, काम वर्जित असावें मन । तीर्थ, व्रत, साधू, देवाचें दर्शन । ऐसें लाऊनि सवय । अधर्माचा उभारी स्तंभ । मुख्य स्त्रियांचा धर्म । पति आज्ञा प्रमाण । पतिरहित ज्या असतील ।

त्यानीं सासूसासरे दीर योग्य अधिकारी माता पिता बंधु यांचे राहुनि अधीन । पुत्र, कन्या, सुना, नातू हे स्वजन हि सोडून राहूं नये कोठें क्षणभर। स्त्रियांनीं लज्जा, मर्यादा, स्वधर्म, स्वजन-रक्षण करुनि परिपूर्ण । पुढें परमार्थाचें लक्षण । चित्तशुद्ध नाहीं होता । सदबोध न घेतां । द्रढलोभ । मायिक वार्ता । त्यांनीं राहूं नये संतापाशीं । सग्दुरुसेवा लोकाचार । अंतरीं मोकळें वागण्याचा हव्यास फार । ऐसि यासि साधू सग्दुरु आश्रय देतात ते योग्य निंदेसि पात्र । जगीं निंद्यधर्म ऐसा दोष । आणीक नाहीं विशेष । तर जगीं निंद्य तें सोडूनि द्यावें । परनिंदा परपिडावर्जित असावें । आतां असो वर लिहिलेला क्रम । साधनीं असावें आत्मज्ञान ॥ श्रीराम ॥

## वर्तावें कसें.

नाशिवंत पदार्थ त्याची । करूं नये प्रेमप्रीती । व्यवहारापुरतें वागावें । अंतरीं मिथ्या ओळखून राहावें । स्वधर्म जतन करून । सत्य वागावें रात्रंदिन । कोणाचा अन्याय करूं नये । परनिंदा–परपीडा–परद्रव्य–परस्त्री–परधर्म प्राण-जाईपर्यंत घडूं नये हातून । सदासर्वदा नम्र असावें । काम, क्रोध, लोभ ममता विरहित राहावें । विवेकें अंतर वळवावें । सग्दुरुसेवा, संतसंग, सत्कर्म, ज्ञान भक्तींचें गूज । तुह्मांस मी सांगतों आज । भूतदया शांति लीनता । पराचे अपराधीं क्षमा । सग्दुरुवचन करुनि जतन । तुह्मीं मिळवावें आत्मज्ञान । सग्दुरुवचन पाही । नामस्मरणावाचूनी । एक पळ न जाई । स्वानंद समाधानें राही । दुजी इच्छा उरली नाहीं।प्रेम पुरस्कार मनवृत्ती नामापरती नाहीं प्रीति । सुख दुःख अपकीर्ती संतोष राही । मन करी नामस्मरण । वृत्ती स्वरूपाकार होय लोचन । चित्तीं राखीं समाधान । सत्य वागावें रात्रंदिन ।

## परमात्मा व जीव.

परमात्मा, परमेश्वर, सर्वोत्तम, निर्गुण, निरंजन, निष्कलंक, गुणरहित । मायातीत अव्यक्त । अगम्य तीन लोक–एकवीस स्वर्ग चौदा–भुवन पंचतत्व पंचकोश चंद्र सूर्य आकाश पृथ्वीवायु । ज्यानें केलें निर्माण असा आदि नारा-यण ओंकाररूप क्षरा–क्षरातीत उत्तम पुरुष महत् प्रकृती आदिशक्ती ज्याचे पादाक्रांत सर्व सत्ता सर्वशक्ती अम्द्भुत अतर्क्य कोणासी न कळे त्याचे।नामरूप धामस्वरुप त्याचेच मी जाणीव मूर्तिमंत परि तो मी नव्हे हें सत्यसत्य तें स्वरुप। आकार विकार गुणातीत तोच मीच असतां पदच्युत होऊनि व्यक्तरूप झालों जीव तो असा कीं–न बोलतां ये स्पष्ट।म्हणुनि घेऊं दृष्टांत। एक मनुष्य निद्रिस्त झाला तोच देह असोनि जागृतीचा विसर पडला । स्वप्नामाजी पुष्कळ व्याप केला । परी मी कोण कोठील हें न कळे । त्याला दिवसा स्वप्नांत म्हणे रात्रीचा

प्रसंग आला । रात्रीं म्हणे सूर्य माध्यान काळा झाला । ऐसा मी जीव भ्रमरुप-भ्रमला । स्वस्वरूप वस्तूसि भुलला । यमविधिचा घाला आला । लक्ष चौऱ्यांशी योनिमाळा । वासनात्मक बंधना बांधुनि गळा । जन्म मृत्यूचें दुःख भोगी वेळो-वेळां । महान् संकट विचित्र मायेचि कळा । अति दुःखि त्रिविधताप । आधि व्याधि । मोह माया देहाभिमान अज्ञानपण । त्याचें नांव जीव जाण । प्रकृती पुरुष साक्षी व्यापकत्व असून । वेगळे राहण्याचें जाणें खूण । पंचतत्व, पंच-कोश, पंचविषय, पंचप्राण, पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें ओंकारपंचक । आतां सर्वही होतील एक । चारी देह चारी वाचा—चारी अवस्था तीन गुण रजतम सत्व प्रकृती पुरुष जीव–जाती । " एकोहं बहुस्याम् " ऐशी आहे श्रुती ॥ श्रीराम ॥

## साधकबोध

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री रामरायाय नमः ॥ श्री सद्गुरवे नमः ॥ साधकाचे वर्तनाविषयींचे बोध—" करमके रेखपर संतजन रेख मारे " तो अशीः— ज्ञान्यास संचित क्रियमाण प्रारब्ध नाहीं. ज्ञान्यासि सुख दुःख पापपुण्य हर्षविषाद काम क्रोध वगैरे कांहींएक नाहीं. याकरितां ज्ञान्यास प्रारब्ध नाहीं. वासनेस प्रारब्ध आहे, ज्ञानी वासनारहित असतो. वासनारहित झाला त्याचा दुसरा देह झाला. करितां संचित क्रियामाण नाहीं, स्त्री पुत्र आप्त गणगोत वगैरे त्याचे कोणी नाहींत, पोकळ वासनारहित जे जे उद्गार येती ते ब्रह्मरूप आहेत, अथवा वासना हा देह याचे बद्ध उद्गार जीवदशेंतील टाकीत जावे. झटूं नये. देह असतां जी क्रिया करणें ती वासनेस पिंड देणें. आतां जैसे प्रेताचें डोळे उघडे असोन दिसत नाहींत तसे विदेही स्थितीच्या मनुष्याची वासना पोकळ असते. मुख्य वासना त्यागावी. खरी वासना आवडीनें सेवावी. आपल्या मुलास दारापुत्राचे सक्तीनें लालनपालन करणें तेंच प्रेम अंतरास घटलेलें असतें. त्याच प्रमाणें गाईम्हशीजनावरें पाळून प्रेम वासनेचा तसाच असतो. परंतु कोणी निरुपयोगी पक्षास म्हणजे राघू मैना चिमणी वानर कुत्रीं पारवे वगैरे प्रकार बहुत आहेत शोकास्तव पालन करितात व बाळगतात. पण त्याचे ठिकाणीं उपायाची आसक्ती नसते. आणि पालन करतात तसे स्त्री पुत्रांचें करावें. आतां आपले साधनापेक्षां अधिक वाटेल ती वासना मारावी. जसा बलवान पुरुषास सर्पदंश झाला म्हणजे तो मरतो, तसे ज्ञान्यास वासना बद्ध झाली कीं त्याचें ज्ञान नाहींसें होतें. निरिच्छ अंतर वाहे स्वानंद नाम न चुके एक पळ । तेच स्वस्वरूप केवळ । आतां माया प्रकृती भ्रांतीमूळ । वास-नाच मूळ वासना बीज । दुःख चिंता भयशोक । ही वासनाच आहे देख ।

ती वासनाच करितां त्याग । मग सत्य तोच राजयोग । त्रिपुटी आंनदनाम । वासना त्याग । मग आनंदनाम ग्रहण । आनंद दृश्यापासून जाहला तो आनंद नाहीं । व दृश्यापासून स्वानंदास धक्का लागूं नये । आत्मा हद्दीबाहेर राहून साधन केलें असतां गर्व होणार नाहीं ज्ञानगर्व फार वाईट आहे तो ठेवूं नये. आपण आत्मा व्हावे, आपण साधन करतो हे कधीं कोणास माहीत होऊं नये. दृष्टीस पडल्यास गर्व येतो तो येऊं देऊं नये. नेति नेति म्हणून वेदानें सांगितलें आहे, तें संतांनीं व गुरूंनीं सांगितलें आहे, व तें आत्मबोधानें कळेल असें समजून आपलें साधनापेक्षां आत्मज्ञान ब्रह्मज्ञान श्रेष्ठ नाहीं. पण असें तें ज्ञान मला आहे असा भास झाल्यावर तात्काळ नदीचा पूर ज्याप्रमाणें आलेला असोन जातो त्याप्रमाणें झालेलें ज्ञान नाहींसें होतें. प्रेतास हळदी कुंकू अलंकार जसे व्यर्थ तशी देहांतलि वासना पोकळ समजून प्रपंच व्यवहार करावा. वासनेला कोणतेही प्रकारें सक्त होऊं नये. मायेचा स्पर्श होऊं देऊं नये. आपण अणुरेणुपेक्षांही लहान व्हावें कीं गर्व होणार नाहीं. नामानें आंनद हा खरा. ब्रह्मानंद नामाखेरीज नाहीं. अहंब्रह्मास्मि व खोटा आनंद मनाजोग झालें, द्रव्य वगैरे मिळालें हा खोटा आनंद समजावा. यापासून पुढें नाश आहे. नामाशिवाय जो आनंद होतो तोहि जड याचा फंद जाणावा व्यर्थ. ॥ श्रीराम. ॥

## नाम

भूतदया शांती लीनता—पराचे अपराधाची क्षमा, सद्गुरु वचन करुनी जतन । तुह्मी मिळवावें आत्मज्ञान । सद्गुरुवचन पाही—नाम स्मरणावांचूनी एक पळ वाया न जाई स्वानंद समाधान राही दुजी इच्छा उरली नाहीं. प्रेम पुरस्कार मनवृत्ती नामापरती नाहीं—प्रीति सुख दुःख अपकीर्ती संतोष राही—मन करी नामस्मरण वृत्ती स्वस्वरूपाकार होय लोचन, चित्ती राखी समाधान सत्य वागावें रात्रंदिन. ॥ श्रीराम ॥

## परमेश्वरप्राप्तीचीं साधनें

ता. १४–५–१९०८ मुक्काम गोंदवले.

१ मनोजय.
२ वृत्तिजय.
३ वासनाक्षय.
४ अलक्ष्य लक्ष.
५ व्यवहार दक्ष.
६ न देखे परधन परजाया.
७ राहे सदा स्वानंद–स्मरणांत.

## पोथीचें सार

मुक्काम गोंदवले. ॥ श्रीराम ॥ मंगळवार ता. ५-५-१९०८.

श्रीगणेशाय नमः ॥ ज्ञान भक्तीचें भांडार, जेणें भवसिंधू उतरे पार तेंच साधन. प्रथम अहंभाव रहित अक्रोध, निष्काम, निर्लोभ, भूतदया, सर्वांभूतिं नम्रता, जनप्रियत्व, निर्वासना, सुखदुःख समसमान, तसेंच मानापमान, हर्ष विषाद एकजाण, परपीडा, परनिंदा, परद्रव्य, अपहार करूं नये. परद्वार प्राण जाईतोंपर्यंत करूं नये, नास्तिकाशीं भांडूं नये, भक्तिमार्ग सोडूं नये, नाम भक्तिज्ञान, नामस्मरण, तुच्छ करून सांगेल तर ऐकूं नये. सद्गुरुवचन ढळूं नये. अखंड, सतत, निरंतर स्वानंदांत विसरूं नये. व्यवहार अवघा लौकिक करुनि जतन स्वधर्म वेदशास्त्र साधू ब्राह्मण त्यांची आवड परिपूर्ण. सदा सत्य वर्तन. मिथ्या बोलूं नये भाषण. अक्षय रहावें समाधान. विवेक वैराग्य सहित भक्ती असावी अंतरांत. स्वाधीन करावें आपलें चित्त, सतत नामस्मरण हृदयांत. अधर्मी, दुष्कर्मी, असत्य, कामविषयासक्त, जुलमी, साधु ब्राह्मण मातापिता, भूपति यांचा द्रोह करणारा त्याची संगत धरूं नये. आपण तसें वागूं नये. आपले उपासनेस कोणी बाधा आणील अथवा सद्‌गुरूस निंदील त्याचेइतका तुच्छ दुसरा कोणीं जगतांत समजूं नये, परंतु त्याचें वैर आपण करूं नये. अंतःकरण त्यापासून दूर असावें.

## उपदेशसार

ता. ११–५–१९०८.

अतिसुक्ष्म विवेकानें वागावें. प्रथम पितृआज्ञेप्रमाणें त्याचें मानाप्रमाणें वर्तन. स्वधर्म करावा रक्षण. सतत स्वाधीन ठेवावें मन. स्वानंद स्वरूप कधीं विसरूं नये. कामक्रोधाची लहरी विवेकानें करी ठार. क्रोध कधीं येऊं देऊं नये. वृथा भ्रमासी भुलूं नये. जारण मारण शिकूं नये. किमयाचे नादांत पडूं नय. सिद्धीमागें लागूं नये. गर्वानें राहूं नये. कोणाचे जीवास तुच्छ करूं नये. विश्वासघात कोणाचा करूं नये. असत्य भाषण करूं नये. नीच संगती धरूं नये. कारणावांचून बोलूं नये. काय हेतूवर मनुष्य बोलत आहे हें समजल्यावांचून उत्तर देऊं नये. शास्त्राधार मोडूं नये. कुलधर्म कुलाचार सोडूं नये नास्तिकाशीं तंडूं नये. कुभांडयाशीं भांडूं नये. वाद कोणाशीं घालूं नये. आपण वाईट वागूं नये. काळजी भीति बाळगूं नये. आळशी स्वभाव ठेवूं नये. मेलें अन्न खाऊं नये, पर दुःखीं हसूं नये. नीच द्रव्य सेवूं नये. अधर्म करूं नये. स्नानसंध्या सोडूं नये. भक्तिविरहित ज्ञान सांगेल त्याचे ऐकूं नये हर्ष विषाद,

मान अपमान, सुखदुःख समसमान. आपण अणुरेणुपेक्षां लहान. जग परब्रह्म समान याची आस्था पाहिजे परिपूर्ण. वेदशास्त्र, साधु, ब्राह्मण, स्वधर्म—सत्कर्म-नित्यनेम, पूजा, प्रातःकाळीं स्नान अध्यात्म भाषण मनन, चिंतन-निदिध्यास, नामस्मरण यांशीं न चुके श्वासोश्वास असा करावा अभ्यास या जगांत सत्यासारखें सुख नाहीं. असत्यासारखें दुःख नाहीं. समाधाना-सारखी श्रीमंती नाहीं. मन जिंकणें यासारखा राजा नाहीं. शांतीसारखें ऐश्वर्य नाहीं. परपीडेसारखें पाप नाहीं. परस्त्रीसारखें या लोकीं व परलोकीं हानी नाहीं. विश्वासघातासारखा दोष नाहीं. सतती संपती कीर्ती माझी म्हणणें या-सारखी भूल नाहीं. परद्रव्य परदारा यांच्या ठिकाणीं सक्तीसारखें दुसरें नरकाचें साधन नाहीं. मनुष्यजन्मास येऊन काय करावें व काय न करावें याचा विचार करावा. वेदशास्त्र साधूंनीं आज्ञा केल्याप्रमाणें वागावें, परदोष न काढावे. वृद्धाचार सोडूं नये. कुळाचार मोडूं नये नीच संगती धरूं नये. निंदा कोणाची करूं नये. पराचे अंतःकरणास दुखवूं नये. वर्म कोणाचें काढूं नये. कारणावांचून बोलूं नये. खरें खोटें पक्कें जाणल्याशिवाय बोलूं नये. उर्मी कधीं येऊं नये. केला उपकार बोलूं नये. संसारांत उणें पडूं नये. उत्पन्नापेक्षां जास्त खर्च करूं नये. कर्ज कोणाचें काढून भलतें काम करूं नये. माता पिता देव ब्राह्मण साधु यांचा छळ करूं नये. त्यांबरोबर अमर्यादेनें राहूं नये. कांहीं अधिकार असल्यास लांच घेऊं नये. वैर कोणाशीं धरूं नये. दुसऱ्याचें चांगलें पाहून त्रासूं नये. परदुःखीं हासूं नये. कुटुंबाचे लोकांस आपले अधिकारांत त्रास देऊं नये. कोणास विश्वास देऊं नये. आपला मूर्खपणा शेवटास नेऊं नये. खोटी साक्ष देऊं नये. औषध देणा-रानें पथ्य सांगितल्यास त्याच्या विरुद्ध वागूं नये.

# गीता-शास्त्र.

१ सर्व वेदशास्त्रांचें मंथन करून भगवंतांनीं गीताशास्त्र हें साऱ्या जगाला दिलें आहे. निमित्त अर्जुनाचें पण पोट भरावें प्राणिमात्रांचें अशा उदार संकल्पानें श्रीकृष्णमाउली पान्हावली व जगाला सर्वोत्तम असें गीता-शास्त्र मिळालें. हिंदुस्थानांतल्या संस्कृत व सर्व प्राकृत भाषांतून इतकेंच काय पण जगांतल्या सर्व भाषांतून गीतेचीं भाषांतरें, रूपांतरें, टीका, भाष्यें, वार्तिकें वगैरे असंख्य झालीं आहेत. भरतखंडांत तर गीता-शास्त्र निर्माण झाल्या-पासून असा एकही विवेकी पुरुष निर्माण झाला नाहीं कीं, ज्याला गीतेनें मोहित केलें नाहीं. प्रत्येकाला वाटतें कीं, मला कांहीं नवीन कळलें आहे व मीं तें जगाला सांगितलेंच पाहिजे. गीतामहासागराच्या तळाशीं किती अनर्घ्य रत्नें पडलीं आहेत याचा संपूर्ण पत्ता कोणालाही लागला नसेल ! ज्याला जें पाहिजे तें त्याला गीतामाउली पुरवीत आहे. ज्ञान पाहिजे त्याला गीता ज्ञान म्ह० कैवल्य देते, भक्ति पाहिजे त्याला भक्ति देते, विहित कर्म पाहिजे तर कर्म देते, व देशकालवर्तमानानुसार ज्याला देशभक्ति पाहिजे त्याला देशभक्तीचाही खाऊ गीता माउली देत असते ! गीतेनें अमृतप्रपा म्ह० अमृताची पाणपोई उघडली आहे व ज्याला जो मनोरथ असतो तो ती पूर्ण करिते. ज्ञानी, कर्मी, योगी, सगुणप्रेमी, निर्गुणी, देशभक्त या सर्वांच्या त्यांच्या त्यांच्या मनोगतानुसार गीतामाउली समाधान देत असते. अज्ञ, सुज्ञ, कामी, निष्कामी, कर्मी, ज्ञानी व भक्त या सर्वांना मोहून टाकणारी गीता-माउली सारखी दुसरी कोणी नाहीं.

२ गीता-शास्त्राचें संपूर्ण अध्ययन करावयाचें आहे त्यानें आमच्या मतें चार ग्रंथ जवळ ठेवून गीतार्थ पहावा. १ श्रीमदाचार्यांचें गीताभाष्य. २ श्रीज्ञानेश्वरमहाराजांची भावार्थदीपिका उर्फ ज्ञानेश्वरी. ३ वामन पंडितांची यथार्थदीपिका व ४ टिळकांचें गीतारहस्य. हे चारही ग्रंथ आपापल्या परीनें चांगले आहेत, तरी ' तथापि भक्तिस्तरुणेंदुशेखरे ' या न्यायानें आमच्या-पुरता विचार सांगावयाचाच झाला तर आमची पहिल्यापासून भक्ति ज्ञानेश्वरी-वर आहे. आमच्या अत्यंत आवडीचा ग्रंथ ज्ञानेश्वरी आहे. व गीतेचें रहस्य ज्ञानेश्वरींत पूर्णत्वानें सांपडतें असा आमचा विश्वास आहे. ज्या मुखानें गीता प्रगट झाली त्याच मुखानें ज्ञानेश्वरी प्रगट झाली आहे. गीतेची

थोरवी काय आहे व अठरा अध्यायांत कोणते विषय कसे सांगितले आहेत हें आज आपण श्रीज्ञानेबामाउलीच्याच मुखानें ऐकूं.

३ ज्ञानेश्वरीच्या आरंभीं, शेवटीं व मधून मधून गीताशास्त्राबद्दल महाराजांनीं जे प्रेमोद्गार काढले आहेत ते कोणाच्याही मनांत गीतेविषयीं उत्कट प्रेमच उत्पन्न करतील. वेदशास्त्रपुराणांचा अर्क महाभारत, महाभारताचा अर्क गीताशास्त्र, व गीताशास्त्राचाही अर्क गीतेचा नववा अध्याय. तथापि तो अध्यायही एकंदर गीताप्रासादाचाच मध्य भाग म्ह० हृदय असल्यामुळें एकंदर गीताशास्त्रावलोकनाशिवाय त्याचें रहस्य आकळत नाहीं.

( १ ) आतां भारत कमलपराग । गीताख्य प्रसंग ।
जो संवादला श्रीरंग । अर्जुनेसी ॥ ५० ॥ ( अ० १ )

( २ ) साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र । पैं संसार जिणतें शस्त्र ।
आत्मा अवतरवी ते मंत्र । अक्षरें इयें ५७७ ॥
हें बोलों काय गीता । हे माझी उन्मेषलता ।
जाणे तो समस्ता । मोहा मुके ॥ ५८३ ॥ ( अ० १५ )

( ३ ) हें गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचें मथित ।
आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ॥ १३२३ ॥
कीं गीता हे सप्तशती । मंत्रप्रतिपाद्य भगवती ।
मोहमहिषा मुक्ती । आनंदली असे ॥ १६६७ ॥
म्हणोनि मज कांहीं । समर्थनीं आता विषय नाहीं ।
गीता जाणा हे वाङ्मयी । मूर्ति श्रीप्रभूची ॥ १६८५ ॥
शास्त्र वाच्यें अर्थे फळे । मग आपण मावळे ।
तैसें नव्हे, हें सगळें । परब्रह्मचि ॥ १६८६ ॥
कैसा विश्वाचिया कृपा । करूनि महानंद सोपा ।
अर्जुनव्याजें रूपा । आणिला देवें ॥ १६८७ ॥ ( अ० १८ )

ज्ञानोबारायांच्या सांगण्याचा सारांश असा आहे, " गीताशास्त्र " हें अनुभवाचें शास्त्र आहे. बोलाचा म्ह० शब्दाचावटीचा, तर्काचा, हा विषय नाहीं हीं गीतेचीं अक्षरें म्ह. आत्मानुभव अंगीं संचरविणारे मंत्र आहेत. भगवंताची ही ज्ञानविवेकलता आहे. देवाच्या स्फूर्तिचीं हीं अक्षरें ज्याला यथार्थ कळतील तो पूर्ण मोहनिर्मुक्त होईल, त्याचें अज्ञान सरेल. गीता हें सर्व वाङ्मयाचें मथित आहे, वेदशास्त्रमंथन करून काढलेलें हें नवनीत आहे, आत्माख्य रत्न यानें हस्तगत होतें. सातशें श्लोकांची ही सप्तशती मोहमहिषासुराचें मर्दन करून त्याला मुक्ति देणारी साक्षात् भगवतीच होय. अधिक समर्थन करायचें कारण

नाहीं, गीता ही श्रीकृष्णपरमात्म्याची वाङ्मय मूर्तिच आहे. बहुतेक शास्त्रें वाच्य जो अर्थ तो पदरांत टाकून आपण मावळतात, तशांतलें हें गीताशास्त्र नव्हे; हें वाच्य वाचक उभयरूपानें प्रत्यक्ष परब्रह्मच आहे. येथें वाच्य परमात्मा आणि वाचकही परमात्मा, याचा अर्थ आणि शब्द दोन्ही कृष्णरूपच आहेत. भगवान् श्रीकृष्णप्रभूचे काय उपकार सांगावेत कीं त्यानें अर्जुनाचें निमित्त करून विश्वावर दया केली व महासुख सुलभ करून ठेवलें !" गीताशास्त्राचें रहस्य इतक्या मधुर व यथार्थ शब्दांनीं कोठें वर्णन केलेलें आढळेल ? जीवांचा मोहनिरास करणारें व आत्मस्वरूपाचें दान करणारें हें गीताशास्त्र आहे.

४ गीतेचा प्रसंग सर्वांस माहीतच आहे. स्थान कुरुक्षेत्र उर्फ स्थानेश्वर आजच्या दिल्लीजवळ आहे. हें ७० मैल लांब व २० मैल रुंद आहे. या क्षेत्राचे कुरुक्षत्र व धर्मक्षेत्र असे दोन विभाग आहेत. धर्मक्षेत्रांत कौरवपांडवांचीं शिबिरें होतीं. या शिबिरांत जो जाईल त्याच्याशीं युद्ध करीत नसत. यांत सांप्रत दोन तलाव व अनेक मंदिरें आहेत. तलावाचें नांव स्यमंतपंचक. तेथें सूर्यग्रहणाचें वेळीं आजही मोठी यात्रा भरते. येथेंच पांडवांनीं पुढें धारातीर्थीं पडलेल्यांना तिलांजलि दिली. स्यमंतपंचकाच्या मध्यभागीं श्रीकृष्णमंदिर आहे, लक्ष्मीतीर्थाजवळ ज्योतीश्वराचें शिवालय बांधलें आहे तेथें भगवंतांनीं अर्जुनाला गीता सांगितली. गीतेचें जन्मस्थान तें ! जवळच विश्वरूपेश्वर आहे तेथें देवानें आपलें विराट् स्वरूप अर्जुनाला दाखविलें.

५ गीतेच्या १८ अध्यायांत अध्यायवार विषय कोणते सांगितले आहेत ? 'जन्यजनक भावें । अध्याय अध्यायानें प्रसवे' ज्ञा० एका अध्यायांतून दुसरा व दुसऱ्यांतून तिसरा याप्रमाणें सर्व अध्याय क्रमानें संगतवार निघाले असून ही संगति ज्ञानोबारायांनीं फार उत्कृष्ट लावली आहे. ९ अध्याय हा गीतेचा पूर्व खंड व पुढचे ९ अध्याय हा उत्तर खंड असे ह्मणून त्यांनीं पूर्वखंडाच्या नऊ अध्यायांत कोणते विषय सांगितले आहेत याचें विवरण १० व्याच्या प्रस्तावनेंत केलें आहेः--

(१) अर्जुनाचा विषाद. ( २ ) सांख्यबुद्धीसी भेद दावून कर्मयोग विशद सांगितला आहे. (३) केवळ कर्म प्रतिष्ठिलें आहे. (४) तेंच चतुर्थांत ज्ञानासह प्रगटलें आहे. ( ५ ) योगतत्त्व सांगितलें आहे. ( ६ ) जीवात्मभाव एकवट करणारा योग आसनासगट सांगितला आहे व योगभ्रष्टांची गतिही दाखविली आहे. ( ७ ) प्रकृति परिहार करून पुरुषोत्तमाला भजणारे चतुर्विध भक्त सांगितले आहेत. ( ८ ) सप्त प्रश्नसिद्धि करून प्रयाणसमय शुद्धि सांगितली

आहे. ( ९ ) ‘ ऐसे हे अध्याय गीतेचे । परी अनिर्वाच्यपण नवमाचें ’ हा सारभूत अध्याय सर्वोत्कृष्ट आहे. ( १० ) दहाव्यांत विभूतिविस्तारयोग सांगितला असून ( ११ ) अकराव्यांत विश्वरूप दर्शन अर्जुनास झालें आहे. यांत शांति व अद्भुत अशा दोन रसांचें मिश्रण आहे. अठराव्या अध्यायांत पुन्हां अध्यायांचा विचार करितांना आणखी खुलासा केला आहे. पहिल्या अध्यायांत शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव व दुसऱ्यांत सांख्यसद्भाव सांगितला असून गीताशास्त्र हें ज्ञानप्रधान असून ‘ मोक्षदानीं स्वतंत्र ’ आहे असें म्हटलें आहे. तिसऱ्यांत कर्मकांड असून चौथ्यापासून अकराव्यापर्यंतच्या आठ अध्यायांत देवताकांड व बाराव्या अध्यायांत ज्ञानकांड सांगितलें आहे. वेदांतकर्म, उपासना व ज्ञान हीं तीन कांडें असून गीता ही ‘कांडत्रय रुपिणी । श्रुतीच ही कोडिसवाणी ’ ह्म० लहानशी श्रुतिच आहे असें दाखविलें आहे. तात्पर्य गीतेंत कर्म, उपासना व ज्ञान हीं तीनही सांगितलीं असून गीता अद्वैत भक्तिप्रधान आहे असें ज्ञानोबारायांचें म्हणणें आहे ज्ञानेश्वरीनें योगच गीतेंत मुख्य आहे असें म्हटल्याचें गीतारहस्यकार सांगतात तें बरोबर नाहीं. गीता ज्ञानभक्तिप्रधान आहे असें ज्ञानेश्वरमहाराजांचें सांगणें आहे. सहाव्या अध्यायांत अभ्यासयोग सांगतांना अभ्यासमार्गांत योग हा ‘ पंथराज ’ आहे असें त्यांनीं म्हटलें आहे खरें; पण सर्व गीतेचें तें रहस्य आहे असें त्यांनीं म्हटलेलें नाहीं. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात ओव्या १२०० पासून १२७० पर्यंत पाहाव्यात म्हणजे ज्ञानोबारायांचा सिद्धांत कळून येईल. ‘ देव बोलिले एक । जे दुजें नाहीं ’ ( १८—५८ ) ‘ आत्मा अवतरवी ते मंत्र । मूर्त इये ’ आत्मत्वें मज एकातें । अद्वय भक्ती जाणोनि निरुतें ’ ‘ तया अध्यात्मशास्त्रासी । जै साचपणाची ये पुर्णी । तैं येइजे जया ठायासी । ते हे गीता ॥ ’ ‘ येथ अविद्या नाश हें स्थळ । तेणें मोक्षोपादान केवळ ॥ या दोन्ही केवळ । साधन ज्ञान ’ इत्यादि अनेक स्थळीं ज्ञानोबारायांनीं आपलें मत प्रांजळपणें सांगितलें आहे. गीता अध्यात्माचा ग्रंथ आहे, मोक्षदान करणारा आहे, मोहनिरास करून तळहातींचा जसा आवळा तसा आत्मा प्राप्त करून देणारा ग्रंथ आहे, हा सांख्यसिंधु ह्म० ज्ञानसागर आहे. अखंड स्वस्वरूपानुसंधान हीच भक्ति असें आचार्यांप्रमाणें ज्ञानोबांचेंही सांगणें आहे.

ज्ञानी इयें स्वसंवित्ति । शैव ह्मणती शक्ति ।
आह्मी परमभक्ति । आपुली ह्मणों ॥ १८–११३३ ॥

ज्ञान तेंच भक्ति व भक्ति तेंच ज्ञान. गीता ज्ञानप्रधान ह्मणा, भक्तिप्रधान ह्मणा किंवा ज्ञानभक्तिप्रधान ह्मणा सर्वांचें तात्पर्य एकच आहे.

# एका चरणाचे वीस अर्थ ! !

अशोकवनिकेंत रावण सीतादेवीकडे आला असतांनाः—

**तृणमन्तरितः कृत्वा प्रत्युवाच शुचिस्मिता ।**

म्हणजे एक गवताची काडी आड धरून तिनें निर्मळ हास्य करून उत्तर केलें—एवढाच याचा साधा अर्थ आहे. वाल्मीकिमुनींच्या कल्पनेनेंही आले नसतील, इतके अर्थ किंवा अर्थध्वनि या चरणांतून एका मद्रासी कल्पकानें काढले आहेत ! तृण अंतरित करण्यांत सीतामाईचे हेतु काय असावेत ? कीं स्मितपूर्वक भाषण करण्यांत सीतादेवींनेः——

( १ ) अनेक दिव्य गुणांला कलंक लावणाऱ्या स्त्रीलोलुपतेच्या रावणाच्या दुर्गुणाबद्दल दया प्रकट केली.

( २ ) असा स्त्रीलंपट पुरुष रणांगणावर उभा राहण्याचें धाडस करील कीं नाहीं याविषयीं संशय प्रगट केला.

( ३ ) पेरावें तसें उगवेंत या कर्माच्या सिद्धांताविषयीं त्याचें अज्ञान पाहून हास्य केलें.

गवताची काडी कां धरली ?:—

( १ ) अतिथीला बसायला आसन देणें हा गृहधर्म होय. तेथें सीतादेवीजवळ रावणाला द्यायला दुसरें आसन नसल्यामुळें तिनें एक गवताची काडी पुढें केली !

( २ ) छळक रावण व आपण यांच्यांत स्थानभेद करण्यासाठीं तिनें काडी मध्यें धरली !

( ३ ) धर्माप्रमाणें सतीनें परपुरुषाशीं भाषण करणें अयोग्य म्हणून तिनें त्याला उद्देशून पण गवताच्या काडीकडे पाहून भाषण केलें.

( ४ ) गवताच्या काडींत शहाणपण किंवा बुद्धि आहे ती जडात्मक रावणांत नाहीं हें दर्शविण्यासाठीं काडी पुढें केली.

( ५ ) तुझ्यांत मनुष्यत्व नसून गवत खाणाऱ्या पशूंपैकींच तूं एक आहेस असें रावणाला सुचविण्यासाठींच तिनें काडी पुढें केली !

( ६ ) परस्त्रीलोभानें प्रवृत्त झालेला रावण गवताच्या काडीसारखा क्षणार्धांत नाश पावेल असें सुचविलें.

( ७ ) रावणाची सर्व संपत्ति व वैभव मी तृणप्राय समजतें असें सुचविलें.

( ८ ) लोभमत्सरादि दुर्गुणांपासून तूं मुक्त नाहींस त्यापेक्षां ही गवताची काडी बरी असें तिनें रावणास सुचविलें.

( ९ ) स्तंभातून प्रगट होणाऱ्या नृसिंहाप्रमाणें परमात्मा गवताच्या काडींतून तुझा सत्यानाश करील असें रावणास सुचविलें.

( १० ) रावणाचा नाश माझा राम खास करील असें तृणाची शपथ घेऊन सांगितलें.

( ११ ) मी पातिव्रत्यतेजानें तुला तृणासारखा तुच्छ करून सोडीन असें ध्वनित केलें !

( १२ ) महाविष्णूनें शुक्राचा डोळा फोडला तसा हें तृण डोळयांत घालून तुझा डोळा फोडीन अशी रावणास धमकी दिली.

( १३ ) ह्या गवताच्या काडींत जणूं ती आपलें पातिव्रत्यतेज ओतून त्या काडीचें रावणनाशार्थ महास्त्र तयार करीत आहे असें सुचविलें.

( १४ ) ह्या गवताच्या काडीइतके तुझ्या शरीराचे तुकडे करीन असें तिनें रावणाला समजाविलें.

( १५ ) पातिव्रत्यधर्मापुढें हें जीवित मी तृणतुल्य लेखतें असें तिनें रावणास उत्तर केलें.

( १६ ) रामाच्या हातून सर्वस्वनाश झाल्यावर तुला गवतांनीं उभारलेल्या झोपडींत राहण्याचा प्रसंग येणार असें कळविलें.

( १७ ) रावणाकडे न पाहतां गवताच्या काडीकडेच पाहण्यांत तिनें आपला शुद्ध निर्धार कळविला.

---

# शहाणपणाचे उद्गार !

इजिप्त ( मिसर ) देशांतला सत्पुरुष ' असीनिमष्ठ ' म्हणतोः--

१ खळदुर्जनांचा संबध पडला तर तूं क्षमावृत्तीनें वाग व परमेश्वर त्यांचा यथायोग्य विचार करील असें मान, कां कीं त्यांच्यावर यापुढें दया करण्याचें परमेश्वराचे मनांत असेल.

२ देवाला संपूर्ण चित्त दे. ज्या सहा फूट जमिनीवर तूं निजतोस तीच लबाडीनें मिळविलेल्या सहा हजार फूट जमिनीपेक्षां अधिक आहे असें मान. ( पहिल्या जमिनीवर तुला शांत सुखाची निद्रा येईल. )

---

# श्रीकृष्णाची चेंडूफळी

( प्राचीन मानभावी कवि **जयराम** यानें ही श्रीकृष्णाची कंदूकक्रीडा फार बहारीनें वर्णिली आहे. )

संशोधक—**विनायक लक्ष्मण भावे**, ठाणें.

अजि अजी अहीवर शयन्, मधुर त्याचे गायन्, पडेना चयन् जिवाला जैशी ॥ कुंठ पाहुं साजणीं, कृष्ण माझा हृषिकेशी ॥ धृ० ॥ गेला पळत, मुलासंग खेळत, मला नहि वळत, बाळ जगजेठी ॥ त्यानें जाऊनि खेळ मांडिला यमुनेचे तटी ॥ चेंडुफळी, खेळत वनमाळि, संगाति हाळि, युगळ मोठि हाटीं । दों ठायीं गडी वाटिलें मुलें धांकुटीं । चेंडू हातिं, घेऊनि श्रीपती, उर्ध्व गडि पाहाति, कृष्ण हा कपटी ॥ कंदूक झोंकिला त्यानि अडकला फांटी ॥ चाल ॥ अहो फांटि चेंडु अडकला ॥ गोपानं कृष्ण वेढीला ॥ डाव कधी ना सोडु तुजला ॥ मग हरी, विचारि अंतरीं, निर्विष खरी, करावे यमुनेशी ॥ काळियांचा गर्व हारोणि दावि भक्ताशी ॥ अजि० ॥ १ ॥ मग गडी, करिती वोढांवोढी, चेंडू आणि घडी, बोले बोलेंभद्र । आतां कशाश पाहतां स्वामी माग मोहर ॥ मग वेटी, कसुनि बळिकटी, दव जगजेटी, गेले कळंबावर । टकमका पांहु लागलें गवळ्यांचे पोर ॥ वर उभा, कर्दळिचा गाभा, प्रकाश गेला नभा, मूर्ति गुलज्यार । त्यांचा ब्रह्मादिकांशी नकळे अंत ना पार ॥चाल॥ अहो पार, हालविली डहाळी ॥ चेंडु पडला गेला पाताळीं ॥ काळियानें घेऊनि करकमळीं ॥ मग झोकुन्, उडि दिली फेकुन्, गोप गेले हुकून्, भ्याले मनांशीं ॥ आतां काय जाउन सांगावे याचे आइबाशी ॥ अजिअजी० ॥ २ ॥ मदुसुदन्, सुखाचे सदन्, बुडाले रतन, यमुनाजळीं ॥ अवघ्यांनि केला कोल्हाळ शंख नादाळी ॥ सांगु चला, याचे आइबाला, कृष्ण बूडाला, गेला पाताळीं ॥ अशी वार्ता जाउनि सांगितली नंदा जवळीं ॥ नारिनर, मिळुनि अपार, वर्षला कहर, नंद राऊळीं । गडबडा लोळि यशदा मनीं तळमळी ॥ चाल ॥ तळमळी कृष्ण मशि दावा ॥ कुंठ पांहू प्राण वीशावा ॥ कुणि तरी आणुनि भेटवा ॥ अशि रडत, वाटिने पडत, मनीं चरफडत, गेली यमुनेशी ॥ कुठें बुडाला कृष्ण पुसे गोपांशी ॥ आजिअजी० ॥ ३ ॥ मुलें मिडन, दविति दुरुन, येथेंचि गेला बुडून, विश्वांभर ॥ **नंदान केला अकांल बुडाला घर ॥ मग गोपि, यमुनेवर कोपि**

चला ग जाऊं अपि, आणु शार्ङ्गधर ॥ यश्वदा येम् भगनिला पमरती पद्र ॥ दे ग बाळ, नको मोडु खेळ, होय कृपाळ, सखे मजवर ॥ कवि तिच्या सुताला करितो नमस्कार ॥ चाल ॥ पुत्राचे देई मशि दान ॥ घे पूण्य पद्रि बांधून ॥ दिपकाविण मंदिर शूण्य ॥ हरिविण, गमत नांहि क्षण, काय वाचुन, व्यर्थ जन्माशी ॥ तूं यमाची भागिनी दया असे तुज कैची ? ॥ अजिअजी० ॥ ४ ॥ काळियांच्या जाउनि आंगणि, देवचक्रपाणि, ठाण मांडुनि, उभाराहिला टकमकां पांति नागिणी त्याचे स्वरुपाला ॥ जाये येथुन, जिवांस फार जपुन, चेंडु गेला गुंतुन, काळि उशाला ॥ तो जागृत होतां, सगळचि ग्राशिल तुजला ॥ श्रीरंग, मूर्ती अभंग, होउनि निःसक, चरणु आपटीला थराथरां कांपली धरणी जागा जाला ॥ चाल ॥ अहो जाला काळ वीषार ॥ गरगरां भंवडी नेत्र ॥ करकरा चात्रि अधर ॥ घालि झडप, चात्रि कडकडप्, अंगाशि तिन वेढप्, अवळि देवांशी त्यानि विश्वरूप धरियला महंता वेषी ॥ अजिअजी० ॥ ५ ॥ शरिरांस लागली कळ, करित चुळबुळ, उकलितां पिळ, झाला हिंपूटी ॥ गरगरां भवंडुनि झोकुनि दिला सेंपूटी ॥ मु लिची लावितां ध्वनीं, डोलवी फणी, वैरभावु मणी, विसरला कपटी ॥ लट्दिशी उडाला--कृष्ण -वळगला पृष्टी ॥ नागिणी आल्या धावुनि, कर जोडुनि, पद्र पसरुणि, म्हणति परमेष्टी ! ॥ दे चुडेदान अम्हांसि देव जगजेठी ॥ चाल ॥ जगजेठि झाला कृपाळ ॥ आला शरण काळियाव्याळ ॥ शिरिं हस्त ठेवि कृपाळ ॥ नेतो वर, नाकांमधि दोर, घालुनि सत्वर हाकित्त काळियांशी ॥ चेंडु आणुनि देति नागिणी श्रीकृष्णापाशी ॥ अजिअजी ॥ ६ ॥ अहिवरीं देवो बैसला, जळांवरि आला, भरत यमुनेला, अपरंपार ॥ गोंवळांनि पाहिला सर्प पळालें दूर ॥ गोड ह्याला, कृष्ण लागला, म्हणुनि वरि आला, बहुत शोकला, खायला पोर ॥ अवघ्यांचा मनोरथु जाणे परमेश्वर ॥ भिउ नका, आलो मी सखा, चेंडु हा देखा, सकळ गोपिका, पाहाति न्यार ॥ चला गड्यानो लवकरि डाव आपुलां घ्यारे ॥चाल॥ आला द्वारकेचा राणा ॥ यश्वदे लाविला स्थनां ॥ दरदरुन फूटला पान्हा ॥ जालां हरिख, आला यदुनाइक, जिवां सुखदायक, भेटि सकळांशी ॥ जयराम म्हणे भगवंता तारि अम्हांशी ॥ अजिअजी० ॥ ७ ॥

# स्फुट विचार.

## १ राष्ट्रीय जागृतीचीं चिन्हें.

डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व पुढारी बेळगांवास जमून राष्ट्रोन्नतीच्या उपायांचें चिंतन व विचारविनिमय करण्यांत गुंग झाले होते. गोरक्षण परिषद, हिंदुमहासभा, विद्यार्थी परिषद, ब्राह्मणेतर परिषद, जैन परिषद, रेल्वेउतारूपरिषद, संस्थानप्रजा परिषद, होमरूल-लीग, हिंदमहिला परिषद, हिंदीप्रचारिणी सभा, शिक्षणपरिषद, संगीत परिषद, अस्पृश्यतापरिषद, सामाजिक परिषद इ० अनेक परिषदांनीं राष्ट्रीयसभेच्या महापर्वणींत आपापलीं कार्यें उरकून घेतलीं व सर्वांनीं आपापल्या विचाराप्रमाणें राष्ट्राचा गोवर्धन उचलून धरण्यांत आपापल्या चिमुकल्या करांगुली लावल्या. ह्या सर्व चळवळींच्या समुच्चयात्मक कार्यानेंच राष्ट्राचा गाडा पुढें ढकलत असतो. ध्येय जितकें उदात्त, परंपरा जितकी चोख,कार्यनिष्ठा जितकी उज्वल, चारित्र्य जितकें शुचिर्भूत,धर्मनीतीचा पाया जितका मजबूत, भगवंताच्या अधिष्ठानावर विश्वास जितका अढळ, आत्मदोषांची जाणीव जितकी तीव्र, सुधारण्याची इच्छा जितकी उत्कट तितक्या मानानें व्यक्ति, संस्था किंवा राष्ट्र यांची उन्नति होत असते तीस वर्षांपूर्वीचा हिंदुस्थान आज राहिला नाहीं, त्याच्या अंगांत चैतन्याविर्भाव निःसंशय झाला आहे. जगांतील राष्ट्रांच्या शर्यतींत हिंदुस्थानचें घोडें मागें आहे ही जाणीव सर्वांना टोंचीत आहे. आपलें कोठें तरी चुकलें आहे व तें सुधारलें पाहिजे असें सर्वांनाच वाटत आहे. प्रत्येक चळवळींतून कांहींना कांहीं तरी चांगलें असेंच निघेल. कांहीं चळवळी आपलें कार्य करून नामशेष होतील. निसर्गाच्या नियमाप्रमाणें ज्या व्यक्तींचें किंवा चळवळींचें कार्य झालें त्या अपाप निघून जातात. आज ह्या चळवळी राष्ट्रांत चैतन्याचा संचार झाल्याचें दर्शवींत आहेत, परमात्म्यानें हिंदुस्थानरूपी निद्रित कुंभकर्णाला जागें केलें आहे, तो आतां आपलें उद्दिष्ट साधल्याशिवाय राहणार नाहीं. सर्व चळवळींचा आत्मा राष्ट्रीयसभा आहे व सर्व पुढाऱ्यांचा पुढारी राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष महात्मागांधी हे आहेत.

## २ राष्ट्रीयसभा व महात्माजी.

महात्माजींची साधुवृत्ति, त्यांचा समतोलपणा, स्वदोषपरीक्षणाचा त्यांचा

मनमोकळेपणा, त्यांची उत्कट देशभक्ति, त्यांची व्यापक राजकारणपटुता, ' सकल लोक एक करावे ' हा त्यांचा महामंत्र इ० सर्व लोकोत्तर गुणांमुळें यंदांची राष्ट्रीय सभेची बैठक अपूर्व झाली यांत संशय नाहीं. युरोपिअन पोषाखांत युरोपिअन विचारांचे अध्यक्षच आजवर प्रायः राष्ट्रीयसभेला मिळाले होते. अत्यंत साध्या राहणीचा सर्व लोकप्रिय असा ' लोकांचा पुढारी ' यंदांच कर्नाटकच्या भाग्यानें राष्ट्रीय सभेला लाभला. कर्नाटकची महात्माजींवर भक्तिही अनन्य आहे. कर्नाटकाचा प्राचीन उज्वल इतिहास स्वागताध्यक्ष रा. गंगाधरराव देशपांडे यांच्या भाषणांत थोडा फार प्रगट झाला. शिवाजी-महाराजांचा उदय झाल्यावर महाराष्ट्राचा जसा भाग्योदय झाला तसा कर्नाटकाचा विजयानगरच्या कारकीर्दींत झाला होता. विजयानगरचें ऐश्वर्य शिवबांच्या जन्मापूर्वीं ७५ वर्षेंच अस्तंगत झालें, पण तत्पूर्वीं कर्नाटकानें आपल्या पराक्रमानें सारा दक्षिणहिंदुस्थान दुमदुमून टाकला होता. श्रीशंकराचार्य, श्रीरामानुज, श्रीमध्व हे वेदांतधर्माचे तीन आचार्य कर्नाटकानें भरतभूमीस दिले आहेत. विद्यारण्यस्वामी कर्नाटकीच होत. वेदांतधर्माची मोठी सेवा कर्नाटकप्रांतानें केली असून कर्नाटकांत मोठमोठे वीर, मुत्सद्दी, कवि, संत, कलाकुशल थोर पुरुष झाले आहेत. गेल्या चार वर्षांत महात्माजींच्या उपदेशानुसार एकनिष्ठेनें वागण्यांत कर्नाटकानें पहिला नंबर पटकाविला आहे. तेव्हां महात्माजींच्या दर्शनार्थ चोहोंकडचे हजारों लोक जमले होते यांत नवल नाहीं.

## ३ महात्माजींचें भाषण.

महात्माजींची विभूति जशी अपूर्व तसें त्यांचें भाषणही अपूर्वच झालें. त्यांत देशभक्ति जशी उज्वल स्वरूपांत दिसली तसेंच त्यांचे इतर लोकोत्तर गुणही त्यांच्या भाषणावरून स्पष्ट दिसले. विलक्षण साधेपणा, कळकळ, उन्नतत्व, ऐक्य घडवून आणण्याची तत्परता, ऐक्यासाठीं आपले कांहीं विचार मागें घेण्याची तयारी इ० गुणांबद्दल त्यांच्या प्रतिपक्षीयांनींही धन्यताच गायिली आहे. सरकारच्या कृत्यांबद्दल पूर्वींचें अध्यक्ष कडक टीका करून शेवटीं सरकारकडे अर्ज व विनंत्याच करीत; पण १९२० सालीं गांधीजींकडे राष्ट्राचें कर्णधारत्व आल्यापासून त्यानीं लोकांकडे पाहायला पुढाऱ्यांना शिकविलें. आपलें चुकतें कोठें, आपल्यांत कोणते दुर्गुण आहेत, आपले दोष घालवावेत कसे, आपसांतले मतभेद ठेवूनही आपण ऐक्य करावें कसें अशी अंतर्मुखता त्यांनीं उत्पन्न केली आहे. ३५ वर्षे कांग्रेस बहिर्मुख होती ती त्यांनीं अंतर्मुख केली. आपल्या पायाशीं भांडा, इतरांस दोष देण्यापेक्षां आपलें दुर्गुण काढून टाका, स्वराज्य जवळ आहे अशी त्यांची शिकवण आहे. ' लोक दोष

आचरती । तेणें दोषें भस्म होती ' अशी समर्थांचीही शिकवण असे. असहकारितेमुळें आपल्या शक्तीचा लोकांना अंदाज करितां आला, खालचा समाजही जागा झाला, कैद किंवा छळ व नानाविध आपत्ती सोसण्याची लोकांत ताकद आली; तरी आपसांत फूट पडल्यामुळें ती बुजविण्यासाठीं, स्वराज्य पक्षाला व इतरांलाही मिळवून घेण्यासाठीं कांहीं काळ ती बाजूला ठेवून सर्वांनीं एकमतानें खादी व चरखा यांकडे लक्ष पुरविणें हें सर्वांचें आद्य कर्तव्य आहे, असें त्यांनीं मोठया कळकळीनें सांगितलें. खादीची चळवळ चालू ठेविल्यानें दरसाल ७० कोट रुपये परदेशी जातात त्यांना आळा पडेल, खेडयापाडयांत लोकांना उद्योगधंदा मिळून वस्त्रासाठीं परदेशाकडे पाहावें लागणार नाहीं, स्वावलंबनाचा पहिला धडा मिळेल व स्वराज्य तितकें जवळ येईल. वस्त्रासाठीं जो खटाटोप तोच साखर वगैरे परदेशी जिनसांबद्दल करायला पाहिजे. राष्ट्राला बेसुमार मद्यपानाची चटक लावून अनीतीनें सरकार पैसा गोळा करितें त्यालाही पायबंद घालण्यांत आलाच पाहिजे. आधीं वर्षभर सर्वपक्षीय लोकांनीं एकमतानें खादीची चळवळ करून शिकस्तीचे प्रयत्न केले पाहिजेत. महात्माजींच्या भाषणांत हिंदुमुसलमानांचें ऐक्य व अस्पृश्यतानिवारण यावरही असाच जोर देण्यांत आला. त्यांची कांहीं सूत्रप्राय वाक्यें लक्षांत ठेवलीं पाहिजेत तीं अशीं:---

(1) In my humble opinion, India's need is not excitement but solid work.

माझ्या मतानें लोकांचीं मनें उत्तेजित करण्यापेक्षां प्रत्यक्ष भरीव काम करून दाखविणाऱ्यांचीच हिंदुस्थानला जरूरी आहे.

(2) It is a blasphemy to say that God set apart any portion of humanity as untouchable.

मानव जातीपैकीं अमुक भाग ( महार मांग इ० ) हा अस्पृश्य म्हणून परमेश्वरानें वेगळा काढून ठेवला असें म्हणणें हें ईश्वराची निंदा करणें आहे.

ह्मणून अस्पृश्यता काढून टाकण्याचा प्रयत्न करणें हें हिंदुमात्रानें पूर्व पापाचें प्रायश्चित म्हणून केलें पाहिजे. अस्पृश्यवर्गांत स्वतंत्र असा एखादा दुर्गुण किंवा व्यसन आहे असें नाहीं. आपणां चारी वर्णांच्या ( जातींच्या ) अंगीं असलेले दोष आपण न पाहणें व अस्पृश्यांचे दोष पर्वतप्राय मानणें हा आपला गर्विष्ठपणा किंवा अहंकार आपण सोडून दिला पाहिजे. परमेश्वराच्या कृपेची पात्रता ही कांहीं एकाद्या जातीची किंवा राष्ट्राची

मिरास नाहीं, तर जे कोणी देवाला शरण जातील त्यांवर ईश्वरी कृपा होत असते. अन्याय, असत्य व हिंसा यांवर उभारलेला धर्म किंवा राष्ट्र जगांत टिकून न राहतां नामशेष होऊन जाईल.

God is light, not darkness; God is love, not hate; God is truth, not untruth. God alone is great, we his creatures are but dust Let us be humble and recognise the place of the lowliest of his creatures.

परमेश्वर प्रकाशरूप आहे, तमोरूप नाहीं; तो प्रेममय आहे, द्वेषाला तेथें जागा नाहीं; तो सत्यस्वरूप आहे, असत्याचा तेथें वाराहि नाहीं. परमात्मा तेवढा श्रेष्ठ आहे व आपण सर्वच प्राणी त्याच्या चरणाचें रजःकण आहोंत. आपण सर्व लीन होऊं या व अत्यंत हीनावस्थेंतल्या जीवांनाही ईश्वराच्या राज्यांत स्थान आहे हें कबूल करूं या.

## ४ भागवतधर्माची हीच शिकवण आहे.

कांग्रेसच्या अध्यक्षपदावरून भागवतधर्माचें तत्व महात्माजींनीं सांगितलें. असाच उपदेश साधुसंत करीत आले आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. (अ० ९):—

थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।।
जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळिक माझी ॥ २८ ॥
माझिये भक्तीवीण । जळो तें जियालेपण ॥
अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ।। ४३६ ।।
म्हणोनी कुळ उत्तम नोहावें । जाती अंत्यजही व्हावें ॥
वरी देहाचेनि नांवें । पशूचेंही लाभो ।। ४४१ ।।
ते पापयोनी मूढ । मूर्ख जैसे कां दगड ।।
परी माझ्या ठायीं दृढ । सर्वभावें ।।४४४।।
ते पापयोनीहि होतुका । श्रुताधीतही न होतुका ॥
परी मजसी तुकितां तुका । तुटी नाहीं ।। ४४९ ।।
तैसें उत्तमत्व तैंचि तरे । तैंचि सर्वज्ञता भरे ।।
जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥ ४५५ ।।
ह्मणोनि कुळ जातिवर्ण । हें आघवेंचि गा अंतःकरण ।
येथ अर्जुना माझेपण । सार्थक येक । ४५६ ॥

श्रीएकनाथमहाराजही भागवतांत (अ० २) म्हणतात:—

आश्रमादि अवस्था । भक्त न धरी च सर्वथा ।

तैसीच जातीची ही कथा । न घे माथां भक्तोत्तम ॥ ७१३ ॥
जन्मकर्मवर्णाश्रमजाती । पूर्णभक्त हातीं न धरिती ।
चहूं देहांची अहंकृती । स्वप्नींही न धरिती हरिभक्त ॥
समूळ देहाभिमान झडे । तो देहीच देवासी आवडे ।
ते भक्त जाण वाडेकोडें । लडिवाळे हरीचे ॥ ७२१ ॥

देहाभिमान नरकाला नेणारा आहे यांत संशय कसचा ? मी ब्राह्मण म्हणून ब्राह्मणत्वाचा अभिमान किंवा मी शूद्र अतिशूद्र याची खंती हें दोन्ही सोडून सर्वांनीं निरभिमानतया नारायणाला भजावें हें भागवतधर्माचें सार आहे. श्रेष्ठत्वाचा अभिमान वरिष्ठ वर्गांनीं सोडावा व कनिष्ठपणाची लज्जा किंवा वरिष्ठवर्णांचा द्वेष, मत्सर यांनीं सोडावा व सर्वांनीं सर्वाद्य जो परमेश्वर त्याला अनन्यभावें भजावें हा मुख्य धर्म आहे. वरिष्ठ व कनिष्ठ ह्या दोन्ही कल्पना घातक आहेत. देवाचा अनन्य भक्त तो वरिष्ठ. बाकी देहाभिमानानें मत्सर द्वेषानें विटाळलेल्या सर्वच जीवांच्या ठिकाणीं अस्पृश्यत्व आहे ! " म्हणोनि गा पार्था । जे विमुख या परमार्था । तयासी भाषण सर्वथा । करावें ना ॥ जें जें भेटें भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ "

## ५ ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय.

रविवार ता. २१ डिसेंबर रोजीं ठाणें येथें मराठी ग्रंथसंग्रहालयाचा ३१ वा वार्षिक समारंभ काव्यसंग्रहाचे माजी संपादक रा. बाळकृष्ण अनंत भिडे यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला. त्याप्रसंगीं ३१ वा वार्षिक अहवाल चिटणिसांनीं सादर केला. मुंबईचें संग्रहालय निघण्यापूर्वीं ठाण्याचें संग्रहालय स्थापन झालें असून संस्थेचे ४०० मासिक वगणीदार आहेत व चालकांच्या निरपेक्ष श्रमामुळें संस्थेचें कार्य चांगलें चाललें आहे. संस्थेच्या संग्रहीं सुमारें ७ हजार ग्रंथ आहेत. ' मराठी वाङ्मयाची वाढ व प्रसार ' यावर अध्यक्षांचें भाषण झालें. नंतर आमंत्रित पाहुण्यांपैकीं सांगलीचे प्रि. भाटे व रा. पांगारकर यांचींही भाषणें झालीं. रा पांगारकर म्हणाले, " मराठी वाङ्मयाची वाढ व प्रसार कसा झाला, कोणी केला हें साधुसंतांच्या कार्याकडे पाहून समजतें. सालोसाल भाषेंत ग्रंथ किती झाले, पांचशें झाले का पांच हजार झाले यावरून वाङ्मयाच्या वाढीचा अंदाज बांधण्याची अलिकडे पद्धत आहे, पण हजारों गावाळ ग्रंथांनीं भाषेचा प्रसार होत नसतो. कविसंमेलनांतून कवि निघत नाहीं, कीर्तनसंमेलनांनीं हरिदास निर्माण होत नाहीं किंवा साहित्यपरिषदांनीं ग्रंथकार तयार होत नाहींत, तसा भाषेची वाढ आणि प्रसार याचा विचार

आहे. जातिवंत जीवंत वाणीचा ग्रंथकार आधीं निपजावा लागतो. सामान्य जीवांनीं वरीलसारखे उद्योग जरूर करावेत. पण मराठी भाषेची वाढ व प्रसार प्रासादिक वाणीचे जातिवंत देवाचे निरोपीच करीत असतात. मराठी भाषेचें ऐश्वर्य ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम रामदास असल्या विभूतींमुळें वाढलें आहे. लाख गाबाळ ग्रंथांनीं सारस्वताची महती वाढत नाहीं. ती ज्ञानेश्वरी, नाथभागवत, दासबोध असल्या एकेका ग्रंथानें वाढते हें लक्षांत ठेवून आपले उद्योग आपण चालू ठेवले पाहिजेत. 'रिकामें तोंड। करूं गेलें वडबड। तों गीतेऐसें गोड। आंतुडलें" म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध हो आवे' असलें उद्गार ज्या ज्ञानरायाच्या मुखानें निघाले तेच खरोखर वाङ्मयाचे उत्पादक व प्रसारक होत. भाकड प्रणयकथा व उष्ट्या पत्रावळींच्या कविता-यांनीं भाषाभिवृद्धी होत नाहीं. वाङ्मयाच्या पलीकडे, जेथून वाणी स्फुरद्रूप होते तेथें, ज्यांची अखंड बैठक त्यांचे स्वैरालाप तेंच खरें वाङ्मय होय. ज्ञानेश्वरी व तुकोबांची अभंगवाणी ज्या मराठी वाङ्मयाला लाभली तें वाङ्मय अभंग अमर आहे. त्या सरस्वतीच्या पावन प्रवाहांत स्नानपानादिकांनीं आपण धन्य होऊं या."

## ६ गीताजयन्ती.

गीताजयन्तीचा प्रघात पुणें वगैरे शहरांतून नवीनच पडूं लागला आहे ही फार चांगली गोष्ट आहे. भगवद्गीतेचा अभ्यास जेणेंकरून वाढेल तें इष्टच आहे. 'गीता भागवत करितां श्रवण। आणिक चिंतन विठोबाचें' ते माझे प्राणसखे आहेत असें तुकोबानीं म्हटलें आहे. अर्जुनाच्या निमित्तानें भगवंतांनीं गीतेचा उपदेश जगाला केला आहे तेव्हां गीतेंतील तत्त्वज्ञानाचा जितका प्रसार होईल तितका इष्टच आहे. पण ही चळवळ पुण्यांत ज्या मंडळींतून सुरू झाली त्यांना एक सूचना करावीशी वाटते. शंकराचार्यांचें गीताभाष्य, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, वामन पंडितांची यथार्थदीपिका व लोकमान्यांचें गीतारहस्य हे चारही ग्रंथ आपापल्या परीनें उत्तम व अभ्यसनीय आहेत यांत शंका नाहीं. ज्याला सवड असेल त्यानें हे चारही ग्रंथ मननपूर्वक वाचून पहावेत, निदान आपापल्या आवडीप्रमाणें यांतला कोणता तरी एक ग्रंथ गीतार्थ समजण्यासाठीं अवश्य पहावा. जुन्या वैदिक मताच्या लोकांना आचार्यांचें भाष्य अत्यंत मान्य आहे, वारकरी लोक ज्ञानेश्वरीमतानुसार गीता पाहतात, यथार्थदीपिकेचे वाचक थोडे आहेत तरी तेही श्रद्धापूर्वक तो ग्रंथ वाचतात, गीतारहस्य नवीनांत मान्य आहे व तें अधिक लोकप्रिय करून त्यांतील विचारसरणी पुढें ढकलण्याचा रहस्यभक्तांचा

विचार आहे व त्यांनींच गीताजयन्तीचा हा नवीन प्रकार सुरू केला आहे. हें सर्व ठीक आहे पण वारकरी आणि रामदास यांच्यांत नस्ता भेद जसा कित्येकांनीं उगाच माजविला आहे, तसा प्रकार गीताजयन्तीच्या कार्यांत न व्हावा अशी आमची सूचना आहे. पुण्याच्या उत्सवांत असा वादविवाद झाल्याचें ऐकवांत आहे. भक्तिपंथ, वारकरी, ज्ञानेश्वरी यासंबंधानें विरुद्ध बोलल्यानें कांहीं गीतारहस्याचा प्रचार जारीनें होत नाहीं. तसें करण्याची तादृश अवश्यकताहि नाहीं. ग्रंथ लोकांपुढें आहेत ज्याला जो आवडेल तो तो वाचील. भक्तिपंथावर किंवा वारकऱ्यांवर टीकास्त्र उचलण्याचें रहस्य-भक्तांना कांहीं कारण आहे असें वाटत नाहीं. खुद्द लोकमान्यांनीं भागवत-संप्रदायाच्या कामगिरीबद्दल अनेकवार आदराचे उद्गार काढले आहेत. ज्ञाने-श्वरतुकाराममनाथांचा पंढरीचा भागवतधर्म उर्फ वारकरीपंथ देशकार्य करणाऱ्यांच्या मुळींच आड येत नाहीं मग विरोध उगीच कां उभा करावा ? सारें राष्ट्र ऐक्यभावानें कसें भरेल, या विवंचनेंत महात्माजींसारखे थोर पुरुष असतांना मतभेद प्रकोपाला नेण्याचे नवीन नवीन प्रकार पुण्यांत निघूं नयेत अशी आमची सप्रेम व सविनय विनंति आहे.

---

# पोंच व अभिप्राय.

**१ विष्णु कृष्ण चिपळोणकरः**—हा एक टीकात्मक निबंध रा० गजानन त्र्यंबक मालखेडकर यांनीं लिहिला आहे. शास्त्रीबोवांच्या वेळची लोकस्थिति, शास्त्रीबोवांचें ग्रंथलेखन व स्वभावविशेष यांचें स्पष्ट पण निर्भीड-पणानें केलेलें हें विवेचन फार चांगलें झालें आहे.

**२ कैवल्यकुसुमः**— प्रसिद्ध भगवद्भक्त सांगलीचे कै० हणमंतराव कोटणीस यांचीं पदें, श्लोक, कांहीं पद्यात्मक पत्रव्यवहार, अष्टक वगैरे कविता या पुस्तकांत त्यांचे चिरंजीव रघुनाथराव यांनीं छापून प्रसिद्ध केली आहे. सत्पुरुषाच्या वाणींत प्रसाद सहजच असतो तसा तो या कवितेंत पूर्ण अस-ल्यामुळें वाचकांना वाचतांना सुखाचे डोल येतात. ग्रंथांत समाधीचे वगैरे आठ सुबक फोटो आहेत. किं. रु. १.

३ **श्रीदत्तभार्गवसंवाद:**—श्रीगुरु दत्त व त्यांचे सच्छिष्य भार्गव उर्फ परशुराम यांच्या संवादांचा हा ग्रंथ अत्यंत सुरस आहे. हा मूळ संस्कृतांत आहे, पण त्याचें हें भाषांतर पुण्याचे परमार्थमार्गी सज्जन रा० बाळकृष्ण भाऊ जोशी यांनीं केलें असून तें भट आणि मंडळी, बुधवार पुणें यांजकडे एक रुपया पाठवून वाचकांनीं अवश्य आणवून वाचावें अशी आमची शिफारस आहे. मूळ संवाद उत्तमच आहे; पण भाषांतरही इतकं सरळ, सुबोध व गोड आहे कीं पुस्तक हातचें खालीं ठेववत नाहीं. अनेक अध्यात्माचे प्रश्न गोष्टींच्या रूपानें सोडविले असल्यामुळें बोध व मनोरंजन हे दोन्ही लाभ ह्या पुस्तकाच्या वाचनानें होतात.

४ **श्रीनामदेवांचें काव्यमय चरित्र:**—रा० देवीदास लक्ष्मण महाजन, नांदेड, यांनीं श्रीनामदेवमहाराजांचें चरित्र विविधवृत्तांत रचलें असून तें फार मनोरम वठलें आहे. चरित्रच मुळीं गोड आणि त्यांत लिहिणारा प्रेमळ मग दुधांत साखर पडल्यासारखें व्हावें यांत नवल काय? नामदेवांचें चरित्र लावणाऱ्या कीर्तनकारांना उपयोगाचें आहे. किं. ०५.

५ **निर्माल्यसंग्रह**— भाग दुसरा:—सांगलीचे कवि साधुदास यांनीं 'रोज उपास्य देवतेला एक श्लोक करून वाहिल्याखेरीज अन्नग्रहण करावयाचें नाहीं' असा नियम पांच सहा वर्षे सतत चालवून त्यापैकीं निर्माल्य क्रमशः वाचकांस देण्याचें योजलें आहे असें दिसतें. साधुदासांची कवित्वशक्ति व गुरुभक्ति चांगल्यांपैकीं आहे. त्यांच्या कवितेंत सरळपणा मोहक आहे. किं. ०८.

६ **महर्षींचा प्रसाद**—द्रोण १ ला व २ रा:—आनंदकर्ते रा० वासुदेव गोविंद आपटे यांनीं महर्षींचा प्रसाद वाटण्याचें हें पुण्यकर्म आरंभिलें आहे. पहिल्या द्रोणाच्या समर्पण प्रकारानें लेखकाच्या डोळ्यांत जसे अश्रु आणले तसें तो वाचकाच्याही डोळ्यांत आणल्याशिवाय राहत नाहीं. रा० आपटे यांचा एकुलता एक मुलगा आनंद अल्पवयांतच वारला यामुळें त्यांचें चित्त पुत्रशोकानें विव्हळ झालें यांत नवल नाहीं. आनंदाच्या अखेरच्या दुखण्यांत त्याच्या अंथरुणापाशीं बसून त्याला त्यांनीं ज्या कांहीं धर्मग्रंथांतल्या गोष्टी सांगितल्या त्या त्याच्याच इच्छेवरून त्यांनीं छापल्या आहेत. अनेक धर्मग्रंथांतल्या व पुराणांतल्या सोप्या गोष्टी बालबोध भाषेंत त्यांनीं लिहिल्या असून त्या लहानथोरांना मनोरंजक व बोधप्रद होतील बालांना आनंदामृत पाजण्याचें पवित्र कर्म रा. आपटे यांनीं जन्मभर सतत चालविलें आहे व तें वरील महदापत्तीनेंही खंड पावलें नाहीं. हें कौतुकावह आहे. रा. आपटे

यांचे हातून बालबालिकांना व प्रौढ विद्यार्थ्यांनाही ज्ञानानंद देण्याचें कार्य दीर्घकाल चालो अशी आमची दयाघनापाशीं प्रार्थना आहे.

**७ प्रल्हाद जयंत व ८ जयद्रथ** ही पौराणिक कथांना अनुसरून दोन नवीन नाटकें ठाण्याचे रा० शंकर गोपाळ घैसास यानीं लिहिलीं आहेत व तीं चांगलीं साधलीं आहेत. हीं दोन्हीं नाटकें शाळांतील संमेलनप्रसंगीं विद्यार्थ्यांकडून करविण्याइतकीं निर्दोष, रसभरित व उदात्त भावनेनें भरलेलीं आहेत. पहिल्यांतील मित्रप्रेम उत्कृष्ट वठलें आहे. दुसऱ्यांत अश्वत्थाम्याचें चित्र उठवदार झालें आहे. दोन्हीं नाटकांत स्त्रीपात्राचें काम ठेवलें नाहीं ही गोष्ट फार चांगली झाली आहे

**९ शृंगेरीची लक्ष्मी:**—ही नवीन ऐतिहासिक कादंबरी प्रो. चिं. ग. भानु यांनीं लिहिली असून मुंबईचे गणेश म्हादेव आणि मंडळी, गिरगांव रोड मुंबई, यांनीं प्रसिद्ध केली आहे. किं. रु. २. प्रो भानु हे फर्ग्युसन कॉलेजचे इतिहासाचे माजी प्रोफेसर, 'नाना आणि महादजी' ह्या निबंधाचे लेखक व गीता आणि उपनिषदें यांचे भाषांतरकार व टीकाकार म्हणून मराठी वाचकांस महशूर आहेत. आतां पासष्टीच्या घरांत गेल्यावर त्यांना कादंबरीकार व्हावेसें वाटलें आहे ! आणि कादंबरीचा विषय तरी काय ? 'या कादंबरीचें कथानक एका सुंदर इंग्रजी पुस्तकावरून मला सुचलें.' त्या सुंदर पुस्तकाचें नांव प्रो. भानु देते तर ठीक होतें. 'नाना आणि महादजी' यांचा काळ कथानकाला योजला असून प्रो. भानूंनीं बाळाजीपंत भानु उर्फ प्रसिद्ध नाना फडणीस यांच्या ठिकाणीं अस्त्या–नस्त्या सर्व सद्गुणांचें वास्तव्य कल्पिलें आहे. नायिका शृंगेरीमठाधिपांच्या सेवेंत असलेली 'लक्ष्मी' नांवाची एक सुंदर व देशभक्त अशी नायकीण असून ती एका मराठा सरदारावर फिदा झालेली आहे. व टिप्पू, निजाम व इंग्रज यांच्या गुप्त मसलतीचा खलिता या जोडप्यानें अखेर शोधून काढून नानांच्या मुत्सद्दीपणाला व श्रेष्ठत्वाला यश दिलें आहे. खलिता चोरीस जाणें, त्याचा तलास काढीत अनेक अडचणींतून व पेंचांतून जाणें, नायकानें नायिकेला मुसलमानाच्या एकांतांत राजकारणासाठीं जाऊं देणें इ. गोष्टी तर पाश्चात्य समाजाला लागू असून लक्ष्मीसारख्या नायकिणीच्या ठिकाणीं नाना फडणिसांचा उज्ज्वल देशाभिमान, उत्कृष्ट धर्मनिष्ठा, अट्टल राजकीय हेरालाही दुर्लभ असे गुप्त हेराचे गुण जे कल्पिलें आहेत त्यावरून आपण महाराष्ट्रीय राजकारणांत युरोपियन गुणावगुणांचीं पात्रें पाहात आहोंत असें वाटतें. अस्वाभाविकपणा हा कादंबरींत महादोष आहे. 'कोकणस्थ, देशस्थ या शब्दांत मोठेपण आहे कां गुणकर्मांत ?' असें उदारतत्व सांगणाऱ्या कादंबरीकाराला

गचाळ–गबाळ चित्र वठवायचें असलें म्हणजे 'वाघमारे' लागतो, तेथें कोणी 'भानु' चालत नाहीं; आणि चांगल्या गुणांचें चित्र काढायचें असलें म्हणजे कोणी 'करंदीकर अगर गोखले' लागतो, याचें इंगित काय स्पष्ट सांगायला पाहिजे ? 'शांत, पुष्टि करणारीं भट - या श्राद्धपक्ष झोडणाऱ्या भिक्षुकांना कांहीं सुद्धां कळत नाहीं.' (पृ. १९) 'गलिच्छ व्यसनी आगांतुक ब्राह्मणाला मी आपल्या पंक्तीला घेतो व सात्विक, श्रीमंत उदार अहिल्याबाईचें पान दूर मांडतो ! महाशिवरात्रीला रात्रीं कित्येक विद्वान् वैदिक शास्त्री शाक्ताश्रमांत पंचमकारांचें यथेच्छ सेवन करितात' इ. (पृ. ३५.) चालू काळांतल्या एखाद्या बाष्कळ सुधारकाचे विचार पेशवाई काळांतल्या लोकांच्या तोंडीं घालणें, पाश्चात्य हेरादिकांना महाराष्ट्रीय राजकारणांत हैदोस घालूं देणें इ. किती तरी दोष प्रस्तुत कादंबरींत आहेत ! भानूंची कसलेली व जोरदार भाषा या कादंबरीस मिळाली आहे एवढाच तिचा गुण असून उत्तरार्धांत कथानकाची गुंतागुंत बरी सोडवली आहे. तिकडे यंदे भानूंचे उपनिषदार्थप्रकाश प्रसिद्ध करीत आहेत व इकडे भानु कादंबरीच्या रूपानें पाश्चात्य व पौर्वात्य विचारांची खिचडी पकवीत आहेत हा देखावा मौजेचा आहे !

**१० निवडक लेखः**—रा. सा. नारायण गोविंद चाफेकर, फर्स्ट क्लास सबजज्ज, ठाणें, यांचें अनेक मासिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले निवडक लेख प्रस्तुत ग्रंथांत एकत्रित केलेले आहेत. सदर ग्रंथांत त्यांचे विविधविषयांवरचे २२ लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील कांहीं कायम स्वरूपाचें आहेत, कांहीं तात्कालिक महत्त्वाचे आहेत, कांहीं वाङ्मयांत येणारे आहेत, कांहीं शास्त्रीय स्वरूपाचें आहेत व कांहीं पुस्तकपरीक्षणार्थ लिहिलेलें आहेत. सर्वच लेख वाचनीय आहेत. चाफेकरांचा बहुश्रुतपणा, भाषेची व विचारांची प्रौढी, मनाचा समतोलपणा हे गुण प्रायः त्यांच्या सर्व लेखांत आढळतात. 'शिकवावें कसें' हा लेख शिक्षकांच्या उपयोगाचा आहे. शिक्षक लेखकानें म्हटल्याप्रमाणें उत्तम प्रकारें शिकवूं शकतील, पण त्यांना स्वतःला तसें बहुरंगी शिक्षण मिळालें पाहिजे व त्यांच्या मागें पोट भरण्याची फिकीर असतां कामा नये. सगळ्यांत भिकार पगार कोणाला मिळत असेल तर तो शिक्षकांना ! शिक्षकवर्गाची दैना सर्वश्रुत आहे. राष्ट्राचे आधारस्तंभ तयार करणारे शिक्षक पण त्यांच्या मागें संसाराचे भुंगे किती असतात, हें त्यांसच माहीत ! उत्तम नोकर पाहिजेत तर उदार हातानें द्रव्य खर्चायची तयारी पाहिजे. सरकारचा कंजूषपणा कोठें दिसत असेल तर तो शाळाखात्यांत. याला तोड निघाल्यास उत्तम शिक्षक मिळण्यास अड-

चण पडणार नाहीं. रामायणकालीन लोकस्थिति, वैदिकधर्म, ऐतरेय ब्राह्मण व त्यांतील ४२ आख्यायिका, हे तीन निबंध उत्कृष्ट आहेत. 'एका शूद्रानें आपल्या वर्णाला अनुक्त अशी तपश्चर्या केल्यामुळे रामानें त्याचा शिरच्छेद केला ही एकच गोष्ट रामाच्या सर्व चारित्रांत त्याला न शोभण्यासारखी दिसते.' (पृ. १७) असें म्हणणारे रा. सा. चाफेकरच पुढें दुसऱ्या लेखांत (पृ. ७६) म्हणतात कीं " माणसें उत्क्रांतीच्या जिन्याच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असल्याकारणानें अगदीं खालच्या पायरीवर उभा राहणारा व अगदीं वरच्या पायरीवर चढून गेलेला ह्या दोहोंना एकच धर्मबंधन लागू करणें अन्यायमूलक तर आहेच, पण निकृष्ट दर्जाच्या माणसानें परिणत बुद्धीच्या माणसाचा धर्म आचरणांत आणण्याचा प्रयत्न करण्यानें केव्हां केव्हां त्याचा अपकर्षच अधिक होण्याचा संभव असतो. ही गोष्ट आमच्या ऋषींच्या ध्यानीं येऊन चुकल्यानें त्यांनीं सर्व लोकांना एकच धर्म सांगितला नाहीं. हें आर्यधर्माचें विशिष्टत्व लक्षांत ठेवणें अवश्य आहे. चातुवर्ण्य व आश्रम यांच्या मुळाशीं वरील तत्व आहे हें सांगणें नकोच." रामावर जो दोष वर लादण्यांत आला आहे त्याचें निराकरण मदर तत्वानें होतें असें आम्हांस वाटतें. फल-ज्योतिषावरील लेखांत 'शास्त्र या पायरीला फलज्योतिष केव्हांही येणें शक्य नाहीं.' असें चाफेकर म्हणतात तें आम्हांस योग्य दिसत नाहीं. फलज्योतिषाचा अभ्यास करणारे लोक पुष्कळ अर्धवट असतात व त्यांचीं फळें मिळत नाहींत म्हणून फलज्योतिष हें शास्त्र नव्हे असें म्हणणें अनुचित आहे; कां कीं हें तत्त्व मान्य केल्यास पुष्कळच शास्त्रांना शास्त्रमाळेंतून काढून टाकण्याची पाळी येणार आहे! अध्यात्म शास्त्र तेवढें शाश्वतच आहे, बाकी प्राचीन व अर्वाचीन बहुतेक शास्त्रें अपूर्ण स्थितींतच आहेत. नवीन प्रयोग, नवीन अनुभव, नवीन शोध यामुळें अनेक शास्त्रांचे आजचे सिद्धांत उद्यां टिकत नाहींत, त्यांत फेरफार होत असतात, पण म्हणून काय त्यांना शास्त्र म्हणत नाहींत? मग बिचाऱ्या फलज्योतिषावरच एवढा घुस्सा कां? मासिकावरचा लेख व मराठी भाषेवरील सावट हा लेख हे आज वाचावेसे वाटतात पण दहावीस वर्षांनंतर यांना कोणीं पुसणार नाहीं. चलनी हुंडया, परत हुंडया इ० लेख अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना उपयोगाचे वाटतील, सामान्य वाचकांना त्यांत विशेष स्वारस्य वाटणार नाहीं. पुस्तकपरीक्षणांतला पाल्हाळ कमी करतां आला असता. 'कोर्टसंचार' ह्या लेखांत लेखकानें आपला कोर्टांतला अनुभव सांगितला आहे. त्याचें वर्म कोर्टाबाहेर जन्म घालविणाऱ्या आमच्यासारख्यांस समजणें दुर्घट आहे. रा. सा. चाफेकर यांनीं कोर्टांत जन्म घालूनही एवढा

विद्याव्यासंग ठेवला हे सेवकवर्गानें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. एकंदरींत चाफेकरांचे निवडक लेख संग्रहार्ह आहेत यांत शंका नाहीं.

**११ भजनाचा शिक्षकः**—ह्या पुस्तकांत तुकोबारायांचे तीस सांप्रदायिक अंभग 'रागदारींत उत्तम चालीचे सशास्त्र नोटशेन' करून रा. एन्. के. मुश्रीफ, मिरज यांनीं छापिले आहेत. हे अभंग 'अस्ताई,अंतरा व अभोग' अशा स्वरूपाचे आहेत. बाजाचे पेटीवर हे वाजवितां येतात. गायन शास्त्राचे जाणते आहेत त्यांनीं याचा उपयोग करून पहावा. छपाई चांगली आहे. किं. ०१०.

**१२ कविसंसारः**—रा. रा. गंगाधर रामचंद्र साने, बी. . यांनीं आमच्या 'मोरोपंताचें चरित्र व काव्यविवेचन' ग्रंथाच्या आधारें प्रस्तुत नाटक लिहिलें आहे. पंतांच्या सोज्वळ व प्रेमळ गृहस्थाश्रमाचें चित्र यांत मनोहर उठलें आहे.

**१३ वर्षप्रबोधः**—ज्योतिर्विद् रामनारायण यांनीं १९२५ सालचें सशास्त्र भविष्य यांत कथन केलें आहे. पुस्तक नेहमीप्रमाणें उपयुक्त झालें आहे. किं. ०८.

**१४ सगनभाऊकृत लावण्या व पोवाडेः**—रा. गोपाळ गोविंद अधिकारी यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. किं. १ रु. ह्या पुस्तकांत पेशवाईच्या अखेरीस पुण्याकडे गाजलेल्या शाहीरांपैकीं प्रसिद्ध शाहीर सगनभाऊ ह्याच्या लावण्या व तीन पोवाडे आले आहेत. 'पानपतचा पोवाडा' ह्या एकाच पोवाडयावरून सगनभाऊचें नांव कायम राहील. त्यां वेळच्या इतरांच्या लावण्यांप्रमाणेंच ह्याच्या लावण्यांतही 'पुणें शहर गुलजार' रावबाजीच्या वेळीं झालें होतें. त्याच्या इष्कीबाजीचें स्वरूप पाहतां येतें. लावण्यांत व पोवाडयांत इंग्रजीच्या पूर्वींची शुद्ध जोरकस मराठी भाषा पाहण्यास मिळेल.

**१५ मराठ्यांचीं संग्रामगीतेंः**—अर्वाचीन कवि दुर्गाप्रसाद तिवारी यांनीं हीं संग्रामगीतें रचिलीं आहेत. बहुतेक गीतें शूरवीर मराठयांच्या इतिहास प्रसंगांना धरून केलीं आहेत. 'मर्दानी झांसीवाली' 'घ्यां करीं जरा समशेर' 'हिंदूचा हिंदुस्थान' संताजीची घोडदौड' 'मोहरा इरेला पडला' इ० गीतें वीरश्रीच्या भाषेंत रचिलीं असून तरुणांना पाठास देण्यासारखीं आहेत. किं. ०१०.

---

# मोतीं आणि हिमबिंदु

लेखकः—**माधव गोविंद भिडे.**

लीलालोलललाम रम्य पुलिनीं गेली त्यजोनी घरीं
वैराग्यें नटलें विभूषण मुदां पादा हिमाच्या धरी
अच्छिद्र स्थिति शोभवी तुज कशी हें फोडुनी सांगणें
छिद्रान्वेषण सर्व लोक करिती पूर्णत्व दावीं म्हणें ॥ १ ॥
हेमाचा गुण वागवीन हृदयीं तो मान मातें मिळे
लोकांचें उपकारशल्य मम या अंगा सदाचें खिळे
पाहें अक्षत हें स्वतंत्र तव मी अस्तित्व बा जीवन !
दूर्वाग्रावरि तूं तसें नलिनिच्या अग्रींहि राजीव न ॥ २ ॥
वाटे हें तव लंबवर्तुल भल्या ! माझ्याहुनी चांगलें
राखाया बघतां सुवृत्त मन हें माझें अहा ! भागलें
कोणी कुंचलितां उगाच खपला काढी जरी बारका
माझें सर्व महत्व जाय विलया मोवे असा तो ढका ! ॥ ३ ॥
माझी येईल शोधण्यास्तव मला ती संभ्रमें कामिनी
चिंतेमाजि तिला नसेल गमली ही शोभना यामिनी
स्वप्नींही तिचिया नसेल मम हें दुर्भाग्य आले अहा !
गाठयानें इथल्या असे शकल जें हें काढिलें रे पहा ॥ ४ ॥
पाहोनी तुटका त्यजील घटिका थांबेल ना बांधवा !
सर्पाच्या दशना समान सगळे ना ताप ना गांध वा !
कोणी मौक्तिकखंड हातिं न धरी ऐसा जगीं न्याय या
व्यंगाहून बरें हळूंच विरुनी जाणें जलीं बा लया ॥ ५ ॥
गेलासी सखया उडून मजला ठेवोन मागें जगीं
आतां कोण म्हणेल रे मज नको तो खेद राहे उगीं
जें मी ध्येय असाध्यसें म्हणुनियां तोंडेंच वाखाणिलें
तें तूं आचरणांत ही लवकरी श्रोत्या अहा ! आणिलें ! ॥ ६ ॥

————

श्रीसद्गुरुरामचंद्रायनमः ।

# करुणाष्टक.

( कै० ह. भ. प. ती. रा. **वामनराव कोटणीस** कृत. )

पाठविणार—**अ. न. कोटणीस**, बी. ए., मुधोळ.

प्रल्हाद भक्त तुज आठवितां मुरारी । स्तंभीं त्वरें प्रगटुनी वधिला सुरारी ॥
तैशा परीच मम पातक छेदिं बा रे । अद्यापि कां रघुपती करुणा नये रे ॥१॥
वेश्यागजादिकिं तुझा करितांचि धांवा । तूं धांवसी न लगतां क्षण एक देवा ॥
मी एकटा तव कृपें नच पात्र कां र । अद्यापि कां रघुपती० ... ... ॥ २ ॥
अष्टांग दुर्धर तपें किति शीणलेरे । त्वद्दर्शनोत्सुक सुखा नच पावले रे ॥
केले अजामिळ खळादिक मुक्त कीं रे । माझीच कां रघुपती०... ...॥ ३ ॥
तुम्हा समस्त म्हणती जन दीनबंधू । रामा किती छळुनि पाहसि सौख्यसिंधू ॥
देवा अतां झडकरी मज भेट दे रे । अद्यापि कां ० ... ... ॥ ४ ॥
कांता सुता स्वाहितलागि मदांध नीचा । सेवूं किती खळजनोक्ति कठोर वाचा॥
तूं दीनबंधु असतां किती चाळसी रे । अद्यापि कां ० ... ... ॥ ५ ॥
संसारसिंधु तरणेसि उपाय नाहीं । जाणोनि मी शरण सत्वर तूज पाहीं ॥
तूं लोटसील तरि आजि कसें सुटे रे । अद्यापि कां ० ... ... ॥ ६ ॥
शास्त्र पुराण निगमादिक ग्रंथ सारे । नामापुढेंच मज वाटति ते पसारे ॥
तारावयासि पतिता तव नाम को रे । अद्यापि कां ० ... ... ॥ ७ ॥
शंभू विरंचि शुक शेष सुरादिकांला । तूझा अगम्य महिमा नच वर्णवीला ॥
मी हीन दीन कुमती किती वर्णु बा रे । अद्यापि कां ० ... ... ॥ ८ ॥
श्रीराम सद्गुरु कृपाघन पूर्ण सिंधो । भक्तां तरंग परिपूरित दीनबंधो ॥
दासाष्टका परिसुनी सदया उदारा ॥ देई त्वरें करुनिया तव पायिं थारा ॥ ९ ॥

## पद.

गुरुपदिं भाव धरा ॥ सुजन हो ॥ धृ० ॥ भवचक्रांतुनि कर देउनिया ॥ नेइल पैल तिरा ॥ १ ॥ सारासार विचार करोनि ॥ निश्चय चित्तिं धरा ॥२॥ कामादिक रिपु जिंकुनि सारे ॥ सत्वर मोक्ष वरा ॥ ३ ॥ इतर साधनें सर्वही खोटीं ॥ हा एक मार्ग खरा ॥ ४ ॥ रामराय गुरु दासा चुकवी ॥ जननमरण फेरा ॥ ५ ॥

## पद.

लखलखे गगनीं सद्गुरु तारा ॥ तारा तो पाहूनि आत्म्यातें तारा ॥ धृ० ॥
तारा तो पाहाया शेषही थकला ॥ शेषाचे शेवटिं तारा हा फुटला ॥ १ ॥
तारा तो पाहाया विश्वास धरा ॥ विश्वास धरुनि विश्वास मारा ॥ २ ॥
विश्वास धरणें सद्गुरुपायीं ॥ तारा तो लाभेल मानवदेहीं ॥ ३ ॥

# कनक कांता व कादंबरी यांचा मोह.

(कनक व कांता यांचा मोह प्राणिमात्रास पडणारा असतो. यांच्याच जोडीस कादंबरी म्ह मद्य ठेवलें म्हणजे ह्या त्रिपुटीच्या मोहानें विश्व कळवलें आहे असें ह्मणणें चुकीचें होणार नाहीं. कनक, कांता व कादंबरी हे तीन प्रकार इंग्रजींतल्या तीन वकारांच्या (Weatb, wife and wine) बरोबरचेंच आहेत. कांतेचा मोह स्वस्त्रीपुरता असला तर दोषावह नाहीं, धन न्यायानें मिळवून सत्कार्यांत वेचलें तर दोषाला कारण होत नाहीं, तिसरें मद्य मात्र सर्वथा त्याज्य होय. तात्पर्य, परस्त्रीगमन किंवा वेश्यागमन, धनलोभ व मद्य यांपासून सज्जनांनीं अलिप्त असलें पाहिजे. श्रीएकनाथमहाराजांनीं भावार्थरामायणात (युद्धकांड अ० ४६) हेंच सांगितलें आहे. तो उपदेश त्यांच्याच मुखानें ऐका.)

## वेश्यागमन.

जो स्त्रीसवें निरत जाला । मद्य प्राशनीं मातला ।
जो धनलोभें भुलला । त्याचा गेला विवेक ॥ १०८ ॥
वेश्यगमनीं जे रत । ते सर्वदा अति उन्मत्त ।
नाठवे स्वार्थ परमार्थ । स्वेच्छा विचरत खर जैसा ॥ १०९ ॥
खर नेणें मर्यादा । दिवसां देखतां जनपदा ।
वेश्याद्वारीं विचरें सदा । न सरे कदा माघारा ॥ ११० ॥
लाथा हाणितां मुखावरी । प्रीती धांवे संमुख खरी ।
पदाभिघात मुखावरीं । आवडीं करीं झेलीत ॥ १११ ॥
तैसा पुरुष कामाचारी । सुखाचि मानी निरंतरी ।
पाऊल जाऊं नेदी दुरी । हृदयावरी झेलित ॥ ११२ ॥
म्हणे जन्मांतरींचीं फळलीं भाग्यें । इचें पदकमळ हृदयीं लागे ।
दैवें दंडिली अभाग्यें । वृथा वैराग्यें कष्टती ११३ ॥

## २ मद्यपान.

स्त्रीकामाची ऐशी रीती । ऐक मद्यप्याची स्थिती ।
वेंचून पदरची संपत्ती । स्वयें होती जगनिंद्य ॥ ११४ ॥
जेणें द्रव्यें ऐहिक भोग घडे । सकाम कर्में स्वर्ग आतुडे ।
निष्कामें तरी डोळियापुढें । तिष्ठे रोकडें मोक्षसुख ॥ ११५ ॥

वेंचूनिय ऐसे धन । करितात मद्यपान ।
ते निजात्मघाती संपूर्ण । नरकसेवन आकल्प ॥ ११६ ॥

## २ धनलोभ.

धनलोभीं जे लुब्धक । स्वप्नीं न देखती सुख ।
जन्मादारभ्य देख । भोगिती नरक अनिवार ॥ ११७ ॥
मरणांत झटे घेतां । रुका न मिळे सर्वथा ।
तथापि सायास करितां । आळस चित्ता उपजेना ॥ ११८ ॥
ऐसें ऐशा कष्टें मिळे । तें वाढवी उपायबळें ।
निज शरीर वृथा कष्टविलें । जेणें फळे निजमोक्ष ॥ ११९ ॥
देवधर्म नेणती कांहीं । पर्वकाळ ठाउका नाहीं ।
श्राद्धांची संभावना नाहीं । निराश पाहीं सदा पितर ॥ १२२ ॥
जै धनाचा वेच होय । तैं प्राणाचि जाऊं पाहे ।
सणावाराची नेणे सोये । अतिथी तेथें काय करील ॥ १२३ ॥
कष्टें जोडिली संपत्ती । ते ठेविती अती निगुती ।
तोंडीं दगड माती घालिती । आपण मरती धुळी खात ॥ १२४ ॥

## त्रिदोष !!

ऐसी एक एकाची जाती । अधःपाता स्वयें नेती ।
तिन्ही एकत्र जेथ मिळती । ते दुःख किती सांगावें ॥ १२५ ॥

---

सार्थ व सभाष्य

# मनोबोध उर्फ मनाचे श्लोक.

प्रकाशक--लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

श्रीसमर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक सर्व लोकप्रीय आहेत. हे दिसतात तितके सोपे नाहींत. श्रीदासबोध व समर्थांची सर्व कविता यांत प्रगट झालेल्या तत्वज्ञानाच्या अंतर्मुख दृष्टीने ते लावले पाहिजेत व तसे ते येथें लावले आहेत. पदाचा अर्थ न सोडतां व संदर्भ व कथानकें देऊन अर्थविवरण केलें आहे. प्रथम प्रस्तावनेंत श्लोकांचा प्रसंग मनाचें स्वरूप व श्लोकसंगति दिली आहे व श्लोक समन्वयानें लावले आहेत.

खिशांत ठेवण्यासारखा आकार, कागद ग्लेज.

पृ. सं. ३२० किं. बारा आणे.

पत्ता—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १८ | माघ १८४६ | नवें वर्ष ५ वें |
| मास ६ वा | फेब्रुवारी १९२५ | अंक २ रा |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



**वार्षिक वर्गणी रु. ३ व व्हीपीनें रु. ३०३**

मुद्रक:—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३००
येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... | १–२ |
| २ संसाराचें चित्र ... ... ... | ६–१७ |
| ३ स्फुट विचार ... ... ... | |
| १ वै. हरिभाऊ गिंडे २ कै० श्रीसदानंद सरस्वतिस्वामी | |
| ३ बेळगांवची गोपरिषद ४ नाशीकची कीर्तनपरिषद ... | १८–२१ |
| ४ पारमार्थिक गोष्टी ... ... ... | २१–२५ |
| ५ श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या तोंडचीं वचनें ... ... | २५–३० |
| ६ भक्ताचा गर्व... ... ... ... | ३१–३२ |
| ७ ह. भ. प. ढोलेबुवांचें भाषण... ... ... | ३२–३५ |
| ८ उत्कृष्ट उतारे ( कविता ) •... ... ... | ३७–३९ |
| ९ पांगारकरांचीं पुस्तकें ( जाहिरात ) ... ... | ४० |



## भक्तिमणिमाला.

संपादकः—ल. रा. पांगारकर, बी. ए.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत–मधुर वाणीनें जनास सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ व्ही. पी. नें १॥३.

पत्ता:—व्यवस्थापक मुमुक्षु, पुणें.

# मंगलाचरण





ॐ नमो श्रीगुरु सच्चिद्घन । वर्षताहे स्वानंदजीवन ।
मुमुक्षुमयूर आनंदले जाण । हरिखें उड्डाण करितातीं ॥ १ ॥
तो सजल देखोनि मेहो । सोहंभावें फोडिती टाहो ।
रोमांचपिसीं पसरूनि पहा हो । सत्वें लवलाहो नृत्याचा ॥ २ ॥
नाचे स्वानंदाचेनि मेळें । तेणें सर्वांगीं निघाले डोळे ।
पिसें देखणीं जाहलीं सकळें । तें शिरीं गोपाळें वाहिलीं ॥ ३ ॥
तो मेघ देखोनि सन्मुख । आर्तचातक पसरिती मुख ।
बिंदुमात्रें पावले सुख । नित्यनिर्दोख जाहले ॥ ४ ॥
आर्ततृषा तत्काळ वोळे । निवाले तेणें स्वानंदजळें ।
मग हरिखाचेनि कल्लोळें । सुखसोहळे भोगिती ॥ ५ ॥
सुभूमि देखोनि निर्मळ । जाणोनि वर्षती काळवेळ ।
वर्षो लागले जी प्रबळ । जळकल्लोळ अनिवार ॥ ६ ॥
तेणें वोळलेनि कृपाभरें । शिष्यसरिसेसी पूर भरे ।
विकल्प वोसणें एकसरें । महापुरें वाहविलीं ॥ ७ ॥
तेणें प्रवाहनिर्मळजळें । चिदैक्यसागरीं सरिता मिळे ।
मग समरसोनि तेणें जळें । राहे निश्चळ निजरूपें ॥ ८ ॥

—श्रीएकनाथी भागवत अ० १९

—:o:—

# मुमुक्षुंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षु' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतःस्त्रीपुत्रां-सह हे नियमानें वाचावें म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला:**—१ मंगलाचरण २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४ मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव. ले. १ते४ १०. श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा:**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतऱ्या थमालेले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार? १३ साधुकथा. १४ पतिपत्नी संबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदीर १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांतांचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद (या सदराखालीं १९ स्फुटें आहेत.)

पत्ता—**व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.**

ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ.

# श्रीसमर्थसंजीवनी

उर्फ

# रामदासी वेचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वी आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. ( १ ) **प्रपंच** ( २ ) **राजकारण** ( ३ ) **परमार्थ** व ( ४ ) **विविधविषयक प्रकरणें** अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा ' सारांश ' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बायडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन, व्ही. पी. नें २८६

पत्ता:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणे.

# समर्थसंजीवनी.

ग्रंथकारः—**ल. रा. पांगारकर**, बी. ए. किं. रु. २.

## लोकमत.

**श्री० चौंडेमहाराज वांईकरः**—"श्रीसमर्थांचा दिव्य संदेश महाराष्ट्रांत लोकांच्या घरोघर पोचविण्याची श्रेष्ठ कामगिरी श्रीसमर्थांनीं आपल्यासाठींच राखून ठेविली होती असें स्पष्ट दिसतें. समर्थमहाराजांच्या एकूनएक उत्कृष्ट शिकवणी आपण संजीवनींत आणल्यानें त्यांची अखंड संगति ह्या एका ग्रंथानें सर्वांस लाभणार आहे."

**केसरी** ( सं. रा. न. चिं. केळकर ):—"श्रीसमर्थांच्या काव्यसागराचें मंथन करून त्यांतून निवडक रत्नें काढून त्यांचा हार गुंफण्याचें कार्य मुमुक्षु-कर्ते पांगारकर यानीं करून महाराष्ट्रधर्माच्या प्रसारास मोठेंच साधन उपलब्ध करून ठेवलें आहे....समार्थांच्या वाणीनें मृतप्राय महाराष्ट्रांत चैतन्य उत्पन्न केलें व त्याच्या हातून महाराष्ट्रधर्माचा व राजकारणाचा झेंडा अटकेपर्यंत फडकविला. याकरितांच ग्रंथकारांनीं समर्थांच्या या शिकवणीला 'समर्थसंजीवनी' असें सार्थ व साभिप्राय नांव दिलें आहे. तिच्या सेवनानें या देशांत तेज व सामर्थ्य प्रकट झाल्याविना राहणार नाहीं. पुस्तकाचें कोणतेंही पृष्ठ उघडावें व कोणताही उतारा वाचावा, त्यांत महाराष्ट्रधर्माचें तेजस्वी स्वरूप प्रगट झाल्यांवाचून राहत नाहीं! वाचकांच्या सोयीसाठीं त्याचे चार विभाग केले असून आणखीहि पोटविभाग केले आहेत, पण अथपासून इतिपर्यंत सर्वच भाग अस्सल बावनकशी सोनें आहे. श्रीयुत पांगारकर यांनीं पुस्तकास विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे व तींत आपल्या प्रेमळवाणीनें पुढील वेच्यांचें सार उद्धृत केलें आहे. पुस्तकाचे बहिरंगही मनोहर असेच आहे. महाराष्ट्रीय आबालवृद्धांनीं या पुस्तकाचा नित्यपाठ करण्याचा परिपाठ ठेवावा व त्यांतले कांहीं भाग तर मुखोद्गत करावें अशा योग्यतेचें हें पुस्तक आहे."

**आनंद** ( सं. रा. वा. गो. आपटे ):—"रामदासी वेंचे या नांवाव-रूनच पुस्तकाचें सामान्य स्वरूप कळतें. विशेष गोष्ट ही कीं आरंभीं ८० पृष्ठांत रा. पांगारकरांनीं सर्व प्रकरणांचा जो सारांश दिला आहे तो इतका व्यवस्थित रीतीनें सुबोध करून चटकदार आणि रसाळ भाषेत लिहिला आहे कीं हा त्यांचा सारांश ह्य० बिलोरी कांचेच्या निर्मळ आरशांत पाडलेलें समर्थांच्या शिकवणींचें उत्कृष्ट प्रतिबिंबच होय!"

**नवाकाळ**—[ सं. रा. कृ. प्र. खाडीलकर ]:—" समर्थांच्या अमोघ वाणीचा लाभ अत्यंत व्यवस्थित रीतीनें करून देऊन श्री. पांगारकर यांनीं ह्या ग्रंथाच्या रूपानें आतापर्यंच्या संतवाङ्मयविषयक ग्रंथांत सुंदर भर घातली आहे श्रीसमर्थवाङ्मयाशीं रा. पांगारकर यांचा २५ । ३० वर्षांचा परिचय आहे. यांत बहुतेक सर्व महत्वाच्या शिकवणींचा समावेश केला असून निवडक वेंचे विषयवारीनें देण्यांत आले आहेत. प्रपंच, राजकारण, परमार्थ व स्फुट प्रकरणें अशीं एकंदर १५० प्रकरणें असून एकंदर प्रकरणांचा 'सारांश' ८० पृष्ठांत आरंभींच घालण्यांत आल्यामुळें विषयसंगति लावणें फार सुलभ झालें आहे. प्रापंचिक, राजकारणी व परमार्थिक अशा सर्व लोकांना मार्गदर्शक शिकवणूक समर्थांचीच असून ती सुव्यवस्थित व नीटनेटक्या स्वरूपांत पुढें ठेवण्याचें महत्वाचें कार्य पार पाडून श्री. पांगारकर यांनीं महाराष्ट्रीय वाचकांना उपकारबद्ध करून ठेविलें आहे. सर्वांनीं सर्वकाळीं जवळ ठेवण्यालायक अशा या ग्रंथाचें बाइंडिंगही मजबूत व टिकाऊ असून किंमत रुपये दोन बेताचीच आहे.

**गोरक्षण** [ सं. अनंतदास रामदासी]:—" शंकरराव देव यांनीं समर्थवाङ्मयाचा द्रोणागिरी धुळ्यास आणण्याचे परिश्रम केले व लक्ष्मणराव पांगारकर यांनीं त्यावरील दिव्य वनस्पतींचा अर्क मोठ्या परिश्रमानें काढून ही समर्थसंजीवनी बनविली व तिचा प्रथम लाभ मुंबईस श्रीसमर्थचरणीं सतत चार महिने तेरा कोटि रामनामाचा जप करणाऱ्या भाविकांना निरूपणप्रसंगीं घडला ही समर्थकृपाच होय. ज्या संजीवनीनें धादांत पाषाणांतही चैतन्य उत्पन्न होईल अशा त्या अमृतसंजीवनीचे घुटके स्वतः अत्यंत कष्ट घेऊन प्रवचनरूपानें ८ । १० दिवस जपयज्ञांतील भाविकांना त्यांनीं पाजले "

**स्वराज्य**—[ सं. रा. शि. म. परांजपे ):—" रा. पांगारकर यांनीं समर्थांच्या समग्र ग्रंथांचें आलोडन करून जें सार काढलें आहे त्यांत काव्याचें फार मार्मिक वर्गीकरण केलें आहे. त्यांनीं लिहिलेली प्रस्तावनाही वाङ्मयाच्या विवरणाच्या दृष्टीनें फार महत्वाची आहे. 'सारांश' ८० पृष्ठांत दिला आहे त्यायोगें समर्थांची दुर्बोध कविता कळण्याला मदत होते. हें उपयुक्त पुस्तक सर्वांनीं संग्रहीं बाळगण्यासारखें आहे."

**ज्ञानप्रकाश**:—' समर्थसंजीवनी ' हें पुस्तक संतकवींचा सुमारें दोन अडीच तपें अव्याहत व्यासंग असलेले रा. पांगारकर यांनीं केले असल्यामुळें तें वाचनीय व मननीय झालें आहे हें सांगावयास नकोच."

---

# संसाराचें चित्र !

१ श्रीभगवद्गीतेच्या १३ व्या अध्यायांत अमानित्वादि जीं १८ ज्ञानलक्षणें सांगितलीं आहेत त्यांत 'जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्' असें एक लक्षण दिलेलें आहे. जन्म, मृत्यु, जरा, व्याधि व दुःख यांच्या ठिकाणीं दोषदृष्टि ठेवणें ह्म० यांपैकीं प्रत्येकीं दोष पाहणें असा त्या पदाचा अर्थ आहे. जन्मदोष ह्म० गर्भवास व योनिद्वारां बाहेर पडणें हा जन्माच्या ठिकाणचा दोष आहे. त्याचें अनुदर्शन म्ह० आलोचन, विचार करावा; मृत्यूच्या ठिकाणीं दोषानुदर्शन करावें; जरेच्या ठिकाणीं प्रज्ञाशक्तितेजोनिरोध म्ह० बुद्धि, शक्ति व तेज यांचा ऱ्हास आहे व परिभूतता म्ह० लोकांनीं तिरस्कार करणें हेंही आहे असें पाहावें; व्याधींच्या ठिकाणीं दोष आहेत हें मनांत आणावें व दुःख म्ह० आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक ताप यांचें मनन करून या सर्वांच्या ठिकाणीं दोष पाहात असावें असें आचार्यांनीं वरील पदाच्या भाष्यांत विवरण केलं आहे. जन्म, मृत्यु, जरा, व्याधि व त्रिविध ताप यांच्या ठिकाणीं दोषदर्शन कशासाठीं करायचें ? 'एवं जन्मादिषु दोषानुदर्शनात् देहेंद्रियविषयभोगेषु वैराग्यमुपजायते । ततः प्रत्यगात्मनि प्रवृत्तिःकरणानामात्मदर्शनाय' म्ह० जन्मादिकांच्या दोषदर्शनानें देह व इंद्रियें यांचे जे विषय त्यांच्या उपभोगाविषयीं वैराग्य उत्पन्न होतें व आत्मज्ञानाकरितां इंद्रियांची प्रवृत्ति प्रत्यग्ज्ञानाकडे होते. मधुसूदनसरस्वतीही 'इदं (जन्मादिषु दोषानुदर्शनं)च विषयवैराग्यहेतुत्वे नात्मदर्शनस्योपकरोति' असें म्हणतात, म्ह० जन्ममृत्यु इ० कांचा वारंवार विचार करणें हें विषयवैराग्याला कारण होत असल्यामुळें आत्मज्ञान होण्यास उपयोगीं पडतें. वरील पदावरील ज्ञानेश्वरमहाराजांचें व्याख्यानही पाहण्यासारखें आहे.

जन्म मृत्यु जरा दुःखें । व्याधि वार्धक्यकलुषें ।
तियें आंगा न येतां देखे । दुरोनी जें ।। ५३६ ।।
तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य ।
येणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव ।। ५२३ ।।

तात्पर्य, जन्म, मृत्यु, जरा, व्याधि, त्रिविधताप इ० दुःखाच्या इंगळांनीं हा संसार भरला आहे अशी संसाराच्या ठिकाणीं दोषदृष्टि ठेवल्यानें विषयवैराग्य उत्पन्न होऊन जीव आत्मलाभास पात्र होतो. जरा, व्याधि व मृत्यु दूर आहेत

तर मग त्यांचीं वर्णनें वाचून त्यांचा विचार आधींपासून कशाला पाहिजे असें एकादा तरुण म्हणेल तर काळवेळ कोणावर केव्हां कशी येईल याचा काय नेम आहे ? पुढें निश्चित येणाऱ्या संकटांचा आगाऊ विचार करून तरतूद करून ठेवणें हें दूरदर्शी सुज्ञांचें काम आहे. घराला आग लागल्यावर विहीर खणतां येत नाहीं. म्हणून दुःखें जर निश्चित आहेत व त्यांपासून सुटका करायची आहे तरी त्यांच्या परिहाराचा उपाय आधींपासून शोधला पाहिजे. रोग होण्यापूर्वीं मात्रा जवळ असली कीं जीव निर्भय आहे. असो. 'जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शन' व्हावें याचसाठीं समर्थांनीं दासबोधाचा तिसरा दशक लिहिला आहे. पहिल्या पांच समासांत संसाराचें भयाण पण सत्य चित्र उभें करून जन्मजराव्याधींचे विवरण केलें आहे, पुढील तीन समासांत त्रिविध तापांचें वर्णन केलें आहे व नवव्या समासांत मृत्यूचें वर्णन केलें आहे. याप्रमाणें ९ समासांत संसाराची दुःखरूपता दाखवून वैराग्यज्वालांनीं दग्ध झालेल्या मनावर १० समासांत हरिशरणागतीचा तरणोपाय सांगून केवळ अमृतवृष्टि केली आहे. हा प्रकार आपण पाहूं.

२ तिसऱ्या दशकाच्या पहिल्या पांच समसांत जें संसाराचें चित्र समर्थांनीं उभें केलें आहे तें पाहतांच सर्वांना पटण्यासारखें आहे. जन्म दुःखाचा अंकुर, जन्म शोकाचा सागर, जन्म भयाचा डोंगर, जन्म कर्माची आटणी, जन्म स्वसुखाचा विसर, जन्म वासनाविस्तार, 'जन्म हेंचि विस्मरण ईश्वराचें' 'पाहतां शरीराचें मूळ । या ऐसें नाहीं अमंगळ' कांकीं 'रजस्वलेचा जो विटाळ । त्यामधें जन्म यासी' त्या विटाळाचा हा पुतळा, याच्या निर्मळपणाचा सोहळा काय वानावा ? बाहेरून कितीहि स्वच्छ ठेवलें तरी 'अंतरीं पोतडें नर्काचें' कांहीं चुकत नाहीं. 'जाला राव अथवा रंक । पोटीं विष्टा चुकेना !' शरीर दुर्गंधींचें कोठार आहे. यास प्रत्यहीं धुतलें तरी अस्थि, मांस, त्वचा, मेद, यांनीं सांदीसांदी भरलेला हा देह शुद्ध कोठून राहणार ? 'लाळ थुंका आणि मळ । पीत श्लेष्मा प्रबळ । तयास ह्मणती मुखकमळ । चंद्रासारिखें !' याप्रमाणें देह आवडून घेवो, पण

**जन्म**

'पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्टा कांहीं वमन ॥
भागीरथीचें घेतां जीवन ॥ त्याची होय लघुशंका'

असा हा देह आहे.

हा नऊ महिने आईच्या उदरांत असतांना याची काय दशा असते ! कारागृहवासच तो ! तेथें 'नवहीं द्वारें निरोधिलीं' असल्यामुळें

**गर्भवास** श्वासोच्छ्वासाला पुरेसा वायुही मिळत नाहीं. 'वोकानरकाचे रस झिरपती । ते जठराग्नीस्तव तापती । तेणें सर्वही उकडती । अस्थिमांस ' चर्माचें मोटाले बांधलेलें, विष्टा मूत्र वांती जंत–त्या दुःखानें तप्त होऊन हा जीव ' कळवळोन ह्मणे चक्रपाणी । येथूनि सोडवीं आतां. ' जन्म-वेळ आली. ' माता आक्रंदों लागली । प्रसूतिकाळीं.' याचेंही ' नाकीं तोंडीं बैसलें मांस । मस्तकद्वारें सांडी श्वास ' यामुळें मस्तकद्वार बुजलें, श्वास कोंडला, हा जाजावला, तशांत ' लोक ह्मणती आडवें आलें । खांडून काढा !' मग खांडून काढतात. ' मृत्यु पावला आपण । मातेचा घेतला प्राण ' येथेंच कित्येक जीवांचें आयुष्य संपतें, कित्येक बालकें ओढून काढतांच मरतात. बरें सुकृतबळानें जगलाच तर पुढें बाळपणींच्या यातना भोगाव्या लागतात. " गर्भी ह्मणे सोहं सोहं । बाहेरी पडतां ह्मणे कोहं ' 'ऐसें दुःख गर्भवासीं । होतें प्राणिमात्रासी । ह्मणोनियां भगवंतासी । शरण जावें. '

२ ' संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ ' हा अनुभव जन्मभर येतच असतो. असो. 'बाळपणीं त्वचा कोवळी,' कांहीं

**बाळपण** दुःख झालें तरी सांगायला वाचा नसते. माता वरवर कुरवाळते पण तें कां आक्रंदतें हें तिला कळत नाहीं. ' नाना व्याधींचे उमाळे, तेणें दुःखें तें आंदोळे,फुंजे रडे माता बुझावी घेऊन कडे' या अवस्थेंत कित्येक जीव मरतात असो. त्यांतून तें वांचलेंच तर खेळूं लागतें आईचा छंद घेतें. वियोग पळमात्र न साहे, ' ब्रह्मादिक देव आले । अथवा लक्ष्मीनें अव-लोकिलें । तरी न वचे बुझावलें । आपुले मातेवांचूनी ' कारण आईला बाळ कसलेंही असलें तरी मोहामुळें अतिप्रिय असतें. ' कुरूप अथवा कुलक्षण । सकलांहून करटेपण । तरी नाहीं तीसमान । भूमंडळीं कोणी, मातेवर अति प्रीति असतांच या वयांत कित्येकांच्या माता मरून पोरें उघडीं पडतात; ' आई पाहतां दिसेना । दीनरूप पाहे जना ' बाई दिसली कीं 'माता ह्मणोनि मुख पाहे । तंव ते आपली माता नव्हे ' । मग हिंवासलें ( हिरमुष्ट ) होऊन राहे । दैन्यवाणें ! ' अथवा आईवांचून तें वांचलें व मोठें होत चाललें कीं आईचा छंद सुटून खेळाची व शेजारच्या लेंकरांची संगति लागून जाते. खेळाची चट लागते. खेळांतही क्वचित् ' पडिले दांत फुटला डोळा । मोडले पाय जाला खुळा ' असें होतें; नाहीं तर देवी आणि गोवराच्या साथींत सांप-डतें, भूत, मुंजा, ब्रह्मग्रह लागतो, कोणी चेटूक करितें. इतकेंही चुकून

त्रांचला ! आईबापांनीं मारमारून शाहणा केला. संभ्रमानें लग्न करून दिलें. बायको मिळतांच बापुडीं मायबापें एकीकडे राहिलीं. याचा 'अंतर्भाव सासुरवाडी' झाली. 'मन हें रंगोन गेलें सासुरवाडीकडे' मायबाप, बंधुभगिनी बायकोपुढें तुच्छ झालीं. 'प्रीतिपात्र ( स्त्री ) अंतर्कळा (चित्त) घेऊन गेली.' दुसरे व्यवसाय सुचेनासे झाले. 'कोवळे कोवळे शब्द मंजुळ। मर्यादा लज्जा मुखकमळ' याला प्राणी गुंतून पडला ! व्यवसाय करितांनाही 'मन लागलेंसे घरीं.' स्त्रीकारणें लाज-लज्जा, विवेक, धर्म, प्रेम सर्व सांडिलें. तिला 'तनुमनु धनु सर्वही। अनन्यभावें अर्पिलें.' 'तये भार्येचेनि कैवारें। मायबापासीं नीच उत्तरें। बोलोनियां तिरस्कारें। वेगळा निघे।' हा कामी तिच्यासाठीं सर्वांशीं वांकडा झाला ! असा स्त्रीप्रेमांत बुडाला असतांना 'ते मरोन गेली अकस्मात भार्या !' तेणें मनीं शोक वाटला. 'स्त्री घेऊन आडवी। ऊर बडवी पोट बडवी। लाज सांडून गौरवी। लोकां देखतां ?' येथें कांहीं जीव जोगी होऊन जातात.

**स्त्रीलोभ**

पण प्रथम स्त्री मृत्यु पावतांच जोगी होऊन जाणारे विरळ, चार दिवस रडून पुन्हा द्वितीयसंबंध करून संसार थाटणारे फार. असो; यानें पुन्हा संसार मांडला व आनंद मानून राहिला. 'जाला अत्यंत कृपण। पोटा न खाय अन्न.' तीर्थ, व्रत, धर्म कर्म, श्राद्धपक्ष सर्व सांडून लंड बनला, 'स्नानसंध्या ह्मणे वृथा। कासया करावी ?' 'अभिलाषें सांची वित्त। स्वयें करी विश्वासघात। मदें मातला उन्मत्त। तारुण्यपणें.' 'स्त्री केली परी धाकुटी। धीर न धरवे पोटीं' यास्तव वोळख सोडून परस्त्रीरत जाला. त्याचें फळ लवकरच मिळालें. 'व्याधी भरली सर्वांगीं.' दुःखें सर्वांग फुटलें, नासिक अवयवेंचि बैसलें, हस्तपाद झडले, सर्वांगीं किडे पडले,...इकडे दरवडा येऊन चोरट्यांनीं वित्त नेलें. असो. औषधोपचार होऊन हा वांचला. 'लोक म्हणती पडला माणसांमध्यें.' पुन्हां स्त्री आणून घर-ात मांडली, कांहीं वैभव मिळविलें पण 'संतान नाहीं' हें दुःख उभें राहिलें.

**द्वितीयसंबंध**

पुत्रासाठीं नवससायास करून वांजपण काढून टाकण्यास उपाय आरंभिले. वांजपण गेलें, पण मरतवांज नांव पडलें. पोर झालें कीं मेलें असें होऊं लागलें. वेली खुंटली, वृत्ति बुडाली, यासाठीं सारी तळमळ ! 'आई भुता करीन तुझा। नांव ठेवीन केरपुंजा' गोसावी, देवऋषी केले. नाना कवटाळें केलीं. 'वृक्षाखालें जाऊन नाहती। फळतीं झाडें करपती' असो. अखेर मुलें होऊन वांचूं लागलीं.

**संतान**

४ लेंकरें उदंड झालीं पण लक्ष्मी घरांतून जाऊन बापडीं भिकेला लागलीं. ' घरभरी जाली दाटी । कन्या आणि पुत्रांची !' खर्च वाढला. यावा

**दारिद्र्य** (उत्पन्न) खुंटून गेला. कन्या उपवर जाल्या, त्यांला उजवावया द्रव्य नाहीं ! मायबापें संपन्न होती. लोकाचारीं भ्रम आहे. पहिली नांदणूक संभाळली पाहिजे. खातीं तोंडें मिळालीं तेव्हां उद्वेगाची काळजी लागली. मुलगेही मोठे झाले. त्यांचीं लग्नें न केलीं तर ' कासया व्यालीं जन्मदरिद्रें' असें लोक म्हणतील अशी लोकलाज लागली. 'मागें रिण ज्याचें घेतलें । त्यांचें परतोन नाहीं दिलें । ऐसें आभाळ कोसळलें । उद्वेगाचें' पत अवघी मोडली, वस्तभाव गहाण पडली, कळांतरें (व्याजानें) पैका काढला, रिणाइतांनीं (सावकारानीं) वेढून घेतलें, तेव्हां ' दोन वर्षे बुडी मारली । नीच सेवा अंगिकारली । शरीरें आपदा भोगिली । अतिशयेसी ' विदेशीं चार पैसे मिळवून घरीं परत आला. स्त्रीपुत्रांना आनंद झाला. ते संपल्यावर पुन्हा विदेशीं गेला. जातांना सर्वांना परम दुःख जालें. दारालेंकरांचें वियोगदुःख कठीण. लांब गेल्यावर ' चित्त भ्रमलें

**विदेशगमन** संसार उद्वेगें,' तेव्हां आईचें स्मरण झालें व तिला दुःख दिल्याचा पश्चत्ताप झाला. आज आई असती तर !–

पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी ।<br>
दगदगला देखोनि अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखवे ॥ ३७ ॥<br>
प्रपंच विचारें पाहतां । हें सकळ जोडे न जोडे माता ।<br>
हें शरीर जयेकरितां । निर्माण झालें ॥ ३८ ॥<br>
धन्य धन्य प्रपंची जन । जे मायबापाचें भजन ।<br>
करिती, न करिती मन । निष्ठुर जिवलगांसी ॥ ३९ ॥

रतिसुखाच्या डोहीं बुडून आईबापांना दुःख दिल्याचा ते वेळीं अनुताप झाला. हा फार उशिरां झाला ! असो. मन घट्ट करून विदेशाला गेला.

५ चार वर्षे परदेशीं राहून घरीं आला. इकडे अवर्षण पडून मुलें लेंकरें दैन्यवाणीं झालीं होतीं. ' अन्ना लागीं मिडकलीं (धाधावली)

**वाताहात** झडा घालिती ' बायको मेली. अन्न करून पोरें भरवावीं असा क्रम सुरू झाला. ' लोकीं भरीस घातलें । पुन्हां मागुती लग्न केलें. ' चार दिवसांनीं पुन्हा विदेशीं गेला व द्रव्य मिळवून आला. ' स्त्री झाली न्हाती धुती । पुत्र देखों न सकती । भ्रताराची गेली शक्ति । वृद्ध जाला.' त्याचीं तिसरी तरुण बायको व दुसरीचीं सावत्र मुलें यांचीं सदा भांडणें होऊन

वाटणीसाठीं तंटे लागले. शेवटीं ‘ लेकीं बापास मारिले । तंव ते मातेनें घेतलें शंखतीर्थ ! ’ लोक म्हणती ‘ बापास लेक कामा आले ! ’ असो. वाटे होऊन लेंकानीं बापास वेगळे घातले. तरुण सुंदर स्त्री व हा वृद्ध. चार दिवस सुखाचे जातात तोंच गल्बला झाला, परचक्र आलें व याची कांता बंदी धरून नेली. कांता भ्रष्टल्याची वार्ता ऐकून याला ब्रह्मांड दुःख झालें, याला आयुष्य व्यर्थ दवडल्याचा पश्चात्ताप झाला. जरा आली. वृद्धपणाचीं दुःखें दारुण आहेत. ‘जन्मवरी स्वार्थ केला । तितुकाही वेर्थ गेला !’ पुन्हां जन्मांतर पुन्हा हेंच !

**त्रिविधताप**

६ संसारदुःखाचें चित्र उभें केल्यावर आतां सकल संसारदुःखांचें शास्त्रीयदृष्ट्या ज्यांत व्यवस्थित वर्गीकरण केलें आहे असें त्रिविधतापांचें वर्णन करितात. हे त्रिविधताप सविस्तर वर्णन करण्याचा हेतु प्रथम सांगतात. ‘जो तापत्रैं पोळला । तो संतसंगे निवाला.’ त्रिविधतापांनीं संसार कसा ग्रासला आहे, हें पुरें मनावर बिंबल्याशिवाय मनुष्य परमार्थाकडे सहसा वळत नाहीं. तापत्रय जाणल्यानें सुज्ञ मनुष्यास वैराग्य प्राप्त होतें, वैराग्य झाल्यानें तो ज्ञानाधिकारी होतो व सत्संगानें ज्ञान प्राप्त होऊन समाधान पावतो. संसाराची दुःखरूपता पुरी प्रतीत झाल्याशिवाय वैराग्य नाहीं, वैराग्याशिवाय ज्ञान नाहीं व ज्ञानाशिवाय मोक्ष नाहीं. यासाठीं संसार दुःखरूप आहे, हें जितकें मनावर ठसेल तितकी मनोभूमी भाजून तयार होते. भुकेनें व्याकुळ झाल्यावर अन्न मिळाल्यानें तृषाक्रांतास जीवन मिळाल्यानें, बंदिवानास बंधमुक्त केल्यानें, महापुरांत बुडत असलेल्याचे प्राण वांचविल्यानें, स्वप्नभीतास जागृत केल्यानें, रोग्यास शुद्ध व प्रचीतीचें औषध दिल्यानें, आसन्नमरण नरास जीवदान दिल्यानें अत्यंत समाधान वाटतें.

तैसा संसारदुःखें दुखवला । त्रिविधतापानें पोळला ।
तोचि येक अधिकारी जाला । परमार्थासी ॥ ७ ॥

दुनियेंत जेवढे म्हणून ताप आहेत ते सर्व तीन वर्गांत येतात. १ आध्यात्मिक २ आधिदैविक व ३ आधिभौतिक. यांचें थोडेंसें स्पष्टीकरण करूं. देह, इंद्रिय, मन व प्राण यांच्या योगानें जे ताप होतात ते आध्यात्मिक ताप होत. हें अर्थात् द्विविध आहेत, एक शारीरिक ह्म० रोगादि व दुसरे मानसिक ह्म० कामक्रोधादि षड्विकारांपासून किंवा शोक,असूया,ईर्ष्या,अवमान इ०अन्यविकारांपासून होणारे हे आध्यात्मिक ताप होत. दुसरे आधिभौतिक ताप हे अन्य भूतांपासून होतात. ‘ पशुपक्षिमनुष्याद्यैः पिशाचोरगराक्षसैः ’ सरीसृपाद्यैश्चनृणांजन्यते चाधिभौतिकः ’ ह्म० पशुपक्षी, मनुष्य, पिशाच्च, सर्पादि

सरपटणारे प्राणी इत्यादि भूतांपासून होतात ते आधिभौतिक. तिसरे आधिदैविक ताप. हे शुभाशुभ कर्मांच्या योगानें होतात. ' शीतोष्णवातवर्षांबुविद्युदादिसमुद्भवः ' ह्म० पापकर्मांच्या योगानें शीत, उष्ण, वात, वृष्टि, वीज इ० कांपासून होतात ते आधिदैविकताप होत. ( वरील श्लोक विष्णुपुराणांतून मी दिले आहेत. दासबोधाच्या छापील प्रतींत जे तीन श्लोक उध्दृत केले आहेत, ते अशुद्ध दिसतात. ते माझ्या हस्तलिखित प्रतीवरून मी शुद्ध पुढें देतो व त्यावरील समर्थांचें विवरणही देतों. )

देहेंद्रियमनःप्राणैः सुखं दुःखं यदाप्यते ।
इममाध्यात्मिकं तापं विजानीयाद्धि देहिनाम् ॥ १ ॥
सर्वभूतैर्देहयोगात् सुखंदुःखं यदाप्यते ।
द्वितीयं तं विजानीयात्संतापं चाधिभौतिकम् ॥ २ ॥
शुभाशुभैःकर्मभिस्तैर्देहांते यमयातना ।
स्वर्नरकादिभोक्तव्यमिदं विद्धयाधिदैविकम् ॥ ३ ॥

* * * *

देह इंद्रिय आणि प्राण । यांचेनि योगें आपण ।
सुखदुःखें सिणे जाण । या नांव आध्यात्मिक ॥३-६-१३॥
सर्व भूतांचेनि संयोगें । सुखदुःख उपजों लागें ।
ताप होतां मन भंगे । या नांव आधिभौतिक ॥ ३-७-२ ॥
शुभाशुभकर्मानें जना । देहांतीं यमयातना ।
स्वर्ग नरक भोग नाना । या नांव आधिदैविक ॥ ३-८-२ ॥

**आध्यात्मिक**

७ देह, इंद्रियें, मन, व प्राण यांच्यापासून जीं जीं दुःखें प्राप्त होतात ते सर्व आध्यात्मिक ताप होत. ' खरूज, खवडे, पुळिया, नारू ' पासून आरंभ करून ' वृद्धपणींच्या आपदापर्यंत देहादिकांना जे नानाविध रोग, आपदा, व्यंगें इ० होतात त्यांचें सविस्तर वर्णन मूळांतच (१३—५६) पहावें.

**आधिभौतिक**

८ आधिभौतिकांत आम्या सर्प, गांधीलादि दंश्य, विंचु, व्याघ्र, लांडगे, सुसर, मगर; इ० प्राण्यांपासून अपाय होऊन जीं अनेक दुःखें होतात तीं सविस्तर वर्णिलीं आहेत. त्यांतच 'सासुरवास गालोरे ( गालगुच्चे )। ठुणके ( ठोसे ) लासणें ( डागणें ) चिमोरे ( चिमटे ) ' इ० प्रकारें सुनांना कठोरपणानें छळणाऱ्या सासवांच्याही दुष्टपणाचे प्रकार सांगितले आहेत; सुना

बिचाऱ्या 'पराधीन बालपणीं । कुशब्द मार जाचणीं । अन्नवस्त्रेंवीण आळणी' इ० वेदना तेव्हां निमुटपणें 'आलें रुदन न धरे' अशा प्रकारें सोशित असत ! 'चुकतां कान पिळती । कां डोळां हिंग घालती । सर्व काळ धारकीं धरिती' अशा कजाग क्रूर सास्वा तेव्हां अधिक असाव्यातसें दिसतें. (२४–२६). तेव्हां परकीयांपासून व कचित् स्वजनांपासूनही होणारे ताप वर्णन केले आहेत ते वाचतांना अंगावर शहारे येतात. 'कोणी येकें भ्रष्टविती, कोणी येकें विष देती, दुर्गाखालें कोसळती, 'नाना प्रकारचे मार । दुर्जन मारिती अपार,' 'परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें । दुर्दशा होऊन मेले' इ० दुःखें आधिभौतिकच होत. 'नाना मंदिरें सुंदरें । नाना धान्यें नाना घरें' दग्ध होतते नाना वन्हीचे आघात या सदराखालींच येतात. 'प्राणी स्थानभ्रष्ट जाले । कन्यापुत्र गाहाळले' हे प्रसंग यात्रेकरूंना येत असावेत. 'तस्कर अथवा दावेदार । अवाचिता करिती संहार । लुटितीं घरें नेती खिल्लार' अशी बेबंदशाही समर्थांनीं तीर्थयात्रेच्या वेळीं पाहिली असावी. भैंद, उचले, खाणोरी, ठक, सितरू, गठीछोडे इ० प्रकारचे भामटे सर्व काळीं सर्वस्थळीं जनांना वेगवेगळ्या प्रकारानें क्लेश देणारे असतात. 'प्राणी बंदी सापडला । यातनावरपडा झाला' त्या यातना व 'प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत' इ० प्रकारें सरकारचे पोलिस अधिकारी जे परमावधीचे क्लेश देत ते अत्यंत दुःसह असले पाहिजेत. दरेमार (दरींत लोटून देणें). तळवेमार (तापल्या तव्यावर उभें करून मारणें), मोघरींमार (अपानीं मेख ठोकून मारणें), बुधलेमार (दारू भरलेल्या बुधल्याशीं बांधून त्यास आग लावणें), डंगारणेमार (बडग्यांनीं मार), बुक्या, गचांडया, गुडघेमार, लाथा, चपरका, शेणमार, इ० प्रकारचे अघोर मार समर्थांनीं खास पाहिले किंवा ऐकले असले पाहिजेत ! टांगणें, टिपऱ्या (चाप) पिछोरे (मागील बाजूस हात वळवून बांधणें); बेडया, बुधनाल (वृक्षाच्या बुंधाशीं नालाकृतीनें बांधून मारणें) कोलदंडें, रक्षणनिग्रह (पाहरेकरी ठेवून बंदी करणें), नाकवणी, चुनवणी, रायवणी [ मोहऱ्यांचे पाणी ), मीठवणी इ० नाकाकानांत ओतून मारणें, जळांत बुचकळणें, हत्तीपुढें बांधून टाकणें, सुळीं देणें, नेत्रवृषण काढणें, कर्णछेद, हस्तपादछेद, जिव्हाछेद, इ० प्रकारें इंद्रियछेद करणें, कडेलोट करणें, भांडयांमुखें उडवणें (तोफेच्या तोंडीं देणें); शिसें पाजणें, गळ घालणें, शिरछेद करणें, फांसी देणें, इ० नानाविध अघोर उपायांनीं न्यायानें असो अन्यायानें असो मरणाधिक दुःख होण्याचे राक्षसी प्रकार हे सर्व आधिभौतिक तापांत येतात. सर्व देशांत सर्वकाळीं व सर्वस्थळीं कमी अधिक

घोरप्रकारांनीं कर्मानुसार अनेक प्राण्यांना असल्या प्रकारचीं नानाविध दुःखें सोसावीं लागतात एवढें खरें आहे. संसारांत सामान्यतःही पुष्कळ दुःखी प्राणी आपल्या पाहाण्यांत येतात. कुरूप कर्कश क्रूर स्त्री (अगर पति), विधवा कन्या मूर्ख पुत्र' संगति होणें, हें आधिभौतिक दुःखच. 'बाळपणीं मरे माता। तारुण्यपणीं मरे कांता (कांत ही)। वृद्धपणीं मृत्यु सुता। या नांव आधिभौतिक' कठिण काळ आणि दुष्काळ। उद्वेग चिंतेचे हलाल' इ० दुःखांचे डोंगर सांगतां अपार आहेत

८ मनुष्यांच्या शुभाशुभ कर्मांच्या योगानें त्यांना स्वर्गनरकादि नाना भोग भोगावे लागतात व देहांतीं यमयातना होतात हे सर्व आधिदैविक ताप होत. शुभकर्मांच्या योगानें स्वर्गादि मिळाले तरी 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशंति' या न्यायानें शाश्वत दुःखध्वंस होत नाहीं व पुन्हां दुःख भोगण्यास मर्त्यलोकीं यावें लागतें म्हणून स्वर्गादिभोगही आधिदैविकांतच घातले आहेत. मदांधपणानें व अविवेकानें माणसें नानाविध पातकें करितात व त्यांचें फळ परमदुःख रूपानें त्यांना भोगावें लागतें.

**आधिदैविक**

आगंबळें द्रव्यबळें। मनुष्यबळें राजबळें।
नाना सामर्थ्याचेनि बळें। अकृत्य करिती ॥ ४ ॥
नीती सांडूनियां तत्वता। करूं नये तेंचि करितां।
येमयातना भोगितां। जीव जाये ॥ ५ ॥

डोळे झांकून स्वार्थबुद्धीनें वृत्ति, भूमि, द्रव्य दारा साधण्यास लोक तयार होतात व मातलेपणानें जीवघात, कुटुंबघात करितात, त्याचें फळ-यमयातना त्यांना भोगाव्या लागतात. मर्यादा सोडून गांवचे लोक वागूं लागले तर त्यांना ग्रामाधिपती दंड करितो, देशानें अन्याय केला तर देशाधिपती त्याला शिक्षा करितो—

देशाधिपतीस दंडिता रावो (राजा)। रायास दंडिता देवो!
राजा न करितां नीतिन्यावो। म्हणोन यमयातना ॥ ९ ॥
अनीतीनें स्वार्थ पाहे। राजा पापी होऊन राहे।
राज्या अंतीं नर्क आहे। म्हणौनियां ॥ १० ॥

राजानें नीति सांडली तर यम दंडितो, व यमानें सांडली तर त्याला दंडणारा देव आहे. अशी नीति देवानेंच लावल्यामुळें न्यायनीतीनें वर्तावें, 'नीतिन्याय सांडितां भोगावें। यमयातनेसी? यमयातनेचीं दुःखें अनिवार आहेत-' हें शास्त्रीं बोलिलें म्हणून अविश्वास मानूंच नये;

वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ति न करिती ।
त्यांस यम यातना करिती । या नांव आधिदैविक ॥१८॥

यमयातना ( बहुधा गरुडपुराणांत वर्णिल्याप्रमाणें ) येथें वर्णिल्या आहेत.

१ त्रिविध तापांचें वर्णन केल्यावर त्रिविध तापांचा राजा जो मृत्यु त्याचें वर्णन करितात. मृत्यूचें भय प्राणिमात्रास आहे. प्रत्येकास जगावें असें वाटतें, मरण कोणासही नको असतें, मात्र तें चुकत नाहीं.

संसार म्हणजे सवेंचि स्वार । नाहीं मरणास उधार ।
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥

संचित सरतांक्षणींच देह पडतो. यमदूतांची मारपीट होतांना ' कोणी चालूं न सकती पाठीं, ' मागें पुढें सर्वांनाच जावें लागतें. राजे, महाराजे, महाबळी कोणी राहूं शकत नाहींत. बळाढय, धनाढय, गुणाढय, झुंजार, संग्रामशूर, राजकारणी, कवीश्वर, चक्रवर्ती, वैदिक, याज्ञिक,पुराणिक, व्युत्पन्न, योगाभ्यासी, संन्यासी, तपस्वी, मनस्वी, सिद्ध, वैद्य, हठयोगी, राजयोगी, वीतरागी, कोणीही असो, मृत्यु कोणाचीही दयामाया क्षणमात्रही करीत नाहीं. ' सकळ जीवांस प्राशन । मृत्यूचि करी. ' हा राजबिंडा आहे, बोलका आहे, विचक्षण आहे, हा हजारोंचा आधार आहे असा विचार मृत्यूपाशीं नाहीं. मृत्यूच्या भेणें पळों जातां येत नाहीं. ' हा मृत्युलोक सकळांस ठावा ' आहे.

गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।
गेले अगाध महिमेचे । मृत्युपंथें ॥ ४६ ॥

भगवंताचे अवतारही कोठे राहिले आहेत ?

गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक ।
गेले युक्तीचे तार्किक । तर्कवादी ॥ ४९ ॥

मोठमोठे पुरुषार्थी, कार्यकर्ते, धर्मरक्षक, आचार्य सर्व काळाच्या तोंडीं गेले.

असो ऐसे सकळही गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥

जे जिवंतपणींच मरणाला मारून स्वरूपाकार होऊन राहिले त्यावांचून सर्व मृत्युवश झाले आहेत.

## सुटकेचा उपाय.

१ 'संसार म्हणजे महापूर' आहे. संसारसागराच्या पोटांत अनेक विषारी

**हरिशरणागति** काळसर्प डंखायला तयार आहेत. आशाममता या प्रचंड सुसरी दुःखाच्या सांकडींत घालतात. अहंकारनक्र रसातळाला घेऊन जातो. कामाची मगरमिठी भयाण आहे.

वासना घामीण वेंटाळें घालून गरळ ओकीत बसलीच आहे. बहुतेक आवर्ती पडिले । प्राणी वाहातचि गेले ' बहुतेक जीव या भवार्णवांत सांपडून वाहात जात आहेत. पण–

जेहिं भगवंतासी बोभाइलें । भावार्थबळें ॥ ८ ॥
देव आपण घालूनि उडी । तयांसी नेले पैलथडी ।
येर तें अभाविकें बापुडीं । वाहातचि गेलीं ॥ ९ ॥
भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ॥ १० ॥
जयास भगवंत आवडे । तयाचे देवासी सांकडें ।
संसारदुःख सकळ उडें । निजदासाचें ॥ ११ ॥
जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे ।
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥ १२ ॥

भाव तसा देव, देव जशास तसा आहे, जसें भजन तसेंच समाधान देणारा आहे. दर्पणांतल्या प्रतिबिंबासारखा भाव असेल तसा देव होतो.

भावें परमार्थाचिया वाटा । वाहती भक्तीचिया पेठा ।
भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंगें ॥ २० ॥
म्हणोनि धन्य ते भाविकजन । जेहिं जोडिलें हरिनिधान ।
अनन्त जन्मांतरींचें पुण्य । फळासि आलें ॥ २६ ॥
आयुष्य हेचि रत्नपेटी । माजी भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ॥ २७ ॥
हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ ।
सदासर्वदा संतुष्ट । नैराश्यबोधें ॥ २८ ॥
जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा ।
जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षै ॥ ३१ ॥

असें हरिभक्तीचें अक्षय अपार सुख भोगावें तरच नरजन्म मिळाल्याचें सार्थक होय. संसारांत अलिप्तपणें असावें.

कोण समय येईल कैसा । याचा नकळें कीं भरंवसा ।
जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ॥ ३९ ॥

या संसारांत कोणावर केव्हां कशी वेळ येईल हें सांगवत नाहीं. वेळेला " पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ' असा प्रसंग येतो. नरदेहांत देव जोडला नाहीं तर नीच योनींत पुन्हां पडावें लागेल. श्वानसूकरादि योनींत उत्तम गति नाहीं. आई बाप, बंधु, भगिनी, दारापुत्र, स्नेहि सोबती–' हे

तूं जाण मवेची । अवघीं सोइरीं सुखाचीं ' आहेत, दुःखाची सांगाती होणार नाहींत.

कैचा प्रपंच कैचें कुळ । कासया करिसी जोजार ।
जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ॥ ४८ ॥
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्रीकन्या पुत्र होती । लक्षानुलक्ष ॥ ५१ ॥
कर्मयोगें मिळाला । येके स्थळीं जन्मास आलीं ।
ते तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥
तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार ।
आतां येक भगवंत साचार । धरी भावार्थबळें ॥ ५३ ॥
येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें ।
नाना स्तुति आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४ ॥
जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी ।
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ५५ ॥
अहर्निशीं ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता
मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ।
भूमि धरिली धराधरें । प्रगट होइजे दिनकरें ।
ऐसी सृष्टि सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७ ॥
ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळूपणें ॥ ५८ ॥
ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडून धरिती विषयकाम ।
ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ॥ ५९ ॥
रामवीण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश ।
माझें माझें सावकाश । शीणचि उरे ॥ ६० ॥
सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी ॥ ६२ ॥
गळ गिळितां सुख वाटे । वोढून घेतां घसा फाटे ।
कां तें बापुडे मृग आपटे । चारा घेऊन पळतां ॥ ६६ ॥
तैसी विषयसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी ।
म्हणोनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ ६७ ॥

हें सर्व पटलें, कां कीं अमळ निवळलेल्या मनास हें पटण्यासारखेंच आहे. भगवद्भजनानें जन्माचें सार्थक होतें हें पत्करलें; पण आतां देव कोठें

आहे, तो कसा भेटतो व त्याचें भजन कसें करावें हें सांगण्यासाठीं श्रीसमर्थांनीं पुढें ‘ नवविधाभक्ति ’ सांगितली आहे. पुढल्या दशकांत ‘ स्वानंद तुबंळेल आतां ’ असें स्वतः त्यांनीं आश्वासन दिलें आहे.

—:०:—

## स्फुट विचार.

### १. वै. हरिभाऊ गिंडे.

बेळगांवशहापूरचे श्रीहरिभक्तिपरायण हरिभाऊ गिंडे हे वारकरी मंडळांत प्रख्यात होते. हे जानेवारीच्या ९ व्या तारखेस मधुमेहानें वारले हें कळवि-ण्यास आह्मांस फार वाईट वाटतें. हरिभाऊ चांगल्यापैकीं वकील होते पण या पेक्षां त्यांची ख्याति पंढरपूर येथील वारकऱ्यांच्या फडावरील कीर्तनकार व वार-कऱ्यांचे पुढारी ह्मणून अधिक आहे. गिंडे यांचें घराणें भगवद्भक्तीविषयीं प्रसिद्ध आहे. हरिभाऊ आपला प्रपंच व्यवसाय नीट संभाळून नित्य ज्ञानेश्वरीचें निरूपण घरीं रोज करीत असत असा क्रम सतत दोन तीन तपें चालला होता. हे तप कांहीं सामान्य नाहीं. हरिभाऊंचे कनिष्ठ बंधू श्यामराव हेही वारकरी मंडळांत प्रेमळ प्रवचनकार ह्मणून मान्य आहेत. हे कित्येक वर्षें एकनाथीभाग-वत सांगत असतात. उभय बंधु सत्वस्थ, प्रेमळ व परोपकारी होते. शाम-रावजी यांजवर घराण्याचें पारमार्थिक यश संभाळण्याचें काम आतां येऊन पडलें आहे व हें कार्य त्यांच्या हातून उत्तम पार पडेल अशी आमची खात्री आहे. गिंडे यांचे घराण्याशीं आमचा पारमार्थिक स्नेहसंबंध बऱ्याच वर्षांचा असून हरिभाऊंचें स्मरण आह्मांस दीर्घकाल राहील. प्रपंच संभाळून परमार्थ निरपेक्षतया साधायचा, दोहींचा काला करायचा नाहीं हें संप्रदायांतील सूत्र-वाक्य ध्यानीं ठेवून हरिभाऊ आयुष्य कंठीत होते. पुत्रशोकासारखे धक्के बसले असून त्यांनीं आपली शांति विवेकानें संभाळली होती. यांचे चिरंजीव पांडुरंगराव हे मेडिकल कॉलेजांत शेवटच्या वर्षांत आहेत. हे लवकरच डॉक्टर होऊन घराण्याची भगवद्भक्तीची परंपरा चालवितील अशी आह्मांस उमेद आहे.

———

### २ क. श्रीसदानंदसरस्वति स्वामी.

निजामच्या राज्यांत प्रसिद्ध असेलेले श्रीसदानंदस्वामी ( पूर्वाश्रमींचे बाबा महाराज ) हे शुक्रवारीं कार्तिक वद्य ३ रोजीं वयाच्या ९६ वे वर्षीं समाधि-

स्थ झाले. यांचा जन्म आंबेजोगाई येथें शके १७५० मध्यें झाला होता. यांस श्रीदेशिकानंदतीर्थ यांचा उपदेश असून गुरु शके १७९४ मध्यें उंबरी मुक्कामी समाधिस्थ झाल्यापासून हे उंबरी येथेंच गुरुचरणांजवळ राहत असत. यांस हठयोग व राजयोग पूर्ण अवगत होते. यांचा पहिल्यापासून ब्रह्मचारी राहण्याचा विचार असून मातापित्यांच्या अत्याग्रहास्तव यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला होता, पण हे संसारांतही विरक्तपणान राहत. हे शांत व गंभीर असून प्रायः मौनवृत्तीनें राहत. यांनीं भक्तिज्ञान, वैराग्य व योग यांवर बरेंच काव्य केलें असून तें प्रसिद्ध व्हावें अशी त्यांची मनीषा नव्हती, प्रसिद्धीचा त्यांस जात्याच कंटाळा होता. तथापि त्यांचे चिरंजीव भास्करानंद व इतर शिष्य यांचा विचार त्यांची कविता प्रसिद्ध करण्याचा आहे असें समजतें. यांच्या स्मशानयात्रेस दहा हजारांवर समुदाय जमला असून पेढे व रुपये उधळण्यांत आले. त्यांच्या चिरंजीवांस त्यांचे गादीवर बसविलें असून ते वडिलांचा उपासनामार्ग पुढें चालवितील अशी अपेक्षा आहे, असें औरंगाबादेहून ‘ सहजानंद ’ कळवितात.

---

## ३ बेळगांवची गोपरिषद.

बेळगांवास कांग्रेसबरोबर ज्या अनेक परिषदा भरल्या त्यांत हिंदुसभेची व गोरक्षणाची अशा दोन अधिक महत्वाच्या भरल्या. मुसलमानांप्रमाणेंच हिंदूंनींही स्वहितार्थ जागृत व्हावें, हिंदुसमाजाची संघटना व्हावी, हिंदुसमाजांत जिवटपणा, चैतन्य, धैर्य इ० गुण उत्पन्न व्हावेत अशा हेतूनें हिंदुसभेचें कार्य चाललें असून तिच्या शाखा जागोजाग स्थापन होत आहेत, हे एक सुचिन्ह आहे. स्वामी श्रद्धानंद, लाला लज़पतराय, पंडित मदनमोहन मालवीय, मुंजे असल्या कर्तृत्ववान् पुढाऱ्यांनीं हें कार्य अंगावर घेतलें असल्यामुळें या कार्याला लवकरच जोमदारपणा येईल असें दिसतें. गोरक्षण परिषदेंत पंडित मालवीय व ह. भ. प. चौंडे महाराज यांचीं भाषणें फार चांगलीं झालीं. **मालवियजी** म्हणाले," गोरक्षण आपण मनापासून करीत असूनही इंग्रज व मुसलमान यांचें या कार्यास साह्य होत नसल्यामुळें हें यशस्वी होत नाहीं. मुसलमानांपेक्षां इंग्रजांचे प्रीत्यर्थ गोवध फार होतो. गोरक्षणाकरितां आपले प्राण दिले पाहिजेत असें हिंदुशास्त्रांत सांगितलें आहे. हिंदुमुसलमानांचें सख्य झाल्यास व मुसलमानांना गोरक्षणाचें महत्व कळल्यास कांहीं आळा पडण्याचा मार्ग सांपडेल. इंग्रजी सैन्यास रोजच्या खाण्यासच गोमांस फार लागतें! मी ६३ वर्षांच्या संबंध आयुष्यांत गाईच्या दुधाशिवाय दूध प्यालों नाहीं पण इकडे मला तें मिळत

नाहीं. मुलांस गोदुग्धाचा भयंकर तुटवडा पडत आहे. गाई दुर्मिळ झाल्या तर आमच्या धर्माचा विजय कसा होईल? कसायाकडे गाय जाऊं न देण्याबद्दल हिंदुमात्रानें जपले पाहिजे, व जो हिंदु गाय विकील त्याशीं पूर्ण असहकार केला पाहिजे. **चौंडे महाराज** म्हणाले, "श्रीगोपालकृष्ण गोमातेस 'मातारः सर्वभूतांना' असें म्हणतात, व वेदांत 'माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसा आदित्यांना' असें गोमातेचें वर्णन केलें आहे. 'आत्मौपम्येन सर्वत्र यः पश्यति स पश्यति' हिंसा धर्माला निषिद्धच आहे. त्यांत गाईचे उपकार अनंत आहेत. गाय गरीब, निरुपद्रवी व बहुत उपकारी प्राणी आहे. आपली ती माता आहे. स्वतःची हिंसा कोणास आवडेल? मग दुसऱ्या प्राण्याची हिंसा करण्याचा मनुष्यास कोणी हक्क दिला? मक्केंत असा नियम आहे कीं, कोणीं डोक्यांतली ऊही मारतां उपयोगी नाहीं. मग मक्केंतला अल्ला वेगळा व हिंदुस्थानांतला वेगळा असे आहे काय? दयेवांचून कोणीही देवाचे कृपेस पात्र होणार नाहीं. आपलेकडे श्रियाळराजानें आपला मुलगा देवास दिला तसा पैगंबरानें इब्राहिमपाशीं मुलगा मागितला तेव्हां पैगंबरानें मुलगा दूर ढकलला व तेथें धुमा नांवाचें बकरें उभें केलें. या कुरबानीच्या प्रकारांत कोठेंही गाईचें नांव नाहीं हें मुसलमान बांधवांनीं लक्ष्यांत ठेवावें. मी कुराणही पढलों आहें! आज हिंदुस्थानांत हजारीं ७०० मुलें गोदुग्ध न मिळाल्यामुळें मरत आहेत. लंडन शहरीं मुलांची मृत्युसंख्या हजारीं ७५ व आमचेकडे ७००! सावध होऊन डोळे उघडून पहा! पुण्याच्या डिसेंबरच्या मृत्युसंख्येंत ४९९ पैकीं २७७ तान्हीं मुलें आहेत. आपली प्रजा वांचविण्यासाठीं तरी हिंदु-मुसलमानांनीं गोवध बंद करावा. शेती सर्वांचा धंदा, मुसलमानांच्या शेतीस बैल नकोत काय? दारीं गाय नसणें म्हणजे तें घर स्मशान आहे असें व्यासांनीं म्हटलें आहे. विचार करा." गाईची थाटानें मिरवणूक काढण्यांत आली. अखिल भारतीय गोरक्षणी योजना मार्चमध्यें होण्याचें ठरलें आहे.

---

## ४ नाशीकची कीर्तनपरिषद.

नाशीक येथें पंडित विष्णु दिगंबरबुवा पलुसकर यांच्या गांधर्व महाविद्यालयाचे तर्फे पौष वद्यांत पांच दिवस ह. भ. प. ढोलेबुवा यांचे अध्यक्षतेखालीं कीर्तन परिषद भरून १०१ तास सतत कीर्तनें चालू ठेवण्यांत आलीं होतीं! हा एक अपूर्व प्रकार झाला. पहिले दिवशीं स्वागताध्यक्ष भिडे शास्त्री यांचें प्रास्ताविक भाषण होऊन अध्यक्षांचें मनोरम भाषण झालें. नंतर पहिलें कीर्तन रा.

पांगारकर यांचें होऊन कीर्तनास आरंभ झाला. अहोरात्र ४ । ५ दिवस कीर्तनामृताची वृष्टि होत होती, व श्रोते आपल्या आवडी-सवडीप्रमाणें येत जात होते. एकंदर कीर्तनकार २५ होते. उपसंहार होऊन पांचवे दिवशीं मुक्तद्वार अन्नसंतर्पण झालें. कार्तिकांत मुंबईचा नामजपयज्ञ तशीच पौषांत ही नाशिकची कीर्तनपरिषद दोन्ही धर्मभावनोद्दीपनाच्या दृष्टीनें फार उत्कृष्ट झाले. नामापाशीं राम असतोच !

---

# पारमार्थिक गोष्टी.

[ वर्ष ४ अंक ७ वरून पुढें चालू. ]

लेखकः—**वामन परशराम फणसळकर, सातारा**

## ५ परोक्ष पांडित्य काय कामाचें ?

फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे । दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे ।
नव्हे वाउगी चाउटी काम पोटीं । क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ॥

एका शहरांत एक साधूजी आले. ते सांगूं लागले कीं, आपण हिमालयांत तप करून गुरुप्रसाद संपादन केला आहे आणि आपण अहंकार व क्रोध यांचा त्याग केला आहे. जगांत सर्वत्र आणि सर्वदा भोळेभाबडे असे कांहीं गृहस्थ असावयाचेच—तसेच चिलिमभक्तहि असावयाचेच ! साधुजीकडे अशा लोकांची बरीच गर्दी होऊं लागली. कांहीं दिवसांनीं तेथील एका ( सावकार ) भक्तानें लाडवांचें सहस्रभोजन घातलें. त्यांत त्यानें एके दिवशीं या साधूजीस निमंत्रण दिलें. साधूजी भोजनास गेले आणि मंडपांत इतर मंडळीबरोबर एका पानावर बसले. यजमानांनीं ' एको विष्णु ' सोडल्यावर भोजन सुरू झालें. निम्यावर जेवण झाल्यावर यजमान नित्याप्रमाणें भोजनदक्षिणा देत देत साधूजींच्या पंक्तींत आले आणि त्यांनीं त्यास इतरांप्रमाणेंच एक आणेली दक्षिणा दिली. दक्षिणा हातांत पडतांच साधूजी खवळून म्हणाले, ' सर्वांबरोबर मलाही एकच आणेली दक्षिणा ! ! ' तात्पर्य, पुष्कळ लोक अर्थ न समजतां पाहिजे तें धीटपणें बोलतात, त्यांना आपल्या बोलण्यांतील आणि कृतींतील विरोध समजत नाहीं, दिसतहि नाहीं—ते पोपटपंचीं भाषणें करून लोकांस मोहांत पाडतात ! गोष्टींतील साधूनें ' सर्वांबरोबर ' म्हटल्यानें त्यानें आपण जे विकार सोडले म्हणून सांगितलें होतें तें सर्व आपोआप उघड झाले कसे तें पहाः—

( १ ) ‘ सर्वांबरोबर ’ म्हटल्यानें इतरांपेक्षां आपण श्रेष्ठ असा अहंकार. ( २ ) ‘ एकच आणेली ’ म्हटल्यानें जास्त दक्षिणा पाहिजे असा लोभ. ( ३ ) खवळून बोलणें हा अर्थातच क्रोध होय.

लोभ, क्रोध व अहंकार तीनही जवळ बाळगून मग ‘ सोडलें ’ तें काय ? जें सोडायला पाहिजे तें जर सोडलें नाहीं तर सोडलें ह्मणणें व्यर्थ होय. ‘ त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें. ’ बाह्य वस्त्राचा त्याग गौण आहे, अहंकारादि विकारांचा त्याग मुख्य आहे.

---

## ६ शास्त्रीबोवांची गोष्ट.

एक शास्त्रीबोवा वादविवाद करण्यांत मोठे कुशल होते. ते शहरोशहरीं जाऊन सभा जिंकून संभावना मिळवीत फिरत असत एकदां ते एका मोठ्या शहरांत गेले. तेथील राजा मोठा विद्वान् व भगवद्भक्त होता. पंडित आल्याचें कळतांच राजानें पालखी पाठवून शास्त्रीबोवांस सभेस पाचारण केलें. शास्त्रीबोवा स्थानापन्न झाल्यावर राजा म्हणाला, ‘ सभेंत वादविवाद करून एकमेकांनीं एकमेकांची मानखंडना करावी हें मला आवडत नाहीं. मीच आपल्यास एका श्लोकाचें व्याख्यान सांगण्याविषयीं प्रार्थना करितों.’ असें म्हणून राजानें पंडितजींस—

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहं ॥

या श्लोकाचें विवरण करण्यास विनंति केली.

शास्त्रीबोवा जाडे विद्वानच होते. त्यांनीं १-१॥ तास प्रवचन करून श्लोकाच्या चिंधड्या चिंधड्या करून टाकल्या ! राजानें पंडितजींची यथायोग्य संभावना तर केलीच, परंतु तो त्यास हळूच म्हणाला, “ शास्त्रीबोवा ! आपल्यास श्लोकाचा अर्थ यथायोग्य समजला नाहीं ” शास्त्रीबोवास राजाचे हे शब्द ऐकून फार विषाद वाटला, परंतु करतात काय ? ते तसेच बिऱ्हाडीं परत गेले.

यजमानांची त्या दिवशींची ती अपूर्व खिन्नता पाहून त्यांच्या पत्नीस परम विस्मय वाटला आणि तिनें त्यांस सभेंतील हकीगत विचारली. शास्त्रीबोवा मनांत इतके खजिल झाले होते कीं, त्यांच्यानें एक मुहूर्तपर्यंत कांहींच बोलवेना. पत्नीनें मोठ्या नम्रतेनें पुन्हां विचारलें तेव्हां त्यांनीं झालेली सर्व हकीगत तिला सांगितली. शास्त्रीबोवांची पत्नीही मोठी विदुषी होती व तिच्यावर शास्त्रीबोवांचें प्रेमही पुष्कळ होतें. ती म्हणाली, ‘तर मग खरेंच त्या श्लोकाचा

अर्थ आपल्यांस कळला नाहीं' शास्त्रीबोवा विचारीच होते पत्नीचे हे शब्द कानीं पडतांच त्यांच्या हृदयांत लख्ख प्रकाश पडला आणि उमजले!

### तात्पर्य.

भगवान् छातीला हात लावून "भक्ताचे योगक्षेम मी चालवितों" असें आश्वासन देत आहेत, "जगीं पाहतां राम हा अन्नदाता। तया लागली तत्वता सारचिंता" असें सत्पुरुष बजावून सांगत आहेत, यास्तव मनुष्यानें जिवापाड मेहनत करून न्यायान्याय, पापापाप, कर्तव्याकर्तव्य, विधिनिषेध यांचा कांहींही विचार मनांत न आणतां अट्टाहास करून केवळ द्रव्यार्जनांतच सर्व आयुष्याचा व्यय करणें हें योग्य नाहीं. गोष्टींतील शास्त्रीबोवांस जर त्या श्लोकाचा हा यथार्थ कळला असता तर ते शहरोशहरीं देशावरीकरितां याच्या करीत फिरलेच नसते! अस्तु. आतां वरील भगवद्वचनावर विश्वास ठेवणें म्हणजे 'असेल माझा हरी। तर देईल खाटल्यावरी॥' अशी वर्तणूक ठेवणें असें मात्र नव्हे. सांगण्याचें रहस्य हेंच आहे कीं, द्रव्यादि प्रापंचिक वस्तूंचा संग्रह करणें ही नरजन्माची इतिकर्तव्यता नव्हे, सबब त्या बाबीला गौणत्व देऊन मनुष्यानें 'कोण मी कैचा, कोठुनि आलों' हा विचार करीत जावा. शरीरयात्रेकरतां यथायोग्य उद्योग हा केलाच पाहिजे, फक्त त्या उद्योगांतच बुडून जाऊं नये.

---

## ७ द्रव्याचा उपयोग परार्थच.

एक मोठा सावकार होता, तो फार कदर्यु होता, तो इतका कीं घरांत कधीं कोणास सुग्रास भोजनही मिळत नसे, मग अतिथी अभ्यागताबद्दल तर बोलावयास नको. त्याचे घरीं कधीं कोणाचा हात भिजत नसे किंवा देव, पितृ, अग्नि यांना हविर्भाग मिळत नसे. त्याचीं कुटुंबांतील सर्व माणसें त्याच्या कंजुषपणाच्या कदरेनें त्रासून गेलीं होतीं परंतु करितात काय विचारे? एके दिवशीं सावकार वसुलाकरतां परगांवीं गेला. त्याला तिकडे ८।१० दिवस लागणार होते. चिरंजीवांनीं ती संधी साधून बापानें जमिनींत पुरून ठेवलेला द्रव्याचा हांडा काढला. त्यांतील सर्व द्रव्य काढून घेतलें आणि तो हांडा कोळशांनीं गच्च भरून ठेऊन पूर्ववत् जमिनींत गाडून टाकला! येणेंप्रमाणें द्रव्य हातांत येतांच मुलानें चैनबाजी चालविली.

सावकार गांवाहून परत आला आणि मुलगा चैनींत पैसा खर्च करीत आहे हें पाहून त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. मुलगा लाडका आणि त्यांतून एकटाच अशा स्थितीमुळें तो मनांतल्या मनांत खिन्न होऊन राहिला.

घरांतील मंडळी मात्र मुलावर खुष असत. कांहीं दिवसांनीं सावकारास पुरून ठेवलेलें द्रव्य सुरक्षित आहे किंवा कसें हें पाहण्याची इच्छा झाली. आणि तो हांडा जेथें पुरून ठेवला होता तेथें गेला; तों त्या जमिनीवरची खूण विसकटलेली त्याला दिसली. त्यानें मोठ्या आर्तपणानें हांडा बाहेर काढला आणि पाहतो तों काय ? हांडा कोळशांनीं भरलेला ! !

द्रव्य सर्व गेलें, मग काय पुसतां ! द्रव्य म्हणजे सावकाराचे बहिःप्राणच आणि ते गेले तेव्हां तो ऊर बडवून घेऊन मोठ्यानें रडूं लागला. माणसें भोंवतालीं जमलीं. चिरंजीवही तेथें आले आणि बाबा मोठ्यानें रडून आकांत करीत आहेत हें पाहून ते शांतपणानें म्हणाले, "बाबा ! तुम्ही इतका आकांत व दुःख कां करितां ? तुम्हांला ह्या द्रव्याचें काय करायचें होतें ? तुम्हांस तो हांडा तरी द्रव्यानें भरून जमिनींतच नुसता गाडून टाकायचा होता ना ? तें द्रव्य कांहीं तुम्ही खर्च करणार नव्हतांच, याकरितां मी हांड्यांत कोळसे घालून तो पहिल्यासारखाच गच्च भरून ठेवला आहे. तुमचा हांडा पूर्वीप्रमाणें भरलेलाच आहे, तो कांहीं रिता नाहीं. मग यांत कोठें काय बिघडलें ? उगीच कां रडत आहांत ?" तात्पर्यः—जें द्रव्य आपल्या अगर दुसऱ्याच्या उपयोगाकरितां खर्च केलें जात नाहीं, जें केवळ संचयच करून ठेवलें जातें, त्याची किंमत पाषाण कोळसे यांच्यापेक्षां जास्ती नाहीं. तें आणि मृत्तिका समानच होत. **पान्हा चोरणारी गाय, प्रेम व रतिशून्य भार्या, पराधीन काया, प्रतिकूल पुत्र, सत्पात्रीं व सत्कार्याकरतां व्यय न केलें जाणारें वित्त.** आणि **भगवन्नाम न घेणारी वाणी,** ह्या पदार्थांच्या रक्षणापासून पुरुषास दुःखामागून दुःखच होतें !! "

---

## ८ मरेपर्यंत विद्याव्यासंग राखावा

एक " अंग गलितं पलितं मुंडं दशनविहीनं जातं तुंडं " अशा अवस्थेप्रत प्राप्त झालेला वृद्ध गृहस्थ आपल्या बागेंत कांहीं नवीन झाडांची लागण करीत होता. त पाहून दुसरा एक गृहस्थ त्यास म्हणाला, " आजोबा, हें काय करतां ? आतां नवीन झाडें लावून काय करणार ? त्यांचीं फळें तुम्हांस चाखावयास थोडींच मिळणार आहेत ? तुमच्या गोऱ्या तर बहुतेक स्मशानांत गेल्याच आहेत. " वृद्ध गृहस्थानें शांतपणानें उत्तर केलें, " दुसऱ्यांनीं लावलेल्या झाडांचीं फळें मीं खाल्लीं, मी लावीन त्यांचीं दुसरे खातील ! "

जगांतील सर्व व्यवहार असेच आहेत. आज हजारो वर्षें ज्या झाडांचीं मधुर फळें आपण खात आलों आहों ते वृक्ष आपल्या ऋषींच्या हाडामांसाचे

बनलेले आहेत, याकरितां देह पडेपर्यंत मनुष्यानें उद्योग करीतच राहिलें पाहिजे.

---

### ९ आपले दोष आपल्यास दिसत नाहींत

आपली अदब न ठेवतां उद्धटपणानें वागल्याबद्दल एक वृद्ध मनुष्य एका मुलाच्या श्रीमुखांत लगावण्याच्या बेतांत होता. तो वृद्ध गृहस्थ म्हणाला, 'मूर्खा, तूं माझा अपमान कसा केलास ?' मुलानें उत्तर केलें, 'आजोबा ! मी मूर्खच आहें, मग माझ्याकडून एखादा अपराध घडला असल्यास तें अगदीं स्वाभाविकच नाहीं काय ? पण तुम्हीं वृद्ध आणि शहाणे आहांना, तेव्हां वयाला व शहाणपणाला शोभेल असेंच वर्तन तुम्हीं स्वतः करा म्हणजे झालें ! " तात्पर्य मनुष्य दुसऱ्याला चटकन् दोष देतो, परंतु ज्या अपराधाबद्दल आपण दुसऱ्यास नांवें ठेवतों तोच अपराध आपण करीत आहों हें त्याच्या लक्षांत येत नाहीं !

---

# श्रीगोंदवलेकर महाराजांच्या तोंडचीं वचनें.

लेखकः—त्रि. ना. देशपांडे, पुणें.

### (१) स्त्रियांविषयीं.

श्रीसद्गुरुनाथा । जानकीजीवना मातापिता । मज तारीं आतां । भवाहूनि भय काळसर्पिणीचें आहे । काळसर्पीण दुर्धर । भुलून गेले नारीनर ॥ १ ॥ तिणें फुत्कार टाकिला । स्वस्वरूपासी घाला आला ॥ २ ॥ तीचि वमनवेळे । विषये जगासीच गिळे ॥ ३ ॥ तिच्या छायारुपी सावलीचा लेश । तो हा मृत्युलोकीं स्त्रियांचा वेष । कृति कर्म दुर्घट । मोठमोठयास केले भ्रष्ट । देव ऋषी मुनि साधुसंत । महंत पंडित ब्रह्मचारी वानप्रस्थ । संन्यासी विरक्त । शब्दज्ञानी वाचाळ । वेषधारी गृहाश्रमी बहुत । त्यांसी पाहतां पाहतां करिती घात । पण तूं बालक ना तूं तरुण । वृद्ध आजा दरिद्री रंक । राजा चतुर विद्वान् शहाणा । पण असंख्य लोक कोटयावधि जाण । जाहले विषयाधीन याचें काय कारण । ऐका सावध होऊन । पशुवत् अंतःकरण । केवळ नरकाची खाण । त विषय लोलंगत मन । अविवेक अविचारी । निजसुखाचा घात करी । परमार्थाचा वैरी । ब्रह्मज्ञानाची थोरी । ऐसे कलियुगांत नरनारी । विषयीं तन मन धन हेचि ज्ञान करिती । ऐसि अखंड मति । ऐसे दुर्बळ

मानव जर्जर । त्यांत भवसागराची लहर । स्त्रीरूपी विकारी मगर । गिळून टाकिते ते काळीं । विषारी काळकूटाची पुतळी । जैशी आकाशांतून वीज पडून जाहली देहाची होळी । तैशी स्त्रियांची सावली । पतंग दीपावरि घाली उडी । तैशी जाण स्त्रीची गोडी । अंकुशानें गज केला । तैसा स्त्रियांनीं मनुष्यपणा नेला । व्याघ्रासि पाडा वांधिला । खाऊं जातां तत्क्षणीं मारिला त्यापरी विषयीं सुखावला । स्त्रियांनीं अनर्थ केला । न कळेचि कोणाच्या वाला । होतां तयांची दृष्टादृष्टी । विवेकज्ञान जाय उठाउठीं । सत्य जाऊन नरकाची वाट । ही दृष्टीची कोटी । होता तयाची भेटी । सांगून जिवींच्या गोष्टी । अर्पुनी तन मन धन । करीं विषयीं बंधन । हावभाव संसार खटपट । नाना तऱ्हेची लटपट । ममत्व दाखवून करी तळपट । ऐसे स्त्रियांचे दुर्धर कर्म । कोण जाणें तयाचें वर्म । मायामोहाची शिराणी । करावी सुकृताची हानी । दाखवूनि लोभ अनिवार । दोष घडवी फार । तुह्मी न करावें संध्या-स्नान । माझ्यापाशीं ठेवावें मन । न करावें धर्मदान । सत्संग तीर्थयात्रा नित्यक्रम । हे काय तुमचा फेडतील भ्रम । मी पुरवीन तुमच्या मनींचा काम । त्याशिवाय तुमचे आप्तगोत । ते काय पुरवितील मनोरथ । तुमचे मातापिता बंधुबहीण सखे सज्जन । ते तुमचे करतील मानपान । तैसें नव्हे माझें मन । करीन अंगाचे अंथरुण । ओवाळून टाकीन आपुले जिणें । दाखवून भलेपणा । अंतरीं कपट दारुत्वाच्या खुणा । पुरुषापाशीं शपथ वाही आपोआप । म्हणे परपुरुष माझे बाप । परोपरिचा विश्वास । सत्यसुखाचा करी नाश । हालवून मान डोळां । भेटवी कळीकाळा । शब्द बोले मंजुळ । बुडवी बेचाळीस कुळ । खान पान अगत्य करी । सत्य सुखाची मारी सुरी । जैसे अजापुत्रासी देती बळी । तद्वत सांभाळ करीं । करून हाटपट । दाखवी नरकाची नीट वाट । विषयीं गुंतवूनी चित्त । शरिराचा करी घात । भुलवूनी वेड लावी मनीं । करी द्रव्या-ची हानी । नानातऱ्हेची चुगली चोर । स्त्रियापुत्रांसी पडला वैर । निर्लोभ दाखवी सार । जनांमाजी अपकीर्ती थोर । लौकिक रितीच्या तीन वाटा । पदरीं बांधून दिला पापाचा सांठा । पहा पहा माझें सुख । सत्यामाजीं केलें काळें मुख । दाखवोनी सचोटी । धांरलें बंधनाचे कसांटी । धरूनि ठेवले मुठी । पुरविली पाठी । बांधिल्या बंधनाच्या गांठीं । कदाकाळीं सुटेना । आधीच जीव मर्कटा समान । स्वस्वरूप सोडून पराधीन । त्यांत विषयीं भूल मद्यपान । वासनासक्त काढणी करून । बुद्धि चित्त तन मन । अक्कल वृत्ती टाकली बांधून । गुरुपुत्राचे काम । स्त्री-विषयाचे पहावें लक्षण । मी अज्ञजीव भ्रांतवत । भ्रांतासी दृश्ये विहित । तोचि करी घात । ती मज न कळे मात ।

॥ श्रीराम ॥

## ( २ ) मन स्वाधीन ठेवण्याचा उपाय.

जसा एक सुटला तुफान वारा । तेणें मृत्युलोक बुडविला सारा ॥ सुखदुःखाचे अधिष्ठान । त्याचें नाम मुख्य मान ॥ तृष्णावासना अहंकार । हा मनाचा विकार ॥ कामाविषयीं गोडी । ही मनाची आवडी ॥ लोभ ममता ही मनाची । अहंता आधी व्याधी ही मनाची । मानीव बुद्धि । मनामाजी पंच विषय । रजतम सान घेऊन । मन करी जन्मजन्माच्या घात । जैसें शरीराचे दोन हात ॥ तैसें मन दो प्रकारें रहात । मन म्हणजे प्रकृती अधीन । सत्याचे करीं विसर्जन । हा एक प्रकार । दुसरी एक सांगतो खूण । प्रथम सूक्ष्म आणि सत्य । निज मनातें न मानी अल्प अज्ञान । म्हणून वासनात्मक बंधन ॥ सत्य सत्य माझें वचन । आतां आवरी चंचल मन ॥ तेचि सांगतो तुज खूण । सहज होय समाधान । तुटे भवबंधन ॥ मन घेई सुखसात । निजमन त्याचा करी घात ॥ मनामाजी आधीव्याधी भारी । नीज मन त्याचा वध करी । ममता अहंता लोभ । हा मनाचा स्वभाव ॥ श्रीराम । तेथें जाऊनी नीज मन । तात्काळ करी शीर छेदन ॥ मनापाशीं सर्व वासना लोलंगता । नीज मन करी त्याचा घात । मन मानी विषयभोग । निज मन त्याचा करी घात । मन मानी भवरोग । भोगाची बळ सत्ता ॥ निज मन करी स्थीर । रामनाम जपे निरंतर । कदापी न पाडावा अंतर । हे ब्रह्मज्ञान द्वादश महावाक्याचा सार । वेदांत मथित गर्भार्थ । वाच्यातीत नीज आस । ऐसे कोणी चतुर जाणती संत । एरवीं परमार्थदरिद्री किंकर । ते काय जाणती नामसार । जे अभिमानी नर तयासी होती नामाविषयीं भ्रांती । तथें अल्पज्ञ काय कलीमाजी इतर साधन पाहती ॥ मुख्य या युगीं आवरुनि मन । पापाशीं भ्यावें रात्रंदिन ॥ सर्वांभूती रहावें लीन । रामनाम नीज धन ॥ निजध्यासें करावें जतन । निर्लोभ अक्रोध अंतःकरण । रामनाम जपे रात्रंदिन सानंद । तात्काळ आत्मप्रचीती । पूर्ण ब्रह्मज्ञानीं रत । पूर्ण वेदांत सिद्धांत । जाणोनि निवांत । राम जाणती यथार्थ । त्यास साक्षी आहे । बहुत अनुभव सुखाची मात । हीच तुमची आमची भेटी । आणि गुज एकांत स्थळ । तें सांगतां तुम्हां सकळ । ठेवून वचनावर विश्वास निर्धार । श्रीराम जपावा निरंतर । संसारीं राखावी खबरदारी । लौकीक संपत्ती संतती असावी घरीं ॥ संतसंग रात्रंदिवस करी । रजतमविरहित वृत्ती । तीच जाणा संतसंगती । अखंड स्वानंद विवेकयुक्त । मान अपमान नसे कांहींच खेद । राम नाम अंतरी बांधी गृंथी गांठीं । तीच मानी सदोदित भेटी ॥ शके १८११ चैत्र शु. ५ शुक्रवार ॥

## ( ३ ) जीव आत्म्याचें विवरण । शुद्ध जाणे ब्रह्मज्ञान.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीरामायनमः ॥ साधकाचे शब्द मी बद्ध असे कवण । मज दुःख कां शरीरीं । मज जन्ममृत्युचा ठाव । चौऱ्यांशीचा फेरा कैसा सुटेल दातारा । त निभ्रांत करुनि सांगावें मज, तें गुज सद्गुरुचें वाक्य विपत्ति ॥ श्रीरामदास समर्थ महाराज । त्यांचें स्वानुभव गुज । ब्रह्मचैतन्य सांगे आज ॥ नोहे माझे पदरचे जाण । गुरु घरचे आहे साधन ॥ तें दृढ करूनि मन ॥ चुकवा लक्ष चौऱ्यांशी योनी । श्रीसमर्थ बोले कृपेकरुनी ॥ तूं शिष्य आहेस कवण । तुज दुःख कशानें जाहलें जाण । तूं शरीरीं आहेस किंवा शरीराहून भिन्न । ऐसें बोलतें शास्त्रपुराण । भिन्न कैशारीतीं तें सांगावें मजप्रती । पुनः शिष्या देई प्रतिवचन । ह्मणे आत्मा शरीराहून भिन्न ॥ गुरुराज बोले हांसून । अरे तूं बोलतोस तो कवण ॥ हें न कळे मज म्हणूनीच दुःखी आहेस दीन । तरी आतां ऐक सावध होऊन ॥ भक्ति वैराग्य ज्ञान । तेणें पावशी समाधान ॥ शिष्या ह्मणे गुरुमूर्ती । भक्ती वैराग्य ज्ञान यांची कैशी प्राप्ती ॥ एक सांगेन साराचासार । सकळ सिद्धांताचें मत । वेदवाक्य वेदांत । ज्ञानभक्ती वैराग्य प्राप्त । सद्गुरुवचनीं निभ्रांत । सद्गुरु कसा ओळखावा । काय उपदेश घ्यावा ॥ तंव गुरु ह्मणे शिष्यराया । क्रियेसहित ज्ञान असे जया ॥ आशारहित निरभिमानी । भक्ती सहित ब्रह्मज्ञानी ॥ तया शरण जावें।स्वस्वरूपीं मिळावें॥स्वस्वरुप काय मज सांगावें । सद्गुरुमाय अधिकारावांचून सांगू जातां वृथा शीण होय तत्वता । अधिकारावांचूनि वृथा शीण होय॥उभयतांसि अधिकार नसतां कांहीं । ज्ञान तयासी होणार नाहीं ॥ ही सत्य सत्य तुज सांगितली खूण । जेथें विश्वास विरक्ती पूर्ण ॥ कामाविषयीं मन नसे । संसाराची चिंता नसे ॥ जयाचे चित्ता एक ज्ञान भक्तीची आवडी । ऐसा तूं आहेस अधिकारी । म्हणून तुज सांगतों ज्ञानभक्ती खरी । जीव आत्म्याचें शोधन करी ॥ तात्काळ तुटे भवबंधन । प्राप्त होय ब्रह्मज्ञान । आतां ऐक शुद्ध करोनि मन । दुजी नसे आस । दृढ माझे वचनीं विश्वास । हेंचि ब्रह्मज्ञान । तुज सांगितली सत्य खूण ॥ तंव शिष्य आनंदला । म्हणे गुरुजी सांगा मला । श्रवणी झाला सादर । जोडूनी दोन्ही कर ॥ म्हणे मी कोण आहें दयाळा । मज सांगा अज्ञानबाळा ॥ मी जीव की जाती । ही मज असे भ्रांती ॥ भ्रांतीचे काढूनि बंधन । मज व्हावें ब्रह्मज्ञान ॥ ऐकोनि शिष्याची वचनोक्ती । संतोषले गुरुमूर्ती ॥ गुरुघर साग्र परमार्थ । स्वरूप सांप्रदाय रामदास समर्थ ॥ त्या समर्थांची वाणी । म्हणे जीव जाती दोन्ही । तूं नव्हेसी शिष्य शिरोमणी । तूं नव्हेसी बद्ध । अज्ञान वायू प्राण ॥ तूं आहेस अजन्म । आत्माचि निधान ॥ मी

आत्मा आहे । मज दाखवा लवलाहे ॥ आत्मा अजन्मा जर आहे ॥ तर तो देहांत कां न राहे ॥ आत्म्यास नसे जन्ममरण । तरी तो देहांत कैसा आला कोण ॥ तंव म्हणे गुरुराव ऐक बाळा । प्रश्न केलास भला आगळा ! जेणें उद्धरिलें कुळा ! जीवाची तुटे शृंखळा ॥ ज्ञानासी होय ज्ञान । तीच विचारली खूण । कानीं पडतां वचन । दूर होय जन्ममरण । ऐक शिष्य शिरोमणी ॥ ब्रह्मरूप लावण्यखाणी ॥ निर्गुण निराकारी । त्यास नाहीं जन्ममृत्यूची भरी ॥ तो सत्तामात्र वसे शरीरीं ॥ जैसें कडामंदीर पोकळ जागा दुर्धर ! त्यांत प्रतिध्वनी निघे अपार ॥ तैसा तूं आहेस आत्मा ॥ सर्व व्यापूनि वेगळा तो परमात्मा ॥ तूं आत्मज्ञानी । स्वरूपीं होसी लीन । परी परमात्मा नये तुझे शरीरीं जाण ॥ म्हणुनि तूं आत्मा । तो सत्य परमात्मा । तो परमात्मा श्रीराम जगज्जीवन । शिवशंकराचें ध्यान । तो परमात्मा जाण ॥ शंकर असे परमात्मा । त्याचा तोचि गाई महिमा । त्या परमात्म्याचें ठिकाणीं ॥ आत्मज्ञान्यासी सांपडे खूण । ती खूण सोडून बद्ध जन । स्वयें परमात्मा म्हणती आपण ॥ जेथें वेद बोले नेती नेती । सहस्रमुखाचे शेषास नसे गती ॥ तेथें मूर्ख परमात्मा मीच बोलती । असें बद्धज्ञानी म्हणती ॥ ते मुक्त कधीं न होती । परमात्म्यावांचुनि ॥ जो म्हणे मीच देव । नको भक्तीभाव तोचि भ्रमाचा ठाव ॥ जैसे कलीमाजी वेदांती शब्दज्ञानी । ब्रह्मवादी ब्रह्मनिष्ठ वचनी घरोघरीं ॥ चमत्कार दाविती परोपरी । शब्दकुशल भावी ॥ तें ज्ञान नव्हेरे निर्धारी । तुज सांगतों खूण । तैसे तूं मानूं नको स्वप्न ॥ हा मुख्य जीवदशेचा घाला । माया अधीन झाला । सत्य सत्य तोच वाया गेला। माया ज्यास सत्य वाटतें । तें ज्ञान फार खोटें॥ ती ओखटी कैसी । तीच सर्व करीती हरीती । समाधान न धरीती । माया भ्रमाचीच मूळ भ्रांती । ती तूं सोडूनि भ्रांतीमळ । ब्रह्मरूप हो केवळ । नाहीं तरी खोटें ज्ञानाची खूण । शिश्नउदरपरायण । देहाभिमानी बुडाले ज्ञानी जन । अरे ज्ञान झालें तरी देह सुखासी सुखावले । ते कलियुगांतील ज्ञानी भ्रमले । जन्मोजन्मीं नरकाचें साधन केलें ॥ असे बहुत प्रकारीं बद्ध जन । देव म्हणती आपण । आत्मस्तुती मी ईश्वर जाण । शब्द ज्ञानाचा पर्वत । परमार्थाचा शुद्ध घात । ऐसे कलीमाजी ब्रह्मज्ञानी फार अती गहन । परि ब्रह्मनिष्ठ कोठेंचि नसे कोण । तैसे तूं भ्रमू नको । भ्रम हीच जीव माया । सांडुनि आत्मरूप ब्रह्मरस घेई शिष्यराया ॥ तें आत्मरुप कैसे । ते सांगेन भरंवसे ॥ आत्मा नाहीं कर्ता, हर्ता स्वानंद देता । तो कल्पने परता ॥ त्यास कैसे ओळखावें । तें सुख कैसें घ्यावें कैसें ध्यावें ॥ ती प्राप्ती इतरासी नाहीं ॥ आत्मा तो वेगळेपणे नसे । मन वृत्ति वासना चित्त न येई कल्पनेच्य मेळीं ॥ उपासना जो करीत राहे । श्रीरामपरमात्माव्यतिरिक्त । नसे तो आत्मा

असे ॥ माया मिथ्या कैसी होती । शिष्यासी धाक वाटे चित्तीं । ह्मणे माया प्रत्यक्ष दिसते । अनुभवास येतें । सुख दुःख देते । प्रेम प्रीति जन्म देऊनि वाढविते ॥ यासही कुटस्थ जाणीव माया । मिथ्या सोडूनी बुद्धि भेद । पुढें आत्म्याचा शोध । या सर्वांचा हो निरास । पुढें मायेचा नाश ।पुढें आत्माचि असे॥ माया जन्मोजन्मींची गांठी । कैसी सोडील माझी पाठी । ती सांगावी । ती सांगा मज एक गोष्टी । माया मिथ्या होती । सद्गुरुवचनीं हाटे भूर्ती । माया बहुत जुनाट ।तिणें बहुतासी भोगवीले कष्ट ' मुख्य देहबुद्धि अविद्यात्मक । अविद्या पराक्रम साधी फार चातुर्य बुद्धी देहभाव वासना कल्पना । ही मायाच अवघी जाणा । ती दावे-दार नसावी शिरजोर । तिणे लोकांसी घालूनी भ्रम । वृथा करवी साधनाचे श्रम । तिची शक्ती फार मोठी । कसाही जरी असेल तरी आत्मा । आत्मदर्शन न होऊं देई भेटी । तरी आतां करी शूर मन । मायेसी हाटवावें जाण । तीच सांगतो खूण । आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हाटे सुटे । बहुत ग्रंथांचे सार काढून दाखविलें । वेदशास्त्रपुराण । सिद्ध साधूची खुण । को-ट्युक्ती गीताचे आधार । परी एकच शब्दाचा प्रकार । शब्दरचना खेळ । वेगळे वेगळे आहे वळ । परी एकची आहे कळ । ती तूं दृढ सांभाळ । स्वानंद नाम ऐसा सूर्यबिंब प्रकाश गगनीं प्रभा । मृत्युलोकीं रणशोभा । शीर उठवीत अपरमित धरणीकंप होत । गाई गाभ टाकीत । तरीं आदित्य न मानी निभ्रांत । तैसें स्वानंदघन एक निमिष्य । लवमात्र वेगळे न राहावें । त्यावर नामस्मरणीं चित्त ठेवावें । मीपण जाळुनी कर्म लिप्त न व्हावें । यासाठीं वेदशास्त्र गीता ज्ञान । अनेक तऱ्हेचे साधन । हे सत्य सत्य जाण । तरी तूं बहुतांचे नको लागूं मागे । बहुता मागे मागे जातां । कांहीं न लागे हाता । बहुतांचे मागे लागला । तो सर्वस्वीं नागवला । जसे लाखो सैन्यांमध्यें एकराव श्रेष्ठ । तसे तुज साधन सांगतों स्पष्ट । नलगे तयासी कांहींच कष्ट ॥ सुखदुः-खरहित । वासना जाळूनि शुद्धचित्त । अहंभाव सोडूनि निभ्रांत । महामाया टाकूनि लोभ काम द्वैत इच्छा नसे कांहीं । मुक्तअमुक्तांहून वेगळा होई । तें सर्व देवासी करी अर्पण । मदर्पण करीं पापपुण्य । स्वानंदयुक्त परमात्माचिंतन । हेंच तुझें कर्तव्य काम । यावेगळें नको जाण भ्रम श्रम ॥ श्रीराम ॥

समाप्त.

# भक्ताचा गर्व.

[ विद्यार्थी, अमळनेर. ]

१ त्रिभुवनसुंदरा गोपाळा ! तुझ्या नांवाची जादु मला कळते. बेभान होऊन तुझ्या नाममहिम्यानें तासच्या तास मी गुंगतों, माझ्या हृदयांतून निघालेलें भावनागीत आनंदाचा ठाव घेतें असेंसुद्धां मी म्हणतों. क्षुद्रही जीवाची आकांक्षा अमर्याद होऊन अवर्णनीय आनंदांत तो विलीन होतो. राजाधिराजा ! या क्षुद्र जीवाला बेहोष करण्यांतच तुझा मोठेपणा आहे असें मला वाटतें व माझा मला अभिमान वाटतो. त्या अभिमानाच्या भरांत मी म्हणूं शकतों कीं, माझ्यामुळेंच तुझ्या सामर्थ्याला व्यक्त स्वरूप मिळतें. व माझीच मला धन्यता वाटते !

२ देवा ! माझ्या हृदयांतल्या गाभाऱ्यांत थरारणाऱ्या आनंदाला तूं महत्त्व न देशील तर तुझेंच सामर्थ्य यांत कमी होतें. मी म्हणेन कीं, त्या आनंदाची किंमत देऊन तुला मी विकत घेतलें आहे. अहाहा ! असें वाटतें कीं, अनंताची व्यापकता त्या क्षुद्र जीवाच्या अत्यल्प हृदयांत थरारणाऱ्या आनंदांतच एकत्रित होते, व तेथून निघालेल्या संगीतानें ती माझ्या रोमरोमांत भिनते. अंतःकरण वेडावतें, बधीर होतें व वाटतें कीं, ह्या सर्वव्यापक संगीताच्या सुरांत अनंत कालपर्यंत जीवानें वाहत जाणें हीच माझी जीवितसाफल्यता होय. ह्या जीवितसाफल्यतेला अंत नाहीं. अंताची भीति उत्पन्न करणारा काळ ह्या संगीतांत बुडी घेतो, हृदयांत उद्दीपित होणारा आनंद अकुंठित होतो व म्हणूनच माझ्या आनंदाला पारावार नाहीं.

३ देवा! मी तुला कैद केलें आहे, आतां तुला माझ्या कैदेंतून सुटून जाण्याला जागाच नाहीं ! कारण आतां मी अगतिक नाहीं; तूंच अगतिक बनला आहेस. तुला शक्तिहीन करून सोडणारें सामर्थ्य तुझ्या नाममहिम्यानें माझ्यांत उत्पन्न केलें आहे व या द्वंदांत तुझा पाडाव झालेला आहे. व अव्यक्त, अतर्क्य अमूर्ताची, व्यक्त व स्वानुभवानें आनंदमय अशी नितांतमनोहर मूर्ति माझ्या हृदयाच्या सिंहासनावर बसवून माझ्याच मोठेपणाचें मी कौतुक करितों.

४ मला खेळण्याचा कंटाळा आला आहे, मला-तुला खूष करण्याची जरूरी वाटत नाहीं. कोंपऱ्यांत अंधारांत बसून मी माझ्या वेडांत गुंग राहीन. माझ्या शांत कोपऱ्यांत तुझ्या येण्याची गडबड मला नको. माझ्या कोंपऱ्यतल्या अंधाराचा तुझ्या येण्याच्या प्रकाशानें नाश झालेला मला पाहवणार नाहीं. कोटी सूर्यांच्या प्रकाशानें लखलखणारें तुझें सिंहासन मला

दिपवणार नाहीं, मी त्याला भाळणार नाहीं. मला तो प्रकाश नको आहे. मी माझ्या अंधारांतच बसून राहीन. अंधारांत बसून तुझ्या आठवणीखेरीज सर्व जग मला नाहींसें होऊं दे; एवढेंच नव्हे तर मी अंधारांत आहें हीही भावना जाऊं दे व तुझें नामस्मरण–तुझी आठवण हेंच माझें जीवित होऊं दे. ज्यांना तुझी जरूर असेल त्यांच्याकडे तूं जा. माझ्याकडे येण्याचा तुझा सर्व समारंभ व्यर्थ जाईल. कारण तूं येण्याची गडबड मला ऐकूं येतांच मी माझ्या झोंपडीचें मोडकें दार लावून घेईन. अहाहा ! एकांतांत-अंधारांत,सर्व जग विसरून नव्हे तुझ्या ऐश्वर्यालाही विसरून, तुझ्या नामस्मरणाच्या गोड तंद्रींत विरघळून जाण्यांतच मला आनंद आहे. जग नाहीं, तूं नाहीं, मी नाहीं, फक्त तुझ्या भक्तीचा प्रवाह अखंड वहात आहे व त्या प्रवाहावर हा जीव झोके घेत आहे.

---

# ह. भ. प. ढोलेबुवांचें भाषण.

[ नाशिक येथील चौथ्या कीर्तनपरिषदेचे अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण. ]

१ " सभ्य गृहस्थ हो ! हरिकीर्तनांत श्रीहरिच अध्यक्ष असतो, त्याप्रमाणेंच कीर्तनपरिषदेंतही अध्यक्ष तोच असला पाहिजे व आहेही; तथापि सभेची परंपरा ध्यानांत घेऊन आणि श्रीहरीला फार श्रम न पडावे अशा दृष्टीनें आपण उपाध्यक्षाची योजना करूं लागलांत, तों जवळच वरून वरून बरा दिसणारा असा मी दिसलों, म्हणून माझी योजना केली. वस्तुतः या ठिकाणीं माझ्याहून वयानें, ज्ञानानें व तपानें थोर असे पुष्कळ आहेत, तथापि आपणच ही रामसेवा मला करण्यास सांगतां यांतील हेतु काय ? आपण सर्व समर्थ आहांतच; पण दुसऱ्यावर तें काम करण्याचा प्रसंग आणून त्यासही कार्यक्षम करावें –" कारभार करितां उमजतें ॥ सकळ कांहीं " ॥–आणि मागच्या मंडळीस पुढें आणावें असा आपला हेतु असावा किंवा आपण ज्या हरिहरांची भक्ति करितां त्यांचा हा एक सद्गुण ( दुर्गुणच म्हणावयाचा ! ) आपल्यांत आलेला आहे ! ज्याच्या चरणापासून गंगा निघाली तो श्रीहरी अथवा मस्तकीं गंगा धारण करणारा शिव यांनीं स्नानाचे वेळीं शंखाला हांक मारावी काय ? पण त्याचेसाठीं ते अडून बसतात ! तो नाहीं तर स्नानच करणार नाहींत ! तो तरी कसा ? ज्यानें वेद चोरून नेले आणि ज्याचें हृदय फारच कुटिल असा शंख यांना आवडला; पण थोरांनीं कांहीं केलें तरी शोभते. शंखानें तरी कांहीं विचार करावा कीं, " हे गंगाजनक ( हरि ) अथवा गंगा-

धर ( हर ) स्नानाकरितां मला हांक मारितात हा माझा मान नव्हे ही थट्टा आहे, तेव्हां आपण जाऊं नये. " पण इतका विचार जर करील तर मग तो शंख कसा ? बाकी तो शंख-तरी त्याला इतकें चांगलें कळतें कीं,-थोरांची अवज्ञा करूं नये. त्याप्रमाणें स्नान घालण्यास तो देवाजवळ गेला, पण त्यांच्याच चरणापासून वा मस्तकापासून निघालेलें गंगोदक त्यानें घेतलें व त्यांच्याच चरणमस्तकांवर अर्पण केलें; पण इतक्याच सेवेनें संतुष्ट होऊन त्या देवानीं तो ' शंख ' होता तरी त्यास आपल्याच पुढें उच्च आसनावर (अडणीवर ) बसविलें ! झालें. थोरांनीं एवढी पदवी दिल्याबरोबर जे जे भक्त पूजेसाठीं आले त्यांना पहिल्यानें या शंखाचीच पूजा करावी लागली मग देवाची ! ॥ ' अंगिकार ज्याचा केला नारायणें ' ॥

२ त्याच देवांचे आपण भक्त. आज आपणही तसेंच केलेंत, आणि सभ्यांनाही तेंच मान्य झालें यावद्दल आभार मानून आपणच शिकविलेंत तें आपल्या चरणाजवळ जसें येईल तसें बोलेन. जें कमी पडेल तें पूर्ण करणार आपण समर्थ आहांतच.

३ ही कीर्तनपरिषद् गांधर्वमहाविद्यालयान्तर्गत रामनाम-आधार मंडळाकडून गेलीं ३ वर्षे मुंबई येथें होऊन ही चवथी आज येथें नाशीक क्षेत्रांत होत आहे. हें स्थळ पंचवटी मोठी पुण्यभूमी. याच ठिकाणीं श्रीरामांनीं आपलें अवतारकृत्य पार पाडण्याचा प्रारंभ केला, व श्रीरामनामाची येथूनच पुढें प्रख्याति झाली. रामनामाचा आधार असलेल्या मंडळानें ही परिषद येथें आणिली हें योग्यच आहे.

४ गां० म० वि० चा व कीर्तनाचा संबंध काय असा प्रश्न निघण्याचें कारण नाहीं. गां. म. वि. चे चालक पं० विष्णुबुवा पलुसकर हे हरिदास कुलोत्पन्न आहेत इतकेंच कांहीं कारण नाहीं, तर गंधर्वांचें हें कर्तव्यच आहे कीं, हरिगुण गायन करणें. अध्यात्म रा. त गंधर्व म्हणाले आहेतः-

वयं संगीतनिपुणा गायंतस्ते कथामृतम् ॥
आनंदामृतसंदोहयुक्ताः पूर्णाः स्थिताः पुरा ॥
पश्चाद्दुरात्मना राम रावणेनाभिविद्रुताः ॥
तमेव गायमानाश्च तदाराधनतत्पराः ॥
स्थितास्त्वया परित्राता हतोऽयं दुष्टराक्षसः ॥

यावरून गंधर्वांचें हें कर्तव्यच ठरतें, आणि तें गां. म. वि. नें ओळखिलें याबद्दल संतोष वाटतो.

५ कीर्तनपरिषद भरविण्यापासून काय फायदा, असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. फायदे पुष्कळच आहेत, त्यांत विशेष, ' मूर्खपण सांडितां '

या न्यायानें एकमेकांचे विचार एकमेकांस कळतात. मनुष्य अनुकरणप्रिय आहे, पण अनुकरणास सद्गुण दिसले पाहिजेत ते दिसतात. आणि एखाद्या एरंडाला आपण मोठा द्रुम आहोंत अशी खोटीच कल्पना झालेली असते ती नष्ट होऊन तिच्या जागीं खऱ्या महत्त्वाकांक्षेचा व जिज्ञासेचा उगम होतो. दुसरें, ज्याप्रमाणें डोक्यावर ओझें घेऊन चालणारावर एक जबावदारी असते कीं ज्या बाजूला ओझ्याचा तोल जाईल त्या बाजूला जास्त शक्तीचा जोर देऊन ओझें सांभाळावयाचें, नाहीं तर रावणासारखा प्रसंग येणारच. तीच जबावदारी उपदेशकवर्गावर असते. धर्म, नीति, भक्ति, ज्ञान, वगैरे जे हरिदासाचे विषय त्यांपैकीं कोणत्या विषयाचें समाजांत औदासीन्य वाढून तोल जात आहे तें जाणून आपल्या वक्तृत्वाचा विशेष ओघ त्या बाजूला वळविणें व समाज स्वस्थानापासून च्युत न होऊं देणें, हें काम उपदेशकवर्गाकडून झालें पाहिजे तें हा वर्ग एका ठिकाणीं जमल्यानें होत असतें. तिसरा सर्वांहून विशेष लाभ असा कीं, वैकुंठीं असलेला आमचा श्रीहरी लक्ष्मी त्याचे चरण संवाहन करीत असल्यामुळें गाढ निद्रित आहे, तो एकट्याचे हांकेनें जागा होतच नाहीं; म्हणून पुष्कळ मंडळी एका ठिकाणीं जमून त्यांनीं सर्वांनीं हाका मारिल्या कीं, त्याची झोंप उडणारच; व कां बाबांनो त्रास देतां, असें विचारण्यास तो येणारच. ‘ संघशक्तिः कलौयुगे ’ म्हणून कीर्तनपरिषद पाहिजे.

५ ही कीर्तन नांवाची दुसरी भक्ति नारदांनीं प्रथम केली म्हणून ही नारदाची गादी म्हणतात. नंतर शुकाचार्य, त्यानंतर अलीकडच्या काळांत नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, अमृतराय वगैरे अनेक संतांनीं तिला प्रसिद्धीस आणिलें. त्यानंतर थोड्या वर्षांपूर्वी या नाशिकांतच तयार होऊन कै० वा० हरीबावांचें शिष्य व आमचे आद्याचार्य गोविंदबाबा होशिंग व त्यांचेच समकालीन अच्युतरायजी मोडक यांचे शिष्य त्रिंबकबुवा या उभयतांनीं सुशिक्षित व अशिक्षित, श्रीमान्–गरीब, बाल–वृद्ध सर्व लोकांस कीर्तनाची गोडी लावून जगभर ध्वजा लाविली. त्यांचें कीर्तनावर प्रेम अलोट होतें. याच गंगातीरावर हजारों माणसांना रात्र संपली व सूर्योदय झाला याचें भानही राहूं नये अशी एक गोविंदबुवांची गोष्ट ऐकतों. कीर्तनाचे आरंभीं एका गृहस्थानी ‘ तपकीरीची डबी काढण्यास कनवटीस हात घातला, पण ते डबी काढण्यास विसरले, हात तेथेंच राहिला ! पुष्कळ वेळानें हाताला कळ लागली तेव्हां शुद्धीवर आले. मग वाटूं लागलें कीं सर्व कीर्तनांत आपण एकदांही तपकीर ओढली नाहीं ! याचें नांव रस. ‘ वक्तुरेवहि तज्जाड्यं श्रोता यत्र न बुध्यते.’

४ कीर्तन ही भक्ती आहे. 'वाग्गद्गदाद्रवते०' अशा अवस्थेंत भक्ताकडून जें भगवंताचें वर्णन होतें तेंच संकीर्तन होय. हा आनंद लुटावा म्हणून भगवद्भक्त श्रोते तेथें येऊन बसतात. अशा तन्मय पुरुषाला हा चुकला असें कोण म्हणणार ? अमुक म्हणा, अमुक सांगा, असें तरी कोण म्हणणार ? व तो ऐकण्यास तरी जाग्यावर कोठें आहे ? प्रस्तुतचे आम्ही कीर्तनकार हे कांहीं सगळेच तसे नाहींत. आम्ही अभ्यास करून मारूनमुटकून झालों आहोंत ! तथापि ती जागा थोरांची असल्यामुळें लोक आम्हांला अद्याप तसाच मान देत आहेत. हें लोकांचें सौजन्य अथवा त्या स्थानस्थापकांचें हें महत्त्व आहे; पण आह्मीं मात्र हें विसरतां कामा नये, आणि ती अवस्था मिळण्यासाठीं अकृत्रिमपणानें भगवत्सेवा केली पाहिजे. या परिषदेंत तशी अखंड १०१ तास कीर्तनद्वारें सेवा करण्याचा उपक्रम होत आहे, हें विशेष आहे. मात्र माझ्या रामजीला आपण चार दिवस तिष्टत उभा करून ठेवणार ! तथापि या गोष्टीचें त्याला स्मरण होऊं देऊं नका म्हणजे झालें. आपणांस जर श्रमाचें विस्मरण होईल तर मग रामजीसही त्याचें स्मरण होणार नाहीं. खरी कीर्तनपरिषद हीच होय. कीर्तनाला काळ नाहीं, वेळ नाहीं, 'तुका म्हणे हरिच्या दासा। शुभकाळ दाही दिशा ॥'

गायन हें कीर्तनाचें एक मुख्यांगच आहे, गायन तेवढें त्यांतून कमी केलें तर त्याला नांव वेगळेंच देतां येईल.

आपण कांहीं तुकारामरामदास, या कोटींतील कीर्तनकार नसलों तथापि त्यांच्या जाग्यावर आहोंत इतकें स्मरण ठेविलें तरी कालांतरानें ती स्थिती प्राप्त होईलच. 'यस्त्वात्मरतिरेवस्यात्'. या कोटींतील हरिदास असे नको, असें असावें वगैरे सांगण्याचा अधिकार कोणालाच नाहीं. व आपण कीर्तन कसें केलें म्हणजे तें लोकांना रुचेल व पटेल याचाहि विचार करण्यास ते विचारभूमिकेवरच नाहींत. तसेंच कीर्तन वाटेल त्यानें वाटेल तेथें वाटेल तेव्हां करावें. त्याला निधिनिषेध, नाहीं. जोंपर्यंत आपण त्या भूमिकेवर पोंचलों नाहीं तोंपर्यंतच या सर्व भावना व नियम व दृष्टी राखणें जरूर आहे.

दासबोध ( दशक ४ समा० २ ) येथें कीर्तनांत विषय कोणते असावेत हें पहावें.

भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ॥
साधन मार्ग अध्यात्म निरूपण! प्रांजळ बोलावें ॥ १ ॥
प्रसंगीं हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी ॥
निर्गुणप्रसंगीं वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ २ ॥
सगुण हरिकथा या नांव कीर्तन । अद्वैत तें निरूपण ॥

सगुण रक्षुनि निर्गुण । बोलत जावें ॥ ३ ॥
पुढें असतां सगुणमूर्ति । निर्गुणकथा जे करिती ॥
प्रतिपादूनि उच्छेदिति । तेचि पढत मूर्ख ॥ ४ ॥
सगुणमूर्तिपुढें भावें । सगुण कीर्तन करावें ॥
नाना ध्यानीं वर्णावें । प्रताप कीर्तीतें ॥ ५ ॥
कथा रचावयाची खूण । सगुणीं नाणावें निर्गुण ॥
न बोलावें दोषगुण । पुढिलांचे कदा ॥ ६ ॥
मूर्ति नसतां सगुण । श्रवणीं बैसले साधूजन ॥
तरी अद्वैत निरूपण । अवश्य करावें ॥ ७ ॥
पदें दोहरें श्लोक प्रबंध । धाटी मुद्रा अनेक छंद ॥
बीर भाटीव विनोद । प्रसंगें करावे ॥ ८ ॥

दश. १४ समास ५ मध्यें पुन्हां म्हणतातः—

भक्तास देवाचें ध्यान । देवावांचूनि नेणें आन ॥
कळावंताचें जें मन । तें कळाकार जाहलें ॥ ९ ॥
एक मन तें गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी ॥
बळेंच धरूनिया चोरीं । शुश्रुषा घेतली ॥ १० ॥
श्रृंगारादि नवरसिक । त्यामध्यें सांडावे एक ॥
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूं नये ॥ ११ ॥
लावण्ययुक्त स्त्रियांचें ध्यान । कामाकार झालें मन ॥
कैचें आठवेल भजन । ईश्वराचें ॥ १२ ॥
स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला ॥
तो जाणवा चेवला । ईश्वरापासूनि ॥ १३ ॥

दशक १४ समास ४ मध्येंः—

सोनें आणि परिमळें । इक्षुदंडा लागती फळें ॥
गौल्य माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ॥ १४ ॥
तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त
व्युत्पन्न आणि वादरहित । तरी ते अपूर्वता ॥ १५

यापेक्षां कीर्तनकारांस उत्तम नियम अधीक कोण सांगेल ?

# उत्कृष्ट उतारे.

## १ नर्मदेची शोभा.

सहस्र शिखरें विंध्य पर्वतासी । सिंहशार्दूळ वनप्रदेशीं ।
सरितातोय गर्जे खळाळेसीं । तेणें नादें अंबर गाजे ॥ १ ॥
जैसे देव अमरावती । संतोषें क्रीडा करिती ।
तैसें त्या विंध्यपर्वतीं । आनंदें वसती सुर सिद्ध ॥ २ ॥
तिये रेवेचिया तीरीं । श्वापदें पक्षी नानापरी ।
वसती तेणें साजिरी । वनस्थळी शोभत ॥ ३ ॥
रानगाई सिंह शार्दूळ । उन्मत्त गज विशाळ ।
म्हैसे उष्ट्र व्याघ्र सायाळ । प्राशावया जळ पावती ॥ ४ ॥
चक्रवाकें हंस अनेक । जळकुक्कट सारस मयूरादिक ।
कोकिळा कूजती तेणें तटाक । अति रमणीय शोभले ॥ ५ ॥
नानापरींच्या वृक्षयाती । अनेक प्रकारच्या कुसुमजाती ।
भ्रमरसंघ रुणझुण करिती । पांथिका विश्रांती व्हावया ॥ ६ ॥
श्रमहारिता अनिळु । तोही वाहतो हळुहळु ।
विशेष हें नर्मदाजळु । अति शीतळु पैं जालें ॥ ७ ॥
कुमुदें विकसलीं सुमनीं । तोचि माथां शोभे वेणी ।
चक्रवाकें कुच दोनी । वनिता म्हणोनी वर्णिजे ॥ ८ ॥
विस्तीर्ण वाळुवंट सुंदर । तोचि माज सुकुमार ।
हंसावळी मेखळा साचार । लहरी ते मुक्ताफळ शोभे नाकीं ॥ ९ ॥
पुष्पें तीरींचीं ते चंदनउटी । कुमुदें तेंचि शोभे घटी ।
जळप्रवाह त्वचा गोमटी । उत्पल जें तेंचि नयन ॥ १० ॥
तीर अत्यंत विशाळ । माजी मीनमगरांचे उल्लाळ ।
तेचि गळां मुक्तामाळ । सुंदर वेल्हाळ शोभली ॥ ११ ॥

—भावार्थरामायण ( उत्तरकांड अ० २० )

## २ मारुतीचें उड्डाण.

पिंजारल्या रोमावळी । दिसे विक्राळ दांताळी ।
मस्तक गेला नभोमंडळीं । गोळांगुळीं आवेश ॥ १ ॥
दोन्ही दिसती नेत्रगोळ । जैसे धगधगीत इंगळ ।

आहाटितां भूमीसीं लांगूळ । लोक सकळ भयभीत ॥ २ ॥
घातिला पुच्छाचा आंकोडा । लंघोनि सुवेळेचा कडा ।
राम स्मरोनि वेगाढा । केला गाढा भुभुःकार ॥ ३ ॥
ऐकोनि त्याचा भुभुःकार । दचके कैलासीं शंकर ।
ब्रह्मांड हडबडिलें थोर । घोरांदर मांडिलें ॥ ४ ॥
अकाळीं प्रळयो कायसा सृष्टीं । प्रळयरुद्र निमती दृष्टी ।
इंद्रादिक पडिले संकटीं । प्राण कंठीं दाटले ॥ ५ ॥
कडे खचले सागरीं । वृक्ष भ्रमती गगनांतरीं ।
उड्डाण करितां कपिकेसरी । सुरासुरीं आकांत ॥ ६ ॥
सप्तसागरां खळबळा । धरा जाऊं पाहे रसातळा ।
आकांत जीवमात्रां सकळां । गोळांगुळाचेनि धाकें ॥ ७ ॥
करोनियां रामनामस्मरण । सवेग केलें उड्डाण ।
न लागतां अर्धक्षण । सागर संपूर्ण क्रमियेला ॥ ८ ॥
दिशा दुमदुमिल्या संपूर्ण । प्राणांतिक सकळ राक्षसगण ।
तें ऐकोनियां रावण । अति चिंता मन उपजवी ॥ ९ ॥

—भावार्थ रामायण ( युद्धकांड अ० ४५ )

---

## २ शैलपाठारीच्या उपवनाची बहार.

शैलपाठारीचें उपवन । आनंदवनाहूनि गहन ।
चैत्रनंदन अशोकवन । त्यासमान पैं नव्हती ॥ १ ॥
रम्य मंदाकिनीचें तीर । चंपकवृक्ष मनोहर ।
अशोक पुन्नाग मांदार । गगनचुंबित वाढले ॥ २ ॥
आंबे पाटली लोध्राचे वृक्ष । केतकी असंख्य अर्जुनवृक्ष ।
केळी नारळी पळस अनेक । जांभळी रायआवळी ॥ ३ ॥
हरीतकी आणि चंदन । खैर धामोडे बिल्ववृक्ष गहन ।
ताड माड सिंदी गगना । स्पर्धा करिती उंचपणें ॥ ४ ॥
ऐसें सुशोभित वन । तेथें किन्नर करिती गायन ।
मधुर नाना मूर्च्छन । सारीगमादि पैं गाती ॥ ५ ॥
जयांचें ऐकतां गायन । मनासी सुख वाटे गहन ।
तेथें विद्याधर मद्य सेवोन । आरक्त लोचन डुल्लत ॥ ६ ॥
योषिता तेथें नेणों किती । नानापरींचें शिंपणें शिंपती ।
हर्षें उल्हासें क्रीडती । चांदणें राती सर्वदा ॥ ७ ॥

एकी वीणा वाजविती । एकीं मोहरींत आलाप करिती ।
एकीं नानावाद्यीं व्युत्पत्ती । दाविती त्या वनदालयीं ॥ ८ ॥
मंद सुशीतळ पवन । मधुमाधव ऋतु जाण ।
वसंत शरद आदिकरून । तये पर्वतीं वसती सदा ॥ ९ ॥
गायन अत्यंत सुस्वर । आणि पुष्पांचा सुवास मधुर ।
मंद करून आकाशसंचार । स्पर्श करीत प्राणिया ॥ १० ॥
भावार्थरामायण ( उत्तरकांड अ० ३० )

---


सुधारून वाढविलेली ) **मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति.

कविवर्य मोरोपंत यांच्या पाऊण लाख कवितेंतून वेगवेगळ्या विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे मोठ्या प्रयासानें यांत संग्रहीत केले आहेत. १ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चक्रीरामायण व ७ विविधविषयपर—अशीं या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं असून त्यांत पंतांच्या कवितेंतलि बहुतेक उत्कृष्ट भाग आला आहे. ग्रंथाला भरपूर टीपा. व कथासंदर्भ दिले असून पंताच्या अजून अप्रसिद्ध अशा कांहीं कविता यांत दिल्या आहेत, व कोठें पंतांच्या हातच्या टीपाही दिल्या आहेत. प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत प्रस्तावना दिली असून तींत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे उत्तम गुण, काव्याची महती व पंतांची महाकवींत गणना होण्याचीं कारणें यांचें साहित्यशास्त्रदृष्ट्या विवरण केलें आहे व **ह्या दुसऱ्या आवृत्तींत पंतांचें त्रोटक चरित्र नवीनच जोडलें आहे** एवढा एकच ग्रंथ असला कीं, पंतांची व त्यांच्या कवितेची पुरी ओळख होते.

**केसरीः**—" पंतांचा उदार, भाविक व प्रेमळ स्वभाव, त्यांची प्रतिभा व रसिकपणा यांचें या वेंच्यांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलें आहे. मराठींत या दिशेचा नांवाजण्यासारखा पहिला प्रयत्न म्ह० हाच होय. महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व बहुश्रुत अशा लहानथोर वाचकांनीं रा. पांगारकरांचे हे वेंचे संग्रह करण्यासारखे आहेत. " **इंदुप्रकाशः**—" वेंच्यांची निवड कौशल्यानें केली असून वैचित्र्य चांगलें साधलें आहे. रसिक, विद्वान् व विद्याखातें यांजकडून या ग्रंथाला अवश्य आश्रय मिळाला पाहिजे. " ३ **ज्ञानप्रकाशः**—ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे. " इ० इ०

**पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.**

# सन्तचरित्रमाला.

## ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पालहाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें ह्या ग्रंथासाठींच लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८-३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वत: लिहिलीं असून ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत- आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुळशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त त्रिरुपन्नालवर, सूरदास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीतारामहाराज, मंगलवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव-महाराज, भटजीबापू, सोनगीरचे महाराज; मोरचे दत्तंभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु, इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा. पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्खा ( भालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का कृ. लेले, धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( विठ्ठल कृष्ण कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहळेकर ), बलभीमबोवा साडेकर ( श्री. खाजगीवाले ), शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशिककर. ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ०. पृ. २५६. पांच फोटो किं. रु. १८ व्ही. पी. नें १८१२.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

---

# सार्थ श्रीदासबोध.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकोक्तिश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साध्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर वर मूळ व खालीं सरळ भाषांतर असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधु शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरश: तपासून घेऊन व दोनही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५०ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५० सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत४ रु. व्ही. पी. नें ४८१०.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.



# गोपीविरहगीत.

वृत्तः--शुद्धकामदा.

प्रगटलासि तूं नंदगोकुळीं । ह्मणुनि इंदिरा वास ये स्थळीं ।
सकळही सुखी या व्रजीं हरी ! । विरहदुःखिता गोपसुंदरी ॥ १ ॥
प्रगट होइं तूं विश्वभूषणा । प्रियतमा ! त्वरें दाविं आपणा ।
हुडकितों तुतें गोपकामिनी । तुजवरी हरी ! प्राण ठेवुनी ॥ २ ॥
वरहि देउनी आस लाउनी । सकळही अडामाजि घालुनी ।
तदुपरी हरी दोर कापणें । तरी मृतासही काय मारणें ? ॥ ३ ॥
विगतदर्प तो सर्प कालिया । करुनि रक्षिलें गोकुळासि या ।
विषजलाचिया नाशुनी भया । विरहसागरीं घातलें ! प्रिया ! ॥४॥
व्रज गिळूं ह्मणे त्या अघासुरा । अजगरासि कारुण्यसागरा ।
वधुनि, रक्षिलें त्या तुला हरी ! । व्रजवधूंवरी कोप का तरी॥५॥
प्रळयमेघही वर्षतां वरी । गिरि धरूनियां रक्षिल्या, हरी ! ।
प्रळय तो स्वयें त्यांवरी करी। कठिण चित्त हें आजि कां परी॥६॥
पिउनि अग्नि तूं ज्यांस रक्षिसी । विरह-अग्निनें आजि जाळिसी ।
हरुनि सर्वही आमुचीं भयें । विरह-संकटीं घालिसी स्वयें ॥ ७ ॥
नव्हसि गोपिकापुत्र निश्चयें । सकळअंतरीं साक्षि तूं स्वयें ।
यदुकुळीं विधिप्रार्थनामिसें । भुवन तारिसी या कथारसें ॥ ८ ॥
ह्मणुनियां तुतें प्रार्थितों हरी ! । सफळ आमुची प्रार्थना करीं ।
प्रगट शीघ्र तूं होउनी प्रिया ! । अभय देउनी छेदिंजे भया ॥९॥
भवभयासही दूर जो करी । निवति लागतां गोपसुंदरी ।
अभयहस्त तो आमुच्या शिरीं । करुनियां कृपा ठेविं गा हरी ! ॥१०॥

सहज दाउनी भाव हांससी । तरि तुं आमुचे गर्व नाशिसी ।
नख न लावितां छेदणें जया । हरि! कुऱ्हाडि कां हाणणें तया? ॥११॥
हरुनि दर्प कंदर्प हा हरी । दवडिं कालियाचेपरी अरी ।
रविसुताह्रदीं कालिया जसा । ह्रदयिं आमुच्या कामही तसा ॥१२॥
तुझि कथासुधा तापल्या जना । निववि अंतरीं विश्वजीवना ।
अमृत निंदिती स्वर्गिचे मुनी । तव कथामृता वंदिती जनीं ॥ १३ ॥
अमृत गोड हें जों जिभेवरी । तुझि कथासुधा गोड हे हरी! ।
श्रवणीं आननीं बाह्य अंतरीं । मधुर सर्वथा जे परोपरी ॥ १४ ॥
कनक आणि तें गुंज जोखणें । तुझि कथासुधा तुल्य लेखणें ! ।
सुलभ जे सदा सर्वही स्थळीं । अमृत तुच्छ तें देवताकुळीं ॥१५॥
सरस हास्य, सप्रेम पाहणें । विहरणें चिदानंदलक्षणें ।
करिति अंतरीं ध्यान जें मुनी । विसरती कशा गोपकामिनी? ॥१६॥
फिरसी गोधनें चारितां वनीं । पद तुझें व्रजीं आठवूं मनीं ।
दुखवतील कीं ते तृणांकुरीं । ह्मणुनि पडतों दुःखसागरीं॥ १७ ॥
दिवस मावळे येसि तूं व्रजा । नयनिं दाविसी श्रीमुखांबुजा ।
कुरळ केश जे भृंग ते जसे । वरि पराग ते धूलिही दिसे ॥१८॥
ढकलुनी युगासारिख्या त्रुटी । दिवस कंठुनि थोर संकटीं ।
नयनिं पाहतां श्रीमुखाप्रती । लवति पापण्या त्या न सोसती॥१९॥
रडति सुस्वरें अश्रु लोचनीं । धरुनि लालसा कृष्णदर्शनीं ।
रडति तों तयामाजि ये हरी । प्रगट आपुलें रूप तो करी ॥२०॥
वसन पींवळें हार कंधरीं । नयन देखिल्या गोपसुंदरी ।
उठलिया जशा प्राण आलिया । सकळ शक्ति त्या येति इंद्रियां॥२१॥
हरिपदीं तया नित्य वामनें । त्रिभुवनीं मिठी घातली मनें ।
अमन या मनें वृत्तिगोपिका । सकळ जालिया चित्सुखात्मिका ॥२२॥

—वामनपंडित.

# समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे.

ग्रंथकारः—ल. रा. पांगारकर, बी ए किं. रु २.

## लोकमत.

**श्री० चौंडेमहाराज वांईकरः**—"श्रीसमर्थांचा दिव्य संदेश महाराष्ट्रांत लोकांच्या घरोघर पोचविण्याची श्रेष्ठ कामगिरी श्रीसमर्थांनीं आपल्यासाठींच राखून ठेविली होती असें स्पष्ट दिसतें. समर्थमहाराजांच्या एकूनएक उत्कृष्ट शिकवणी आपण संजीवनींत आणल्यानें त्यांची अखंड संगति ह्या एका ग्रंथानें सर्वांस लाभणार आहे."

**केसरी** ( सं. रा. न. चिं. केळकर ):—"श्रीसमर्थांच्या काव्यसागराचें मंथन करून त्यांतून निवडक रत्नें काढून त्यांचा हार गुंफण्याचें कार्य मुमुक्षु-कर्ते पांगारकर यानीं करून महाराष्ट्रधर्माच्या प्रसारास मोठेंच साधन उपलब्ध करून ठेवलें आहे....समार्थांच्या वाणीनें मृतप्राय महाराष्ट्रांत चैतन्य उत्पन्न केलें व त्याच्या हातून महाष्ट्रधर्माचा व राजकारणाचा झेंडा अटकेपर्यंत फडकविला. याकरितांच ग्रंथकारांनीं समर्थांच्या या शिकवणीला 'समर्थसंजी-वनी' असें सार्थ व साभिप्राय नांव दिलें आहे. तिच्या सेवनानें या देशांत तेज व सामर्थ्य प्रकट झाल्याविना राहणार नाहीं. पुस्तकाचें कोणतेंही पृष्ठ उघडावें व कोणताही उतारा वाचावा, त्यांत महाराष्ट्रधर्माचें तेजस्वी स्वरूप प्रगट झाल्यांवाचून राहत नाहीं! वाचकांच्या सोयीसाठीं त्याचे चार विभाग केले असून आणखीहि पोटविभाग केले आहेत, पण अथपासून इतिपर्यंत सर्वच भाग अस्सल बावनकशी सोनें आहे. श्रीयुत पांगारकर यांनीं पुस्तकास विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे व तींत आपल्या प्रेमळ वाणीनें पुढील वेच्यांचें सार उद्धृत केलें आहे. पुस्तकाचें बहिरंगही मनोहर असेंच आहे. महाराष्ट्रीय आबालवृद्धांनीं या पुस्तकाचा नित्यपाठ करण्याचा परिपाठ ठेवावा व त्यांतले कांहीं भाग तर मुखोद्गत करावें अशा योग्यतेचें हें पुस्तक आहे."

**आनंद** ( सं. रा. वा. गो. आपटे ):—"रामदासी वेंचे या नांवाव-रूनच पुस्तकाचें सामान्य स्वरूप कळतें. विशेष गोष्ट ही कीं आरंभीं ८० पृष्ठांत रा. पांगारकरांनीं सर्व प्रकरणांचा जो सारांश दिला आहे तो इतका व्यवस्थित रीतीनें सुबोध करून चटकदार आणि रसाळ भाषेंत लिहिला आहे कीं हा त्यांचा सारांश हा० बिलोरी कांचेच्या निर्मळ आरशांत पाडलेलें समर्थांच्या शिकवणींचें उत्कृष्ट प्रतिबिंबच होय"

**नवाकाळ**—[ सं. रा. कृ. प्र. खाडीलकर ]:—" समर्थांच्या अमोघ वाणीचा लाभ अत्यंत व्यवस्थित रीतीनें करून देऊन श्री. पांगारकर यांनीं ह्या ग्रंथाच्या रूपानें आतापर्यंच्या संतवाङ्मयविषयक ग्रंथांत सुंदर भर घातली आहे. श्रीसमर्थवाङ्मयाशीं रा. पांगारकर यांचा २५ । ३० वर्षांचा परिचय आहे. यांत बहुतेक सर्व महत्वाच्या शिकवणींचा समावेश केला असून निवडक वेंचे विषयवारीनें देण्यांत आले आहेत. प्रपंच, राजकारण, परमार्थ व स्फुट प्रकरणें अशीं एकंदर १५० प्रकरणें असून एकंदर प्रकरणांचा 'सारांश' ८० पृष्ठांत आरंभींच घालण्यांत आल्यामुळें विषयसंगति लावणें फार सुलभ झालें आहे. प्रापंचिक, राजकारणी व परमार्थिक अशा सर्व लोकांना मार्गदर्शक शिकवणूक समर्थांचीच असून ती सुव्यवस्थित व नीटनेटक्या स्वरूपांत पुढें ठेवण्याचें महत्वाचें कार्य पार पाडून श्री. पांगारकर यांनीं महाराष्ट्रीय वाचकांना उपकारबद्ध करून ठेविलें आहे. सर्वांनीं सर्वकाळीं जवळ ठेवण्यालायक अशा या ग्रंथाचें बाइंडिंगही मजबूत व टिकाऊ असून किंमत रुपये दोन बेताचीच आहे.

**गोरक्षण** [ सं. अनंतदास रामदासी]:—" शंकरराव देव यांनीं समर्थवाङ्मयाचा द्रोणागिरी धुळ्यास आणण्याचे परिश्रम केले व लक्ष्मणराव पांगारकर यांनीं त्यावरील दिव्य वनस्पतींचा अर्क मोठ्या परिश्रमानें काढून ही समर्थसंजीवनी बनविली व तिचा प्रथम लाभ मुंबईस श्रीसमर्थचरणीं सतत चार महिने तेरा कोटि रामनामाचा जप करणाऱ्या भाविकांना निरूपणप्रसंगीं घडला ही समर्थकृपाच होय. ज्या संजीवनीनें धादांत पाषाणांतही चैतन्य उत्पन्न होईल अशा त्या अमृतसंजीवनीचे घुटके स्वतः अत्यंत कष्ट घेऊन प्रवचनरूपानें ८ । १० दिवस जपयज्ञांतील भाविकांना त्यांनीं पाजले "

**स्वराज्य**—[ सं. रा. शि. म. परांजपे ):—" रा. पांगारकर यांनीं समर्थांच्या समग्र ग्रंथांचें आलोडन करून जें सार काढलें आहे त्यांत काव्याचें फार मार्मिक वर्गीकरण केलें आहे. त्यांनीं लिहिलेली प्रस्तावनाही वाङ्मयाच्या विवरणाच्या दृष्टीनें फार महत्वाची आहे. 'सारांश' ८० पृष्ठांत दिला आहे त्यायोगें समर्थांची दुर्बोध कविता कळण्याला मदत होते. हें उपयुक्त पुस्तक सर्वांनीं संग्रहीं बाळगण्यासारखें आहे."

**ज्ञानप्रकाश**:—' समर्थसंजीवनी ' हें पुस्तक संतकवींचा सुमारें दोन-अडीच तपें अव्याहत व्यासंग असलेले रा. पांगारकर यांनीं केलें असल्यामुळें तें वाचनीय व मननीय झालें आहे हें सांगावयास नकोच."

# मुमुक्षुंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षु' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. हें जाणून महाराष्ट्रियांनीं हे भाग विकत घेऊन स्वतःस्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिलाः**— १ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ इश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४ मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव. ले. १ते४ १०.श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२होळीची मीमांसा. १३भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५श्रद्धा. १६वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७व्यसनांतून सुटावें कसें? १८ संक्रांतीचा हलवा. १९श्रीशिवलिंगाचें रहस्य. २०हिंदुधर्म. २१निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५आमचे पुढारी संतच. २६प्रेमामृतमाधुरी. २७डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसराः**—१आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४मामामामींचा संसार. ५सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतऱ्या थमालेले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदीर १९ मातृभाषेचें प्रेम. २०दयेचे प्रकार. २१वेदांतांचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३वाङ्मयतप. २४अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७निंदकांचे उपकार. २८ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद ( या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. )

पत्ता—**व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.**

# श्रीदासनवमी महोत्सवार्थ संचार.

श्रीसमर्थांची पुण्यतिथी माघ वद्य ९ असून हे नऊ दिवस श्रीसमर्थभक्तांना उत्सवप्रद असतात. रा. पांगारकर हे नाशकाहून निघून तृतीयेस साताऱ्यास व चतुर्थीस सज्जनगडावर गेले व पंचमीषष्ठीस साताऱ्यास राहून सप्तमीस मुंबईमार्गानें अमदाबादेस गेले. तेथें उत्सवाचे मुख्य तीन दिवस राहून एकादशीस बडोद्यास उतरून महाशिवरात्रीसाठीं नाशकास परत आले. श्रीदासनवमीच्या उत्सवासाठीं आकोला, यवतमाळ, वगैरे ठिकाणीं बोलावणीं होतीं पण अनेक ठिकाणीं जाणें अर्थातच शक्य नव्हतें.

## सज्जनगड.

चतुर्थीस सायंकाळीं सज्जनगड चढतांनाच मनास विलक्षण उत्साह वाटला. सज्जनांचे मेरुमणि श्रीसमर्थमहाराज ज्या गडावर राहिले होते व ज्यांच्या दर्शनसुखासाठीं शिवाजीमहाराज व समर्थांचे अनेक अधिकारी शिष्य व रंगनाथस्वामीप्रभृति समर्थांचे संत मित्र अनेकवार जात असत तो सज्जनगड साताऱ्यापासून ६ मैलांवर आहे. उरमोडी उर्फ उर्वशी नदी उतरून श्रीसमर्थचिंतन करीत गडाभोंवतालचा रम्य प्रदेश अवलोकन करीत व साताऱ्याचा अजिमतारा, जरांडयाचा श्रीमारुतीचा डोंगर, व आसपासचीं डोंगरांची रांग पाहत पाहत आम्ही अस्तमानसमयीं वर गेलों. त्या प्रदेशांतलें समर्थचरित्र सारें मनासमोर उभें राहून आनंद झाला. पुण्य भूप्रदेशांतला संचार व पुण्य चरित्राचें चिंतन हें कोणाच्या चित्ताला उन्नतिप्रद होणार नाहीं ? शिवरायांच्या क्षात्रतेजाचा मूर्तिमंत पुतळा असा साताऱ्याचा किल्ला व समर्थांच्या ब्रह्मवर्चसाचा अवतार असा सज्जनगड हे समोरासमोर बसून धर्मसंस्थापनेचें खलबत अजून करीत बसले आहेत असें मनांत येऊन नानाविध मनोभावांत चित्त दंग होऊन गेलें. ता कर्तृत्वाच्या उसळीचा काळ व आजची लोकपरिस्थिति यांच्या तुलनेंत मनाला काय वाटलें तें सांगतां येणें कठिण आहे. सायंकाळीं स्नान करून श्रीसमर्थांच्या पादुका व दोन कुबडया यांना वंदन करून समर्थांच्या समाधिसन्मुख दोन घटिका अपार आनंदांत घालविल्या. समर्थांच्या नानाविध लीला आठवल्या, त्यांच्या गुणांचा पार कोणास लागणार ह्मणा, पण ज्ञात गुणकथा स्मरून लोहपरिससंगमाचा आनंद भोगला. खरा उत्सव चरणांपाशींच होतो. प्रसाद होऊन रात्रीं परत आलों.

## सातारा.

दुसरे दिवशीं सायंकाळीं साताऱ्यांत पालख्यांचा सोहळा उत्कृष्ट झाला. यंदा श्रीकल्याणस्वामींचीही पालखी आली होती. श्रीसमर्थांचे मित्र रंगनाथस्वामीही समर्थांच्या भेटीस आले होते. वांईचे चौंडेमहाराज यांच्या प्रेर-

णेनें व चालनेनें पंढरीच्या वारकरी मेळ्यांप्रमाणें हा पालख्यांचा उपक्रम गेल्या पांचसात सालांतच झाला आहे. मिरजेच्या वेणाबाई, टाकळीचे उद्धवस्वामी यांच्या पालख्या सालाबादप्रमाणें होत्याच. नवलाची गोष्ट एक वाटली कीं, सातारा शहरांतील विद्वान, वकील, व्यापारी, पुढारी, देशभक्त म्हणविणारे, सुशिक्षित लोक समर्थांना अजीबात विसरले आहेत! समर्थांच्या उत्सवांत ते एकमतानें गैरहजर असतात तेथील दोन वर्तमानपत्रें कीं या उत्सवाला ज्यांनीं प्रोत्साहन दिलें पाहिजे तीं कौन्सिलच्या निष्फळ वाटाघाटींत दंग असतात पण समर्थांचें त्यांना विस्मरण पडलेलें दिसतें! सक्रिय राजकारण ज्यांनीं वीस तीस वर्षांत यशस्वी करून दाखविलें व 'स्वराज्य' मिळवून दिलें त्या समर्थांचें साताऱ्यांतील पुढारी लोकांस विस्मरण व्हावें हें पाहून बरें वाटलें नाहीं. समर्थांची ह्यांत काय हानि आहे म्हणा; पण एवढ्या स्फूर्तिदायक प्रसंगाचा त्यांनीं फायदा घेऊं नये हें कशाचें लक्षण समजावें? द्रव्यार्जन व लौकिक ह्यांत मुख्यतः दंग असून फावल्या वेळांत पै दिडकी लोककार्य करणाऱ्यांच्या 'पुण्यतिथि' साजऱ्या करणाऱ्या या सुशिक्षित लोकांना उशाशीं असलेल्या महाविभूतींचें स्मरण होऊं नये काय? आह्मांला अशी उमेद आहे कीं, सातारा शहरच नव्हे तर जिल्ह्यांतील सर्व लोक मोठ्या उत्साहानें, प्रेमानें समर्थांचा हा स्वानोतिकर उत्सव पुढील सालापासून तरी एकविचारानें थाटाचा करूं लागतील. ज्या राष्ट्राला दिव्य भूतकाल नाहीं किंवा असलाच तर तो तें विसरून जातें, त्याला भविष्यकाळाची आशा करायचा अधिकार नाहीं. साताऱ्यांत रा. पांगारकरांचीं समर्थांच्या उपदेशावर व चरित्रावर दोन प्रवचनें झालीं. पालख्यांपुढील प्रवचनाचे वेळीं श्रोतृसमुदाय चांगला जमला होता, पण नुस्तीं व्याख्यानें ऐकणाऱ्या श्रोत्यांपेक्षां समर्थसेवा करणारे श्रोते आह्मांला अधिक आवडले असते. वाचनालयांतून वर्तमानपत्रें व मासिकें अहमहमिकेनें वाचणारे लोकांची गर्दी दिसते, पण दासबोध, ज्ञानेश्वरी, नाथभागवत या दिव्य ग्रंथांची पारायणें भक्तिभावानें करणारे, उपासनेला दृढ चालणारे, परमार्थप्रवण अंतःकरणानें लोकाकार्याला लागलेले तरुण ज्या दिवशीं राष्ट्रांत हजारोंनीं दिसतील त्या दिवसापासून राष्ट्राचा उदय होईल. देव, धर्म, संत या त्रयीला विसरणाऱ्या धर्मविमुख राष्ट्राच्या अन्यथा चळवळी निष्फळ होत व हें 'तुम्हां सर्वांच्या प्रतीतीस आलें किंवा नाहीं' असें विचारण्याचा काळ आला आहे.

## अमदाबाद व बडोदा.

अमदाबादच्या महाराष्ट्र समाजाच्या निमंत्रणावरून तेथें जाणें झालें. दोन दिवस प्रवचनें झालीं. समाज एकजूट, भाविक व प्रेमळ दिसला पण तीन

दिवस उत्सव करून वर्षाचे बाकीचे दिवस झोपीं न जातां समर्थांचीं, सर्व संतांचीं, अखंड स्मृति ठेवण्यासाठीं त्यांच्या ग्रंथांचीं अखंड पारायणें करीत श्रवणमननिदिध्यासनबलानें त्यांच्याशीं अंतरंग ऐक्य पावा असेंच तेथील लोकांस सांगणें आले. महात्माजींचा सत्याग्रहाश्रम व मुसलमानी काळांतील इमारती, स्वामीनारायण मंदिर, जैनमंदिर इ० स्थानें मंडळींनीं प्रेमानें दाखविलीं. बडोद्यास प्रो० माणिकरावांच्या आखाड्यांत सायंकाळीं प्रवचन होऊन ही बारा दिवसांची फेरी संपली.

---


**प्रती फारच थोड्या शिल्लक आहेत.**

# मोरोपंत-चरित्र व काव्यविवेचन.

पृ०सं.६२० ] ग्रंथकार:—**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,** बी. ए. [ किं रु. २॥८

**बी. ए. च्या परीक्षेस मुंबई युनिव्हर्सिटीनें नेमलें आहे.**

सदर ग्रंथाच्या प्रती पुष्कळ वर्षे आमच्या आह्मांसच उपलब्ध होत नव्हत्या त्या नुकत्याच मुंबईस एका बुकसेलरकडून मिळाल्या आहेत. पांगारकरांच्या ग्रंथांचे सेट्स् पुरे करण्यास ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं व बी. ए. च्या विद्यार्थ्यांनीं ताबडतोब मागणी करावी. ग्रंथ दुर्मिळ आहे. किं. रु. २॥८ ट. ख. वेगळा ॥१०

पत्ता:—**व्यवस्थापक ' मुमुक्षु '** पुणें शहर.

---

**आवृत्ति दुसरी** **मोरोपंतीं वेचे.** **किं. रु. १॥१२**

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाऊणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील हीं रमणीय मोत्यें एकत्रित केलेला एकच ग्रंथ जवळ करावा. **केसरीकारांनीं** म्हटलें आहे " महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीति व्यवहारज्ञ व लहान थोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. " या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेत—

१ ईश्वरभक्तिपर. २ कवि आणि कविता. ३ उपदेशपर. ४ वर्णनपर. ५ कथानकपर. ६ वक्रीरामायण व ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध जोडला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे मुख्य गुण, काव्याची महती इ० विषयांचें सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ, कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें, संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ता:—**व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें शहर.**

# श्री रघुनाथमहाराज उर्फ काका पुराणिक.

( मे-जून १९२४ चे अंकावरून पुढें चालू. )

२९ काका रा. सांडूंचे घरीं आल्यानंतर रा. छत्रे यांचेतर्फे महापूजा व नैवेद्य वगैरे उपचार यथावकाश सादर करण्यांत आले. रा. छत्रे यांची सरकस मुंबईस चालू होती. त्यांचे आग्रहावरून काकांस वारंवार खेळ पाहावयास जावें लागे. एके दिवशीं श्री रंगनाथ या नांवाचे सत्पुरुषाबरोबर काकांना घेऊन रा. छत्रे यांनीं मुद्दाम एक बहारीचा खेळ केला व शृंगारलेल्या हत्तीच्या सोंडेनें काकांचे गळ्यांत फुलांचा हार घातला. कांहीं दिवस मुंबईस राहणें होऊन " श्री समर्थ संप्रदाय " संस्थेकडून पूजा व प्रसाद झाल्यानंतर काका-महाराजांची स्वारी मार्गप्रतीक्षा करीत असलेल्या ठाणेकर भक्तमंडळीकडे गेली. तेथें एक काशीकर वे० सं० अनंतभट्ट या नांवाचे एक आचारसंपन्न, कडकडीत वैदिक दशग्रंथी भिक्षुक असत. त्यांची व काकांची सहज गांठ पडली. या ब्राह्मणाच्या घरचीं दोन मुलें काकांकडे जाणारीं असून काकांचे सांगण्यावरून श्री अध्यात्मरामायणाचें पठण करीत असत. वे० अनंतभट्टजी हे वेदाचे कट्टे अभिमानी असून, ब्राह्मण म्हणून जेवढा वेदाचा अधिकारी आहे त्यानें परमार्थ अगर ईश्वर प्राप्तीसाठीं वेदाध्ययनच केलें पाहिजे, इतर ग्रंथाचें पठण अगर केवळ नामस्मरण यानें कार्य होणें नाहीं, असें ते मोकळे मनानें आग्रह-पूर्वक पण निरहंकारानें सांगत. स्वतः त्यांनीं वेदाची पाळणूक फार जपून व त्यास अहोरात्र अखंड जिव्हाग्रीं वागवून केली होती. त्यामुळें त्यांच्या ह्या मताचा निरोध करण्यास कोणी सहसा धजत नसे. वर सांगितल्याप्रमाणे जेव्हां त्यांची व काकांची भेट झाली त्यावेळीं या वेदमूर्तीनें काकांचे चरणावर प्रेमानें मस्तक तर ठेविलेंच, काकांनींही उलट त्यांस " आपण साक्षात् वेदोनारायण आहां, नमस्कार कसला करितां " असें म्हणून स्वतः त्यांचे पाय धरिले. " परस्परं भावयन्तः " अशा थाटाचा गौरव झाल्यानंतर वे० अनंतभट्ट यांनीं काकांस विचारिलें कीं " महाराज, काय हो, वेदांहून तुमचें रामायण श्रेष्ठ आणि म्हणून तें तुम्हीं लोकांस वाचावयास सांगतां? याच्या पुढेंही आणखी सांगणारे आहेत कीं सदैव देवाचें नुसतें नांव घ्यावें म्हणजे यापरतें आणखी परमार्थाचें साधन कांहींएक नको? " यावर काकांनीं भटजींची वेदांवर असलेली अनन्य भक्ती व निष्ठा ओळखून उत्तर दिलें कीं " अहो,

वेदाध्ययनाकडे द्विजांची प्रवृत्ति आहे कोठें व उत्तरोत्तर वेद नीटसा ह्मणतो कोण? म्हणून रामायणभागवतादि ग्रंथ त्यांना वाचावयास आवडतात. व ज्यांस तेही ग्रंथ समजत नाहींत ते प्राकृत ग्रंथ वाचतात. शिवाय श्रुतिमध्यें जें आहे तेंच संस्कृत ग्रंथांत आहे व जें संस्कृत ग्रंथांत आहे तेंच प्राकृतांत आहे. वर्णाश्रमविधि त्यजून नाम मात्र घेऊन चालावयाचें नाहीं. त्याला देव पावणार नाहीं. प्रत्यक्ष नाम कोणी घेईल तरी पुरें आहे. पण अखण्ड नाम घेणारा असा कोण आहे? तुकाराम, नाथ आदिकरून अलीकडील संत हे पूर्वीचे ऋषिमुनिच होत. त्यांचे महतीचा कुणास अंत आहे?" या प्रकारें करून भटजींची काकांनीं समजूत घातली व काका म्हणाले "तुम्ही प्रत्यक्ष वेदोनारायण आहांत, अशा तुमच्यासारख्यांस आणखी मार्ग तो कशाला?"

३० प्रो० छत्रे प्रातःकाळीं आपले तंबूंतून महाराजांचे दर्शनाकरितां आले. कुशल प्रश्न झाल्यानतर प्रो० छत्र्यांनीं महाराजांस विचारिलें कीं "मी अगदीं कंटाळलों आहे. संसाराचा धंदा सोडण्याची मला कधीं आज्ञा आहे?" त्यावर काका म्हणाले, "तुह्मांस संसाराचा धंदा जरूर केला पाहिजे. कर्मानुसार भागास आलेला संसाराचा धंदा निरभिमानानें खुशाल करावा व सारें ईश्वरास अर्पण करावें. परमार्थ ईश्वरानें केला आणि संसार काय चोरानें केला!" नंतर रामदासस्वामींची वादीचा साप केलेल्या गारोड्याची प्रसिद्ध गोष्ट सांगून काका म्हणाले, "गारोड्यास तो साप खोटा, इतरांस खरा, ईश्वरास प्रपंच खोटा पण तुह्मां आम्हांस तो खराच. टाकू म्हणून तो सुटावयाचा नाहीं. ईश्वरार्पणबुद्ध्या विभागास आलेलें कर्म सारून त्याची भक्ति करून तो ईश्वर भाव जेव्हां देईल तेव्हां प्रपंच खोटा असें मग म्हणावयासच नको." श्री तुकारामांनीं म्हटलें आहे "हेचि थोर भक्ति आवडती देवा। संकल्पावी माया संसाराची" काकांकडे येणाऱ्या मंडळींमध्यें जीं कांहीं थोडीबहुत माणसें परमार्थाची आवड म्हणून आली त्यांपैकीं प्रो० छत्रे हे होत. बहुत संत-मंडळामध्यें वावरलेले, प्रसंगीं देहावर बेतली तरी बेहेत्तर पण खऱ्या साधूच्या वचनाप्रमाणें वागण्याची बाणेदार तयारी, त्याचप्रमाणें संतकार्याकरितां लागेल तो पैसा खर्च करण्याची उदारबुद्धी, हरतऱ्हेचे उद्योग करून आंतून नेहमीं सावध अशा माणसास काकांनीं प्रपच न सोडतां तो आपोआप कसा सुटेल अशा रीतीचा अकर्तृत्वबोध वरील गोष्टीच्या रूपानें सांगितला.

३१ याच सुमारास रामदासी ह. प. रिसवडकरबोवा यांचा कीर्तनसप्ताह ठाणें मुक्कामीं सुरू होता. ते महाराजांचे दर्शनास आले व त्यांनीं आपले कीर्तनास येण्याची काकांस फार विनंति केली. त्यावरून काका कीर्तनास प्रो०-

छत्रे यांसह गेले. "गुरुभक्ति" हा विषय बोवांनीं बहारीचा प्रतिपादन केला. कीर्तन सुश्राव्य झालें. काकांनीं मान डोलवली व ह. भ. प. वामनबुवा बहुतुके यांचीं पूर्वी पुष्कळ कीर्तनें झालीं त्यानंतर आजचें हें बुवांचें कीर्तन जवळ जवळ त्याच तोडीचें ऐकावयास मिळालें, असें म्हणाले. छत्रे कीर्तनास हजर असल्यामुळें बुवांस बिदागी चांगली मिळाली. काकांनीं स्वतः एक रुपया दिला तो बुवांनीं आपले देवांत प्रसाद म्हणून ठेविला व ते त्याची नित्य पूजा करीत. नंतर बुवांची ठाण्यास फारच वाहवा झाली व पुष्कळ कीर्तनें झालीं. एवढा लौकिक व पैसा आपणांस काकांचें प्रसादानें मिळाला असें बुवा नेहमीं म्हणत. चार पांच घरीं काकांचा ठाणें येथें सवडीनुसार मुक्काम झाला. प्रत्येक घरीं लग्नसमारंभाप्रमाणें थाटमाट व उत्साह, पुराण व परमार्थचर्चा असा आनंद होऊन महाराजांची स्वारी मुंब्रामार्गें पनवेलीस श्रीमंत तात्यासाहेब पुराणिक यांजकडे जावयास निघाली.

३२ पनवेलास ४।५ दिवस श्रींचा मुक्काम झाला. एके दिवशीं तात्यासाहेबांचे वडील वे. शा. कृष्णशास्त्री यांनीं एक रामफळ श्रीस आणून दिलें. श्रींनीं तें सर्वांस मिळेल अशा बेतानें वांटून ध्यावयास सांगितलें आणि म्हणाले कीं हें ज्याला ज्याला म्हणून मिळेल त्याला प्लेगाची बाधा होणार नाहीं. श्रींच्या आज्ञेप्रमाणें शक्य त्या खबरदारीनें रामफळ सर्वांस वांटण्यांत आलें. कर्मधर्मसंयोगानें एक इसम या प्रसादास चुकला व तेवढाच दुर्दैवानें गांठला व प्लेगमुखीं पडला. पुढें श्रींची स्वारी पळस्पेवरून कर्जतमार्गानें साताऱ्यास गेली. अंगांत ज्वर बहुत होता. साताऱ्यास वे. शा. भालचंद्रभट्ट करंबेळकर यांचे घरीं मुक्काम होता. तीन दिवस स्वारी अंथरुणास खिळून होती. चौथे दिवशीं पहाटेस उठून श्रींनीं विचारिलें कीं आज ( पौष व ३० शके १८२६, ता. ४ फेब्रुवारी १९०५ ) महोदय पर्व आहे नव्हे ? होय, असें उत्तर मिळतांच चला तर आज कृष्णाबाईचे स्नानास असें म्हणाले. अंगांत ताप म्हणतो मी, आणि माहुलीस स्वारी जाणार कशी, असें मंडळी आपआपसांत पुटपुटत होती. बरेच दिवस ज्यांनीं श्रींचे सहवासांत घालविले अशी कांहीं मंडळी होती त्यांना असें वाटे कीं, एखादी गोष्ट स्वारीचे मनांत घडवून आणावयाची असें ठरलें म्हणजे प्राकृत जीवाप्रमाणें कोणत्याही उपाधीचा प्रतिबंध त्यांस होणें नाहीं म्हणून ती गोष्ट तडीस जावयाचीच. त्याप्रमाणें दारांत टांगे येऊन दाखल झाले व श्रींसह सर्व मंडळी माहुली संगमावर स्नानास निघाली वाटेंत पीरवाडीस श्रीनाथमहाराजांचे समाधीचें दर्शन घेतलें. नदीवर येऊन पोंचल्यावर सर्वांचें स्नान झालें. महाराजांनीं तांब्याचा

तांब्याच पाणी पिण्याकरितां तोंडास लाविला, व " कृष्णाबाई काय करील तें खरें " असें म्हणून तांब्याभर पाणी प्याले व कृष्णाबाईची एक कळशी भरून घेऊन सबंध दिवस तेंच पाणी पीत राहिले. घरीं परत आल्यावर " आज काशीयात्रा झाली " असे उद्गार श्रींचे मुखांतून निघाले. साताऱ्याहून परत मुंबईस येऊन स्वारी धोपेश्वरीं परतली. कर्जतहून निघाल्यापासून मुंबईस परत येईपर्यंत स्वारींची प्रकृति तापानें सारखी बेजार होती. सर्व व्यवहार बंद पडून ऊर्ध्व दृष्टी करून स्वस्थपणानें अंथरुणावर स्वारी पडलेली असे. निर्विकल्प समाधींत सुखाचा अनुभव घेत आहेत, असें पहाणारास वाटे. समाधिस्थिति जेव्हां उतरे तेव्हां मधूनमधून " हाय " अशीं अक्षरें मुखावाटें बाहेर पडत. पुनरपि ऊर्ध्वदृष्टि करून पूर्ववत् स्वस्थ पडून रहात. सातारा सोडल्यापासून मुंबईला पोंचेपर्यंत प्रकृति ठीक होती. मुंबईस रा. सांडूचे बिऱ्हाडीं आल्याबरोबर मुद्दाम आमंत्रण केल्यासारखा ताप हजर. एक सप्तक ताप सारखा आला व दुसरे दिवशीं धोपेश्वरीं जावयास निघण्याची तयारी झाल्याबरोबर स्वारींची प्रकृति हुशार. तात्पर्य,शरीरभोग भोगण्याची वेळ आली कीं स्वानुभवी पुरुष भोग पत्करूनही आपलें अखंड आत्मानंदामध्यें कसा मग्न असतो हें प्रत्यक्ष सर्वांच्या दृष्टीस पडलें.

३३ "श्रीसमर्थ संप्रदाया"कडून मुद्दाम निमंत्रण गेल्यावरून श्रींचें पुनरागमन मुंबईस ता. १६ डिसेंबर १९०६ रोजीं झालें. ता. १४ जानेवारीं १९०७ रोजीं सूर्यग्रहणाची पर्वणी आल्यामुळें सर्व संप्रदायबंधु श्रीसमवेत समुद्रस्नानास गेले. स्नान झाल्यानंतर मंडळीपैकीं एकानें ग्रहणांत अध्यात्मरामायणापैकीं कोणता भाग वाचावा असें विचारिलें असतां " सुन्दरकाण्ड " वाचावें व राहिलेल्या वेळांत जप करावा असें श्री म्हणाले. त्या दिवशीं भोजनोत्तर रात्रीं अर्थाचा अध्याय झाल्यानंतर ११ चे सुमारास स्वारी सिंहासनावर बसलेली आहे, ९।१० मंडळी भोंवतालीं बसलेली आहे अशा थाटांत, श्रोत्यांच्या नशिबाची काय जी अभ्युदयाची वेळ कीं काकांनीं श्रीनाथमहाराजांच्या लीला सांगण्यास एकाएकीं आरंभ केला. गोष्टी सांगतांना काकांच्या तोंडावर इतकें तेज चढलेलें दिसलें कीं त्यांचेकडे टक लावून पाहण्याची सोयच नव्हती. गोष्टींचा प्रवाह अनावर होऊन गेला. श्रोते व वक्ता समरस तादात्म्य पावून, नाथलीलेच्या अमृतवृष्टींत वाहून जाऊन बराच वेळ अमृतमय होऊन स्वात्मानंदाचे सुखसोहळ्यांत गर्क झाला. वक्ता निरवधि निरतिशयानन्दस्वरूपच होता, पण श्रोत्यांना त्या आनंदाचा लवमात्र स्वाद मिळावा व त्यांचें स्वरूप पटून मार्गारूढ असलेल्या आपल्या प्रिय

भक्तांस ध्येय पटवून देऊन गुरुभक्तीचें मर्म विशद करून दाखवून उपासनेचें फळ किती सुन्दर, मधुर व सुखदायी आहे, ह्याचा अनुभव अल्पावकाश कां होईना—गोष्टींच्या मिषानें प्रत्ययास आणून दिला. रात्र किती लोटली याचें कोणासही भान नाहीं. इतक्यांत कोंबडा आरवला. चालू असलेली गोष्ट पुरी करून श्री म्हणाले," अहो, उजेडावयास झालें. गोष्टींच्या भरांत केव्हां रात्र गेली हें मला मुळींच कळलें नाहीं." त्यावर मंडळींनीं म्हटलें " आज ज्या गोष्टी ऐकावयास मिळाल्या व जो आनंद झाला तो काय फिरून मिळणार आहे ? " त्यावर श्री म्हणाले " हें काय माझे हातांत आहे ? महाराजांनीं तोंडाचें कुलुप आज काढलें, तेव्हां ह्या गोष्टी मला सांगतां आल्या, नाहीं तर मीं काय सांगणार ? उठा, पळा." गोष्टींचा ओघ चालू असतां मध्येंच एकानें श्रींस विचारलें कीं, ज्ञान झाल्यानंतर काय होतें ? त्यावर श्रींनीं उत्तर दिलें कीं," आधीं त्रिकालज्ञता उत्पन्न होते, आणि जिकडे तिकडे प्रकाश दिसतो. (समोर असलेल्या खांबाकडे व भिंतीकडे हात करून म्हणाले) मग काय हा खांब व ही भिंत दिसते काय ? त्याला ज्ञानाशिवाय कांहीं दिसतच नाहीं." तो प्रकाश कसा असतो असें विचारितां ते म्हणाले, " तुम्ही आतां विचारतांच म्हणून उगीच कांहीं म्हटल्या कांहीं कल्पना करितां आली तर, हा जो सूर्य दिसतो आहे ना तो त्या ज्ञानाच्या प्रकाशापुढें एखाद्या काजव्याप्रमाणें आहे ! " पुढें थोडे दिवस मुंबईसच राहणें होऊन स्वारी धोपेश्वरीं गेली.

३४ धोपेश्वरीं परत जातेवेळीं मी लवकरच परत येईन असें एका ठाणेकर-भक्तास कबूल केल्यावरून तो इसम श्रीस आपले घरीं पाचारण करून आणणें करितां स्वतः धोपेश्वरीं गेला व ३ मार्च १९०७ रोजीं जलमार्गानें त्यांस घेऊन आला. पनवेल, मुंबई वगैरे ठिकाणीं जाऊन पुनः ठाण्यास ८ दिवस मुक्काम करून प्रो. छत्रे यांच्या अत्याग्रहावरून अकोला, मुर्तिझापूर, धामणगांव वगैरे ठिकाणीं श्रींची स्वारी गेली.धामणगांवीं असतां रा. परांजपे या नांवाचे एक पदवीधर गृहस्थ रामदासी बाण्यानें श्रींचे दर्शनास आले.त्यांनीं काकाचे पायांवर आपलें मस्तक ठेविलें व कांहीं केल्यानें तें वर उचलिनात.तेव्हां एका इसमानें काकांस सांगितलें कीं, त्यांच्या मस्तकावर आपण हात ठेविल्याशिवाय ते उठावयाचे नाहींत. बरें आहे असें म्हणून काकांनीं त्यांचे मस्तकावर हात ठेविला व ते नंतर उठले. कांहीं वेळानें काका म्हणाले, " हात ठेवून काय होतें, कांहीं तरी समजुती आहेत " धामणगांवीं सर्कशीच्या एका खेळाचें संबंध उत्पन्न पूर्वसंकल्पाप्रमाणें छत्रे यांनीं श्रींचे पदरांत घातलें व त्यांचेबरोबर असलेल्या ५।७ मंडळीला वस्त्रप्राव-

रणें देऊन त्यांचा सन्मान केला. धामणगांवाहून मुक्काम हलवून लोणावळें व तळेगांव येथें एक एक दिवस मुक्काम केला. तळेगांवीं रात्रौ विठ्ठलमंदिरांत ह. प. विनायकबोवा साखरे यांचें श्रीसमोर कीर्तन झालें. व तें महाराजांना फारच आवडलें. तेथून पुढें पुणें मुक्कामीं जाऊन रा. कुशाबा लिमये यांचे नातेवाईक तेथें रहातात त्यांचेंकडे काका गेले. काका यांचे गुरुबंधु रावसाहेब कोल्हटकर यांनीं देह ठेवितेवेळीं काकांस सांगितलें होतें कीं, रा. कुशाबा लिमये यांचें मीं रु. २०० देणें आह तें तुम्हीं तुमचा हात चालल्यास द्याव.तें देणें फेडण्याकरितां रा. लिमयांचे वंशजांचा पत्ता काढून त्यांस गांठलें. त्यांच्या कडील माणसांस या गोष्टीची कांहींच माहिती नव्हती. तेव्हां ते रुपये घेईनात. पण काकांनीं त्यांची गोड शब्दांनीं समजूत घालून त्यांचे पदरांत रुपये घातले. तीं माणसेंही थोर मनाचीं, सुसंपन्न व समंजस असल्यामुळें त्यांनीं काकांचा सत्कार करून त्यांस ती रक्कम दक्षिणेच्या रूपानें परत केली. पुण्याहून पुढें साताऱ्यास व तेथून पीरवाडीस काका गेले. साताऱ्यास आल्यावर रा. कोल्हटकर यांचेतर्फे एक मारवाडी व एक शिंपी अशा दोन धनकोंचे पैसे देण्याचे उद्योगास सुरवात झाली. पैकीं मारवाड्याच्या वंशजाचा पत्ता लागला नाहीं. शिंप्याचे नातेवाईकांनीं मात्र चोपडी आणून आपले रु. ९५ येण्याची खात्री पटवून दिली. त्यावरून त्यास ती रक्कम दिली. ती घेऊन तो म्हणाला " महाराज, मीं विठ्ठल मंदिरावर रु.९५ किंमतीचे पत्रे मुंबईहून आणवून घातले आहेत. ती रक्कम आज मी देण आहें. ती आपण मला दिलीत " व इतकें बोलून आनंदानें घरीं गेला. काका पूर्वी साताऱ्यास पुराण सांगत असतांना ओळखीचे असे अनेक भिक्षुक, शास्त्री वगैरे जी मंडळी हयात होती ती काकांस प्रेमपूर्वक नमस्कार करून काकांचा गौरव करीत. एक वृद्ध शास्त्रीबोवा नेत्रांत अश्रू आणून " काका, तुम्ही देव झालांत, आम्ही होतों ते आहों " असें प्रेमपुरःसर म्हणाला. श्रींचा फोटो घेण्यांत आला व रात्रौ मंत्राजागर करून कै. वे. भालचंद्रभट्टजी यांनीं श्रीस एक शाल अर्पण केली व श्रींनीं ती भटजीबोवांस प्रसाद म्हणून परत दिली. साताऱ्याहून मुंबईतून जलमार्गें काका धोपेश्वरीं परत गेले.

३५ धोपेश्वराहून श्री रा. दामले वकील यांचे आग्रहावरून २८ दिसेंबर १९०८ रोजीं त्यांचेकडे गेले होते तेवेळीं कोल्हापूर व मलकापूराकडील मंडळी श्रीस नेणेकरितां आली होती. परंतु यावेळीं तिकडे जाण्याचा बेत लांबणीवर टाकला. ठाण्याहून एक श्रींचे भक्त श्रीदर्शनाची उत्कट इच्छा झाल्यामुळें श्रींचे दर्शनाकरितां तातडीनें निघाले व तेच दिवशीं मध्यरात्रीनंतर

सुमारें ३ वाजतां रा. दामले वकीलांचे घरीं पोंचले. तेथें घरापुढील मंडपांत मंडळी गाढ झोंपेनें घोरत पडलेली होती त्यांतच हे ठाणेकर जाऊन निजले. पहांटेस श्रींची स्वारी उठतांच या भक्तानें श्रींचे पायांवर मस्तक ठेवितांच श्री हास्यमुद्रेनें म्हणाले, " काय धांवाधाव ही, आह्मी आजच निघणार " ठाणेकर यांची खरोखरीच झालेली धांवाधांव श्रीचरणीं उमटलेली पाहून त्यास फार कौतुक वाटलें यांत नवल नाहीं. अनेकवेळां असें निदर्शनास येत असें कीं श्रीदर्शनाकरितां येणाऱ्या मंडळींपैकीं कोणी कांहीं विचारण्यापूर्वीच एकदम एखाद्या पारमार्थिक अगर व्यवहारिक गोष्टीसंबंधानें श्रींचें स्फुर्तिरूप भाषण सुरू व्हावयाचें व त्या भाषणांत येणाऱ्या विषयासंबंधानें पृच्छा करावी असा हेतू मनांत धरून आलेला इसम त्या मंडळींत अचुक सांपडावयाचा व तो बहुतकरून लांब गांवाहून आलेला नवीन असावयाचा. जमखिंडीहून एक इंग्रजी पदवीधर गृहस्थ श्रींचे दर्शनास पहांटेस उजेडावयापूर्वी धोपेश्वरीं आले. ४ चा सु ार असेल, मंडळी ओटीवर कांहीं झोंपलेली व कांहीं प्रातःस्मरण करीत बसलेली होती त्यांत ते बसले. स्वारी आंत देवघरांत निजलेली होती. जमखिंडीकरांशीं बोलतां बोलतां, " नामस्मरणासंबंधीं " कांहीं महाराजांस विचारावें म्हणून मुद्दाम आल्याचें त्यांनीं सांगितलें.स्वारी उठल्याबरोबर, सर्व मंडळी श्रींचे समोर बसली, सर्वांनीं श्रीस वंदन केलें, इतक्यांत श्रींची काय जी लहर लागली ते " हरिनामस्मरणापरतें साधनच नाहीं, पण हे हवें आहे कोणास ? " असें म्हणून नामस्मरणावर बराच वेळ सुंदर भाषण केलें. त्याचा परिणाम त्या जमखिंडीकरावर इतका झाला कीं, गोष्ट पटली ह्मणून स्फुंदून स्फुंदून त्यास प्रेमाश्रू लोटले व आश्चर्यचकित होत्साता श्रीकडून उपासना घेऊन मार्गास लागला. पुष्कळ वेळां असें होई कीं, काकांना परमार्थाचे साधनाचा मार्ग विचारण्याकरितां लोक येत. विचारणारा जें साधन करीत असेल तेंच त्यांस काकांनीं सांगावें व नंतर मी हेंच करितों असें त्या पृच्छकानें ध्वनित केल्यावर बरें आहे तर असें काकांनीं म्हटलें ह्मणजे त्यास जो आनंद व ज्या प्रेमाच्या गुदगुल्या होत त्यांचें वर्णन कोणता पामर करूं शकेल ?

३६ रत्नागिरीहून काका निघाले ते जानेवारी १९०९ रोजीं मुंबईस आले. त्यांचे उतरण्याचें घरोब्याचें घर ह्मणजे सांडूंचें. पण ते यावेळेस त्यांनीं श्रींचे आज्ञेवरून घेतलेल्या चेंबूर इस्टेटीवर रहावयास गेले होते. तेव्हां काकांस प्रसिद्ध वैद्य रा. त्र्यंबकशास्त्री धामणकर यांनीं आपलें बिऱ्हाडीं नेलें. काकांचा स्नानसंध्यादिक नित्यक्रम पार पडून स्वारी भोजनाकरितां

पानावर बसून देवास नैवद्य समर्पण करीत होतीं इतक्यांत एक पारशी गृहस्थ बाहेरचे ग्यालरींत येऊन बूट काढून, महाराजांचें दर्शनाकरितां मी आलों आहें, असें म्हणून उभा राहिला. महाराज भोजनास बसत आहेत असें एकानें त्यांस हळूंच सांगितलें, पण असें त्यांस परस्पर सांगून तिष्ठत ठेवण्याची जबाबदारी आपणावर घेणें ठीक नाहीं असें मनांत येऊन ते गृहस्थ आल्याचें वर्तमान काकांस कळविलें. जेवणास आरंभ झाला नव्हता. काका धावळी नेसलेले व डोक्यास शाल गुंडाळलेलें तसेंच उठले व तडक त्या पारशी गृहस्थासमोर येऊन उभे राहिले. त्यानें काकांचे पायांवर मस्तक ठेविलें व हात जोडून तो उभा राहिला. श्रींनीं काय इच्छा आहे असें विचारल्यावरून नुसती दर्शनाचीच इच्छा होती असें तो म्हणाला. " तुमचें काम झालें, आतां मी जाऊं ? " असें काका म्हणाले व घरांत गेले. हे पारशी गृहस्थ रामभक्त असून निरंतर नामस्मरण करणारे आहेत. पुढें चेंबूर मुक्कामीं एक आठवडा राहून काका शींव मुक्कामीं किसनदासशेट यांचे घरीं गेले. तेथें एके दिवशीं सायंकाळीं एक हरिदासबोवा काकांशीं परमार्थविषयक वादात्मक चर्चा करून काकांस म्हणाले, " आपण साधु आहां, आपणासारिखे करिती तत्काळ ' या तुकोबारायांच्या वचनाप्रमाणें मला ब्रह्म करा. " काकांनीं त्यास परोपरीनें सांगितलें कीं, ' ब्रह्म काय वाटेवर पडलें नाहीं, रक्ताचें पाणीं करावें लागतें वगैरे ' पण त्याची कांहीं केल्या समजूत पडेना. तेव्हां काका म्हणाले, " धोतर सोडून लंगोटी घाला, व माझेपुढें मांडी घालून बसा व मी सांगेन तेव्हां उठा " त्यावर तो बोवा कांहीं सबब सांगून उठून चालता झाला. शिवाहून स्वारी ठाण्यास आली. रा. दामले यांचे घरीं ओटीवर काका बसले होते. सायंकाळचे सुमारास ह. भ. पांगारकर पुण्याहून आले. त्यांचेबरोबर रा. उपाध्ये या नांवाचे एक गृहस्थ होते. रा. पांगारकर आपले मनांत असा संकल्प करून आले होते कीं काकांचे दर्शन झाल्याबरोबर त्यांचे पादसंवाहन करावयास मिळावें.पांगारकर ओटीवर येऊन पोंचले तों श्रीस थोडी डुकली लागून ते आडवे झाले होते रा. पांगारकर यांनीं पादवंदन करितांच श्रींनीं जागा झाल्यासारिखें करून आपलें दोन्ही पाय जे आंखडून घेतले होते- ते सरळ होऊन जवळ जवळ त्यांचे हातांतच पडले. पांगारकर यांनीं मोठा प्रसादच झाला असें समजून पाय चेपण्यास आरंभ केला. कृतसंकल्प तडीस गेला म्हणून रा. पांगारकरांसारख्या प्रेमळ भक्तांस अत्यानंद वाटून त्यांचे नेत्रांतून अश्रू वाहूं लागले. वैराग्य व भक्ति या विषयावर चार शब्द श्रींनीं त्यांस सांगितलें.रात्रौ प्रसाद घेऊन श्रींची आज्ञा घेऊन रा. पांगारकर व उपाध्ये पहांटेस ५ वाजतां जावयास निघाले. रा. उपाध्ये हे मुस्तुलिंगेंद्रिय

शास्त्रज्ञ असून श्रींचें उघडें मस्तक त्यांचेजवळ जाऊन पहाण्याची त्यांची इच्छा होती. श्रींचे दर्शनास उपाध्ये गेलें असतां ते नित्याप्रमाणें मस्तक रुमालानें वेष्टिलेलें असें गादीवर बसलेले होते. स्नानाखेरीज कोणत्याही अन्य वेळीं काका डोकीचा रुमाल काढीत नसत. चमत्कारिक गोष्ट अशी कीं, रा उपाध्यें पुढें येतांच काकांनीं रुमाल काढून खालीं ठेवला, व नंतर उपाध्ये यांनी मनसोक्त मस्तक निरीक्षण करून साश्चर्य आनंदित होऊन चालूं लागले. व काकांची कृपा म्हणूनच आम्हांला त्यांचें असें उघडें मस्तक बघावयास मिळालें व आमचें समाधान झालें असें ते म्हणाले.

३७. ता. १ फेब्रुवारी रोजीं काका भुसावळ मुक्कामीं डॉ. परांजपे यांचेंकडे जावयास निघाले. तेथें पालखींतून श्रींची मिरवणूक काढण्यांत येऊन दर्शनाकरितां जनसमूह इतका लोटला कीं, काकांना आपला स्नानसंध्यादिक नित्यविधि उरकण्यास पराकाष्ठेनें फुरसत मिळाली. रात्रीं ९ वाजेपर्यंत दर्शनोत्सुक मंडळींची सारखी गर्दी होती. पुढें जळगांव मुक्कामीं १ वेळ वस्ती करून ता. ३ रोजीं पंढरपूर येथें स्वारी आली. तात्यासाहेब नुलकर यांचेकडे २ दिवस मुक्काम होता. ता ५ रोजीं सकाळीं श्रीविठ्ठलाचे पुजारी बडवे हे उत्तम पोषाख करून बुका, तुळशीच्या माळा, गंध, फूल, पेढे, खडीसाखर वगैरे जिन्नसांनीं भरलेलीं ताटें घेऊन हे सर्व उपहार श्रीस सादर करण्यांत आले आहेत असें म्हणून त्यांचेपुढें ताटें ठेवून हात जोडून उभे राहिले. त्यावर काका म्हणाले, "ईश्वरास अर्पण करावयाचें टाकून मला कशाला हें?" बडव्यांनीं कांहींएक उत्तर न देतां त्या उपहारांनीं श्रींचें पूजन केलें. पूजा समाप्तीनंतर स्वारी अत्यंत सद्गदीत होऊन म्हणाली, 'भगवानाची इच्छा, तेथें काय काणाचें चालावयाचें आहे!" तात्यासाहेब नुलकर शिरडीचे श्रीसाईमहाराजांकडे जाणारे भक्तमंडळींपैकीं एक होते. त्यांचे बंधू वगैरे कांहीं नातेवाईक श्रीकाकांकडे येणारी होती. काकांविषयीं माहिती त्यांस वेळोंवेळीं ऐकावयास मिळे. त्यामुळे काकांविषयीं त्यांस साहजिक प्रेम व आदर उत्पन्न झाला. काकांचें आपणांस दर्शन व्हावें अशी बरेंच दिवस त्यांस उत्कंठा लागून राहिली व समय साधून ती गोष्ट त्यांनीं श्रीसाईमहाराजांचें कानावर घालून त्यांची प्रार्थना केली. त्यावर साईबाबा म्हणाले, "तुम्ही काळजी कशाला करितां? तुमच्याकडे येऊन तुम्हांस त्रिरात्र काकांचें दर्शन होईल." त्याप्रमाणें तात्यासाहेबांकडून काकांस पंढरपूर मुक्कामीं आपलें घरीं येण्याविषयीं सप्रेम आग्रहाचें आमंत्रण करण्याची व्यवस्था झाली. बरेच आढेवेढे घेऊन सरतेशेवटीं "येतों, पण एकच दिवस राहीन, जास्त

आग्रह करूं नका" असें काकांनीं निक्षून सांगितलें. तथापि संतासवें वागण्याची तात्यासाहेबांचे आंगवळणीं पडलेली शिस्त इतकी भारदस्त, विनम्र व सप्रेम कीं काकांचा एक दिवसावर न रहाण्याचा बेत मागें पडून तात्यांनीं जेव्हां सांगितलें कीं " महाराज, मी मोठा अपराधी आहें कीं चरणाजवळ प्रार्थना करावयाची सोडून मीं मूर्खासारिखा मस्तकाचीच विनवणी करितों आहे" तेव्हां त्रिरात्र वास करणें काकांस कबूल करावें लागलें. श्रीसाईबाबांचें आश्वासनहीं तात्यासाहेबांचे प्रतितीस आलें.

३८. पुजारी बडवे यांचे निमंत्रणावरून भोजनोत्तर स्वारी श्रीविठ्ठलाचे दर्शनास सायंकाळचे सुमारास गेली. काका येण्याचे सुमारास मंदिरांत गर्दीच न होईल अशी व्यवस्था ठेविली होती. काका श्रीपांडुरंगाचे समोर बसले व नंतर मूर्तिपुढें उभे राहून देवाचे पायांस हात लावूं लागले. तों पाठीस पोंक असल्यामुळें उंच हात पोंचेना. मग पायांखालीं थोडा आधार घेऊन श्रीपांडुरंगाचे चरणावर आपले हात ठेवून चरण चांचपूं लागले. व कांहीं खूण पटली असा अभिनय करून काका हंसले, व दोन वेळां मान डोलविली. घरीं परतल्यावर मंडळीनें ही गोष्ट विचारतां काका म्हणाले कीं, " नाथमहाराज एकदां म्हणाले होते कीं, जर कदाचित् तुला पंढरपुरास जाण्याचा प्रसंग आला तर पांडुरंगाचे उजवे पायास ( पाउलास ) खळगी आहे ती पहा. " त्याप्रमाणें चांचपून पाहिलें तों खरीच खळगी आहे." रात्रीं श्री अध्यात्मरामायणांतील सुंदरकांडाचा अर्थ श्रीनीं सांगितला. ४।५ तास सारखें वक्तृत्व चाललें होतें. ह्याच कांडाचा अर्थ सांगावा असा आग्रह एका गृहस्थानें धरिल्यावरून अर्थाचा क्रमिक अध्याय सोडून हें काण्ड श्रीनीं सांगितलें. पहिल्या दोन अध्यायांचा अर्थ झाल्यानंतर तिसरे अध्यायास सुरवात झाली असतां सीतादेवीनें मारुतीस असा प्रश्न केला आहे कीं, वानरांची आणि माणसांची संगति झाली म्हणून तूं म्हणतोस, तरी तें होईल तरी कसें ? त्यावर मारुतीरायानीं अग्निसमोर झालेल्या सुग्रीव व प्रभु रामचंद्राच्या शपथेपासूनची हकिकत सांगण्यास सुरवात केली. ती सर्व हकिकत काकांनीं किष्किंधाकाण्डाचे सर्व अध्यायांच्या अर्थाचा सारांश सांगून नंतर सुंदर काण्डांतील चवथ्या व पांचव्या अध्यायांचा अर्थ सांगून पुराण आटोपलें. मौज अशी कीं, त्या काण्डाचा अर्थ सांगा म्हणून आग्रह करणारा श्रोता अवलपासून अखेरपर्यंत निद्रेच्या अधीन होऊन स्वस्थ घोरत पडला होता. पुराण आटोपल्यानंतर श्रीस जें हसूं कोसळलें व मंडळीस जो आनंद वाटला त्याचें वर्णन करणें दुरापास्त होय. पुराण चालू असतां श्रींची ती नखशिखांत आरक्त, टवटवीत मूर्ति, सीताशुद्धिकरितां श्री

मारुतिरायांनीं केलेला अतुल पराक्रम पुराण चालू असतां पुराणिकाचे मुखांतून प्रसंगानुरूप प्रेमभक्तीनें डबडलेली व अखंड स्रोतरूपानें वाहणारी स्पष्ट व खणखणीत अमृतवाणी, त्या वाणीचे प्रवाहांत " अनिच्छन्नपि " ( इच्छा न करितांना ) बळेंच खेंचून तल्लीनतेप्रत पावलेल्या श्रोत्यांच्या वृत्ति, यांचें यथार्थ वर्णन " जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे " असें म्हणणें भाग आहे.

दुसरे दिवशीं श्रीसहवर्तमान सर्व मंडळीं चंद्रभागेचे स्नानास गेली. श्रींनीं कनवटीस असलेले सर्व पैसे एका भिक्षुकास दिले. व नेसलेलें वस्त्र एका भिकाऱ्यानें मागितलें तें त्यास दिलें. सायंकाळीं पंढरीनाथाचे दागिने पाहण्याकरितां बडव्यांनीं बोलविल्यावरून तेथें मंदिराचे जामदारखान्यांत जाऊन सर्व दागिने एक एक हातांत घेऊन श्रींनीं पाहिले. दागिने पाहिल्यानंतर पांडुरंगाचा प्रसाद म्हणून मेवामिठाईनीं भरलेलीं ताटें बडव्यांनीं श्रीस सादर केलीं. ती वेळ देवाचे धुपारतीची असल्यामुळें नगारा व घंटा यांचा गजर सुरू झाला व आपल्या प्रियभक्ताचें स्वागत वाद्यांच्या गजरांत सुमंगल वेळीं श्रीपांडुरंगच करीत आहे असा भास झाला !

३९. ता. ७ फेब्रुवारीं दोन प्रहरानंतर पंढरपुराहून स्वारी निघोन दुसरे दिवशीं सकाळीं पुण्यास आली. रा. हरी विनायक साठे यांचेकडे भोजनोत्तर जाणें झालें. रा. साठे हे साईमहाराजाकडे जाणारे भक्तमंडळांपैकीं होत. साईबाबांनीं काकांचें दर्शन तुम्हांला सहज घडेल, स्वस्थ असा, असें सांगितलें होतें. त्याप्रमाणें अनायासानें दर्शनाचा योग आला. रात्रीचे गाडीनें स्वारी साताऱ्यास जाण्यास निघाली.

४०. दुसरे दिवशीं सकाळीं १० वाजतां साताऱ्यास गं. ती आऊताईकडे श्रींचा मुक्काम झाला. ह्या वेळेस ठिकठिकाणीं एका दिवसापेक्षां अधिक काळ कोठेंही राहिले नाहींत. ज्यास्ती रहाण्याचा आग्रह करण्याच्या भानगडींत पडूं नका असें प्रत्येकास बजावून सांगत. सायंकाळीं पीरवाडीस श्रीनाथमहाराजांचे समाधीचे दर्शनाकरितां गेले. तेथें कोंडिबांनीं " दोन दिवस तरी रहा " असा फार आग्रह केला. त्यावर काका म्हणाले, " रहाण्याची मुळींच सवड नाहीं, तुमचा शब्द मला मोडावा लागत आहे याबद्दल नाथमहाराज काय शिक्षा करितील ती भोगीन, पण आतां राहाणें घडणार नाहीं. " त्यावर कोंडीबा स्वस्थ राहिले. त्याच पावलीं स्वारी साताऱ्यास परतली व रात्रींचे गाडीनें निघून वाठार स्टेशनावर उतरून तेथेंच रात्र काढली. सकाळीं श्री वाग्देव यानीं स्टेशनपासून जवळच अन्तरावर बांधलेली देवाची इमारत पहावयाची असें ठरलेलें होतें. त्याप्रमाणें मंडळींनीं ती इमारत पाहून श्रीस हकि-

कत कळविली. व लगेच १० चे गाडीनें निघून तळेगांव व लोणावळें येथें एकेक वेळ राहून चेंबूर मुक्कामीं ता. १३ फेब्रुवारी रोजीं पोंचली व तेथें दोन दिवस राहून धोपेश्वरीं घरीं गेली.

४१. यानंतर काकांनीं सरतेशेवटची एकच खेप मुंबईस आपण होऊन केली तो प्रसंग पुढें येईलच. मध्यंतरीं काकांच्या दिनचर्येचें जसें दिसलें व समजलें तसें वर्णन करणें ही गोष्ट महत्त्वाची असें वाटून तें येथें देत आहे. जीवन्मुक्त महात्मा कर्मातीत असून विधिनिषेधांचे कडसणींतून पार मोकळा असतो हें शास्त्रसिद्धच आहे. नर जन्माला येऊन प्रापणीय ( प्राप्त व्हावयाचें ) ते प्राप्त झालें, इतिकर्तव्यता झाली, अखंड आत्मानुभवैकरसामध्यें तादात्म्य पावून कृतकृत्यता जरी झाली तरी प्रारब्धवशात् देहपतनापर्यंत प्राप्त पुरुष संसारांत कसा वर्ततो, अथवा—

अथवा कृतकृत्योऽपि लोकानुग्रहकाम्यया ।
शास्त्रीयेणैव मार्गेण वर्तेऽहं का मम क्षितिः ॥

"तस्य कार्यं न विद्यते" त्याला कर्तव्य असें कांहींही उरलें नाहीं तरी पण लोकांवर अनुग्रह करण्याकरितां शास्त्रविहित मार्गानें तो वर्तन करील, पण त्याची त्याला क्षिति नाहीं. असा जो संतांचा व्यवहार त्याचें मूर्तिमंत उदाहरण ह्मणजे श्री काका महाराज हे होत. प्रातःकाळीं उठल्यावरोबर प्रातर्विधि उरकल्यानंतर आपले गुरूंचे पादुकांसमोर मांडी घालून वसून श्रीमच्छंकराचार्यकृत गुर्वष्टक व आणखी कांहीं प्रातःस्मरण अतिप्रेमळस्वरानें म्हणत. नंतर कोणी विद्यार्थी पाठ घेण्यास आला तर त्यास काव्य, व्याकरणाचा वगैरे पाठ देत. काकांचीं स्नानसंध्या वगैरे नित्य नैमित्तिक कर्मं इतकीं निरलस व व्यवस्थितपणें चालत कीं, एखाद्याला असें खचित वाटावें कीं, हा म्हातारा दावसूत्री कर्मठ ब्राह्मण आहे. रामगीता, रामसहस्रनाम व महिम्न हीं नित्य पाठांतलीं असून शिवाय अध्यात्मरामायणांतील निरनिराळ्या कांडांतले मिळून अकरा सर्ग, दररोज क्रमानें येईल त्या सर्गाचा पादुकांस प्राकृत अर्थ सांगणें बाकीच्या उरलेल्यावेळीं अहोरात्र रामायण वाचन, त अगदीं पहाटेस ४।५वाजेपर्यंत व रिकामावेळ राहिलाच तर नामस्मरण अशी दिनचर्या असे. भरज्वानींत काकांनीं, ते लोकांना सांगत " उपासनेंत रक्ताचें पाणी झालें पाहिजे " त्याप्रमाणें आपला देह ईश्वरभजनांत झिजविला व चंदनाप्रमाणें त्याचा जेव्हां परिमल पसरला तेव्हां काकांच्या पायांजवळ एकामागून एक असे दूरवरचे लोक आत्मकल्याणार्थ येऊं लागले. काकांचें शरीर स्वाधीन व कार्यक्षम असेपर्यंत काकांची गुरु ह्मणून सेवा करण्याची सोयच नव्हती.

काकांपुढें मंडळींनीं आतां कांहीं तरी बोलतील, अम्मळशानें बोलतील ह्मणून तासानुतास बसावें, पण हे आंतल्या आंत आपलेपणापासून विभक्त होऊन बाहेर बघतील तेव्हां ? हेतु असा कीं होतांहोईतों कोणी आपणांस चिकटूं नये व कांहीं विचारूं नये. पण अशा व्यवहाराला न डगमगतां व आपली श्रद्धा न चळूं देता जे कोणी तगले ते हळुहळू मार्गास लागले. व यांपैकींहि त्यांच्या वचनांस जे थोडे जागले ते समाधान पावून, प्रपंचांत राहून व तोच परमार्थ-रूप करण्याचें सामर्थ्य श्रीसद्गुरुरायाचे कृपेनें संपादन करून प्रपंच करीत आहेत.

काकांच्या तोंडून वेदान्ताची ठरीव परिभाषा अर्थाच्या अध्यायाचे वेळीं अर्थ सांगताना मुळास धरून येईल तेवढीच. इतर वेळीं साधुसंताच्या गोष्टी मोठया प्रेमानें व आवडीनें सांगत. त्या सर्व गोष्टींचें पर्यवसान अखंड नामस्मरण व सांगितलेली उपासना केल्यावांचून व ईश्वरानें भक्ति-भाव दिल्यावांचून नुसती बडबड करूं नये यांत व्हावयाचं. तात्पर्य काका जसें बोलत तसे असत व “ आधीं केलें आणि मग सांगितलें ” ही समर्थोक्ति त्यांचे ठिकाणीं अक्षरशः सार्थ होती. किंबहुना, जें केलें तें सांगितलें व देहा-वसानपर्यंत अकर्तृत्व बोधानें तें साधक व मुमुक्षु यांना मार्गदर्शक म्हणून करि-तच राहिले. काकांच्या नैमित्तिक कार्यांपैकीं रामनवरात्राचा उत्सव हा मह-त्वाचा वार्षिकोत्सव होता. त्या उत्सवास घरीं आरंभ होऊन ५ दिवस झाले.साहवे दिवशीं नित्याप्रमाणें स्नानास बसले असतां, एकदम बाबुराव यांस हाक मारून सांगितलें कीं, मी आज वाडीस ( पीरवाडीस ) जाणार, आतांच्या आतां तयारी करा. रामनवरात्र अर्धवट सोडून काका जातों म्हणतात हा प्रकार तरी काय ह्मणून घरांतील माणसांस आश्चर्य व चिंता वाटून सर्वांचीं मनें अस्वस्थ झालीं. कुटुंबानीं हें आकस्मिक जाणें कशाकरितां व नवरात्र सोडून जातां हें काय, असें विचारितां “ माझें रामनवरात्र मजबरोबर आहे. ” असा तीस जबाब मिळाला. स्वारी दोनप्रहरानंतर राजापुरीं येऊन पडावांत बसून ता. २९ मार्च १९०९ चै. शु. ८ मी रोजीं चेंबुर मुक्कामीं येऊन दाखल झाली. काका आकस्मिक आल्याचें वर्तमान मुंबई ठाणें वगैरे ठिकाणीं हां हां म्हणतां पसरलें. दुसरे दिवशीं श्रीचे दर्शनास फार गर्दी झाली. रामजन्माचा अध्याय श्रीचे मुखांतून सर्वांस ऐकावयास मिळून रामनवमीचा उत्सव मोठया थाटानें झाला. श्री काकांसारख्या रामरूप भक्तानें अनाहूत आपण येऊन पूर्वसूचना न देतां आपल्या आवडत्या श्रीरामरायाचा उत्सव आपल्या सद्भक्ताकडे केला त्यामुळें रा. सांडूंना आळशावर गंगा या न्यायानें किती आनंद व

धन्यता वाटली असेल व गुरुमाउलीनें निरहेतुक वात्सल्यानें वेळोवेळीं संभाळून बालकाप्रमाणें उपदेशामृताचे घोंट युक्तीनें व केव्हां केव्हां न कळत पचतील तितके कसे पाजिले, व हा परब्रह्माचा उत्सव परब्रह्मानें करून श्रींच्या वात्सल्याची परकाष्ठा झाली, असें त्यांस वाटलें व त्यांचे निमित्तानें इतर सांप्रदायी बंधूंसही वात्सल्याचा व सुखसोहळ्याचा लाभ झाला. या ठिकाणीं रा. बाबुराव ही व्यक्ति कोण याचा खुलासा करणें अवश्य आहे. श्रीकाकांचें चरित्र देतांना जसें श्रीनाथमहाराज, हांडेकरमहाराज यांचे संबंधानें दोन शब्द वर लिहिले आहेत, तद्वत् रा. बाबुरावासंबंधीं माहिती जर न दिली तर हें काकांचें चरित्र अपूर्ण होय. रा. बाबुराव यांचें आडनांव करंवेलकर. हे गृहस्थी वाण्याचे, श्रीमंती भोगलेले, व्यापारी व पेढीवाले हुशार इसम असून, दैवदुर्विपाकानें धंदा बसून ओहटींत सांपडलेले, केवळ पूर्वपुण्याईनें परमार्थाचे भूमीवर वाहून आले. कर्मधर्मसंयोगानें त्यांस श्री काकांचा सहवास घडला. काकांच्या सहवासानें त्यांच्या चित्तांत अशी प्रेरणा झाली कीं यांच्या पायांवर देह अर्पण करून कृतकार्य व्हावें. योगायोग असा कीं, काकांनीं चार पांच वेळां करावयाची ती परीक्षा करून, कसोटीस लावून, ठीक असें जाणून रा. बाबुराव यांस जवळ केला. बाबुराव यांनीं कोणत्याही प्रकारानें आपला खाण्यापिण्याचा व इतर व्यावहारिक संबंधाचा भार काका किंवा त्यांचें संबंधी यांजवर काडीभरही न घालण्याची खबरदारी घेऊन, निःस्वार्थ बुद्धीनें केवळ परमार्थाच्या एकाच दृष्टीनें काकांची जी जवळ जवळ २५ वर्षे तनुमनानें निरलस सेवा केली त्याचें वर्णन करणें कठीण आहे. उपमेनेंच जर तें सांगावयाचें ह्मटलें तर समर्थांचें ते कल्याणच एवढें सांगितलें म्हणजे पुरे. पदरीं असलेला बायकांपोरांचा प्रपंच प्रारब्धाचे खुंटीस लावून श्रीकाकांचे सेवेस आपला देह "गुरूचे घरीं झाडतो, सारवीतो" अशापासून तों स्वारी ८।१० वर्षे वेळोवेळीं बहुत ठिकाणीं हिंडली व बहुत द्रव्य जें लोकांनीं त्यांस अर्पण केलें त्याचा पैनपैचा हिशोब खबरदारीनें, टापटीपीनें व निर्लोभ वृत्तीनें ठेवण्याच्या जबाबदारीचीं कामें करण्यापर्यंत एकनिष्ठ सेवा बाबुरावानें केली व हा एवढा एकच भक्त श्रींनी आपलासा म्हटला श्रींनी अनेक वेळां रा. बाबुराव यांस "तुह्मांस काय पाहिजे" म्हणून विचारावें. त्याचें बाबुरावांकडून एकच उत्तर "माझें कल्याण ज्यांत आहे तें द्या" असें येई. एके समयीं प्रापंचिक याचकांच्या झुंडीच्या झुंडी श्रींचे दर्शनास येऊन जो तो आपआपली सुखदुःखाची रडकथा श्रीपुढें गाऊन व आपलें समाधान करून जाई असें होतां होतां मंडळी पांगली व बाबुराव श्रींचे समोरून सहज जात असतां काका मंडळीस म्हणाले, "हा बाबुरावच काय तो एक समाधानी आहे." तात्पर्य, अशा थाटाची बाबुराव

यांची साक्ष श्रींचे चित्तांत असे. ते हे बाबुराव श्रींचा सहवास दोन तपें पदरांत पाडून वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध होऊन प्रापंचिक आघातांस " निःसारे खलु संसारे वियोगो ज्ञानिनां यदा । भवेद्वैराग्यहेतुः स शान्तिसौख्यं तनोति च ॥ अशा भूमिकेवरून टक्कर देऊन समाधानवृत्तीनें रामायणाचे पठणाचे सहज सुखांत चेंबूर मुक्कामीं " हरि हरि" म्हणत बसले आहेत.

४२ श्री काकामहाराज यांचें एकादशीचें व्रत फारच कठीण असे. तीन दिवस बहुधा तें चाले. व त्याचें मुख्य अंग म्हणजे अहोरात्र श्री अध्यात्म रामयणाची साग्र आवृत्ति पठण करावयाची व ती पुरी झाल्यानंतर द्वादशी सोडावयाची. हें व्रत त्यांनीं शरीर थकेपर्यंत केलें व जेव्हां शरीर अगदीं थकलें तेव्हां उपरिनिर्दिष्ट बाबुराव श्रींस ह्मणाले कीं, आपलें शरीर आतां थकलें आहे व व्रत करणें फार कठीण जाऊं लागलें आहे तेव्हां आपण आज्ञा कराल तर मी हें व्रत आपले कृपेनें पुढें चालवीन. त्यावर श्रींनीं विचार करून उत्तर दिलें कीं बरें आहे करून पहा. त्यावेळेपासून आज तागायत बाबुरावांनीं हें व्रत अव्याहत पाळिलें आहे.

४३ चेंबूर मुक्कामीं श्रीरामजन्ममहोत्सव समारंभ करून काका पीरवाडीस गेले व तेथें चैत्र शु. ७ रोजीं ( १२ एप्रिल १९०९ ) श्रीनाथमहाराजांचे पुण्यतिथीचा समारंभ स्वतः मोठया थाटानें केला व समाधीवर छत्रीवजा पत्र्याचें छप्पर स्वतःचे खर्चानें उभारिलें. साताऱ्याहून ६।७ मैलांवर एक डोंगर आहे. त्याला "शिलोबाचा डोंगर " असें म्हणतात. डोंगराचे माथ्यावर अरुंद असें एक पठार आहे. पायथ्यापासून चढण अतिशय बिकट असून एकच पाऊल ठेवण्याइतकी वाट आहे. ही वाट तरी चढावाचे डावे अंगानें एका डोंगराचाच मळलेला मार्ग असून उजवे बाजूस एकदम ताड दोन ताड पर्यंत सारखा कडा तुटलेला आहे. सराव नसलेल्या माणसाला ही चढण फारच कष्टावह आहे. ही बिकट वाट श्री काकांच्या अनुज्ञेनें रा. विनायकराव नूलकर या नांवाच्या एका सद्भक्तानें याच वेळेस शेंदोनशें रुपये खर्च करून महत्प्रयासानें सुधारून सुकर केली. डोंगराचे शिरोभागीं असलेल्या पठारीवर दोनतीन भल्या लांबलचक शिळा उभ्या आहेत त्यांसच " श्री शिलोबा " म्हणतात. या ठिकाणीं श्रीनाथमहाराज, रावसाहेब व काका यांसहवर्तमान निरंतर दर्शनास येऊन रात्रीच्या रात्री आनंदानें काढीत असत. रा. विनायकरावजींनीं काकांस प्रार्थनापूर्वक विनंती केली कीं, " श्री शिलोबांस " जाण्याची वाट आपल्या कृपेनें तडीस गेली आहे तरी

ती आपण एकदां नजरेखालीं घालावी. याप्रमाणें काकांसह डोंगरावर जाण्याचा बेत निश्चित झाला. सातारचे राजवाड्यांतून काकांकरितां एक सुंदर मेणा व तो वाहून नेणारे आठ कुशल भोई यांची व्यवस्था झाली. श्रीनाथमहाराजांचे निधनानंतर जवळ जवळ तीन तपें इतका काळ लोटल्यानंतर आपल्या आवडत्या " शिलोबा 'स्थानाचें' दर्शन घेण्यास काका निघाले, हें केवळ त्यांच्या भक्ताच्या आवडीचें कौतुकच होय. नाहींतर काकांची प्रकृति अगदीं अशक्त झालेली व वार्धक्यामुळें इतक्या लांबीचा पल्ला झेपण्याइतकें शरीरांत अवसान नसून सुद्धां केवळ मंडळींच्या उत्कट इच्छेमुळेंच हा प्रवास त्यांनीं पत्करला. काकांसह सर्व मंडळी वर जाऊन पोंचली. दोन प्रहर भर बारांचा सुमार होता. काका शिलोबापुढें राहिले व त्यांस प्रेमाचें भरतें येऊन कंठ सद्गदित झाला, व नेत्रांतून अश्रुपूर वाहूं लागले. शिलोबाचे पायावर मस्तक ठेवून, हात जोडून काकांनीं शिव महिम्न स्तोत्राचें पठण केलें. नंतर शिलोबाची पूजा वगैरे सर्व विधि आटोपून मंडळी बसली. शिलोबाचे स्थान अगदीं उघडें असून डोंगराचे पठारीवर एकही असा वृक्ष नाहीं कीं सूर्याचे तापानें संतप्त झाल्यास क्षणभर त्याचे छायेचा आश्रय करून विश्रांति घेतां येईल ! त्याचप्रमाणें वरती कोठेंही असा जलाशय नाहीं कीं जेथें ऊरफोडी डोंगर चढून गेलेल्या व तहानेनें व्याकूळ झालेल्या इसमास घोंटभर पाणी मिळेल ! अशा स्थितींत ऐन चैत्र महिन्यांत भर दोनप्रहरीं उन्हाच्या कडाक्यांत, वर आकाश व खालीं जमीनीवर काकांसहवर्तमान मंडळी तृषाकुल होऊन आतां येथें एवढया मंडळीला पाणी कसें मिळणार अशा विवंचनेंत होती. डोंगर उतरून एका हांकेवर " उरमोडी " नांवाची नदी आहे तिचें पाणी आणलें तर; नाहींतर सर्वांनीं परत फिरण्यापलीकडे गत्यंतर नाहीं. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, आठ इसम डोक्यावर पाण्याचीं गाडगीं घेऊन यांचे समोरच आले व त्या पाण्यावर सर्वांनीं निर्वाह करून " शिलोबाला काळजी " म्हणून, त्याचें स्मरण करीत सर्व मंडळी सोनगांवीं कांहीं वेळ राहून वाडीस परतली. श्रीनाथ शिलोबाचे वर छप्पर करण्याबद्दल प्रश्न निघाला असतां " तूर्त नाथांची मर्जी नाहीं. " असा काकांकडून जवाब मिळाला. त्यांचे पश्चात् कांहीं वर्षांनीं छप्पर करण्यांत आलें. दरवर्षी दसऱ्याचे आदले दिवशीं तेथें उत्सव असतो. ते दिवशीं भाविकजन अहोरात्र " शिलोबाचे " सान्निध्यांत राहून भजन, पूजन, प्रसाद वगैरे करून दसऱ्याचे दिवशीं सकाळीं खालीं उतरतात. पिरवाडी व साताऱ्याहून दर रविवारीं नेमानें जाणारे कांहीं भक्त आहेत. या डोंगरावरून समोरच " श्रीसमर्थ रामदास " यांच्या सज्जनगडाचें दर्शन होतें.

४४या खेपेस श्रीकोंडिबांनीं काकांना सहा महिने पीरवाडीस रहावें व ६ महिने घरीं ( धोपेश्वरीं ) रहावें अशी प्रार्थना केली व ती मान्य करून स्वारी मुंबईस यावयास निघाली. मुंबईहून २१ मे रोजीं बोटीनें घरीं गेले.

काका धोपेश्वरीं गेल्यानंतर ७ महिन्यांनीं पूर्व संकल्पाप्रमाणें पीरवाडीस रहाण्याकरितां सन १९१० चे जानेवारी महिन्यांत मुंबईस आले. ही महाराजांची शेवटची खेप होय. ते मुंबईस दोन दिवस राहून लगेच पीरवाडीस गेले. व श्रीकोंडिबांचे घरांत एका खोलींत राहिले. ज्या ठिकाणीं नाथमहाराजांचे सेवेंत काकांनीं तपेंच्या तपें घालविलीं व ज्या आश्रमांत ते कृतकृत्य झाले त्याच आश्रमांत नाथांचे पश्चात् राहिलेल्या श्रीकोंडिबाप्रभृति अवशिष्ट मंडळींमध्यें अजमासें २५ वर्षांनंतर पुनश्च येऊन राहिले. नित्यकार्यक्रम उरकल्यानंतर काकांची निजाबसावयाची जागा, पूर्वीं जेथें नाथमहाराज बसत तथेंच घराचे ओरींत असे. एका माचावर बसलेली वयोवृद्ध, तपोवृद्ध अशी ती पाणीदार नेत्रविभूषित, सतेज, शांत व गंभीर ज्ञानस्वरूप मूर्ति पाहून नित्य सभोंवार असलेल्या परिवारास व दर्शनास येणाऱ्या इतर जनांस काय आनंद किती सुख वाटत असलें पाहिजे हें वर्णन करून समजण्यासारिखें नाहीं. याच सुमारास, विद्यार्थिदशेपासून तों आज मितीपर्यंत काकांचे चरणीं निःसीम प्रेम असलेले रा. बेडेकर या नांवाचे एक गृहस्थ पीरवाडीस श्रीनाथांचे समाधीजवळ परमार्थाची उत्कट आसक्ति असल्यामुळें, अल्पस्वल्प जी नोकरी मिळेल ती पत्करून राहिलेल्या सर्व वेळांत उपासना करून रहात असत. पहिली परीक्षा उतरल्यानंतर कोल्हापुराहून हे गृहस्थ मुंबईस आले व पोटापुरती नोकरी मिळवून गुजारा करून रहात. काकांच्या अतिशय जुन्या प्रेमी मंडळींपैकीं हे एक होत. काकांच्या जितक्या खेपा मुंबईस झाल्या तितक्या वेळीं सत्पुरुषाची सेवा करण्याची जी एक प्रेमळ हतवटी साधावी लागते ती ह्यांच्यांत निसर्गतःच असल्यामुळें काकांच्या तैनातीस यांनीं वाहून घेतलें होतें. परमार्थ प्रधान व प्रपंच गौण, अशी यांची दृढ समजूत असल्यामुळें, परमार्थाविषयीं आटोकाट प्रयत्न करून प्रपंच प्रारब्धाचे माथीं मारून श्री काकांची सेवा मनोभावानें व निरलसपणानें करणें हीच इतिकर्तव्यता व जन्मसाफल्य अशी यांची वागणूक असे. यांना एक पोटदुखीची व्यथा असे. व तिनें यांच्या पारमार्थिक समजुतीला चांगली मदत केली. त्या सबबीवर अनेक वेळां हवी तितकी रजा घेऊन श्रीसेवेस हे धोपेश्वरीं अगर पीरवाडीस जाऊन रहात. अखेरीस परमार्थानें जोराची उचल केल्यामुळें नोकरीस कायमची रजा देऊन पीरवाडीस श्रीनाथांचे समाधि-

स्थानासंनिध येऊन राहिले. काकाही पीरवाडीस सहा महिन्यांचे मुदतीनें येऊन राहिले, तेव्हां रा. बेडेकरांना अनुकूल असेंच ईश्वरानें घडवून आणिलें. श्रीसान्निध्यांत त्यांनीं बहुत आनंद केला.

४५ पीरवाडीस आल्यापासून यावेळीं काकांचें वागणें श्रीकोंडिबांचे मनोगतानुरूप सुरू झालें खाणें, पिणें, पोथी वाचणें, अर्थाचा अध्याय सांगणें वगैरे हरएक बाबतींत काका हे कोंडिबांचे अंकित आहेत असें भासे. कोंडिबांचें वर्तनही काकांचे शब्दापलीकडे नसे. तेव्हां हा परस्परसंबंध व ही अशी उभयतांची वागणूक यांत कांहीं रहस्य आहे असें प्रत्येकास वाटूं लागलें. काकांचें कोंडिबावर असलेलें पुत्रवत् प्रेम, श्रीनाथमहाराजांचे हे नातू म्हणून त्यांचे ठिकाणीं गुरुकुलोचित आदर व दिवसानुदिवस वृद्धिंगत होत असणारें व स्पष्ट दिसणारें काकांचे कोंडिबाविषयीचें अगत्य ह्या गोष्टींमुळें कोंडिबा हे आपल्यांतले खरे पण सामान्य व्यक्ति नसून कांहीं तरी विशेष प्रकार आहे, असें प्रत्येकास वाटूं लागलें. त्याप्रमाणें मंडळीही हळूहळू जागी होऊन कोंडिबांना श्रीकोंडिबामहाराज म्हणूं लागली. काकांनीं कोंडिबास आपल्यासारखें केलें याची साक्ष त्यांच्या वर्तनावरून, त्यांच्या औदासीन्ययुक्त समाधानी व आनंदवृत्तिवरून, मित पण मार्मिक भाषणावरून व सर्वत्र समदृष्टीवरून पटूं लागली.

४६ काका पीरवाडीस बरेच दिवस रहाणार असें कळल्यावरून गांवोगांवीं असलेली त्यांची भक्तमंडळी तेथेंच येऊन कांहीं काल साधेल तशी राहूं लागली. तीन महिनेपर्यंत त्यांची प्रकृति ठीक होती. पुढें दम, मूळव्याध, घेरी वगैरे अनेक व्याधींनीं आपलें डोकें वर काढिलें हे सर्व रोग कांहीं वर्षांपासून बिऱ्हाड करून काकांच्या शरीराचे आश्रयानें राहिले होते, व त्यांच्या ( काकांच्या ) कलाप्रमाणें आपला पराक्रम दाखवीत. परंतु आतां उत्तरोत्तर 'भोगादेव क्षयः' या न्यायानें यांना मोकळीक देऊन, त्यांचा भोग भोगून, शरीर ज्याचें त्यास देऊन चरित्र संपवावें अशी काकांची मनीषा असल्याचा संशय येऊं लागला, व हा संशय खरा ठरण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. शरीरास बराच त्रास होत आहे असें दिसे. अस्वस्था वाढली. अशा स्थितींत " गण्डस्योपरि पीटिका संवृत्ता " या म्हणीप्रमाणें काकांचे तोंडांत डाव्या गालाचे आंतले बाजूस एक मांसग्रंथी उत्पन्न झाली. या नवीन व्याधीनें फार कष्ट होऊन काका अधिकच थकत चालले. तेव्हां डाक्टर भाजेकरांसारख्या शस्त्रनिपुणास दाखवून कांहीं उपचार करावा या हेतूनें काकांस मुंबईस आणण्यासाठीं सांडूमंडळी पीरवाडीस

गेली व त्यांस घेऊन आली. दोन दिवसांनीं आषाढ शु० १५ गुरुपौर्णिमेचा सुयोग अनायासानें प्राप्त झाला. यापूर्वीं केव्हांही गुरुपौर्णिमेच्या दिवशीं श्रीसद्गुरुमूर्तींची प्रत्यक्ष पूजा करण्याचा कोणालाही योग आलेला नव्हता. पौर्णिमेचा दिवस उगवला. दोन अडीचशेंवर मंडळींचा समूह जमला होता. श्रीगुरूंच्या प्रत्यक्ष पूजेचा सुयोग आल्यामुळें प्रत्येकास तो दिवस भाग्याचा व आनंदाचा वाटला ह. भ. प. सांडूनीं श्रींच्या पूजेचा थाट फारच रमणीय व सद्भक्ताला साजेल असा प्रेक्षणीय केला होता. सर्व मंडळींची पूजा आटपण्यास सबंध चार तास लागले. यासमयीं श्रींचें कुटुंबांसही श्रीसमवेत सिंहासनावर बसवून, श्रीकोंडिबांसही जवळच आसन दिलें होतें. पूजासमाप्तीनंतर महाप्रसाद झाला. त्या दिवशीं मंडपांत ठिकठिकाणीं मंडळींचे जमाव एकत्र बसून पारमार्थिक विषयांची अनेकविध चर्चा करीत आपल्या गुरुभक्तीचे रंगांत दंग होऊन क्षणभर संसाराचे जंजाळांतून व्यतिरिक्त होते. रात्रौ सुश्राव्य हरिकीर्तन झालें.

४७दोन तीन दिवसांनीं डॉ.भाजेकरांस श्रींचे आगमनाची वर्दी देऊन,श्रीस जडलेल्या रोगाची चिकित्सा करण्याविषयीं सांगून त्यांस चेंबूर येथें येण्याविषयीं रा. सांडूनीं विनंति केली. सर्व कामें बाजूस सारून डाक्तर आले. व त्यांनीं श्रीस प्रणिपात करून रोगाची परीक्षा करावयाची ती केली. मध्यंतरीं कांहीं वर्षांपूर्वीं मूत्रकृच्छ्राच्या विकारासंबंधानें डॉ. भाजेकर धोपेश्वरी काकांकडे गेले होते त्याविषयीं चौकशी करितां डाक्तरसाहेबांस असें आढळून आलें कीं काकांचा तो विकार अजून साफ बरा झाला नाहीं. म्हणून थोडी शस्त्रक्रिया करणें अवश्य आहे असें त्यांनीं काकांस सांगितलें. व त्यांची संमति मिळाल्यावर तात्बडतोब शस्त्रप्रयोग करुन काकांना त्या व्याधींतून मोकळें केलें. आतां चिंताजनक असा जो तोंडांत विकार उत्पन्न झाला होता त्याविषयीं डॉक्तरसाहेब काय म्हणतात इकडे लोकांचें लक्ष लागून राहिलें. भाजेकरांनीं सांगितलें कीं ज्याला इंग्रजींत "केन्सर" म्हणतात तो हा रोग असाध्य असून याच्या वेदना फार दु:सह असतात, पण त्यानें महाराजांचा आश्रय केला आहे हें त्यांतल्या त्यांत बरें आहे, शिवाय ते म्हणतात कीं हें दुखणें माझ्या जिवावरचें आहे, याला आपण हात घालूं नये. डॉक्तरसाहेबांस श्रीफळ व वस्त्र आणि कांहीं रुपये प्रसाद म्हणून दिले, व प्रसाद म्हणूनच त्यांनीं त्यांचा अव्हेर केला नाहीं; तात्पर्य डॉक्तरांच्या निदानकालापासून श्रीविषयीं चिन्ता उत्पन्न झाली. अनेक देशी उपाय करण्यास सुरुवात झाली. शेंकडो उपाय झाले असतील. लावण्याचें अगर पिण्याचें औषध पुढें केलें कीं

काकांनीं मुकाटयानें घ्यावें. गुण म्हणून एकाचाही आला नाहीं. प्रकृतिमान विचारणारानें आतां बरें आहेसें वाटतें, असा क्षेम प्रश्न केला कीं, "वा गुण आहे" असें काकांनीं म्हणावें. उलट कोणीं ह्या दुखण्याच्या फार वेदना होत असतील, नाहीं? असें म्हटलें कीं "काय विचारावें? भयंकर वेदना आहेत" असें काकांनीं उत्तर द्यावें. असे महिनेच्या महिने लोटले.

४८ डॉ भाजेकर यांनीं रोगाचें निदान निश्चित केल्यानंतर सात आठ दिवसांनीं श्रीची स्वारी चेंबूर सोडून कोल्हापूर मार्गानें घरीं जाण्यास निघाली. जातां जातां वाटेंत पुणें, पीरवाडी, मिरज, इचलकरंजी, मलकापूर, साखरपें, रत्नागिरी वगैरे ठिकाणीं वाट पहात असलेल्या भक्तमंडळींकडे अल्पकाल वास्तव्य करून धोपेश्वरीं पोंचली.

४९ धोपेश्वरीं आल्यानंतर काकांचा नित्यक्रम पूर्ववत् सुरू झाला. मुख-रोगाचें पाऊलही हळू हळू पुढें पडूं लागलें. औषधोपचारांची गर्दी उडाली. ज्योतिषी, पंचाक्षरी आपापलें शास्त्र पुढें करून रोगशांतीचे उपाय सुचवूं लागले. काकानीं सर्वांस "ठीक आहे" म्हणून वाटेस लाविलें. गणेश उत्सव नवरात्र वगैरे नैमित्तिक उत्सव नित्य परिपाठाप्रमाणें यथास्थित पार पडले. ललितापंचमीचें व्रत काकांकडे मोठया थाटाचें असें. तेच दिवशीं प्रकृति फार बिघडली व सकाळीं १०।११ वाजले तरी काका कांहीं केल्या उठेनात, तेव्हां घरांतील मंडळी घाबरली. पण इतक्यांत एकदम काका उठून बसले व स्नान, पोथीवाचन वगैरे नित्यक्रम आटोपून कुलाचार उत्तम पार पडला. रात्रौ हरिदासाचें कीर्तन झालें. त्या दिवसाचीं सर्व कामें आटपल्यानंतर काकांच्या दुखण्यास जोर चढला. विजयादशमी पदरांत पडली. अशक्तता वाढूं लागली. अन्नद्वेष झाला. शेंपन्नास वेळा विडा कुटून दिला तरी जी खाण्याची तयारी ती शिथिल झाली. फार तर चार पांच वेळ दिवसांतून विडा खात स्वकर्मांत मात्र अजून खंड पडला नव्हता. मात्र अध्यात्मरामायणांतील क्रमवार अध्यायाचा अर्थ सांगण्याचा परिपाठ एकाएकीं सोडून "श्रीरामगीतेच्या" अर्थाला काकांनीं आरंभ केला. यामुळें काका आतां लवकरच स्वधामास जाणार अशी चिन्ता प्रत्येकास वाटूं लागली. प्रथमतः कांहीं दिवस निरूपण मोठयानें सुरेख झालें पण पुढें शब्द खोल व हळू येत चालला. रामगीतेंतील पारमार्थिक सिद्धान्त फारच विशद करून सांगितले.ऐकणाराला असें वाटे कीं,ही अमृतवृष्टी अखेरची आहे ही मोहक वाणी पुनरपि ऐकावयास मिळेल न मिळेल. हा परमार्थाचा उपदेश काका आपली शेवटची भेट म्हणून देत आहेत कीं काय असा संशय येऊं लागला. पुढें पुढें अस्वस्थता फारच वाढली व थोडा भ्रमही

होऊं लागला. ह्या भ्रमाची जात मात्र अशी होती कीं इच्छेस येईल तेव्हां व्यवहार नीट करीत. एरव्हीं भ्रम चालू असावयाचाच. पीरवाडीहून श्रीकोंडीबा काकांस भेटण्याकरितां आले. ते धोपेश्वरीं काकांचे घरीं ज्या माळ्यावर काका निजले होते तेथें येतांच काका उठून बसले व माच्यावरून खालीं ओणवून कोंडीबांची चरणधूली आपले मस्तकावर लाविली, व त्यांस जवळ बसविलें. त्या रात्रीं ते काकांजवळच निजले. दुसरे दिवशीं सकाळीं प्रातर्विधि उरकून कोंडीबा काकांजवळ जाऊन बसले. काकांना त्यांचेजवळ कांहीं एकांतांत बोलावयाचें आहे असें दिसल्यावरून आसपास असलेली सर्व मंडळी दूर झाली. नंतर उभयतांचे बराच वेळ भाषण झालें. नंतर प्रकृति अधिकच क्षीण होऊं लागली. काकांच्या तोंडांतून शब्दही येईनासा झाला, तेव्हां जो तो आपापल्या ठिकाणीं उद्विग्न होऊन बसला. नरकचतुर्दशीचा दिवाळीचा दिवस. तो दिवस तर पार पडला. अमावास्याही उलटली. बलिप्रतिपदा ता. २ नवंबर सन १९१० चा दिवस उजाडला. काकांच्या प्रकृतीचें मान चढत जाऊन भ्रमाचा जोर जास्त झाला. या गडबडींतच एक बाई १८ कोसांवरून काकांकडून दोन अक्षरें मिळावीं म्हणून आली होती. काका तर आतां बोलायचे बंद होऊन अशा स्थितींत पडलेले पाहून तिला फार वाईट वाटून ती रडूं लागली. तिनें धीर करून काकांच्या उशाशीं बसून आपली हकीगत व मनोगत काकांचे कानाशीं तोंड नेऊन निवेदन केलें. व काकांनीं तिला काय सांगावयाचें तें सांगितलें व तिचें समाधान झालें. दुपारीं १० चे सुमारास कोंडिबा धोपेश्वराहून आपले घरीं जाण्याकरितां निघाले. त्यांस पोंचविण्यासाठीं बरोबर रा. बाबुराव करंबळेकर हेही गेले. राजापुरीं रा. भागवत वकील यांचेकडे हे पाहुणे एक वेळ राहून रात्रौ पडावांत बसून कोंडिबा पुढें निघाले. सायंकाळचे सुमारास रा. गोविंदराव सांडू मुंबईहून धोपेश्वरीं आले. त्यांचे क्षेम कुशल काकांनीं विचारलें. भ्रमाचा जोर चालूं होताच, तरी पण मनांत येईल तें करीतच होते. असो.

५० सूर्यनारायण अस्तास गेला. दिवे लागले. रात्रीचे ८ चा सुमार. श्रीची स्वारी आपले आनंदांत निमग्न अशी स्वस्थ पडलेली आहे, वाह्यतः वयपरत्वें जीर्ण झालेला तेजःपुंज पण रोगानें ग्रस्त झालेला अतएव क्षीणतेच्या कोमल छटेनें आवृत असा तो सद्गुरुरायांचा दिव्य देह माचावर शोभत आहे, सभोंवार कांहीं भक्तमंडळी सचिन्त उभी आहे, व आतां पुढें काय प्रसंग ओढवणार हें उघड दिसत होतें तरी, आशा व निराशा यांचे कैचींत

घरांतील मंडळी व बाहेरगांवाहून आलेली सांप्रदायमंडळी घुटमळत होती. श्रींची घालमेल सुरू झाली, पण कांहीं वेळ अगदीं स्वस्थ पडून होते. त्या अवधींत रात्रींचें जेवणखाण उरकून सर्वजण तांतडीनें श्रींचे माचाभोंवतीं जमले. साडेनवांचा सुमार झाला. श्रींची तळमळ सुरू झाली. या कुशी-वरून त्या कुशीवर असे वारंवार अस्वस्थपणानें वळूं लागले पुनरपि प्रकृतीस स्वस्थपणा येऊन डोळा लागतो न लागतो इतक्यांत काका उठून बसण्याचा प्रयत्न करूं लागले. बसण्याची इच्छा आहे असें जाणून काकांच्या ज्येष्ठ व कनिष्ठ मुलांनीं आपल्या आंगावर तोल संभाळून आराम खुर्चीवर बसतात त्याप्रमाणें त्यांस माचावर बसविलें. काकांनीं करुणा भाकण्याकरितां हात उताणे करतात त्याप्रमाणें करून दृष्टी तटस्थ केली व मुखानें " राम, राम " असा घोष सुरू केला व तो इतक्या झपाट्यानें कीं, दुष्काळपीडित अन्नान्न करणाऱ्या इसमास सुग्रास मिळाल्यावर तो जसा त्यावर अधाशीपणानें ताव मारतो, त्याप्रमाणें काका रामनामाचे ग्रासावर ग्रास आधाशीपणानें घेत होते. त्या खडखडीत नामोच्चारानें सर्व घर दणाणून गेलें. ज्या मुखांतून आठ दिवसांत एखादा शब्द मुष्किलीनें बाहेर पडे त्यांतूनच हा नामघोषाचा अखंड प्रवाह दीड तासपर्यंत कसा अस्खलित सुरू होता ? शेवटची वेळ येऊन ठेपली. एक उचकी आली त्यानंतर त्रितीय सवनांत " राम " हीं अक्षरें, अशीच दुसरी व तिसरी उचकी व त्यावर " राम " ह्या दोन अक्षरी मंत्राचा शिक्का मोर्तब करून काकांनीं ओष्ठ मिटले.

रात्रिं सवाअकराला बुधवारीं कार्तिक प्रथम दिवशीं ।
अठराशें बत्तिस शकिं गोष्ट घडे ही अनिष्ट शोच्य अशी ॥

शके १८३२ कार्तिक शु० प्रतिपदेला ( बळिप्रतिपदा ) बुधवारीं रात्रीं ११। वाजतां श्रीसद्‌गुरु रघुनाथमहाराज उर्फ काका पुराणीक यांणीं आपलें पांचभौतिक शरीर विसर्जन करून " यद्गत्वा न निवर्तन्ते " त्या श्रीराम-रायाच्या परमधामाला गेले. परमार्थाचा मार्ग आक्रमण करणाराला " रक्ताचें पाणी करून " अनन्य व अव्यभिचारी निष्ठेनें ईश्वरोपासना केली असतां, तो परमकारुणिक व कृपाळू भगवान् प्रसन्न होऊन उपासकला वैराग्य, भक्ति व ज्ञान ही आपली अमूल्य देणगी देऊन, " भवसागर सब सूक गया है । फकर नही मुजे तरननकी ॥ " असा खंबीर व धीट आत्मविश्वास उत्पन्न करून कसा पैलपार करतो असें निरंतर सांगून भक्तमंडळीला जागृत ठेवणारी जाग-ती जोत आराम पावली ! " सांगितल्याप्रमाणें अंहकार बाजूस ठेवून उपासना निर्धारानें चालवा, कांहीं एक काळजी करूं नका, त्यांत सर्व आहे, " असा त्यांचा शेवटचा आशिर्वादपूर्वक निरोप आहे.

धौपेश्वरीं अवतरे रघुनाथरूप ।
जें ब्रह्म निर्गुण पुरें सगुण स्वरूप ॥
वाग्देवरुद्रनुत जें भवसिंधुपोत ।
वेदी तदांघ्रिरज तद्गुण कीर्ति गात ॥
॥ ॐ तत्सत् ॥

---

# किंचित् वैदिक विचार.

( लेखकः—वामन परशूराम फणसळकर, सातारा ).

अलीकडे कित्येक पंडितमन्य तुटपुंज्या संस्कृत भाषाध्ययनानेंच केवळ कुतूहलानें स्वतःच वेदवेदांगाचें आलोडन करितात आणि त्यांचा अर्थ मनःपूत समजून भलभलतीं विधानें निर्भयपणें करितात. या मासल्याचे कांहीं विक्षिप्त विचार एका त्रैमासिकांत कांहीं दिवसांपूर्वीं माझ्या पहाण्यांत आले, त्यावरूनच मनांत आलेले विचार खालीं नमूद करीत आहें. माझ्या विवेचनावरून त्या विक्षिप्त विचारांचें अनुमान सहज करतां येण्याजोगें आहे. सबब मी त्यांची हजरी येथें घेत नाहीं.

१. वेद हें आर्यांचे मुख्य प्रमाणभूत व अत्यंत पवित्र ग्रंथ असून ते अपौरुषेय अर्थात् पूर्ण आहेत, म्हणून त्यांमध्यें सर्व कांहीं आहे, असाच सर्व आस्तिक आर्यपुत्रांचा दृढ विश्वास आहे. वेदोक्त कर्मानुष्ठान आणि वैदिकविचार यांचा अधिकार फक्त श्रद्धावंत पुरुषांसच आहे.

" श्रद्धालोरेव सर्वत्र वैदिकेष्वधिकारतः "

—पंचदशी ध्यानदीप २४.

२ वेद फक्त पोपटाप्रमाणें पठन करण्याकरतांच आहेत असें एका भ्रमिष्टावांचून दुसरा कोणीहि म्हणत नाहीं. ती नास्तिकाची भाषा आहे. वेद कर्म, उपासना आणि ज्ञान असे त्रिकांड आहेत. कर्मापासून चित्तशुद्धि, उपासनेपासून चित्तैकाग्र्य, आणि ज्ञानापासून मोक्ष असा हा परम पुरुषार्थप्राप्तीचा क्रम आहे. वेदच एक प्रमाण ग्रंथ आहे इतकेंच नव्हे तर तो साक्षात् ईश्वर आहे असाच सर्व आस्तिकांचा दृढनिश्चय असल्याकारणानें वेदांत तत्वज्ञान नाहीं असें कोणास स्वप्नांत सुद्धां वाटत नाहीं.

३ वेद अनंत आहेत त्यापैकीं जितके उपलब्ध जाहले तितके एकत्र करून त्यांचें शाखोपशाखा, कांडें इ० वर्गीकरण श्रीव्यासांनीं केलें. एका वेदाचे चार ग्रंथ याज्ञिकांनीं आपले सोईसाठीं केले नाहींत.

## वेदविभागाविषयीं प्रमाण.

पराशरात्सत्यवत्यामंशांशकलया विभुः । अवतीर्णो महाभाग वेदं चक्रे चतुर्विधं ॥ ४९ ॥ ऋगथर्वयजुःसाम्नां राशीनुद्धृत्यवर्गशः । चतस्रः संहिताः चक्रे मंत्रैर्मणिगणा इव ॥ ५० ॥ तासां स चतुरः शिष्यानुपाहूय महामतिः । एकैकां संहितां ब्रह्मन्नेकैकस्मै ददौ विभुः ॥ ५१ ॥ —भा. स्क. १२ अ ६

श्रीव्यासांनीं एका वेदाचे चार भाग करून ते आपल्या चार शिष्यांस दिले. त्या प्रशिष्यांनीं आपआपल्या भागांचे पुनः पोटभाग करून ते आपआपल्याप्र शिष्यांस दिले. याप्रमाणें वेदविभागाची परंपरा आहे. एका वेदाचे अनेक विभाग करण्याचें कारण असें कीं:—

क्षीणायुषः क्षीणसत्वान्दुर्मेधान्वीक्ष्य कालतः । वेदान्ब्रह्मर्षयो व्यस्यन्हृदिस्थाच्युतनोदिताः ॥ ४७ ॥

अथर्वणवेदांत जारणमारण, उच्चाटन, इत्यादिकांचें प्रतिपादन आहे, परंतु ती आत्म्याची पवित्र शक्ति आहे हें म्हणणें केवळ भ्रम आहे. तें नास्तिक मत आहे.

४ ' वेदांत ' ह्या शब्दाचा अर्थ असा आहेः—वेदस्य–वेदनस्य–ज्ञानस्य अंतः समाप्तिः वेदांतः । याचा अर्थ वेदांत म्ह० जेथें ज्ञानाचा अंत अर्थात् शेवट होतो, म्हणजे जें जाणलें असतां जाणण्याचें म्हणून कांहीं शिल्लक राहत नाहीं, असें जें शास्त्र तो वेदांत होय असें शास्त्र म्हणजे उपनिषदें होत आणि याच अर्थानें उपनिषदांला 'आम्नायमस्तक,' 'वेदशिरः' असें म्हणतात. ' ज्ञानादेव तु कैवल्यं ' अशी वस्तुस्थितिच आहे,व हें ज्ञान उपनिषदाध्ययनानेंच प्राप्त होतें, आणि कैवल्य म्ह. मोक्ष, हीच पुरुषार्थाची पराकाष्ठा असल्यामुळें मोक्षाच्या प्राप्तीनें ज्ञातव्याची इतिश्री होते हें यथायोग्यच आहे. उपनिषदें हें वेदांचें मस्तक असल्यामुळें, वैदिक तत्वज्ञान आणि औपनिषदिक तत्वज्ञान असा भेदच मुळीं करितां येत नाहीं, कारण शिर काय धडाहून भिन्न असतें ? शिराला धडाची आणि धडाला शिराची अवश्यकता आहेच आहे. वेदरूप धड कर्म व उपासना म्ह० साधन सांगतें, तर उपनिषत्रूप शिर ज्ञान म्हणजे साध्य वस्तु सांगतें, एवंच दोन्हीं मिळोन एकच. उपनिषदांत अर्थात् ज्ञानकांडांत मुख्य जीं चार महावाक्यें आहेत, तींहीं वेदांमधूनच घेतलेलीं आहेत, तीं अशीं:—

१ प्रज्ञानं ब्रह्म - हें ऋग्वेदऐतरेयोपनिषत् अ० ३ खंड ५ यांत आहे

२ अहं ब्रह्मास्मि—हें यजुर्वेदबृह० उपनिषत् चतुर्थ ब्राह्मणमंत्र १० यांत आहे.

३ तत्वमसि—हें सामवेद छांदोग्योपनिषत् अध्याय ६ खंड ८ मंत्र ७ यांत आहे.

४ अयमात्मा ब्रह्म—हें अथर्वणवेद मांडयुकोपनिषत् मंत्र २ यांत आहे.

अशी वस्तुस्थिति असतां वैदिक तत्वज्ञान आणि औपनिषत् तत्वज्ञान असा भेद कल्पिणें हा शुद्ध भ्रम आहे. तो सोलीव विक्षिप्तपणा होय.

५ त्याचप्रमाणें ज्या श्रोत्रियांनीं देह झिजवून वेदपठण केलें आणि परधर्मीयांच्या हल्ल्यापासून वेद रक्षण करून वेदांची परंपरा आजपर्यंत अव्याहत राखिली आहे, त्या वेदमूर्तीला पोपटाची उपमा देणें हें सर्वथैव अयोग्य आहे.

६ ' पूर्णमदः पूर्णमिदं, ' ह्या मंत्राचा अर्थ ईश्वर पूर्ण आहे व त्यानें उत्पन्न केलेलें जग पूर्ण आहे असा नाहीं, कारण सृष्टीनिर्माणकर्ता ईश्वर नित्य नाहीं. ब्रह्मा, विष्णु महेश हे जगन्नियंते आहेत, परंतु प्रळयकाळीं त्यांचाही अंत होतो; तेव्हां नाश पावणारी वस्तू पूर्ण आहे असें कसें म्हणतां येईल ? ईश्वर अनित्य आहे याजविषयीं प्रमाणें:—

१ मायाभासेन जीवेशौ करोतीति श्रुतत्वतः॥ कल्पितावेव जीवेशौ ताभ्यां सर्वं प्रकल्पितं ॥

२ मायाख्यया कामधेनोर्वत्सौ जीवेश्वरावुभौ ( पंचदशी )

श्रीसमर्थ म्हणतात—

मही निर्मिता लिहितो सर्व भाळीं । परी लिहितो कोण त्यांचे कपाळीं ।
हरू जाळितो लोक संहारकाळीं । परि शेवटीं शंकरा कोण जाळी ॥
तिन्ही देव जेथोनि निर्माण झाले । तया देवराया सि कोणी न बोले ॥

७ ब्रह्म हें जगाचें उपादानकारण आहे आणि तेंच एक पूर्ण आहे. त्या ब्रह्मापासून उत्पन्न झालेलें जगत्‌ही ब्रह्मानेंच पूर्ण म्ह० ओतप्रोत भरलेलें आहे. उदा० मृत्तिकेपासून उत्पन्न झालेल्या घटादि मृन्मय सृष्टींत आदीं अंतीं व मध्यें उपादानकारण म्हणजे मृत्तिकाच भरलेली आहे, त्याप्रमाणें नामरूपात्मक जग ब्रह्मापासून झालें, व तें ब्रह्मानेंच पूर्ण म्ह० भरलें आहे, असा पूर्ण मदः पूर्ण मिदं ' या मंत्राचा अर्थ आहे.

८ जग भोग्य आहे आणि जीव हा त्याचा भोक्ता आहे—

ईशकार्यं जीवभोग्यं जगद्‌द्वाभ्यां समन्वितं ।
पितृजन्या भर्तृभोग्या यथा योषित्तथेष्यताम् ॥ —पं. द. प्र. ४-१८

याचा अर्थ जग हें ईश्वरनिर्मित आहे, आणि तें त्यानें जीवांच्या भोगाकरतां उत्पन्न केलें आहे, म्हणजे ईश्वरानें उत्पन्न केलेलें स्थलजगत् जीवानें आपल्या मानसिक सृष्टीनें आपल्यास भोग्य करून घेतलें आहे. उदा० बाप

कन्या उत्पन्न करतो, ती कन्या म्हणजे स्त्रीदेहच होय, परंतु त्या स्त्रीदेहावर जांवई ही माझी भार्या असा संकल्प करून ती आपणास भोग्य करून घेतो आणि संसार करितो. जग हें प्रागभाव व प्रध्वंसाभावयुक्त आहे म्ह० तें आदीं नाहीं व अंतींही नाहीं, फक्त मध्येंच दिसतें. जगत्भोग्याचा भोक्ता जो जीव तो जीवही ईशनिर्मितच असल्यामुळें आदीं नाहीं व अंतीं नाहीं. जीव व जगत् मध्यकालीं म्ह० स्थितिकालींच फक्त उपलब्ध होतात, अतएव जगत् जसें मिथ्या तसा त्याचा भोक्ता जीवही मिथ्याच होय. तो पूर्ण कसा असूं शकेल ?

९ आणखी जीव पूर्ण नाहीं ह्या म्हणण्याला प्रत्यक्ष प्रमाणेंही पण आहेत. उदा० वर्तमानकाळीं उपलब्ध झालेलीं साधनें म्ह० आगगाडी, मोटार, बायसिकल, तारायंत्र, बिनतारेचें तारायंत्र, इत्यादिकांचें ज्ञान आपणा जीवांला मागील काळीं होतें काय ? वनस्पतीला म्ह० उद्भिज सृष्टीला मनुष्याप्रमाणेंच सुखदुःखें होतात हें ज्ञान तरी परवांपर्यंत आपल्यास होतें काय ? खनिज पदार्थांतहि चैतन्य असतें हें ज्ञान तर अगदीं नुकतेंच झालें आहे. सर अलिव्हर लॉज हे आधुनिक शास्त्रज्ञ रोज नवीन नवीन शोध लावीत आहेत हें कोणास माहीत नाहीं ? या प्रकारचा आपला अनुभव असून मनुष्य पूर्ण आहे असें म्हणणें हा शुद्ध वेडेपणा नव्हे काय ?

वरील विवेचनावरून स्वयंपंडित-प्रति-निविष्ट विद्वान म्हणविणारे कसें बहकतात हें श्रद्धालु पुरुषांचे लक्ष्यांत येईल, तर त्यांनीं असल्या निराधार व स्वकपोलकल्पित विधानांनीं खऱ्या शास्त्रार्थाविषयीं आपली दिशाभूल होऊं देऊं नये. ॐ तत्सत् ।

---

# देह विटाळाचा गोळा पण परमपुरुषार्थद आहे.

लेखक:--वामन परशुराम फणसळकर, सातारा.

१ हें मानवी पांचभौतिक शरीर म्हणजे, शुक्र, शोणित, पूय, विण्मूत्र इत्यादि बीभत्स द्रव्यांचा ईशकृत पंजर आहे.ही कांहीं कादंबरी किंवा कल्पित सुरस गोष्ट नाहीं, किंतु प्रत्यक्ष प्रमाणसिद्ध [ चक्षुर्वै सत्यं ] गोष्ट आहे, हें डोळे उघडे ठेवून पाहाणारास सांगण्याची जरूरी नाहीं. त्यांना ती तशी दिसत नसेल ते डोळे असून अंधळे व कान असून बहिरे या कोटींपैकीं असले पाहिजेत. देह स्त्रीपुरुषांच्या शुक्रशोणितापासून बनलेला नाहीं काय ? देहांत अस्थि, त्वचा, नाडी, मांस, रक्त, रेत, पूय, विष्टा, मूत्र, रोम, नखें या-शिवाय अन्य काय आहे ? नित्य प्रातःकाळीं उठल्याबरोबर आपला अनुभव काय सांगतो ? पहा ! मुख लाळश्लेष्मादिकेंकरून अत्यंत घाणेरडें, डोळ्यांत चिपडें, नाकांत शेंबूड, कानांत मळ, हेंच मुखकमळ ना ? भागीरथीच्या पवित्रोदकाची, उत्तम सौगंधिक देहसंगानें लघुशंका होते ! २५० रुपये खिचडीच्या भोजनाची विष्टा होते ! शरीर म्हणजे व्याध्यादिकांचें वसतिस्थान नव्हे काय ?

[ १ ] वातपित्तश्लेष्मजन्यव्याधयः कोटिशस्तनौ ।
दुर्गंधित्वं कुरूपत्वं दाहभंगादयस्तथा ॥

—पं. द. तृ. दी. श्लोक. २२४

[ २ ] यदस्थिभिर्निर्मितवंशवेश्य-स्थूणं त्वचारोमनखैः पिनद्धं ।
क्षरन्नवद्वारमगारमेतद्विण्मूत्रपूर्णं मदुपैति कान्या ॥

[ ३ ] त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जास्थिसंहतौ ।
विण्मूत्रपूये रमतां कृमीणां कियदंतरम् ॥

शिवाय श्रीभर्तृहरीनें म्हटलेंच आहे कीं,
मुखं श्लेष्मागारं तदपिच शशांकेन तुलितं

स्त्रीच्या मुखांतील लाळेला अधरामृत म्हणणाऱ्या चार्वाकादिकांनीं म्ह. देहात्मवाद्यांनीं हा देह उत्तम संपूर्ण आहे म्हणावें हें युक्तच आहे !

२ पंचदशीकार सांगतात कीं, अखंडैकरस ब्रह्माचा अनुभव निर्विकल्प समाधींत होतो हें ऐकतांच माध्यमिक शून्यवाद्यांची स्थितिः--

मग्नस्याब्धौ यथाऽक्षीणि विव्हलानि तथास्य धीः ।
अखंडैकरसं श्रुत्वा निष्प्रचारा बिभेत्यतः ॥ [ महा० वि० २७ ]

अशी होते ! याचप्रमाणें विषयकर्दमांत लोळणारे, देहाचे चोजले करणारे, ग्राम्य सुखांत कृमीप्रमाणें रममाण होणारे जे चार्वाकभक्त त्यांस देहासक्ति-त्याग, वैराग्य, एकांतवास, समाधि, आत्मानंद इ. इ. शब्द कानीं पडतांच अंगांत कांपरें भरून बुजल्यासारखें होतें ! आणि मग ते मनास येईल तसें बरळत सुटतात. त्यांना जग म्हणजे नंदनवन आणि देह म्हणजे पवित्र आश्रम असें दिसूं लागतें !

श्री आचार्य विचारतातः--

खादते मोदते नित्यं शुनकः सूकरः खरः ।
तेषामेषां विशेषः को वृत्तिर्येषां तु तैः समा ॥

३ आणखी ज्या तत्वज्ञान्यांनीं आणि साधुसंतांनीं देहाला 'विटाळाचा गोळा' म्हटलें आहे, ते अंगाला राख लावून सारेच कांहीं जंगलांत फिरत नव्हते. जनक, भगीरथ, प्रतार्दिन् इ. राजे राज्य करित होते. वशिष्ठ, विश्वामित्र, अत्री, भरद्वाज, इ. ऋषींनीं दारापरिग्रह केला होता. अलीकडीलही एकनाथ, नामदेव, तुकाराम, कबीर,तुळसीदास इ. संत गृहस्थाश्रमी होते. श्री समर्थ रामदासस्वामी व त्यांचे पंचायतन यांनीं कांहीं देहाची उपेक्षा करून देह काष्टासारखा वाळविला नव्हता, अगर ते निराहारीही न हते. देहाविषयीं श्री तुकारामबोवा म्हणतातः—

कथेची सामग्री । देह–अवसानावरी ॥ नको जाऊं देऊं भंगा ।
गात्रें माझीं पांडुरंगा ॥

* * *

तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥

श्री समर्थ म्हणतातः--

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धितें ॥ दा० १-१० ॥

४ देह हा पुरुषार्थप्राप्तीचें प्रथम मुख्य साधन आहे हें सर्वांस कबूल असून देहास 'विटाळाचा गोळा' म्हणणाऱ्यांपैकीं कोणीही त्याबद्दल विवाद करीत नाहींत, परंतु देह मोक्षाचें साधन आहे याचा अर्थ देहाची बडेजाव करावी, देहभोगार्थ सर्व आयुष्य खर्चीं घालावें, देहयात्रा उत्तमप्रकारें चालवावी व तोच काय तो मनुष्याचा अंतिम पुरुषार्थ होय असा होत नाहीं. देह परमार्थाला साधक आहे, याकरितां ज्याप्रमाणें मोतीं संभाळण्याकरतां चिंधी

बाळगणें अथवा पुष्पहार धारण करण्याकरितां गळ्यांत सूत धारण करणें त्याप्रमाणें परमपुरुषार्थ साधण्याकरितां देहाची जोपासना करणें आहे; ग्राम्य भोग भोगण्याकरितां नव्हे. विषयांचा यावदर्थ परिग्रह केला असतांहि देह-यात्रा चालते, म्हणून अवश्य तेवढेंच साधनार्जन करून देहनिर्वाह करावा, विषयोपभोगांत मनानें बुडून जाऊं नये. देह नश्वर आहे हें सदा डोळ्यांपुढें असावें, मन विषयासक्त होऊं देऊं नये.विषयभोगानें प्रमत्त होऊं नये, मर-णाचें सदा स्मरण राहावें इ. इ. उद्देशानें देह ' विटाळाचा गोळा '—असें व्यंजनोक्तीनें म्हटलं आहे. वेद आप्त म्हणजे यथार्थवादी आहेत, ते देहाची प्रशंसा करून देहाला ' सप्तऋषींचा आश्रम ' असें परमार्थतः कसें म्हणतील? मूर्त अमूर्त, मर्त्य अमृत, चंचल स्थिर, परोक्ष अपरोक्ष, अशीं ब्रम्हाचीं दोन रूपें आहेत. वेद परोक्षप्रिय आहेत. ते अमूर्त ब्रह्माचें वर्णन परोक्ष रीतीनें करितात. पहा. बृहदारण्यकोपनिषत् अध्याय २ ब्राह्मण २।३.

इंद्रियाला ऋषी म्हटलें आहे तें औपचारिक आहे. त्याचा अर्थ इंद्रियांचे लाड पुरवावेत अथवा इंद्रियाधीन व्हावें असा नाहीं.तें फक्त रूपक आहे.इंद्रिया-संबधीं प्रत्यक्ष विचार सदर उपनिषदान्या ब्राह्मण ३ यामध्यें सांगितला आहे. चार्वाकसांप्रदाय असा आहे कीं स्वकपोलकल्पित आपल्या लाडक्या मताच्या-पुष्ट्यर्थ वेदांतील प्रत्यक्षाभास वाक्यें प्रमाण म्हणून दाखवून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकणें. उदा. ' देहच आत्मा ' हें तत्व श्रुतीला प्रमाण आहे असें दाखवि-ण्याकरतां चार्वाक ' स वा एष पुरुषोऽन्नरसमयः ' ( तै० २–१–१ ) ' आ-त्मैव देहमयः ' हा विरोचनाचा सिद्धांत प्रमाण दाखवितात व आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ

वाक्यान्यपि यथाप्रज्ञं दाढर्यायोदाहरंति हि ॥

पं. द. चि. दी. १०४

चार्वाक सांप्रदायिक कशी हातचलाखी करतात पहाः—

ईशवास्योपनिषदांतील " तेन त्यक्तेन भुंजीथा मागृधः कस्य स्विद्धनं " या मंत्राधांतील ' त्यक्तेन भुंजीथा " एवढेंच अवतरण घेऊन त्याचा अर्थ आप-ल्याला अनुकूल करतात, परंतु " मागृधः कस्य स्विद्धनं " या मंत्राचा अर्थ असा आहे कीं, सर्वत्र ईश्वररूपच आहे अशा भावनेनें दृश्य जगताचा त्याग होत असल्यामुळें दृश्याविषयीं मिथ्याबुद्धि अर्थातच होते. तस्मात् मिथ्या-वस्तूविषयीं आकांक्षा करूं नको म्हणजे साभिलाषानें भोगाची इच्छा करूं नको.

ऐसे विचारें ओळखोनि । निवांत व्हावें अभिमान त्यागुनि ।

मग कर्में घडतीं तीं देहालागुनि । घडोत सुखें ॥

—श्रीहंसराजस्वामी

वेदवाक्याचा अर्थ पूर्वापर संबंध पाहून करावा लागतो.

इंद्रियांना वेदांनीं सप्तऋषी म्हटलें आहे ही उत्प्रेक्षा आहे, कारण

पराचिखानि व्यतृणत्स्वयंभूः । कठो. ४- १

याचा अर्थ ब्रह्मदेवानें इंद्रियें बहिर्मुखच निर्माण केलीं आहेत, हीं इंद्रियें फसवीं आहेत, तीं मनुष्याला खोटें ज्ञान करून देतात.

६ आपलें शरीर व इंद्रियें याबद्दल प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता साक्रेटीस म्हणतोः—" ज्ञानार्जनास आपलें मानवी पांचभौतिक शरीर साह्य करितें किंवा प्रतिक्षणीं प्रतिरोध करितें वरें ?—म्हणजे आपलीं नेत्रकर्णादि इंद्रियें आपल्याला विषयांचें खरें ज्ञान करून देतात किंवा खोटें ? आजपर्यंत कवी व तत्वज्ञ आपल्याला सांगत आले आहेत कीं, आपलीं हीं नेत्रादि इंद्रियें बाह्य गामी असून सदैव अस्पष्ट व अयथार्थ ज्ञान देणारीं आहेत. नेत्रकर्णादिकांची जर अशी गोष्ट आहे तर इतर इंद्रियें काय करितात हें सांगणेंच नको. नेत्र व कर्ण हीं श्रेष्ठ इंद्रियें आहेत हें तुम्हांला मान्य असेलच तर मग जिवात्म्याला खरें ज्ञान केव्हां होईल ? बरें देहाचीं संगती ठेवून ज्ञान संपादन करावें म्हटलें तर शरीरही फसविणारेंच आहे, हा आपला प्रत्यक्ष अनुभव आहे; तेव्हां अस्तित्वाचें ( सद्वस्तूचें ) यथार्थ ज्ञान विचारदृष्टीनें मात्र होईल असा संभव आहे. शब्द, स्पर्श, सुख, दुःख, आशा, इत्यादिकांस निवृत्त करून केवळ आणि शुद्ध सद्भावाचा विचार जीवानें केला तरच त्याला यथार्थ ज्ञान होईल, म्हणजे तत्त्वज्ञाला शरीराची मुळींच किंमत नसते, त्याचा आत्मा नेहमीं चिंतींत असतो कीं, शरीरापासून विभक्त राहून आपण स्वरूपचिंतनांत मात्र कालक्षेप करावा आणखी ज्याला आपण न्याय म्हणतों तो शुद्धस्वरूपांत असतो किंवा नसतो ? तसेंच, शुद्ध सौंदर्य, शुद्ध कल्याण ( निःश्रेयस् ) असें कांहीं आहे कीं नाहीं ? शुद्ध न्याय, शुद्ध सौंदर्य, अथवा निश्रेयस् यांचीं स्वरूपें तुम्हीं आम्हीं कधीं प्रत्यक्ष म्हणजे नेत्रादि इंद्रियांनीं पाहिलीं आहेत का ? खचित नाहीं. कारण इंद्रियांचें तें कामच नव्हे. याकरितां शुद्ध महत्व, शुद्ध आरोग्य, शुद्ध बल, सारांश प्रत्येक पदार्थाचें शुद्ध स्वरूप इंद्रियांना कळणें सर्वथा अशक्य आहे. तर मग आपल्याला अर्थात् असें म्हटलें पाहिजे कीं,—पदार्थाचें शुद्ध मूळ स्वरूप जाणून घेण्याची इच्छा करणाऱ्या तत्वज्ञानें आपल्या शुद्ध बुद्धिचा मात्र अवलंब एकाग्रतेनें केला तरच त्याला मूळ स्वरूपाचें कांहीं ज्ञान झालें तर होईल. शुद्ध स्वरूपज्ञान होण्यासाठीं शुद्ध बुद्धीचा मात्र आधार घेणें इष्ट आहे, येथें नेत्रकर्णादि इंद्रियांचा यत्किंचितही प्रवेश होऊं देणें म्हणजे महत्पाप आहे."

तात्पर्यः—मानसिक शुद्ध चैतन्याचे द्वारानें मात्र मूळ स्वरूपाचें ज्ञान होतें. एवंच भलत्या मार्गानें जाण्याची प्रवृत्ती उत्पन्न करणाऱ्या आणि फसव्या नेत्रकर्णादि इंद्रियांचा व शरीराचा होतां होईल तितका संसर्ग कमी केला तरच ज्ञानविरोधी प्रसंग पुष्कळ अंशांनीं विनष्ट होतील असें विचारांतीं ठरतें.

७ याप्रमाणें बहिर्मुख इंद्रियादि संघाताची म्हणजे शरीराची संगति शक्य तितकी नियमित करून केवळ शुद्ध मनानें जो पदार्थाचें स्वरूप पहातो तोच खरा तत्वज्ञ होय, त्याला मात्र यथार्थ ज्ञान होईल. शरीरसंगति प्रेमानें आदरणाऱ्या संसाऱ्याला यथार्थ ज्ञान होण्याची आशाच नको. प्रत्येक तत्वज्ञ व शोधक असेंच म्हणेल कीं, जोंपर्यंत आम्ही शरीरी आहों, शरीरगत सुख-दुःखाला लगटून राहिलों आहों, तोंपर्यंत स्वरूपज्ञानाची प्राप्ति करून घेणें ही जी आमची प्रधान इच्छा ती कधींही या शरीरसंगतीनें पूर्ण होणार नाहीं. कारण शरीर आहे तावत्कालपर्यंत आम्हांला क्षुधादि विकारांची, ज्ञान-विरोधी विकारांची, बाधा व्हावयाची हें निश्चित आहे. शरीर म्हणजे हजारो रोगांचें माहेरघर आहे. शिवाय असल्या नित्य रोगवश असणाऱ्या शरीराच्या संगतीला राहून सद्विचार सुचणें अथवा स्वरूपाचें चिंतन निराबाधपणें चालणें शक्य नाहीं. शरीर असल कीं नाना प्रकारच्या वासना, भावना, मनीषा, भयें इत्यादिकांची वरती कायमची असावयाची; तेव्हां शारीरिक विकार व शारीरिक भावना यांची गर्दी जेथें आहे तेथें आपलें मन शुद्ध राहणार तरी कसें ? कदाचित् राहिलेंच तर त्याला शुद्ध विचार सुचणार तरी कसे ? शारीरिक प्रपंचाला भुलून वेडा झालेला संसारी विचारापासून परावृत्त होतो यांत कांहीं आश्चर्य आहे काय ? आणखी पहा. संसारांत, समाजांत किंवा राष्ट्रांत जीं मतें व मतांतरें दृष्टीस पडतात, जे कलह होतात, जे पक्ष जन्मास येतात, भारतीयुद्धें होतात, त्या सर्वांचें मुख्य कारण काय हें पाहिलें तर, द्रव्याचा अभिलाष होय असें दिसेल आणि हा अभिलाष आणि ही मूढ करणारी भावना तरी कां होते तर शरीर व त्याचे लाड पुरविणें हें ससारी पुरुषांचें ध्येय असतें म्हणूनच ना ? अशा नाना प्रकारें आपण शरीराचे दास बनल्यावर आपल्याला विचार करण्याला वाव आणि ज्ञानार्जन करण्यांला एका क्षणाची तरी फुरसत सांपडेल काय ? आणि सांपडली तरी शरीरमोहानें वेडे झालेल्या आपल्या मनाला विचार करण्याची पात्रता तरी येईल काय ? खचित नाहीं.

८ मित्रहो, इतक्याही अडचणी सोसून आपण विचाराला बसलोंच तरी शरीर व त्याचे विकार आपल्याला क्षणभरही स्वस्थ विचार करूं देणार नाहींत ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. तेव्हां शुद्ध ज्ञानाची आणि शुद्ध विचार करण्याची जर तीव्र इच्छा असेल तर तत्वशोधकानें शरीराची आस्था व शरीराची संगति

( आसक्ति ) सोडूनच दिली पाहिजे. तात्पर्य, जो तत्वबुभुत्सु आहे त्यानें शरीराची आस्था, शरिरावरील प्रेम, शारीरिक उपभोगाला उपयोगी पडणाऱ्या गोष्टींचें चिंतन हें होतां होईल तितकें कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या प्रयत्नांला सिद्धि येते ती केवळ इंद्रियजयानें. त्याकरितां इंद्रियजयाचें व्रत अखंड चालविलें व स्वरूपचिंतन एकाग्रतेनें केलें तर मूळ स्वरूपाचें यथार्थ ज्ञान कांहीं अंशानें तरी होईल. शिवाय इंद्रियांना मनाच्या साहाय्यावांचून पदार्थांचें ज्ञान कोठें होतें ? मनासहित इंद्रियांचा विषयांशीं संनिकर्ष जाहला तरच विषयांचें ज्ञान होतें, नाहींतर होत नाहीं. उदाहरणः—आपण वाटेनें जातांना अनेक पदार्थ पाहातों व अनेक शब्द ऐकतों, परंतु घरीं आल्यावर त्यांचें स्मरण राहत नाहीं, कारणः—

अन्यत्रमना अभूवन्नादर्शमन्यत्रामना अभूवन्नाश्रौषम् ।

—बृहदारण्यक.

म्हणजे माझें मन जाग्यावर नव्हतें म्हणून मीं पाहिलें नाहीं, माझी बुद्धि ठिकाणावर नव्हती म्हणून मीं ऐकिलें नाहीं, असें पुरुष म्हणतो याचा अर्थ मनाविना इंद्रियांना विषयाचें ज्ञान होत नाहीं. म्हणून अशा परावलंबी व फसव्या इंद्रियांना ' ऋषी ' म्हणणें ही फक्त अलंकारिक भाषा आहे, हें उघडच आहे.

९ मन,बुद्धि व वाणी यांना अगम्य असलेलं वेदरहस्य देहात्मवादी जो आहे त्याला आकलन होणें कठीणच आहे. वेदांच्या ज्ञानाबद्दल पंचदशीकार म्हणतातः—


गुरुशास्त्रं विनाऽत्यंतं गभीरं ब्रह्म वेत्ति सः । यो. नं. श्लो.—७८

म्हणजे अत्यंत गंभीर असें ब्रह्म म्हणजे वेदांचा प्रतिपाद्य विषय—वेदाचें रहस्य—तें गुरुमुखांतून श्रवण, पठन, मनन इत्यादि साधनावांचून कोणासही प्राप्त होणें अशक्य आहे तात्पर्य, देह हा जरी ' विटाळाचाच ' बनलेला असला तरी तो परम पुरुषार्थप्राप्तीचें साधन आहे व जेथें जेथें देहाची स्तुती केली आहे तेथें तेथें केवळ ह्याच अर्थानें होय हें लक्षांत ठेवून मुमुक्षु साधकांनीं देहरक्षण परमार्थप्राप्तीचा प्रधान हेतु याच उद्देशानें करावें, अर्थात् देह हा विदेहकैवल्य प्राप्तीकरितां आहे, केवळ विषयभोगाकरितां नाहीं ही गोष्ट नेहमीं जागरूक ठेवून प्रमत्त होऊं नये, किंतु सर्व योनींत साधारण असलेले स्त्रीपुत्र-वित्तादिक संपादन करण्यांत व ते भोगण्यांत आयुष्याचा सर्वस्वी व्यय न करितां या अत्यंत मलिन व अध्रुव देहाच्या सहायानें ध्रुव व ' यद्गत्वा न निवर्तते अशा धामाची जोड करून घ्यावी, हीच नरदेहाची इति कर्तव्यता होय.

ग्रंथ संग्रहालय

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें। संसारीं होइजे निराळें।
मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| पुरें वर्ष १८ | चैत्र वैशाख जेष्ठ १८४७ | नवें वर्ष ५ वें |
| म ८।९।१० | एप्रिल मे जुन १९२५ | अंक ४।५।६ |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



**वार्षिक वर्गणी रु. ३ व टपालहशील रु. ३८३**

मुद्रकः–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३००
येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

# मुमुक्षुवाचकांस:—

एप्रिल, मे व जून ह्या तीन महिन्यांचा हा जोड अंक निघत आहे. पहिले बाजीरावसाहेब पेशवे यांचे आश्रयानें उदय पावलेल्या राजकार्यकुशल अशा एका थोर सत्कवीनें ‘ श्रीज्ञानेश्वरीविजय ’ नामक हजार श्लोकांचा एक श्लोकबद्ध ग्रंथ लिहिलेला संपूर्ण ह्या अंकांत दिला आहे, व ह्यामुळें गद्यलेख कोणताही देण्यास जागा राहिली नाहीं. एक प्राचीन संतचरित्रपर सुंदर ग्रंथ वाचावयास मिळा ल्याबद्दल वाचकांस संतोष वाटेल अशी आह्मांस उमेद आहे, व शिवाय जुन्या प्राचीन कवितेच्या जीर्णोद्धारासारखें पुण्यकार्य रखून मधून करणें हे मुमुक्षूनें आपलें कर्तव्य ठरविलेलें प्रसिद्धच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अमृतानुभव व त्यावरील भगवद्भक्त प्रल्हादबोवा बडवे यांची समश्लोकी हा अर्धवट छापावयाचा राहिलेला ग्रंथ यथावकाश पुरा करतां येईल. दरमहा आठ पृष्ठें देतां येतील पुढील म्ह० जुलईच्या अंकांत श्री० धुंडिराजमहाराज सं० देगलूर यांचा ‘ अवतारमीमांसा ’ हा सुंदर लेख येणार असून तो जुन्यानव्या सर्व वाचकांस फार आवडेल असा भरंवसा वाटतो. ‘ श्रीसमर्थसंजीवनी ’ व ‘ सार्थ मनोबोध ’ हे ग्रंथ लोकांस फार आवडल्याचें पाहून आम्हांस समाधान वाटतें. वाईची ‘ प्राज्ञ पाठशाळा ’ व तळेगांवचें नवीन ‘ समर्थविद्यालय ’ ह्या दोन्ही राष्ट्रीय विद्यालयांनीं ‘ संजीवनी ’ आपल्या शाळांतून लावली आहे. आमचा नवीन एक महत्वाचा ग्रंथ चालू आहे तो चार महिन्यांत प्रगट होईल व नंतर ‘ श्रीसमर्थचरित्रास ’ हात घालावयाचा आहे. त्या ग्रंथाविषयीं वाचक उत्सुक झाले आहेत असें पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसतें; पण आणखी दीड वर्ष त्यांनीं दम धरिला पाहिजे. ‘ श्रीसमर्थचरित्र ’ व ‘ श्रीनामदेवचरित्र ’ हीं दोन चरित्रें पुढील तीन वर्षांत व्हावींत असा अंदाज आहे. संतसज्जनांच्या आशीर्वादानें हें कार्य निर्विघ्नपणें पार पडेल अशी उमेद आहे. मुमुक्षू आपल्या कार्यातच निरंतर मग्न असल्यामुळें जोड अंक क्वचित् निघाल्यास सुज्ञ वाचक क्षमा करितील यांत संशय नाहीं. हें कार्य लोकांचें आहे. व ‘ मुमुक्षू ’ लोकांचा सेवक आहे, ‘ न्यून ’ पडल्यास क्षमा करणें हें सज्जनांचें व्रत आहे.

# निरंजनमाधवांचा कवितासंग्रह.

भाग दुसरा.

## श्रीज्ञानेश्वरविजय.

हा ग्रंथ.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

संपादक ' मुमुक्षु ' पुणें.

यांनीं संशोधिला, संपादिला व प्रकाशिला.

वैशाख शके १८४७ मे १९२५.

किंमत बारा आणे.

प्रकाशकः - लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.
' मुमुक्षु कचेरी, ' पुणें शहर.

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे, ' हनुमान '
प्रेस घ. नं. ३००, सदाशिव पेठ, पुणें शहर.

ग्रंथ संग्रहालय



# प्रस्तावना.

ज्ञानेशो भगवान्विष्णुर्निवृत्तिर्भगवान्हरः ।
सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥

१ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्राचें सर्वांत प्राचीन प्रमाण म्हणजे **नामदेवांचे ' आदि ' व ' समाधि '** ह्या दोन प्रकरणांवरील अभंगांत जें सांपडतें तेंच होय. नामदेवांचे हे आदीचे व समधीचे अभंग एकंदर २६६ आहेत. हे चारचरणी नसून एकेका अभंगांत पंधरावीसपर्यंत व अधी-कही चरण आहेत. आदिप्रकरणांत ज्ञानेश्वरादि चारी भावंडांचें दिव्य चरित्र वर्णिलें असून समाधिप्रकरणांत ज्ञानोबारायांच्या समाधीच्या विस्तृत वर्णनाबरो-बरच सोपानदेव, चांगदेव, मुक्ताबाई व निवृत्तिनाथ यांच्याही समाधिप्रसंगांचें वर्णन केलेलें आहे. या चारी भावंडांच्या जन्मांचे व समाधींचे काल आहेत ते असेः—

## जन्मकाळ.

१ निवृत्तिनाथः—शके ११९५ श्रीमुखसंवत्सर माघ वद्य १ प्रातःकाळ.
२ ज्ञानेश्वरमहाराजः—शके ११९७ युवासं. श्रावण कृष्ण ८ मध्यरात्र.
३ सोपानदेवः—शके ११९९ ईश्वर सं. कार्तिक शुद्ध १५ प्रहररात्र.
४ मुक्ताबाईः—शके १२०१ प्रमाथि सं. अश्विन शुद्ध १ मध्याह्न.

## समाधिकाळ.

१ ज्ञानेश्वरमहाराजः—शके १२१८ दुर्मुख सं. कार्तिक वद्य १३ गुरुवार ( आळंदीस ).
२ सोपानदेवः— ( शक १२१८ ) मार्गशीर्ष वद्य १३ ( संवत्सर उर्फ सासवड येथें ).
३ चांगदेवः— ( शके १२१८ माघ वद्य १३ ( पुणतांबें ).
४ मुक्ताबाईः— ( शके १२१९ ) वैशाख वद्य १२ ( एदलाबाद ).
५ निवृत्तिनाथः— ( शके १२१९ ) ज्येष्ठ वद्य १२ ( त्र्यंबकेश्वर ).

ह्या भावंडांचें समग्र चरित्र गद्यांत पहावयाचें असल्यास माझा **' श्रीज्ञानेश्वर-चरित्र व ग्रंथविवेचन '** हा ग्रंथ पहा. असो. नामदेवांच्या आदि व समाधि ह्या अभंगांच्या आधारेंच निरंजनमाधव कवीनें शके१६८७—

८८ मध्यें पुणें शहरांत राहून प्रस्तुत **ज्ञानेश्वरविजय** हा श्लोकबद्ध ग्रंथ रचिला आहे. याची एकंदर श्लोकसंख्या १०३८ आहे. आदिप्रकरण ५ अध्यायांत व समाधिप्रकरण १२ अध्यायांत वर्णिलें आहे. चरित्रदृष्टीनें पूर्वखंड अधिक महत्वाचें व सरसही आहे.

२ निरंजनमाधवाचा हस्तलिखित कवितासंग्रह मला इ. स. १९०१ मध्यें श्रीक्षेत्र नाशिक येथें एका भिक्षुकाच्या घरचीं जुनीं दप्तरें चाळीत असतांना सांपडला. या कवीचे काव्यग्रंथ पाहून माझा त्याविषयीं उत्कृष्ट ग्रह झाला, व अशा उत्तम कवींचीं सुंदर कवनें सांदीकोपऱ्यांत पडून रहावींत हें बरें नव्हे असें वाटलें. मला मिळालेलीं कवनें कवीनें स्वहस्तानें लिहिलेलीं आहेत यांत ग्रंथांतच प्रमाणें आहेत. कवीचें संक्षिप्त चरित्र व त्याच्या कवितेची थोडी माहिती १९०३ सालीं केसरी पत्रांत मीं दिली होती. तोच लेख पुन्हां तसाच या प्रस्तावनेपुढें जोडलेला आहे तो वाचकांनीं प्रथम वाचावा व नंतर मूळ ग्रंथ पहावा. सदर चरित्रांत उल्लेखिलेला ‘ बालबोध ’ ग्रंथ नंतर धुळ्याचे कै. गोविंदराव चांदोरकर यांनीं प्रसिद्ध केला असून तो ‘सत्कार्योत्तेजक सभा, धुळें’ यांजकडे मिळतो. निरंजनमाधवांचा कवितासंग्रह—भाग पहिला हा ग्रंथ ५।७ वर्षांपूर्वी आह्मीं स्वतंत्रपणें प्रसिद्ध केला असून त्यांत कविकृत सुंदर २१ स्तोत्रें व सांप्रदायपरिमळ उर्फ आत्मचरित्र छापलेलें आहे. ग्रंथ एक रुपयास मुमुक्षु कचेरींत मिळतो. त्यानंतर कवीचा दुसरा ग्रंथ ‘ श्रीज्ञानेश्वरविजय ’ हा आज प्रसिद्ध होत आहे. हा ग्रंथ सन १८७९ सालीं शिलाप्रेसवर पुण्याच्या चित्रशाळेनें छापला होता, पण तो आज अनुपलब्ध आहे. त्याची प्रतही कोठें पाहण्यास मिळत नाहीं. शिवाय कविलिखित मूळप्रतही आह्मांस मिळाल्यानें तो पुन्हां स्वतंत्रपणें छापणें अवश्य झालें. याचीं प्रूफें तपासण्याचें काम आमचे मित्र रा. श्रीपत बाजी जोग यांनीं केलें आहे, ह्मणून त्यांचा मी फार आभारी आहें. निरंजनमाधवाचा ‘ सुभद्राचंपू ’ व इतर स्फुट प्रकरणें तिसऱ्या भागांत व वृत्तमुक्तावलि, वृत्तावतंस व वृत्तवनमाला हे छंदःशास्त्रावरचे तीन मराठी ग्रंथ चौथ्या भागांत छापण्याचा आमचा विचार आहे. नूतनमंदिर बांधण्याचे खालोखाल जीर्णोद्धाराचें पुण्य आहे. या कामीं आमचे महाराष्ट्रीय वाचक आम्हांस साह्य करितील अशी उमेद आहे.

पुणें, मुमुक्षु कचेरी
वैशाख कृष्ण ११ शके १८४७.

संतचरणरज,
**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

———

# अनुक्रमणिका.

## पूर्वखंड ( आदिप्रकरण )


| अध्याय. | | | | श्लोक. |
|---|---|---|---|---|
| अ० पहिला— | ... | ... | ... | ५३ |
| अ० दुसरा— | ... | ... | ... | ६० |
| अ० तिसरा— | ... | ... | ... | ४० |
| अ० चौथा— | ... | ... | ... | ४४ |
| अ० पांचवा— | ... | ... | ... | २२ |
| | | | | २१९ |


## उत्तरखंड ( समाधिप्रकरण )


| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ० पहिला— | ... | ... | ... | ५७ |
| अ० दुसरा— | ... | ... | ... | ६२ |
| अ० तिसरा— | ... | ... | ... | ७४ |
| अ० चौथा— | ... | ... | ... | ७२ |
| अ० पांचवा— | ... | ... | ... | ४१ |
| अ० सहावा— | ... | ... | ... | ७९ |
| अ० सातवा— | ... | ... | ... | ८१ |
| अ० आठवा— | ... | ... | ... | १४१ |
| अ० नववा— | ... | ... | ... | ५२ |
| अ० दहावा— | ... | ... | ... | ६१ |
| अ० अकरावा— | ... | ... | ... | ६४ |
| अ० बारावा— | ... | ... | ... | ३५ |
| | | | | ८१९ |


आदिप्रकरणः—लेखनकाल शके १६८८ व्यय संवत्सर आषाढ शुद्ध १४ भानुवासरे

समाधिप्रकरणः—रचनाकाल, शके १६८७ पार्थिव सं. फाल्गुन शुक्ल ५ शुक्रवार. लेखनकाल शके १६८८ व्यय सं. श्रावण वद्य १ गुरुवासरे.

# निरंजन माधव
## चरित्र व कवित्व.

१ मराठी वाचकांपुढें एक उत्कृष्ट प्राचीन कवि आणावयाचा आहे. मराठी कविता व मराठ्यांचा इतिहास यांचा अन्योन्य संबंध असून मराठी काव्याचें मार्मिक संशोधन व अभ्यास झाल्याविना मराठ्यांच्या इतिहासाचें खरें स्वरूप समजणार नाहीं. या सिद्धांताला बळकटी आणण्याकरितांच कीं काय कोण जाणें, गेल्या दोन चारशें वर्षांतले कांहीं कवि माझ्या हस्तगत झाले आहेत; त्यांपैकीं एका चांगल्या कवीची अल्प माहिती जगापुढें प्रथमच मांडण्याचें काम करण्यास मला फार आनंद वाटतो. पहिले बाजीराव पेशवे हे शिवरायाप्रमाणें गुणग्राही असून गुणी पुरुषरत्नांचा संग्रह करण्याचा त्यांचे ठायीं गुण होता हें सर्वश्रुत आहे. त्यांनीं कित्येक वीर पुरुष उदयाला आणले आहेत, पण मराठी भाषेंतला एक चांगला कवि त्यांच्या गुणज्ञतेमुळें उदय पावला ही गोष्ट अद्याप कोणासही माहीत नाहीं. **बनाजी ऊर्फ निरंजन माधव हें त्या कवीचें नांव होय.** याचीं काव्यें व चरित्र आजवर अज्ञातवास भोगीत पडलीं होतीं. याचा ‘ ज्ञानेश्वरविजय ’ कांहीं वारकऱ्यांच्या पाहण्यांत आहे, व चिद्बोधरामायणाचें बालकांड ’ इ. स १८८६ सालीं रा. रा. सीताराम रामचंद्र गायकवाड यांनीं प्रसिद्ध केलें आहे. रा गायकवाडांस सातही कांडें मिळालीं होतीं असें प्रस्तावनेवरून दिसतें, पण नुक्ताच मीं शोध केला त्यावरून तीं **चोरीस** गेल्याचें समजतें ! यापलीकडे निरंजन माधवाविषयीं बिलकुल माहिती आजवर उपलब्ध नव्हती.

२ मला या कवीची पांच चार हजार कविता सांपडली असून आणखी इतकीच मागें पुढें शोध केल्यास सांपडेलसें वाटतें. पण इतक्या थोडया कवितेवरूनही मराठींत हा एक अलौकिक कवि होऊन गेला असें दिसतें. याचे श्लोक वामनाच्या श्लोकांप्रमाणें प्रासादिक आहेत. यानें आपल्या घराण्याची व आपली विस्तृत माहिती देऊन आपल्या गुरुसांप्रदायाचीही सुरेख हकीकत दिली आहे. हा कवि चांगला योगी असून साऱ्या भरतखंडभर यानें तीर्थयात्रा केल्या व राजकीय पुरुष या नात्यानें राजेरजवाडयांच्या दरबारांत हा वागलेला आहे. बाजीराव व नानासाहेब पेशवे यांच्या आश्रयांत याचा बराच

काळ गेला. याला संस्कृत व मराठीशिवाय कानडी, हिंदुस्थानी, गुजराथी वगैरे बऱ्याच भाषा येत असून एक ग्रंथ यानें गुजराथी ग्रंथाच्या आधारें मराठींत केला आहे. मोरोपंती रामायणाच्या पूर्वीं निरोष्ठ रामायण, मंत्ररामायण यानें मराठींत केलीं होतीं ! संस्कृत चंपूंच्या धर्तीवर सुभद्राचंपू म्हणून एक मोठें सरस काव्य यानें मराठींत केलें आहे ! कै. गोडबोले यांनीं वृत्तदर्पण केलें तेव्हां त्यांस व इतरांस हाच वृत्तावरचा प्रथम मराठी ग्रंथ असें वाटलें, परंतु याचे वृत्तशास्त्रावर तीन ग्रंथ आहेत ! याचीं स्तोत्रें तर अतिशय गोड आहेत. याप्रमाणें बहुश्रुत पंडित व योगी, साधु व राजकार्यनिपुण असा हा चौरस कवि मराठींत होऊन गेल्यास अद्याप दीडशेंही वर्षें झालीं नाहींत, तरी काव्यरसिकांच्या अनास्थेमुळें हा सुरेख कवि विस्मृतिपंथास चालला होता. मराठी कवींसंबंधानें लिहितांना निरंजनमाधवाचें नांवही काढीत नाहीं,पण याचें चरित्र व ग्रंथ व्यवस्थेनें छापून काढल्यास वाचकांचें लक्ष त्याकडे आपोआप वेधेल असा मला भरंवसा वाटतो. याचा आत्मचरित्रपर जो ग्रंथ आहे त्यावरून पेशवाईतल्या समाजास्थितीची बरीच अटकळ बांधता येते.

३ प्रथम कवीचें चरित्र त्याच्याच ग्रंथाधारें व त्याच्याच शब्दांनीं सांगून मग त्याच्या काव्यांची मी संक्षिप्त माहिती देणार आहें. " **सांप्रदायपरिमळ** " नांवाचा एक ओवीबद्ध आत्मचरित्रपर हजार ओव्यांचा ग्रंथ यानें इ. स. १७६३ मध्यें आपल्या पत्नीसाठीं रचिला. बद्धपाणी व पतिव्रता अशी गंगावती एकदां कवीला म्हणालीः—

" आपण रचिलीं ग्रंथरत्नें । तीं म्या केलीं हृदयाभरणें ।
आतां स्वसांप्रदायकथन । शिरोभूषण मज द्यावें ॥ १ ॥

व आणखी एका शंकेचें निरसन करावें. आपण लक्ष्मीधर व बापदेव या दोन सद्गुरूंचें नेहमीं चिंतन करितां याचें कारण काय ? दोपणीं एकच वस्तु आहे असें पूर्वील ग्रंथांत सांगून गुरुद्वैत मनीं कां बाळगितां ? "

हा भक्तिनम्र व प्रेमळ सतीचा प्रश्न ऐकून निरंजन योगी म्हणालेः—

तुझ्याच अर्थीं जाण । म्या पूर्वीं ग्रंथ रचिले पावन ॥
आतां सांप्रदाय प्रकाशन । करणें वल्लभे तुजसाठीं ॥ २ ॥

यानंतर कवीनें प्रथम आपल्या कुळाचा व आपला इतिहास स्वस्त्रीस निवेदन केला; व नंतर लक्ष्मीधर व बापदेव या दोन गुरूंचा त्यांच्या दोन्ही सांप्रदायांसह इतिहास सांगितला आहे. हा सर्व ग्रंथ फारच महत्वाचा आहे. आधीं आत्मचरित्र कोणाही थोर पुरुषाचें असलें तरी तें मनोवेधक व बोधप्रद असतेंच. त्यांतही बहुभाषाकोविद, बहुदेशसंचारी, राजकार्यनिमग्न अशा

सत्कवीचें आत्मचरित्र म्हणजे रसज्ञांस तो खमंग मेवाच वाटला पाहिजे, व त्यांतही पतिपत्नींच्या प्रेमळ संवादामुळें त्याला जें माधुर्य व पावित्र्य येतें त्यानें तर असा ग्रंथ अद्भुत वाटलाच पाहिजे.

४ गोदावरीच्या दक्षिणेस वरखेडाच्या शिवेवर रामडोह नामक प्रसिद्ध गांव आहे ती कर्त्रीची ' मातृभूमि ' होय. याचे पूर्वज तेथील कुळकर्णी होते. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, यांचें गोत्र विश्वामित्र. कुलदेव गिरीचा व्यंकटेश. अदिलशाहींत आजानें गांव सोडून व्यापारानिमित्त विजापूरशहरीं वस्ति केली. तेथील पातशहाची सेवा करून प्रतिष्ठा मिळविली. कवीचे वडील माहदो बनाजी हे भक्त होते. त्यांनीं आपल्या चारी पुत्रांस अधिकार देऊन दक्षिणोत्तर यात्रा केल्या व कृष्णातीरीं जमखिंडीपासून ४ मैलांवर शूर्पारक्षेत्र ह्मणून नरहरीचें कडकडीत स्थान आहे तेथें उत्तरवय घालवून ते निजधामाला गेले. मध्यमपुत्र तिमाजीपंत यांनीं दिल्लीपतीनें विजापूर घेतांच तें शहर सोडलें व गिरीस व्यंकटेशसेवा करण्यास्तव गेलेः—

न करितां मनुजाचें सेवन । तिमाजीपंतीं आमरण ।
भगवद्भजन पुस्तक—लेखन । करोनि काळ दवडिला ।

यांची कीर्ति सर्वत्र पसरली होती व यांचें नांव ' त्या समयींचे पुरुष नेणती । ऐसें नाहीं वर्तलें ! '

माधवरावाची स्त्री व कर्त्रीची माता भागीरथीबाई ही पवित्र माउली होती व ' प्रत्यक्ष स्वप्नदर्शन । प्रत्यक्ष करावें भाषण ' अशा अधिकाराची होती. तिच्या उदरीं कंची प्रांतीं वेगवती नदीतीरीं पक्षितीर्थासमीप निरंजनमाधवाचा जन्म झाला. बाप वारल्यावर त्याचा तो देश सुटून सातान्यास बाजीराव पेशवे यांच्या आश्रयास कवीचें जाणें झालेंः—

काळकर्मऋणानुबंधें । तो देश सुटला प्रसिद्ध ।
आह्मां येणें घडलें शुद्ध । महाराष्ट्र देशांतरीं ॥ १ ॥
शाहूभूपतीचा प्रधान । बाजीराव बल्लाळ पृथ्वीरत्न ।
परमयशस्वी पावन गुण । भूपाळमंडळशिरोमणी ॥ २ ॥
गुणरत्नाचा परीक्षक । स्वयें सद्गुणपूर्ण अशेख ।
तेणें संग्रह केला सम्यक । जेष्ठबंधू सह आमुचा ॥ ३ ॥

निरंजनमाधव यापुढें सातान्यास राहण्यास आले; व विद्याभ्यासास सुरवात झाली. पण यापुढची आपली हकीकत कवीनें आपल्या दोन्ही गुरूंच्या सांप्रदायाच्या हकीकतींत गुरफटल्यामुळें मी दोन्ही सांप्रदायांची हकीकत पृथक्त्वानें देतों.

## १ दत्तसांप्रदाय.

५ साताऱ्यास आल्यावर निरंजनास संस्कृत शिकण्याची निःसीम आवड उत्पन्न झाली, पण आतांप्रमाणें तेव्हांही सर्वत्र भाडोत्री शिक्षक उदरभरणार्थी होते. म्हणून आस्थेनें सांगणारा कोणी गुरु भेटेना! कवि म्हणतोः—

आस्थापूर्वक सांगणार। कोणी न मिळती विप्रवर।
सर्वही अर्थकामातुर। भरणें उदर मुख्य स्वार्थ॥ १॥

ही निरंजनाची चिंता लवकरच दूर झाली साताऱ्यास लक्ष्मीधर बरवे म्हणून कोणी चित्तपावन सत्कुळज सुपुरुष होते त्यांची कीर्ति ऐकून निरंजन त्यांच्या दर्शनास गेले.

हातीं महारुद्रवीणा। स्वरें ज्ञानेश्वरीपारायणा॥

अशी गंभीर व मंदस्मित करणारी भव्यमूर्ति पाहून निरंजनाचें चित्त तेथें जडलें. गुरूला ते शरण गेले. सिद्धांतकौमुदी आरंभिली. सहा महिने निरंतर सेवा करून गुरुकृपा संपादिली. ते 'अंतरंग–बहिरंग' सर्व निरंजनास सांगूं लागले. लक्ष्मीधर वीणावादनप्रवीण असून ज्ञानेश्वरींतल्या ओव्या ते सुरावर गोड ह्मणत. त्यांचे वडील गोविंदभट्ट बरवे हे ज्ञानेश्वरभक्त असून त्यांनीं ज्ञानेश्वरीचा प्रसार केला. लक्ष्मीधराचे गुरु ब्रह्मानंदस्वामी यांनीं त्यांची कविताशक्ति व प्रबंध पाहून त्यांस लक्ष्मीधरकालिदास या नांवानें गौरविलें. निरंजनाचे वेळीं लक्ष्मीधराचे प्रबंध लोक गात असें दिसतें. साताऱ्यास येणारे राजेरजवाडे प्रथम लक्ष्मीधराचें दर्शन घेत शाहूमहाराजांनीं त्यांस गांव इनाम दिलें. (त्यांचे वंशज अद्याप तिकडे तें उपभोगीत आहेत असें कळतें.) निरंजनमाधव म्हणतो, 'माझ्या दृष्टांतावरून 'श्रीची कृपा तुजवर पूर्ण आहे' असें जाणून लक्ष्मीधरांनीं मला महावाक्याचा उपदेश केला, व साक्षात्कार होऊन माझा उद्धार झाला' गुरूचें प्रेमळ स्तवन कवीनें केलें आहे.

६ हे लक्ष्मीधर बरवे दत्तसांप्रदायी होते. श्रीदत्तमहामुनि हे या सांप्रदायकल्पतरूचें मूळ होत. त्यांचे शिष्य विमलानंद; त्यांचे अमृतानंद; त्यांचे ब्रह्मानंद, त्यांचे शिष्य सच्चिदानंद. यांनीं गोकर्णमहाबळेश्वराच्या वनांत तपश्चर्या केली. त्यांची समाधि वर्ष सहामहिने टिकत असे. त्यांना नारदाचें दर्शन झालें. 'मनुष्याच्या चर्मचक्षूला दुर्लभ देवदर्शन कसें झालें?' अशी शंका गंगावतीनें काढिली व तिला 'योग्यांना तें सुलभ आहे' असें निरंजन योगी यांनीं उत्तर दिलें. सच्चिदानंदांचे शिष्य ब्रह्मानंद व त्यांचे शिष्य लक्ष्मीधर बरवे हे होत.

७ यानंतर बऱ्याच गोष्टी घडल्या, त्या पुढें सांगण्यांत येतील. निरंजन-

माधवानें काशीप्रयागादि त्रिस्थळी करून उत्तर हिंदुस्थानांतील तीर्थक्षेत्रें पाहिलीं. त्याचें पहिलें काव्य इ. स. १७३५ मधलें आहे. पुढें बाजीरावसाहेब वारल्यावर नानासाहेबांनींहीं कांहीं वर्षें निरंजन माधवाचा सप्रेम समाचार घेतला. ब्रह्मानंदपुत्र शिवानंद बेलूरग्रामीं मठीं होते, तेथें सच्चिदानंदबावांनीं सुंदरकृष्णाच्या मूर्ति स्थापल्यामुळें या सांप्रदायाची गादी तेंच स्थान होतें. पुढें काय झालें तें पहाः—

बाजीराव भूपाळनंदन । नाना प्रभू अतिप्रवीण ॥
तत्सेवनीं रात्रिदिन । अवकाश न घडे सुटाया ॥ १ ॥
सर्व संस्थांनीं मजप्रती । पाठवितां राजकार्यार्थीं ॥
दाक्षिणात्य सर्व नृपती । करिती प्रीती गुणग्राही ॥ २ ॥
बहुत कार्यभागभार । सुटावया नव्हे अवसर ॥
चित्तीं ध्यास लागला फार । तीर्थयात्रा घडावी ॥ ३ ॥
अस्मिन्नवसरीं पिशुनजनीं । असत्य भाषणें कथोनी ॥
अप्रीती उत्पन्न केली मनीं । बाळाजी पंडित प्रधानवर्या ॥ ४ ॥
हेही देवमाया घडली । संदेह नसतां चित्तवृत्ति फिरली ॥
पूर्ववत् न देखतां ममता झाली । बुद्धि उद्विग्न माझीही ॥ ५ ॥
इंगितें भाव कळतां जाण । तेंचि निमित्त करोनि पूर्ण ॥
केलें दक्षिणदेशाटन । तीर्थाटन मुख्यत्वें ॥ ६ ॥

श्रीशैल, व्यंकटेश, रामेश्वर, कांची, कुंभकोण, श्रीरंगपट्टण, बेलूर, कोल्हापूर वगैरे अनेक क्षेत्रें पाहून पुण्यास निरंजनमाधव आले व 'इष्टमित्रा' च्या गांठी पडून महासमाराधन केलें. नानासाहेबांचा पुनरपि लोभ जडून शिबिकादि संपत्ति देऊन त्यांस महत्पद अर्पण केलें व श्रीरंगपट्टणीं पाठविलें. निरंजनांच्या हातून मोठालीं कार्यें झालीं, पण मुख्य विश्रांतिस्थान त्यांच्या मनास अध्यात्मचिंतन व हरिभक्ति यांतच होतें. कृष्णानंदसिंधु ग्रंथ रचण्यास यांनीं पुण्यास प्रारंभ केला होता. तो ग्रंथ संपवून चिद्बोधरामायण उर्फ निरंजन रामायण म्हणून अध्यात्मरामायणावर टीका करण्यास आरंभ केला. तो ग्रंथ परत पुण्यास आल्यावर संपला. सुंदरकांड समाप्त होतांच आपण्णा पंडित ह्मणून एका सिद्धानें राममंत्र उपदेशून रामरहस्य निरंजनकवीस सांगितलें. त्यांच्या कृपेनें व त्यांच्या संगतींत हा ग्रंथ दोन वर्षांत संपला. वरील तीर्थयात्रेसंबंधीं कवि म्हणतोः—

सर्वदेवतादर्शनें । महानदीतीर्थस्नानें ।
महाक्षेत्रसेवनें । पाप हरलें जन्माचें ॥ १ ॥

नाना देश संचार करितां । नानास्थळीं फिरतां ।
नाना परींचे सत्पुरुष संतां । पाहोनि झालों कृतार्थ ॥ ३ ॥

असो; दुसऱ्या गुरूची व त्यांच्या सिद्धेश्वर सांप्रदायाची हकीगत त्यांच्या नवीनच उपलब्ध झालेल्या ग्रंथावरून देऊन हा चरित्रभाग पूर्ण करितों.

---

## ( २ ) सिद्धेश्वरसांप्रदाय.

८. निरंजनमाधवाच्या चरित्राचा उत्तरार्ध व त्याच्या दुसऱ्या गुरूची व सिद्धेश्वरसांप्रदायाची माहिती सांगून एकनाथमहाराजांच्या समकालीन अशा एका सिद्धानें रचिलेल्या व आजवर अनुपलब्ध अशा एका अनुपम ग्रंथाचाही स्फोट करावयाचा आहे.

९ गंगावतीनें पुनरपि विचारलें, "पहिला दत्तसांप्रदाय लक्ष्मीधरगुरूच्या कृपेनें धरिला असून दुसरा सिद्धेश्वरसांप्रदाय आपण कां धरिला ? प्रथमांत काय पूर्णता नव्हती म्हणून दुसरा लोकीं रूढविलात ?" हा प्रश्न ऐकून निरंजनास हर्ष झालाः—

निजसुंदरीची प्रेमझरी । तत्रापि विज्ञापनाकुसरी ।
श्रवण करोनि हर्षितातरीं । प्रत्युतरीं प्रमोदवित ॥ १ ॥

ज्ञानसुधेंत सांप्रदायपद्धति सांगितली असून कवीनें ती पुनः स्त्रीस येथें सांगितली. लक्ष्मीधराच्या कृपेनें साताऱ्यास सप्तर्षीवर असतां २२ व्या वर्षी महाविद्या निरंजनास प्राप्त झाली. नंतर बाजीरावानें त्यास राजकारणासाठीं तंजावरास पाठविलें:—

अस्मिन्नवसरीं बाजीरावप्रधानें । सेवा सांगोनि परम मानें ॥
शिबिकादि संपत्तिदानें । चंदावर संस्थाना पाठविलें ॥ १ ॥
तेथील कार्यभागभार । पडला कांहीं संवत्सर ।
येतां जातां सद्गुरुवर । भेटतांही तांतडी ॥ २ ॥

निरंजनास कांहीं वर्षे तंजावर प्रांतींच काढावीं लागलीं स्वामिसेवातत्पर राहूनही जपादिकर्म व सद्ग्रंथव्यासंग त्यानें सोडिला नाहीं. तंजावरीं राहण्यानेंच 'काव्यनाटककळाकुसरी । नानाविनोद राजसभांतरीं ' वगैरे गुण त्यास प्राप्त झाले. पुण्यापासून तंजावरपर्यंत सर्व दक्षिण देश नेहमीं फिरावा लागल्यामुळें व्यावहारिक ज्ञान निरंजनास प्राप्त होऊन मोठमोठे पंडित, वैदिक व संतमहंत यांच्या गांठी पडल्या. निरंजनच म्हणतो कीं, पंडितसंगति, साधुसहवास, अनेक देशाटण, व बहुभाषानैपुण्य हे फायदे आपणांस झाले. 'सर्वभाषापरिज्ञान । घडों

आलें देशाटणें । ' तंजावराहून पुण्यास जातां येतां सातान्यास राहून लक्ष्मीधराचें दर्शन घेत निरंजनानें कांहीं वर्षे काढलीं

सर्वत्रस्थळीं मान्यता । सभास्थानीं निर्भयता ।
तत्काळ स्फूर्ति सुभाषता । चमत्कारता नृपादिकां ॥ १ ॥
प्रतिवादि मुखस्तंभन । सर्व मान्य होय भाषण ।...

वगैरे प्रकारचें चातुर्य आपणांस कसें प्राप्त झालें हेंही निरंजनानें सांगितलें आहे. अशीं कांहीं वर्षे जातां सद्गुरु लक्ष्मीधर परलोकीं गेल्याचें निरंजनास कळलें. तेव्हां त्यानें अनिवार शोक केला. त्याचें गुरुभक्तिपूर्ण असें वर्णन त्यानें केलें आहे.

बाळक असतां स्तनंधय । मातृवियोग जैसा होय ।

तैसा ' उदरकार्यार्थ परिश्रमी ' असतां निरंजनास शोक झाला. सात अहोरात्र त्यानें उदकप्राशनही केलें नाहीं. सातव्या रात्रीं लक्ष्मीधरानें स्वप्नांत दर्शन देऊन त्याचें सांत्वन केलें व सांगितलें कीं, आजपासून सातव्या दिवशीं तुला आमची विभूति भेटेल. स्वप्नवाक्यांचा विश्वास प्राज्ञ पुरुष मानीत नाहींत, म्हणून निरंजन स्वस्थ होते; पण खालीं वर्णन केल्याप्रमाणें गुरुवाक्य खरें झालें. गणेशसुत बापजीपंडित म्हणून बाजीरावाचे स्नेही नियोगकर्मांत अत्यंत कुशल व मोठे राजकारणी होते; निरंजनाच्या बंधूचा व त्यांचा स्नेह फार. पण त्यांचे हृद्गत कोणासही कळायचें नाहीं, असें खोल बुद्धीचे होते. तसेच 'व्यापारवृत्तीमाजी कोणी । यासम नसे पुरुषमणी, ' राजकारणासाठीं बाजीरावानें उभयतांना एकत्र पाठविलें. नित्य राहटी पाहतां व ज्ञानकळेची गोठी कळतां परस्पर प्रेममिठी पडली. सर्व व्यवहार करीत असतां बापजींची समाधि स्थिर असे. त्याची जितेंद्रियता, शांति व सहज निर्विकल्प स्थिति पाहून निरंजनाची त्यांचे ठिकाणीं श्रद्धा बसली. त्यांचेजवळ शिष्यमंडळी होती त्यांस ते " बाळबोध " ग्रंथ नित्य पढवीत. त्यांनीं निरंजनावर पुरती दया केली—

षण्मुखा खेचरी मुद्रा दोनी । दावोनी लक्षानुसंधानीं ।
मुक्त केलें अर्धक्षणीं । कोटि जन्मीं जें साधिजे ॥
त एका पळांतरीं । देवोनि कृतार्थ केले परी ।
तारक होवोनि संसारीं । तारिलें कृपाकटाक्षें ॥ २ ॥

बापजी पंडितांच्या वरानें निरंजनास प्रत्यक्ष ब्रह्मदर्शन होऊन ते जीवन्मुक्त झाले. त्यांच्या कृपेनें:—

परमार्थविषयीं कोठें कांहीं । अणुमात्र गुंता राहिला नाहीं ॥

असें निःसंदेह पद निरंजनास प्राप्त झालें. याप्रमाणें लक्ष्मीधर व बापदेव हे दोन सद्गुरु निरंजनास मिळाले.

लक्ष्मीधरें महावाक्य उपदेश केला । बापदेवीं तो अर्थ प्रकट दाविला ॥
स्वानुभव आणोनि दिधला । हृदयीं लाविला ज्ञानदीप ॥ १ ॥

गंगेंत मिळण्यापूर्वींची यमुना जशी गंगेशीं एकरूप होऊन पुढें भागीरथी या नांवानें वाहते, तद्वत् लक्ष्मीधराचा सांप्रदाय पुढें सिद्धेश्वरसांप्रदायांत मिळाला. चरम गुरु बापदेव म्हणोन सिद्धेश्वरसांप्रदायच निरंजनानें चालविला. याप्रमाणें दुसऱ्या गुरूची हकीकत देऊन निरंजनमाधव म्हणतातः—

मंत्रयोगीं लक्ष्मीधर । ज्ञानयोगीं बापदेव गुरुवर ॥
दोघेही एकाकार । मंगलचरणीं वंदिजे ॥ १ ॥

१० या **सिद्धेश्वरसांप्रदाया**चा उगम नाथांच्या काळीं महाराष्ट्रांत जी धर्मजागृती झाली तींत आहे. या सांप्रदायाचा मूळ पुरुष **त्र्यंबकराज असून त्याचा मुख्य ग्रंथ "बाळबोध"** उर्फ " बालावबोध " हा होय. कृष्णदेवाचा सुत भैरव नामक माध्यंदिन शाखेचा यजुर्वेदी ब्राह्मण होता. तो राजयोगी व ब्रह्मनिष्ठ असून तुळजापुरची देवी अनुष्ठानानें त्यानें प्रसन्न केली. तिनें त्यास तीन फळें दिलीं व सांगितलें कीं, तुला तीन पुत्र होतील व मधल्याच्या हातावर त्रिशूळ दिसेल. तो मदंश समज. याप्रमाणें भैरवास तीन पुत्र झाले. त्यांचीं नांवें नरसिंह, त्र्यंबक व कौंडण्य; आई भारद्वाजगोत्री अंबावती नांवाची होती. बापानें मधल्या मुलास विद्या दिली नाहीं. तो लग्न करणार नाहीं ही भीति त्यास वाटे. बाप वारल्यावर त्र्यंबकानें आपणच गृहस्थधर्म चालविला. वडील बंधूनें उपदेश केला. नंतर ज्ञानी कमलाकर या साधूनेंही त्यास बोधिलें. पुढें चंडीची सेवा आरंभिली. नंतर सप्तशृंगीच्या डोंगरावर जाऊन देवी प्रसन्न करून घेतल्यावर सिद्धेश्वर ( श्रीशंकर ) यांनींही पांच वचनें उपदेशिलीं. त्याचा विस्तार करून त्र्यंबकरावानें 'बालबोध' नामक ग्रंथ केला; तो शके १४९४ वांत प्रारंभ करून शके १५०२ मध्यें संपविला. ( या ग्रंथाची संपूर्ण प्रत निरंजनमाधवानेंच इ स. १७६४ मध्यें केलेली मला मिळाली आहे. दुसरीही एक अपूर्ण प्रत इ. स. १७३८ मध्येंच त्यानें केली आहे. यावरून पहिल्या बाजीरावाच्याच कारकीर्दींत निरंजनमाधवाचें सातान्यास येणें झालें व लक्ष्मीधर व बापदेव या दोन्ही गुरूंचा अनुग्रह होऊन त्यानें काव्य रचण्यासही सुरवात केली हें उघड दिसतें. ) त्र्यंबकरायानेंच वरील हकीकत आपल्या बालबोध ग्रंथांत दिली आहे. ह्या ग्रंथाचे खंड तीन असून ओवी संख्या ५२४० आहे. यांत ४५ कथनें

( chapters ) आहेत. ग्रंथ मोठा प्रौढ असून वेदांतादि शास्त्रांचा खुलासा फार सुबोधपणें केला आहे. ‘ हें महाराष्ट्र परि बरवें । शास्त्रदोहन आहे. ’ असें त्र्यंबकराज योगी म्हणतात. हा ‘ बालबोध, ’ नाथांचें भागवत, माधवदासांचें योगवासिष्ट हे तीनही प्राकृत ग्रंथ महाराष्ट्र भाग्योदयाच्या वेळचे असून दहा पांच वर्षांच्या अंतरानें रचलेले आहेत. त्यामुळें शाहाजीच्या जन्मापूर्वीची महाराष्ट्राची सामाजिक व धार्मिक स्थिति समजण्यास हे व यांच्या काळचे दुसरे ग्रंथ फार उपयोगीं पडणार आहेत. मराठी भाषेविषयीं त्र्यंबकरायाचे उद्गार पहाः—

जैसा सुखासनाचा मार्गु । तैसा महाराष्ट्र—प्रसंगु ॥
अंगीं बाणे राजयोगु । रोकडाची ॥१ ॥
ये मराठी पल्लवें । जीव उगमातें पावे ॥
तरी कासया उलथावे । पानाचे कवळे ॥ २ ॥
वापीकूप देवराणी । मध्यें सखोल अर्थपाणी ॥
तें सुदेशीं सेंदनी भरूनि । आहाच कीजे ॥ ३ ॥
आणि संस्कृत केवळ । अर्थे करावें प्रांजळ ॥
येरवी रक्षितां फळ । कोण त्याचें ॥ ४ ॥
अर्थ ज्ञान पदें प्रासें । वरी वैसतीं प्रमाणें सुरसें ॥
ते मऱ्हाठी पुरवील भडसे । विद्वज्जनाचे ॥ ५ ॥
धन्य धन्य हे मऱ्हाटी । ब्रह्मविद्येची कसवटी ॥
हा द्वारशीलेचे पोटीं । परिसु जोडिला ॥ ६ ॥

हा ‘ बालबोध ’ म्हणजे दासबोधाचा पूर्व जन्मच दिसतो. याची भाषाशैली ३२५ वर्षांपूर्वीची असल्यामुळें ज्ञानेश्वरी—भाषेच्या जवळ जाते. या ग्रंथरूपी मालिकेंत एकदां ओंवलेला शब्दमणी पुनः आणलेला नाहीं, संस्कृताची गोडी या ओंव्यांत आणली आहे, हा मननपूर्वक वाचतांच सर्व शास्त्रांचें सार आकलन करितां येईल, व ब्रह्मसायुज्यता मिळेल, असें त्र्यंबकराय म्हणतात व ग्रंथ वाचल्यास त्यांचें म्हणणें प्रत्येकास यथार्थ वाटेल, असें मला वाटतें. अस्तु.

११ त्र्यंबकरायाची थोडी माहिती निरंजनमाधवानें बापजीपंतांचें वर्णन देत असतांना दिली आहे. बाळबोधाची प्रशंसा केली आहे व सांप्रदाय परंपरा खालीलप्रमाणें दिली आहे. त्र्यंबकराजाचे गुरु परानंद; त्यांचे विज्ञानानंद, त्यांचे कमलानंद, त्यांचे शिवानंद, त्यांचे चिन्मयानंद व त्यांचे शिष्य गणेशसुत बापजीपंडित उर्फ महामौळी हे होत.

१२ ' सांप्रदायपरिमळ ' ग्रंथांत कवीनें आत्मचरित्र व सांप्रदायपरंपरा दिल्या आहेत. त्यांच्याच शब्दांत मीं एथवर हकीकत दिली आहे. पुढें कवीनें आपल्या सांप्रदायाचे नियम दिले आहेत. ते येथें देण्याचें कारण नाहीं. तरी निरंजनाचें धर्ममतौदार्य किती होतें हें दाखविण्यासाठीं ओव्या देतों:—

सर्व धर्मांची साहायता । करावी सामर्थ्य असतां ॥
आपल्या धर्मविहिता । सदा फार जपावें ॥ १ ॥
परधर्माचें आचरण । आपण कदापि न कीजे जाण ॥
परंतु परधर्म पाहोन । संतोष मानावा मानसीं ॥ २ ॥
हें ईश्वराचें कौतुक । ईश्वर मायाचालक ॥
अनेकमार्गदर्शक । ईश्वर सर्व ॥ ३ ॥

या तीन ओव्यांत परधर्मसहिष्णुतेचें [ Religious toler tion ] केवढें उदार तत्व गोवलें आहे तें पहा ! हा सिद्धांत परधर्माची निंदा करणाऱ्या स्वधर्मोत्कर्षेच्छूनें हृदयपुटीं ठेवावा !

१३ ग्रंथसमाप्तीचे प्रसंगीं निरंजनमाधव आपल्या पत्नीस म्हणतातः—

तूं तंव भक्तिमती नारी । माझी परम प्रिय सुंदरी ॥
ह्मणोनि गुरुसांप्रदायकथा विस्तरीं । कथिलीं म्या प्रेमें ।
गौरी शंकराची वल्लभा । किंवा सूर्याची प्रभा ॥
अग्निशक्ति शुभा । स्वाहा जैशी ॥ २ ॥
किंवा चंद्राची दीप्ति । किंवा वायूची सदागती ॥
कुबेराची संपत्ति । तैशी तूं सती मम प्रिया ॥ ३ ॥
किंवा ब्रह्माणी ब्रम्ह्याची । इंदिरा जैशी विष्णूची ॥
प्राणप्रिया आत्मयाची । चित्कळा तेंवि ॥ ४ ॥
जैशी शर्करेची मधुरता । कीं उदकाची शीतळता ॥
सुधेची शुभ्रता । नये निवाडितां भिन्नत्वें ॥ ५ ॥
तुज मज भिन्नभाव तत्वता । नसोन दिसे बोलापुरता ॥
जललहरी हे वार्ता । उपाधीकृत ॥ ६ ॥

१४. असो. आतां या दोन्ही लेखांतील महत्त्वाचे मुद्दे वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत ते, ( १ ) पृथ्वीरत्न बाजीरावाची स्तुति कवीनें केलेली यथार्थ आहे. बाळाजी बाजीरावाची राजकार्यनैपुण्याची कवीनें तारीफ केली आहे. व " बाळाजीपंडित प्रभुवर । मुख्य प्रधान परि राजेश्वर " म्हणून त्याच्या वाढलेल्या सत्तेचा उल्लेख केला आहे. कवीचें व त्यांचें किंचित् मधें बिनसलें होतें, तेव्हां इंगितज्ञ व निस्पृह अशा निरंजनमाधवानें तीर्थयात्रेच्या

मिषानें पुण्यांतून पाय कां काढला याचेंहीं कारण त्यानेंच दिलेलें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पिशुनजनांनीं असत्य भाषणें करून नानासाहेबांचें मत आपल्याविषयीं कलुषित केलें असें कवि म्हणतो. ( २ ) निरंजनमाधवाच्या प्रवासांवरून व तीर्थयात्रांवरून त्या काळच्या स्थितीची कल्पना होते. बापजी-पंडितासारखीं प्रपंच व राजकारण हीं दक्षतेनें करणारीं माणसें वस्तुतः अलिप्त असून नित्य समाधिसुखाचा अनुभव घेणारीं अशीं शें-दीडशें वर्षांपूर्वीं आपल्या समाजांत फार असत. नौकरीच्या पेशाच्या लोकांना स्नानसंध्येलाही वेळ मिळत नाहीं, म्हणून अलीकडे कांहीं लोक कुरकुरतात ! निरंजनाची योगांत व परमार्थांत गति फारच झाली होती. ( ३ ) निरंजनमाधव व त्यांची पत्नी गंगावती यांचे परस्परसंवाद वाचून व निरंजनानें तिच्यासाठीं काव्यें केलीं, तिला परोपरीनें गोड, प्रेमळ व सन्मानपूर्वक शब्दांनीं आळवून आपली शिष्यीण व सांप्रदायाची कर्ती शास्ती केली यावरून व शेवटच्या पतिपत्नीच्या अभेदरूपाचें वर्णन वाचून आमच्या समाजांत स्त्रियांस शिक्षण कसें देत व किती मानीत हें कोणासही कळणार आहे. ‘ निजसुंदरीची प्रेमझरी । तत्रापि विज्ञापना कुसरी ’ या गुणांनीं पतीस मोहणाऱ्या स्त्रिया जुन्या पद्धतीच्या शिक्षणानेंही तयार होतील एवढें यावरून दिसतें. आका, वेणू, जनाबाई, मुक्ताबाई, इत्यादि स्त्रियांचीं काव्यें, वामनानें आपल्या गिराबाई स्त्रीसाठीं प्रियासुधा ग्रंथ केला, निरंजनमाधवानें पांच सहा ग्रंथ केवळ स्त्रीसाठीं करून तिला आपल्या योग्यतेला आणली, मोरोपंत आपलीं काव्यें मुलीकडून व सुनांकडून वाचवून घेत, वगैरे प्रकार डोळ्यांपुढें असूनही आपल्या स्त्रियांच्या अज्ञानाविषयीं, अशिक्षणांविषयीं जे वृथा प्रलाप काढतात त्यांना काय म्हणावें हेंच मला समजत नाहीं !

---

निरंजनमाधवकृत

# श्रीज्ञानेश्वरविजय.

## पूर्वखंड ( आदिप्रकरण. )

### अध्याय पहिला.

॥श्रीमत्सुंदरकृष्णाय नमः ॥ श्रीमहागणाधीशाय नमः ॥
॥श्रीशारदांबायै नमः ॥ श्रीलक्ष्मीधरगुरुभ्यो नमः ॥
॥श्रीमहामौळिपूर्णानंदगुरुभ्यो नमः ॥ ॐश्रीज्ञानेश्वरगुरुभ्यो नमः ॥

ज्ञानेशो भगवान्विष्णु र्निवृत्तिर्भगवान्हरः ।
सोपानो भगवान्ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मणःकला ॥ १ ॥

जें ईटेवरि शोभतें कटितटीं हस्तांबुजें ठेउनि
धाले जे सनकादि शंकरमुनी ध्यानामृता सेउनी ।
हें मी वंदितसें निरंतर दिसे दृष्टीस या सावळें
जें अत्यंत सुवर्ण गोड विलसे चिन्मात्र जें कोवळें ॥ १ ॥
या लोकीं गणनाथ बोधमय या भावोनियां पूजिजे
किंवा यासचि शारदा म्हणुनियां विद्यात्मिका भाविजे ।
शुद्धानंदविलास यासचि गुरू हें नामही ठेविजे
तें मद्दैवत हृत्सरोजभुवनीं सर्वात्मका ध्यायिजे ॥ २ ॥
श्रीलक्ष्मीधर बापदेव करुणें चित्तत्व जें जोडलें
तें ज्ञानेश्वर नामकें सगुण या लोकत्रयीं रूढलें ।
त्याचे दिव्य विलास वर्णिन मुखें संतोष देती जना
यावें या चरितार्णवासि सुजनीं सानंद उन्मज्जना ॥ ३ ॥
नमीन मी सद्गुरु आदिदेवा । ज्ञानेश्वरा पुण्यतमप्रभावा ।
वर्णीन तुझ्या चरितामृतातें । जिंती सदा जें त्रिदशामृतातें ॥ ४ ॥
कृष्णें गीतार्थ पार्था कथुनि अतितमा नाशिले त्या विषादा
तेव्हां तो विश्वरूपा निरखुनि नयनीं पावला पूर्ण बोधा ।
त्याचा तो अर्थ सोपा प्रकट कलियुगीं प्राकृतातें कराया

झाला तो देहधारी हरि उघड पहा ! सादरें ज्ञानराया ॥ ५ ॥
कृपा करावी मज बुद्धि द्यावी । ज्ञानेश्वरा ! कीर्ति तुझी वदावी ।
तुझ्या प्रसादें जड चेष्टवीतें । जडासि नाहीं नवलाव येथें ॥ ६ ॥
चित्ता चेतविसी मना मनविसी सर्वेंद्रियां चाळिसी
प्राणा हालविसी गुणा प्रकटिसी विद्या स्वयें दाविसी ।
मोहातें हरिसी मतीस वरिसी तूं अंतरीं राहसी
जिव्हे बोलविसी असें घडविसी चिच्छक्ति तूझी असी ॥ ७ ॥
लोकीं या घडतें जनांत असतें तूं वेगळें काणतें
नेत्रीं जें दिसतें श्रुतीं परिसतें जें बोलतें चालतें ।
दे घेतें उठतें तसेंचि बसतें जें नीजतें हांसतें
विज्ञानात्मक तूंचि एक असशी भावासि या जाणतें ॥ ८ ॥
यासाठीं मम हृत्सरोजभुवनीं अव्यक्त हो ऊघडा
दावीं या रसनापथें तव जना सन्मार्ग हा रोकडा ।
यातें जे निरखोनि चालति पुढें तद्धाम ते पावती
ऐशी हे मज बुद्धि दे त्रिभुवनाधारा अळंदीपती ॥ ९ ॥
देवा ! त्वां पाहलेंचि पादकमळा सेवावया लाविलें
यालोकीं निजदास रूढउनियां सर्वांसि त्वां दाविलें ।
आतां तेंचि मनीं धरोनि सदया ! त्वत्कीर्ति हे बोलवीं
कैसा आजि मला उपेक्षिसि विभू त्वां घेतलें पालवीं ॥ १० ॥

## कुसुमशर वृत्त.

नमन तुज नमन तुज नमन तुज देवा !
परम गुणनिधि असासि अगुण विभुदेवा !
न कळसिच विकळ बहु हुडकिति तुला ते
श्रुति अझुणिवरि विवरि तव गुणकला ते ॥ ११ ॥
घडसि जरि सकृप तरि कळसि सुजनातें
करिति परि अमुप तप न दिससि जनातें ।
शरण तुज निघति मनिं धरुनि पदपद्मा
नमिति तरि लभति गदरहित सुखसद्मा ॥ १२ ॥
श्रोते सज्जन सांख्ययोगनिपुणा सज्ञानवंता जना
वेदाभ्यासपरायणा सुविबुधां पांडित्यसद्भूषणा ।
नाना याज्ञिक श्रौतकर्मकरणा नाना तपस्वी गणा
भावें किंकर मी निरंजन करीं वंदोनियां प्रार्थना ॥ १३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. नं. ... ता. ... नाशिक शाखा

आहे कीं भगवंत सर्वगत हा सर्वस्वरूपी हरी
सर्वांमाजि वसोनि सर्व परिच्या क्रीडा विचित्रा करी ।
तो ज्ञानेश्वर नाम साच घडला ताराक्या सज्जना
त्याचें सच्चरितार्थ वर्णिन असी मी इच्छितों कामना ॥१४॥
नेणें काव्यकलाकलाप अथवा कौशल्य नेणें कसें
योगीं तों गति ठाउकीच न दिसे, वेदांत ठावा नसे ।
वैराग्याप्रति भेटि तों मज नसे ते भक्ति नेणे कसी
ध्यातो श्रीगुरुज्ञानदेवचरणांभोजासि या मानसीं ॥१५॥
तो प्रेरी रसनेसि यास्तव यथाज्ञानें यथार्थीपणा
वर्णावीं चरितें ह्मणोनि धरिलें म्यां धैर्य हें आपणा ।
टाकावे बहु दोष काव्यरचनीं एका गुणा आदरा
सद्भावार्थ असे जगद्गुरुपदीं हा साच चित्तीं धरा ॥१६॥
मूळापासुनि सर्व वृत्त कथणें याकारणें लागलें
संदर्भाविण कोण लोक उमजे जाणे कसें चांगलें ।
यासाठीं पुरुषत्रयादि बरवी घेवोनि वर्णीतसें
तें सद्भक्तचरित्र पूर्ण विभवें शोभे भजा मानसें ॥१७॥

## अथ कथाप्रारंभ.

श्रीगोदातट रम्य पावन असे मोक्षार्थ दे या जना
आपेगांव अपूर्व पुण्य वसती सौख्यासि ये सज्जना ।
तैं गोविंद महानुभाव विलसे सद्विप्रचूडामणी
गैनीनाथकृपे अलभ्य मिळला सज्ञानरूपी मणी ॥१८॥
सारी सत्कर्मयोगा विधिसहित सुखें आश्रमीं योगनिष्ठा ।
नीराबी नाम भार्येसह भजत गुरू नाम गैनी वरिष्ठा ।
भक्तिप्रेमानुबंधें विरति अतिशयें वर्ततां काळकर्मे
झाली गर्भासि धर्ती द्विजवरवनिता वर्ततां नित्य धर्मे ॥१९॥
आनंदांकुर तो प्रकाशित दिसे त्या भक्तिगर्भी जसा
आला विठ्ठल तोचि दिव्य उदरा वाटे मला भर्वसा ।
झाले नौ महिने निशा हरुनियां व्याली उषा ज्या परीं
लोकीं सद्रविबिंब, हे प्रसवली पुत्रा तसी सुंदरी ॥२०॥
यातें विठ्ठल नाम ठेउनि पिता तो नामकर्मे करी
बालत्वावरि मुंजबंधन विधी सानंद तो आदरी ।

वेदाध्यापन धर्मशास्त्र विहितें श्रौतादि सांगे पिता
हा वैराग्यविलासवंत न धरी संसारचिंताकथा ॥ २१ ॥
वैराग्यें सदृढें नमोनि पितरां तो स्नातकार्थी घडे
केलीं उत्तरमानसादि सकळें तीर्थं सुभावें पुढें ।
आला द्वारवतीस सुंदर हरी पूजोनि भक्ती तया
शंखोद्धारक तीर्थराज निरखी पिंडारका चिन्मया ॥ २२ ॥
देखे दिव्य सुदामविप्रनगरी हे द्वारका दूसरी
जेथें श्रीधर मूळमाधव असे तो देखिला श्रीहरी ।
ये त्याहोनि पुढें प्रभास विलसे तेंही दिठीं देखिलें
देखे ते मुचकुंदभूपतिगुहा हें चित्त तें रंगलें ॥ २३ ॥
ऐसा मार्ग उलंघितां निरखिलें त्या सप्तशृंगाचळा
तेथें जे विलसे सदा भगवती दाक्षायणी चित्कळा ।
तीतें सेउनि पातला द्विज सुखें गोदावरीच्या तटीं
शोभे पंचवटी निरीक्षण करी श्रीरामसीता दिठीं ॥ २४ ॥
कापालेश्वर पूजिला मग निघे श्रीत्र्यंबकालोकना
पाहे ब्रह्मगिरी कुशावत महातीर्थी करी मज्जना ।
भीमाशंकर ज्योतिलिंग निरखी आला अलंदीपुरा
इंद्राणी अवलोकिली सुरनदी साक्षात्त्रिलोकोद्धरा ॥ २५ ॥
केलें स्नान अतीव पावन जळीं श्रीचक्रतीर्थी तदा
भस्मोद्धूलित आसनावरि बसे संध्याजपार्थी मुदा ।
सिद्धोपंत महानुभाव वसती तद्ग्रामवासी सदा
जो सिद्धेश्वर तोचि हा द्विजतनूधर्ता दिसे सर्वदा ॥ २६ ॥
सदाचार निष्ठा करी अग्निहोत्रा । सदा मान्य जो विप्रधुर्या पवित्रा ।
स्वधर्मासि या नित्य पाळोनि राहे । महाज्ञान संपन्न चिद्वस्तु पाहे ॥ २७ ॥
घरीं सुंदरी धर्ममार्गानुकूला । पतीच्या मनासारिखी पुण्यशीला ।
असें दिव्य दांपत्य धर्मी विराजे । सदाभ्यागता पूजिती भक्तिभोजें ॥ २८
तयांनीं दिठीं देखिलें या द्विजातें । सदा ब्रह्मचर्यें विराजे अशातें ।
दिसे सूर्य भूमंडळा काय आला । असी सत्प्रभा देखतां स्तब्ध झाला २९
म्हणे कुंभजन्मा असे तीर्थवासी । ऋषी सांख्यकर्ताचि वाटे मनासी ।
अहो ! हा मुनी आणखी कोण आहे । जया देखतां पाप कोठें न राहे ३०
नमस्कार साष्टांग केला द्विजेंद्रा । चला मंदिरा माझिया ज्ञानचंद्रा ।
अम्हां मानसीं बेधली रूपमुद्रा । घडे तोष अत्यंत चित्ता समुद्रा ३१

पुसे पाय कोठूनि आले वदावें । मला धन्य या लोकमार्गी करावें ।
चलावें गृहा आजि हा लाभ द्यावा । मना आवडे साधिजे पादसेवा ३२
वदे विप्र आम्ही असों तीर्थवासी । अम्हांलागि जाणें असे पंढरीसी ।
जधीं देखिली शुद्धभीमा मनाला । तदारभ्य अध्यास ऐसा उदेला ॥३३॥
असें ऐकतां तोष चित्तें घरातें । बहु प्रार्थिला ने तदा विठ्ठलातें ।
महाभावसंपन्न देखोनि तोषें । घरा चालिला श्रीमुखीं नामघोषें ॥ ३४ ॥
घरीं पूजिला ठेविला दीस कांहीं । तदां पाहिली रम्यचर्या तयांहीं ।
बरा दंपतीलागि चित्तासि आला । परामर्ष या सत्कुळाचाच केला ३५
ययां स्वप्नही दाविलें विठ्ठलानें । घरीं कन्यका यासि दीजे विधानें ।
मना आवडे तोचि स्वप्नार्थ वाटे । तदां दंपतीच्या मना हर्ष वाटे ॥ ३६
पुसों लागले सर्व वृत्तांत यातें । कुळाचार सद्गोत्रवृत्ती समेतें ।
वदे ग्राम गोदातटीं दिव्य आहे । पिता माय माझी असे तेथ पाहे ३७
घरीं वृद्ध मातापिता क्षेत्रवासी । अपेगांविची वृत्ति तेथील जोशी ।
यजुर्वेद वाजीसनी शुद्ध शाखा । असें बोलतां तोष पंतासि देखा ३८
तदां बोलती हे वधू सुंदरांगी । जशी रुक्मिणी रुक्मवर्णा शुभांगी ।
तुम्हां अर्पिजे हेंचि आलें मनाला । पहा आमुच्या गोत्रजां सज्जनाला ३९
म्हणे मार्गिच्या तीर्थिका दिव्यकन्या । कसी अर्पितां आपुली लोकमान्या ।
घरीं मायबापाविना लग्नसिद्धी । कसी ते घडे हे नव्हे युक्त बुद्धि ॥४०॥
प्रवासीं नसे वित्त गांठीस कांहीं । नव्हे युक्त संबंध हा साच पाहीं ।
अम्ही जातसों तीर्थयात्रे यदृच्छा । नव्हे बोलणें योग्य हें ज्ञानदक्षा ४१
तईं दंपती बोलती या द्विजेंद्रा । यथायोग्य हें सांगसी धीसमुद्रा ।
तुला देखतां चित्त ऐसेंचि मानी । वरीं अर्पिजे हे वधू सद्विधानीं ॥४२॥

ज्ञानी रूपस सत्कुलीन तरणा साधू तपस्वी असा
विद्यावंत विचारशील शुचितासौजन्यसिंधू तसा ।
गांभीर्यादिगुणें सदा विलससी सत्पात्र भाग्यें अह्मां
जामाता हरिनें दिल्हा न करितां सायास ये आश्रमा ॥ ४३ ॥
नांगीकार करी मला ह्मणतसे तीर्थासि जाणें पुढें
श्रीरामेश्वर मुख्य दक्षिण दिशे आहेच कीं रोकडें ।
हें मी साधुनि कृत्य येइन पुन्हा संवत्सरें आलया
तेव्हां मान्य करीन गोष्टि तुमची पित्रां मना आलियां ॥ ४४ ॥
तेव्हां खिन्नमनें निशीथ समयीं अत्यंत जायापती
देखे विठ्ठल स्वप्न रात्रिसमयीं वृंदावनीं सन्मती ।

“ हा तूझाचि विभाग सत्य विलसे पूर्वीच हा नेमिला
ब्रह्मयानें तुजकारणेंचि घडिला आहे द्विजा ठेविला ” ॥४५॥
आला ब्राह्मण वृद्ध रूप धरुनी प्रत्यक्ष तैसा वदे
अंगीकार करोनि दिव्य ललना तीर्थासि जाईं मुदें ।
हा तूझाच विभाग निर्मित असे या अन्यथा कैं घडे
आहे कार्य विचित्र फार जगतीं सत्कीर्ति वाढे पुढें ॥ ४६ ॥
अंगीकार करीं न आग्रह धरीं होणार कैसें चुके ?
कीजे लग्नविधान त्यावरि पुन्हा तीर्थासि जावें सुखें ।
तीन्ही देव इच्या कुसीं प्रकटती ऐकोनियां चोजला
‘ होणारा प्रति कोण काय चुकवूं लाहे ’ असे बोलिला ॥ ४७ ॥
केलें मान्य तदां सुतोपमनसें ते सोयिरे धायिरे
पंतीं लग्न करावयासि समुदें ते आळविले बरे ।
सामग्री समुदी यथास्थित घडे ज्या नेमिल्या वासरीं
झाली सिद्ध यथेष्ट सुंदर वधू अर्पावया साजिरी ॥ ४८ ॥
सालंकारयुता सुता द्विजवरा सिद्धेश्वरा सान्निधी
जैसा क्षीरनिधी रमा स्वतनया विष्णूसि अर्पी विधी ।
ज्येष्ठीं लग्न घडे तदां मग पुढें आषाढ आला भला
झाला उत्सवकाळ पंढरपुरीं ज्याला मिळेना तुला ॥ ४९ ॥
जामाता श्वशुरीं प्रयाण करितां ते पावले पंढरी
श्री ईटेवरि शामसुंदर उभा तो देखिला श्रीहरी ।
आले वैष्णवभार फार करिती सत्कीर्तनें सादरें
वीणा ताळ मृदंग नाम कडके टाळ्या अनेकास्वरें ॥ ५० ॥
तोही उत्सव पाहिला मग निघे तीर्थाटणा दक्षिणे
सिद्धोपंत ‘ अवश्यमेव ’ ह्मणती जावें सुखें आपणें ।
यावें शीघ्र बहूत दीस न लवा श्रीविठ्ठलाज्ञा अशी
आहे यास्तव म्यां निरोप दिधला नस्तां अह्मां मानसीं ॥ ५१ ॥
नमुनि विठ्ठल जाय पुढें तया । करि बिजे जगदीश सर्वे जया ।
परम सौख्य गमे हरिकीर्तनें । करित तीर्थ फिरे मनचिंतनें ॥५२॥

## आर्या

ज्ञानेश्वरविजयाभिध सुंदर योगी निरंजनें केला ।
ग्रंथ गुरुस्मरणें हा मान्य घडो सर्व साधु पुरुषांला ॥ ५३ ॥

॥ इति श्रीज्ञानेश्वरविजय माधवनंदन कवि बनाजि विरचित प्रथमाध्याय समाप्त ॥ श्रीज्ञानदेवार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥

---

# अध्याय दुसरा.

देखे आद्य निवृत्तिसंगम असे कृष्णासरित्सतकें
श्रीशैलेश्वर औभलाख्य नृहरी वंदोनियां कौतुकें ।
देख शेषगिरीश वेंकटपती श्रीकांत जेथें वसे
श्रीभूमीसह भूवराह निकटीं विप्रेंद्र सन्मानसें ॥ १ ॥
कांची व्याघ्रपुरी तशीच निरखी ते काळहस्ती बरी
देखे श्रीअरुणाचलादि विमलें स्थानें यथा भूवरी
पाहे दिव्य चिदंबरेश शिव तो आकाशरूपी पुढें
श्री वृद्धाचल वृद्धलिंग निरखी वंदी पदाब्जें दृढें ॥ २ ॥
तें चोळमंडळ निरीक्षण सर्व केलें । कावेरिकातट शिवालय पुण्यकाळें
श्रीकुंभकोणप्रभृती बहु शर्वलिंगें । मन्नार कृष्णमुख विष्णुपदें अनेगें ॥३॥
रामेश्वरा निरखिलें रघुनाथसेतू । स्नानें करोनि द्विज हा करि पूर्ण हेतू
देखे जनार्दन पुढें मदुराभवानी । मीनाक्षिणी परमसुंदर नाथराणी ॥ ४ ॥
श्रीरंगनाथ शिवजंबु शिवापलिंगें । स्थानें विचित्र निरखी हरिचीं अनेगें
गोकर्णतीर्थ अवलोकुनि आदिमाता । कोलापुरीं निरखिली जगदीशकांता ५
देखे अपूर्व करहाटक कृष्णवेणी । श्रीकोयना प्रियसमागम पुण्यखाणी ।
ते माहुली निरखिली जनमुक्तिदात्री । आला अळंदिस पुन्हा निरखी स्वनेत्रीं ६
सिद्धोपंतीं श्रवण करितां हर्षसंयुक्त वेगीं
जामातातें दृढतर धरी पोटिशीं सानुरागीं ।
नेला गेहा प्रिय सुहृदजना भेटुनी स्वल्प काळें
जावें वाटे जनकजननीदर्शना हचि बाळें ॥ ७ ॥
सिद्धोपंतीं स्वदारा कुमरकुमरिकां सिद्ध केलें कुटुंबा
संगें या विठ्ठलाच्या निघति सकलही देखिलीं तात अंबा ।
सासूच्या दर्शनाचा अतिशय महिमा तोष तो बोलवेना
वृद्धां संतोष झाला सुत महवनिता देखतां वर्णवेना ॥ ८ ॥
पूजा वृद्धांसि केली मणिधनवसनें भूषणें व्याहियात
सिद्धोपंतीं स्वतापें वधुवर सदनीं ठेविलें तापचित्तें
गोदास्नानासि भावें करुनि सुनियमें जायिजे ग्रामवासा
ऐसा उत्साह वाटे निजहृदयमठीं चिंतिलें पंढरीशा ॥ ९ ॥

निरोप घेवोनि फिरे गृहासी । झाला पुन्हा सुस्थिर ग्रामवासी ।
कांहीं दिसां विठ्ठलमायबापा । वैकुंठयात्रा घडली अपापां ॥ १० ॥
दारापती राहति स्वस्थचित्तें । उद्वेग नाहीं मनि विठ्ठलातें ।
प्रारब्धयोगें मिळतां स्वकाळीं । तें भोगिजे स्वस्थ मनांतराळीं ॥ ११॥
कांहीं असा काळ ययांसि गेला । संसारचिंताचि नसे जयाला ।
कंठी स्वतोषें भगवंतबुद्धि । पडेचिना जो सहसा उपाधि ॥ १२ ॥
सिद्धोपंतीं ऐकिलें वृत्त ऐसें । संसारीं तें चित्त यांचें न बैसे ।
गेले तेथें पंत भेटावयातें । जामातासी देखिलें कन्यकेतें ॥ १३ ॥

## शिखरिणी.

यदृच्छालाभें जो परम सहजानंदभरितें
सदां योगाभ्यासीं हरिगुरुपदीं मानस रते ।
मुखीं चाले नारायण हरि असी नामलतिका
यथान्यायें कालक्षपण करणें मात्र इतुका ॥ १४ ॥
तदा सिद्धोपंतीं बहुत विध प्रार्थोनि उभयां
अळंदीतें आणी वसउनि करी पुण्यनिलया ।
समीपीं ठेवोनी सकळ करि निश्चिंत सहसा
हरीची हे इच्छा म्हणुनि निवसे तुष्टमनसा ॥ १५ ॥

राहे अळंदीस सुखें सुतोषें । सदां करी कीर्तन नामघोषें ।
सत्संग साधूपुरुषीं सदांही । यात्राद्वयीं पंढरि जात पायीं ॥ १६ ॥
कदापि नेघे जनलोक संगें । वीणा करीं एकट जाय आंगें ।
गेला तया काळ कितेक ऐसा । मना नये पुत्रविषीं भरोसा ॥ १७ ॥
वैराग्य चित्तीं अनुताप होता । सुटावयाची करि दीर्घ चिंता ।
कांतेसि बोले मजलागि आज्ञा । देईं सखे तूं अससील सुज्ञा ॥ १८ ॥
संन्यास घेईन मनासि वाटे । जाणें नको संसृतिघोरवाटे ।
विमुक्तचित्तें विचरोनि आतां । पावेन मीं ब्रह्मपदा अनंता ॥ १९ ॥
म्हणे रुक्मिणी काय हें प्राणनाथा । न होतां कसा पुत्र संन्यास घेतां ।
निषेधोनि वृत्तांत सांगे पित्यासी । असे पूर्ण जामात तूझा उदासी ॥२०
असे सर्वदा सावधानेंचि गेहीं । करी भाषणा युक्त जाणोनि तेही ।
अकस्मात हे व्यग्र कार्यांत होती । तदा पूसतां जा म्हणे भ्रांत चित्तीं ॥२१
मिसें तेवढया चालिला शीघ्रकाळें । जसा पक्षिया तूटतां तंतुजाळें ।
तसें वाटलें विठ्ठला हा निघाला । त्वरें नीट काशीस हा विप्र आला ॥२२॥

निरीक्षोनि संन्यासिया ज्ञानपूर्णा । धरी पादपद्में म्हणे तारि दीना ।
महासंसृतीची असे घोर बेडी । त्वरें ज्ञानशस्त्रें विभू आजि तोडी ॥२३॥
सुवैराग्य देखोनि याचें महंतें । तदा दीधला श्रेष्ठ संन्यास यातें ।
यया ज्ञान वैराग्य पूर्वींच होतें । यया मुख्य वेदांत सांगे सदर्थें ॥२४॥

श्रीशारीरक भाष्य तें पढविलें गीता सभाष्यें बरी
श्री वासिष्ठ अहर्निशीं गुरुमुखें शोधोनि निष्ठा धरी ।
नानायोगमतें विचित्र निरखा अध्यात्मबोधीं हिता
वेदांतोपनिषद्विचार घडला संतोष दे आयिता ॥ २५ ॥

महाबुद्धिवंतासि स्वल्पाच काळें । बरें ज्ञानविज्ञान चित्तीं उदेलें ।
उदासीन वायू तसा काळ सारी । गुरूच्या मना फार संतोषकारी ॥२६
म्हणे मानवी हा नव्हे ईश्वराचा । असे अंश कोणीच मद्भाग्य साचा ।
गुरूहोनिही शिष्य संपूर्ण झाला । गुरूच्या मनीं तोषभानू उदेला ॥२७॥

घरीं रुक्मिणी वाट पाहे पतीची । म्हणे काय झालें मनीं ते विवेची ।
तदां सूचलें बोलिलें जा म्हणोनी । दिल्हा कीं दगा प्राणनाथें निदानीं ॥२८
महा खेद चित्तीं धरी काळ कंठी । उदासीन हेही घडे कंबुकंठी ।
सदां अंतरीं ते पतीलागिं चिंती । जिच्या मानसीं लागली थोर खंती ॥२९॥
सदां नित्य अश्वत्थसेवा करावी । अशी जाहली बुद्धि उत्पन्न जीवीं ।
सनी शुद्धभावा करी वृक्षसेवा । असी कंठितां कीव ये वासुदेवा ॥३०
अकस्मात काशींत याच्या गुरूतें । मनीं वाटलें या मठीं विठ्ठलातें ।
सुखें स्थापिजे जायिजे रामलिंगा । पुन्हा येइजे सेविजे देवगंगा ॥ ३१ ॥
असें वाटतां नीघता होय वेगीं । पथीं चालतां ये अळंदीस मार्गीं ।
अकस्मात आकाशपुष्पाप्रमाणें । विधीनें तया आणिलें हेंचि मानें ॥३२॥
यती वोढिला साच ईच्या तपानें । अकस्मात अश्वत्थनारायणानें ।
जयाची महा दुर्घटा योगमाया । कळेना कधीं वेधया देवराया ॥ ३३ ॥
महातेजसंपन्न देखोनि यातें । बहू जाहला तोष चित्तीं सतीतें ।
त्वरें टाकिली वृक्षसेवा सतीनें । नमस्कारिला श्रेष्ठ शुद्धामतीनें ॥ ३४ ॥
म्हणे पुत्रवंती घडे शीघ्र बायां । मुखीं नावती वर्ण संतोषदायी ।
इच्या लोटलें नेत्रयुग्मांत पाणी । बहू जाहली खिन्न हे कीरवाणी ॥ ३५ ॥
यती चोज मानी म्हणे हे सुकांता । ममाशीर्गिरा ऐकतां खेदवंता ।
पुसे हा यती भामिनी शुद्धभावा । ममोक्तीं तुला कां घडे खेद जीवा ॥३६॥
असें पूसतां बोलिली त्या यतीतें । असे प्राप्त संन्यास माझ्या पतीतें ।
पुरी काशिकेमाजि संन्यास तेणें । असे घेतला ऐकिलें साच जाणें ॥ ३७ ॥

मला पुत्र होतील कैसे कृपाळा । निघे कासया श्रेष्ठवाणी कपाळा ।
असें ऐकतां या यतीतें चपेटा । मना लागला बोल माझा न खोटा ॥३८॥
कधीं या मुखीं व्यर्थ वाणी निघेना । न होती इला पुत्र हेहीं घडेना ।
सती पूसतां लक्षणें सर्व सांगे । यती ऐकती सादरें सानुरागें ॥ ३९ ॥
तदां ते घरा नेत संन्यासियासी । कथी श्रेष्ठ हें पात्र आलें पित्यासी ।
सिधोपंत वंदोनि पादद्वयातें । मुनींद्रासि भिक्षा दिल्ही तोषचित्तें ॥ ४० ॥
तदां बोलतां जाणवे शिष्य माझा । दिल्हा त्यासि संन्यास आम्हींच वोजा ।
पित्याला म्हणे घ्या तुम्ही या सतीला । इला भेटवूं शीघ्र यीच्या पतीला॥४१॥
मला फीरणें प्राप्त झालें यदृच्छा । घडे सर्वही एक तें ईश्वरीच्छा ।
मला पूर्ण रामेश्वरीं सेतुयात्रा । पहा प्राप्त झालीच योजूं कलत्रा ॥ ४२ ॥
सतीच्या तपें आणिलें साव मातें । यिचें सांकडें सत्य सर्वोत्तमातें ।
पुढें मी उपेक्षा करीं त्याच काळीं । यिचें पुण्य माझ्या तपा कां न जाळी
तदां वृद्ध मातापिता कन्यकेशीं । यतीच्या सवें नीघता काशिकेशीं ।
दिठीं देखिला ते पुरी शंकराची । महाराजधानीच विश्वेश्वराची ॥ ४४ ॥
ययां ठेविलें अन्य गेहीं समस्तां । मठालागिं श्रीपाद आले प्रशस्ता ।
गुरूपाद वंदोनियां शिष्य बोले । कसें शीघ्र येणें घडे अल्पकाळें ॥ ४५ ॥
न झाली दिसे पूर्ण संकल्पसिद्धी । पथीं जाहली कोण ऐशी उपाधी ।
कधींही नव्हे सत्यसंकल्पहानी । निघेना कधीं या मुखीं व्यर्थ वाणी ॥४६॥
असें बोलतां शिष्य चैतन्य नामा । गुरूच्या पदीं ज्यास अत्यंत प्रेमा ।
तदां पूसती सद्गुरू सत्य सांगें । घरीं कोण टाकोनि आलासि मागें ॥४७॥
असे ग्राम कोठें तुझा दक्षणेसि । तुझे कोण होते तया ग्रामवासी ।
कथीं साच वृत्तांत मागा अम्हासी । असत्यें महापातकी तूंचि होसी ॥४८॥
तदां निर्व्यलीकें कथा सर्व सांगे । मला वाणतां पूर्ण वैराग्य आंगें ।
सती टाकिली एकटी मातृगेहीं । निरोपा तिच्या घेतला या उपायीं ॥४९॥
असी मीनली गोष्टि मागीच जेव्हां । स्वशिष्यासि आज्ञा करी स्वामि तेव्हां ।
सतीलागिं हातीं धरीं जा गृहासी । इला पुत्र उत्पन्न कीजे सुखेशीं ॥५०॥
ऋतुस्नात कांतेसि देयीं रतीतें । अशा सेवनें तोषवीं साच मातें।
इला पुत्र तीघे तसी एक कन्या।अपत्यांसि निर्माण कीजे सुधन्या ॥ ५१ ॥
पुन्हां येयिजे राहिजे स्वस्थचित्तें । असें ऐकतां मान्य केलें महंतें ।
म्हणे देह हा वाहिला पादपद्मा ।करूं वाक्य तें मुख्य सेवाचि आम्हां॥५२॥
अम्हीं पाळिजे वाक्य आधीं गुरूचें । ययामाजि तें आमुचें काय वेंचे ।
पुढें काय होणार तुम्हीं पहावें । अम्हीं दास्य सांगातलें तें करावें ॥ ५३ ॥

गुरू बोलती साच होणार तैसें । घडो आणितो काळ निश्चित बैसे ।
करीं वाक्य माझें नको फार बोलुं। नको याविना अन्यपंथेंच चालूं ॥५४॥
तदां घेतली रुक्मिणी सासुरीतें । यतो चालिला तो पुन्हा ग्रामपंथें ।
अळंदीस येऊन सुस्थीर झाले । यथापूर्व संसार तो पूर्ण चाले ॥ ५५ ॥

चैतन्याश्रम हा गृहाश्रम करी ह ऐकिलें ब्राह्मणीं
केला त्याग यथा कुळासि सकळीं त्या सौहृदांच्या गणीं ।
कोणी दर्शनही कदापि न करी वंदील तैं कोणता
याच्या पाहुनि लोकनिंदितपथा मानी कसा जाणता ? ॥ ५६ ॥
झाला कीं उपहास फाराचि जनीं भिक्षा मिळेना तदां
पाला भक्षुनि वृक्षसंभव कधीं तोयाशनें एकदां ।
भक्षी वायु कधीं कधीं करतळीं भिक्षान्न भक्षोनियां
ऐसा द्वादशवर्ष काळ क्रमिला माया न चित्तीं तया ॥ ५७ ॥
येतां तो ऋतुकाळ एक दिवशीं वीर्यासि योजी मुनी
तेव्हां गर्भ अमोघरेत उदया आला निवृत्तीमणी ।
श्रीज्ञानेश्वर देव हा उपजला खाणींत हीरा जसा
वैदूर्यासम दिव्यकांति धरिता सोपान झाला तसा ॥ ५८ ॥
मुक्तायी नवमौक्तिकोपम असे तीवांहुनी धाकुटी
चौघें माणवकें विचित्रपरिचीं हे दीसती गोमटीं ।
नामें हीं अतिचित्र ठेविति यया आकाशवाणी जसी
सांगे त्याचपरीं मुनींद्र परिसा अत्यादरें सौरभीं ॥ ५९ ॥
जैसा देवकि देवगर्भ वडला आला कुशीं ज्यापरीं
कौसल्येप्रति जेंवि राम उदरा आला स्वयें श्रीहरी ।
स्तंभीं तो प्रकटे जसा नरहरी तैसेंचि हेही पहा
मायाधीश्वरव्यक्ति पावति जना घेवोनि देहा महा ॥ ६० ॥

**॥ इति श्रीयोगी निरंजनमाधवविरचित ज्ञानदेवविजये जन्मचरित्रकथन नाम द्वितीय अध्यायः ॥ श्रीरामकृष्ण ॥**

---

# अध्याय तिसरा;

---:०:---

चैतन्याश्रम रुक्मिणी उभयतां चिंतातुरें जाहलीं
झाली संतति चांगली परि पडे जातीकुळावेगळी ।

प्रायश्चित्त यया कुळासि पडिलें कीं शुद्धपक्षद्वया
देवाची करणी निवारण करी तो कोण लोकीं यया ? ॥ १ ॥
तेव्हां ब्रह्मसभा बरी मिळविली चैतन्य सांगे तया
" आदेशें गुरुच्या यथेष्ट घडलें देवीं करावी दया ।
कामें लोभवशें कदापि घडलें नाहींच मायाभ्रमें
नाहीं लोलुप इंद्रियां वश नव्हे मी साच या अक्रमें ॥ २ ॥
प्रायश्चित्त ययासि काय वदिजे तें आचरें मी सुखें
आह्मां पंडित जाणते सकळही शास्त्रार्थ सांगा मुखें ।
पाहा ग्रंथ निबंध आचरण तें साही जणें आचरूं
उद्धारा पतितांसि ब्राह्मण तुह्मी लोकत्रयाचे गुरू " ॥ ३ ॥
पापीही तरती अनेक जगतीं स्वामीचिया दर्शनें
आम्हीं पामर उद्धरूं नवल हें नाहीं निवृत्ती ह्मणे ।
तैसा ज्ञाननिधी द्विजांसि विनवी सोपानही आदरें
यांचें भाषण ऐकतां द्विजवरां आश्चर्य चित्तीं भरे ॥ ४ ॥
हे चातुर्यनिधी बरे विलसती सारे कळांचे निधी
ऐशातें अकुलीन काय घडवी, दुर्वार मोठा विधी ! ।
हे बाळेंचि परंतु साच न तुळे यांसी सुरांचा गुरू
जातीमाजि उणें ययांसि नसतें होते जगाचे गुरू ॥ ५ ॥
तेव्हां ब्राह्मण पाहती बहुतसीं सद्धर्मशास्त्रें बरीं
जेथें वैदिक धर्मनिष्ठ बसले शास्त्री सभाभ्यंतरीं ।
देहांताविण दूसरी न निरखों संन्यासिया निष्कृती
ऐसा निश्चय या यतीस समुदे सद्विप्र ते सांगती !! ॥ ६ ॥
चैतन्याश्रम तेधवां नमुनियां सद्भाव सद्ब्राह्मणां
आतां जाइन मी प्रयाग नगरा त्रेणींत देहार्पणा
पश्चात्ताप पुरःसरें मग निघे टाकोनि पुत्रांप्रती
पूर्वीही नहुती ययासि ममता शंका तदां कोणती ? ॥ ७ ॥
लोकां मात्र दिसे गृहीं वसतसे, वैराग्य चित्तीं असे
यातें सद्गुरुवाक्य पाश चरणीं बांधोनि पाडीतसे
तोही मुक्त यथार्थ आजि घडला झाडोनियां चालिला
वैराग्यासम कोण दंड दुसरा शास्त्रीं असे बोलिला ॥ ८ ॥
गेला हा यति तैं प्रयागसलिलीं हा देह तैं अर्पिला
झाला मुक्त निजानुभूतिविभवें चैतन्य तो पावला ।

जैसा तो घट फूटतां नभ मिळे जावोनियां कारणीं
तैसा हा निरहंकृतीस्तव मिळे ब्रह्मीं जगत्कारणीं ॥ ९ ॥
जातां तो पति रुक्मिणी स्वपितरां अर्पोनि चौघें मुलें
चैतन्याश्रमपाठिसींच निघती झाली मनें निश्चळें ।
तेही जाउनियां प्रयाग नगरीं वेणींत देहार्पणा
केलें ते पतिलोक पाउनि वसे सेवोनि नारायणा ॥ १० ॥
आतां हे चवघी मुलें विलसलीं बापाविना राहिलीं
आलीं ब्रह्मसभेसि वंदुनि पुढें जोडोनि हस्तांजुळी ।
आह्मां काय गती ह्मणोनि पुसती ज्ञानी निवृत्ती तयां
श्रीमंतीं कथिजे विचार सुचला आणोनि चित्तीं दया ॥ ११ ॥
प्रतिष्ठाना जावें म्हणाति बुध ते या यतिसुतां
पतीतांचा तेथें घडल तरि उद्धार पुरता ।
तुह्मी आणा पत्रें तरि अह्मि करूं मान्य समुदें
महाज्ञानी तेथें वसति तुह्मि जाव परमुदें ॥ १२ ॥
दिल्हें विप्रीं हस्ताक्षर लिहुनियां पत्र बहिलें
तुह्मी जावें तेथें कथन करिजे सर्व पहिलें ।
तदां आलीं चौघें वसति निजगेहीं निजजनीं
निवृत्ती त्या काळीं वदति परिसावेंचि सुजनीं ॥ १३ ॥
ह्मणे ऐके ज्ञान्या ! अतिचतुर आहेसि बरवा
तुला सांगे माझा अनुभव तमोनाशक दिवा ।
नसे मातें कांहीं कुळ अकुळ मी ब्राम्हण नव्हे
नव्हे क्षेत्री वैश्यांतरि वृषलजाती न गणवे ॥ १४ ॥
नव्हे मी ते कांहीं त्रिदशगण गंधर्व ऋषि ते
नव्हे भूतें रात्रिंचर दितिज हो पुण्यजन ते ।
नव्हे पक्षी नोहे मृगगण पशू वृक्ष जड ही
बटू संन्यासी हो वनचर नव्हे आश्रम गृही ॥ १५ ॥
अनादित्वें आहे निबिड म्हणती चिद्धन जया
विनाशातें नेणें स्थिति जनन नेणाचि प्रळया ।
निजानंदीं साक्षी स्वरुप अति माझें बुझ मनीं
नव्हे मी ते कांहीं नभ मरुत तेजाप धरणी ॥ १६ ॥
नव्हों आम्हीं कांहीं त्रिगुणाचि महत्तत्व अथवा
विराटात्मा नोहे अगुण तरि मी जाण बरवा ।

नव्हे कांहीं जें जें वदति जन जें त्याहुनि पर
स्वरूपानंदीं मी निखिल सुख चैतन्य सपुर ॥ १७ ॥
अम्हां धर्माधर्मीं किमपि तरि संपर्क न वसे
निषेधाचा हो कां किमपि विधि निर्बंध न दिसे ।
नसे भेदाभेदीं अढळ निजरूपीं दिसतसे
अशा बोधानंदीं सहजसहजीं मी वसतसें " ॥ १८ ॥
तदां बोले ज्ञानेश्वर " वदसि तूं गोष्टि बरवी
निहारीं लिंपेना उदित वडला निश्चय रवी ।
जसें सोनें माती न धरित तसा शुद्ध अगुणी
गुरू चैतन्यात्मा असासि परिसावी विनवणी ॥ १९ ॥
करावी वेदाज्ञा प्रभु सकळ आचारविषयीं
धरी या सृष्टींत ह्मणुनि वसिजे त्याच समयीं ।
महाश्रेष्ठीं कीजे प्रथम अपुला धर्म सकळीं
जसा आहे ज्याचा श्रुतिविहित त्या उत्तम कुळीं ॥२०॥
अनाचारें नोहे जय भयाचि दे त्या इहपरीं
म्हणोनी पाळावा नियतचि सदाचार चतुरीं ।
जरी ज्ञानी आहे तरिहि जनतासंग्रह धरी
यथाशास्त्रें धर्माचरण करिजे उत्तम परीं " ॥२१॥
तदा त्या सोपानें सरस उभयांतें विनविलें
" जसें हे ज्ञानोबा वदति मम चित्तासि मिनलें ।
असावें धर्माच्या पथिं सहज कीं दुर्घट जरीं
जयाचा तो तेणें करुनि वसिजे उत्तम परीं ॥२२॥
पहा त्या पंडूचे कुमर कुळ कोणा मिळतसे
वशिष्टा दुर्वासा आणिक घटजन्मासि परिसें ।
तसा वाला कोळी घडत मुनि वाल्मीक बरवा
विराजे ब्रह्मर्षी ह्मणुनि करिजे धर्म बरवा ॥२३॥
सदां सद्वैराग्यें अति भजन मार्गींचि वसिजे
स्वरूपानंदींही नियत निजधर्मींचि असिजे ।
तसें आहों आम्ही कुळ अकुळ तें काय ह्मणिजे
महद्ब्रह्मीं साम्यीं कुळ अकुळ कोठून गणिजे ? " ॥२४॥
असा तीघांचाही नियम घडला निश्चय धरीं
प्रतिष्ठाना जावें शरण रिघिजे सज्जनवरीं ।

तदां घेती विप्रीं लिखित बरवें पत्र अपुलें
निवृत्तीच्या मागें निघति मग तीघे लघु मुलें ॥२५॥
जनांच्या नेत्रांतें लघु दिसति सर्वां वडिल हे
परेच्याही होतां पर नव्हति आलीकडिल हे ।
असे तीघे गेले हळु हळुच ते पैठणपुरा
विधी तीर्थ स्नाना करिति अपणा योग्य सुकरा ॥२६॥
तदां प्रातःकाळीं निरखिति महाब्राह्मणसभे
नमोनी साष्टांगें निवसति तया सन्मुख उभे ।
मुखें विप्रेंद्रातें विनविति अह्मी दीन तुमचे
गुरू लोकां उद्धारक वडिल तुह्मींच अमुचे ॥ २७ ॥
अह्मांतें रक्षावें म्हणति बुडतां दुःखसलिलीं
नसे थांगा कोठें स्वकरिं धरिजे आजि वडिलीं ।
दिल्हें तें विप्रांचें लिखित बरवें पत्र सुजना
मुखें सारें केलें जनन कथना अंतर विना ॥२८॥
तदां त्या पत्राचें पठण करितां हेंचि कळलें
यतींचीं हें बाळें पतित असती हें निवडलें ।
तदा या शास्त्रार्था बहु दिवस कीं घोर पडिला
नसे प्रायश्चित्तीं लिखित विधि कोठें निवडिला ॥२९॥
महाजनीं निर्णय हाचि केला । नसेचि कीं निष्कृति या मुलांला ।
या धर्मशास्त्रीं विधि आढळेना । तैं सांगिजे काय यथां कळेना ॥ ३० ॥
न सांगतांही गति साच नाहीं । महास्थळीं कीर्ति नुरोचि कांहीं ।
यां बोलिजे निष्कृति हेचि आतां । आहां तसे राहुनि राम चिंता ॥३१॥
अनन्यभक्ती हरि पादपद्मीं । निष्ठा धरा केवळ सौख्यसद्मीं ।
तीव्रानुतापें भजनास सारा । टाकोनि मायामय हा पसारा ॥ ३२ ॥
श्रीकृष्णरूपें जग सर्व पाहा । द्विजादिचांडाळखरांत देहा ।
विलोकितां वंदन तें करावें । लेखों नये आप दुजें परावें ॥ ३३ ॥
चित्तीं चिदानंद धरोनि राहा । चैतन्य तें एक अखंड पाहा ।
या पद्धतीनेंच तराल लोकीं । यावेगळा मार्ग तुह्मां नसे कीं ॥ ३४ ॥
जितेंद्रियत्वेंचि वसा अखंड । न वाढवा संसृति कामबंड ।
वैराग्ययोगेंचि धरोनि पिंड । वर्ता तुह्मां निष्कृति हे उदंड ॥ ३५ ॥
हें सांडिता त्या नरकांत दंड । पावाल तो दुर्धर कीं वितंड ।
देखाल दृष्टी यमदूत चंड । याकारणें भक्ति करा अखंड ॥ ३६ ॥

सद्ब्रह्मचर्यें पितरादिकांतें । ताराल तुम्हीं वसतां यथार्थें ।
तस्मात राहा तुह्मि ऊर्ध्वरेते । नाहीं तरी पात घडे तुह्मांतें " ॥ ३७ ॥
आदेश हा ऐकुनि सद्द्विजांचा । न माय संतोष जगांत त्यांचा ।
चौघें महा हर्षित पूर्ण झालीं । मनांतिली गोष्टि अह्मां मिळाली ॥ ३८ ॥
तैं वंदिले ब्राह्मण श्रेष्ठबुद्धी । पुनीत झालों तरलों भवाब्धी ।
मातापिता दैवत या जगाचें । दीनाजना रक्षक व्हा त्रिवाचे ॥ ३९ ॥
स्तवोनियां ब्राह्मण सभ्य ऐसें । चौघे न माती भुवनांत हर्षें ।
सोपान ज्ञानेश निवृत्ति मुक्ता । सानंदले मानिति बोल युक्तां ॥ ४० ॥

**इति श्रीमन्निरंजनमाधव विरचितज्ञानेश्वरविजयाभिधग्रंथे ॥**
**प्रतिष्ठानप्रवेश प्रायश्चित्तकथनंनाम तृतीयोध्यायः** ॥श्रीरामकृष्णाय नमः॥

---

# अध्याय चौथा.

निवृत्ति सोपानक दिव्य मुक्ता । ज्ञानेश सर्वेश्वर मूर्तिधर्ता ।
चौघें मुलें देवचरित्र यातें । विलोकितां हर्ष महाजनांतें ॥ १ ॥
यांचीं असीं परिसतां अतिदिव्य नावें
ते बोलती द्विज सभासद हो वदावें
' नामार्थ काय तुमचा ' ह्मणतांचि त्यातें
नामार्थ बाळक कसे वदती तयांतें ॥ २ ॥
मी तों निवृत्त न पडेचि प्रवृत्तिमार्गीं
भोगीं अखंड स्वसुखामृत राजयोगी ।
मी ज्ञानदेव ह्मणिजे सकळागमाचा
वेत्ता असे कथिन मी पुसतां त्रिवाचा ॥ ३ ॥
सोपान मी भजन दाउनि केशवाचें
वैकुंठ पावविन भक्तिमतांसि साचें ।
मुक्तायि मुक्ति उघडी जगदीशलीला
दावावया प्रकटली भुवनीं कलीला ॥ ४ ॥
हें बोलती लघु मुलें आंत थोर गोष्टी
तैं हांसती द्विजसभासद मंददृष्टी ।
जे गर्ववंत मदमोहित कर्मवादी
शास्त्रज्ञ जे म्हणविती भरले उपाधी ॥ ५ ॥
ज्ञानी जगीं म्हणावितां तरि ज्ञानदेवा

काांहीं करामत अम्हांसि करोनि दावा ।
तैं ज्ञानदेव म्हणती करितांचि आज्ञा
दाऊं सकौं करुनि साच गुरुप्रतिज्ञा ॥ ६ ॥
सारे विचार करिती द्विज विप्रमेळीं
तैं यांसि मात वदती स्वसभांतराळीं ।
हा ज्ञाननामक समर्थ हल्या पहावा
याच्यामुखें सरस वेदचि बोलवावा ॥ ७ ॥
हा बोलिला तरि हल्या तुज साच मानूं
नाहीं तदां घडसि तूं अतिहीन मानूं ।
बोले तदां निरखवा मज ज्ञानहेला
देखाल सर्वगत आत्मविलास डोळां ॥ ८ ॥
माया अगाध विलसे जगदीश्वराची
तीची अचिंत्य रचना न कळेचि साची ।
बोलेल तो नवल काय महेश्वरेच्छा
आहे अगाध न कळे मतिमंद तुच्छा ॥ ९ ॥
तेव्हां पखाल धरि दाविति थोर हैसा
हा देख बोलविसि याप्रति सांग कैसा ।
ते त्यासि ताडिति बळेंचि असूड तेव्हां
ते वोळ ऊठति तनूवरि ज्ञानदेवा ! ॥ १० ॥
आत्मा ममांतरित तोचि समस्त देहीं
आहे तदां मजचि होतिल भाव तेही ।
तैं बोलती द्विज यया वदनीं श्रुतीतें
उच्चारवीं प्रकट दाविं महामतीतें ॥ ११ ॥
तेव्हां नमी सकळ सद्विजवृंद त्यांतें
हेला धरोनि उतरोनि पखाल हातें ।
बोले मुखें श्रुतिस वाहन तूं यमाचा
तूं नाशितां घडसि विप्रमतीतमाचा ॥ १२ ॥
तैं 'अग्निमीळे' स्वरयुक्त बोले । हें ऐकतां विस्मित विप्र झाले ।
कांहीं यजुर्वेदहि साम कांहीं । ऐसा नये सुस्वर सामकांहीं ॥ १३ ॥
ते ऐकती सकळ एक मुहूर्त सारे
तैं चोज मानिति हल्या वदला कसा रे ।
" हे मुख्य देव हरि शंकर हा विधाता

लोकोद्धरा प्रकटले कलिमाजि आतां ॥ १४ ॥
हे चित्कळाचि दिसते अमुतें कुमारी
जीच्या प्रभेसि तुळणा न पवे तमारी
आम्ही पहा कुटिल कर्मठ साभिमानें
यां ईश्वरां न गणिलें मदमोहमानें ॥ १५ ॥
बंदीं अखंड पडिलोंचि असों विधीच्या
कैसे निघूं अमित मोहमहानिधीच्या ।
आह्मांसि भेदमति हे जडली उदंड
यां सज्जनांसि रचिला बहुसाल दंड ॥ १६ ॥
आह्मीं जनांसि कथितों न करूंच कांहीं
हें सांगण्यास करणें न मिळे कदांही ।
कामांध हुंबरतसों पशुतुल्य माजें
आहों प्रतिष्ठित जगात ह्मणोनि माजे ॥ १७ ॥ "
धिक्कार ते करिति आपण आपणांतें
ऐसे महाजन नये अभिमान यांतें ।
हे लीन पूर्ण निधिसे भरले सदांही
उर्मी विकारवश हे नव्हती कदांही ॥ १८ ॥
यांच्या स्थितीस निरखोनि समस्त वेत्ते
टाकोनि गर्व नमिती बहुसाल यांतें
वाचे जयोक्ति वदताति पिटोनि टाळ्या
तैं नागरी करिति आरतिया निराळ्या ॥ १९ ॥
यांचा अमानुष पराक्रम लोक सारे
पाहोनियां म्हणति मानव तो न सारे ।
पुष्पें तदां वरुषती कितिएक माथां
चौवर्णिचे नमिति सादर ज्ञाननाथा ॥ २० ॥
तैं ज्ञानदेव म्हणती द्विजमंडळातें
मी पात्र आजि घडलों तुमच्या कृपेतें ।
हे साच सर्व महिमा तुमच्या कृपेची
नोहे मदीय पुरुषार्थ वदों त्रिवाची ॥ २१ ॥
तुम्ही द्विजेंद्र समुदे हरि रूप आहां
वेदांसि आश्रय तुम्ही धरिता स्वदेहा ।
तुम्हांसि वंदुनि निरीक्षुनि मोक्षपंथा

हे लागती सकळ जीव यथार्थ वार्ता ॥ २२ ॥
तीर्थासि आस्पद यथार्थ असां समस्तां
गंगादि वंदिति नदी पदरेणु माथां
तैं दोष काय उरती अमुचेचि देवा
झालों पुनीत तुटला भवबंधगोवा ॥ २३ ॥
हा धन्य कीं दिवस जी कृतकृत्य झालों
भेटोनि संतचरणांसि बरे निवालों ।
हा ब्रह्मवृंद अवलोकुनि त्याचि वेळां
झालों महत्कलिमलाहुनि मीं निराळा ॥ २४ ॥
सोपान तैं विनविती द्विजनायकातें
वानूं सके कवण या वचनें तुम्हातें ।
दूरोनि तें पळत पातक देखतांना
तीर्थासि पावन पदांबुज हे ठिकाणा ॥ २५ ॥
पादाब्जरेणु कलिकल्मषनाशकारी
देवादि उद्धरति काय पुन्हा शरीरी ? ।
हे पाय आजि निरखूं नयनीं अम्ही ते,
जे योगकोटिकृतपुण्यफलासि दाते ॥ २६ ॥
श्रीवासुदेव हृदयावरि नित्य वाहे
त्याची तनूचि तुह्मि भूसुर अन्य नोहे ।
हे वेदशास्त्र वसती तुमच्याच देहीं
यावेगळें अणिक सुस्थळ त्यांसि नाहीं ॥ २७ ॥
होते सुतृप्ति वचनें पितरांसुरांतें
स्वाहास्वधा भजनि या मुखपंकजातें ।
याकारणें वदुनि निश्चय एक वाणी
लावा अम्हासि विभु धर्मपथीं दयेनी ॥ २८ ॥
उच्छिष्टशेषग्रहणासि क । विभागी
सोपान याप्रति वदे प्रभु राजयोगी ।
तैं बोलती सुजन विप्र समस्त यांतें
वर्ता तुम्हीं प्रभु कळेल तसें तुम्हातें ॥ २९ ॥
तुह्मी असा त्रिजगतीश्वर हेंचि माने
आह्मासि निश्चय दुजा सहसा न माने ।
आम्ही नहोंचि कथनाप्रति योग्य कांहीं

सर्वेश्वरासि जगिं शासिल कोण पाही ? ॥ ३० ॥
ऐसेंचि वाक्य कथिलें द्विजनायकांहीं
हे ईश्वरांश दुसरा न विचार कांहीं ।
हे वर्तती जसजसे सकळा जनातें
निश्चित संमत असेचि सदां अज्ञातें ॥ ३१ ॥

ऐकोनि विप्रमुखनिर्गत रम्य वाचा
यांच्या मनासि घडला अतितोष साचा ।
मोठ्या तपें निरखितां गयनी निवृत्ती
तेणें दिल्हें सरस चिन्मय रत्न हातीं ॥ ३२ ॥

वेदांतशास्त्र निशिवासर चर्चिती हे
योग्यापरीं करुनि योगचि राहती हे ।
गीतार्थ बोध करिती श्रुतिमस्तकांचा
वेदांतशास्त्रपठणीं अतिहेतु त्यांचा ॥ ३३ ॥

भोगावती करुन प्रत्यह मज्जनातें
श्रीकालिका निरखिती अतितुष्ट चित्तें ।
जेथें यती वसति जाउनि त्याजपाशीं
वेदांत मात्र श्रवणीं अतिहेतु ज्यांसी ॥ ३४ ॥

प्रज्ञा विलोकुनि यतीश्वर ते ययातें
ते धन्यधन्य ह्मणती लघु बाळकांतें ।
सच्चित्सुखैकपद एक त्रिरूप झालें
या तीरुपींचि परतत्व जगीं उदेलें ॥ ३५ ॥

छंदें पुराण कथितां हरिकीर्तनातें
त्या पैठणीं वसति संमत सद्विजातें
तैं जाहलें परम कौतुक एक ऐका
ऐश्वर्य दाविति जनासि विचित्र जें कां ॥३६॥

आली श्राद्धतिथी तदां द्विजगृहीं मंत्रेंचि अव्हानिलें
ज्ञानेशें पितृलोकचे पितर या पृथ्वीतळा आणिले ।
झालें श्राद्धविधानें देव पितरीं पावोनियां तृप्तता
आशीर्वाद करोनि जात अपुल्या स्थाना द्विजादेखतां ॥३७॥

तेव्हां ब्राह्मण चोजले सकळही देखोनि लीला असी
तेव्हां धन्य असें समस्त ह्मणती अन्या घडे हे कसी ।

आह्मी वेद षडंग सांग पढलों तैशी क्रियाही करों
शास्त्रें सर्व पुराण धर्म सुजनां सांगों मुखें आचरों ॥३८॥
हें सामर्थ्य अम्हांस येइल कसें प्रत्यक्ष हे देव कीं
यांचें दुर्लभ मर्त्य कृत्य दिसतें देखों नये लौकिकीं ।
जेणें वेद पशुमुखें वदविले पित्रां दिठीं दाविलें
बाळत्वें असतां स्वपादभजना सर्वां जगा लाविलें ॥३९॥
हा एका मुखिचा विरंचि अथवा हा दों भुजांचा हरीं
दोंनेत्रीं त्रिपुरांत हा अवतरे कीं व्यास या भूवरी ।
ऐसा तर्कवितर्क लोक करिती यांतें दिठीं देखतां
हा ज्ञानेश्वर पूर्णवस्तु विलसे विज्ञानदाता सतां ॥ ४० ॥
चौवर्णात्मक मंत्रमूर्ति विलसे हें गुह्यदृष्टीं दिसे
हें एकाक्षर तत्व मानुष वपू घेवोनि आलें कसें ।
श्रीमद्विठ्ठल या रुपा धरितसे साधूंसि ऐसें दिसे
मौनत्याग करोनि बोध जनका देहासि या घेतसे ॥ ४१ ॥
तेव्हां समस्त मिळती क्षितिदेव तोषें
पत्रासि लेख करिती परिपूर्ण हर्षें ।
लोकोद्धरार्थ वसुधेवरि देव आले
दैवें हरीविधिसदाशिव हे उदेले ॥ ४२ ॥
यांलागि काय कथिजे तरि काय लोकीं
हे तों नव्हेति विधिकिंकर सद्विवेकी ।
लेहोनि पत्र करिं देत निवृत्तिनाथा
जो कां असे धरणि तारक या अनाथां ॥ ४३ ॥
घेवोनि पत्र सकळां धरणीसुरांतें
साष्टांग हे नमिति सादर बद्धचित्तें ।
घेवोनि सव्य द्विजवृंद सुखें निघाले
नेवासियास महिषासह शीघ्र आले ॥ ४४ ॥

**॥ इतिश्रीज्ञानेश्वरविजयग्रंथे प्रतिष्ठाननिवासमहिमाप्रदर्शनं नाम चतुर्थोध्यायः ॥ श्रीसद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥**

---

# अध्याय पांचवा.

श्रीम्हाळसा त्रिभुनश्वेवरि आदिमाया
जे वैष्णवी त्रिपुरभैरवि भव्यकाया ।
नारायणी निरखितां अतितोषचित्तें
तत्सन्निधीं वसति आवडती जनांतें ॥ १ ॥
केली तिच्यानिकट राहुनि ज्ञानदेवी
गीतार्थ तेंचि घडली सति देवदेवी ।
आचार्य-शंकर-विनिर्मितभाष्य जैसें
केलें असें परम भाषणयुक्त तैसें ॥ २ ॥
केलाऽमृतानुभव तो कथितां निवृत्ती
तो या क्षितीं अमृत साम्याचि येत व्यक्ती ।
तेथूनियां निघति वंदुनि ते भवानी
लोकेश्वरी परमपावन विश्वयोनी ॥ ३ ॥
यावें अलंदिस असीच धरोनि इच्छा
ते चालले सहज वर्तति ते यदृच्छा ।
मार्गीं महानुभव भेटति संत कोणी
तेथेंचि वास करिताति निराभिमानी ॥ ४ ॥
दावोनि त्यांसि रमताति कला विशाला
सत्कीर्तनाविण घडी न वचे जयांला ।
आळ्याचिये उपवनीं वसतीस आले
टाकी कळेवर हळेश्वर वेद बोले ॥ ५ ॥
देवोनि त्याप्रति समाधि करोनि पूजा
तो धाडिला हरिपदा पशुलागि पैजा ।
जैसा गजेंद्र हरिनें स्वपदासि नेला
ज्ञानेश्वरें महिषपुत्र विमुक्त केला ॥ ६ ॥
ऐसा अगाध महिमा सुजनांसि दावी
एकामुखें कविजनीं कितिसी वदावी ? ।
जो ज्ञानदेव हरि तोचि धरेसि आला
त्याची अगाध विलसे अतिचित्र लीला ॥ ७ ॥
आले स्वजन्मनिलयासि अलंदिकेला
होता यथास्थित सुहृज्जन तो भुकेला ।
त्यातें निरीक्षुनि सुखी नमिती जनांतें

भेटोनि ते असल ज्याप्रति जेंवि नातें ॥ ८ ॥
देवत्रयासम विराजति देहधारी
हे ब्रह्मसार पुतळे जगसौख्यकारी ।
जे वर्तती निजविलासगुणें सदांही
सत्कीर्तिघोष अति गाजत देश दाहीं ॥ ९ ॥

हे धन्य धन्य ह्मणती जन यांसि सारे
ज्यांचे निरीक्षुनि अनेकगुणी पसारे ।
कर्पूर वास लपवी तरि काय राहे
सत्कीर्ति सौरभ तसा विकसोनि राहे ॥१०॥
उत्पन्न विज्ञान महानुभाव । ज्यांचा जगीं व्यक्त दिसे प्रभाव ।
अनाश्रमी ऐकुनि चांगदेवें । हें मानिलें यांसि दिठीं पहावें ॥११॥
पशूमुखीं बोलविले श्रुतीतें । हें दाविलें कौतुक ब्राह्मणातें ।
श्रीज्ञानदेवी रचिली हाराटी । आणोनि वेदागम अर्थ गांठी ॥१२॥
ऐसा विचित्र महिमा महिमाजि एके
तो चांगया निघत शिष्यकुळें अनेकें ।
व्याघ्रावरी वळघला बहु योगसिद्धी
दावी जना सुकृतवैभव तत्समृद्धी ॥१३॥
जैसी निधीस मिळतां सरिताचि आटे
तैसीच चांगमुनि मानसवृत्ति आटे ।
सूर्योदयीं उडुगणांसह चंद्र लोपे
याचें समस्त महिमान तसेंचि लोपे ॥१४॥
हा ज्ञान भास्कर दिसे सुमहत्प्रतापें
त्याच्यापुढें मिरविजे किति तेज दीपें ? ।
जे योगसिद्ध मति पाउनि लुब्ध झाली
ते ज्ञानसिद्धि निरखील कसी विशाली ? ॥१५॥
भेटोनि ज्ञानफळ पाउनि स्वच्छ झाला
याचा अहंकृति विलास बरा विझाला ।
वोझें जुनाट अति टाकुनि शुद्ध झाला
मुक्ता–कृपें परम–मुक्तिपदासि गेला ॥१६॥
अलंकावती पंढरीहोनि सोपी । नुरे ये स्थळीं पावतां दीर्घ पापी ।
कळीकाळ येथें शिरेनात केव्हां । म्हणोनी भजा सादरें ज्ञानदेवा ॥१७॥
संतां निरंजन कवी विनवी नमोनी

ग्या आदि हे तरि यथामति मूढवाणी ।
वेंचोनियां विरचिली म्हणवोनि देवा
दीनावरी सकृप होउनि नित्य सेवा ॥१८॥
ज्यातें शिवादि न वदूं सकतील वाचे
मी काय वानिन अगाध गुणांसि त्याचे ।
या कारणें सुजन संत महंत लोकीं
घ्या आवडी करुनि सद्गुरुकीर्ति हे कीं ॥१९॥
काढी पाणबुडया बुडोनि सलिलीं मुक्ताफळें चांगलीं
त्यासाटीं धरिताति काय नृपती या सर्व भूमंडळीं ?
रत्नाचे गुण पाहुनी करिति कीं सद्भूषणा—कारणें
मीही किंकर त्यापरींच समजा घ्या श्लोकरत्नें मनें ॥ २० ॥
निवृत्तीश्वरा ज्ञान—सोपान देवा । क्रमें आदि मुक्ताख्य चौंघास देवां ।
सदांसर्वदां वंदितों पादपद्मीं । बरी पूजितों स्थापितों चित्तसद्मीं २१
इति निरंजनमाधव सत्कवी । रचित आदिकथा विलसे भुवि
भगवती अतिपावन गौतमी । त्रिजगवंद्य प्रसिद्ध महागमीं ॥ २२ ॥

**॥ इतिश्री ज्ञानेश्वरविजयग्रंथे कवी निरंजनमाधवयोगीविरचिते निवासपुर—निवासगीतादि—ग्रंथकरण निरूपणंनाम पंचमोध्यायः ॥ श्लोक सर्व २१८ शके १६८८ व्ययसंवत्सर आषाढ शुद्ध चतुर्दशी भानुवासरे लेखनं समाप्तम् ॥ श्रीरस्तु शुभमस्तु ॥**

---

निरंजनमाधव कृत

# श्रीज्ञानेश्वरविजय.

## उत्तरखंड [समाधि प्रकरण.]

### अध्याय पहिला.

श्रीशामसुंदर इटेवरि तिष्ठताहे
चिन्मात्र वस्तु घडली निजमूर्ति ते हे ।
भीमातटीं कटितटीं कर त्यासि पाहे
भेटावया निजजनाप्रति वाट पाहे ॥ १ ॥
समचरण तयाचें देखतां या मनाला
सुख अमुप उदेलें काय सांगूं जनांला ? ।
भवभय बहु होतें आजि सारें पळालें
जड मनपण माझें नेणवे कैं गळालें ! ॥ २ ॥
अहंकृति विलास हा सकळ तूटला त्याक्षणीं
इटेवरि निरीक्षिला सगुण सांद्र या लोंचनीं ।
अविद्यक समस्तही गलित भाव झाले कसे
गुणत्रयविलास त्या त्यजुनि चित्त हें उल्लसे ॥ ३ ॥
मना प्रबळ वासना नवल ऊठिली हे असी
अखंड तरि चिंतिजे हरिपदांबुजें मानसीं ।
वदेल जरि वैखरी हरिकथाचि बोलो सुखें
कदा कृपण दुष्कृतीजनकथा न यो या मुखें ॥ ४ ॥
जसा हरि तसेचि ते परम भक्त त्याचे पहा
अभिन्नपण पावले समरसोनि गेले महा
स्वयें हरिच जाहले हरिहि तोच झाला तसा
जगासि तरि दाखवी तनु धरोनियां भिन्नसा ॥ ५ ॥
म्हणोनि भगवज्जना हरि असेंचि पैं मानिजे
उदार गुण आवडी धरुनि फारसी वानिजे ।

असीच मज बोधिते घनकृपा तयाची मना
करील हरि सावळा सफळ हे असी कामना ॥ ६ ॥
तो नामदेव अतिभक्त अभिन्न देवीं
जो सामरस्यपद पाउनि वासुदेवीं
रंगोनि स्वल्प उरला दिसतो जनाला
तारावया सगुण साधक सज्जनांला ॥ ७ ॥
तेणें समाधिसुख पाहुनि ज्ञानियाचें
जें वर्णिलें परम कारण या जगाचें ।
तें जे जगीं पढति ते तरती भवाब्धी
भेटे तया सगुण विठ्ठल चित्सुखाब्धी ॥ ८ ॥
वाटे मनासि धिवसा हरिभक्तिनावें
म्यांही भवांबुधित आजि सुखें तरावें ।
या वर्णिलें गुरुसमाधिस नामदेवें
म्यां श्लोकरूप यश वर्णुनि सौख्य घ्यावें ॥ ९ ॥
लोकांत निंद्य म्हणवी करितां पराचा
हेवा नसोनि गुण आपणियांत त्याचा ।
हेही यथार्थपरि प्रेरित अंतरात्मा
या कारणार्थ न गणीं जन बोलते मा ॥ १० ॥
आणीक एक जन जेंवि भरे उपाधी
तैसा दुजा नर भरे तरि निंद्य आधीं ।
जे भक्त आचरति धर्म तयाच वाटे
जातां तयासि भय दुर्यश हें न भेटे ॥ ११ ॥
हेंही अम्हीं परिसिलें सुजनामुखानें
या कारणें परम लाभ अम्हासि तेणें ।
गाऊं सुखें अमल बुद्धि असो नसो कीं
मातें वरें म्हणतु वा न म्हणोत लोकीं ॥ १२ ॥
निरंजनकवी करी सकळ सज्जना प्रार्थना
तुम्ही सदय जी असा करित दीनसंरक्षणा ।
म्हणोनि परिसा बरी विनवणी कृपासागरीं
अयोग्य अति धीट मी करितसें तुम्हांसी सरी ॥ १३ ॥
जगांत तरि माउली गति जशी खळा बाळका
न लक्षुनि गुणासि ते घडत सिद्ध त्या पालका ।

तसेंचि करुणाघनीं मज नुपेक्षितां रक्षिजे
धरोनि हित मानसीं प्रबळ चूकतां शिक्षिजे ॥ १४ ॥
जयासि घडली बरी सुजनवंद्य शिक्षा जगीं
तयासिच मिळे महाफळ कथा नव्हे वाउगी
म्हणोनि तुमच्या पदा नियत मी भजें हो गुरू
सहोनि करिजे मला कवि उद्धंत सर्वां धुरू ॥१५॥
नमूं योगपीठा निवृत्ती वरिष्ठा । नमो ज्ञानदेवा परब्रह्मनिष्ठा ।
नमो बोधदीपासि सोपानरूपा । नमो दिव्य मुक्ताभिधा मुक्तिरूपा ॥ १६॥
चतुर्धा हरी तो घडे चित्कळेशीं । स्वमायावश पूर्णकामीं विलासी ।
कलीमाजि उत्पन्न झाल्या जनांतें । स्वयें उद्धरावेंचि आलें मनातें ॥ १७॥
अनेका जगीं दाखवी लोकलीला । करी बोध गीतार्थ सोपा जनांला ।
असा ज्ञानरूपी हरी तोचि साजे । जयाची महत्कीर्ति लोकीं विराजे ।१८।
झाले कीं अवतारकृत्य अपुलें ज्या कारणें भूवरी
केला कीं अवतार या कलिजना तारावया सत्वरी ।
हातीं नाव दिल्ही रचोनि सुजना श्रीकृष्णसद्भक्तिची
गीतार्था विवरोनि दिव्य रचिली छाया सुधासी तिची ॥ १९ ॥
अमृतबोध करी अमृतापगा । त्वरित जींत निवे भवताप गा ।
सुमति तो अवगाहन जैं करी । हरिपदाप्रति पावत लौकरी ॥ २० ॥
अभंगही फार अभंग केले । अभंग सौख्यामृतसार गोळे ।
जे सेविती तेचि अभंग होती । अभंग चिन्मात्र पदासि जाती ॥२१॥
श्रीगीता कल्पवल्ली उपजत बरवी कृष्णवक्त्रालवालीं
व्यासें सिंचोनि तीतें टवटवित तसी विस्तरा पाववीली ।
पार्थाख्या मंटपीं जे बहुत पसरली संजया साधली ते
सेवावी ज्ञानदेवी परम फळ जना मुक्ति कैवल्य देते ॥२२॥
या ज्ञानदेवासि समाधि घ्यावी । वाटे स्वलीला पुरती करावी ।
श्रीविठ्ठलीं ऐक्यपदा भजावें । पृथक्पणा टाकुनि वस्तु व्हावें ॥२३॥
आभास हा भिन्नपणें विराजे । अभिन्न तद्रूप तयासि कीजे ।
घटामठाकाश महानभीं तें । मिळावया काय शरीर त्यातें ॥२४॥
व्युत्थानकाळीं मन जेथ रातें । समाधि घेतां अपुल्या पदातें ।
येईल विश्रांति करावयातें । अपूर्वता ते तरि कोण येथें ॥२५॥
जें ज्ञानांजन या जगीं प्रकटलें श्रीज्ञानदेवाकृती
विश्वासें धरिलें तयासि मिनलें चिद्वस्तुतें निश्चितीं ।
पाहा ज्ञानधनासि प्राप्त करितें लोकत्रयीं शोभतें

श्रीज्ञानेश्वर नाम नित्य जपतां मूढाजडा तारितें ॥२६॥
जें ईटेवरि ब्रह्म तेंचि विलसे भीमातटीं सावळें
ज्याच्या सर्व समंतता विलसती भोळीं खुळीं गोवळें !
तेही भक्त तसेचि भाविक पहा ! भोळे जनाच्या मना
मानेनात असे अकिंचन तसे नाहीं जयां कामना ॥२७॥
तेव्हां ज्ञानमणी हरीस विनवी " माझी असे प्रार्थना
अंगीकार कराल तैं विनवितों मी आदिनारायणा ।
देवी भीमकनंदिनी विलसते अंकस्थिता सुंदरी
नीलांभोदसमीप शोभित दिसे विद्युल्लता ज्यापरीं ॥२८॥
हे माया ह्मणवी त्रिलोकजननी विद्या घडे ज्ञानियां
योग्याची तरि सिद्धि हें फळ घडे साक्षात्तपस्वी तयां ।
संसारींरत, यांसि हेंच भुलवी देवी अविद्यापणें
ब्रह्मीं चिन्मय रूपिणी जडमयी झाली जगा कारणें ॥२९॥
यीचे सर्व विलास हें जग दिसे स्रक्सर्पभासापरीं
तूं आत्मा तुजलागि झांकुनि कसी सानंद लीला करी ।
तूं देवा तरि ऊघडाचि दिससी खेळां तयीच्या तरीं
ऐसें कौतुक हें तुह्मी उभयतां जाणा करूं श्रीहरी ॥३०॥
दोघांचाचि विलास मिश्रित जगीं म्यां पाहिला लोचनीं
आतां इच्छितसे मनीं सुखघना हा लंघिजे त्रैगुणीं ।
जें कां निश्चळ रूप निष्कळ तुझें मींतूंपणावेगळें
ध्यावें तेंचि अखंड चिन्मयपणें हें द्वैत जेथें गळे ॥३१॥
ऐशी ज्ञानसमाधि हे मज तुह्मी द्यावी जगन्नायका !
नेच्छी भुक्ति तसीच मुक्तिपदवी सायुज्य तेही नका ।
मायातीत विशुद्ध बुद्ध बरवें एकत्वहीं नाढळे
शून्याशून्यविहीन तें मज करा चिन्मात्र सर्वागळें " ॥३२॥
ज्ञानेश्वराची विनती हरीनें । हे ऐकिली सादर दिव्यकानें ।
संतोष झाला स्वमनीं विठोला । माझ्या कसा येइल अल्प बोला ॥३३॥
ह्मणे भला होसिल ज्ञानदेवा । तूं भक्त तूं प्रेमळ शुद्ध भावा ।
मिळोनि मातें मिळणें पुन्हां तूं । मिळावया इच्छिसि जाण बा ! तूं ॥३४॥
मीतूंपणीं आणिक काय आहे । एकत्व तें मी ह्मणणें न साहे ।
तुझ्यामुखें ग्रंथ जनांत झाले । माझ्याकृपें सर्वहि म्यांच केले ॥३५॥
जे जे तुह्मी लौकिक भव्य लीला । मी सर्व झालों मग कैं निराळा ।

मीतूंपणा ठाव असेल सांगें । तत्रापि तुझें करणेंचि लागे ॥३६॥
हें ऐकतां पादसरोरुहातें । घाली मिठा ज्ञाननिदान हातें ।
पुनः पुन्हा वंदन तेंचि सारी । या गौरवें प्रेम भरे शरीरीं ॥३७॥
तें विठ्ठलें पाहुनि ज्ञानदेवा । कृपार्द्रनेत्रें बरवें सदेवा ।
संतुष्ट केलें कमळासि जैसा । प्रकाशवी भास्कर नित्य तैसा ॥३८॥
हें नामदेवें निरखोनि डोळां । प्रेमास्पदें फारचि खेद केला ।
हें व्यक्त ज्ञानेश्वर रूप आतां । अव्यक्त होईल ह्मणोनि चिंता ॥३९॥
बद्धांजुळी लक्षुनि ज्ञानदेवा । पुढें उभा नम्र शुचि स्वभावा ।
सप्रेम बोले मग केशिराजा । प्रस्थान कीजे अति शीघ्र वोजा ॥४०॥
माझी ध्यान समाधि नित्य तुझिया चित्तीं असे वेधली
सर्वत्रीं ममरूप हे गुणमयी मुद्रा मना बोधली ।
आतां जाउनियां समाधि करिसी अव्यक्त ध्यासी मला
तेव्हां हें सुगुणी मदीय रुपडें कैं आठवे वा तुला ॥४१॥
माझें हें गुणरूप नित्य तुझिया चित्तांत राहो प्रिया !
ऐशी भेटि मला निरंतर तुझी तूं देत जासी सया ।
ऐशी ऐकुनि देवभाषित गिरा तैं साधु संतां जनां
झाला खेद मना वियोग घडतो हा आजि ज्ञानांजना ॥ ४२ ॥
तेव्हां ते सति रुक्मिणी भगवती सप्रेम ज्ञानेश्वरा
अर्पी भोजन षड्रसाक्त हृदयीं विश्लेषचिंतातुरा ।
ऐशी कार्तिक मास शुक्ल दशमी प्रेमामृतें वर्तली
केली जागरणा समेत बरवी एकादशी चांगली ॥ ४३ ॥
क्षीराब्धि उत्सव यथाविध सांग केला
श्रीद्वादसीस हरिजागर पुण्यवेळा ।
जो कां निजोनि उटिला हरि मास चारी
विष्णुव्रतादि करिती परलोकचारी ॥ ४४ ॥
प्रस्थान तैं करुनि पूजुनि विठ्ठलातें
वंदोनियां मग निघे सति रुक्मिणीतें ।
येतों ह्मणोनि पुसतां अति कंठ दाटे
बाष्पांबुपूर नयनीं बहुसाल लोटे ॥ ४५ ॥
तेव्हां हरी ह्मणत ज्ञानशिखामणीतें
मी पाठिसीं त्वरित येइन सत्य तेथें ।
जेथें असे परम पावन ते अळंदी

सिद्धेश आदिशिव दे सकळार्थ सिद्धी ॥ ४६ ॥
इंद्रायणी सरस दक्षिण संस्थ वाहे
जीला समस्त सरिता उपमा न साहे ।
तेथें समाधि तुज देइन मीच हातं
एकादशी बहुळपक्ष महोत्सवातें ॥ ४७ ॥

एकादशी कार्तिक शुक्ल माझी । एकादशी कार्तिक कृष्ण तूझी
दोन्ही महोत्साव सुभक्त माझे । लक्षोनियां पावति तोष वांजे ॥ ४८ ॥
हे ऐकतां देवमुखोक्त वाणी । सानंदता पाउनि भाविकांनीं ।
टाया पिटोनी जयकार घोषें । ब्रह्मांड सन्नादविलें अशेषें ॥ ४९ ॥
अळंदीस येवोनिया ज्ञानदेवें । समाधिस्थळा सिद्ध केलें सदेवें ।
बरें आदि सिद्धेश्वरा पूर्वभागीं । गुहा सिद्ध केली यथा उक्त योगीं॥५०
समाधीस इच्छी वसो ज्ञानराजा । तदां ते स्थळीं पातला केशिराजा ।
खगेंद्रावरी आरुढ तो स्वलीला । सवें रुक्मिणी सत्यभामा सुशीला ५१
महाभक्त ते नामदेवादि सारे । मिळाले तदां मानवां एक मेरे ।
जुनें द्वापरींचे तसे उद्धवादि । कृतत्रेतिंचे पातलें रम्यबुद्धी ॥ ५२
तदां देखतां म्लानवृक्षा अजाना ! झरे नामदेवासि चित्तासि पान्हा ।
ह्मणे पांडुरंगासि या पुष्टि द्यावी । सदां आर्द्रता वृक्षराजा असावी ॥५३
असी ऐकतां नामयाची सुवाणी । तदां तोषलें बोलले चक्रपाणी ।
अह्मी दीधली ज्ञानराजादि गंगा । जितें स्पर्शितां जाय संताप भंगा ५४
दिल्ही ययातें मर्णिकर्णिका ती । दोघी सदां तिष्ठति याच ठायीं ।
मिळोनि इंद्रायणिच्या जळासी । लोकत्रया उद्धरिती सुखेंशीं ॥५५॥
येवोनि येथें ममभक्त कोणी । करील जो मज्जन या त्रिवेणीं ।
गायील भावें मम नामवाणी । वैकुंठिंची भोगिल मुक्तिराणी ॥ ५६

ऐसा दिल्हा वर तया परमेश्वरानें
तैं नाचती परम भक्त महा सुखानें ।
वैकुंठ तें कलिजनांप्रति फार सोपें
केलें त्रिलोकजनकें सुमहत्प्रतापें ॥ ५७ ॥

**॥ इतिश्री ज्ञानेश्वरविजये समाधिप्रारंभवर्णनं नाम प्रथमोऽध्यायः ॥**

**॥ श्रीरुक्मिणीशार्पणमस्तु ॥**

———

# अध्याय दुसरा.

## रत्नकळा सवाथी.

सनकादि महामुनि तैं मिनले करिती निगमागम घोष बरे
शुभगायन सामऋची करिती अतिनाद विरंचिकटाह भरे ।
भगवज्जन गर्जनहीं नृहरी हरि विठ्ठल राम अशा गजरें
घनटाळमृदंग विणे करताळ महारव ऐकुनि दोष झुरे ॥ १ ॥
दिनपंचक याचपरीं अति उत्सव देव अळंदिस राहियले
अतिधन्य सुमान्य अळंदिपुरी जिस एकहि मोक्षपुरी न तुळे ।
हरि जेथ उभे विभु रुक्मिणिसीं परितिष्ठति भक्त उभे सगळे
क्षण एक जरी नर येथ थिरे तरि पातकपर्वत तैंचि गळे ॥ २ ॥
मग पाहुनि ज्ञाननिधीप्रति बोलति विठ्ठल " तूं परिसे सखया
तव दिव्य कवित्व जनीं नर वाचिल त्यावरि मी करिं पूर्ण दया।
मज तो जन भेटल तो मज पावल तो मज चिंतिल तो मज या
निजभक्तजनीं अतिवल्लभ होइल देयिन मी पद पूर्ण तया " ॥ ३ ॥
परिसोनि असें परमामृतभाषण ज्ञाननिधी नमिती चरणीं
करकंज शिरीं हरि ठेउनियां उठवी अपुला निजभक्तमणी ।
समुदाय समेत निघे मग विठ्ठल येत नदीतटिं तेचक्षणीं
हरिदास समस्त तदां करिती शुभ मज्जन पाउनि हर्ष मनीं ॥ ४ ॥

---

## स्रग्धरा.

नाम्याचा पुत्र नारा सुचवित अपुल्या नामदेवास कानीं
देवाला पूस बापा सकळहि महिमा क्षेत्रिचा या पुराणीं ।
व्हावी लोकांत सारी प्रकट हरिमुखें सांगतां भक्तवृंदीं
पावावी मूढलोकीं परि हरि पदवी सेवितां हे अळंदी ॥ ५ ॥
संतोषें नामदेवें मग हरिस मुखें पूसिलें नम्रवाणी
सांगावा क्षेत्रिचा या अतितर महिमा काय ते चक्रपाणी ! ।
होती कोणायुगीं हे कवण तरि असे सांग क्षेत्रज्ञ येथें
या लोकीं हे अळंदी म्हणुनि मिरवली नाम कां सांग यीतें ॥ ६ ॥
येथें तो धर्म लोकीं कवण विचरिजे काय तें दान यात्रे

जी येथें पुण्य केलें तरि घडत किती साच देवें वदावें ।
ऐसें या नामयाचें गदित परिसतां तोषला केशिराजा
सारे जे संत तेही प्रमुदित घडले साश्रुनेत्रेंचि वोजा ॥ ७ ॥
ह्मणत धन्य हरी मग नामया । पुससि पुण्यकथेसि अनामया ।
प्रतियुगीं मजला असणें असे । असिच ज्ञान–समाधि सदां असे ॥ ८॥
वैकुंठ भूतळवटीं तुज सांगतों मी । अष्टादशाहुनि वरिष्ठचि पीठनेमी
काशीहुनी वडिल जाण सया अळंदी ! येथें तपें करुनि पावति मोक्ष सिद्धी
शैवागमीं शिव विरंचिस बोधिताहे।संवाद हा अतिशयें तुज सांगताहें
दक्षासि द्रोह घडला अति शंकराचा।तो मुक्त येथ घडला तपतांचि साचा
वैवस्वतादिक मनू पदवी वराया । आले पुरा बहुतवार तपें कराया ।
हे नारदादि बहु भक्त तपोनि येथें । ते पावले परम सज्जन मत्पदातें॥ ११॥
हें तों असे अति पुरातन तीर्थ नामा । येथेंचि मुक्त घडला गुरुशाप सोमा।
मोक्षासि दे ह्मणुनि नाम इचें अळंदी । हे या कळींत अति दुर्लभ जाण आधीं
येथें दिल्हें परम अल्पचि दान तेंहीं । मेरूसमान घडतें अनुमान नाहीं ।
यज्ञादि धर्म करितांचि अनंत होतें । झालें तरीं सुरगुरू वदवे न मातें ॥१३॥
देतील अन्न नर एकचि घांस येथें । पृथ्वीस सागर दिल्ह्यासम पुण्य होतें ।
जो एकदांचि मम नाम वदेल वाणी । तो सांगवेद–फल पावल सत्य मानी॥ १४
येथें निवास करितां घडली तपस्या । लाभे सुरेंद्र पदवी सहजीं मनुष्या ।
विश्वास मात्र धरिजे तरि सर्व कांहीं । होयील सिद्धि मग त्यासि विलंब नाहीं
ऐसें असे परम गुह्य ह्मणोनि तोषें । म्यां स्थापिलें सतत ज्ञान धना विशेषें ।
मी राहिलों निकट येउनि याजपाशीं । येथेंचि मी करिन सर्व जनांसि काशी १६
आनंदकानन यथार्थ असे अळंदी । हे मोक्षदायक म्हणोन अखंड वंदी ।
विश्वेश हा ह्मणुनिं भाविसि सिद्धलिंगा । इंद्रायणी परमपावन देवगंगा ॥१७॥
हे ऐकतांचि भगवन्मुखिची सुवाणी । ते पावले परम वैष्णव तोष–खाणी ।
ते नाचती उडति ते जयशब्द तोंडें । उच्चारितां रव विरंचिकरंड कोंडे॥ १८॥
ज्ञानेश्वरार्थ मग दिव्यसमाधि–शय्या । कीजे ह्मणोनि वदले हरिदास वर्या ।
आले विठोसहित भक्त समाधिठाया । सिद्धेश्वरानिकट पूर्व दिसे कराया ॥१९॥
ध्यानीं सदा निरत नित्य निवृत्तिनाथ । तोही त्यजोनि मग सत्वर येथ येत ।
सोपान मुक्ति अति सत्वर सिद्ध होती । ज्ञानेश्वरा निकट वर्तति नित्यभक्ति २०
ज्ञानेश्वरें नमुनि सादर विठ्ठलातें । आज्ञा समाधिस सुखें पुसतां विभूतें ।
ठेवी महंत अभयंकर हस्त माथां । जो उद्धरी सकळ दीनजनां अनाथा ॥२१॥
आज्ञा करी बैस सुखें समाधी । सर्वात्मरूपीं मिळसी सुबुद्धी ।

हा मोक्ष प्रत्यक्ष तुलाचि जोडे । तूंसारिखे या त्रिजगांत थोडे ॥२२॥
तैं इंद्रचंद्रादि सुरेंद्र आले । विरांचि दक्षादि प्रजेश आले ।
गंधर्व विद्याधर सिद्ध आले । वसू मनू मारुत तैं मिळाले ॥२३॥
तेत्तीसकोटी अमरेंद्र-मेळा । पहावया कौतुक तैं मिळाला ।
त्रैलोक्यवासी ऋषि मुख्य आले । पाताळिंचे पन्नगही निघाले ॥२४॥
सद्भक्त जे मानव तैं मिळाले । राजर्षि मोठे जनकादि आले ।
ब्रह्मर्षि आले शुक वामदेव । जे श्रेष्ठ व्यासादि महत्प्रभाव ॥२५॥
त्या सत्यभामादिक देवनारी । सोळासहस्राधिक गोपनारी ।
चंद्रावळी त्यांतहि मुख्य राधा । संतोषल्या देखुनियां मुकुंदा ॥२६॥
प्रल्हाद आला सहदैत्य पासीं । लंकापती राक्षस-यूथपासीं ।
आला तदां नारद भक्तराजा । गातो मुखें विठ्ठलनाम वोजा ॥२७॥
वशिष्ठ तो श्रेष्ठ ऋषींसमेतें । आला समाधीस विलोकनार्थें ।
जे अंबरीषादिक भक्तराजे । आले असे श्रेष्ठ समाधि गाजे ॥२८॥
कैलासवासी हरपार्वतीसी । समाधि-संतोष-विलोकनासी ।
दावावया कौतुक शैलजेला । नंदीश्वरारूढ जवेंचि आला ॥२९॥
साक्षात्त्रिलोकेश्वर पांडुरंग । जेथें उभा तेथिल काय रंग ।
वर्णावया ये कवि-मंद-वाचे । उदार ऐसे गुण केशवाचे ॥३०॥
केली समस्तीं जयघोषवाणी । प्रसून-वृष्टी रचिल्या सुरांनीं ।
सुरांगना आरतिया सुदाटीं । वोवाळिती विठ्ठल रत्नताटीं ॥३१॥
ऐसा महोत्साह विराजलाहे । समाधि ज्ञानेश्वर सेवितांहे ।
नाचे तदां तो परसा सुभक्त । नामा तसा नाचत प्रेमयुक्त ॥३२॥
तैं नामदेवामनिं खंति दाटे । नेत्रोत्थ बाष्पांबु विशेष लोटे ।
बोले तदा श्रीधर रुक्मिणीसी । समाधि हा सेवित ज्ञानरासी ॥३३॥
ऐसा न देखे ममभक्त दूजा । कलींत हा दुर्लभ ज्ञानराजा ।
हा जाणसी कीं सति प्राण माझा । यासारिखा हाचि यथार्थ वोजा ॥३४॥
सर्वा जगाचा अपमृत्युहर्ता । संजीवनी जाणसि ज्ञाननाथा ।
अळंदिका-वासचि योग्य यातें । आह्मी वसूं यासह तोष-चित्तें ॥ ३५ ॥
जो भक्त मातें निरखील डोळां । ज्ञानेश्वरा सन्निध येक वेळां ।
तारील गोत्रासह सत्कुळासी । होयील वैकुंठपदीं विलासी ॥ ३६ ॥
हें धन्य आहे शिवपीठ नारी । श्रीनीळकंठाख्य वसे पुरारी ।
येथें करी श्रेष्ठ तपा विरंची । तो पावला ब्रह्मपदा त्रिवाचीं ॥ ३७ ॥
इंद्रा घडे गौतम-शाप भारी । भोगी अहल्या कपटें सुनारी ।

निःसत्व येतां सुरलोकनाथा । येथें करी तो तप वृत्रहंता ॥ ३८
झाला तदां पातकमुक्त देहीं । तो पावला देव-पदासि पाहीं ।
इंद्रायणी नाम नदीस तेणें । या ठेविलें तोषुनि वासवानें ॥ ३९ ॥
यीच्या तिरीं इंदुपुरी विराजे । या पंचकोशांतरिं फार साजे ।
भोगी गुरूची शशि दिव्य तारा । ते मागतां नेदिच त्या भ्रतारा ४०
शापी तदां तो गुरु त्या शशीतें । प्रतारिसी फारचि काय मातें ।
क्षयी कलंकी घडसील चंद्रा । तेणें घडे रोग तया द्विजेंद्रा ॥ ४१॥
टाकोनि तारा क्षयरोग होतां । मनांतिलीही सरली अहंता ।
बृहस्पतीच्या वचनेंचि येथें । केली तपस्या उडुलोकनाथें ॥ ४२ ॥
येथें त्रिवेणी अतिगुप्त वाहे । भागीरथी भैरवसंन्निधी हे ।
पूर्वेवरीं पर्वतराजकन्या । माया वसे शंभुस ती सुधन्या ॥ ४३ ॥
सभोंवते हे वनवृक्ष पाहीं । हे देव सारे अनुमान नाहीं ।
तात्काळ अस्थी घडतात पाणी । हे तीर्थकर्ता विभु चक्रपाणी ॥४४॥
हे पंढरीहोनि विशेष आहे । कळींत सोपी सकळां जना हे ।
नसे कळीचें भय या अळंदीं । येवोनि जंतू जरि तीर्थ वंदी ॥ ४५ ॥
प्रेमें वदे विठ्ठल रुक्मिणीतें । उचंबळे अद्भुत प्रेम त्यातें ।
सबाष्पकंठें हरि हेंचि बोले । ते धन्य जीच्या उदरासि आले ॥ ४६ ॥
ऐकोनि ऐशी हरिवक्त्रवाणी । संतोषली पंढरिनाथराणी ।
ते रुक्मिणी पूसतसे हरीला । विचित्र ज्याची अनुपम्य लीला ॥ ४७ ॥
" चौघे महाभक्त उदार साचे । हे पूतळे केवळ चिद्रसाचे ।
हे अंश कोणा सुरसत्तमाचे । स्नेहाळ तूझे पुरुषोत्तमाचे ॥ ४८ ॥
कलींत येहीं अवतार केला । किमर्थ हाही विधि सांग बोला ।
सांगा सविस्तार कथा दयाळा । तारी जनातें अतिचित्रलीला ॥" ४९ ॥
' प्रिये ' म्हणे विठ्ठल ' ऐक आतां । शंभूचि तूं जाण निवृत्तिनाथा ।
मदंश हा ज्ञानमणी विराजे । सोपान वेधास्य यथार्थ साजे ॥ ५० ॥
जे मुक्ति मी कीं सुजनासि देतो । ते हेचि मुक्ता तुजला कथीतों ।
प्रत्यक्ष झाले कलिमाजि लोकां । उद्धारकर्ते मम भक्त जे कां ॥ ५१ ॥
राहोनि मी मौनचि पंढरीतें । आहें नसें भाषण तैंचि मातें ।
सांगावया तत्व यया जनांला । म्यां ज्ञानरूपें अवतार केला ॥५२॥
संवादसौख्यामृतसेवनार्था । कर्मावया शंकर आदिनाथा ।
म्यां आणिलें त्यासि निवृत्तिरूपें । जनांत केलें परतत्व सोपें ॥५३॥
संवादसौख्यामृत हे दिवाळी । देखोनि पाठी विधि धांव घाली ।

सोपानरूपें मम सन्निधानीं । हा राहिला यास्तव सत्य मानी ॥५४॥
हे योगमाया मम खेळ सारा । आधीन यीच्या रचिला पसारा ।
क्रिया अक्रिया ह्मणवोनि यीतें । म्यां ठेविलें नांव महासतीतें ॥५५॥
हे बंधरूपा जगिं मुक्तिरूपा । हे शक्ति माझी अमल स्वरूपा ।
तयांत हे केवळ मुक्तिदात्री । मुक्तात्मिका साच घडे धरित्रीं ॥ ५६ ॥
जे वर्तली ज्ञानमुखें सुवाणी । जे ऐकती भाविक भक्त कोणी ।
तयांसि तात्काळचि मुक्ति धात्री । म्यां आणिली यास्तव आदिदेवी ५७
व्यासें महाभारत रम्य केलें । तें पांचवा वेद म्हणोनि बोलें।
जो भारतीं वर्णित अर्थ नाहीं । तो साच झाला जगतींत नाहीं ॥५८॥
तत्रापि त्यामाजि मदीय गीता। म्यां बोधिली पांडवमध्यभक्ता ।
ते मुक्तिदात्री अतिगूढ आहे । भावार्थ तीचा तरि व्यक्त नोहे ॥५९ ॥
निवृत्ति हा शंकररूपधारी । यती घडे हाच पुरा शरीरी ।
येणें महाभाष्य करोनि गीता । हे ठेविली पंडितपात्रनार्था ॥ ६० ॥
आपामरांलागि कळावयातें । ते कींव आली अतिथोर मातें
टीका मऱ्हाठी विवरोनि सोपी । करीन मी प्राकृत ज्ञानवापी ॥ ६१ ॥
ह्मणोनि केला अवतार आह्मी । त्रिवर्गदेवीं सति जाण भूमीं ।
विकल्प येथें न धरींच कांहीं । आह्मांविना बोधक अन्य नाहीं ॥६२॥'

॥ इति श्रीज्ञानेश्वरविजये समाधिवर्णने द्वितीयोध्यायः
श्रीविठ्ठलप्रीतयेऽस्तु ॥

---

# अध्याय तिसरा.

पुसे रुक्मिणी देवदेवासि भावें । म्हणे 'गूढही तत्व मातें वदावें ।
कलीमाजि या प्राकृतालागि सोपी । करा कां सुगीता परब्रह्मरूपी' ॥ १ ॥
हरी बोलले ऐक वो सुंदरांगी । तुला सांगतों गुह्य मी या प्रसंगीं ।
पुरा व्यासरूपेंचि सारीं पुराणें । महाभारता म्यांच केलें सुजाणे ॥ २ ॥
चहूं वेदिंच्या म्यां विभागासि केलें । मुनी शिष्य दिल्हे तया साच बोले ।
महावेद शाखोपशाखा उदंडा । रचोनी करी एक तो खंड खंडा ॥३॥
नसे बुद्धि येकासि सारा धराया । मला हेंच कीं कार्य शाखा कराया ।
ऋषी शिष्य पैलादि ते जाण माझे । तया वाटितां वेद लोकीं विराजे ॥ ४॥
वैशंपायनही तयांत बरवा तो शिष्य माझा सती

म्यां हें भारत त्यास कीं पढविलें देखोनियां सन्मती ।
तेणें तेंचि पुढें परीक्षितिसुता जन्मेजयाकारणें
केलें कीं कथनासि त्यासि घडल्या त्या विप्रहत्या म्हणे ॥५॥
होता पांडववंश तोंवरि असे चौथ्या कलीच्या युगीं
कांते जाण युधिष्ठिराख्य शक तो तों वेदशास्त्रा सुगी ।
झाला त्यावरि विक्रमाख्य बरवा तोही भला चालिला
जेथें धर्म उदार भूपति महा भोजा असा जाहला ॥६॥
होते तोंवरि विप्रवृंद बरवे आचारयज्ञादिकें
शाखा–अध्ययनें करोनि असती गीर्वाण–विद्याधिकें ।
झाला तो मग शालिवाहन महा कर्ता शकाचा तदां
झाले भूपति म्लेंछ दुष्ट करिते गोब्राह्मणांच्या वधा ॥७॥
तैं ब्राह्मण्य समस्त हीन घडलें वृत्तीविना कष्टलें
वेदाभ्यास नसे न यज्ञविधि तो गीर्वाणही भ्रष्टलें ।
झाले सेवक हे अविंध–कुळिचे आभासमात्रें द्विजा
जाणावे उरलें नसेचि दुसरें संध्या नसे श्रीपुजा ॥८॥
कोणी वैदिकही तयांत वसती दंभेंचि ते नष्टले
नाहीं शास्त्रविचार वित्तविषयीं हिंडोनि ते भ्रष्टले ।
तेव्हां तत्वविचार कोण कथिता लोकांत दुर्ब्राम्हणा
यासाठीं करुणा करोनि रचिली गीता जगत्तारणा ॥९॥
याअर्थीं अवतार म्यांचि धरिला या ज्ञानदेवाभिधें
केलें प्राकृत भाष्य मान्य सकळां लोकांसि वैशारदें ।
आतां प्राकृत ग्रंथ हेच पढतां जातील मुक्तीप्रती
कैंचे वेद पुराण यज्ञरचना कैं धर्म आतां सती ॥१०॥
आतां ऐक रहस्य भक्ति धरिजे मन्नाम उच्चारिजे
मन्नामेंचि कलींत आप तरिजे लोकांसही तारिजे ।
माझी कीर्तिसुधा सुखें निजमुखें ते सज्जनीं प्राशिजे
हो कां संस्कृत प्राकृतेंचि अथवा येणें कली नाशिजे ॥११॥'

असें ऐकतां तोषली देवराणी । जिची पूर्ण केली हरीनें शिराणी ।
तदां ज्ञानदेवास दिल्ही समाधी । महावैभवें विठ्ठलें घोषवेदीं ॥ १२ ॥
विमानीं महापुष्पकीं रात्रि नेली । महानंदयोगेंचि सद्भक्तमेळीं ।
सदांही कथा हेचि ज्ञानेश्वराची । हरीच्या मुखीं श्लाघना सद्गुणांची ॥१३॥
रविउदय तदां तो जाहला दिव्य जेव्हां

ता......

नरहरि करि आज्ञा त्या विमानासि तेव्हां !
धरणितळिं समस्तीं ऊतरोनी द्विजांनीं
करिति सकळ संध्यास्नानदानें विधानीं ॥ १४ ॥

न देखोनि ज्ञानेश्वरा संतलोकीं । तदां मांडिलासे महाशोक तो कीं ।
न देखेंचि ते मूर्ति ज्ञानेश्वराची । यया लोचनीं दूसरी श्रीधराची ॥ १५ ॥
तदां देव संबोखिती तूं निवृत्ती । महादेव तूं काय हे तूज खंती ।
जगा तारिता तूंचि कीं आदि होसी । नव्हे युक्त हे क्लेश तूझ्या मनासी १६
तदा दीर्घ सोपान पायांसि लोटे । तदां मुक्तिबायीस या देव भेटे ।
न देखोनियां लोचनीं ज्ञानदेवा । न कंठे आम्हां साच बा वासुदेवा ॥१७॥
धरी देव सोपान तो एक हातें । दुजी मुक्ति बाळा धरी अन्यहस्तें ।
तदां नामदेवादि भक्तांसमेतें । शमी खालुते बैसले देव तेथें ॥१८॥

हळहळ करिती ते संत सद्भक्त सारे । स्तवित अमळ चित्तें कृष्ण विष्णु मुरारे ।
त्रिकळ सकळ आम्हीं जाहलों आजि देवा । त्वरित सदय आम्हां भेटवीं ज्ञानदेवा
हरि म्हणति पहा रे सर्वभूतांत त्यातें
सकळहि घडला हे ज्ञानदेवा विभूतें ।
परम अणुभरीही ठाव नाहीं निराळा
अचळचळसमस्तीं एकरूपें मिळाला ॥२०॥
अवचित नभगर्भीं वर्तली व्योमवाणी
म्हणत श्रवण कीजे गोष्टि हे सज्जनांनीं ।
अढळ सकळ काळीं हेचि जाली अळंदी
त्रिभुवन–जन तारी मुक्तिही यीस वंदी ॥२१॥

सिद्धेश ज्ञानेश्वर हे अळंदी । सदां असे ज्ञाननिधी समाधी ।
अनादि यीतें म्हणवोनि जाणा । नव्हे कदा शोक बरा सुजाणा ॥२२॥
तेथें मिळाले सनकादि संत । हे ऐकतां केवळ हर्षभूत ।
पिटोनि टाळ्या जयकार केला । तो नाद ब्रह्मांड भरोनि गेला ॥२३॥
प्रस्थान कीजे मग देवदेवें । हें योजिलें देखुनि नामदेवें ।
तैं घातली लोळण भूमिदेशीं । पिटी तदां भाळ करें विशेषीं ॥२४॥

रडे वोरडे नामया दीर्घ–कंठें । तया ज्ञानरत्नाविना तो न कंठे ।
म्हणे प्राण टाकीन वांचोनि कांहीं । मला या जगीं साधणें अन्य नाहीं २५
तदा पाहिलें विठ्ठलें नामयातें । म्हणे लागलें कोण वेडें ययातें ।
उगा कां रडे वोरडे व्यर्थ नामा । यया जाणत्या सांतवी कोण तो मा २६
पुसे पंढरीनाथ या नामदेवा । वृथा खेद कासासि देतोसि जीवा ।

नसे ठाव दुःखासि कोठेंचि कांहीं । तुला सांगिजे काय तें आणिकांहीं २७
म्हणे सांग तूझ्या मनीं काय आहे । वृथा फुंदसी गोष्टि हे युक्त नोहे ।
वदे काय तूझ्या मनीं साच वाणी । तुझी ऊरली कोणती ते शिराणी॥२८॥
असें ऐकतां त्यासि संतोष वाटे । पुढें बोलतां बोलतां कंठ दाटे ।
म्हणे ज्ञानदेवास दावीं दयाळा । तयावेगळा अर्थ नेदीं निराळा ॥२९॥
मला ज्ञानदेवाविना तों न कंठे । पुन्हा देखिजे एकदां होचि वाटे ।
तया भेटिजे आटिजे शोकसिंधू । मना आवडे पूरवी दीनबंधू ॥३०॥
असी ऐकतां नामयाची सुवाणी । तदां हासिले बोलिले चक्रपाणी ।
अम्ही दीधली ज्ञानदेवा समाधि । पुन्हा तो कसा ऊठवावा सुबुद्धि ॥३१॥
नये आहुती होमिली जेंवि हातीं । तसी गोष्टि हे तूं न वाहेचि खंती ।
समुद्रीं जसी मीनली मेघधारा । नभीं लीन झाला जसा थोर वारा ॥३२॥
पुन्हा ऊठणें तेंवि ज्ञानेश्वराचें । नव्हे शोक टाकी नसे काम याचें ।
नको आळ घेऊं वृथा नामदेवा । स्मरें अंतरीं यापरी ज्ञानदेवा ॥३३॥
असे सर्व भूतांतरीं ज्ञान कांहीं । तयावेगळें दूसरें साच नाहीं ।
अरे देखिला जो परिछिन्न होता । समस्ता जगीं व्यापला तोचि आतां ३४
मिळाली स्वयें सागरीं जाण गंगा । पुन्हा ते कसी सांग येईल मागां ।
तसा मीनला व्यापकीं साच ज्ञानी ।तया दाविजे केंवि तूं गोष्टि मानीं ३५

हा ज्ञानागर ज्ञानसागर असे हा ज्ञानतारू जना
हा ज्ञानांजन हाचि दान विलसे ज्ञानें दिसे सज्जनां ।
ध्यानें गम्य घडे यथार्थ वदतों ध्यानेंचि हा सांपडे
यासाठीं मम गोष्टि ऐक बरवी ध्यानीं स्मरे रोकडें ॥३६॥
मातें पाहुनि मीच तो म्हणुनियां भावीं सुखें नामया
माझें रूपचि तें दुजेपण कधीं नाहीं अह्मांतें तया ।
माझा नाम–सुघोष नित्य करिं तूं मातेंचि तूं आळवीं
मी ज्ञानेश्वर जाण दृश्य तुजला मातेंचि तूं पाळवीं ॥३७॥
म्हणे नामा देवा ! तळमळ मला फार सुटली
न राहे माझ्या या मनिं डहुळली दुःखपटली ।
मला आतां जेव्हां दरुषण नव्हे ज्ञाननिलया
न राहे या लोकीं मम तनु असें जाण सदया ॥३८॥
समर्थाच्या बाळा न पुरति लळे केंवि कथिजे
तुझ्या दासें इच्छा करुनि फळ कैसें न पविजे ? ।
नसे मातें वाटे हरिजन तयां दुर्लभ जनीं

हरी तूं विश्वात्मा असिसि अमुतें तातजननी ॥३९॥
स्वभक्तासाठीं त्वां अघट घडवावें तरि हरी
तयाचें पाळावें वचन सहसा त्वां नरहरी ।
कसा पार्थासाठीं कळवळुनि तात्काळ अपुलें
स्वरूपा दावावें हरि—विधि—सुरीं ना निरखिलें ॥ ४० ॥
घडावीं तात्काळीं अमित लुगडीं एक निमिषीं
तया पांचाळीची कळवळ तुला कां हरि असी ।
निशीं शाखापत्राप्रति करुनि आरोगण हरी
महान्नें दुर्वासा रचुनि भयपीडा परिहरी ॥४१॥
दहा सोंगें एका धरिसि तरि भक्तार्थ सखया !
अम्हांसाठीं कैशी अमट करिसी ते तव दया ।
घडावेंना तेंही घडविसि मनीं साच धरितां
कसा होसी देवा कृपणपण आतांचि करितां ॥४२॥
गजेंद्रें बाहावें तुज तंव हरी धांवसि कसा
खगेंद्रा टाकोनी अमित पडला तूज वळसा ।
स्वभक्तांचे ऐसे मनिं धरुनि तूं पाळिसि लळे
अम्हांसाठीं कैसा घडसि अति निष्ठूर न कळे ॥४३॥
करीं दीनानाथा बिरुद अपुलें साच बरवें
न होतां या नावा त्यजुनि मग लोकांत मिरवें ।
न जावें दैन्यानें तरि मिळुनि हातीं सुरतरू
तया कोणीं लोकीं भजल मग सांगें सुरगुरू ॥४४॥
स्वभक्तांच्या छंदा पुरविसि हरी तूं प्रतियुगीं
अम्हांसाठीं मुद्रा अपण धरिली मौनचि उगीं ।
मला दावीं ज्ञानेश्वर दवडिजे शोक परता
असा माझा स्वामी असिसि विभु तूं श्रेष्ठ पुरता ॥४५॥
असी हे नाम्याची परिसुनि सुवाणी करुण हे
तदां वीठोबाच्या मुखिं किमपिही शब्दचि न ये ।
तटस्थाकारें तो त्रिभुवनपती स्तब्ध बसला
कसें कीजे नामा धरुनि नसता आळ रुसला ॥४६॥
न कीजे म्यां याचें तरि पळभरी जीव न धरी
तदां माझें गेलें यश सकळ कांहींच न उरी ।
अम्हीं कैसें वांचूं जगतिं मग नाम्याविण घडी

असे माझ्या प्राणाहुनि अधिक हा गोष्टि उघडी ॥४७॥
करावें कीं याच्या असल मनिचें हेंचि बरवें
तदां माझें सारें यश भुवनकोशांत मिरवे ।
न होतां हें गेलें सकळ मिळवीलें बहु–युगें
स्वभक्ता कैवारी म्हणुनि वदिजे कां मग जगें ॥४८॥
अलिंगी नाम्यातें पसरुनि भुजा च्यारि हरि तो
स्वभक्तांच्या तापा क्षण न लगतां नित्य हरितो ।
कसा तो खेदाचा परिहर करीना निजगडी
रडे नाम्या ऐसा अठउनि स्वमित्रा घडिघडी ॥४९॥
कर स्पर्शी माथां सकळ करिता शोक परता
स्वदासांच्या चित्ता उचित फळ देणार पुरता
तदां बोले नाम्याप्रति हरि मुखें धन्य अससी
त्रिलोकांच्या भाग्या उघड करिता तूंचि दिससी ॥५०॥
अरे ! मद्भक्तांची सरि कवण लोकीं करिल या
जयाच्या माथां ते मम विलसते फारचि दया ।
न होणेंही व्हावें धरिति मनिं तैं भक्त सहसा
असे मी कामारी कथित करितों हा भरवसा ॥५१॥
असोनी ऐसेंही तुज कथितसें जाण बरवें
नसे येथें ज्ञानी अमळ निजलोकांत मिरवे ।
असे जेथें गेला नियत मम तो पुंडलिक रे
नये तो माघारा म्हणुनि न करीं शोक न झुरें ॥५२॥
चला जाऊं आतां सकळ सखया पंढरपुरा
करीं तेथें माझें भजन करिसी ज्यापरि पुरा ।
तदां नामा बोले मज निरखवीं ज्ञाननिधि तो
न होतां चित्ताचें न करि मग मी पूर्वविधि तो ॥५३॥
न नाचे मी रंगीं तवनिकट त्या रंगसदनीं
न नाचे भीमेच्या अति वितत त्या रम्य पुलिनीं ।
कथा वार्ता वीणा सकळ तव पादार्पण करी
न राहे मी आतां नियत तुझिया पंढरपुरीं ॥५४॥
वनीं एकांतीं त्या वसुनि भलत्याही गिरिदरीं
करीं आयुष्याचें क्षपण परिसे तूं नरहरी ।
फळें कंदें मूळें गळित तरुपानें तृण जळें

करूं वृत्ती आतां अवतरि असे जीवित बळें ॥५५॥
असें नामा बोले नयनिं जळधारा गळतसे
ययातें देखोनी नरहरि मनीं विव्हळ दिसे ।
कसें कीजे आतां कवण रचिजे यत्न बरवा
कसा ज्ञानी येतो दहनिं मिळला कापुरखा ॥ ५६ ॥
तदां बोले आयी हळुच रखुमाई सुविनयें
अजी जावें तेथें त्वरित विनतेच्याचि तनयें ।
वदावी ते आज्ञा सरस अपुली पुंडलिक त्या
तुम्ही ज्ञानोबांसी धरणिवरि यावें जनहिता ॥५७॥
न ऐके हा नामा कवण मग तो यत्न करिजे
यया बाळाचेंही हित अपुण चित्तांत धरिजे ।
असे बोले देवा त्रिजगजननी भीमकसुता
तदां बाहे वेगीं हरि गरुड तो भक्त पुरता ॥५८॥
म्हणे जावें वेगीं मम पदिं वसे पुंडलिक तो
असे ज्ञानी तेथें म्हणुनि तुज मी गूज कथितों ।
तयां दोघां आणीं कथन करि वृत्तांत समुदा
तुम्ही भेटा मातें पुनरपि वसा जाउनि पदा ॥५९॥
पहा नामा छंदें बहुत परि हा दीर्घ रडतो
ययाच्या हृत्पद्मीं अति विरह संताप कढतो ।
यया भेटायातें सहज उभयीं येउनि घडी
पुन्हा जावें आह्मां निरखुनि कथीं गोष्टि उघडी ॥६०॥
असी आज्ञा होतां गरुड अतितोषें उडतसे
पहा माझ्या वेगा पवन मग वेगें क्रमितसे ।
स्वपक्षाक्षेपें जो सकळ करि आंदोलन जगा
लयांतींच्या वातासम उडवितो भूधरनगा ॥ ६१ ॥
त्वरेनें वैकुंठा घडि पळ न लागे तंव सरे
महावेगें जातां गरुड तनुचें भान विसरे ।
त्रिलोकेशा वाहे त्वरित खग जाये निजपदा
सडा जातां त्यातें किति उसिर तो लागल वदा ॥६२॥
तदां संतोषें तो जय-रव उठे वैष्णवगणीं
आह्मां सोपा आहे त्रिभुवनमणी विठ्ठल धणी ।
पहा ! आम्ही जें जें मनिं धरितसों तेंचि पुरवी

तमाची ते बाधा परिहर कसा तो करि रवी ॥६३॥
निरोपातें सांगे गरुड विनयें 'पुंडलिकजी !
तुम्हांतें पाचारी नरहरि चलावें त्वरित जी ।
त्रिलोकीचे आले हरिजन धरें मोक्षपदिंचे
तुम्ही नाहीं आलां म्हणुनि विभुला तोष न वचे ॥६४॥
सवें घ्या ज्ञानेशा हरि बहुतसी वाट निरखी
त्वरें भूलोकातें सरुनि करिजे विठ्ठल सुखी ।
तुम्हांसाठीं नामा बहुत झुरतो खंति करितो
पुन्हा देवाचें तें स्मरस्मरुनियां पाय धरितो ॥६५॥
ययासाठीं दोघीं त्वरित निघणें युक्त दिसतें
तुम्हां नेतों खांदीं बसउनि पळांमाजि निरुतें ।'
असी ऐके तेव्हां गरुड मुखिची गोष्टि बरवी
तदां पुंडोबाच्या सुख अमुप वाढे निजजिवीं ॥६६॥
पुजी प्रेमें भावें हरिसम सखा अंडजपती
धरी ब्रह्मांडेशा सबळ निजखांदीं द्रुतगती ।
हरीचा हा घोडा त्रिभुवनिं न जोडा जन यया
अशा स्तोत्रें तोषा बहुतचि करी पुंडलिक या ॥६७॥
'बरा झालों मीही बहुत दिवसां धन्य सखया
हरीनें केली कीं सय मज मनीं आणुनि दया ।
त्यजोनी तैं गेला प्रभुवर पहा पंढरपुरा
असा भक्तांचें हा यश मिरविता सत्प्रिय खरा ॥६८॥
यया ज्ञानेशार्थी परम विरहें तापित दिसे
मलाही हा लाहो परम घडला यातरि मिसें ।
चलावें ज्ञानोबा अज निरखितो वाट तुमची
तुम्हांसाठीं झाली सय बहु दिसां आजि अमुची ॥६९॥
रडे नामा खेदें बहुतचि तुम्हां आठवुनियां
मनीं त्या मोहाच्या निधिस अपुल्या सांठउनियां ।
पुन्हां आम्हीं तुम्हीं नयनिं निरखूं तो सुरपती
पतीतांचा त्राता म्हणुनि नियमें भक्त जपती ॥७०॥
पती तो लक्ष्मीचा त्रिभुवनपती तो व्रजपती
पती हा विश्वाचा म्हणुनि भजताहे पशुपती ।
पती पृथ्वीचाही घडुनि वधिला राक्षसपती

पतीतोद्धारांचा नियत ह्मणवी शेष सुपती ॥७१॥'
असें पुंडलीकामुखें ज्ञानदेवें । बरें ऐकतां वाक्य बोले चलावें ।
अम्हां हेंच सेवा करूं तोष देवा । सदां सर्वसौख्यामृता तोचि ठेवा ॥७२॥
विमानासि पाचारिलें पुंडलीकें । तदां पातले कोटिसूर्येंदु-लेखें ।
तयामाजि आरूढले भक्त दोघे । महा प्रेम ज्यांच्या मनीं नित्य जागे॥७३॥
अगा वैनतेया पुढें जा हरीला । अम्ही पातलों सांग लक्ष्मीपतीला ।
सुखाचा अम्हां सोहळा प्राप्त झाला । समाजांत लक्षूं तया विठ्ठलाला॥७४॥

**इति श्रीज्ञानेश्वरविजये समाधिवर्णनं पुंडलीकागमनकथनं नाम तृतीयोध्यायः ॥ श्रीगुरुनाथ ॥ श्लोक १९३ ॥**

---

# अध्याय चौथा.

पुढें चाले वेगें गरुड अपुल्या पक्षगतिनें
विमानें चालावें किति मजपुढें याच मतिनें ।
विमानाच्या वेगा गरुड निरखी तों दिसतसे
जवें पाठीं धांवे मनपवनवेगा जिणतसे ॥ १ ॥
पुढें आला वेगें खग हरिपदा वंदन करी
म्हणे या देखावें तुह्मि गगनयाना झडकरी ।
ययामध्यें दोघे मिरविति तुझे भक्त बरवे
जयांच्या सामर्थ्या त्रिभुवनपती तो न पुरवे ॥ २ ॥

## भुजंगप्रयात.

सुपर्णामुखें ऐकतां पंढरीशें । निरीक्षी नभा लोचनीं फार हर्षें ।
तदां दाखवी त्या विमानासि हरतें । प्रिया रुक्मिणीसत्यभामादिकांतें ॥३॥
म्हणे नामया येतसे यान पाहे । ययामाझि तूझा सखा दीसताहे ।
तुझा छंद हा पाळिला ज्ञानदेवें । तुला धन्य केलें त्रिलोकीं सदेवें ॥४॥
तगे तें पहा व्योमयानासि नेत्रीं । जयाच्या प्रकाशा पुरेना धरित्री ।
सख्या ज्ञानिया पुंडलीकासमेतें । दिठीं देखसी भेटसी प्रेमचित्तें ॥५॥
तदां हर्ष मायीचना नामयाचा । मनीं आणि पोटीं जगीं सर्व साचा ।
त्रिलोकीं न ब्रह्मांडगर्भात सांठे । जयालागिये लोपलें तत्व भेटे ॥६॥
नमी विठ्ठला बोलिला भक्त नामा । तुम्ही काय देवा करानात तेमा ।

असी तूमची जाणतां श्रेष्ठमाया । नसे देव लोकत्रयींही वदाया ॥ ७ ॥
तदां साम्य येईल कोणासि तूझें । तदां तूंहुनी श्रेष्ठ कैंचा विराजे ।
म्हणोनीच म्यां घेतला आळ देवा । तुवां पाळिजे मायबापा सदेवा ॥८॥
घडेना तसेंही घडों आणिसी जी । असें हें तुझी योगमाया नियोजी ।
नमो इंदिरेशा तुझ्या पादपद्मा । नमो सत्यभामाप्रिया सौख्यसद्मा ॥९॥
असें बोलुनी तो उगा मौन वाहे । पुढें पातल्या त्या विमानासि पाहे ।
लयांताग्निचंद्रार्क तेजें लखाखी । समस्तांचिया नेत्रपात्यांसि झांकी ॥ १०॥

## शिखरिणी.

असें आलें पृथ्वीवरि उतरलें पुष्पक तदां
पहा त्या भक्तांच्या मनिं उसळला हर्ष समुदा ।
अम्हा झाला कैसा दिवस तरि हा धन्य सकळां
कळेना कोणातें त्रिभुवनपतीविठ्ठलकळा ॥ ११ ॥

## भुजंगप्रयात.

अहो पुंडलीकासि ज्ञानेश्वरातें । तया नामया आणि लक्ष्मीधरातें ।
सतीरुक्मिणी–सत्यभामासमेतें । अम्ही पाहतों पुण्य हें काय होतें ॥१२॥
असा काय एकांत दृष्टी पडावा । असा काळ कोण्या भवीं आतुडावा ।
असे तोषले गर्जती नामघोषें । दिशा सर्वही पूर्ण झाल्या विशेषें ॥ १३ ।
निरीक्षोनियां सन्निधीं चक्रपाणी । त्वरें ज्ञानियालागि हातीं धरोनी ।
सुखें पुंडलीकें विमानावरोनी । तदां ऊतरे धन्य तो काळ मानी ॥ १४ ।
नमी विठ्ठलाच्या पदीं दंड तैसा । झरे प्रेमधारा दिठीं पूर तैसा ।
सुरोमांच कांटे कितीं दाट देहीं । दिसे पातला ते क्षणीं कंप तोही ॥१५॥
असा अष्टभावीं बुडाला दिसेना । तया देखते सर्वही भक्तसेना ।
म्हणे धन्य हा भक्त कीं पुंडलीक । जगीं पाहिला वर्णिजे हाचि एक॥१६॥
जयाकारणें या क्षितीं शेषशायी । उभा राहिला पंढरीमाजि पाही ।
अम्हां हेंचि वैकुंठ याच्या कृपेनें । न लागे बहू दूर तें ऊर्ध्व जाणें ॥१७॥
मिठी घातली पुंडलीकें पदाब्जीं । गळे बाष्पधारा तया लोचनाब्जीं ।
गळां शब्द रोधी नये बोल कांहीं । तया ऊठवी त्याक्षणीं देव बाहीं॥१८॥
चहूंही भुजांनीं अलिंगी स्वभक्तां । अनेकां दिसां देखिलें प्रेमयुक्ता !
कसा काळ हा धन्य झाला मला रे । दिठीं या तुला देखिलें म्यां मुला रे १९
तदां प्रार्थिलें पुंडलीकें हरीतें । म्हणे हेंचि द्यावें अखंडार्थ मातें ।

जसें ज्ञानदेवीं जसें नामदेवीं । तसें प्रेम माझे स्थळीं नित्य ठेवीं ॥२०॥
तदां रुक्मिणी सत्यभामेसि वंदी । न माये जगीं त्यासि आनंद कंदीं ।
तदां भेटले भक्त ते उद्धवादी । कसा लोटला प्रेमलोटें सुखाब्धी ॥२१॥
नमी ज्ञानिया पंढरीनायकातें । महासौख्यसंपत्तिच्या दायकातें ।
तदां भेटले नामया आणि ज्ञानी । सुखें पुंडलीक स्वयें धन्य मानी ॥२२।
म्हणे नामया तूं जगीं धन्य होसी । नसे भक्त तूझ्या असा केशवासी ॥
पदीं पावल्या ज्ञानदेवासि येथें । तुझ्या कारणीं आणिलें या समर्थें ॥२३॥
युगाचेयुगीं धन्य कीं भक्त तुम्ही । अळंदी सदांही असे जाणतों मी ।
जगा उद्धरायासि हे गुह्य देवें । असें ठेविलें तत्व हें वासुदेवें ॥२४॥
जगाकारणें पंढरी आणि काशी । प्रसिद्धा जगीं उत्तरे दक्षिणेसी ।
तयांहूनि हे गुह्यदेवें अळंदी । स्वभक्तांचिया ठेविली मोक्षसिद्धी ॥२५॥
जसा भूप भांडार राखे जिवाचें । तसें मुक्तिभांडार हें केशवाचें ।
सुविश्वासिया दाखवी हे अळंदी । जया वाटतें देइजे मोक्षसिद्धी ॥२६॥
जुनें पीठ वैकुंठ भूलोकिचें हें । यथें नीळकंठेश हा देव आहे ।
यथें ब्रह्मरुद्रादि सर्वां सुरातें । महासिद्धि संप्राप्त झाली पुरा ते ॥२७॥
असे साच कैलास हे भूमिभागीं । वुझे मातुलिंगाख्य हें क्षेत्रयोगीं ।
असे बोलती ये स्थळीं केशिराजा । चतुर्भूज राहे सदा स्वामि माझा ॥२८।
यया दक्षणे पंचकोशांत पाहे । महाक्षेत्र तें पुण्यनामाख्य आहे ।
असे दिव्य नागेश लिंगासि मानी । नदी नागनाम्नी असे सन्निधानीं ॥२९।
नद्या तेथ मूळा मुठा नागगंगा । त्रिवेणी घडे तुल्य मानी प्रयागा ।
असे पश्चिमे जाण इंदूपुरी ते । महाक्षेत्र संहार पापा करीते ॥३०॥
अळंदीस तेही वसे पंचकोशीं । तिथें दिव्य ब्रह्मेश तो सत्वराशी ।
जगा उद्धराया सदोदीत राहे । जगीं धन्य तो लोचनीं त्यासि पाहे ॥३१॥
असे उत्तरे खेटकीं सिद्धलिंग । असे पंचकोशांत तेही अभंग ।
असी भीमरा दक्षणे वाहताहे । पहा दिव्य भागीरथी तीर्थ आहे ॥३२॥
पहा पूर्वभागींच इंद्रायणीचा । कसा संग हा शोभला भीमरेचा ।
महालिंग तें संगमेशाख्य आहे । तया पाहतां पाप कांहीं न राहे ॥३३॥
ययांमाजि मध्यस्थळीं हे अळंदी । वसे मूळ सिद्धेश हा चित्सुखाब्धी ।
नदी दिव्य इंद्रायणी देवगंगा । तिच्या स्नानमात्रेंचि ने पाप भंगा ॥३४॥
पहा दक्षणे वाहते सर्वकाळीं । यथें ज्ञानिया नांदतो प्रेमशाली
करी स्नान येथें तया कोटितीर्थं । कृतस्नान सत्पुण्य जोडे तयार्थं ॥३५॥
असी दिव्य काशी गया आणि वेणी । प्रयागादि येथेंचि तूं सत्य मानी ।

असे नित्य येथें हरी शंकरासी । पहा मोक्ष प्रत्यक्ष दे पामरासी ॥३६॥
अशा सुस्थळीं ज्ञानदेवा समाधी । दिल्ही विठ्ठलें सर्वलोकार्थसिद्धी ।
तुझें भाग्य हें नामया धन्य आहे । तुझ्याकारणीं देखिले देवराये ॥३७॥
नसे देवलोकीं न पाताळपोटीं । असें तीर्थ हें सिंधुच्या सप्तवेटीं !
मिळे ज्यासि भाग्यें तरे तोचि प्राणी । नसे सूटला मागुती गर्भखाणी ॥३८
निवृत्तीसवें फावलें जें निदान । अह्मी हें तुम्ही देखिलें सत्य जाण ।
निवृत्ती निधी ज्ञानिया ज्ञानखाणी । महासिद्धि मुक्ता अळंदीस मानी ॥३९॥
अळंदीच हें पंढरी ज्ञानदेवें । कशी आजि केली दुजी या सदेवें ।
उभारोनि बाहे तुला सांगतां हें । मुखीं एकदां जो जपे नाम लाहे ॥४०॥
हरी विठ्ठला गोपवेषा मुरारी । तया मुक्ति येवोनि ठाके पुढारी ।
कळी काळ दोघांकडे त्रास मोठा । अळंदीजनाच्या न जातीच वाटा ॥४१
असे येथ चिंतामणी कल्पशाखी । महा कामधेनूसि जो कां विलोकी ।
तयातें जगीं या उणें काय आहे । महादैन्यदुःखादि कोठें न राहे ॥४२॥
अजानाख्य हा कल्पशाखी विराजे । असे देवचिंतामणी सिद्धराज ।
स्वभक्तांसि दे सर्वसिद्धी दयाळू । तया देखतां तो करी काय काळू ॥४२॥
नदी हेच इंद्रायणी कामधेनू । करी काम संपूर्ण हे मुक्ति धेनू ।
असे श्रेष्ठ अश्वत्थ हा सोनियाचा । समाधिस्थळीं शोभतो ज्ञानियाचा ॥४४
जडां आणि मूढांसि बाळां स्त्रियांतें । पशू शूद्र हो अंत्यजा पामरांतें ।
हरी मोक्ष ज्ञानाविना त्यांसि देतो । अळंदीस एक्या निशीं राहतां तो ॥४५
वदे नाम तोंडीं महापाश तोडी । कथा आयके तो महासौख्य जोडी ।
जरी एक बिंदूच सेवी जळाचा । घडे नाश हो सर्व त्याच्या मळाचा ॥४६॥
असें वर्णितां भाविकें पुंडलीकें । नभीं दाटलीं ते विमानें अनेकें ।
तदां मीनले स्वर्गिंचे देव सारे । महाश्चर्य पोटीं तयांच्या न थारे ॥ ४७ ॥
अहो पुंडलीकादि भक्तांसमेतें । दिठीं देखिलें आजि वैकुंठ येथें ।
उभा देव गोपाळगायींसमेतें । पहा दीसती गोपिका सर्व येथें ॥ ४८ ॥
असे येथ राही उभी सत्यभामा । पहा भीमकी लाजवी पूर्ण सोमा ।
अशा अष्टही पट्टराण्या विभूता । समालिंगिती कल्पवल्ली तरूला ॥ ४९ ॥
पहा पैल या अंबरीषा नृपातें । तुम्ही देखिलें काय राया ध्रुवातें ।
पहा दीसतो धर्मबंधूसमेतें । हरी निर्धीं देखिलें अर्जुनातें ॥ ५० ॥
तुम्ही पाहिलें उद्धवा काय डोळां । पहा आणखी मीनला भक्तमेळा ।
विदेही महाज्ञानसंपन्न साजे । पहा श्रेष्ठ रुक्मांगदातुल्य राजे ॥ ५१ ॥
ऋषी हे महा पातळे हो तपस्वी । मुनी व्यास वाल्मीक आले यशस्वी ।

पहा सिद्ध दत्तादि येथें मिळाले । चिरंजीव मार्कंडभूषुंड आले ॥ ५२ ॥
हरीदास हा मारुती मुख्य जेथें । पहा पैल लंकापती भक्त येथें ।
पहा धन्य सुग्रीव किष्किंधनाथ । महावृद्ध आला असे जांबुवंत ॥ ५३ ॥
पहा अप्सरा मुख्य येथें मिळाल्या । तयांच्या कशा कामबुद्धी गळाल्या ।
सुरांच्या ऋषींच्या मिळाल्या पुरंध्री । जया रत्नताटंक सत्कर्णरंध्रीं ॥ ५४ ॥
करीं आरत्या रत्नताटीं हरीतें । उभ्या दिव्य नीराजना रत्नहस्तें ।
असा हा समारंभ आतां अळंदी । मिळाली असे ज्ञानदेवा समाधी ॥५५॥
असा काळ हा श्रेष्ठ कोणासि भेटे । कळीची महाभीति सर्वस्व आटे ।
असें बोलती देव ते एकमेकां । न माये मनीं ज्यासि संतोष तो कां ॥५६॥
भला नामदेवा भला ज्ञानदेवा । भला पुंडलीका महाशुद्धभावा ।
तुम्हीं आणिलें सिद्ध वैकुंठ येथें । नसे सौख्य ऐसें पदस्थांसि तेथें ॥५७॥
म्हणोनी पहा भक्त वैकुंठवासी । क्षिती पातले मुक्तिसंगी उदासी ।
उदार स्वरें हर्ष पूर्णांतराळें । फुलें वर्षती सर्वही एकमेळें ॥५८॥
तदां वंदिलें उद्धवें विठ्ठलातें । म्हणे देखिलें थोर आश्चर्य येथें ।
अम्ही द्वारका पाहिली पूर्वकाळीं । नसे जाहली त्या स्थळीं हे दिवाळी॥५९
मिळाला नसे यापरी भक्तमेळा । असा कोण तेथें महोत्साह झाला ।
सदानंददायी अळंदीच माने । नभीं दाटलीं कोटिशा देवयानें ॥६०॥
येथें दिव्य इंद्रायणी धन्य वाहे । इची साम्यता गोमती ते न लाहे ।
असे येथ सिद्धेश हा मुक्तिदाता । करी तारकादेश लोकां समस्तां ॥६१॥
अहो येस्थळीं ग्राव चिंतामणी ते । असे द्वारके देखिले काय होते ।
बुडाली तुवां टाकितां ते समुद्रीं । असे चौयुगीं सारखी ते अळंदी ॥६२॥
त्रिवेणी सदां वाहते रम्यवाणी । जरी द्वारका श्रेष्ठ केली पुराणीं ।
न ये हे कधीं थोरवी त्या पुरीला । मला विठ्ठला वाटतें साच बोला॥६३॥
पहा वृक्ष वल्ली शिला मुक्त येथें । तुझ्या पादरेणुप्रतापें समस्तें ।
अहो भूमिका धन्य जेथें अळंदी । तुझी पादपद्मांकिता दे समृद्धी ॥६४॥
तुझें भाग्य वानूं किती ज्ञानदेवा । तुवां आणिलें या स्थळीं वासुदेवा ।
पहा सर्व वैकुंठ येथेंचि आलें । दिसे सर्व ब्रह्मांड येथें मिळालें ॥६५॥
तुझ्या या स्थळा देखतां काळ कांपे । समाधीस देखोनि देवेंद्र तापे ।
तुझ्या सेवनालागिं येतो समोरा । तुला प्रार्थितो स्वर्गवासा उदारा ॥६६॥
तदां अष्टदिक्पाळकां कोण लेखी । कटाक्षा तुझ्या इच्छिती सर्व ते कीं ।
कसें भाग्य या ज्ञानियाचें पहाहो । उभा राहिला देव त्रैलोक्यनाहो ॥६७॥

अवो रुक्मिणी ऐकसी गोष्टि माझी । परब्रह्मिंची शक्ति नोहेसि दूजी ।
खरें सांग तूं पूसतों गोष्टि तूतें । अळंदी उणी कीं उणी द्वारका ते ॥६८
असे जाण शैवागमीं रम्य गाथा । अळंदीच हे श्रेष्ठ त्रैलोक्यमाता ।
अळंदी महापेठ आहे जुनाट । विके नाम नाणे फुका ब्रह्म भेटे ॥६९॥
तदां बोलली भीमकी धन्य होसी । अरे उद्धवा सत्य विज्ञानरासी ।
तुझी धन्य हे प्रेमगंभीर वाणी । असे साच ऐशी अळंदी पुराणीं ॥७०॥
तदां उद्धवा भेटले भक्त सारे । महाश्रेष्ठ सज्ञान होसी कसा रे ।
महानंद साम्राज्य तूला मिळालें । तुझ्या कीर्तनें पाप सारें जळालें ॥७१॥
तया रंगणीं नाचतो भक्त नामा । मुखीं गात त्या विठ्ठला सार्वभौमा ॥
तदां ताळ दिंडी पताका अनंता । महाघोष गाजे विरिंच्यांडेभत्ता ॥७२॥

**॥ इति श्री ज्ञानेश्वरविजये समाधिवर्णने क्षेत्रमहिमावर्णनं नाम । चतुर्थोध्यायः ॥ श्री पंढरीशार्पणमस्तु ॥**

---

# अध्याय पांचवा.

देखोनियां नाचत नामयातें । रंगीं तया श्रीहरिसन्निधीतें ।
बोले तदां ते जननी जगाची । श्रीरुक्मिणी हांसुनि मंदवाचीं ॥१॥
नाम्यासि या विष्णुपदासि न्यावें । सायुज्य मुक्तीप्रति यासि द्यावें ।
हा योग्य आहे अतिभक्त नामा । आज्ञा करावी सुरसार्वभौमा ॥२॥
हरी मुखा पाहुनि नामयाच्या । बोले महामेघ—गभीर—वाचा ।
नेतों तुला मुक्तिपदासि नामा । देईन सायुज्य अलभ्य तें मा ॥३॥
या भीमकीला तरि हेंचि माने । आरूढ हो हंसयुतें विमानें ।
जायीं पदीं राहुनि सौख्य भोगीं । जेथें सदां राहति भक्तयोगी ॥४॥
हे ऐकतां विठ्ठलवक्त्रवीणा । नामा वदे केवळ दीनवाणी ।
वंदी पदाब्जीं उभयांस माथां । उपेक्षितां कां मजला अनाथा ॥५॥
नको नको मुक्ति तुझी दयाळा । विमान हंसान्वित हें कशाला ।
देयीं तुझ्या केवळ प्रेमळांतें । जे इच्छिती मुक्ति अखंड त्यातें ॥६॥
भांडार तूझें हरि हेंच मोटें । तें मुक्ति देयीं स्वजनासि नेटें ।
नको नको मुक्ति कदापि मातें । वैकुंठ तेंही मज किंकरातें ॥ ७ ॥
जीवंत मी भोगित मुक्ति येथें । राहें सुखें सेउनि पंढरीतें
नाचोनि रंगीं तुझिया समोरा । श्रीभीमरावाळवटीं उदारा ॥८॥

हे दास तूझे मिळतांति तेथें । करीन संकीर्तन भक्तियुक्तें ।
गायीन गाथा तुमच्या अनंता । नानावतारीं करिसी अनंता ॥ ९ ॥
ज्या ज्या युगीं त्वां अवतार कीजे । मीही तसा होउनियां विराजें ।
आयी ! पुसावें तुम्हि विठ्ठलातें । कोठें न होतों हरिच्या समेतें ? ॥१०॥
जेव्हां जळीं हा झषरूप झाला । मी भक्त सत्यव्रत त्याच वेळां ।
जेव्हां घडे कूर्मशरीरधारी । मी जाहलों मंदर या शरीरीं ॥ ११ ॥
जेव्हां घडे देव वराहरूपी । मी जाहलों कंकरभूमिरूपी ।
खांबांत झाला नरसिंह जेव्हां । प्रल्हाद मी सन्निध भक्त तेव्हां ॥१२॥
जैं जाहला वामन ब्रह्मचारी । मी पादुका तैं घडलों विचारीं ।
हा जाहला भार्गवरूप जेव्हां । मी जाहलों तीक्ष्णकुठार तेव्हां ॥१३॥
जेव्हां घडे राघव चापपाणी । मी मारुती दास यथार्थ मानी ।
हा कृष्ण तैं उद्धव मींच झालों । याच्याच बोधें बरवा निवालों ॥१४॥
हा पंढरीनायक मीच नामा । उभा असे सन्निध जाणसी मा ।
नाचें पुढें मी जननी अखंड । मुक्तीहुनी हें सुख फार गोड ॥१५॥
भक्तीविना इच्छिल मुक्ति कोणी । धिग्धिक्तया मी अति तुच्छ मानीं ।
नको नको मुक्ति कदापि माये । मी भक्तियोगें भुवनीं न माये ॥१६॥
तूं मुक्ति ते वो फळ जाण आयी । हें सौख्य त्या मुक्तिपदांत नाहीं ।
निःसार ते मुक्ति कशासि मातें । नामामृतप्राशन नास्ति जेथें ॥१७॥
निःसीम जे भक्त असेति त्यांची । वंदीन मी धूळि पदांबुजाची ।
मुक्तीहुनी ते शतकोटि वाटे । विशेष तें प्रेम मनीं न सांटे ॥१८॥
श्रीराम नारायण वासुदेव । मुकुंद विष्णू विभु देवदेव ।
श्रीरुक्मिणीनायक दीनबंधू । स्वच्छंद मी गायिन हा प्रबंधू ॥१९॥
नामामृतातें बहुसाल प्यालों । बोधें तयाच्या अतिमत्त झालों ।
निजानुभूती साते नित्य भोगीं । मी मुक्तिदासीविषयीं विरागी ॥२०॥
म्यां लोटिलें मुक्तिपदासि लातें । भजोनि भावें पुरुषोत्तमातें ।
कर्माख्य माझें पट तें गळालें । मी पांडुरंगांगणिं नित्य लोळें ॥२१॥
तूं आदिमाता म्हणवोनि तूंतें । मी बोलिलों हृद्गत गुह्य मातें ।
हें गूज माझें कवणासि दाऊं । सांगें सती हें कवणासि देऊं ॥२२॥
मौनेंचि म्यां सांठविलें स्वचित्तीं । न बोलतां विठ्ठलपाय चिंतीं ।
हा अंतरात्मा हरि एक जाणे । तूं माउली जाणसि वो सुजाणे ॥२३॥
हे नामदेवामुखिंची सुवाणी । ऐकोनि हांसे मग कृष्णराणी ।
श्रीरुक्मिणी धन्य म्हणोनि राहे । ज्ञानेश्वरें ऐकुनि मात तेहे ॥२४॥

श्रीभीमकीतें विनवोनि बोले । जे ऐकतां सज्जन तें निवाले ।
तें ऐकिजे सर्वहि संतलोकीं । हा श्रेष्ठ संवाद असे त्रिलोकीं ॥२५॥

## द्रुतविलंबित.

वदत ज्ञानमणी जननीपुढें । परिस वो कथितों सति साबडें ।
सकळ जाणसि तूं जगदीश्वरी । तदपि बाळगिरामृत स्वीकरी ॥२६॥
परम भक्ति घडोनि जनाप्रती । सुजडतारक हांसिल तूं सती ।
गहन चित्पदिंचीं अनुभूति तूं । अससि वो परमेश्वर शक्ति तूं ॥२७॥
म्हणुनि हें तुजसीं अनुवादतों । अनुभवामृत तूंज निवेदितों ।
अमर ते हरिभक्त अखंड ते । कुशल वर्तति नाशविहीन ते ॥२८॥
हरिपदाब्जरजोत्तम लाधले । म्हणुनि ते पुरुषोत्तम जाहले ।
न गणिती तरि मुक्ति—महापदा । पतनवंत गणोनि महाऽऽपदा ॥२९॥
हरिपदाब्जरजीं महिमा असे । तसि कदापि न मुक्तिपदीं दिसे ।
हरिनखांशुविमिश्रमहाजळा । शिव धरी मुकुटीं परमोज्ज्वळा ॥ ३० ॥
घडत मज्जनयोग महेश्वरा । शिव महावन डाकिनि शंकरा ।
घडत भीमरथी त्रिजगोद्धरा । विलसते नरलोकयशस्करा ॥३१॥
मिळुनियां तरि इंद्रनदीप्रती । बहुत पावलिसे जगिं उन्नती ।
हळुच हे उतरे फणिआलया । म्हणति भोगवती समुदें जिया ॥३२॥
कलुष गौतम सन्मुनि पावला । घडत गोवध पातक त्याजला ।
म्हणुनि तो शिवभक्ति बरी करी । हर तयाप्रति दे भुवनोद्धरी ॥३३॥
शिवजटेंतुनि वोघ निघे तदां । अमल ब्रह्मगिरीशिखरीं मुदा ।
करुनि गौतम ते कुशवेष्टिता । लभत मज्जन पावत मुक्तता ॥३४॥
गोदावरी ते भवबंध नाशी । तारी कळीमाजि महाजनांसी ।
भगीरथें प्रार्थुनि देवदेवा । मागीतली लोकनुतप्रभावा ॥३५॥
पित्राचिया उद्धरणार्थ वेगें । शिवें दिल्हा वोघ महानुरागें ।
भगीरथातें म्हणवोनि लोकीं । भागीरथी ख्यात असे त्रिलोकीं ॥३६॥
मंदाकिनी निर्जरलोकवासी । भागीरथी मानवदोष नाशी ।
पाताळलोकीं अळकावतीतें । त्या सागरा उद्धरणार्थ जाते ॥३७॥
हे तीर्थ झाली पदरेणुसंगें । तो स्वामि आम्हां हृदयांत रंगे ।
त्या सांडितां मुक्ति अम्हांसि कैशी । फळेल तूं सांग समर्थ होसी ॥३८
तीर्थादि हे किंकर ज्या विभूचे । आम्ही असों केवळ दास त्याचे ।
नामींच आम्हां सकळार्थसिद्धी । मुक्ती अम्हां वंदिति नित्य आधीं ३९

हें एवढें बीज अम्हांसि ठावें । म्हणोनि यातें पडलें भजावें ।
आहे अम्हां विठ्ठल वित्त पूर्ण । याचे कृपे मुक्ति गणील कोण ॥४०॥
हे ऐकतां विठ्ठल ज्ञानियाची । वाणी सुधातुल्य महारसाची ।
प्रेमें अलिंगी मग हस्त माथां । ठेवी सुतोषें परिपूर्ण भक्ता ॥४१॥

**॥ इति श्रीज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिवर्णने रुक्मिणी-नामदेव-ज्ञानदेवसंवादोनाम पंचमोध्यायः ॥ श्लोक ३०६ ॥**

---

# अध्याय सहावा.

आज्ञापती विठ्ठल रुक्मिणीसी । हे भक्त माझे असती उपासी ।
याकारणें भोजन आजि द्यावें । मिष्टान्न यां योग्य जवें करावें ॥१॥
अवश्य आज्ञा म्हणवोनि माथां । वंदोनियां पाय म्हणे समर्था ।
तूं इच्छितां सर्वहि याचकाळीं । होईल त्रैलोक्यजना दिवाळी ॥२॥
पाचारिले तैं विधि-विश्वकर्मे । सांगीतली त्यांप्रति हेचि कर्मे ।
शाळा रचाव्या अनुपम्यवाणी । कीं इच्छिती भोजन चक्रपाणी ॥३॥
त्या कामधेनूसि जवें बलावा । सर्जावया सर्व पदार्थ लावा ।
गंगादि आणा सरिता उदंडा । वाहोत नाना रसपूर्ण गोडा ॥४॥

## भुजंगप्रयात.

दहीं दूध लोणी घृतासाखरेच्या । मधूपेयसंयुक्त सर्वारसाच्या ।
फळें शाक सर्जावया कल्पवृक्षा । त्वरें बाहिजे गा विधी सर्वदक्षा ॥५॥
सुवर्णादि पात्रार्थ चिंतामणीतें । त्वरें आणिजे स्वर्गिचा आजि येथें ।
रचा सर्व रांगोळिया रत्नदीपा । करा कुंकुमें चंदनें सेक लेपा ॥६॥
करा आयितीं सर्व तात्काळ येथें । भुकेले पहा पंढरीनायकातें ।
पहा भक्त सर्वस्त्र माझे भुकेले । ययां पाहिजे पूर्ण संतृप्त केलें ॥७॥
बरें मेळवा शीघ्र दिक्पाळ तेही । यथायोग्य कामास योजा तयांही ।
त्वरें आळवा त्या शचीनायकातें । ययां वाढण्या अप्सरा बायकांतें ॥८॥
तयांनीं तदां तोचि आदेश माथां । त्वरें वंदिला तैं स्रजी विश्वकर्ता ।
विचित्रा विशाला महारम्य शाला । मणिस्तंभयुक्ता जशा त्या तशाला ९
महादीप पीठावळी रत्नताटें । तशा आडण्या तोयपात्रासि नेटें ।

बहू वाटिया पान पत्रें उदंडें । तदां सार्जिलीं विश्वकर्में प्रचंडें ॥१०॥
तदां पातल्या अप्सरा दिव्यनारी । धुरा देवपत्नी शची मुख्य सारी ।
ऋषींच्या तशा सुंदरी देवमाता । पुढारोनियां मीनल्या त्या समर्था ॥११॥
तदां देखिलें सर्वही सिद्ध आहे । नये भीमकी पांडुरंगासि बाहे ।
तुम्ही ऊठिजे भक्तिवृंदासमेतें । करावी त्वरा स्नानसंध्या समस्तें ॥१२॥
महातीर्थ इंद्रायणी पुण्यदात्री । समस्तीं तदां स्नान केलें पवित्रीं ।
दिठीं देखिलें दिव्य वैकुंठ तेंही । नसे यापरीं मुख्य वैकुंठ तेंही ॥१३॥
तदां पाहिल्या लोचनीं दिव्यशाला । महाश्रेष्ठ चिंतामणींच्या विशाला ।
बऱ्या निर्मिल्या दिव्यपंक्ती अपूर्वा । दिशा साधिल्या उत्तरा आणि पूर्वा १४
जशा ज्यांसि त्या योग्य पंक्ती धराव्या । अहो ऊर्ध्व संन्यासियांतें कराव्या ।
अहो अग्निहोत्र्यांसि हे पंक्ति द्यावी । महायागदीक्षावतां हे असावी ॥१५॥
महा सोमपी याच पंक्ती वसावे । बरे श्रोत्रिये या स्थळीं बैसवावे ।
महोदार जे तापसी वानप्रस्थ । तयां योग्य हे पंक्ति आहे प्रशस्त ॥१६॥
अहो ब्रम्हचारीजनीं या वळीतें । सुखें बैसिजे ठाव हा योग्य यातें ।
अहो भक्तसाधू-समाधानवंता । यथें बैसवा साधुबुद्धी समस्तां ॥१७॥
दयाळू सदां पोषिते जे परांचे । पहा साधु हे कोवळे या मनाचे ।
सदां सिद्ध जे दीनसंरक्षणातें । तया आणिजे श्रेष्ठ पंक्तीस येथें ॥१८॥
महीदानदेते महोदार लोकीं । महाकर्मकर्ते मठाराम जे कीं ।
करावे हरी तोषणाच्याच व्याजें । तयां सज्जना पंक्ति मोठा विराजे॥१९॥
महाधीर वैराग्यसंपन्न आले । उदासीन सर्वांस्थळीं साच झाले ।
विरिंच्यादि लोकांत नाहीं सुखाशा । तयां बैसवा श्रेष्ठपंक्ती नरेशां ॥२०॥
नवाही प्रकारांतरें भक्तियोगें । मला वश्य केलें जयांनीं निजांगें ।
जयांला नसे या जगीं अन्य जोडा । तयां भक्तवर्गांसि हे पंक्ति मांडा॥२१
महाभक्त मौनी महायोग्य सिद्ध । हरी लक्षिती सर्वभूतीं प्रसिद्ध ।
अशा सज्जना थोरली पंक्ति योजा । म्हणे रुक्मिणीनाथ देवाधिराजा॥२२॥
दिसे सन्मुखीं मी समस्तांसि तोंडा । अशा मध्यदेशीं अम्हां पात्र मांडा ।
अम्हां सन्निधीं ज्ञानिया पुंडलीका । करा ठाव ते दूर मातें न लेखा ॥२३॥
तदां उद्धवाक्रूरपार्थादिकांहीं । हरीच्या मतें दिव्यपंक्ती तयांही ।
बऱ्या निर्मिल्या योग्य त्यातें वसाया । नसे ठाव कोणासि कांहीं रुसाया२४
बलावा त्वरें भोजना भक्त माझे । हरीची असी श्रेष्ठ आज्ञा विराजे ।
तदां सर्व पाचारिला भक्तमेळा । त्वरें चालतील क्षिती रम्यशाला ॥२५॥
यती बोलती तैं उगारोनि दंडा । तयां अप्सरातें तुम्ही मार्ग सोडा ।

अम्ही सोवळे जातसों भोजनातें । तुम्ही दूर व्हा पुंश्चली अन्यपंथें ॥२६॥
तदां बोलती अप्सरा यांसि रागें । कसे सोंवळे अंतरीं भेद जागे ।
यती ही असा ते क्षमा मुख्य नाहीं । कशाला शिखा टाकिल्या क्रोधियांही
तदां ते यती बोलती त्यांसि तोषें । नसे भेद भूतीं अम्हां ब्रह्म भासे ।
तथापी जनाचार रक्षावयातें । अम्ही तर्जितों या जगा निस्पृहत्वें ॥२८॥
असें ऐकतां वंदिती पादपद्मा । त्वरें जायिजे भोजना देवसद्मा ।
असा सोहळा मांडला थोर जेथें । हरी वर्ततां न्यूनता काय तेथें ॥२९॥
तदां बैसले सर्वही एकमोरे । हरी लक्षिती सर्व नेत्रासमोरे ।
तदां वाढण्या घेतलें देवतांहीं । शची मेनका ऊर्वशी मुख्य त्यांहीं ॥३०॥
त्वरेनें अरंभा म्हणे दिव्य रंभा । घृताची घृताच्या धरी रत्नकुंभा ।
जना वाढिते दाविते कौशलातें । अशा सिद्ध देवांगना सर्व तेथें ॥३१॥
तया वाढण्या पातल्या सर्व पात्रीं । तदां पात्र गुंडाळिती अग्निहोत्री ।
अम्ही काय या गोंधळीं आजि आलों । कसें जेविजे या स्थळीं भ्रष्ट झालों ३२
महा पूंश्चली अप्सरा कामचारी । अह्मां वाढिती हे नव्हे गोष्टि भारी ।
तदां हांसती पूसती त्या तयांतें । तुह्मी मानितां काय मोठ्या भयातें ॥ ३३ ॥
तुह्मी याज्ञिकीं यज्ञ काशासि केले । अह्मां कारणें वेद ते वेंच केले ।
अह्मांलागि कंटाळतां आजि येथें । उद्यां पादसेवार्थ पावाल तेथें ॥ ३४ ॥
अह्मी सर्व देवेश्वरां मान्य आहों । ऋषी इच्छिती त्यांसिही वश्य नोहों ।
अशांच्या तुह्मी मानितां कां विटाळा । मनीं स्वर्गिची वासना मुख्य टाळा ३५
ऋषीराय आम्हांचि पासोनि झाले ।अह्मी हे ऋषी सर्वही शुद्ध केले ।
अह्मांपासुनी वंश हे क्षत्रियांचे । प्रसिद्धीस आले शशीभास्कराचे ॥ ३६ ॥
अम्ही नाहलों या जळीं शुद्ध झालों । हरीतीर्थ इंद्रायणी तोय प्यालों ।
अम्हा काय धिक्कारितां व्यर्थवाणी । त्यजा भेदबुद्धी भजा चक्रपाणी ॥ ३७ ॥
तदां लाजिले बैसले सर्व ठायीं । जवें वाढिती देवता सर्व कांहीं ।
तदां हांसती अन्य देखोनि त्यांतें । हरीपंक्तिचे भेद बुद्धिस्थितांतें ॥ ३८ ॥
असा गल्बला ऐकतां चक्रपाणी । वदे धातया ऐक तूं रम्यवाणी ।
स्वपंक्तीस पाहोनियां देवतांहीं । बरें वाढितां घोळ होणार नाहीं ॥ ३९ ॥
धरी मस्तकीं श्रीशआदेश धाता । करी योगिनीलागिं आज्ञा समस्ता ।
स्वपंक्ती तुह्मी वाढिजे तोष-मानें । तदा श्रीपतिलागि हें कृत्य माने ॥ ४० ॥
तया मुख्य स्वाहा स्वधा याज्ञिकांतें । बऱ्या वाढिती तोष-चित्तें स्वहस्तें ।
महायोगसिद्धी तयां योगियांसी । तपोसिद्धि त्या वाढिती तापसांसी ॥ ४१ ॥
समर्थी महामोक्षसिद्धी यतींतें । तदां नीघती उत्सवें वाढण्यातें ।

वनस्थांसि त्या ब्रह्मलोकांत-सिद्धी । महासाक्षपें वाढिती श्रेष्ठबुद्धी ॥ ४२ ॥
व्रतस्थांसि त्या पुण्य-सिद्धी समस्ता । तयां तीर्थिकां तीर्थसिद्धी प्रशस्ता ।
तयां स्वर्गकामीजना अप्सरांहीं । बरें वाढिलें प्रीति पावोनि तेहीं ॥ ४३ ॥
यया वारिती भीमकी सत्यभामा । अह्मी वाढितों भक्तवृंदा महात्मा ।
अशा पट्टराणी हरीच्या समस्ता । निघाल्या तदां वाढण्यातें प्रशस्ता ॥ ४४ ॥
बरीं लोणचीं रायतीं दिव्यशाखा । महारम्य कोशिंबिरी त्या अनेका ।
वरान्नें बरीं सोलिवां मुद्गदाळी । सुगंधें सुवर्णाकृती पीत झालीं ॥ ४५ ॥
मुदा ओदनाच्या महाउष्ण वाफा । सुगंधासि घेवोनि येती अपापा ।
जशा कुंदजातीकळ्या त्याप्रमाणें । शितें शोभतीं ते शरच्चंद्रवर्णें ॥ ४६ ॥
पहा भक्ष्य लाडू किती साखरींचे । भले लोटले पूर नानापरींचे ।
वडे सांडगे पापडांच्या सुरासी । महापात्र तें वाढती सावकाशीं ॥ ४७ ॥
खिरी कामधेनूदुधें आळवील्या । बऱ्या रायपूरीं सिता मेळवील्या ।
बहू वाढिल्या रत्नपात्रीं अनेकीं । सुधा स्वर्गिंची जिंतिती याच लोकीं ॥ ४८ ॥
तयां पात्रपात्रांसि चौसष्टि वाटया । समस्तां रसीं दाटल्या फार मोठया ।
कढी तूप दूधा दह्यांच्या निराळ्या । बऱ्या क्षीर-सायीभरें पूर्ण केल्या ॥४९ ॥
अनेकांपरीं तक्रानिंबूरसांनीं । कितीं दाट संमिश्र ते शर्करेनी ।
बहू जातिच्या भिन्न पक्कान्नजाती । तयांचे पहा ये स्थळीं पूर जाती ॥ ५० ॥
तदां पाहती लोचनीं स्वर्गवासी । अह्मी एक सेवोनि जाणों सधेसी ।
तिया एक गोडींत दूजें कळेना । अम्हां मानवी-सौख्य देवां मिळेना ॥ ५१ ॥
पहा षड्रसें भक्षिती भिन्नभिन्न । रुची चाखती तोषनी नित्यपूर्ण ।
असे अन्न यांतें अनंता प्रकारीं । हरी निर्मितो धन्य हे भूमिचारी ॥ ५२ ॥
सुगंधोदकें स्वच्छ इंद्रायणीचीं । बरीं भाविलीं केतकीपाटलींचीं ।
उशीरादि कस्तूरिका चंपकाहीं । बहू शीत संस्कारिलीं चातुरांहीं ॥ ५३ ॥
अह्मी वंचलों जन्मलों स्वर्गलोकीं । कशाकारणें राहतों व्यर्थ नाकीं ।
कधीं हें सरे पुण्य जाऊं धरेसी । भजूं पांडुरंगासि या भावनेशीं ॥ ५४ ॥
महाभक्त साधूंचिया दिव्यपंक्तीं । अम्ही मान्य होऊं कधीं कोण युक्ती ।
करावी,असा निर्जरां काम वाढे । असे मृत्युलोकीं जना सौख्य गाढें ॥ ५५ ॥
अम्ही मानवीं जन्म घेवोनि यावें । सुखें या अशा भोजनातें करावें ।
असे इच्छिती स्वर्गिंचे देव सारे । मनीं थोर आशा तयां या प्रकारें ॥ ५६ ॥
असा सोहळा सर्व लोकांसि झाला । समस्तांसि देवें परामर्ष केला ।
तदां ज्ञानदेवा निवृत्तीस पाहे । पुढें मुक्ति सोपान चौघांसि बाहे ॥ ५७ ॥
तयां बैसवी सन्मुखीं स्वर्णताटीं । हरीला जयां देखतां प्रीति मोठी ।

चतुर्भुज मूर्ति द्विजां दोंभुजांच्या । स्वरूपा पुजी प्रेम ठायीं जयांच्या ॥५८॥
तयाचें पद क्षाळिलें तीर्थ माथां । धरी प्रेमभावें त्रिलोकासि धर्ता ।
महामंदिरीं सिंचिलें सर्वठायीं । ह्मणे मूळ संपत्तिचें हेंचि पाही ॥ ५९ ॥
मुखीं प्राशिलें तैं म्हणे धन्य झालों। सुधा अक्षयी आजि मी स्पाच प्यालों ।
अहो ब्रह्मपादांबु हें सोमपाना । असें तुल्य मी हें म्हणे सत्य जाणा ॥६०
फुलें तूळसीचीं दळें विप्रमाथां । गळां हार नाना फुलीं लोकभर्ता ।
उटी चंदनाच्या सुगंधा बुक्यांनीं । पुजी देव हा ब्राह्मणा चक्रपाणी ॥ ६१॥
म्हणे इंदिरा—मेदिनीचा पती मी । जयांच्या प्रसादें असे पूर्ण कामी ।
सुरां रक्षितों शिक्षितों दैत्यनाथां । असे सर्व सामर्थ्य हे विप्रसत्ता ॥६२॥
असें देव सर्वांसि बोलोनि राहे । करें सर्व संकल्प तैं सोडिताहे ।
असे एक विष्णू जगद्रूप सारा । महद्भूत त्या सर्व पावो उदारा ॥६३॥
असा दिव्य संकल्प सोडी हरी तो । समस्ता क्रिया पूर्ण जो कां करीतो ।
असी दावितो या जना रीति सारी । स्वयें आचरे लोककर्ता मुरारी ॥६४॥
तदां जेविती भक्त संतुष्ट सारे । हरी आमुचा अन्नदाता कसा रे ।
अम्हां दीधलें आजि हें पोट सानें । कसीं साठऊं यांत हें उत्तमान्नें ॥६५॥
अम्हां तोंड मध्यें कशालागि झालें । अहा मस्तकीं धातयानें न केलें ! ! ।
उगें टाकितों ऊर्ध्वपंथेंचि गोळे । कितीं जन्मिचें पुण्य होतें उदेलें ॥६६॥
हरी पंक्तिचा लाभ आम्हांसि झाला । कितीं जन्मिचा भाग्य-भानू उदेला ।
पुन्हा मृत्यु संसार कांहीं अम्हांतें । नसे निश्चयें मानलें या मनातें ॥६७॥
असें चिंतिती जेविते लोक सारे । बहू जेविले तोष पोटीं न थारे ।
सुखीं सर्वदां श्रीनिवासासि गाती । मुखीं श्लोक उच्चारिती रूप ध्याती ॥६८
जया जें रुचे तेंचि मागोनि घेती । सदां सर्वदां त्या रसीं तृप्त होती ।
असे जेविले षड्रसें कृष्ण पांती । सुतोष परानंद पावोनि ठाती ॥६९॥
असे जेविले भक्त ते कौतुकानें । तयां तृप्ति आनंत कल्पांत मानें ।
अशा जेवणीं भूक राहील कोठें । जरी वाढवीलें तरी पोट मोठें ॥७०॥
विडे पुष्पमाळादिकें अष्टगंधें । बहू धूपधूमें विचित्रें सुगंधें ।
तदा ते सभा बैसली वैष्णवांची । ध्वनी दिव्य गांधर्व सद्गायनाची ॥७१॥
तदां अप्सरा नाचती ताळघोळें । विणे साल्ररी सन्मृदंगें विशाळें ।
फुलें वर्षती पाहती दिव्य व्योमीं । कसा तिष्ठतो भक्तवृंदांत स्वामी ॥७२॥
अळंकापुरीं हा महोत्साह झाला । असा तुष्टला सर्वही भक्तमेळा ।
हरी राहिले जोंवरी क्षेत्रदेशीं । असा नित्य सन्मान भक्तोत्तमांसी ॥७३॥
तदां फुंदतां पाहिला एक नामा । रडे अश्रुनेत्रीं करी खेद तो मा ।

तदां रुक्मिणी बोलिली श्रीधरातें । अम्ही मांडिलें ताट या नामयातें॥७४॥
न जेवीच नामा तुझी वाट पाहे । तयां जेववी तो जसा पूर्ण धाये ।
तदां विठ्ठलें बाहिलें नामयातें । पुढें आणिलें चांगलें ताट त्यातें ॥७५॥
महादिव्य मिष्टान्न वाढोनि आणी । सती रुक्मिणी भक्तिसप्रेमखाणी ।
करें घास घालीं मुखीं नामयातें । बहू सांतवी थापटी पाठि हातें ॥७६॥
हरीच्या करें शेष हें वैष्णवांचें । किती वानिजे भाग्य या नामयाचें ।
निजांकीं तया बैसवी नामयासी । मुखीं कूरवाळी बुझावी तयासी ॥७७॥
असा जो ळळा पाळिता सज्जनाचा । असे माय हा बाप सर्वांजनाचा ।
अळंदीस उत्साह नारायणानें । असा दाविला भक्तवृंदासि तेणें ॥७८॥
महा तोष पोटीं तयांतें न माय । अम्हां जोडले धन्य देवेशपाय ।
असा सोहळा जन्म कोटयानकोटी । तपा अर्जितां तैं मिळे देवभेटी ॥७९

**॥ इति श्रीज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिवर्णने भोजनविलासकथनं नाम षष्ठोऽध्यायः**

---

# अध्याय सातवा.

निवृत्तीस देखोनियां देव बोले । तुम्ही जायिजे त्र्यंबका स्वल्पकाळें ।
कुशावर्ततीर्थी जळीं सत्समाधी । तुम्हां नेमिला पाविजे चित्सुखाब्धी ॥१॥
यया दिव्य सोपानदेवास आम्ही । असे नेमिला ठाव त्या दिव्य भूमीं ।
कऱ्हेच्या तटीं वत्सरग्राम जेथें । सुखें वास कीजेल सोपाननाथें ॥२॥
तदां तुष्टले भक्त हे सर्व कांहीं । अहो धन्य हा पंढरीनाथ पाही ।
स्वभक्तां कसा नेमिला ठाव येणें । त्रिलोकीं असे यापरी अन्य कोण ॥३।
जयाचा असे अंश तेथेंचि योजी । असा श्रीहरी भक्तकार्या नियोजी ।
असे आवडी गर्जती भक्त गाजी । महाघोष तो गाजला सत्समाजीं ॥४॥

## शार्दूलविक्रीडित.

मुक्तायी म्हणते मला नरहरी द्या पादसेवा बरी
तुम्हासंन्निध नित्य राहिन सुखें सप्रेम चित्तांतरीं ।
कल्पांतावधि नित्य मी तुजविना राहीचना विठ्ठला !
आशा हेच मनीं असे पुरविता तूं देव सर्वागळा ॥५॥

असें मागतां देव तात्काळ तीतें । म्हणे युक्त हें मागसी माय मातें ।
असें जें मनीं आवडे तेंचि तूला । घडे प्राप्ति तूं जाण सद्भावशीला ॥ ६
अशा गोड बोलें हरीनें दयाळें । अलिंगोनि मुक्तायिला धन्य केलें ।
पुढें मीनले इंद्रचंद्रादि सारे । नभीं वाजती शंख भेरी तुतारे ॥ ७ ॥
पुन्हां स्वर्गसंपत्ति तेथें मिळाली । तदां वाहती भक्त सन्नामटाळी ।
महाघोष ब्रह्मांड भेदोनि गेला । महानंद झाला तयां वैष्णवांला ॥ ८ ॥
ऋषीचीं स्तवें देवगंधर्व-गानें । महावेद-पारायणें सामगानें ।
असा गाजला नाद त्या पुण्यभूमी । अळंदी असे ते स्थळीं रामनामीं ॥ ९ ॥
असी सर्व वैकुंठसंपत्ति येथें । हरीनें स्वतां आणिली उत्सवातें ।
असा भक्त त्यांचा करी सोहळा हो । स्वयें देतसे विष्णुभक्तांसि लाहो ॥१० ॥
ऐसा समारंभ अखंड काळीं । घडे अळंदीस महादिवाळी ।
चिंता घडे केवळ पुंडलीका । हा नाठवी विठ्ठल पंढरी कां ॥ ११ ॥
येथेंचि येगें सुखवास केला । जायील हा पंढरिला कशाला ।
इंद्रायणी हेचि ययांसि मानें । श्रीचंद्रभागा त्यजिली ययानें ॥ १२ ॥
चिंतोनि ऐसें निजचित्तपद्मीं । श्रीविठ्ठला वंदुनि पादपद्मीं ।
एकांत पाहोनि करी विनंती । कां पंढरीतें त्यजिलें महंतीं ॥ १३ ॥
येथेंचि देवें रहिवास केला । ज्ञानेश्वरीं आवडि हे तुम्हाला ।
तुह्माविना ते मज चंद्रभागा । न गोड वाटे गति काय सांगा ॥ १४ ॥
इटेवरी पाय नसेति तूझे । तूं वेगळें राउळ तें न साजे ।
त्या वेणुनादीं मुरलीरवातें । ऐकेचिना, कंठल केंवि मातें ॥ १५ ॥
त्वरें चलावें प्रभुजी स्वदेशा । कृपा करावी मज पंढरीशा ।
लोकीं समस्तीं स्थळ रूढवीलें । मत्कारणीं टाकिसि काय बोलें ॥ १६ ॥
ऐकोनि ऐशी निजभक्तवाणी । हांसोनियां बोलत चक्रपाणी ।
तूं पुंडलीका करिसील चिंता । काशासि टाकी उगली अनर्था ॥ १७ ॥
ज्ञानेश्वराच्या अतिमोहबंधें । मी पातलों येथ पहा विनोदें ।
हा सारिला उत्सव सर्व कांहीं । आतां मला कार्य नसेचि पाहीं ॥१८॥
समाधि देवोनि ययासि आतां । जाऊं निजानंद-युतें स्वपंथा ।
झालें महत्कार्य मनाप्रमाणें । राहावया कारण सांग कोण ॥ १९ ॥
हे ऐकतां निश्चित देववाणी । त्या पुंडलीका मनिं हर्षखाणी ।
नमोनि पादांबुज विठ्ठलाचें । सप्रेम रंगीं अनुपम्य नाचे ॥ २० ॥
अनंत तीर्थें असतीं मिळालीं । सोपानरायासि समाधि-काळीं ।
तीर्थांसिही स्थापुनि तेथ पाही । जाऊं सुखें या अनुमान नाहीं ॥ २१ ॥

कऱ्हेतटीं स्थापुनियां स्वहस्तें । सोपानदेवाप्रति स्वस्थचित्तें ।
संवत्सरीं ठेउनि यासि जाऊं । नको सख्या फार उदास होऊं ॥ २२ ॥

## शार्दूलविक्रीडित.

सोपानेश्वर विठ्ठला विनविती वीजें किजे श्रीधरा
या वैकुंठविलास–संपति–सवें जावोनि संवत्सरा ।
स्थापावें मजला सुरेंद्र समुदें ब्रह्मेंद्रचंद्रादि हे
आले तेतिसकोटि दैवत–कुळें सेवेंत तूझ्या उभे ॥ २३ ॥
या देवासि मुखेंचि आगड किजे येथें तुह्मी राहिजे
इंद्राणी–सलिलांत पूत सुजना केलें तुह्मीं पाहिजे ।
या गंगादि नद्या समस्त मिनल्या तांथें अनंतावधी
आलीं पुष्कर–मुख्य याप्रति हरी स्थापा अळंदीपदीं ॥ २४ ॥
येथें जे करितील मज्जन तयां वैकुंठवासी किजे
ज्ञानी भक्त विरक्त सर्व परिचे येतील येथें तुझे ।
सामान्याप्रति इंद्रचंद्र–पदवी पाहोनियां अर्पिजे
ज्याचें मानस त्यापरीं पुरविजे देवें स्वयें राहिजे ॥ २५ ॥
चालावें अतिवेळ वर्तत असे येथील कृत्या त्वरें
आटोपा ह्मणवोनि वंदन करी सोपान अत्यादरें ।
देवें या निरखोनि कूर्मनयनें संतोषयुक्ता गिरा
तेव्हां बोलत धन्य होसिल बरा सोपानजी साजिरा ॥ २६ ॥
तुह्मी देव त्रिवर्ग या क्षितितळीं भूभारसंहारणीं
आलां वैष्णवमार्ग–रक्षण करूं झालां यती ब्राह्मणीं ।
केलें तें अवतारकृत्य समुदें धर्मा द्विजां स्थापिलें
बावीसा वरुषांत सर्व अपुलें सत्कार्य संपादिलें ॥ २७ ॥
ज्ञानोबा ममरूप या कलियुगीं झाला जगोद्धारणा
येणें आर्जविलें मला बहुपरीं गावोनि नारायणा ।
केला ग्रंथ विशाल सज्जनमना आनंददाता असा
पाहा प्राकृतही असोन निववी लोकांसि गीर्वाणसा ॥ २८ ॥
गीतार्था विवरोनि भाष्य कथिलें गंभीर अर्थें बरें
नानालंकरणें सुकाव्य रचना तैं दाविली चातुरें ।
केली ते अमृतानुभूति सुजना साक्षात्सुधेची प्रपा
बोधें भाविक सज्जनासि निववी छाया तसी त्वत्कृपा ॥ २९ ॥

केलें आणिक ग्रंथ ते कलिजना तात्काळ—बोधाप्रती
त्याचा अर्थ विचारिती सुजन तैं मुक्तीसही पावती ।
सारांशा निवडोनि अर्थ कथिला पाल्हाळ तो टाकिला
यासाठीं सुजनासि बोध घडतो तात्काळ येथें भला ॥३०॥
केले दिव्य अभंग भक्तिपर ते कित्येक योगार्थकें
ते गाती जन मूढ भाविक तरी होती तयां सार्थकें ।
ऐशी हे रचना समस्त घडली लोकोत्तरा या जगीं
झाली दिव्य समाधि उत्सवयुता दुर्लभ्य हें या युगीं ॥३१॥
झाले भक्त उदंड पूर्वयुगिंचे आहेति आतां किती
भावी होतिल ते अनंत परिचे येना असी उन्नती ।
तुम्ही ज्ञाननिधी त्रिवर्ग हरिच्या अंशें जगीं जाहलां
यासाठीं कवणासि येईल असी सामान्य भक्तां तुळा ॥३२॥
कीर्तीनें जग तारिलें सकळ या लोकीं ध्वजा लाविली
ऐशी हे हरिभक्ति-पद्धति बरी सद्वैष्णवां दाविली ।
केला अद्वयबोध शुद्ध बरवा वारोनि भेदांकुरा
पाखंडासि विनाशिलें श्रुतिपथा स्थापोनियां दुर्धरा ॥३३॥
तेव्हां तीर्थसमूह तो निरखिला देवें कृपालोचनीं
त्यातें आळविलें पृथक् पृथक तें नामासि पैं घेउनी ।
गंगे ये यमुने सरस्वति असी येई पुढें वारुणे
येयीं तूं मणिकर्णिके मम गिरा ऐकावयाकारणें ॥३४॥
गंगेशी मिळताति उत्तम नद्या त्यांसी अळंदीस्थळीं
राहावें सुखरूप तेंवि यमुने इंद्रायणीचें जळीं ।
रेवे गे अपुल्या सख्यांसह सुखें तापी पयोष्णी तरी
गोदा भीमरथी तसी भगवती कृष्णा महा सुंदरी ॥३५॥
कावेरी कपिला तशाच अणखी ज्या नंदिपादोद्भवा
देवी ते कृतमालिका शुभजळा ते ताम्रपर्णी शिवा ।
ज्या कीं पश्चिमदेशिंच्या अघहरा सिंधू तसी गोमती
अन्या ज्या असतील सर्व तितुक्या यावें अळंदीप्रती ॥३६॥
नाना पुण्य—सरोवरें सकळही पृथ्वीतळीं जेवढीं
श्रीमत्पुष्कर-मुख्य सर्व वसिजे इंद्रायणीं आवडी ।
जे जे संगम ते प्रयाग—प्रभृती येथेंचि त्यांनीं बरें
राहावें जनपावनार्थ अमुच्या मानोनि आज्ञा शिरें ॥३७॥

जे कोटयार्बुद सर्व तीर्थ गणना या कोटितीर्थांतरीं
राहावें निशिवासरीं सुखमनें येवोनि अत्यादरीं ।
मीही संन्निध तूमच्या वसतसें या चक्रतीर्थांतरीं
होतीं जीं कलुषें तुम्हांत समुदीं चक्रें स्वथा मी हरी ॥३८॥
माझे केवळ भक्त दांत सुगुणी अद्रोह मूर्ती बरे
जे शांत्यादिकळा–विशिष्ट असती निर्लोलुपी ते खरे ।
ज्ञानी भाविक सर्व–लोक–समता अद्वैत–बोधामृतें
जीवन्मुक्त विरक्त येतिल मला भेटावया आयिते ॥३९॥
ते जेव्हां तुमच्या जळीं उतरती स्नानार्थ कीं त्या क्षणीं
त्यांच्या पादरजें समस्त दुरितें जातील हो साजणी ।
जे कां निंदक धर्मदूषक महाकापटयवंतां नरा
दंभाचाररतांसि पाप तुमचें जायील चित्तीं धरा ॥४०॥
माझे भक्तचि मुख्य तीर्थ असती, तीर्थांसि ते पाविती
माझें जें भजनाख्यतीर्थ सुजनां सर्वांसि ते दाविती
मन्नामामृतसार सेविति असे ते तूमच्याही अघा
नासूं पैं सकतील पूज्य सकळां येतील तेव्हां वगा ॥४१॥
आतां हे असली करोनि सकळां स्थापी सुतीर्थीं हरी
इंद्राणीसलिलीं समीप अपुल्या या कोटितीर्थांतरीं ।
राहे आपुणही सदोदित सुखें ज्ञानेश्वरासन्निधीं
एकांशें सति भीमकीसहित तो भक्तार्थ दाता निधी ॥४२॥
आज्ञा मानुनि सर्व तेथ वसती गंगादि तीर्थावळी
बाहे मोक्षपुरीस तो हरि पुढें तुम्ही वसा या स्थळीं ।
काशी ये मथुरे पुढें त्वरित तूं ययीं अयोध्यापुरीं
येवो द्वारवती मम प्रियकरी ये उज्जनी सुंदरी ॥४३॥
ये माये मज सन्निधीस वसिजे कांची तुम्ही सात ही
स्वच्छंदें सकळाघनाशन करा हे उद्धरावी मही ।
ये कोल्हापुर कुंभकोण अणखी पृथ्वीत पुण्यप्रदें
क्षेत्रांहीं सकळीं सुखेंचि वसिजे मत्सन्निधानीं मुदें ॥४४॥
आज्ञा हे करितां समस्त शिरसा वाहोनि ते वर्तती
ब्रह्मांडीं असती विशेष तितुकीं आलीं अळंदीप्रती ।
पुण्यारण्यगणीं समस्त वसिजे नानावनीं काननीं
जेथें श्रीहरि मुख्य तिष्ठत असे लोकत्रयाचा धणी ॥४५॥

जें लिंगें असती यया वसुमती सिद्धेश्वरीं येऊनी
गोकर्णेश्वर मल्लिकार्जुन महा विश्वेश्वरा घेऊनी ।
आले पूर्वदिशाधिनाथ समुदें जे पश्चिमे देशिंचे
आले दक्षिण दिक्पती सकळही पंपादि सत्क्षेत्रिंचे ॥४६॥
पाताळींहुनि हाटकेश्वर तऱ्हीं आला अळंदीप्रती
श्री रामेश्वर सर्व पाप हरिता तो येत सेतूपती ।
केदारादिक उत्तराख्य दिशिचे सिद्धेश्वरीं राहिले
झाले ते नर धन्य या सुनयनीं सिद्धेश्वरा पाहिले ॥४७॥
सोन्याचा अतिथोर पिंपळ असे सिद्धेश्वरासन्निधीं
सारे येउनियां ऋषी निवसती सानंद त्याचे पदीं ।
पानोपान सहस्र साठ वसती त्या वालखिल्यावळी
सारे तेत्तिस कोटि देव वसती येवोनियां राउळीं ॥४८॥
प्राकारीं धरणीस रेणु तितुके ते देव सारे गणा
लिंगें सर्व खडे, समस्त सलिलें तीर्थांचिं ऐसें म्हणा ।
तेथें जे वसताति ब्राह्मण ऋषी कीजे असी भावना
नोहे हा उपचार विठ्ठल करी आज्ञा समस्तां जना ॥४९॥
तेव्हां सर्व सुराधिपीं विनविलें त्या आदिनारायणा
लक्ष्मीशा करिसी अम्हांसि कुतुकें आज्ञा जगत्कारणा ।
यावें या धरणीस सर्वहि तुम्ही राहा अळंदीस या
आम्ही तों शिरसा सदैव धरितों आदेश हा स्वामिया ॥५०॥
आम्ही देव अम्हांसि भूतळ हरी स्पर्शोनये या परीं
आज्ञा हे करुणाघनेंचि पहिली केली असे ते बरी ।
आम्ही वर्ततसों तसेचि, न करूं भूस्पर्श देवेश्वरा
आतां हे कथिता अळंदिस वसा येवोनियां सत्वरा ॥५१॥
याची काय अम्हांसि युक्ति कथिसी तुझी वृथा वैखरी
कैशी होयिल अंतरिक्ष वसणें होयील कैशापरीं ।
याचा काय विचार आजि कथिजे सर्वज्ञ सर्वेश्वरा
आम्ही तों तुझिया निदेशसमयीं वर्तो जगत्शेखरा ॥५२॥
ऐसें ऐकुनि हांसिले मग तदां श्रीकांत त्या निर्जरां
आज्ञा हे कथिली सुतत्व परिसा चिंता त्यजा दुर्धरा ।
केली मोक्षपुरी त्रिशूल शिखरीं काशी तुम्हांकारणें
श्रीचक्रावरि पंढरी विराचिली म्यां ते जगत्कारणें ॥५३॥

हे म्यां दिव्य अळंदिका विरचिली या श्रेष्ठ पद्मावरी
पूर्वीं आदियुगीं तुम्हांसि नव्हतें हें तत्व ठावें परी ।
चौदाही भुवनें दळें विलसती मेरू महा कांचनीं
या पद्मीं शुभकार्णिका घडतसे आणा तुह्मी हें मनीं ॥५४॥
याचें नाळ असे भुजंगम-पती श्रीशेष माझी कळा
याचा कंद यथार्थ कूर्म परिसा तो मीच कीं सांवळा ।
हें पाताळजळांत मूळ परिसा म्या निर्मिलें यापरी
पूर्वीं हें तरि लक्षयोजन कृतीं होतें यया भूवरी ॥५५॥
त्रेतीं हें घडलें सहस्त्रपरिच्या गावें महापद्म हें
माझी केवळ वल्लभा कमळजा तीचें महासद्म हें ।
झाले द्वापर हें प्रवेष करितां मानें शतें योजनें
आतां या कलिमाजि योजन दहा चक्राकृती पाहणें ॥५६॥
मध्यें दिव्य अळंदिका वसतसे मेरूस्थळीं कर्णिका
श्रीसिद्धेश्वर दिव्यलिंग विलसे येथें तुह्मी आयका ।
हा भूस्वर्ग तुम्हांसि म्यां विरचिला राहा सुखें यापरी
स्वर्गीचे सकळार्थ भोग मिळती तुम्हांसि पृथ्वीवरी ॥५७॥
येथें यज्ञमखादि लोक करिती नाना स्वधर्मक्रिया
किंवा ते तप होम मज्जप तरी सद्भक्त माझे तयां ।
होतें पुण्य अनंतकोटि-गुण तें माझ्या वरें देव हो
हो कां कुत्सितही मनुष्य तरि तो होतो महादेव हो ॥ ५८ ॥
ऐसें ऐकुनि देवनाथ समुदें सांष्टांग दंडापरीं
पायीं लोटाति धन्य धन्य ह्मणती सर्वेश्वरा श्रीहरि ।
लोकोद्धारक हे विचित्र रचिली देवें अळंकापुरी
यींची त्या अमरावतीस उपमा येनाच कोण्यापरीं ॥ ५९ ॥
भोगांतीं पडणें ह्मणोनि लघुता पावे पुरी निर्जरी
हे तात्काळ जनांसि जीव पदवी वारोनि आत्मा करी ।
हें सामर्थ्य तुझ्या कृपेंचि विलसे काशीहुनी आगळी
जे जीवंत नरासि मोक्ष घडवी प्रत्यक्ष या भूतळीं ॥ ६० ॥
ऐसें स्तोत्र समस्त देव करितां संतोष लक्ष्मीधरा
झाला फार तदां अनेक वर ते दिल्हे अळंदीपुरा
तेव्हां उत्सव गाजला अतिशयें वर्णावया वैखरी
माझी काय पुरेल शेष न सके वक्त्रें सहस्त्रें धरी ॥ ६१ ॥

तेव्हां पुंडलिकासि लक्षुनि करी आज्ञा हरी सावळा
येथें कीर्तन जो करील नर तो माझ्या पदा पावला ।
त्यांही येउनि कार्तिकीस करिजे उत्साह ऐसा सदां
कृष्णैकादशि पंचरात्र वसिजे येथेंचि आम्ही मुदा ॥ ६२ ॥
होजी मान्य ह्मणे सुभक्त हरिचा संतुष्ट चित्तांतरीं
देखे वाल्मिक बादरायण तया श्रीकांत आज्ञा करी ।
होतें गूढ ह्मणोनि आजिवरि या क्षेत्रा पुराणांतरीं
नाहीं वर्णियलें असेल तरि हें वर्णा सुखें यावरी ॥ ६३ ॥
देवा अंजुळिबंध ते विनविती आह्मी तपाच्या बळें
जाणों भाविक हें ह्मणोनि पहिलें आहेचि हें वर्णिलें ।
देवा हें शिवविष्णुपीठ सरिता इंद्रायणी भूवरी
वाहे विष्णुपदीं ह्मणोनि पहिली हे वर्णिली साजिरी ॥ ६४ ॥
हा तों लोहगिरी पुरातन असे येना तुळे पंढरी
काशीही गणितां नये मग असी कैंची जगीं ती सरी ।
ब्रह्मा विष्णु हरी प्रजापति सुरीं रुद्रादिकीं ये स्थळीं
केलें सुस्थिर दीर्घकाळ तप तें राहोनि पृथ्वीतळीं ॥ ६५ ॥
स्कंधातें उपदेशिली पुरहरें अध्यात्मविद्या बरी
येथें स्कंदपुराण पुत्र बरवा तो पार्वतीचा करी ।
पूर्वीं जाण पुरूरवासि घडलें वैराग्य तीर्थीं यया
टाकी ऊर्वसि–कामबंध समुदा, केली परेशें दया ॥ ६६ ॥
भीमेशें तरि भीमरेसि पहिलें येथोनि नेलें असे
येथें ते विषदग्ध शंकरतनु स्नानें निवाली दिसे ।
येथें सिद्धगणांसि तत्व गुज हें सिद्धेश्वरें बोलिजे
आह्मी सांगतसों पुरातन असी आहे कथा जाणिजे ॥ ६७ ॥
व्यासें हे कथितां पुरातनकथा तैं व्यासपूजा हरी
केली त्या अपुल्या करें सकळही पृथ्वीसुरां त्यावरी ।
वाल्मीकादिक सिद्ध रत्नभुवनीं सिद्धासनीं स्थापिले
देवेशें स्वकरेंचि सांग समुदें चान्हीं करें पूजिलें ॥ ६८ ॥
गंगासागरमुख्य सर्व सलिलें काश्यादि तीर्थें बरीं
अष्टौ भैरव अष्टही गणपती चौसष्टि योगीश्वरी ।
तेहीं सर्व स्थळस्थळीं वसविले सर्वां सुरांसी हरी
येथें राहुनि सोहळा करितसे दावी जना भीतरीं ॥ ६९ ॥

झाले श्रीहरि–पंक्तिपावन पुन्हां धाले प्रसादामृतें
आले भक्त समस्त तैं मिरवती सद्वैभवें शाश्वतें ।
नंदी–भृंगिरटादि सर्व गण ते आले शिवाचे बळी
भस्मोद्‌दूलित कृत्तिवास समुदें रुद्राक्षमाळा गळीं ॥ ७० ॥
आले तैं प्रमथादि भूतपार्ति ते प्रेतावळी मातृका
वेताळादिक भैरवादिक महा झोटिंग ते आयका ।
आले स्कंद गणेश पार्षद सर्वें त्या पार्वतीच्या सख्या
येती श्रीगिरिजेसमेत कुतुकें शक्तीधरें आशिक्या ॥ ७१ ॥
ऐसें हें शिवसैन्य सर्व मिनलें वैकुंठवासी तसे
आले वैष्णव शुद्ध सात्विक पहा शोभेति विष्णू तसे ।
जे पीतांबर कौस्तुभादिक महा सद्भूषणीं भूषती ।
हातीं चक्रगदारविंदजळजें चारीं करें शोभती ॥ ७२ ॥
तै आला हनुमंत भक्तवर तो बद्धांजुळी तिष्ठतो
आला सेवक मुख्य अंडजपती भक्ताग्रणी एक तो ।
विष्वक्सेन जयादि मुख्य समुदें आले महावीर ते
जे कां कृष्णसमीप पार्षद महानंदें सदां राहते ॥ ७३ ॥
आले ते सनकादि वातरशनी संन्यासयोगें सदा
जे कां वर्तति जे कुमार वसती पंचाब्द ते सर्वदा ।
आले नारद भक्तराजसहितें श्रीब्रह्मवीणा करीं
आले तुंबरमुख्य गायक तदां गाती मुखीं श्रीहरी ॥ ७४ ॥
नाचे तैं गणराज गायन करी वीणा स्वरें शारदा
वाहे ताळकुमार देवपति तो बांधी मृदंगा तदां ।
आलाप स्वर सप्त सर्व सवनें मूर्छा अनेकापरीं
साहा राग तशाच छत्तिस पहा त्या रागिणी सुंदरी ॥ ७५ ॥
थै थै थै थतकार फार उठिला घेवोनि ताळस्वरा
आलापीं मग देहभान उरणें कैंचें घडे या नरां ।
शंभूचे गण नाम–घोष करिती त्रैलोक्य दाटे स्वरें
विष्णूचे भट नामघोष करितां ब्रह्मांड नादें भरे ॥ ७६ ॥
पाताळीं फणिराज तो दचकला आला धरामंडळीं
पाहे उत्सव हा अकल्पित दिठीं पुण्यें अळंदी–स्थळीं ।
त्या पाताळबिळांत उत्सव असा कल्पांत कोण्या घडे
चक्षू–श्रोत्र म्हणोनि गायन–सुखा विस्तारिताहे फडे ॥ ७७ ॥

संतोषे मग शंभु पूजन करी एकासनीं विठ्ठला
भावें बैसविलें जया हरहरीं भावो नसे वेगळा ।
पूजी श्रीतुलसी–सुकोमलदळें बिल्वप्रवाळें सुमें
नाना दिव्य सुगंध कल्पतरुचीं पद्में तसीं उत्तमें ॥ ७८ ॥
नाना वैभवयुक्त पूजन करी नानोपचारें बरीं
वंदी सादर पादपंकजयुगीं सप्रेम–युक्तांतरीं
केलें स्तोत्र दहाशतें मुखपुटीं तैं तोषले श्रीहरी
जिव्हा तुटुनि दीधल्या दशशता त्या सन्मुखा–भीतरीं ॥ ७९ ॥
देवी सुंदर कल्पवृक्ष सुमनें पुष्पांजुळी वर्षती
वाद्यें वाजविती सुगान करिती नाटयादिकें हर्षती ।
तैं देवेंद्र मुखें सतोष वदला सद्भाव देवाप्रती
हा तो लोहगिरी सुवर्णमय हा मेरू असे निश्चिती ॥ ८० ॥
या माथां अमरावती सुललिता देवी अळंदीपुरी
इंद्राणी सरिता अपूर्व विलसे भागीरथी दूसरी ।
ऐसें ऐकुनि सर्व देव निकरीं प्रत्यक्ष इंद्रामुखें
झाले हर्षित फार निर्भर तदा लोकीं न माती सुखें ॥ ८१ ॥

**इति श्रीमत् ज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिचरित्रवर्णने सकळतीर्थनिवासो नाम सप्तमोऽध्यायः ॥**

---

# अध्याय ८ वा.

## दोधकवृत्त.

ज्ञानि समाधिस विठ्ठलराजें । बैसविला अति उत्सव गाजे ।
नाचति भक्त सुरासुर भोजें । दिव्य कथानक हें बहु साजे ॥ १ ॥
कांचन-पिंपळ उत्तरभागीं । वृक्ष अजान पुढें उपयोगी ।
बैसत आसन घालुनि जेथें । सर्व सुखांबुद वर्षनि तेथें ॥ २ ॥
सिद्ध महेश्वर सिद्धगणाशीं । बुद्धिविधायक पश्चिमदेशीं ।
ज्ञाननिधी निरखोनि हरी तो । बोलत फार सुतोषगिरा तो ॥ ३ ॥
चंद्र दिवाकर जोंवरि तारा । भूमि असे जव अंबुधि वारा ।
तोंवरि अक्षय येथ समाधी । राहिल निश्चय घे वर आधीं ॥ ४ ॥
कल्प सरे मग या जग आटी । ठेविन नेउनियां मम पोटीं ।

होयिन मी वटपत्रनिवासी । बालक निद्रित योगविलासी ॥ ५ ॥
मागुति सर्जिन लोक तदां ते । येथ यथास्थित हें मग वर्ते ।
याचपरीं बहुतें शतकल्पें । क्रीडतसे निजशक्ति अनल्पें ॥ ६ ॥
ज्ञानदेव चतुराक्षर नामें । जो जप नित्य करी नर नेमें ।
त्यासिच सुलभ चौविध मुक्ती । दायक मी नृहरी अतिभक्ती ॥ ७ ॥
देयिन भोग समस्तहि येथें । नेयिन सेवट मत्सदनातें ।
हा वर अद्भुत मीं तुज देतों । वास करीन तुझ्या निकटीं तो ॥ ८ ॥
बोलत देव समस्तजनांसी । भक्त असा मम ज्ञानविलासी ।
नाहिंच नाहिंच आणिक दूजा । ज्ञाननिधी जगतारक वोजा ॥ ९ ॥
वंदुनि पादसरोज हरीचे । त्यावरि नाथ निवृत्तिगुरूचे ।
वंदुनियां सकळां सुरसिद्धां । व्यासमुखा मुनिवर्य सुबुद्धां ॥ १० ॥
बोलति विठ्ठल देखुनि डोळां । तूंविण कोण अह्मांसि निराळा ।
स्वामि असे भुवनत्रयकोशीं । तूंचि अह्मां भवतारक होशी ॥ ११ ॥
उत्सव हा निजभक्तजनाचा । कोण करी तुजवांचुनि साचा ।
धन्य मला त्रिजगीं हरि केलें । भाग्य कसें मम आजि उदेलें ॥ १२ ॥
येथ महासुर–सिद्ध मिळाले । ब्रह्म महेंद्र शिवादिक आले ।
धन्य मला सकळांतरिं केलें । हें यश तूज तुझें हरि आलें ॥ १३ ॥
भक्तलळा परिपाळिसि देवा । योग्य तुलाचि सुरांत सदेवा ।
उत्सव हा मम थोर समाधी । दाखविला स्वजनांप्रति आधीं ॥ १४ ॥
रूढविलें भुवनत्रयिं मातें । रूढविलें अपणें अपणातें ।
दाखविली सकळांप्रति माया । दीनदयानिधि केशवराया ॥ १५ ॥
भक्त तुझे अह्मि पावन झालों । मान्य तुह्मी जगतीं बहु केलों ।
काय वदूं तुमचे गुण आतां । विश्वविधायक पंढरिनाथा ॥ १६ ॥
विश्वरुपें समुदा नटलासी । विश्वपटांत गुणी भरलासी ।
चाळिसि विश्व समस्त परेशा । चाळक तूं भुवनत्रयवासा ॥ १७ ॥
भू-जळ-तेज-समीर-नभातें । कोण धरी तुजवांचुनि हातें ।
बुद्धि अहंकृति मानस आठें । प्राकृत हें रचिलें जग मोठें ॥ १८ ॥
सत्वरजात्मक हें तरि सारें । चाळविसी हरि सूत्र विचारें ।
निर्मुनि एक विराट तनूतें । तूंचि विराज विराजसि तेथें ॥ १९ ॥
भक्तमहाभयसंकटकाळीं । दुष्टनिवारक तूं वनमाळी ।
घेसिल ते अवतार अनेक । त्यांत दहा करिती जन लेख ॥ २० ॥
दाविसि दिव्य चरित्र जनांला । लाविसि सात्विक ते भजनाला ।
गोविसि राजस तामस कामीं । खेळ करी तव शक्ति रिकामी ॥ २१ ॥

गातिल जे तव पुण्यचरित्रा । त्यां प्रतिपाळिसि साच पवित्रा ।
ठेविसि नेउनियां निजधामीं । देउनि मुक्तिसुखाप्रति स्वामी ॥२२॥
हें महिमान अगाध परेशा । एक-मुखें तुज वर्णिन कैसा ।
वर्णुनि त्या ह्मणती श्रुति नेती । वैखरि काय पुरे तुज गाती ॥२३॥
ऐकुनि ज्ञानमुखें स्तुति-वाणी । तोषुनि विठ्ठल पंकजपाणी ।
ठेवितसे अतिशीतळ माथां । तारक जो भविं दीनअनाथां ॥२४॥
मागुति मागुति ज्ञानमणीची । बोलतसे स्तुति विठ्ठल वाचीं ।
सांगत देव दयानिधि माझें । स्तोत्र करीं भुवनाद्भुत गाजे ॥२५॥
ऐकुनि सेवटली तव वाणी । नाम सुधासम सद्गुणखाणी ।
तृप्ति घडेल जसी मम कर्णा । योजि तशा निगमार्थक वर्णा ॥२६॥
धन्य ह्मणोनि नमोनि पदातें । ज्ञाननिधान तदां निगमार्थें ।
स्तोत्र करी विभुविठ्ठलजीचें । सार्थक हेंच असे रसनेचें ॥२७॥
ज्ञान कळानिधि विठ्ठलदेवा । वर्णुनि ज्ञान सुधा निधि सेवा ।
तो करि ज्ञानसुधारसवाणी । वेंचुनि ज्ञान जनीं सुखखाणी ॥२८॥
ते अतिखोल यया लघुवाचे । वर्णिन केंवि महागुण त्याचे ।
मान्य किजे सकळां सुजनांनीं । मंदमती वदलों अभिमानी ॥२९॥

## नमन ज्ञानदेवकृत.

### मात्रासमक वृत्त.

काळकुतूहळ देव नमो । चक्रचाळ गोपाळ नमो ।
शिव विश्वेश्वर आद्य नमो । श्रीविश्वप्रतिपाळ नमो ॥१॥
अरूप दिग्वासासि नमो । दशदिग्व्यापकदेह नमो ।
नारायण सुखसार नमो । कमलगर्भजनकासि नमो ॥२॥
चित्ताचाळक भाव नमो । विष्णो भव्य विभाव नमो ।
भजनशीळ हृदयस्थ नमो । आदिदेव तूं सत्य नमो ॥३॥
ज्योतिर्लिंग जगदीप नमो । भुवनांतर्गत एक नमो ।
जगद्गुरू श्रीकांत नमो । अगम्य पार परेश नमो ॥४॥
ज्ञानगम्य जयदेव नमो । लीलानाटक भाव नमो ।
वैकुंठाधिप कृष्ण नमो । वैकुंठस्थितरूप नमो ॥५॥
दर्श स्पर्शनगूढ नमो । उपरति विद्या दृढ नमो ।
देव तितिक्षारूप नमो । कमलालय कमलेश नमो ॥६॥

मूल त्रिगुणाधार नमो । त्रिगुणक्षोभक काळ नमो ।
सदाकृपावात्सल्य नमो । ब्रह्मसनातननाम नमो ॥७॥
राजेश्वर जयराम नमो । जयजय विगळितकाम नमो ।
वाचातीत-विचार नमो । वाचाचालक-सूत्र नमो ॥८॥
जय हृत्तम-चंडार्क नमो । काल-कला-संदीप्त नमो ।
कर्त्या हर्त्या सर्व नमो । भक्त रक्षका हरी नमो ॥९॥
हरहरि ब्रह्मेशान नमो । वेदांतांबुधि-पार नमो ।
अद्वितीय सुखसार नमो । सर्वेश्वर भवहार नमो ॥१०॥
श्रुति-गम्यामयहीन नमो । ज्ञानकिरण-चिद्भानु नमो ।
द्वैतनिरासक साम्य नमो । समसुखकर्ता तूज नमो ॥११॥
व्यक्ताव्यक्तक रूप नमो । मायामदगजसिंह नमो ।
मायागृहकृतवास नमो । आत्माराम सुखाब्धि नमो ॥१२॥
शिवजीवात्मक देव नमो । ज्ञानाज्ञान-विलास नमो ।
सर्वजीव-निजबीज नमो । सहजानंद-विकास नमो ॥१३॥
लीलाकृत-नटवेश नमो । जय जय जगदाधीश नमो ।
पंढरपुरकृतवास नमो । पांडुरंग-धृतनाम नमो ॥१४॥
अद्भुतरूपोदार नमो । त्रैलोक्याक्रातिधार नमो ।
भीमातीर-विहार नमो । भीमकाळ-परिहार नमो ॥१५॥
त्रैलोक्यांबुजकंद नमो । जगदीशा जगदादि नमो ।
क्षराक्षरोत्तम-पुरुष नमो । सर्वातीत उदार नमो ॥१६॥
मुद्रा जीवाकार नमो । चराचरां आधार नमो ।
मधुसूदनधृतनाम नमो । मधुमाधवविश्राम नमो ॥ १७ ॥
मधुरगीतप्रिय बाळ नमो । मुरलीगायनलोल नमो ।
कालभुजंगमकाल नमो । भालविशालतमाल नमो ॥ १८
त्रिविधतिमिरपरिहार नमो । परमानंदविहार नमो ।
पुरविसि आशापूर नमो । जय निजभक्ताधार नमो ॥ १९
आशापाशहुताश नमो । क्लेशाक्लेशविनाश नमो ।
प्रापंचिकपरिहार नमो । श्रीधर श्रीकर देव नमो ॥ २०
संगदोषहर सर्व नमो । नाशक विषयविकार नमो ।
अनंतनामाधार नमो । नामें कलिपरिहार नमो ॥ २१ ॥
शांतितितिक्षाधार नमो । देव दयाघनसार नमो ।
दीनोद्धर सुखपार नमो । दीनदयाकर नित्य नमो ॥ २२
कूर्मसमामृतदृष्टि नमो । रक्षिसि हे तव सृष्टि नमो ।

निष्कलंकजननाथ नमो । भेदमहाभय-घात नमो ॥ २३ ॥
भवार्णववाडववन्हि नमो । द्वादशरविसमतेज नमो ।
वेदवेद्य गुणपूर्ण नमो । वेदप्रकटनशील नमो ॥ २४ ॥
चित्तचकोरसुधांशु नमो । कारणकार्यसमर्थ नमो ।
सत्य नमो अतिनित्य नमो । सत्यज्ञानानंद नमो ॥ २५ ॥
अद्वैतांबुधिसार नमो । निर्द्वंद्वा निष्पार नमो ।
नित्यानित्यपरासि नमो । नित्यानित्यकरासि नमो ॥ २६ ॥
अतिदुर्गार्तिहरासि नमो । हरणभरणकरणासि नमो ।
भेददृष्टिहरणासि नमो । भवभयपरिहरणासि नमो ॥ २७ ॥
अद्वैतानंदासि नमो । निर्द्वंद्वामृतशिल्क नमो ।
आलिंगितपरशक्ति नमो । दर्शितश्रीशिवभक्ति नमो ॥ २८ ॥
काळकूटविषभक्ष नमो । कालांतक अ दक्ष नमो ।
आदिचराचरसाक्ष नमो । आदिचराचर-रक्ष नमो ॥ २९ ॥
वसु-रुद्रादित्यात्म नमो । पशुपाशोद्धरपक्ष नमो ।
सर्वत्रीं समभाव नमो । प्रियाप्रियादि अभाव नमो ॥ ३० ॥
कृत्रिमकपटविदा‌ऽ नमो । अकपटजनसुखदोह नमो ।
परिहरि संकटघोर नमो । प्रतिपालक संहरक नमो ॥ ३१ ॥
नारायण गुणपूर्ण नमो । पारायण सुखपूर्ण नमो ।
इंद्रियचाळकचक्र नमो । त्रैलोक्याधिपशक्र नमो ॥ ३२ ॥
दत्तात्रय अवधूत नमो । नित्यानंदविलास नमो ।
अपरमितैश्वर्यासि नमो । उत्कटसत्ताधार नमो ॥ ३३ ॥
दुष्टदर्पपरिहार नमो । शिष्टपुरुषपरिपाल नमो ।
कष्टविनाशक सुष्ट नमो । अमित कीर्ति उत्कृष्ट नमो ॥ ३४ ॥
चतुर्वेदरविगगन नमो । लोकांतरतमहरण नमो ।
जागृतिस्वप्नसुसाक्षि नमो । योगगुप्त सर्वाक्षि नमो ॥ ३५ ॥
सत्यसनातन विष्णु नमो । दैत्यमहामयजिष्णु नमो ।
सर्वहि भार-सहिष्णु नमो । गोकुलपालक कृष्ण नमो ॥ ३६ ॥
क्षीरनीरनिर्वाह नमो । विदग्धजनसुखदोह नमो ।
विवेकसागरपार नमो । महानादझंकार नमो ॥ ३७ ॥
अद्वयपरसुखसदन नमो । जगभक्षक अतिवदन नमो ।
शुक्लांबर शुभवर्ण नमो । दयावंत अतिजीर्ण नमो ॥ ३८ ॥
श्रुतिशास्त्रप्रतिपाद्य नमो । पद्मगर्भभवतात नमो ।
चिदाकाश अतिव्याप्त नमो । चित्सत्ता घनरूप नमो ॥ ३९ ॥

त्रिभुवनतामसदीप नमो । एकार्णव–समरूप नमो ।
कल्पांतक गुणविभव नमो । सकळदेवदेवेंद्र नमो ॥ ४० ॥
गोगोपाल कृपाल नमो । गोविंदा गुणशील नमो ।
चित्तचमत्कृतिरूप नमो । चित्तरंजनाधार नमो ॥ ४१ ॥
ध्वजवज्रांकुश–अंक नमो । पदपंकज अकलंक नमो ।
दूरीकृतभवपंक नमो । कृत्याकृत्य–विशंक नमो ॥ ४२ ॥
निराधारकाधार नमो । क्षमाक्षमासंधार नमो ।
अलेप अगुणाकार नमो । अखिलांडेश्वर देव नमो ॥ ४३ ॥
चित्तभ्रमकाविचित्र नमो । धैर्याधैर्यगुणाढ्य नमो ।
प्रसाददानाध्यक्ष नमो । परमोदार परेश नमो ॥ ४४ ॥
ध्यानांतर्गतदीप नमो । दर्शितदिव्यप्रताप नमो ।
आग्रहनिग्रहहीन नमो । वैकुंठाद्यभिधान नमो ॥ ४५ ॥
अनादृष्टपरिमाण नमो । दृश्यादृश्यनिदान नमो ।
सुखमय सुखकररूप नमो । नित्योदितपदकमळ नमो ॥ ४६ ॥
दृश्यादृश्यादृश्य नमो । दीप्तचराचरदृश्य नमो ।
सर्वहि तूं शिवभाष्य नमो । सर्वहि तूं सर्वेश नमो ॥ ४७ ॥
परमपदाद्विब्रह्म नमो । आत्माराम सुशर्म नमो ।
सन्मुख भक्तजनांसि नमो । तारक दीनजनांसि नमो ॥ ४८ ॥
एकतत्व एकांत नमो । एकचि मायाःकांत नमो ।
पूर्णचिदांबुधि नित्य नमो । योगरूढ परतत्व नमो ॥ ४९ ॥
सबाह्य वससी तूज नमो । सबाह्य दिससी तूज नमो ।
वेदादिकवक्त्यासि नमो । वेदादिककर्त्यासि नमो ॥ ५० ॥
सत्ता सर्व तुझीच नमो । भक्त जाणती तूज नमो ।
ज्योतिर्मयरूपासि नमो । तत्वबीज तें तूंचि नमो ॥ ५१ ॥
परब्रह्म परतत्व नमो । परमगुह्य परसत्व नमो ।
अपरंपार परांत नमो । स्वयंवेद्य संचित्य नमो ॥ ५२ ॥
अघटितघटका तूज नमो । सुघटितविघटण–दक्ष नमो ।
द्वैताद्वैता तूज नमो । कर्ता भर्ता सर्व नमो ॥ ५३ ॥
संख्यारहिता तूज नमो । असंख्यपालक तूज नमो ।
जनसंजीवन तूज नमो । पुंडलीकधन तूज नमो ॥ ५४ ॥
निर्गुणसगुणस्वरूप नमो । देवदेव अतिसुलभ नमो ।
कृपे सर्व तुझियाच नमो । चरणनलिनयुगळासि नमो ॥ ५५ ॥
भवतापकजीमूत नमो । ब्रह्मनाम निर्धूत नमो ।

योगीजननिजमित्र नमो । योगिवृंदसुखपात्र नमो ॥ ५६ ॥
भूस्वर्गत्रय तूंचि नमो । युगयोगात्मक तूंचि नमो ॥
सर्वजनक हा तूंचि नमो । विश्वकनक तें तूंचि नमो ॥ ५७ ॥
नाहीं तुजसम अन्य नमो । तुजविण अधिक नसेचि नमो ।
चारीही वाचा तूज नमो । न पवति साऱ्या तूज नमो ॥ ५८ ॥
मुक्तिविधायकतत्व नमो । मुक्त्यतीतपरतत्व नमो ।
पंचम उरसी तेंचि नमो । षड्दर्शनपथसूर्य नमो ॥ ५९ ॥
चिद्विलास सकळांग नमो । भानुबिंबगततेज नमो ।
तेजोवंतसुतेज नमो । आदितेजरविबिंब नमो ॥ ६० ॥
अनेकदर्शनभेद नमो । क्लेशसर्वविच्छेद नमो ।
त्रिगुणप्रपंचनिरास नमो । सर्वासत्वविनाश नमो ॥ ६१ ॥
नाडीचक्रातीत नमो । इंद्रियदशकातीत नमो ।
यांत गुंतले भक्त तयां । काढिसी तूं कनवाळ नमो ॥ ६२ ॥
बाध्यबाधककर्म नमो । भ्रमसत्ता हे सव नमो ।
तद्भ्रमवारक तूंचि नमो । ह्मणुनि पदांबुज नित्य नमो ॥ ६३ ॥
यमधर्माची दृढसत्ता । कर्मधर्म-चाळकपंथा ।
कर्मधर्म सर्वहि घात्या— । पायीं अर्पुनि तूज नमो ॥ ६४ ॥
यमदमउपशम जे कांहीं । भेददर्शनें जे साही ।
नाडीत्रयपथ या देहीं ! अर्पुनि तुजला तूज नमो ॥ ६५ ॥
प्राण-पवन मनधारण जें । तुर्यपदाचें कारण जें ।
समतुक अवघे गुण सहजें । अर्पुनि तुजला तूज नमो ॥ ६६ ॥
भौतिक दिसतें जग सारें । जन्ममरणभय अनिवारें ।
ब्रह्मांडाधिप तुज सारें । पदयुगीं अर्पुनि तूज नमो ॥ ६७ ॥
युक्त वासना मन झालें । विषयधनीं गुंतुनि ठेलें ।
धाउनि वेगीं तूं सगळें । वोढुनि काढीं तूज नमो ॥ ६८ ॥
चंचळचित्तचमत्कृति तें । नकळे तद्भावनगतितें ।
तुझिया परसत्ते होतें । पदयुगीं अर्पुनि तूज नमो ॥ ६९ ॥
मनवारू चंचळ झाला । बांधुनि ठायीं दृढ केला ।
बुझाविला तव चरणाला । अर्पुनि विमला तूज नमो ॥ ७० ॥
नित्य धर्म होते चुकले । वेदविरुद्धें ते झकले ।
तेचि तुला श्रीहरि सगळे । अर्पण केले तूज नमो ॥७१॥
श्रुति-स्मृतीचीं बहु वचनें । सभाचतुरता अति गहनें ।
अन्य कळा सर्वहि सगुणें । अर्पुनि चरणा तूज नमो ॥७२॥

नानातंडवितंड क्रिया । देह-चाळका असति जिया ।
भ्रंश मनातें अतिशय ज्या । सांभाळीं तूं तूज नमो ॥७३॥
देहभरण-ममता सारी । देह पोषिती निशिवारीं ।
अनंत वृत्तीच्या हारी । सांभाळी तूं तूज नमो ॥७४॥
त्रिगुण-तिमिर जें जें अवघें । रूपा आलें मन वोघें ।
तें तें देवा मी नेघें । सांभाळी तूं तूज नमो ॥७५॥
योनिजनित निजकष्ट सदां । वृद्ध वासना पुष्ट सदां ।
अर्पुनि तुजला सर्व मदा । शुद्ध जाहलों सांभाळीं ॥७६॥
विद्यावयकुलधर्म बरा । ब्रह्मकर्म आचार खरा ।
हरी सर्वही उणा पुरा । अर्पियला तुज सांभाळी ॥७७॥
बहुत जन्म अवतार-कळा । नाना शाखा अति-विमळा ।
गोत्रोच्चार-विधी सकळा । विभू अर्पिल्या सांभाळी ॥७८॥
वेदपाठ जें स्मृतिवचनें । शास्त्रभाषणें अति गहनें ।
कीर्तन गुण वर्णन गाणें । तुला अर्पिलें सांभाळी ॥७९॥
चंद्रसूर्यपदसोपानें । करुनि जया लोका जाणें ।
तेंही तवपद तुज जाणें । केलें अर्पण सांभाळी ॥८०॥
रोमरोम शत ब्रह्मांडें । विराट रूप असे वाडें ।
तेंही तवरूपीं थोडें । महद्रूप तूं तूज नमो ॥८१॥
विश्वपटाची सूक्ष्मघडी । तारक ब्रह्मगुणेंचि घडी ।
ते म्यां उकलुनियां उघडी । देखिजली तवमूर्ति नमो ॥८२॥
तुझ्या भक्तिनें सर्व कळे । तीविण कांहींही न कळे ।
तुझ्या कृपेनें दास भले । सुखा पावले तूज नमो ॥८३॥
अनंत नामाचा पुतळा । तूझ्या आंगीं सर्व कळा ।
असा तुझा तूं अति विमळा । परमानंदा तूज नमो ॥८४॥
गुणाग्रगण्या श्रीरामा । गुणसागर तूं निःसीमा ।
सकळ-चराचर-विश्रामा । पूर्णब्रह्मा तूज नमो ॥८५॥
विभूतिरूपा तुज नमितां । अहंकार-मळ कैं आतां ।
चित्त रमे पायीं दृढता । अति निश्रांता तूज नमो ॥८६॥
नमन हेंचि अतिथोर दिसे । नमनें तवपद-सुख गिंवसे ।
याविण सर्वहि नेति असें । श्रुतिशत वर्णिति तूज नमो ॥८७॥
नमन हेंचि अतिवर्म असे । नमनीं परसुख पूर्ण वसे ।
नमन हेंच परतत्व दिसे । आत्मारामा तूज नमो ॥८८॥
नमनाविण सर्वहि वाटा । देव देव त्या अव्हाटा ।

नमन पावती तुज श्रेष्ठा । परमवरिष्ठा तूज नमो ॥ ८९ ॥
नमन हेंचि तारक जाण । नमन हेंचि परविज्ञान ।
नमन-विना सुरपद हीन । नको विठ्ठला तूज नमो ॥ ९० ॥
नमन कोण म्हणतो लटकें । तोचि प्रपंचीं जीव ठके ।
सर्व जगाच्या भव-सुटके । नमन सर्वथा श्रेष्ठ नमो ॥ ९१ ॥
नमना यवढा मंत्र हरी । धुंडुनि शास्त्रें कोटिवरी ।
काढिन ह्मणतां यासि सरी । नये दूसरी तूज नमो ॥ ९२ ॥
इंद्रचंद्र सनकादि मुनी । परम पावती तुज नमुनी ।
शिव मुख्य सनातन तो नमनीं । तिष्ठत भजनीं तूज नमो ॥ ९३ ॥
नमन हेंचि अनुभूति खरी । नमन हेंचि भवभाव हरी ।
नमन हेंचि परदेव करी । नमन थोर गुज तूज नमो ॥ ९४ ॥
नमन करुनि ब्रह्मा श्रेष्ठ । नाभिकमळ अतिसुखपीठ ।
पावत निजपद वैकुंठ । नमन इष्ट अति तूज नमो ॥ ९५ ॥
श्रीगुरुकरुणा ज्यासि घडे । नमन-भक्तिसुख त्या जोडे ।
मुक्ति तया पायांचि पडे । मुख्य मुक्ति तूं तूज नमो ॥ ९६ ॥
नमो नमस्ते नमो नमो । पुढतोपुढती नित्य नमो ।
समाधिसुख-दात्यासि नमो । चिद्घनसुखपूर्णासि नमो ॥ ९७ ॥
महाविष्णु तूं योगनिधी । योगरूप योगींद्र विधी ।
अपरमितानंदांबुनिधी । भानुकोटि-तेजासि नमो ॥ ९८ ॥
अनंत करकमळें धरिता । तोचि चतुर्भुज तूं ताता ।
मुकुटरत्नमणिढाळ शिरीं । वनमाळा आपाद वरी ॥ ९९ ॥
अरिशंखांबुजयुक्तकरा । पीतांबर रमणीय धरा ।
कौस्तुभकंधर देववरा । श्रीवत्सांकित तूज नमो ॥ १०० ॥
नूपुरतोडर पदयुगुळीं । बांधुनि ठेविसि काळकळी ।
सर्वपाळ गोपाळ बळी । मन्मथ-शत-सुंदर-वदना ॥ १०१ ॥
नाना पदक मणी कंठीं । हार मुद्रिका लघुबोटीं ।
आंगीं मलयागर उटी । मृगमद भाळीं बहु शोभे ॥ १०२ ॥
जडित-मेखळा-गुण कासे । क्षुद्रघंटिकारव विलसे ।
तेणें मुनिमानस विकसे । मुरलीवादनलोल नमो ॥ १०३ ॥
रुणुझुणु रुणुझुणु रुणुझुणुनू । वाजविसी मंजुळ वेणू ।
सुंदर शामल जलदतनू । देखुनि लाजे मदन नमो ॥ १०४ ॥
सभोंवते गोपाळ तुझे । अंतरंग जिवलग माझे ।
पुंडलीक मम प्राण असे । तव पद निकटीं नित्य वसे ॥ १०५ ॥

माझ्यावृत्ती गोपमुली । रमती निशिदिन पदकमळीं ।
माझा भाव सुकल्पतरू । तळीं तिष्ठसी आदिगुरू ॥ १०६ ॥
भक्ति पूर्ण माझी यमुना । वाहत पदनिकटीं सुमना ।
ज्ञान बोधसह दश्य हरी । सर्व अर्पिलें तुझे करीं ॥१०७॥
रखुमादेवीवर वरदा । बाप विठ्ठला दिव्य-पदा ।
वंदन करितों मी भाळीं । करीं धरुनि तूं सांभाळी ॥१०८॥
अष्टोत्तरशत पद्ममणी । माला विरचुनि ज्ञानमणी ।
पूजी विठ्ठल-पदकमळा । मुक्तिदायका अति विमळा ॥१०९॥
भावें धरिती जे कंठीं । शोभति ते जन वैकुंठीं ।
ज्ञानदेवसह जगजेठी । देयिल अंतीं सुखभेटी ॥११०॥
इह सर्वार्थ तया फळती । चाऱ्ही मुक्ती त्या वरिती ।
ऐशी महिमा नमनाची । ज्ञानदेवगी सुमनाची ॥१११॥
ज्ञानदेवभावार्थ असा । घेउनि वदलों मी परिसा ।
उणें पूर्ण तें सर्व करा । दीन बनाजी करीं धरा ॥११२॥

**॥ इतिश्रीज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिवर्णने स्तुतिकथनं नामअष्टमोध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥**

---

# अध्याय ९ वा.

ऐकोनि ऐशी स्तुति ज्ञानदेवी । संतोष पावे हरि फार जीवीं ।
प्रफुल्लवक्त्रें मग भक्तिमेळीं । तैं बोलले विठ्ठल त्या सुकाळीं ॥ १ ॥
ज्ञानेश्वरें स्तोत्र अपूर्व केलें । माझ्या मना हें तरि फार आलें ।
पढेल कोणी मम भक्त भावें । वाटे मला मत्पद त्यासि द्यावें ॥ २ ॥
कृष्णाष्टमी पासुनियां अमांत । कार्तीकमासीं ममभक्त येथ ।
येवोनियां स्तोत्र करील कोणी । मद्रूप मी देयिन चक्रपाणी ॥ ३ ॥
या अष्टमी कीर्तन जो करी तो । सर्वार्थसिद्धी इह तो वरीतो ।
त्यानंतरें पाउनि लोक माझा । भोगी समृद्धीसुख सर्व वोजा ॥ ४ ॥
नौमी तिथी कीर्तनवंत कोणी । न गुंततां ये मम सन्निधानीं ।
येतों विमानीं वळघोनि जाणा । मी तुष्टतों त्यावरि देवराणा ॥ ५ ॥
कथा करी जो दशमीस नाचे । मी पाद वंदोनि तयां जनांचे ।
स्वरूप माझें निज त्यासि देतों । आज्ञेसि त्यांच्या मुकुटीं धरीतों ॥ ६ ॥

एकादशीच्या दिवशीं निशीथीं । जागे करी कीर्तन-शुद्धभक्ती ।
सायुज्य माझें निज त्यासि जोडे । असे मला केवळ भक्त थोडे ॥ ७ ॥
क्षीराब्धिचा उत्सव द्वादशीला । करी महाकीर्तन त्या नराला ।
सजावया ब्रह्मकटाहकोटी । मी शक्ति देतों अनुपम्य मोठी ॥ ८ ॥
त्रयोदशी आणि चतुर्दशी अमा । तिन्ही तिथी केवळ जाण उत्तमा ।
शतां कुळाशीं ममलोकवासी । मद्रूपमद्भाग्यविभाग त्यासी ॥ ९ ॥
त्यासीच खेळें मग त्या निराळें । नसे मला आणिक साच बोलें ।
तो सोयरा मित्र समस्त माझा । मी वीकलों त्याप्रति जाण वोजा ॥१०॥
म्यां त्याजला आणिक काय द्यावें । मदीय सर्वस्व तया वहावें ।
दारीं बळीचा अतिदास झालों । भक्तीबळें केवळ वश्य केलों ॥ ११ ॥
द्वारीं वसें त्याचपरी ययातें । मी विकलों अन्य नसेचि मातें ।
या अष्टही पुण्यतिथी पवित्रा । होती मला केवळ प्रीतिपात्रा ॥ १२ ॥
लक्ष्म्यादि या अष्टहि नायकांची । नसे मला प्रीति जशी तयांची ।
या कौस्तुभाहोनि विशेष मातें । खगेंद्र येना समते तयांतें ॥ १३ ॥
हे तों घडेना मग शेष माझा । पलंगही त्यासम काय मोजा ।
ऐशा तिथी अष्ट मला प्रिया या । जाणोनियां भक्त धरील माया ॥१४॥
करील जो कीर्तन त्यांत माझें । कैचें भवाचें मग त्यासि वोझें ।
ऐसा मुखें बोलत केशिराजा । तैं नाचती ऊडति भक्त वोजा ॥ १५ ॥
आनंद जो त्या समयांत झाला । वर्णू कसा एक-मुखेंचि बोला ।
ब्रह्मादि वेडे घडताति जेथें । मी मानवी काय विशेष तेथें ॥१६॥
वदोनि ऐसा महिमा तिथीचा । बोले पुढें पुंडलिकास वाचा ।
त्वां पंढरी एक जगांत केली । प्रख्यात मुक्तिप्रद तेच झाली ॥१७॥
या ज्ञानदेवें रचिली अळंदी । मुक्तिप्रदा भूमितळीं त्रिशुद्धी ।
हे पंढरीहून विशेष माने । गीतार्थ केला ह्मणवोनि येणें ॥१८॥
तैं बोलिजे तोषुनि पुंडलीकें । यथार्थ देवा वदलासि ऐकें ।
मी भक्त तो केवळ तूंच होसी । ज्ञानस्वरूपीं सुख-पूर्णरासी ॥१९॥
हे पंढरीहून विशेष आहे । अर्थें यया अन्य कदापि नोहे ।
महासुखें तोषुनि देवभक्त । ऐसें मुखें बोलति सत्ययुक्त ॥२०॥
सानंद तैं देखुनि देवभक्तां । निवृत्तिनाथें अति-बोधयुक्ता ।
रम्याक्षरें त्या स्तविलें हरीतें । श्री रुक्मिणीनायक विठ्ठलातें ॥२१॥

## निवृत्तिस्तोत्र.

तूं ब्रह्म तूं परम तूं परमात्मज्योती

तूं धर्म तूं परम तूं प्रिय पुण्यकीर्ती ।
आत्माचि तूं अकळ तूंचि निरंजना रे
तूं तो अनंत कळसील कसा जना रे ॥२२॥
तूं तो विवेकधन या अविवेकवंता
कैसा दिसों सकसि सूक्ष्मतमा महंता ।
हृत्सारसा विकसना करिसील भानू
चैतन्य तूं परम तूं तुज काय वानूं ॥२३॥
विश्वेश तूं अखिल तूंचि चराचराचा
धाता पिता म्हणविसी विभु पंढरीचा ।
तूं पांडुरंग जगतारक तूंचि देवा
ईटेवरी विलससी विभु वासुदेवा ॥२४॥
तूं आदि अक्षर परात्पर बीज होसी
तूं तो अनादि सुखमूर्ति असाचि ठासी ।
अंभोद-शामल-तनू पट पीत कासे
सौदामिनीसम सुवर्णगुणें विकासे ॥२५॥
कंदर्प-कोटिसम सुंदर मोहनांगा
आदित्यकोटिसम तेजधरा विहंगा ।
आरूढसी असि-गदांबुज-चक्रधारी
सर्वांग रत्नमणिमंडित तूं मुरारी ॥२६॥
फुल्लांबुजेक्षण शुचिस्मित तूं दयाळा
कूर्मासमान अवलोकिसि सज्जनांला ।
माथां किरीट अतितेज विराजताहे
कानीं झषाकृति सुकुंडल-युग्म आहे ॥२७॥
तूंतें विलोकन असें करितां दयाळा
तेव्हां रजस्तमविलास दिसे गळाला ।
तूझी असी तनु मनोहर देखिजेते
तें सत्व शुद्ध अति मानस हें करीतें ॥२८॥
अष्टांगही भरत सात्विक अष्टभावें
रोधे गळा बहुत बोल नये स्वभावें ।
रोमांच ऊठति तनूवरि वारिधारा
नेत्रीं गळे निरखितां तुजला उदारा ॥२९॥
ब्रह्मांडकोटि वसती तव रोमराजीं
देवा अनंतगुण तूं असती असा जी ।

वर्णावया तुज सहस्रमुखासि कोडें
मी काय एक मुख वर्णिन दीन वेडें ॥३०॥
त्वां ज्ञानदेव अपुल्या परमार्थरूपीं
केला विभू समरसोनि बरा अरूपीं ।
दीनें अम्हीच उरलों न करीं उपेक्षा
त्वां तारिजे म्हणुनि नित्य मनीं अपेक्षा ॥३१॥
ऐशा स्तवें परम तोषुनि मंद हांसे
पाहे कृपार्द्रनयनें करुणाविलासें ।
होसी निवृत्ति गुणसागर मीच तूंही
तुह्मा अह्मांत तरि भेद कदापि नाहीं ॥३२॥
ज्ञानेश मी नरहरी शिव तूं निवृत्ती
चैतन्य एक घडलों निज चारि मूर्ती ।
देवत्रयांत परि कल्पुनि भक्त तीनी
म्यां हाचि खेळ रचिला विभु सत्य मानी ॥३३॥
आतां असे कवण भिन्नपदार्थ सांग
मीतूंपणा दिसत भास दुजा प्रसंग ।
हेमेंचि निर्मुनि किजे कटकादि–मुद्रा
कैचा तरंगकृत भेद महा–समुद्रा ॥३४॥
आकाश काय मठ कुंभ तयांत भेदे
दृष्टी जरी दिसत भिन्न नव्हे विनोदें ।
तूं आमुची स्तुति असी करसील देवा
हें चोज वाटत मनासि निवृत्तिदेवा ॥ ३५ ॥
ब्रह्मांड पूर्ण सगळें तव रोमरंध्रीं
माया स्रजी सकळ तेचि तुझी पुरंध्री
तूं तों विराटतनु सर्व तुझ्याच आंगीं
शोभे जगत्त्रय असें भजताति योगी ॥ ३६ ॥
घेसी हरा विविध तूं अवतार जेव्हां
आह्मी करूं सकळही तवपादसेवा ।
ब्रह्मादि देव मग कोण गणील तेव्हां
दासानुदास घडती तव देवदेवा ॥ ३७ ॥
या दीसती सकळ अष्ट तुझ्या विभूती
मी एक सर्व घडलों परमार्थमूर्ती ।
हे काय शैलतनुजा मजवीण आहे

मी शक्ति तूं पुरुष हे श्रुति बोलताहे ॥ ३८ ॥
हेरंब षण्मुख वृषेंद्र गणेंद्र नंदी
हे पार्षदादि समुदें घडलेंचि आधीं ।
वांचोनि मी कवण अन्य घडेल तूझें
सर्वस्व तूंचि असती परतत्व माझें ॥ ३९ ॥
सांगाल तें करिन साच निवृत्तिनाथा
नासूं त्रिलोकजनदुर्धरघोरचिंता ।
शोषूं भवार्णव अह्मीं अतुल्या चरित्रें
तारूं रचूं सुगम सुंदर नाममंत्रें ॥ ४० ॥
जेव्हां धरोनि भवसागर जाहलाहे
तेव्हां धरोनि अह्मि तारक निश्चयें हें ।
जे आमुचे भजति भक्त अह्मां अभेदें
तेव्हां भवाब्धि तरताति महा विनोदें ॥ ४१ ॥
हें ऐकतां मधुरभाषण तो निवृत्ती
लोटांगणें हरिस घालित पुण्यकीर्ती ।
तूं धन्य धन्य अमुतें अति गौरवीसी
लोकांत सद्यश असें बहु गाजवीसी ॥ ४२ ॥
होसील तूं सकळ आजि अह्मां कुवांसा
साहाय सर्वविषयीं करिसी परेशा ।
हें जाहलीं सकळ सिद्ध तपें तुझ्यांनीं
नारायणा अखिलनायक चक्रपाणी ॥ ४३ ॥
या विष्णुभक्तिपथि आजि अम्हांसि देवा
केलें धुरीण जगतीप्रति वासुदेवा ।
दासानुदास अह्मि त्वांचि कृपा करावी
माया असीच परिपूर्ण मनीं धरावी ॥ ४४ ॥'
बोले हरी ' सकळदर्शक विष्णुमार्गा
होसील तारक गुरू त्रिजगा अनेगा ।
तूं मोक्षसिद्धिकर लाविसि याच वाटे
नानाजना फिरविसी पडले अव्हाटे ॥ ४५ ॥ '
पाळी असे हरि ळळे निजसेवकाचे
स्थापी असा भजनमार्ग वदोनि वाचे ।
देवोनियां निजसमाधिस ज्ञानदेवा
स्थापीतसे कल्युगीं हरि धर्मसेवा ॥ ४६ ॥

ऐसें वदोनि पद वंदुनि तेंचि काळीं
श्रीविठ्ठला पुसुनि तोषमनांतराळीं ।
केलें प्रयाण अपुल्या निजधामपंथें
श्रीत्र्यंबकेश्वर वसे निजलिंग जेथें ॥ ४७ ॥
जेथें कुशावत असे हरिरूप गंगा
तेथेंच हा मिळत जाउनि अंतरंगा ।
गेला अनंतसुखधामपदासि तो कीं
जो जाहला प्रकट साधुजनार्थ लोकीं ॥ ४८ ॥
निवृत्ति जातां प्रति ज्ञानदेवें । तैं प्रार्थिलें श्रीवचना करावें ।
जावें तुह्मी ब्रह्मगिरीस देवा । तीर्थीं समर्पा तनु शुद्धभावा ॥ ४९ ॥
त्यानंतरें विष्णुपदासि पाऊं । त्रिवर्ग आह्मी सुखपूर्ण होऊं ।
पाऊं तया चिन्मयविष्णुधामीं । क्रीडा करूं श्रीहरिसींच आह्मी ॥५०॥
मुक्ता ह्मणे तैं मज विठ्ठलातें । समर्पिजे ज्ञाननिधी स्वहस्तें ।
चंद्रार्क तों राहिन पंढरीसी । सेवोनियां विठ्ठल सौख्यरासी ॥५१॥
दया असों द्या मज लेंकरावरी । आयीस मातें निरवा परोपरीं
हे पुंडलीकादिक भक्त सोयरे । आहेति बंधू मज हेचि साजिरे ॥५२॥

**इतिश्रीज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिवर्णननिवृत्तिप्रयाणं नाम नवमोध्यायः ॥ श्रीसद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥**

---

# अध्याय १० वा.

जातां निवृत्ति गुणसागर मूळपंथें
सोपान खंतियुत बोलत विठ्ठलातें ।
सप्रेम गद्गद निजांतर आर्द्र झालें
तैं सात्त्विकांकुर उदेजुनि वाक्य बोले ॥१॥
' जे रामकृष्ण जन भाविसि तूंचि होसी
तूं रामकृष्ण ह्मणतां भवबंध नासी ।
तूं तोडिसी हृदय दीप घडोनि त्याचा
तूं दाविसी परम मोक्ष—निधी सुखाचा ॥२॥
तूंतें हरी नरहरी भवकेसरी रे

प्रल्हाद भक्त वरदा ह्मणवोनि जे रे ।
गातील ताळकर–दिव्य–मृदंग–घोषें
त्यांचें अनंत जननोद्भव पाप नाशे ॥३॥
त्यालागि मुक्ति वरिते हरि याच देहीं
हे भक्त नेच्छिति कदापि सुमुक्ति तेही ।
तुझ्याचि दिव्यचरणांबुजरेणुला हें
त्यामाजि मुक्तिशतसौख्य यथार्थ आहे ॥४॥
यावीण मोक्ष गणितो नर तेचि मिथ्या
येना जरी असल मोक्ष तयांसि पथ्या ।
हा धन्य देश अपुल्या पदरेणुयोगें
केला निवास सुख पाउनि पांडुरंगें ॥५॥
दिल्ही समाधि अपुली निज ज्ञानदेवा
केला स्वकीय तरि वासचि वासुदेवा ।
गेले निवृत्ति गुरुनाथ पदासि तेही
मी मात्र येक उरलों तव दास पाहीं ॥६॥
म्यां या क्षितीवरि तयांविण काय कीजे
सेवा असेल तरि सांगुनि धन्य कीजे ।
सांगा विचार पुढती कवण्या प्रकारीं
म्यां कांठिजे नरहरी तुमच्या विचारीं ॥७॥ '
तैं बोलती त्रिजगतीपति विष्णु यातें
' सोपान तूंचि जगतीपति बा यथार्थे ।
तूं तों चराचर–पिता प्रपितामहा तूं
तूं वेदमार्ग–परिरक्षक नान्य बा तूं ॥८॥
तूं गा विराट अससील हिरण्यगर्भ
सारें चराचर दिसेचि तुझेंच गर्भ ।
हें सर्व त्वांचि धरिलें सुतपप्रभावें
सामर्थ्य सर्वहि तुझेंचि असे स्वभावें ॥९॥
तूं व्यापलास पटसूत्र तसेंचि लोकीं
त्यातें कळे जरि तुला निगमें त्रिलोकी ।
जे अंधबुद्धि भवपंकनिमग्न झाले
त्यांचे कदां उघडतील मदांध डोळे ॥१०॥
धर्मा घडे क्षय तदां निरखोनि तीवे
आह्मीच घेत अवतार पुन्हा विभागें ।

मारूनि दुष्ट परिहारुनि पापकृत्या
'स्थापोनि सज्जन महापथधर्मसत्या ॥ ११॥
हा खेळ सर्व करणेंचि अह्मांसि लोकीं
आह्मी त्रिवर्ग तरि एकपणें असों कीं ।
त्या पूर्ण एकचि चिदंबुधिचे तरंग
तीघे असों स्वसुख केवळ अंतरंग ॥ १२॥
दावोनियां त्रिगुणभाव जनाचसाठीं
भिन्नत्व दावुनि करूं बहुलोकसृष्टी ।
गंगा जरी त्रिविधमार्ग धरोनि गेली
लोकत्रयीं तदपि ते ह्मणिजे निराळी ॥ १३॥
तैसाचि मीं हरि सदाशिव तूं विधाता
झालों त्रिवर्ग परि नाहिंच भेदवार्ता ।
केलेंचि सर्व अवतार धरोनि कृत्या
बौद्धादि दुष्टमत मोडुनियां असत्या ॥ १४॥'
ऐशीं हरीनिगदिताक्षरपंक्ति कानीं
सोपान ऐकुनि मनीं अतिहर्ष मानी ।
सप्रेमयुक्त मग पूर्णसुखें निवाला
नाहीं दिसे स्थळ पुढें मग भाषणाला ॥ १५॥
तदां मुक्ताबायी नमुनि हरिपायीं दृढमती
करी स्तोत्रा ऐशा मधुरवचनीं प्रेमळवती ।
'दयाळा तूं सत्यात्मक असशि सत्यव्रत हरी
तदां सत्यानंदीं विलससि परा तूं नरहरी ॥ १६ ॥
अगा सच्चिद्रूपा सकळधन तूं सत्य अमुचें
जगीं सत्याकारें तुज निरखितां पातक खचे ।
अहो विश्वाकारा अजित विभु नारायण हरी
सदां सत्याब्धी तूं तुज सकळ हें सत्य लहरी ॥ १७
तुझ्या सत्यत्वीं हा सकळ रचला लोक दिसतो
घडोनी सत्यात्मा दिनकरकरीं सत्य दिसतो ।
नभीं येकाचक्रें रथ फिरवितो सप्ततुरगें
जगा स्थापी कर्मीं पुनरपि समुद्रीं मग रिघे ॥ १८
महाकूर्मा पृष्ठीवरि धरिसि हे शेष अवनी
नये तूला कैसा शिण न मनिसी वीट अजुणी ।

असा तूं सत्यातें असासि अवलंबोनि सुमना
न देतां स्तंभातें रचिसिल विरिंच्यांडसदना ॥ १९ ॥
धरापृष्ठीं स्वर्गीं असासि गगनीं ब्रह्मसदनीं
सदां सत्याकारें म्हणुनि जग वर्ते दृढ गणी ।
जधीं सत्याचा हा पथ विघडतो त्याच समयीं
धरोनी देहातें वसविसिल सत्यें मग मही ॥ २० ॥
पथीं सत्याचा या बहु तुज असे पक्ष जनका
महाविष्णू देवा अखिलजगभांगारकनका ।
जगन्नाथा नाथा तुजविण जगा काय म्हणिजे
तुझ्या रूपीं सारें रविकिरण तैसेंचि गणिजे ॥ २१ ॥
तुला ध्याती योगी परम वितरागी स्वविषयीं
तुला प्रेमें गाती भजत अनुरागी स्वनिलयीं ।
तुझी पूजा सारे करिति गणगंधर्व सुमनें
सुराळी ते काळीं वरुषति शिरीं दिव्यसुमनें ॥ २२ ॥
शिवाचा तूं आत्मा असासि सुरविश्राममठिका
समस्तां योग्यांतें हरि सतत कल्पद्रुम तुका ।
व्रतां सर्वांतेंही तुजविण नसे ठाव दुसरा
तपस्व्यांचा स्वामी पुरविसि शिराणी सुखकरा ॥ २३ ॥
तुझ्या योगें तीर्थें सकळ घडलीं पावन जगीं
समस्तां लोकांची हरिति कलुषें ते प्रतियुगीं ।
पुराणीं हे वाणी सकळ परिसों देव समुदे
असे गाती देवा प्रकट महिमा हे श्रुति वदे ॥२४ ॥
स्वभक्तांचा होसी परम कणवाळू गुणनिधी
म्हणोनी तो झाला हरि तनय तूझा तरि विधी ।
भवाब्धीचा तारू परम गति तूं साधक जना
म्हणोनी हें सारें जग अनुसरे पादभजना ॥ २५ ॥
जया वाटे देवा अतिकठिण संसार तरिजे
तयांनीं निर्द्वंद्वें करुनि अमळा तूज भजिजे ।
महालक्ष्मीनाथा करिं मज अनाथावरि दया
नुपेक्षीं दातारा करिं धरिं परानंद उदया ॥ २६ ॥'
अशा मुक्तायीच्या वदनकमळीं हे स्तुतिसुधा
झरे वर्णी तेव्हां हरिख हरिचित्तासि बहुधा ।

म्हणे 'धालों बायी वदसिल अगायी ममगुणा
वरा देतों घेयीं पुरविन तुझ्या येइल मना ॥ २७ ॥'
म्हणे तैं मुक्तायी 'तुजविण हरी कांहिंच नसो
तुझें घेणें देणें सकळ तुजपासींच निवसो ।
तुझ्या पायीं राहो अचळ अमुचें प्रेमचि हरी
तुझ्या दासासंगीं अमुप सुख देयीं नरहरी ' ॥ २८ ॥
म्हणे मुक्तायीतें 'परिस अमये गोष्टि वदतों
पदीं माझ्या लागे नर तरि वरी मुक्तिपद तो ।
न ये जन्मा कांहीं घडति शतकल्पें तरि पुन्हा
अशा पात्रे माझ्या भजक सुख धामासि गहना ॥ २९ ॥
सुखें तूं मत्संगीं निवस जंव तारा मणि रवी
असे पृथ्वी भूतें चरअचर घेवोनि बरवीं ।
वसे माझी गाथा जंववरि क्षिती हे सुखतनू
तुझी राहो लोकीं ममनिकट होवोनि अतनू ॥ ३० ॥
तुझ्या स्तोत्रा कोणी पढतिल तया मुक्ति सुजना
त्वरें मी देता हें परमपद सारूप्य सगुणा ।'
असा देवें केला बहुत परिचा लोभ सुकरें
करें स्पर्शी गात्रें मुख निराखिलें तोषनिकरें ॥ ३१ ॥

## शालिनी.

पुंडलीक तंव बोलति देवा । हात जोडुनि करी पदसेवा ।
'ऐकिजे ममवरें विनवीतों । वेदवेद्य अससी विभु तूं तों ॥ ३२ ॥
नेणती श्रुति तरी तव पारा । शास्त्र-सज्जन-सुरांसि अपारा ।
जाणवेल तरि काय वदावें । ज्यासि कंठगत हें भवदावें ॥ ३३ ॥
तूं गुणार्णव हरी तुज गातां । मौन येत वचनासि महंता ।
वेद नेति ह्मणती मग कैंचा । शाहणा अणिक वर्णिल वाचा ॥ ३४ ॥
शेष एक जागिं फार मुखांचा । भागला मग असा पर कैंचा ।
कोण जाणल तुला जगदीशा । तूं अपार गुणनिर्गुण ईशा ॥ ३५ ॥
भक्तकाज करुणाघन होसी । दिव्य देह असले बहु घेसी ।
पावलासि मज या सुजनार्थी । पंढरीसि करिसी शुभवस्ती ॥ ३६ ॥
भक्त सर्व भजती तुज देवा । ते अहर्निश तुझी पदसेवा ।
इच्छिती अतुळ ते महिमेचे । तो असे कवण कीं तुज वंचे ॥ ३७ ॥
तूं समान महिमा हरि ज्यांच्या । वर्णनीं न सकती मन वाचा ।

ग्रंथालय ठा... नं..... ता.....

वश्य तूज करिताति गुणानें । प्रेमबंध न घडे तुज तेणें ॥ ३८ ॥
भीमरा सुखकरा शशिभागा । वेणुनाद–निकटीं निजरंगा ।
लक्षिती तुजचि दृष्टि भरोनी । तिष्ठसी कटितटावरि पाणी ॥ ३९ ॥
गोपबाळक गडी हरि तूझे । वेणुनाद करिती अतिभोजें ।
नाचती उडति कीर्तनरंगीं । तूजसी च रतले तवसंगीं ॥ ४० ॥
दीनपाळ हरि एकचि होसी । वांछितार्थ सुजनांप्रति देशी ।
तू जगत्त्रय गुरू भवतारू । सज्जनार्थचि तुझा अवतारू ॥ ४१ ॥
अष्टविंशति युगें मजसाठीं । पंढरीस वससी जगजेठी ।
भावलुब्ध भगवंत असा तूं । तूं अनादिनिधना जगहेतू ॥ ४२ ॥
तूंचि होसिल त्रिलोकनियंता । स्वामि तूंचि सकळांसि अनंता ।
तारिले बहुत लोक कळीचे । आपुल्या निजगुणें हरि साचे ॥ ४३ ॥
क्षीरसिंधुतनयापति होसी । तूंविना अणिक मी गुणरासी ।
कोण दैवत असे तरि नेणें । गातसें ममसुखें तव गाणें ॥ ४४ ॥
सांवळें सगुणतत्व दिसाया । जाहलासि जगीं पंढरिराया ।
ब्रह्म तूंचि गुणहीन विठोबा । तूं अरूप अपरंपरतो बा ' ॥ ४५ ॥
यापरां स्तुति करी निजदास । पुंडलीक अतिभक्तिविलास ।
त्या प्रसन्ननयनें हरि पाहे । प्रेमसिंधु कुरवाळित बाहे ॥ ४६ ॥
धन्य धन्य ह्मणती हरि त्यातें । धन्य तूं भजक तूं प्रिय मातें ।
या जगीं तुज असा दुसरा तो । भक्तिवंत गुणसाम्य न येतो ॥ ४७ ॥
यापरीं बहुत भक्तगुणाची । वर्णना करिति श्रीधर वाचीं ।
भक्तप्रेमळ हरीच ह्मणावा । अन्य कोण मग साम्य गणावा ॥ ४८ ॥

## भुजंगप्रयात.

पुन्हां त्या स्थळीं सर्व भक्तोत्तमांतें । दिल्हीं भोजनें प्रेमयुक्तें अनंतें ।
मनीं प्रेम तत्रापि ज्ञानेश्वराचें । निघेना तया सांडुनी चित्त याचें ॥४९॥
तदां उद्धवें हात जोडोनि देवा । बरें प्रार्थिलें ऐकिजे वासुदेवा ।
समाधीस देवोनि सोपानदेवा । पुढें पंढरी जायिजे देवदेवा ॥ ५० ॥
जसी ज्ञानदेवा दिल्ही हे समाधी । तसी यासि दीजे विभू वेदशब्दीं ।
अशा प्रार्थनेलागिया चित्त द्यावें । पुढें तिष्ठत्या वैनतेया पहावें ॥५१॥
अशी ऐकतां उद्धवाची सुवाणी । तदां संकटें दाटले चक्रपाणी ।
ह्मणे एक अंशें वसे या ठिकाणीं । यया ज्ञानदेवार्थ तूं सत्य मानीं ५२
तदां वेदघोषें महाप्रेमतोषें । ऋषी देवसद्भक्तमेळें विशेषें ।
दिल्ही ज्ञानदेवासि देवें समाधी । जगत्कारणें विठ्ठलें तुर्यशब्दीं ॥ ५३ ॥

पुढें पाहिला भक्त तो पन्नगारी । तदां स्वार झाला विभू दानवारी ।
फडात्कार पक्षाचिया रम्यवातें । उडे फार तोषें गरुत्मा समर्थ ॥ ५४॥
तदां पुंडलीकादि तो भक्तमेळा । बसे पुष्पकीं नादघोषें निघाला
तुरें वाजती शंख भेरी नफेरी । सुरां किन्नरांच्या अनेकाप्रकारीं ॥५५ ॥

तदां देव तेत्तीसकोटी विमानीं । ऋषी चालिले बैसले व्योमयानीं ।
मिळाला जसा तो अळंदीस मेळा । तसा सर्व संवत्सरग्रामयाला ॥ ५६ ॥
जवें पातले सर्व संवत्सरासी । हरी उत्तरे त्याक्षणीं भूमिदेशीं ।
समस्तां सुरांसीं समारंभ केला । जसा ज्ञानदेवीं तसा येथ झाला ॥ ५७ ॥
दिठीं देखिली भूमि ते लक्षणोक्ता । कऱ्हा उत्तरेच्या तटीं ते प्रशस्ता ।
खणाया समाधीस आरंभ केला । स्वयें विश्वकर्मा तदां सिद्ध झाला ॥ ५८ ॥
बरीं शुद्ध सम्मार्जनें कुंकुमानें । सडे घातले गंधतोयें सुजाणें ।
त्वरें जाण पीयूषसंप्रोक्षणातें । करी इंद्र संतोषवी श्रीहरीतें ॥ ५९ ॥
तदां ब्राम्हणीं वेदपारायणातें । सुतोषेंचि आरंभिलें प्रेमचित्तें ।
महासामगानें उदंडाप्रकारीं । अतीसुस्वरें रंजवीती मुरारी ॥ ६० ॥
सुभेरी महाकिन्नरांच्या नरांच्या । बहू वाजती घोष गाजे सुरांचा ।
जयोक्ती वदे सर्व तो भक्तमेळा । तदां थोर उत्साह तेथें उदेला ॥ ६१ ॥

**॥ इति श्रीज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिवर्णने संवत्सरप्रवेशो नाम दशमःसर्गः ॥**

---

# अध्याय ११ वा.

पुढें पुंडलीकादि भक्तासमेतें । उभे राहिले मुख्य सोपान तेथें ।
तदां देव लक्ष्मीपती त्यासि पाहे।उजू आपल्या सन्निधीं शीघ्र बाहे ॥१॥
तदां सर्व गंगादितीर्थावळीतें । पुढें बाहिलें देवदेवें अनंतें ।
जशा राहिला अंश येकें अळंदी । तसें राहिजे सर्वही या समाधी ॥ २ ॥
जसी ज्ञानदेवीं अह्मां प्रीति भारी । तसा देव सोपान मत्प्रीतिकारी ।
नसे भेद यामाजि कांहींच साचा । ममाज्ञा असी पाळिजे हे त्रिवाचा॥ ३ ॥
पुढें ब्रह्मरुद्रादि देवेंद्र आले । उभे राहिले दिक्पती एकमेळें ।
महासिद्ध चौघे मुनी ब्रह्मपुत्र । जया देखतां होत पापी पवित्र ॥ ४ ॥
समस्तां ऋषींतें त्रिलोकी दयाळू । ह्मणे राहिजे ये स्थळीं सर्वमेळू ।
अम्हींही वसों नित्य या भीमकीसीं।तुह्मीही वसा नित्य आम्हाचपासीं ॥५॥

तदा वर्षती देव सारे फुलांनीं । उभे राहिले व्योमपंथीं विमानीं ।
तदा भीमकी दिव्य जोडोनि पाणी । पदीं लागली वल्लभप्रेमखाणी ॥६॥
'कसा भक्त सोपान हा भाग्यवान । जयाकारणें देव आले विमानें ।
पहा सर्व आले ऋषी ब्रम्हवेत्ते । चतुर्वेद सर्वांग संपूर्ण धर्ते ॥ ७ ॥
नद्या गौतमी सूर्यजा आणि गंगा । जयां देखतां शुद्धि ये अंतरंगा ।
पहा पुष्करादीक तीर्थें अनंतें । नये लेखितां मीनलीं सर्व येथें ॥ ८ ॥
पुरी सातही क्षेत्रवृंदें समस्तें । तुम्हां पाठिसी पातलीं सर्व येथें ।
समस्ताद्यदेवा तुम्ही एक आलां । म्हणोनी हरी मीनला विश्वमेळा ॥ ९ ॥
महाधन्य हा वाटतो दीस मातें । तुम्ही पातला भक्तकार्यार्थ येथें ।
असा पक्षपाती जगीं कोण आहे । महादीनबंधू असें नांव साहे ॥ १० ॥
तुम्ही आजि संवत्सरग्रामवासी । हरी काय जाणोनि केलें ययासी ।
मला तत्व हें सांगिजे देवदेवा । मना आवडे भाव याचा पुसावा ॥ ११ ॥
असें पूसतां बोलती देव वाणी । 'अहो रुक्मिणी ऐक तूं प्रेमखाणी ।
महागोप्य तेंही तुला सांगताहे । नसें बोलिलें आजपर्यंत पाहें ॥ १२ ॥
तुला काय ठावें नसे लोककाजा । सती पूससी जाणतों भाव तूझा ।
तुवां पूसिलें या जगातें कळाया । म्हणोनी तुला सांगताहे सुकाया ॥१३॥
अहो इंद्रकीलाख्य या पर्वतातें । सती जाण आधीं महापुण्यदातें ।
येथें मार्ग पाताळिचा थोर आहे । महानाग शेषादि येतील पाहे ॥१४॥
म्हणे वैनतेयासि जा शेषलोकीं । महापन्नगातें सुभावें विलोकीं ।
समस्तांसि येथेंचि वाहोनि आणी । असें सांगती सेवका चक्रपाणी ॥ १५ ॥
महाक्षेत्र हें भूतळीमाजि नारी । पुरी दिव्य कौंडण्यनामेंचि भारी ।
पहा योगिनी येथ प्रत्यक्ष नांदे । जगाच्या अभिष्टार्थ सर्वस्वहीं दे ॥१६॥
महाभैरवानंद या क्षेत्रपाळा । पहा मल्लनाथासि येथेंचि डोळां ।
पुरा ये स्थळीं नांदला तो विधाता । विरंची किती काळ येथेंचि होता ॥१७॥
पहा भूतळीं राहिला इंद्र येथें । ऋषी कोटिशा नांदले जाण पूर्तें ।
पुरी विश्वकर्मेंचि निर्माण केली । विरंची वसे या स्थळीं देवमेळीं ॥ १८ ॥
ऋषीदेवपित्रादि तीर्थव्रतातें । असें स्थापिलें ब्रह्मयानें महंतें ।
कऱ्हा वाहते ब्रह्मपात्रांत होती । झरोनी स्वयें चालिली पूर्वपंथीं' ॥ १९ ॥
असें सांगतां रुक्मिणीलागिं देवें । तदा पूसिला प्रश्न सोपानदेवें ।
'कधीं नांदला सांगिजे आदिधाता । पुसों आवडे हे कथा देवनाथा' ॥२०॥
म्हणे श्रीहरी 'ऐक बा भक्तराया । तुला सत्कथा सांगिजे पूर्विका या ।
अम्ही राहिलों पुंडलीकार्थ आतें । धरामंडलीं पंढरी श्रेष्ठ जेथें ॥ २१ ॥

अम्ही राहिलों या जगीं चिद्विलासें । अम्ही टाकिला लोक वैकुंठ ऐसें ।
समस्तां सुरीं ऐकतां त्याचिकाळीं । अरे पातले हे विधी चंद्रमौळी ॥ २२ ॥
महादेव शंभू असे माणदेशीं । अह्माकारणीं टाकिली दिव्य काशी
तदां हा विरंची वसे येथ पाही । सुरांच्या समूहें मदां सर्वदांही ॥ २३ ॥
अरे राघवें मर्दितां राक्षसातें । रणीं शक्ति जैं लागली लक्ष्मणातें ।
तदां आणिला तो गिरी द्रोणनामा । तया मारुतीनें महाश्रेष्ठ तो मा ॥ २४ ॥
तयाचा पडे अंश कांहीं तुटोनी । यया इंद्रकीलासि तूं सत्य मानी ।
अरे औषधी दिव्य अद्यापि येथें । निशीं दीसती स्वर्णवर्णे समस्तें' ॥ २५ ॥
असें वृत्त सांगीतलें सर्व देवें । समाधीस येथें सुखें तां बसावें ।
असी श्रीश आज्ञा करी त्याच काळीं । नमी दिव्य सोपान पादाब्ज भाळीं २६
समाधि-स्थळीं आसनीं बैसवीला । महानंद उल्हास चित्तासि झाला ।
हरीचें करी स्तोत्र सोपानदेव । स्तुतिप्रीत जाणोनि हा देवदेव ॥ २७ ॥

## सवायाहेमकळा.

देव अगण्य गुणागुणसागर तूं गुणरत्न गुणाकर होसी
काळ समस्त तुझा निज किंकर शासक तू अससील तयासी ।
काळ विनाशक भक्तजनाप्रति पीडिल यास्तव दंडुनि त्यासी
तांचि विभू पद-पंकज-तोडरिं बांधियला नवनूपुर पाशीं ॥ २८ ॥
अक्षरशून्य त्रिमात्रक आदि तयांहुनि अक्षर तूं हरि हीरा
आद्य समस्त सुरासुर त्यांप्रति तूंचि वडील विराजसि सारा ।
तूंचि महेश्वर सर्वसुरेश्वर तूंचि अनंत गुणाद्य अपारा
तूज नमो पुरुषोत्तम जी प्रभु वेद असे वदती सुखसारा ॥ २९ ॥
वेद विदग्ध तुला हरि जाणति वेदहि जाणसि तूंचि निवांत
वेद अनंत तुझे गुण ते हरि वर्णिति त्या न कळे तव अंत ।
नेति मुखें निरसोनि समस्तहि दाविति ते तुजलागुनि संत
जाणुनि नेणति नेणुनि जाणति नेमिति ते तुजलाचि सुशांत ॥ ३० ॥
विश्रम पावत चित्त तुला नमितां मग टाकुनि सर्वहि वृत्ती
ध्यान करी तरि लीन घडे पद पंकजिं केवळ चिन्मय मूर्ती ।
ध्यान मनासि अगम्य नमो तुज गम्यहि होसिल तूं निजशांती
राम गुणार्णव निर्गुण तूं ह्मणवोनि तुला धरिलें दृढ संतीं ॥ ३१ ॥
तूंचि अशेष अपार समस्त महेश्वर होसिल तूज नमो जी
तूंचि समस्त चराचरधारक तूंविण कोण पराप्रति मोजी ।
जीव शिवादि सदोदित प्राकृत भावपदार्थ यथार्थ असो जी

तूंचि विभू नटलासि असाच अनंत विलास तुझे हरि हे जी ॥३२॥
देव तनू जितक्या असती हरिनामरुपासि धरोनि निराळ्या
ज्या असती गुणकर्मविधायक ज्या सकळांप्रति कारण झाल्या ।
त्या सकळा तुझियाच रुपाहुनि भिन्नपणें जरि व्यक्तिस आल्या
तूज नमो हरि सागरिच्या लहरीसम सर्व तुलाचि मिळाल्या ॥३३॥
कृष्ण कृपालय विष्णु सनातन जिष्णु जगन्मय शुद्ध स्वरूपा
तूंचि चिदात्मक तूंचि प्रकाशक भासक तूं भुवनत्रय–दीपा ।
नाथ अनादि सुरासुर–नायक पालक तूं करिसी अनुकंपा
तूज नमो अतिगूढ जनाप्रति दीससि एक अज्ञांप्रति सोपा ॥३४॥
योगविदांप्रति दीससि तूं सकळा जसला मनि भाविति तूतें
हें वदतें जग सर्व खरें परि प्रत्यय हा न घडेचि मनातें
तूं अपरंपर पारविहीन कसा घडसील मनासम त्यांतें
हें न कळे गुज तूज नमो न कळों सकसील कदापि मतीतें ॥ ३५ ॥
तूं जगदादि जगज्जनका जगजीवन तूंचि जगन्मय होसी
तूंचि जनीं नटलासि जनार्दन सर्जक पाळक तूंचि जनांसी
हें जग याप्रति तूंचि धणी मणि सूत्रसमान धरोनि विशेषीं
अंतरयामि निरंतर तूं वससी तुजलागि नमो गुणरासी ॥ ३६ ॥
काय कुतूहलवर्णन मी करुं अद्भुत खेळ तुझाचि पराद्या ।
भक्तिपरायण प्रेमळ पंडित सज्जन त्या परिपाळिसि सद्या
तूंचि परात्परमूर्ति निदान समस्तजगाप्रति तूं श्रुतिवेद्या
तूज नमो मदनायुत–सुंदर मंगळनामक तूं अतिहृद्या ॥ ३७ ॥
तूं परतत्व परेहुनि वर्तसि नाहि गुणत्रयलाग स्वरूपीं
तूं निगमागममार्ग चराचरिं वाढविसी महिमा वहुरूपी
रक्षिसि धर्म अधर्म विनाशिसि हे रचिसी चरितें अतिसोपीं
गाति महाजन भक्त तुझे परिसोनि तरे अति निर्दय पापी ॥ ३८ ॥
योग अनंतपरीं जगि दाविसि योग तपोमय तूंचि अधीशा
ज्ञानसमाधि तुझ्या स्वरुपीं असती प्रकटे सकळांतरवासा
तूं असला शिवशांतसनातन तूज नमो परिपूर्णविलासा
होय जयांवरि हे करुणादिठि तो नर पावत सौख्य अपैसा ॥ ३९ ॥
या मनुजां इह भुक्ति परत्र सुमुक्ति अशा हरि दोनिच आशा
त्या नसती मज तूजविना नलगे प्रभु कांहिंच तें जगदीशा
सांडुनि सत्वरजात्मक लिंगशरीर मिळेन तुझा तुज ईशा

सागरिची लहरी जशि सागरिं ते मिळते सहजोंचि अपैशा ॥ ४० ॥
जो अतिबोध तुझा अतिशेखर भक्ति तयावरि जे झळके
मुक्तिशिरीं पदपंकज ठेउनि टाकिलिसे बहुता हरिखें ।
यास्तव मी नमितों तव पंकज साम्यपदीं विनयें अधिकें
तोंचि मला जरि देसिल तूं तरि दे नलगे दिधलीं अणिकें ॥४१॥
मूळ निराकृति घेउनि आकृति सर्वरुपीं नटसी नट तैसा
हेंचि मला कळलें श्रुतिच्या वचनें धरिला बहुसाल भरोसा
भेदविकार निरासुनि एक पदींच करीं मजला सरसासा
भेदमहाभयनाशक तूं भवशोषक तूं कमलांगनिवासा ॥ ४२ ॥
जो शम जो दम जो मद–निग्रह सर्व तयासम होत तुझेनी
आदि अनादि वरिष्ठ गुरू तुजपासुनि पावति चित्पद ज्ञानी ।
तें पद दाखवि पूर्ण निरामय आयकतों अति सुंदर कानीं
पावति सौख्य अनंत तुझे नर पाउनि जें न फिरे मग कोणी ॥४३॥
ईश्वर तूंचि उदार अनंत अनंद अपार अनेक रुपाचा
ऊर्णक–नाभिसमान जगा रचितोसि सविस्तर तूं स्वगुणाचा ।
तूं रचिलासि अभेद असी मज दृष्टि तुझी उघडी हरि देयीं
सांठवि हृत्कमळीं अपुल्या पदरीं निज किंकर पाळुनि घेयीं ॥४४॥
दीन अनाथ जनांप्रति नाथ तुह्यांविण आणिक कोण असे जी
चित्त मदीय तुसीं मिनलें जगदीश दुजें मग काय दिसे जी ।
जीव–शिवासहि आदि विभू तुजवीण दुजा भवभेद नसे जी
वर्तसि तूंचि अभेद चराचरिं तोंवि हरी वससी मजमाजी ॥४५॥
राम नमो रमणीय–वपू घनशाम नमो सुखधाम नमो
दिव्य–शरासन–बाण–विधारक राक्षसनायकनाश नमो ।
काम नमो कमनीय–गुणाकर कोटि–दिवाकर–धाम नमो
व्योम नमो विबुधाधिप योगिजनांसि मना सुखधाम नमो ॥४६॥
दत्त महा अवधूत नमो निज सत्यसनातन एक नमो
ज्ञानदशांसि अभिन्न नमो परभेदव्रतांसि अलभ्य नमो ।
एकचि तूं दशधा घडसी दशमाकृति ईश अगम्य नमो
नम्य नमो नमनादि नमो सुखगम्य नमो श्रुतिधर्म्य नमो ॥४७॥
देव नृसिंह मुकुंद नमो हरि वामन याचित–भूमि नमो
सर्व–दिगंतर–पूर्ण नमो अध ऊर्ध्व तदांतर दिक्षु नमो ।
तूं चतुराचतुरांहुनि भिन्न न जाणति आगमनैगम मौना

वाहति पाहति नांदसि तूं सभराभरिता सकळांत समाना ॥४८॥
मंजुळ–शब्द कसा मुरलीरव भूलवितो सकळा भुवनांसी
मंजुळ नाम तुझें अति–पावन ध्यान तुझें भवबंध विनासी ।
विश्व चराचर रूप विकुंठनिवास रमाधव सुंदर होसी
हे भजते भजकावळियांप्रति सौख्य अनंत अपारचि देसी ॥४९॥
मूळ जगद्गुरु हे जगपाळक हे जगचाळक हे जगदादी
हे जगसर्जक हे जगनाटक हे जगतारक वर्णित वेदीं ।
तूं परमेश्वर तूं जगदीश्वर तूंचि जडाजड–भूत–विनोदी
सत्यसनातन देव निरंजन वर्णिति भक्त तुतें बहु शब्दीं ॥५०॥
पुंडलिकाप्रति सांपडलासि अरूप असोनि रुपा धरितोसी
व्यापक सर्व चराचरिं होउनि पंढरिमाजि उभा दिसतोसी ।
विठ्ठलमूर्ति युगानयुगीं हरि तिष्ठसि भक्तजनार्थ सुखेंशीं
नीट इटेवरि धीट तुला अवलोकिति भेटति चित्सुखरासी ॥५१॥
भीमरथी पदपंकजसन्निध वाहत सुंदरि ते शशिभागा
राउळ रम्य तुझें विलसे अति दक्षिणतीर धरोनि शुभांगा ।
दीनजना कनवाळ कृपालय भक्तजना सुजना सुखसंगा
बाललिला करिसी गुणसागर गोचरगोचर पांडुररंगा ॥५२॥
जन्मशतीं तरि देखति जे तुज जन्मशतोद्भव पातकरासी
जाळुनि टाकिसि एक पळांत पळार्ध जरीं वसती तुजपाशीं ।
पावति मोक्षपदाप्रति धन्य प्रयागगया नलगे मज काशी
तूं असला विभु दीससि गोचर दृष्टि भरोनि हृदब्जनिवासी ॥५३॥
देव नमो दनुजेंद्रविनाशक दिव्य समाधि मला तुज हातें
त्वां दिधली किति काय वदूं मम पुण्य पुरातन अद्भुत होतें ।
प्रेमळ त्यांवरि प्रेमपरायण दाखविसी निजभाव जनातें
वंदन वंदन वंदन वंदन वंदन कोटि पदांबुरुहातें ॥५४॥ '
यापरिची स्तुति ऐकुनि विठ्ठल बोलति भक्तमणीप्रति तोषें
'पूर्ण करीं स्तुति प्रेमळ तूं असती परिपूर्ण निजांतर हर्षें ।
अक्षरपंक्ति अपूर्व तुझी श्रवणीं पडतां अति तृप्त मि झालों
मीतुंपणीं तरि अंतर काय असे अम्हि एकपणेंचि मिळालों ॥ ५५ ॥
तूं अवतार चतुर्मुख हे मनुजाकृति घेउनि वर्तसि लोकीं
पुण्यवतांप्रति हें कळलें गुज याचपरीं तुज मानिति ते कीं ।
तीनिच देव अम्हीं प्रकटोनि महीवंर सारुनि अद्भुत लीला

दाखविली निजभक्तजनांप्रति पार नसेचि तुझ्या महिमेला ॥ ५६ ॥
चातुर तूं सकळागम जाणसि सर्व सुविद्यविवेकविचारा
सर्व पवित्र पवित्र पदार्थ तयांत पवित्रपणेंचि उदारा ।
शोभसि तूं मम भक्तिपरायण सर्व जगा जगदोद्धरसारा
तीर्थ पदांबुजिचें रज इच्छिति जे धरिती बहु पातकभारा ॥ ५७ ॥
यापरिचें हरि स्तोत्र करी तंव मौनाचि तो अवलंबुनि राहे
भक्तशिखामणि दिव्य सुपान सुधासम गौरव पाउनि धाये ।
त्यावरि तो हरि तीर्थजळें अभिषेक करोनि यथाविध यातें
सर्वऋषीसमवेत पढोनि महागमदर्शित तें श्रुतिसूक्तें ॥५८ ॥
भागिरथी यमुनादिक सर्वहि दिव्य नद्या वनितातनुधारी
आरतिया स्वकरें अतिसुंदर घेउनि पावति मध्य दुपारीं ।
श्रेष्ठ मुहूर्त महासमयीं अति उत्सव ते स्थळिं अद्भुत झाला
सर्व सुरासुर सिद्धमुनी हरिदास समाज समस्त मिळाला ॥ ५९ ॥
वर्षति देव फुलें गगनींहुनि गायक नारदतुंबर गाती
नाचति देववधू अतिहर्षित भूचर खेचर सर्व पहाती ।
थोर महाजयकार तदां उठिला रव दिक्तट भेदुनि गेला
तैं स्तविती सुरकिन्नरसिद्ध निशाचरभार अनेक मिळाला ॥ ६० ॥
दिव्य समाधिस बैसविलें हरिनें तव निर्जर मंगळवाद्यें
वाजविती गगनीं क्षितिमंडळिं भेरि मृदंग महाध्वनि हृद्यें ।
नाद दिगंत भरोनि रसातळिं जाउनि सांगत तो फणिकानीं
ऊर्ध्व विरंचिकटाह विभेदुनि जात महावरणांत भरोनी ॥ ६१ ॥
यापरिचा अति उत्सव वर्तत तैं नमिले पदपंकज तेणें
श्रीहरिचे बहुतां विनयें मग पूजियले निजभक्त सुपानें ।
प्रार्थितसे हरि नित्यनिरंतरिं रुक्मिणिसीं मजसन्निध राहे
देव अवश्य ह्मणे पदपंकज भक्तिपुरःसर मस्तक वाहे ॥ ६२ ॥
पाहतसे हरिलागि दिठीं चरणाब्ज धरोनि शिखांतवरीतो
शामल कोमल सुंदर सोज्वळ दिव्य तनूसि मनांत धरीतो ।
पीतपटीं परिवेष्टित कौस्तुभकंधर चक्रगदांबुजपाणी
नेत्र विशाल सुहास्य मुखीं करुणाघन विठ्ठल ठेउनि ध्यानीं ॥ ६३ ॥
नेत्रनिमीलन तो करि अंतरिं हृत्सरसीरुहपीठनिवासी
पाहत पाहत हर्षभरें जळसांद्रप्रवाह सुटे नयनासी ।

मंद मुखांबुजिं हास्य विराजत तें पुलकें तनुमाजि उदेलीं
मौन गिरेसि पडे मुरडे मन बाह्य नुरे निजप्रेम सुकाळीं ॥ ६४ ॥

॥ इतिश्री ज्ञानेश्वरविजयमहाकाव्ये समाधिवर्णने सोपानस्तुति समाधिनिवेशोनाम एकादशोध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

# अध्याय १२ वा.

पद्मासनीं बसुनि निर्मळ ध्यान चित्तें
सोपान नेत्र करि मीलन तैं अनंतें ।
प्रेमप्रसन्ननयनीं निरखोनि त्यातें
दिल्हीं समाधि सुखदायक सज्जनातें ॥ १ ॥
तेथें स्वयें नरहरी परितिष्ठताहे
एकांश कोटिशतकल्प असाचि राहे ।
भक्तासि पावन करी निजकीर्तनानें
देवादिदेव पुरुषोत्तम तोचि जाणें ॥२॥
ज्याची समाधि सुख वंदिति लोक तीनी
संवत्सरीं विलसला गुणरत्नखाणी ।
‘ सोपान ’ मंत्र जपतां भय मृत्यु कांपे
ज्याचें चरित्र पढतां भवताप लोपे ॥३॥
ऐशी समाधि हरि देउनि भक्तराया
स्थापोनि कीर्ति अपुली स्वजना तराया ।
आरूढला गरुड केवळ भक्त खांदीं
ज्यातें सुरासुर मुखें स्तविताति बंदी ॥४॥
सोळासहस्र तरुणी निजपट्टराणी
ते उद्धवादि हरिदास महाविमानीं ।
ब्रह्मादि देव सुरपन्नगकिन्नरांशीं
आले ऋषीश्वर समस्तहि पंढरीसी ॥५॥
भीमाचि ते निरखिली वर चंद्रभागा
वैकुंठसाम्य पुरि पंढरि पापभंगा ।
श्रीमल्लिकार्जुन सदाशिव जेथ नांदे
त्या देखतां नमिति निर्जर सुप्रमोदें ॥६॥

त्या राउळीं परम सुंदर वीट जेथें
श्रीपांडुरंग निवसे सुखधाम तेथें ।
संपूर्ण भक्त करितां पददर्शनातें
संतोष पार न दिसेचि जयां मनातें ॥७॥
त्यानंतरें निरखिलें सकळांसि देवें
जे बद्धहस्त परितिष्ठति सर्व सेवे ।
आज्ञा दिल्ही ह्मणतसे अपुल्या स्थळातें
जावें सुखें बहुत तोष दिल्हा अम्हातें ॥८॥
आलां तुम्ही सकळ या क्षितिमंडळातें
मत्कारणीं निरखिलें अति उत्सवातें
ऐसें वदोनि सकळांप्रति दिव्य पानें ।
वांटी विडे निजकरें अपुल्याचि मानें ॥९॥
बोलाविले प्रथम भक्त विकुंठवासी
प्रल्हाद—पुंडलिक मुख्य—महत्तमांसी ।
त्यानंतरें विधिसमेत सुरां समस्तां
तैं गौरवोनि हरि पाठवि लोककर्ता ॥१०॥
इंद्रादि देव मग दिक्पति स्वर्गवासी
जाती विमान वळघोनि महाविलासी ।
जाती ऋषी सकळही मग योगपंथें
ते संत सिद्ध सनकादिक मुख्य तेथें ॥११॥
ते नारदादि दृढभक्त नमोनि गेले
गंधर्वगुह्यकसुरासुर तैं मिळाले ।
ते अप्सरादिगण वंदुनि देवदेवा
जाती सतोष निलया कृतदेवसेवा ॥ १२ ॥
शेषादि पन्नगकुळें अतळादि लोकां
गेले नसे कलिमलादिक मृत्युधोका ।
ते मानवी बहुत भक्त नमोनि पायीं
जाती स्वदेश—निलया सुटले अपायीं ॥ १३ ॥
नामा स्वपुत्रसह सान्निध नित्यकाळीं
राहे समीप हरिच्या अतिप्रेमशाली ।
गावोनि नाचुनि करी हरिकीर्तनातें
जो नित्यकाळ रिझवी हरिच्या मनातें ॥ १४ ॥

तैसाच भागवत तो परसा विनोदें
नाचे सदां हरिपुढें निजभक्तिमोदें ।
जे नित्य सन्निध न सोडिति पादपद्मा
जे एकही निमिष नेणति देहसद्मा ॥ १५ ॥
ते राहिले सकळ पंढरपूरवासी
जे नित्यकाळ भजती विभुविठ्ठलासी ।
गेले स्वकीयनिलयासि त्रिलोकवासी
जे मीनले सकळ निर्जर उत्सवासी ॥१६॥
ऐसा महोत्सव अपूर्व करोनि देवें
सत्कीर्तिघोष राचिला जगिं वासुदेवें ।
हे नामदेव कविता रसिका अभंगीं
होती पुरातन सुधासम साधुसंगीं ॥१७॥
ते श्लोकरूप रचिली हरि अंतरात्मा
प्रेरीतसे ह्मणुनियां निजबुद्धिसीमा ।
मी काय मूढमति वर्णिन दैवयोगें
हें सांग सर्व रचिलें विभु पांडुरंगें ॥१८॥

## उपसंहार.

श्रीनामदेवकृत मुख्य प्रबंध होता
तैसाचि म्यां विरचिला सुखबोधदाता ।
मी बोलिलों पदरिची तरि एक वाणी
नाहींच, साक्ष हरि विठ्ठल चक्रपाणी ॥१९॥
या कारणें सकळसंतजनीं महंतीं
हें आदरें परिसिजे करुणावसंतीं ।
मी दीन जाणुनि शुकोक्तिसमान कीजे
जे दुष्टबुद्धि मतिहीन तयां न दीजे ॥ २० ॥
श्री ज्ञानेश्वर तो निवृत्ति सुखदा सोपानमुक्तापदीं
मी साष्टांग नमीतसें पुरनपी तोषें सदा पूर्णधी ।
देवा मी तुमच्या प्रसादविभवें हा ग्रंथसिंधू बरा
झालों पार कृपा तरीं वळघलों मी धन्य लोकीं खरा ॥ २१ ॥
आतां हा अतिमान्य सर्व जगतीं होयील ऐसें करा
सेवा घेउनियां प्रसिद्ध घडवा लोकांत या किंकरा ।
माझी हे विनती असी विलसते सद्भाविकां तारणी

झाली हो तुमची सुकीर्ति सुगमा सद्बोधमंदाकिनी ।। २२ ।।
श्रीमद्विठ्ठलपादपंकजयुगा हे गद्यपद्यात्मिका
माला दिव्य समर्पिली कमलजा सद्भक्त हो आयका ।
यींचा तो मकरंद पुष्टिद असे जो भाविकां षट्पदां
येथें काव्यकलाकलाप विलसे सौरभ्य घ्या सर्वदां ।। २३ ।।
श्रीमन्माधवपंडितेंद्रतनयें भागीरथीनंदनें
विश्वामित्रकुळाब्धिशीतकिरणें सत्सौख्यदें चंदनें
केला ग्रंथ निरंजनें कविवरें संतांचिया तोषणा
वाचा श्रेष्ठ कृपा करोनि सकळीं मानोनि मद्भाषणा ॥ २४
नोहे मत्पुरुषार्थ काव्यरचनीं श्रीविठ्ठलें अंतरीं
केला बैसुनि हा प्रबंध बरवा तैं चालिली वैखरी
श्रीज्ञानेश्वरभक्तराजमहिमा लोकत्रयाच्या हिता
योजी दीनजनोद्धरार्थ परिसा नोहे फुकाची कथा ।। २५ ॥
हे धर्मार्थसमस्तकाम पुरवी वाचोनि निष्ठा धरी
ऐशा या सुजनांसि सत्य घडली वैकुंठिची पायरी
जावें ज्याप्रति वाटतें हरिपदा तेणें सुखें घेयिजे
हा मोहार्णव एकदांचि सुजनीं या जाहजें लंघिजे ॥ २६ ॥
हे तों श्लोक असे जनांसि दिसती नोहेत चिंतामणी
हे तों केवळ कल्पपादपफळें हे सांडलीं मेदिनी
हे वाणी सुरभी निजामृतरसें सर्वांजनां तोषवी
यासाठीं सुजनीं अवश्य करुनी प्रेमें धरावी जिवीं ।। २७ ।।
वाक्पुष्पें हरिपादपंकजयुगीं लक्षावळी वाहिली
वाग्रत्नें रसनाख्यदिव्यपरळीं दीपप्रभा दाविली
किंवा सोज्वळ फुल्ल पद्यकमळें म्यां अर्पिली श्रीधरा
केलें काव्यसुधारसें स्नपन त्या सर्वाद्यसर्वेश्वरा ।। २८ ।।
हें झालें गुरुसेवनीं फळ मला सच्छास्त्र जें पाहिलें
त्याच्या पूर्णनिदर्शनार्थ हरिनें प्रत्यक्षता दाविलें
या कीं मूढमतीमुखें वदविलें आख्यान लोकत्रया
देतें पूर्ण मना चमत्कृति असी श्रीविठ्ठलाची दया ।। २९ ।।
श्रीलक्ष्मीधरबापदेवचरणीं मच्चित हें वेधलें
तेव्हां श्रीहरिभक्तिनामक मला सद्रत्न हें साधलें
आहे स्पर्शमणीच ग्रंथ समजा तात्काळ मोठया जडा

कर्ता कांचन हा विचित्र महिमा पाहा तुम्ही रोकडा ॥ ३० ॥
स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके सप्ताष्टषट्चंद्रमा
शोभे पार्थिवनामवत्सर बरा जो प्रेयसर्वोत्तमा
तन्मध्यें तरि उत्तरायण असे हे फाल्गुनी पंचमी
पक्षीं शुक्ल विशेष आणि कमलावारीं महाउत्तमीं ॥ ३१ ॥
झाला ग्रंथ विचित्र पुण्यनगरीं पुण्यें गुरूच्या असा
पुण्यानें घडला पुरातनकृता आला कळों भर्वसा ।
हा तों पुण्यवतांसि योग्य विलसे वाचावयाकारणें
निंदा पुण्यजनींच यास करिजे उन्मत्त वाणी मनें ॥ ३२ ॥
श्रीज्ञानेश्वर श्रीनिवृत्ति तिसरा सोपान तो सद्गुरू
तींघेही मिळतां प्रयाग ह्मणिजे अत्यंत तीर्थेश्वरू ।
मुक्तायी मणिकर्णिका विलसते काशी अळंदीपुरी
इंद्राणी सकळाघसंघशमनी भागीरथी दूसरी ॥ ३३ ॥
या तीर्थाहुनि अन्यतीर्थ नलगे मानेचिया या मना
माझी ही परिपूर्ण आजि घडली येथेंचि ते कामना ।
क्षेत्रन्यास करोनि चित्त बसलें माझें अळंकापुरीं
आतां मोक्ष उदार देयिल मला ज्ञानेश्वर श्रीहरी ॥ ३४ ॥
हा सत्यव्रत हा परात्पर गुरू हा दीनबंधू असे
हा लोकोत्तर हा यशोनिधि पहा लोकत्रयीं उल्लसे ।
यासाठीं दृढ पादपद्म धरितां प्रेमें बनाजी कवी
केला मान्य जगांत या मिरविला हीनास्त जैसा रवी ॥ ३५ ॥

**इतिश्रीमत्कविकुलतिलकयोगीनिरंजनविरचित श्रीज्ञानेश्वरविजय-महाकाव्ये समाधिवर्णने मोक्षप्रदोनाम द्वादशोध्यायः ॥ संपूर्ण सद्गुरुचरितं श्रीसुंदरकृष्णार्पणमस्तुः ॥**

॥ श्रीरस्तु । शुभं भवतु ॥

समाधीचे श्लोक ८०९ आदीचे श्लोक २१८ सर्व १०२७ +३=१०३०

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ). हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्यपाठांतलें होऊन बसलें आहे धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें. ०१२

२ **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही दुसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४

५. **आनंदलहरीः**—(कवितासंग्रह) ह्यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८ व्ही.पी. नें ०११

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४

८. **निरंजनमाधवांची कविता**:—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीभागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

# पांगारकरांचीं पुस्तकें


११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५

१२–१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध (भाग १-२):–किं. प्रत्येकीं रु १०८

१४ मोरोपंती वेंचे (दुसरी आवृत्ति):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चारित्रही नवीन दिलें आहे. किं० रु. १०१२.

१५ पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं० ०८.

१६ श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सळा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं० रु० ३.

१७ श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी किं० ०५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्री यांच्या चरित्रासह. किं० ०१०.

१९ मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्याची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १

२० मारुतिउपासना. ( चौथी आवृत्ति ):—किं. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु ४ व्ही. पी. नें. ४०१०.

२२ सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२

२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले. असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २


२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २०८

२५ निरंजन माधवांची कविता ( भाग २ रा ):—किं ०१२

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १८ मास ११ | आषाढ १८४७ जुलै १९२५ | नवें वर्ष ५ वें अंक ७ वा. |



संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्हीपीनें रु. ३८३

मुद्रकः लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.




| | | |
|---|---|---|
| १ | मंगलाचरण ... ... ... ... | १–३ |
| २ | थोरांचा समागम... ... ... ... | ४–५ |
| ३ | अवतारमीमांसा ... ... ... ... | ६–२६ |
| ४ | स्फुट विचार ... ... ... ... | २७–३२ |
| ५ | विवेकसुमनें ... ... ... ... | ३३–३६ |
| ६ | साभिप्राय स्वीकार ... ... ... | ३७–३९ |



## श्रीज्ञानेश्वरमहाराज–चरित्र व ग्रंथविवेचन किं. १८

( दुसरी आवृत्ति )

१ श्रीज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र. २ कुलवृत्तांत व जन्म. ३ गुरुसंप्रदाय. ४ मुंज व वेदशास्त्रमर्यादा. ५ पैठणचे चमत्कार. ६ तीर्थयात्रा–प्रकरण. ७ चांगदेव आणि ज्ञानदेव. ८ समाधिप्रकरण. ९ उपासना आणि गुरुभक्ति. १० ग्रंथविवेचन आणि वेचे व ११ स्तुतिसुमनांजलि. याप्रमाणें अकरा प्रकरणें सदर ग्रंथांत दिलीं आहेतः पृ. सं. २७२.

**१ केसरीः**—" रा. रा. पांगारकर यांच्या या ग्रंथाची भाषा भक्तिरसानें ओथंबलेली व वक्तृत्वपूर्ण आहे. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांचें विवेचन रसभरित आहे."

**२ इंदुप्रकाशः**—" ज्ञानेश्वरमहाराजांचें उदात्त व गंभीर चरित्र रा. पांगारकरांसारख्या श्रद्धावान भागवताकडून लिहिलें जावें हा योग अपूर्व आहे. ग्रंथकारांची प्रेमळता व शोधकपणा ह्या ग्रंथांत ज्यास्त असून विवेचन मोठें मार्मिक आहे. "

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.



## श्लोक.

### वृत्त—स्वागता.

कृष्णमूर्ति हृदयीं जडलीसे, । तत्पदा दृढ मिठी पडलीसे, ॥
विश्व हें सकळ तन्मय जालें, । द्वैतभान अवघेंच उडालें ॥ १ ॥
माय, बाप, कुळगोत, विसांवा, । सोयरा, सजण हाच असावा, ॥
अंतरंग तुज याहुन नाहीं, । हे मना हित विचारुन पाहीं. ॥२॥
कृष्ण, केशव, जनार्दन, नामें । घेत जाय करितां निज कामें. ॥
वासुदेव, घननीळ फुकाचा । सांपडे निधि अनादि सुखाचा. ३
हा भवाब्धि मजला न उलंघे, । धुंडितां विषय मानस लंघे ॥
सांवळा, सगुण; जो अवतारी, । कर्णधार उतरील उतारीं ॥ ४ ॥
सोयरीं सकल, सादर, मित्रें, । व्यर्थ जाण अनुकूल कलत्रें; ॥
चित्त हें न लगतां भगवंतीं । सोडवी कवण येउन अंतीं ? ॥५॥
ज्ञानराज मजला गुरु भेटे, । शोकसागर समग्रहि आटे. ॥
नित्य वोहट पडे ममतेला । ठाव होय चढता समतेला. ॥ ६ ॥
हा भरें मज भवज्वर आला, । ज्ञानराज मज वैद्य मिळाला. ॥
मी उदास विषयांवरि जालों, । सद्गुरू ! शरण तूजच आलों ७
व्यापिलें मज मनोभवरोगें, । जांचलों विषयसंचययोगें. ॥
पादुकाभजनभेषज द्यावें; । सद्गुरू ! यश अमोलिक घ्यावें ८
ओव येति तुझिया स्तवनाचे, । भारती बहुत यास्तव नाचे ॥

वेग जाय मुरडोन मनाचा, । नित्य उत्सव तुझ्या नमनाचा ९
मातलों धनमदें, जगदीशा, । नाठवेशि मज, गोपतिवेषा ॥
वेदवेद्यचरिता, भगवंता । येइं मी शरण तूज अनंता. ॥ १० ॥
पुत्रमित्रपशुबांधवमोहें । नित्य संसृतिसुखांतचि पोहें ॥
नाठवे चरणपंकज तूझें, । सोडवी कवण बंधन माझें ? ॥११॥
झोंबलीच मदनानल–आहे, । रक्षिता कवण आणिक आहे ? ॥
मत्सरें हुरपळे मन माझें, । यास जीवन पदोदक तूझें. ॥ १२ ॥
मोहभैंद भुरळें मज घाली, । वृत्ति हे तुज पराङ्मुख झाली. ॥
घातला दृढ गुणत्रयफांसा, । लाविशी हरि किती मज झांसा? ॥१३॥
कृष्णजी ! परमदीन दयाळा, । पावना, पतितपावनशीला, ॥
सोयऱ्या, सुसखया, रण सोडीं । एक वेळ मज येथुनि सोडीं ॥१४॥
आयके द्विज अजामिळ नांवें, । ज्याजला पतितराज म्हणावें, ॥
उद्धरे निधि अनाचरणाचा, । हा प्रताप तुझिया चरणांचा ॥१५॥
रूप हें सहज सुंदर तूझें । नोळखे हृदय पामर माझें ॥
हें निरर्थक भरे बहु हांवे; । या अनित्य विषयांवरि धांवे ॥१६॥
कोटि जन्म जपतां तुजला रे, । लाधसी अवचिता मजला रे. ॥
सांपडेस निज संचित ठेवा, । कोण यावरि विसंबिल देवा ? ॥१७॥
निद्रितास मज जागृत केलें, । हातिचें सकल संचित नेलें. ॥
तोडिलें सकल बंधन, बापा, । कोण हे हरि तुझी अनुकंपा ॥१८॥
खेळ हा सकल मोडुन नेला, । थोर त्वां मज अनुग्रह केला; ॥
दावणीहुनि सुटे पशु जैसा । होय मी सहज मुक्तच तैसा ॥१९॥
नित्य संसृतिभयें सुखदुःखें । देखिलीं विविधरूप अनेकें. ॥
सोडवीं त्वरित, यादवराजा. । गुंतसी कवणिया निजकाजा ? ॥२०॥
तूजवीण मन पांगुळ जालें, । आंधळेपण मतीसहि आलें. ॥
ऊचलून कडिये मज घेईं, । कृष्णरूपजननी ! स्तन देईं ॥ २१ ॥

तूं असोनि जननी कनवाळू, । मी तुझें परमबाळ भुकाळू, ॥
काय होय अतिवोरस तूझा । प्राण जाय तुजवांचुन माझा ॥२२॥
मी विषण्ण विलपें परदेशीं, । तूं कसें मज अनुत्तर देशी ? ॥
वत्सले ! त्यजुनि बाळक तान्हा । काय हा पळविशी निज पान्हा ?
बाळकें रुसतसे जननीसीं । काय माय रुसते परि त्यासीं ? ॥
वासुरा त्यजुन गाय खडाणी । काय जाय पशुजाति अडाणी ?
श्वापदांत भयभीत वराकी । काय हे हरिणि पाडस टाकी ? ॥
चारया जरि विहंगिणि जाते, । ते फिरोन पिलियांप्रति येते. ॥२५॥
कोरडें मुख पडे बहु माझें । न द्रवे अझुनि मानस तूझें. ॥
म्यां किती तरि हरी ! विलपावें ? । कोण काळ तरि तारिल पावें.
कंठ हा गहिंवरें बहु दाटे, । लावि सत्वर मला निज वाटे. ॥
पंथ हा जरि तुझा उमगावा । पाश हा तरिच, रे ! उगवावा. ॥२७॥
हा हरिस्तव पढे जन जो कीं ! । तो कृतार्थ म्हणवी नर लोकीं ॥
प्रेमपात्र हरिचें बहु व्हावा; । संसृतिश्रम तयास न व्हावा. ॥२८॥

—सामराजकृत रुक्मिणीस्वयंवर.

---

पृ. सं. ३२० सार्थ व सभाष्य किं. ०१२

# मनोबोध उर्फ मनाचे श्लोक.

प्रकाशकः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

श्रीसमर्थ रामदासस्वामींचे मनाचे श्लोक सर्व लोकप्रिय आहेत. हे दिसतात तितके सोपे नाहींत. श्रीदासबोध, व समार्थांची सर्व कविता यांत प्रगट झालेल्या तत्वज्ञानाच्या अंतर्मुख दृष्टीनें ते लावले पाहिजेत व तसे ते येथें लावले आहेत. पदाचा अर्थ न सोडतां व संदर्भ व कथानकें देऊन अर्थविवरण केलें आहे. प्रथम प्रस्तावनेंत श्लोकांचा प्रसंग, मनाचें स्वरूप व श्लोकसंगति दिली आहे व श्लोक समन्वयानें लावले आहेत.

खिशांत ठेवण्या सारखा आकार, कागद ग्लेज.

पृ. सं. ३२० किंमत बारा आणे.

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# थोरांचा समागम.

१ शांतवृत्ति दाखविणारा शत्रु व शीघ्रकोपी मित्र हे दोघे सारखेच तापदायक होत. —एडमंड बर्क.

२ वादविवादांत विकारवशतेमुळें प्रगट झालेले सारे शब्दसमूह तेवढे वगळावेत. —सर थॉमस ब्राऊन.

३ मनोविकार हे ओढ्यांसारखे आहेत; उथळ असतात त्यांना खळखळाट असतो, खोल असतात तें गंभीरपणामुळें प्रगट दिसत नाहींत.

—सर वाल्टर रॅले.

४ विवेकवाणी ही आत्मारामाची व विकारवाणी ही देहाची. ह्या दोन भाषा भिन्न असून त्यांत पुष्कळ वेळां विरोध असतो हें आश्चर्यकारक नाहीं.

—रूसो.

५ नव्या काळाचे प्रवर्तक वीर आपलें अंतःकरण तपासतील तर त्यांना सुद्धां आपल्या अंतरात्म्यावर जुन्या काळांतील विचारांचें साम्राज्य अद्याप चालूच आहे असें आढळून येईल. —हीने.

६ तुह्मी जन्मण्यापूर्वी काय काय घडामोडी झाल्या आहेत हें न कळणें ह्मणजे सतत बाळ राहणेंच होय. कारण वर्तमान गोष्टींची भूतपूर्व गोष्टींशीं सांखळी जोडतां आली नाहीं तर त्या जगण्यांत अर्थच काय आहे? —सिसरो.

७ परमेश्वर रागावलेला दिसला तरी त्याचे पोटांत करुणा आहे हें विसरूं नका. —काउपर.

८ माझें चरित्र वैभवसंपन्न कसें होईल असें सिसरोनें एकदा कौल लावून देवास विचारलें असतां त्याला उत्तर मिळालें कीं 'लोकमताच्या छंदानें न वागतां तूं आपल्या स्वबुद्धीनें वाग कीं निश्चित यश मिळेल' —प्लूटार्क.

सत्य असत्यासी मन केलें ग्वाही ।
विचारिलें नाहीं बहुमता ॥ १ ॥ —तुकाराम.

९ म्हाताऱ्या आजीबाईसारखी जनता ही नेहमीं कुरकुर करीत राहायचीच!

—कार्लाईल.

१० लोकांचें तुम्ही महान् स्वार्थत्याग करून हित केलेंत कीं कृतज्ञता पिसासारखी हलकी होते व तुम्ही चूक करून त्यांचें थोडें नुकसान झालें कीं लोकांचा रोष हा लोखंडाच्या रुळासारखा असह्य होतो. —प्लूटस.

११ आपल्या ग्रंथांतले उतारे दुसऱ्या विद्वान माणसानें आदरानें उद्धृत

केलेले पाहून ग्रंथकारास जें समाधान होतें तें किंवा तितकें दुसऱ्या कशानेंही होत नाहीं ! —बी. फ्रांकलिन.

१२ मी आपल्या शत्रूंच्या भाग्याचा हेवा करण्यापेक्षां शत्रूंनीं माझा हेवा करावा हें मला आवडतें, कां कीं दुसऱ्याचें बरें आहे व आपलें नाहीं असा मत्सर वाटणें हें करंट्याचें लक्षण आहे ! —प्लॉटस.

१३ बिकट प्रश्न सोडविण्यांत गुंतलेल्या पुरुषांनीं आपलें चित्त द्वेष, मित्रत्व ( स्नेह ), राग व ममता ह्या विकारांपासून अलिप्त राखलें पाहिजे.

—सॅलस्ट.

१४ सर्व पदार्थ दिसतात त्यापेक्षा कमी भयंकर असतात. —वर्डस्वर्थ.

१५ प्रत्यक्ष अंगावर येऊन आदळलेल्या अनेक दुःखप्रसंगांतून तूं उत्तीर्ण झाला आहेस, पण जीं दुःख संकटें कधीं उद्भवलींच नाहींत त्यांच्या कल्पनेनें तूं किती अधिक दुःखें भोगलीं आहेस ! —इमरसन.

१६ गत दुःखांचें विस्मरण ठेव, आगामी दुःखें टाळण्याचे उपाय योजून तयार रहा. —वेब्स्टर.

१७ बापाचें मन वेधील असा तो मुलगा नव्हता, पण तो माझा मुलगा होता, माझा एकुलता एक पुत्र होता, माझें तें अपत्य होतें ! —जोना बेली.

१८ मी दीन आहें, मजजवळ स्तुति करायला शब्दही नाहीं !

—शेक्सपीअर.

१९ मुख्य तत्वाच्या गोष्टींत ऐक्य, संशयास्पद गोष्टींत मतस्वातंत्र्य, व सर्वच गोष्टींत सहनशीलता हवी.

२० तुमचीं पुष्कळशीं दुःखें काल्पनिक असतात, ह्मणून त्यांपासून तुम्हांला आपली सुटका करून घेतां येणें सुलभ आहे ! —मार्कस ऑरिलस.

२१ आश्चर्य हें तत्ववेत्त्याचें ब्रीद आहे. तत्वज्ञानाचा उगम आश्चर्यापासून आहे असें साक्रेटीस म्हणे. —प्लेटो.

---


# मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—ल. रा. पांगारकर, बी. ए.

बी. ए.च्या परीक्षेला मुंबई युनिव्हर्सिटीनें नेमलें आहे.

सदर ग्रंथाच्या प्रति पुष्कळ वर्षें आमच्या आम्हांसच उपलब्ध होत नव्हत्या. त्या नुकत्याच मुंबईस एका बुकसेलरकडून मिळाल्या रा. पांगारकर यांच्या ग्रंथाचे सेटस् पुरे करण्यास ज्यास पाहिजे असतील त्यांनीं व बी. ए. च्या विद्यार्थ्यांनीं तावडतोब मागणी करावी. ग्रंथ दुर्मीळ आहे. पृ. स. ६२० किं. रु. २॥८ ट. ख. वेगळा ०।१०.

पत्ताः—व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें.

श्री पांडुरंग प्रसन्न.

# अवतारमीमांसा.

( लेखक—धुंडिराज रामचंद्र महाराज, सं. देगलूर. )

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥
तैंसा अमूर्तचि मी किरीटी । परी प्रकृति जैं अधिष्ठीं ।
तैं साकारपणें नटनटीं । कार्यालागीं ॥ ४८ ॥

ज्ञानेश्वरी अ० ४.

१ अतिशय आश्चर्य आहे कीं ज्या भारतवर्षांतील विद्येचा अभ्यास जर्मनी, यूरोप, अमेरिका इ० इ० दूर दूर देशांत रहाणारे विद्वान् अत्यंत आस्थेनें करूं लागले आहेत परंतु तिचा अद्यापि त्यांना अंत लागला नाहीं; तसेंच ज्या भारतीय ऋषिप्रणीत ग्रंथांचीं शेंकडों बुद्धिमान् आपापल्या भाषेंत भाषांतरें करूं लागले आहेत, परंतु दर्शनशास्त्रांच्या सांकेतिक शब्दांचा अर्थ योग्य रीतीनें न करितां आल्यामुळें ते न्यायादि शास्त्रांच्या रूपांतराविषयीं असमर्थ झाले आहेत, त्याच भारतवर्षांत आज असा एक विपरीत काल प्राप्त झाला आहे कीं जातिभेद, आश्रमभेद, विवाह, मूर्तिपूजा, श्राद्ध, तीर्थयात्रा, अवतार इ० इ० ( कीं जे पूर्वी सर्वांच्या व आजही कित्येक सुज्ञांच्या सदैव आचरणांत आहेत ) अशा परमपूज्य व जगप्रसिद्ध विषयासंबंधीं पंडितंमन्य म्हणविणाऱ्या आर्यपुत्रांच्याच अंतःकरणांत अनेक शंकाकुशंकांचा प्रादुर्भाव होऊं लागला आहे !

२ ज्या आर्यसंस्कृत्यंतर्गत जातिसंस्था, आश्रमसंस्था, विवाहसंस्था, श्राद्ध, अवतार, तीर्थयात्रा इ० इ० पवित्र कार्यांतील गूढ तत्वांचें कोडें उलगडल्यामुळें पाश्चात्यांना आपली स्वतःची ( पाश्चात्यांची ) संस्कृति क्षुद्र आहे—आम्ही या विषयांत मागासलेले आहों व म्हणून हतभागी आहों असें वाटूं लागलें आहे, त्याच आर्य संस्कृतीमध्यें उत्पन्न झालेल्या आर्यपुत्रांनीं ( कांहीं क्षुद्र कारणांनीं ) आपल्या उच्चतम पवित्र संस्कृतीची विटंबना करावी, यापेक्षां आणखी कोणती अवनति असेल असें मला वाटत नाहीं.

असो. ह्या अनेकशा धार्मिक विषयांतून शंकानिरसनार्थ आज ‘ अवतार ’ या विषयासंबंधींच विचार कर्तव्य आहे, म्हणून आपण याच विषयाकडे वळूं.

३ साधारणपणें ' अवतार ' या विषयाविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें बऱ्याच शंका उपस्थित होतातः—( १ ) सर्वज्ञ व सर्व शक्तिमान् परमेश्वरास अवतार घेण्याची काय आवश्यकता आहे ?

( २ ) सर्वव्यापक परमेश्वराचें अल्प परिमाणानें परिच्छिन्नत्व कसें संभवतें ?

( ३ ) अलौकिक लीलाविशिष्ट परमेश्वरास लौकिक मानवलीला कशा शोभतात ?

( ४ ) ईश्वरअवतार हा उच्च मानवरूपांत कांहीं तरी शोभतो पण तिर्यग्योनीमध्येंही तो शोभतो काय ?

( ५ ) अवतारामध्यें प्राकृत जीवांपेक्षां वैलक्षण्य काय आहे ?

( ६ ) पूर्ण अवतार व अंश अवतार यांत काय भेद आहे ?

( ७ ) परमेश्वराचीं अवतारशरीरें पांचभौतिक असतात किंवा अपांचभौतिक—अलौकिक असतात ?

ह्या वरील प्रश्नांपैकीं एकएकाचा आतां आपण विचार करूं.

४ पहिला प्रश्न हा आहे कीं, ईश्वर सर्वथा पूर्णकाम व सर्वशक्तिसंपन्न आहे, ह्मणून त्यास अवतार घेण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं; कारण, " प्रयोजनमनुद्दिश्य न मंदोऽपि प्रवर्तते " ( कारणावांचून मूर्ख सुद्धां कोणत्याही कर्मामध्यें प्रवृत्त होत नाहीं ). शिवाय " अर्के चेन्मधु विन्देत किमर्थं पर्वतं व्रजेत " ( घरींच जर मध मिळतो तर पर्वतावर जाण्याचें काय कारण ? ) या न्यायानें सर्वशक्तिमत्त्वामुळें त्यास कांहींच अशक्य नाहीं ह्मणून ईश्वर अवतार धारण करितो हें ह्मणणेंच खोटें आहे.

या प्रश्नाचें उत्तर देतांना आरंभीं हा विचार करणें अवश्य आहे कीं, सर्वथा पूर्णकाम सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याचें काय अडलें होतें कीं, त्यानें ही चराचरात्मक सृष्टी उत्पन्न केली व कोणत्या कारणानें त्यानें हें इंद्रजाल रचून त्याचें नियंतृत्व आपले शिरावर घेतलें ? या प्रश्नासंबंधी विचार करितांना जितके सेश्वरवादी आहेत, ते सर्व एकच उत्तर देतात कीं, ही सर्व ' भगवल्लीला ' आहे. हा सर्व त्या जगन्नियन्त्याचा विलास आहे. कारण, सर्व प्रमाणशिरोभूत उपनिषदांमध्येंही रमणेच्छा अर्थात् लीलाच सांगितली आहे. जसें बृहदारण्यक ब्राह्मणः—

" सवै नैव रेमे तस्मादेकाकी न रमते स द्वितीयमैच्छत् "

म्हणून ज्या पूर्णकाम षडैश्वर्यसंपन्न जगदीश्वरानें अनेककोटिब्रम्हांडरचना जर केवल लीलेनेंच केली, तर लीलेस्तवच तो अवतार धारण करितो

असें विधान करणें अप्रस्तुत होणार नाहीं. तसेंच पूर्वाचार्यांनीही अवताराचें हेंच कारण दर्शित केलें आहे.

'श्रीमद्भागवत गर्भस्तुति'–सर्व देव म्हणतातः—"न ते भवस्येश भवस्य कारणं विना विनोदं बत तर्कयामहे" ॥ किंवा "क्रीडनेनेह देहभाक्" ॥ तसेंच अक्रूर म्हणतो "यानि यानीह रूपाणि क्रीडनार्थं बिभर्षि हि"

(भागवत स्कं. १०–४०)

विष्णुपुराणांतही स्पष्टपणें हेंच दर्शित केलें आहे.

मनुष्यधर्मशीलस्य लीला सा जगतःपतेः ।
अस्त्राण्यनेकरूपाणि यदरातिषु मुञ्चति ॥ १ ॥
मनसैव जगत्सृष्टिं संहारं च करोति यः ॥
तस्यारिपक्षक्षपणे कोऽयमुद्यमविस्तरः ॥ २ ॥
तथापि यो मनुष्याणां धर्मस्तमनुवर्तते ॥
कुर्वन्बलवतां संधिं हीनैर्युद्धं करोत्यसौ ॥ ३ ॥
सामं चोपप्रदानं च तथा भेदं प्रदर्शयन् ॥
करोति दंडपातं च क्वचिदेव पलायनम् ॥ ४ ॥
मनुष्यदेहिनां चेष्टामित्येवमनुवर्ततः ॥
लीला जगत्पतेस्तस्य छंदसः संप्रवर्तते ॥

(विष्णुपुराण अंश ५ अध्या० २२)

भावार्थ—मानवधर्माचें अनुकरण करणाऱ्या भगवंताची ही लीला आहे. तो नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें आपल्या शत्रूंवर फेंकतो. वास्तविक जो मनानेंच सृष्टीची उत्पत्ति व संहार करितो, त्यास शत्रूंच्या पराभवाकरितां खटपटीची काय आवश्यकता ? परंतु मानवधर्माचा अंगीकार केल्यामुळें मनुष्यस्वभावानुसार बलवानांशीं तह व निर्बलाशीं युद्ध, व कार्यप्रसंगीं साम, दाम, दंड, भेद करणें व केव्हां रणांतून पाठ सुद्धां फिरविणें मनुष्यांचें अनुकरण करणाऱ्या परमेश्वराची ही लीलाच आहे !

ह्या अवतारांना लीलामूलकत्व असूनही ह्यांत आणखी तीन उद्देश दृष्टिगोचर होतात.

(१) दुष्टदमनपूर्वक सत्पुरुषांचें रक्षण.

(२) धर्माचें रक्षणपूर्वक जगताचें मंगल.

(३) सगुणलीलाद्वारां तत्कालीन व भावी उपासकांचें सौकर्यसाधन.

प्रथमोद्देशाविषयीं श्रीकृष्ण भगवान् अर्जुनास सांगतात.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्॥ तेवेळीं आपुल्याचेनि कैवारें। मी साकार होऊनि अवतरें । मग अज्ञानाचें आंधारें । गिळूनि घालीं ॥ दैत्यांचीं कुळें नाशीं । साधूंचा मान गिंवसीं ॥ गी. अ. ४

॥ गोविप्रसुरसाधूनां छंदसामपि चेश्वरः ॥
॥ रक्षामिच्छंस्तनूर्धत्ते धर्मस्यार्थस्य चैवहि ॥

श्रीमद्भागवत ८-२४-५

श्रीकृष्ण भगवान् देवकीगर्भांत असतांना सर्व देव स्तुति करितात. बिभर्षि रूपाण्यवबोध आत्मा क्षेमाय लोकस्य चराचरस्य । सत्वोपपन्नानि सुखावहानि सतामभद्राणि मुहुः खलानाम् ॥ ( स्कंध १०–२–२९ ) ब्रम्हदेव काल्याचें प्रसंगीं ह्मणतातः—स्कं. १०–२–२९ सुरेष्वृषिष्वीश तथैवनृष्वपि तिर्यक्षु यादस्स्वपि तेऽजनस्य । जन्मासतां दुर्मदनिग्रहाय । प्रभो विधातः सदनुग्रहाय च ॥

श्रीकविश्रेष्ठ तुलसीदासजी म्हणतातः—

करहिं अनीति जायनहिं बरणी । सीदहि विप्र धेनु सुर धरणा ॥ १ ॥ तबतब प्रभुधर विविध शरीरा ॥ हरहि कृपानिधि सज्जन पीरा ॥ २ ॥

असुर मार थापहि सुरहिं, राखहि निजश्रुति सेतु ॥
जगविस्तारहि विशदयश, रामजन्मकर हेतु ॥ ३ ॥

ह्या वचनांचे हेंच तात्पर्य आहे कीं दुष्टांचें दमनपूर्वक सत्पुरुषांच्या रक्षणाकरितांच प्रभूचा अवतार आहे.

आतां दुसरा उद्देश म्ह. सत्यधर्माचें रक्षणपूर्वक जगन्मंगल याविषयीं श्रीकृष्ण म्हणतातः—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
जे धर्मजात आघवें । युगायुगीं त्या रक्षावें ।
ऐसा ओघ हा स्वभावें । आद्य असे ॥

म्हणोनि अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्त पणही नाठवीं । जेवेळीं धर्मातें अभिभवी । अधर्म हा. गी. अ. ४–७

समूळ धर्माची वाढी मोडे । अधर्माची शीग चढे ॥
तैं तुज अवतार धरणें घडे । आमुचें सांकडें फेडावया ॥
करोनि अधर्माचा घातु । धर्म वाढविसी स्वस्थु ॥

एकनाथी भागवत अ० ६-८०

॥ धर्म स्थापावया । येथें येसी देवराया ॥ १ ॥　　नामदेव.
॥ धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥　　गी० ४

'धर्मस्यार्थस्य चैव हि' जगत्कल्याणार्थ भगवंताचा अवतार आहे असें सर्व देव म्हणतात.

मत्स्याश्वकच्छपनृसिंहवराहहंस । राजन्यविप्रविबुधेषु कृतावतारः ।
त्वं पासि नस्त्रिभुवनं च यथाधुनेश । भारं भुवो हर यदूत्तम वंदनं ते ॥
भागवत. १०-२-४०

कृष्णमेनमवेहि त्वमात्मानमखिलात्मनां ॥
जगद्धिताय सोप्यत्र देहीवाभाति मायया ॥　　स्कं १०—१४—५५

आतां तिसरा उद्देश म्ह० सगुणोपासनाद्वारां तत्कालीन व भावी भक्तांना "तुका म्हणे सगुण भोळ्याभाविका" या न्यायानें अवतार हें सुलभ साधन आहे. याविषयीं विचार करूं.

कृष्णावतारकालीं व्रजवासी गोपाल, गोपिका, नंदयशोदा इत्यादिक श्रीकृष्णपरमात्म्याच्या समागमानेंच मुक्त झाले होते. याबद्दल ब्रह्मदेवाचीच साक्ष आहे. तो म्हणतोः—

अहो भाग्यमहो भाग्यं नंदगोपव्रजौकसाम् ।
यन्मित्रं परमानंदं पूर्णं ब्रह्म सनातनम् ॥३२॥श्रीमद्भागवत १०—१४

आतां आमच्या भरतखंडांत जन्मलेला प्रत्येक श्रद्धालु साधक आपण या दुस्तर संसारसागरांतून तरून जाऊन मुक्त व्हावें, किंवा आपणास देवाची भेट व्हावी अशी इच्छा धारण करीत असतो, व स्वेच्छेनुसार तो सुगम मार्गाचा शोधही करीत असतो. अशा जिज्ञासूंकरितां प्राचीन नारद, व्यास, शुक, शांडिल्य, गर्ग, प्रल्हाद इत्यादिकांनीं व अर्वाचीन शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इ० इ० संत मंडळींनीं अवतारचरित्रांचें श्रवण, मनन, कीर्तन, स्मरण, इ० सदैव करीत राहणें हाच सुलभ राजमार्ग दर्शविला आहे. महर्षि नारदांनीं स्पष्टच "अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ" असें म्हटल आहे भक्त्याचार्य शांडिल्यानींही "सा मुख्येतरापेक्षितत्वात्" असेंच सांगितलें आहे. प्रल्हाद व व्यासांनींहीं

यानास्थाय नरो राजन्न प्रमाद्येत कर्हिचित् ।
धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥　　भाग० ११—२

विधिनिषेधबाधकरहित श्रेष्ठ "मोडोनियां वाटा सूक्ष्म दुस्तर । केला राज्यभार चाले ऐसा" अशा भागवतधर्माचीच ध्वजा फडकविली आहे.

श्रीमच्छंकराचार्य हीः—

॥ मोक्षसाधनसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी ॥ (विवेकचूडामणि) असेंच म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजही " भक्त्या त्वनन्यया शक्यः " ह्या श्लोकाच्या अवतरणांत ह्मणतातः—

तैसा मी एकेचि परि । आतुडें गा अवधारीं ॥
जैं भक्ती येऊनि वरी । चित्तातें गा ॥ अ. ११ ओ० ८५

श्रीमद्भगवद्गीतेचा सिद्धांतही " मन्मना भव मद्भक्तो " " मय्यर्पितमनोबुद्धिः " " भक्त्या लभ्यस्त्वनन्यया " " तेषामहं समुद्धर्ता " " तेषां सततयुक्तानां " " सर्वधर्मान्परित्यज्य " इ० इ० प्रमाणांवरून हाच ठरतो असें कोणींहीं नाकबूल करून चालणार नाहीं. श्रीतुकोबाराय तर स्पष्टच म्हणतात.

दीन आणि दुर्बळासी । सुखराशी हरिकथा ॥ १ ॥
तारूं भव सागराचें । उंचनीच अधिकारी ॥ २ ॥
चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आवडी धरीं । कृपा करी म्हणवुनि ॥ ४ ॥

एकूण हीच संसार तरून जाण्याची सोपी पायवाट आहे. " तुका म्हणे सोपी केली पायवाट । तरावया भवसागर रे ॥ १ ॥

एथ एकचि लीला तरले । जे सर्व भावें मज भजले ॥
तया ऐलीच थडी सरलें । मायाजळ ॥ ज्ञा० अ० ७ ओ० ९७

ह्या एकंदर वचनांचा निष्कर्ष हाच निघतो कीं भगवत्स्वरूपाचें ठिकाणीं चित्त समर्पण केल्यानें त्याची उपाधी नष्ट होऊन तेंच चैतन्य होऊन जातें. अर्थात्, प्रलयापर्यंत कोणींही जीव अवतारचरित्राविषयीं अनुरक्त राहील तर त्याचा उद्धार झाल्यावांचून रहाणार नाहीं. विचार करून पाहिलें असतां नवविधा भक्तीला आश्रयस्वरूप अवतारच आहेत कृष्णजयन्ति, वामनजयन्ति, नृसिंहजयन्ति, रामनवमी इ० बहुतेक व्रतें सुद्धां अवताराश्रितच आहेत. इतकेंच नव्हे तर अयोध्या, मथुरा, गोकुळवृंदावन, सरयू, यमुना, भागीरथी इ० क्षेत्रें व तीर्थें आणि या तीर्थक्षेत्रांनीं व्यापिलेला आमचा आर्यावर्तसुद्धां अवताराश्रितच आहे. सारांश, भगवंतानें लीलेनेंच ही स्थावरजंगमात्मक सकल सृष्टी निर्माण केली व तदंतर्गत अज्ञ जीवांचा उद्धार करण्याकरितांच अवतार धारण केला. शुकाचार्य रासक्रीडाप्रसंगीं ह्मणतातः—

अनुग्रहाय भूतानां मानुषं देहमास्थितः ॥
भजते तादृशीः क्रीडा याः श्रुत्वा तत्परो भवेत ॥ ३७ ॥
श्रीमद्भागवतस्कंध १०–३४

आणखीही भक्तपरित्राण, दुष्कृतविनाश, धर्मसंस्थापन इ० इ० वरींचशीं दुर्घट कृत्यें केलीं; तस्मात् ईश्वरावतार ही कल्पित कल्पना नसून नितांत सत्यच आहेत. याबद्दल आज सुद्धां पुष्कळशीं प्रत्यक्षादि प्रमाणें उपलब्ध आहेत.

५ आतां आरंभीं दर्शविल्याप्रमाणें दुसरा प्रश्न ह्मणजे सर्वव्यापक परमेश्वराचें अल्प परिमाणानें परिच्छिन्नत्व कसें संभवतें; कारण, परब्रह्म सच्चिदानंद परमात्मा हाच रामकृष्णरूपानें अवतीर्ण होतो म्हटल्यास ह्या अवतारांच्या एकदेशित्वामुळें व्यापक ब्रह्मावर दोष येईल. पण " निर्दोषं हि समं ब्रह्म " असें आहे. करितां याही एका दृष्टीनें परमेश्वर अवतार घेतो हें म्हणणें बाधित होतें. याबद्दल आतां विचार करूं:—

व्यापक वस्तूचा शोध केला असतां

यच्च किंचिज्जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा ॥
अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ॥

या श्रुतीप्रमाणें ब्रह्म हेंच व्यापक आहे. व त्यानंतर, " एतस्मादात्मन-आकाशः संभूतः " या श्रुतिवचनाधारें ( नारायणोपनिषद् ) त्या ब्रह्मापासून उत्पन्न झालेलें आकाशच जास्त व्यापक ठरतें. यद्यपि आकाश व्यापक आहे; तथापि घटाकाश, मठाकाश, इ० इ० उपाधिभेदानें अज्ञांच्या दृष्टीनें तें एकदेशी असें भासतें—परंतु ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीनें आकाशांत कांहींच फरक होत नाहीं. जसें श्रीकृष्ण भगवान म्हणतात.

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ॥
अगा आकाश कें नाहीं । हें न रिघेचि कवणे ठायीं ॥
परि कायिसेनि कहीं । गादिजेना जैसे ॥ २१ ॥ ज्ञा०

त्याप्रमाणें " सत्यज्ञानानंद गगनाचें प्रावर्ण " असा व्यापक परमात्मा हाही कोणच्याही उपाधीनें लिप्त होत नाहीं. म्हणूनच श्रीकृष्ण भगवान् सांगतातः—

सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥
तैसा सर्वत्र सर्व देहीं । आत्मा असतचि असे पाहीं ॥
परि संगदोषें एकेही । लिप्त नोहे ॥ ज्ञानेश्वरी अ० १३—३२

अज्ञांच्या दृष्टीनें अवतारांच्या एकदेशित्वामुळें परमेश्वरावर दोष येत असेल, पण प्रमाणयुक्त नजरेनें पाहिल्यास हा आक्षेप तेंव्हांच फोल ठरेल. ज्या प्राकृत मर्त्य शरीराच्या उपाधानें त्या व्यापकाचें व्यापकत्व नष्ट होत नाहीं, तो परमात्मा दिव्य अवतारामुळेंच सदोष होतो, असें विधान करणें किती गैर आहे हें वाचकांनीच पाहावें.

व्यापकता कायम असूनही अवतारांच्या एकदेशित्वामुळें त्यांत कांहींच फरक होत नाहीं. इतकेंच नव्हे तर अवताररूप प्रधान आकारानें एकदेशांत असूनही श्रीकृष्ण परमात्म्यानें अन्यस्थलीं अनंत रूपें दाखविलीं आहेत. जसें अक्रूरास जलांत अनंतरूपदर्शन, गोपिकासमवेत रासक्रीडाप्रसंगीं अनेक रूपानें क्रीडा करणें इ० इ०, तात्पर्य हें आहे कीं फक्त आकारच अवच्छिन्न होतात किंतु ब्रह्म कांहीं अवच्छिन्न होत नाहीं. कधीं कधीं तर या दिव्य आकारासही तो परमात्मा अंतर्हित करितो. जसें रासलीलाप्रसंगीं--

अंतर्हिते भगवति सहसैव व्रजांगनाः ॥ भा० १०–२० ॥

किंवा ' ततश्चांतर्दधे कृष्णः ' ( श्लो० ३८ ) सर्व गोपिकांचा गर्व परिहार करण्याकरितां श्रीकृष्ण अंतर्धान पावले व पुन्हां ( गर्व दूर झाल्यावर ) प्रगटही झाले.

तासामाविरभूच्छौरिः स्मयमानमुखाम्बुजः ॥

एकूण अवतारांच्या एकदेशित्वामुळें त्या सर्वव्यापक परमेश्वरावर कोणतेंच संकट येत नाहीं.

६ आतां तिसरी शंका ही उद्भवते कीं, तुमच्या म्हणण्याप्रमाणें कदाचित् परमेश्वर अवतारही घेत असेल, पण तो अलौकिक तद्वत त्याच्या लीला गुण-कर्में हीं अलौकिकच असावींत, पण रामकृष्णादि अवतारांच्या चरित्राकडे पाहिलें तर त्यांत हास्य, रडणें, भीति, पलायन, चौर्य इ० इ० मानवलीलाच दृष्टोत्पत्तीस येतात ! परंतु अलौकिकलीलाविशिष्टपरमेश्वरास अशा क्षुद्र मानव लीला शोभत नाहींत म्हणून रामकृष्णादिकांवर ईश्वरत्वाची कल्पना करणेंच चुकीचें आहे !

ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं हा विचार करणें अवश्य आहे कीं परमेश्वरास कोणती लीला शोभते व कोणती शोभत नाहीं, कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुं सर्व-तंत्रस्वतंत्र परमेश्वरास जगदुत्पत्तिस्थितिनाशक लीला जर शोभते तर तदंतर्गत दुसरी अवतारलीला कां शोभूं नये ? कारण परमात्मा जर लीलाच करूं लागेल तर त्यास सर्वच लीला शोभतात, ह्मणून मानवलीला कांहीं परमेश्वराच्या अवतारांस विरोधी नाहीं. भगवान् जर क्रीडे-करितांच त्या शक्तीचा उदय करितील तर त्यांत आश्चर्य काय ? शिवाय जे खऱ्या प्रेमानें जशी त्यांची भक्ती करितील त्या भक्तांकरितां तशींच रूपें धारण करून त्यांचा उद्धार करणें हा त्या भक्तवत्सल प्रभूचा स्वभावच आहे. " यथा यथोपासते तदेव भवति " " ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥ "

येऱ्हवी तरी पाहीं । जे जैसे माझ्या ठायीं ॥
भजती तयां मीहिं । तैसाचि भजें ॥ ज्ञा० अ० ४

नंद यशोदा, वसुदेव देवकी, दशरथ कौसल्या इत्यादिकांनीं तपश्चर्या करून हाच वर मागितला होता कीं, ' महाराज ! तुम्ही आमचे पुत्र व्हा. ' त्याप्रमाणें मानवरूप धारण करून त्यांचे उदरीं जन्म घेणें त्या भगवंतास भाग पडलें. शिवाय अवतारलीलांबद्दल आणखीही तीन कारणें दाखवितां येतील. ( १ ) प्रार्थना. ( २ ) प्रकृति. ( ३ ) इच्छाप्रार्थनेनुसार—नंदादिकांच्या प्रार्थनेवरून जन्म घेणें. गोपिका व इतर भक्तांच्या प्रार्थनेनुसार अनेक लीला करणें. इच्छा—ऋतुग्रामादिकांच्या अपेक्षेवरून अनंत लीला करणें. केवळ जगदुद्धाराची इच्छा बाळगूनच तत्संबंधी कार्यें ( अर्जुन उद्धव इत्यादिकांना तत्वज्ञानोपदेश वगैरे ) करणें. एकूण कांहीं लीला प्रार्थना व इच्छा—यांना अनुसरून व कांहीं प्रकृतीला अनुसरून होतात. प्रकृत्यनुसार—ज्या वेळेस सर्व बाजू जलमय झाल्या आहेत, त्या वेळेस ती प्रकृति किरीटकुंडलादिकांनीं युक्त अशा चतुर्भुज रूपाची इच्छा करीत नाहीं, तर मत्स्यरूपच त्या इच्छेस अनुकूल आहे. ज्या वेळेस जलांत बुडलेल्या मंदरास धारण करण्याची अवश्यकता होती, त्या वेळेस कठिण पृष्ठवान् कूर्मावतारच त्या प्रकृत्यनुसार होय. चिखलांत वुसून पृथ्वीस वर काढण्याकरितां सूकरावतारच योग्य होता. परक्यांचें कांहींही असो पण आमच्यांतील कित्येक आंग्लसंस्पृष्ट लोक म्हणतात, "कसलीं हीं पुराणें व अवतार. काय गप्पा, काय वाडा, काय असंभाव्य गोष्टी त्यात लिहिल्या आहेत. ह्या खऱ्या कोणत्या दृष्टीनें मानाव्या ?" या आक्षेपांस भरपूर उत्तर आंग्ल विदुषी ॲनिबिझांट बाईनें दिलें आहे. तें तसेंच खालीं मराठींत देतों. ती म्हणते " आपण प्रथम पहिल्या तीन अवतारांचाच विचार करूं. हे अवतार पशुयोनींत झालेले आहेत असें वाचतांच आधुनिक ग्रॅज्युएटाच्या मनांत येतें कीं हें काय आश्चर्य आहे ! ईश्वराचे अवतार म्हणावयाचे व ते माशाच्या, कांसवाच्या व डुकराच्या जातीचे ! हा काय बालिश मूर्खपणा ! पाश्चात्य हें वाचून म्हणतात कीं ही केवळ रानटी लोकांची वडबड आहे ! परंतु असलीं मतें टाकून देणें बरें नव्हे. मनुष्यत्वाच्या आकाराबद्दल इतका विलक्षण अभिमान कां ? ईश्वराच्या अनंत कल्पनेंतून निरनिराळ्या युगांत निर्माण झालेल्या योनींमध्यें तुमचीआमची मनुष्ययोनी हीच काय ती श्रेष्ठ असा हट्ट कां ? ईश्वरानें मनुष्ययोनींतच अवतार घ्यावा असा विशेष या देहामध्यें आहे तरी काय ? खनिज पदार्थापासून देवलोकांपर्यंत ईश्वरानें केलेल्या अफाट रचनेचा विचार करितां, ईश्वराच्या मानानें सृष्टींतील प्राणि-

मात्रांमध्यें फरक असला तर तो अत्यल्प आहे, व ईश्वरास सर्व देह सारखेच आहेत. मत्स्यावतार यांत मत्स्ययुगाची कल्पना आहे. या वेळीं मत्स्यरूपानें ईश्वर अवतीर्ण झाला. ही कल्पना इतकी उपहासास्पद नाहीं. मात्र अज्ञदृष्टीनें न पाहतां ज्ञानदृष्टीनें तिचा विचार केला पाहिजे, व अशा दृष्टीनेंच पुराणें वाचलीं तर तीं सत्य आहेत असेंच दिसून येईल. फिरून प्रल्हाद व नृसिंहावतार या संबंधानें बाई म्हणते:—

"Hari, Hari," cried the boy, and the pillar burst asunder and the mighty form came forth and slew the Daitya &c. a story ?–Facts, not fiction; truth, not imagination.

भावार्थ—प्रल्हादानें हरिनामाचा उच्चार करितांच स्तंभ दुभंग होऊन त्यांतून नृसिंह प्रगट झाला व त्यानें दैत्यवध केला. ही काय नुसती काल्पनिक गोष्ट आहे ? नाहीं. ही कादंबरी नाहीं, तर प्रत्यक्ष घडलेली वस्तुस्थिति आहे. ही कल्पना नाहीं, तर भूतार्थ आहे.

एकूण परमेश्वर: प्रकृत्यनुसार पश्वादिकांच्या लीलेपर्यंतही शोभतो तर मानवलीलेंत तो शोभेलच यांत काय संशय ? येथें ही एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, भगवदवतारांच्या लीला, लौकिक व अलौकिक भावानें युक्त असतात. अलौकिक भाव हा अद्भुत रसामध्यें भरलेला असतो. म्हणून त्या अलौकिक भावाच्या प्रागट्यतेनें पहाणाऱ्या व ऐकणाऱ्याच्या हृदयामध्यें अवतारस्वरूपाचें ईश्वरास्तित्व सिद्ध होतें. नंतर जेव्हां भगवान् लौकिकलीलेचा प्रादुर्भाव करितात, तेव्हां कांहीं ईश्वरभावाची छटा त्या लौकिकभावांत मिसळल्यामुळें एक अपूर्व माधुर्य त्यांत येतें. जसें उलूखलबंधन, मुखांत त्रैलोक्यदर्शन इ० दिव्य लीलांचा आनंद अधिकाऱ्याशिवाय कोण भोगूं शकणार ? ह्या अवतारलीलांचें माधुर्य लोकोपकारार्थच आहे. कारण ऐकणारे व सांगणारे लोक सुद्धां तरतात.

> शृण्वन्गृणन्संस्मरयंश्च चिंतयन्नामानि रूपाणि च मंगलानि ते ।
> क्रियासु यस्त्वच्चरणारविंदयोराविष्टचित्तो न भवाय कल्पते ॥ ३७ ॥
>
> श्रीमद्भागवत १०—२.

७ याच विषयांत फिरून एक असा प्रश्न उद्भवतो कीं, ईश्वरावतारामध्यें जीवापेक्षां अधिक सामर्थ्य काय आहे ? कारण, रामकृष्णादिकांच्या अवतारचरित्रांकडे पाहिल्यास हा संशय उत्पन्न होतो कीं ह्या अवतारांमध्यें जीववैलक्षण्य काय आहे ? द्रोण, कृप, भीष्म, कर्णार्जुनादिक जसें अस्त्रविद्येमध्यें निष्णात

होते, तसेच रामलक्ष्मणादिकही होते, जरासंधादिक वीर जसे एकापेक्षां एक बलवान् होते, तसेच श्रीकृष्णही होते; इतकेंच नव्हे तर, श्रीकृष्णापेक्षांही जरासंधादिक जास्त बलवान् होते; कारण श्रीकृष्णास जरासंधापुढें पळून जाणें भाग पडलें. तस्मात् जर प्राकृत जीवापेक्षां जास्त वैलक्षण्य रामकृष्ण इ० अवतारांमध्यें नाहीं, तर त्यांना अवतार मानणेंच व्यर्थ आहे, व जरी मानलें तरी त्या अवतारांस जीवत्व सिद्ध होतें, म्हणून परमेश्वराचें अवतार न घेणेंच सिद्ध होतें.

किंचित् जरी विचारास आपल्या अंतःकरणांत थारा दिला तरीही पण या प्रश्नाची निरर्थकता सहज पटण्याजोगी आहे. विचार केल्यास प्राकृत जीवापेक्षां अनंतपटीनें अवतारांमध्यें वैलक्षण्य पदोपदीं दृष्टिगोचर होईल. श्रीकृष्णांनीं जन्मकाळींच किरीटकुंडलादिकांनीं भूषित अशी आपली चतुर्भुज शामसुंदर मूर्ति वसुदेवदेवकीस दाखविली.

> तमद्भुतं बालकमम्बुजेक्षणं । चतुर्भुजं शंखगदार्युदायुधं ।
> श्रीवत्सलक्ष्मं गलशोभिकौस्तुभं । पीताम्बरं सांद्रपयोदसौभगं ॥ ९ ॥
> महार्ह वैडूर्यकिरीटकुंडलत्विषा परिष्वक्तसहस्रकुंतलम् ।
> उद्दामकांच्यंगदकंकणादिभिर्विरोचमानं वसुदेव ऐक्षत ॥ १० ॥
>
> श्रीमद्भागवत स्कं. १०–३.

अशा प्रकारचें कल्पनातीत वैलक्षण्य रामचंद्र, श्रीकृष्ण, वामन, परशराम, नृसिंह, मत्स्य, इ० इ० अवतारांत असतांना त्यांचेविषयीं जीवसाम्यत्वाची कल्पना करणें किती अनुचित होईल याचा विचार वाचकच करितील.

कारण, असा कोणताही अवतार नाहीं कीं ज्याच्या आदिपासून अंतापर्यंत सर्व चरित्रांत अद्भुतता नाहीं. जसें मत्स्यावताराचें शंखासुरासारख्या बलाढ्य समुद्रतळीं दडून बसलेल्या राक्षसापासून वेद परत आणणें; कच्छावताराचें मंदराचल धारण, वराहाचें पृथ्वीउद्धरण, नृसिंहाचें स्तंभांतून प्रागट्य, मर्यादापुरुषोत्तम रामचंद्राचें सामर्थ्य "रानीचिया पालेखाइरा । नेवाणे करविले लंकेश्वरा" हें सुप्रसिद्धच आहे. हा श्रीकृष्णअवतार तर अद्भुत लीलानिधीच आहे. याजबद्दल श्रीएकनाथमहाराज म्हणतात, "बहुत अवतारीं अवतरला देवो । परि या अवतारींचा नवलावो । देवां नकळे अभिप्रावो । अगम्य पहा हो हरिलीला ॥ १ ॥ ब्रह्म आणि करी चोरी । देवो आणि व्यभिचारी । पुत्र कलत्र आणि ब्रह्मचारी । हेही परी दाखविली ॥

परंतु हा मधुर रस चाखण्याकरितां कुभावना किंवा अश्रद्धादूषित जिव्हा उपयोगी पडणार नाहीं, येरा गबाळांचें हें काम नाहीं ! अधिकाऱ्याशिवाय हें

विमल नितांत सत्य असें गूढ रहस्य दुसऱ्याला समजणें दुर्घट आहे. आजकाल पाश्चात्यांना व तत्संसर्गानें दूषितांतःकरण झालेल्या आमच्या आर्यबांधवांना हें कोडें उलगडत चाललें आहे, हें या भरतखंडाचें भाग्यच समजलें पाहिजे. कारण, रासक्रीडा, गोपीवस्त्रहरण, इ० इ० लीलांमध्यें उद्दाम असा अश्लीलपणा नसून यांतील माधुर्य किंवा रहस्य कांहीं और आहे असें समजूनच पाश्चात्य विदुषी अॅनि बिझांट म्हणतेः—

They came and worshipped and he gave them back their robes. An immoral story, with a child of six as the central figure ! He is spoken of as though he were a full-grown man, insulting the modesty of women.

But there is a profound occult lesson below the story, viz. when the soul is approching the supreme Lord at one great stage of initiation, it has to pass through a great ordeal; stripped of all external aid or covering, the soul itself must stand naked ( before the Lord ), and it is that nakedness of the soul as it approaches the supreme Goal, that is told of here.

**भावार्थः**—गोपी येऊन श्रीकृष्णाचें वंदन करितांच त्यानें त्यांचीं वस्त्रें परत केलीं, हें ऐकून आजकालचे शहाणे रोमांचित होऊन कानांत बोटें घालतात, व 'शांतं पापं' म्हणून ओरडत सुटतात. परंतु, त्यांना असें कळत नाहीं कीं हा प्रकार करणारा खेळाडू केवळ सहा वर्षांचा अर्भक होता. तरुणीची बेमुर्वत करण्यास योग्य असा कोणी टोण्या नव्हता. शिवाय या वस्त्रहरणाचे बाह्यांगीं गोष्टींत फार गूढ सत्य भरलें आहे. तें हें कीं, जीव हा परमेश्वराशीं एकीभाव पावतांना अशा एका अवस्थेला येऊन पोचतो कीं, त्याला सर्व बाह्योपाधींचा त्याग करून केवळ नंगेच बनावें लागतें व तेव्हांच प्रभूशीं समरस होऊं शकतो. आणि हाच धडा या गोष्टीनें दाखविला आहे. यांत पांचटपणाचा हेतु मुळींच नाहीं.

बंगाल्यांतील रा. हीरेंद्रनाथ दत्त नांवाच्या एका सद्गृहस्थानें आपल्या 'श्रीकृष्ण' नामक पुस्तकाच्या प्रस्तावनेंत या विषयाचा विचार उत्कृष्ट रीतीनें केला आहे. त्याचा सारांश थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. तो म्हणतोः—

" बालरूपी परमात्मा ज्याप्रमाणें वृंदावनांतील संवगडी मुलांशीं खेळे बागडे तसाच अल्लड पोरींशींही नाचेबागडे. त्या मुलाचा मोहकपणाच असा होता कीं, वृद्ध असो, तरुण असो, त्याचें चित्ताकर्षणच होई. मग अल्लड पोरींचा ओढा त्याजकडे व्हावा व पालकांस न जुमानतांही त्यांनीं त्याचे नादीं लागावें असें म्हणण्यांत आश्चर्यकारक तें काय ? "

( आंग्लभाषाभिज्ञ जिज्ञासूंनीं तें पुस्तक अवश्य वाचावें. )

तेव्हां चित्ताकर्षणरूप माधर्याची पराकाष्ठा हें एक अवतारामध्यें मोठेंच वैलक्षण्य आहे. ही गोष्ट जीवाकडून होत नाहीं. परमात्मा श्रीकृष्ण जेथें उभे राहतील तेथें तिर्यगादि चेतन तसेंच जड नद्या, लतावृक्षांकुरादि हें परवश होऊन स्तब्ध होतात. हें अद्भुत माधुर्य आणि वशीकरण केवळ प्रभूचे ठिकाणींच आहे.

श्रीकृष्णानीं ज्या वेळेस मधुवनामध्यें वेणुवादनास आरंभ केला त्यावेळीं त्या वेणुनादानें नद्या, हरिणी, गाई, विमानांतील देव, वृंदावनवासी गोपिका, मयूर इ० पक्षी इत्यादिक मोहित होऊन स्तब्ध झाले. गोपिका ह्मणतातः—

धन्याः स्म मूढमतयोऽपि हरिण्य एता । या नंदनंदनमुपात्तविचित्रवेषं ।
आकर्ण्य वेणुरणितं सहकृष्णसाराः । पूजां दधुर्विरचितां प्रणयावलोकैः ॥११॥
देव्यो विमानगतयःस्मरनुन्नसारा । भ्रश्यत्प्रसूनकबरा मुमुहुर्विनीव्यः ॥ १२ ॥
गावश्च कृष्णमुखनिर्गतवेणुगीतपियूषमुत्तभितकर्णपुटैः पिबन्त्यः । शावाः स्नुतस्तनपयःकवलाः स्म तस्थुर्गोविंदमात्मनि दृशाश्रुकलाःस्पृशन्त्यः ॥ १३ ॥
( श्रीमद्भागवत १०—२१ )

परम भागवत श्रीएकनाथमहाराज म्हणतात—

भुलविले वेणुनादें । वेणु वाजविला गोविंदें ॥ १ ॥
पांगुळलें यमुनाजळ । पक्षी राहिले निश्चळ ॥ २ ॥
तृणचरें लुब्ध झालीं । पुच्छें वाहुनियां ठेलीं ॥ ३ ॥
आनंद न समाये त्रिभुवनीं । एका भुलला जनार्दनी ॥ ४ ॥

एकूण परमात्मा आनंदमय आहे " आनंदं ब्रह्मणो विद्वान् " " एतस्यैवानंदस्य अन्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति " श्रु० ( वेदांतसूत्र ) " आनंदमयोऽभ्यासात् " इ० इ० वचनांवरून हेंच सिद्ध होतें, व आनंद फार चित्ताकर्षक असतो. म्हणून जीवापेक्षां श्रेष्ठ चित्ताकर्षणरूप वैलक्षण्य ( व आणखी पुष्कळशीं दिव्य वैलक्षण्यें ) अवतारांमध्यें आहेत हें सिद्ध झालें.

८ ह्यानंतर आणखी एक असा प्रश्न उपस्थित होतो कीं पुराणांमध्यें "एते चांशकलाः प्रोक्ताः कृष्णस्तु भगवान्स्वयं " अशीं भेदवाक्यें ( म्ह० कांहीं

अवतार पूर्ण व कांहीं अंश रूपानें ) आहेत. तेव्हां या वचनांची संगती कशी ? त्यांत कांहीं पूर्ण स्वरूप व कांहीं असे आहेत कीं ज्यामध्यें ब्रह्माचा एक अंश आला आहे असें म्हटलें तर त्या अंशस्वरूपावर जीवसाम्यतेचा दोष येतो. कारण, जीवही परमात्म्याचें अंशस्वरूपच आहेत. " ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः " " अंशो नाना व्यपदेशात् " ( वेदांत सूत्र ). आतां कोणी असें म्हणेल कीं, जीव हे परमाणुरूप अंश आहेत व अवतार हे श्रेष्ठ अंश आहेत. असें मानलें तरि ईश्वरत्व तर सिद्ध होत नाहींच; परंतु मोठे अंश मानण्यानें मोठे जीव म्हटले जातील, शिवाय मध्यम परिमाणत्वामुळें क्षणभंगुर ठरतील. ह्यामुळें जीवापेक्षांही कमी अधिकाराचे ते होतील. पुन्हां कोणी ह्मणेल कीं जीव पूर्वजन्मार्जित कर्मानें ( जरी ते परत्म्याचे अंश आहेत तरी ) भिन्न भिन्न उत्पन्न होतात. पण अवतार हे परमात्म्याचे खंड—स्वरूप आहेत. तेव्हां तर दुसरा हा दोष येतो कीं अवतारामध्येंहि खंड होण्यानें व्यापकता रहात नाहीं, तर अवच्छिन्नताच येते. आणि राहिलेल्या ब्रह्मांतून खंड निघण्यानें त्याचीही व्यापकता नष्ट झाली ! ह्मणून हा संशय येतो कीं परमात्म्याचे पूर्णावतार कसे तरी होतील पण अंशावतार कांहीं संभवनीय नाहींत.

या प्रश्नाचें उत्तर देतांना हा विचार करणें अवश्य आहे कीं अंशावतार येथील अंश शब्द जीवसदृश अंशवाचक नसून जो अवतार एकाच उद्देशानें प्रगट होतो व तेवढेंच कार्य साधून अंतर्हित होतो, असा मत्स्यकच्छादि रूपवान तो अंशावतार, व जो अनेक उद्देश्यांकरितां प्रगट होतो व असंख्यात लीला करून अंतर्हित होतो तो पूर्णावतार ह्मणविला जातो; जसें रामकृष्णादि अवतार होत. अवताराचें अंशत्व व पूर्णत्व लीला व कार्यं यांवर अवलंबून आहे.

वेदादि सच्छास्त्रप्रवर्तक परमात्म्यानें जी मर्यादा प्रगट केली आहे, त्याच मर्यादेचें पालन राम अवतारामध्यें प्रभूनें करून दाखविलें आहे. हा रामअवतार पुत्रमर्यादा, भ्रातृमर्यादा, ब्रम्हचर्यमर्यादा, सत्यमर्यादा इ० इ० किती तरी मर्यादेकडून व्याप्त आहे. ह्मणूनच मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांचें पूर्णत्व सिद्ध होतें.

" मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये " "मामेकं शरणं व्रज" "मामेव ये प्रपद्यन्ते" इ० इ० प्रमाणसिद्ध शरणागतरक्षण हाही परमात्म्याचा स्वभाव आहे. तोही बिभीषणादिकांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसतो. तसेंच कृपालुता, दयालुता इ० गुणही स्पष्ट दिसतात. हनुमान, सुग्रीव, अंगद, भरत इत्यादिकांना समान

रीतीनें आलिंगन देऊन समदृष्टित्व हीं सर्व जगाच्या निदर्शनास आलीं. ह्या अनेक कार्यांवरून प्रभु श्रीरामचंद्र यांची पूर्ण लीला, पूर्ण मर्यादा, सर्वतः परिपूर्णता ही अवश्य स्वीकार्य आहे.

श्रीकृष्ण अवतारामध्यें तर याहीपेक्षां जास्त पूर्णत्व दिसून येतें. कारण इकडे बाललीलापूर्ण, कौमारपूर्ण, वीरतापूर्ण, आपल्या अंगावर पडलेले अनेक शस्त्राघात सहन करून अर्जुनाचें रक्षण करण्यांत दयापूर्ण, इतकेंच नाहीं तर अद्भुत शृंगारादि रसाचीही पूर्णता भगवंताच्या पूर्ण अवतारामध्यें आहे. विरुद्धधर्माश्रयत्व हाही त्या परब्रह्माचा स्वभावच आहे. व अलौकिकतेला कारण विरुद्धधर्माश्रयत्वच होऊं शकतें, हा सर्व भक्तिकांडवाद्यांचा साग्रह सिद्धांत आहे. यावद्दल श्रुतिसंमत " अणोरणीयान्महतो महीयान् " " नमो ह्रस्वाय च वामनाय च नमो बृहते च " "नमो ज्येष्ठायच कनिष्ठाय च " ( यजुर्वेद अ. १६ ) " तदेजति तन्नैजति तद्दूरे तदांतिके " " तदंतरस्य सर्वस्य तदुसर्वस्यास्य बाह्यतः ॥ "

" दूरस्थं चांतिके च तत् " ( ईशावास्य उ० )

जे एक आंत बाहेरी । जे एक जवळ दूरी । ( ज्ञानेश्वरी )

तेच विरुद्ध धर्म कृष्णावतारामध्यें भगवंतांनीं अनेक वेळेस दाखविले आहेत. जसें निःशक्तता व कोमलता इतकी कीं गाईच्या वासरास धरलें तर तें वासरूंच यांना ओढून नेतें. " वत्सैरितस्तत उभावनुकृष्यमाणौ " शक्तिमत्ता इतकी कीं गोवर्धन साहजिक लीलेनें उचलला जातो. यशोदामातेच्या अंकावर बसले तर अगदींच हलके, पण शकट, तृणावर्त, अरिष्ट, पूतना इत्यादि बलाढ्य असुरांनाही भारी. तसेंच ब्रह्मदेवास वृंदावनांत एकत्व, अनेकत्व, द्विभुजत्व, चतुर्भुजत्व इ० रूपानें दर्शन दिलें.

यावद्वत्सपवत्सकाल्पकवपुर्यावत्करांघ्र्यादिकं
यावद्यष्टिविषाणवेणुदलशिग्यावद्विभूषाम्बरं ।
यावच्छीलगुणाभिधाकृतिवयो यावद्विहारादिकं ॥
सर्वं विष्णुमयं गिरोऽङ्गवदजः सर्वस्वरूपो बभौ ॥ १९ ॥

श्रीमद्भागवत १०–१३

तसेंच आपल्या मुखांत यशोदामातेस दोन वेळेस हें सर्व त्रिभुवन दाखविलें. ( श्रीमद्भागवत १०–७–३६ )

खं रोदसी ज्योतिरनीकमाशाः सूर्येंदुवह्निश्वसनाम्बुधींश्च ॥
द्वीपान्नगांस्तद्दुहितॄर्वनानि भूतानि यानि स्थिरजंगमानि ॥

तसेंच अर्जुनासही " इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् । मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥ (श्रीमद्भगवद्गीता ११–७)

इया मूर्तीचिया किरीटी । रोममूळीं देखें पां सृष्टी ।
सुरतरूतळवटीं । तृणांकुर जैसे ॥ ४८ ॥
एथ एकैकाचिया प्रांतदेशीं । विश्व देख विस्तारेसीं ।–ज्ञानेश्वरी

म्हणून विश्वरूप दाखविलें. इ० इ०. अद्भुत चमत्कार दाखवून प्रभूनें आपली पूर्णब्रह्मताच सर्वांच्या नजरेस आणिली. हरिवंश, पद्मपुराण, इत्यादिकांमध्येंही, तसेंच अथर्ववेदीय गोपालतापनी उपनिषदांतही परिपूर्ण श्रीकृष्णावताराचें पूर्णत्वच पूर्णरीतीनें दाखविलें आहे. एकूण अंश व पूर्ण हीं विशेषणें कार्यावरून लाविलेलीं आहेत, ह्या विशेषणांमुळें जीवत्व किंवा व्यापकत्व सिद्ध होत नाहीं.

९ आतां सातवा एक प्रश्न असा उपस्थित होतो कीं अवतार हा शरीराधीनच असतो, अशरीर–अवतार कोणताच झालेला नाहीं; तेव्हां हा संशय येतो कीं अवतारशरीरें हीं प्राकृतजीवसदृश आहेत किंवा अलौकिक? परंतु अवतारचरित्राकडे दृष्टी दिली तर त्यांत जन्म, वृद्धि, युद्धांत रक्तानें भिजणें, तसेंच क्षुधा, तृषा, हर्ष, शोक इ० प्राकृतधर्मच दृष्टिगोचर होतात, व ह्या प्राकृतधर्मानें युक्त असणें हीच अवतारशरीरांचीं पांचभौतिकत्वाचीं कारणें आहेत. ह्या लौकिक देहधर्माला साधक अशा प्रमाणानें समस्त पुराणें तसेंच रामायणादिक ग्रंथ भरले आहेतः—

(आधान) ततो जगन्मंगळमच्युतांशं समाहितं शूरसुतेन देवी ।
दधार सर्वात्मकमात्मभूतं काष्ठा यथानंदकरं मनस्तः ॥
(श्रीमद्भागवत १०।२।१८)

(जन्म) देवक्यां देवरूपिण्यां विष्णुः सर्वगुहाशयः ॥
आविरासीद्यथा प्राच्यां दिशींदुरिव पुष्कलः ॥ १०।३।८
(वृद्धि) कालेन व्रजताल्पेन गोकुले रामकेशवौ ॥
जानुभ्यां सह पाणिभ्यां रिङ्गमाणौ विजह्रतुः ॥ अ० ८
(क्षुधातृष्णा) गाश्चारयन्सगोपालैः सरामोदूरमागतः ॥
बुभुक्षितस्य तस्यान्नं सानुगस्य च दीयतां॥ अ० १७।२३.

ह्या रीतीनें अवतारांच्या शरीरामध्यें पांचभौतिकत्व सिद्ध होतें, म्हणून प्राकृत शरीरधारी जीवांत व अवतारामध्यें काय भेद आहे?

वरील प्रश्नांत अवतारशरीरांना पांचभौतिक मानलें आहे. परंतु वस्तुतः

हें पहावयास पाहिजे कीं अवतारांच्या शरीरांमध्यें केवल पांचभौतिकत्वाचेच धर्म दिसून येतात किंवा अलौकिक ?

वास्तविक सूक्ष्म दृष्टीनें अवतारांचीं लीलाप्रकरणें पहाण्यानें हें दृष्टिगोचर होतें कीं, पांचभौतिकापेक्षां अपांचभौतिक अलौकिक धर्मच जास्त असतात. जसें कृष्णावतारीं जन्माचें वेळेस चतुर्भुजदर्शन, पुन्हा द्विभुज होणें, इच्छामात्रानेंच सर्वांना निद्रिस्त करणें, पुढें पूतनातृणावर्तादिवध, यमलार्जुनमोक्ष, कालियामर्दन, गोवर्धनोद्धारण, अंतर्धान व प्रागट्यशक्ति, अर्जुन, ब्रह्मदेव, यशोदा, अक्रूर इत्यादिकांना अनंतरूप दर्शन, इ० इ० हजारों अलौकिकधर्म पहाण्यांत येतात. आतां निःपक्षपातानें ही परीक्षा करणें उचित आहे कीं, ही द्विविधधर्मवत्ता पांचभौतिकत्वाकडून संभवते किंवा दिव्य अपांचभौतिक अलौकिक परमात्म्याकडून? कारण, भौतिक पाषाणवनस्पती इ० पदार्थांमध्यें जे गुण ठराविक आहेत ते कधींही वाढत नाहींत व घटतही नाहींत. त्यांचे मध्यें नियतगुणयुक्तत्व हेंच एक प्रकारचें लौकिकत्व आहे. परंतु एक शिलाखंड ( दगड ) च गुरुत्व, श्यामत्व, कठोरत्व इ० यावत्पांचभौतिकगुणविशिष्ट असेल, परंतु पहातां पहातां गुप्त होईल, नंतर पुन्हा नानारूपानें प्रगट होईल, पुन्हां स्थूल सूक्ष्म इ० नाना आकार धारण करून पुन्हा जसेंच्या तसेंच पूर्वस्थितीवर येईल, तर त्याचे ठिकाणीं पूर्वोक्त लौकिक गुण राहूनही तो अलौकिकच मानला जाईल. अर्थात् लौकिकधर्म अलौकिकत्वाचे बाधक होत नसून एकही अलौकिक धर्म असेल तर तो ह्या सर्व लौकिक धर्मांचा बाधक होऊं शकेल. जसें एखादा मृत मनुष्य पूर्वींच्याच रंग, रूप, आकार, स्वभाव, भाषण, इ० इ० क्रियेनें पुन्हा कोठें दृष्टीस पडेल तर ( जरी त्याची स्थिति सर्व पूर्ववतच असेल ) तरी दग्ध झाल्यानंतर पुन्हा दृष्टीस पडणें हा एकच असा अलौकिक गुण आहे कीं त्यास प्रेत, भूत, देव असें सर्वजण मानतील. हे विचारीत नाहींत कीं त्याचे सर्व धर्म तर पूर्वींचेच आहेत, एक अलौकिक नवा असला म्हणून काय झालें ? अर्थात् लौकिकतेचा बाधक अलौकिक धर्म आहे ह्मणून रामकृष्ण इ० अवतारांमध्यें एकंदर लौकिक धर्मांचें अस्तित्व असतांही अलौकिक धर्मविशिष्टत्वामुळें त्या देहांचे अलौकिकत्वच सिद्ध होतें. कांहीं लौकिकधर्मही दाखविणें हें त्या अलौकिकतेचें भूषणच आहे, दूषण नाहीं. श्रीशुकाचार्यांनीं हें अलौकिकत्व स्पष्टच सिद्ध केलें आहे. जसें "ततो जगन्मंगलमच्युतांशं" या श्लोकांत स्पष्टच सांगितलें आहे कीं "मनस्तःदधार" जसे इतर स्त्रिया गर्भ धारण करितात, तसा देवकीनें केला नाहीं किंतु मनानेंच धारण केला. तसेंच जन्मसमयींही आचार्य म्हणतात

कीं " आविरासीत् " यावरूनही हें सिद्ध होतें कीं भगवंतांनीं इतर बालकांप्रमाणें जन्म घेतला नाहीं तर स्तंम्भांतून प्रगट होऊन जसा नरसिंह अवतार घेतला, तसेंच कौसल्या देवकी यांचे सन्निध श्रीरामचंद्र श्रीकृष्ण प्रगटले. याबद्दल श्रीनामदेवराय म्हणतातः—

अयोनीसंभव नोहे कांहीं श्रमी । नामयाचा स्वामी प्रगटला ॥

रामजन्माबद्दल श्रीएकनाथमहाराज म्हणतातः——

सुवर्णाचा शोभे मस्तकीं मुगुट । हिरे घनदाट तयावरी ॥
असाहा अयोनि संभव । प्रगटला हा राघव ॥ १ ॥

" अयोनिर्विष्णुरीडितः " शिवाय गौर, श्यामसुंदर, लहान मोठे इ० इ० धर्म जर त्यांचे ठिकाणीं रहाणार नाहींत तर मग अवतार ह्मणजे काय ? करितां कौमारपौगंडादि वयोभेदानें रूपभेद तसेच हर्षशोकादिक व युद्धामध्यें रुधिरक्षतादिकानें पूरित शरीर होणें इ० इ० मानवलीला आहेत. श्रीभगवंत ज्या वेळीं इच्छितील त्या वेळेस आपल्या दिव्यशरीरास अदिव्य पांचभौतिकांप्रमाणें दाखवितात. ही त्या अलौकिक शरीराची अधिक अलौकिकता आहे.

१० कोणी कोणी श्रीकृष्णाचें जराव्याधाच्या बाणापासून वैकुंठास गमन झालें हें सुद्धां कृष्णशरीराच्या भौतिकत्वाचेंच सूचक आहे असें म्हणतात. परंतु त्याचेवर फिरून हा आक्षेप येतो कीं पांचभौतिक शरीरवान् लौकिक जीवाच्या विरुद्ध कोणी त्यास मर्मस्थानीं आघात केल्यास त्या योगानें तो सकष्ट देहत्याग करितो. तेव्हां त्याचा तो विकृत देह भूलोकावरच पडून रहातो, परंतु प्रभूच्या इच्छेनुरूपच ब्रह्मशापामुळें यदुकुलाचा क्षय झाला. आणखी आपल्या इच्छेनेंच ब्रह्मशापापासून उत्पन्न झालेल्या मुसळाच्या अग्रानें आपण घायाळ झाले. वास्तविक पादतल असें कांहीं मर्मस्थान नाहीं, तरी त्याच आघातास त्यांनीं आपल्या वैकुंठयात्रेचें द्वार मानलें. नंतर तो जराव्याध येऊन पहातो तर त्यास——

शंख चक्र गदा कमळ । मूर्तिमंत आयुधें सकळ ॥
आश्रूनियां पिंपळ । बैसला केवळ वीरासनीं ॥

एकनाथी भागवत ३० ओ० २१०

अशी दिव्यमूर्ति दृष्टीस पडली. त्या मूर्तीस बाण लागलेला पाहून त्या व्याधास फार दुःख झालें, व भीत भीत तो श्रीकृष्णाजवळ येऊन म्हणतो, ' महाराज ! माझ्याकडून मोठा अपराध झाला. करितां तुम्ही दंड करा. प्रभो ! मी शरण आहें. ' परंतु प्रभूनें त्या वेळीं इतकी शरणागतवत्सलता दाखविली कीं त्यास त्याच देहासह वैकुंठास पाठविलें.

भगवान् म्हणतात—

मा भैर्जरे त्वमुत्तिष्ठ काम एष मतो हि मे ।
याहि त्वं मदनुज्ञातः स्वर्गं सुकृतिनां पदं ॥ ३९ ॥
इत्यादिष्टो भगवता कृष्णेनेच्छाशरीरिणा ।
त्रिः परिक्रम्य तं नत्वा विमानेन दिवं ययौ ॥ ४० ॥

व्याध आरूढोनि विमाना । क्रमूनि इंद्रचंद्रग्रहगणा ॥
अक्षयीं सुखस्वर्गभुवना । कृष्णकृपे जाणा तो पावला ॥

एकनाथी भागवत.

११ शिवाय जरा नामक व्याधाची पूर्वजन्मींची कथा अशी प्रसिद्ध आहे कीं, रामचंद्र जेव्हां रावणकुंभकर्णादिक दुष्टराक्षसांचा संहार करून सीतेसहवर्तमान अयोध्येच्या सिंहासनावर विराजमान झाले, त्यावेळीं सुग्रीव नलनीलादि सर्व वानरांना नाना प्रकारचीं बक्षिसें दिलीं. परंतु पुष्कळ वेळां सांगण्यानेंही अंगदानें कांहींच मागितलें नाहीं. त्यावेळेस श्रीरामचंद्रानीं आग्रहानें त्यास सांगितलें कीं 'वत्सा, कांहीं तरी माग.' परंतु त्यावर अंगदानें असें उत्तर दिलें कीं 'महाराज! सध्यां इहलोकीं तर मी युवराज आहें व तुमच्या चरणारविंदाचें दर्शन नित्य घेत असल्यामुळें व तुमची पूर्ण कृपादृष्टि मजवर आहे ह्मणून परलोकांतही मला कांहीं कमी पडणार नाहीं तर मी काय मागूं? मला कांहींच नको' तेव्हां श्रीरामचंद्रांनीं पुन्हां त्यास सांगितलें कीं 'जोंपर्यंत मी तुला कांहीं देणार नाहीं तोंपावेतों मला समाधान वाटणार नाहीं, म्हणून कांहीं तरी माग.' यावर अंगद हात जोडून म्हणतो कीं, 'महाराज! तुम्ही माग म्हणाल्लांत ह्मणून मी मागतों. तुम्ही झाडाआड उभे राहून विनाकारण माझ्या पित्याचा वध केला. करितां तुमच्या या कृत्याचा सूड घ्यावा अशी माझी इच्छा आहे! कारण, यावांचून दुःखनाशाचा दुसरा उपायच नाहीं.' हें त्याचें भाषण श्रवण करून श्रीरामचंद्रांनीं त्यास आलिंगन दिलें व सांगितलें 'वत्सा! मी तुझ्या या पितृभक्तीस पाहून फार संतुष्ट झालों. पण सख्या! या अवतारांत तर हें शक्य नाहीं, पण मी पुन्हां अवतार घेईन तर तुझ्याच बाणानें या भूलोकाचा त्याग करीन.' तर या वरदानामुळेंच अंगदानें जराव्याध होऊन भगवंतास बाण मारला, व तो मुक्त झाला.

इकडे श्रीकृष्ण परमात्माही—

सौदामिन्या यथाकाशे यान्त्या हित्वाभ्रमंडलम् ।
गतिर्न लक्ष्यते मर्त्यैस्तथा कृष्णस्य दैवतैः ॥९॥

वीज तळपे अभ्रमंडळीं । ते कोठोनि आली कोठें गेली ॥

गति नरां न लक्षे भूतळीं । तैशी कृष्णगती जाहाली दुर्गम देवां ॥
—एकनाथी भागवत. ३१–९–८६

अशा रीतीनें अदृश्य झाले. इतकेंच नाहीं पण रुक्मिणीप्रमुख ज्या कृष्णपत्न्या होत्या त्यासुद्धां " रुक्मिण्याद्यास्तदात्मिकाः " " एकार्णव जाला तरंग बुडाला । तैसा देह झाला ब्रह्मरूप " ( ज्ञानेश्वर ) कृष्णरूप झाल्या. एकूण हा सर्व प्रकार अलौकिकतेचाच सूचक आहे. विवेक्यांना यांत पंचभौतिकत्वाचा लेशसुद्धां दृष्टीस पडणार नाहीं. या विषयांत ' श्रीमच्छंकराचार्य यांचा एक उतारा मननीय आहे. तो खालीं दिल्यावांचून राहवत नाहीं—

आचार्य श्रीमद्भगवद्गीतेच्या आरंभीं उपोद्घात भाष्यांत म्हणतात—

' स च भगवान् ज्ञानैश्वर्यशक्तिबलवीर्यतेजोभिः सदासंपन्नस्त्रिगुणात्मिकां वैष्णवीं स्वां मायां प्रकृतिं वशीकृत्याजोऽव्ययो भूतानामीश्वरो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावोऽपि सन् स्वमायया देहवानिव जात इव च लोकानुग्रहं कुर्वन्लक्ष्यते, स्वप्रयोजनाभावेऽपि भूतानुजिघृक्षयेति. '

भावार्थ—ज्ञानादि षड्गुणानें संपन्न असूनही त्याच्या आधीन असलेल्या त्रिगुणानें युक्त सर्व जगाच्या मूळप्रकृतीला तो भगवान् आपल्या स्वाधीन ठेवतो, व स्वतः अज अव्यय असतांही आपल्या विचित्र शक्तीमुळें स्वतःच्या प्रयोजनाचा जरी अभाव असला तरी भूतांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेनें शरीरानें युक्त झाल्यासारखा दिसतो त्यामुळें त्याचा जन्म झाला आहे, तो सर्व लोकांवर जणुंकाय अनुग्रहच करीत आहे, असें भासतें.

एकूण अवतारशरीरांना भौतिकत्व न मानतां अलौकिकच मानणें उचित आहे.

तसेंच बृहद्वैष्णवांतहि—

योवेत्ति भौतिकं देहं कृष्णस्य परमात्मनः ।
स सर्वस्माद्बहिष्कार्यः श्रौतस्मार्तविधानतः ॥
मुखं तस्यावलोक्यापि सचैलं स्नानमाचरेत् ॥

असें फार कडक रीतीनें सांगितलें आहे.

महाभारतः—

" नभूतसंघसंस्थानो देहोऽस्य परमात्मनः " ॥

श्रीमद्भागवतः—

" अस्यापि देववपुषो मदनुग्रहस्य ।
स्वेच्छामयस्य नतु भूतमयस्य कोऽपि "

श्रीमधुसूदनसरस्वतीः—

" अतो न भौतिकं शरीरमीश्वरस्येति "

गीतेंतील " अजोऽपि सन्नव्ययात्मा " या श्लोकावरील शांकरभाष्य व तत्व-प्रदीपिका, शंकरानंद, मधुसूदन इत्यादिकांच्या टीका पाहिल्यास त्यांच्या विवरणापुढें कुणाच्या शंका टिकतील असें आम्हांस वाटत नाहीं.

१२ सारांश, ईश्वरावतार व त्याचीं सर्व रसपरिप्लुत उदात्त व गंभीर अशीं दिव्य चरित्रें ह्यांना काल्पित कादंबरीइतकें महत्व आमचे पाश्चात्यांच्या संसर्गानें दूषितांतःकरण झालेले पंडितंमन्य म्हणविणारे आर्यबांधव देण्यास तयार आहेत, परंतु वरील विवेचनावरून त्यांची आगंतुक क्षुद्रसंसर्गजन्य कुशंकानिवृत्ति होऊन त्यांच्या अंतःकरणांत मूलभूत सात्विक दिव्यश्रद्धेचा उदय होवो! अशी त्या अंतर्यामि अवतारधारण करणाऱ्या प्रभूची प्रार्थना करून हा लहानसा लेख संपवितों. इतिशम्

---


प्रती फारच थोड्या शिल्लक आहेत.

# श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र.

**पृष्ठसंख्या ५२८ किंमत रु. ३ ट. ख. सह रु. ३।८।७**

**ग्रंथकार—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

सतत आठ वर्षें हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या, श्रीक्षेत्र देहू येथील जुनीं दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून आणि गाथ्यांचें व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ काळनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवित्वस्फूर्ति ८ चित्तशुद्धीचे उपाय ९ सगुणभक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि (उपदेशसार) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण. अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत.

ग्रंथांत सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपति पांडुरंग २ तुकोबांचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला. ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान. यांत प्रसंगानुसार तुकोबांचे अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व अवश्य तेथें विवरणही दिलें आहे.

पत्ता—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें शहर.

# स्फुट विचार.

## १ शारदोपासकसंमेलन.

गेल्या मे महिन्यांत पुण्यास पहिलें शारदोपासकसंमेलन प्रसिद्ध काव्येतिहाससंशोधक रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे अध्यक्षतेखालीं भरलें होतें. प्रथम स्वागताध्यक्ष प्रो. दत्तोपंत पोतदार यांचें सुविचारपूर्ण सुंदर भाषण झालें. नंतर राजवाडे यांचे छापील भाषण त्यांनीं स्वतःच वाचून दाखविलें. राजवाडे यांची विचारसरणी व वर्तनपद्धती विद्वान् लोकांत सुप्रसिद्ध आहे, तिला सुसंगत असेंच त्यांचें भाषण झालें! मराठयांच्या इतिहासाला उपयुक्त असे सहस्रावधि जुने कागद त्यांनीं शोधून काढले आहेत व त्यांपैकीं बरेच १५।२० खडांत प्रसिद्ध केले आहेत. त्यांची विद्वत्ता, कष्टाळूपणा, संशोधकबुद्धि सर्व कांहीं अपूर्व आहे. इतिहासाचीं साधनें शोधून प्रसिद्ध करण्याच्या कामांत त्यांच्यासारखा वाकबगार माणूस दुसरा नाहीं. त्यांची देशहिताची कळकळही निर्विवाद आहे, पण त्यांच्या भाषणांत जो निराशावाद व उद्दामपणा दिसला तो आह्मांप्रमाणें पुष्कळांस आवडला नाहीं. मराठीभाषा मरणार, मराठे लोक व मराठी संस्कृती नामशेष होणार, पन्नास वर्षांत मराठींत नामांकित ग्रंथ किंवा ग्रंथकार कोणीच झाले नाहींत इ० राजवाडयांचीं मुक्ताफळें तेच म्हणून लोकांनीं ऐकुन घेतलीं. निराशावादाचें रडगाणें वाटेल त्याला गातां येतें, त्याला विद्वानांची सभा नको आहे. झालेल्या कामाचें सकौतुक परीक्षण, पुढील कामाची दिशा, कांहीं उत्तेजनपर सूचना वगैरे गोष्टी सांगतां आल्या तर सांगाव्यात.नाहींपेक्षा रडगाणें ज्याचें त्यानें आपल्या खोलींत गात बसावें! Laugh and the world will laugh with you, weep and you weep alone म्हणजे तूं हांसायला लाग कीं सारें जग तुझ्या हांसण्याची साथ करायला येईल, तूं रड कीं तुला येऊन कोणी मिळणार नाहीं असें एका इंग्रजी ग्रंथकारानें ( मिस विलकॉक्स ) म्हटलें आहे तें यथार्थ आहे. मोठमोठे साधु, तत्ववेत्ते, ग्रंथकार, देशभक्त ( देशाची किंवा समाजाची स्थिति यथार्थ जाणूनही) उमेदीचा, उत्साहाचा, कर्तृत्वाचा संदेश जगाला सांगत असतात. राजवाडयांच्या निराशावादाच्या पाठीमागें असा थोडासा उदात्तध्वनि आहे

हें आह्मांस कबूल आहे; तथापि निराशावाद लोकांस नाउमेद करण्याइतका दुसऱ्यांस ‘ तुह्मी गुलाम आहांत, नाकर्ते आहांत ’ असें उद्दामपणानें सांगण्याइतका वाहवला जावा हें बरें नाहीं. राजवाडयांप्रमाणें मराठी भाषेच्या कैवारानें स्वार्थत्यागपूर्वक यत्न करणारे दहापांच ग्रंथकार तरी मराठीला लाभले आहेत. राजवाडयांची महाराष्ट्राच्या इतिहासाची सेवा अमूल्य आहे, त्यांची बुद्धिमत्ता व श्रमसातत्य अवर्णनीय आहे, याविषयीं मतभेद नाहीं; पण त्या त्यांच्या गुणांबरोबरच विनय व सौजन्य हे गुण त्यांच्या ठायीं असते तर दुधांत साखर पडती ! त्यांच्या उद्योगाची महाराष्ट्रसमाजाला किंमत आहे ह्मणून त्यांचें कसलेंही विचार समाज शांतपणें ऐकत असतो. पुण्याच्या त्या संमेलनाप्रमाणें साहित्यपरिषदेमार्फत साहित्यसंमेलन चार महिन्यांत नाशकास भरणार आहे असें ऐकतों. चार विद्वान् एके ठिकाणीं भेटतात, जेवतात, खातात, विचारविनिमय करितात, ठराव पास करितात, कांहीं भाषणें करितात, पण याहून असल्या संमेलनांचा अधिक उपयोग झाल्यास ठीक होईल.

## २ वसंतव्याख्यानमाला.

‘ काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ’ या सुभाषित वचनाप्रमाणें अलीकडे बऱ्याच ठिकाणीं वसंतव्याख्यानमाला सुरू झाल्या आहेत. त्यांचा लोकशिक्षणाच्या कामींही बराच उपयोग होतो यांत संशय नाहीं. पुण्यास ही टूम ५० वर्षांमागें कै. माधवराव रानडे यांनीं काढली, व तेथें मालेचें काम आज सतत ५० वर्षे चांगलें चाललें आहे. स्वतः रानडे, लो. टिळक, कुंटे, प्रो. जिन्सीवाले इ. धडाडीच्या विद्वानांचीं उत्तमोत्तम व्याख्यानें मालेमुळें लोकांस ऐकावयास मिळत व नानाविध विचारांनीं लोकांच्या बुद्धीस चालना मिळे. अलीकडे तसले विद्वान् किंवा एकेका विषयाचा जन्माभ्यास करणारे एकनिष्ठ पुरुष कमी झाल्यामुळें कोणीतरी कांहींतरी बोलावें असाच प्रकार फार दिसून येतो. पुण्याप्रमाणें नाशकासही आज तीन वर्षे वसंतव्याख्यानमाला चालू झाली आहे. गोदावरीच्या रम्यतीरीं देवमामलेदारांच्या समाधिसमोरच्या भव्य पटांगणावर मे महिनाभर मालेचीं व्याख्यानें ऐकण्यास प्रत्यहीं सायंकाळीं स्त्रीपुरुषांचा चांगला समाज जमत असतो. नाशीकची थंड हवा व रमणीय परिस्थितीही मालेच्या यशास बरीचशी कारणीभूत आहेत. वऱ्हाडखानदेशचे अनेक विद्वान् व सुखवस्तु गृहस्थही तेथें रहावयास जात असल्यामुळें श्रोतृसमाजही चांगला पुष्ट झालेला दिसतो. रा. सा. वझे ह्या कर्तृत्ववान् विद्वानाच्या परिश्रमामुळें मालेचा कार्यभाग बराच कार्यक्षम होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

## ३ देशबंधु दास.

जूनच्या १६ तारखेस दार्जिलिंग येथें ह्या थोर पुरुषाचा अंत झाला. चित्तरंजनदास यांचें नांव गेल्या ४।५ वर्षांतच साऱ्या हिंदुस्थानभर स्वार्थत्यागी व कर्तृत्ववान् देशभक्त ह्मणून गाजून राहिलें होतें. दासांच्या यशाचें बीज त्यांच्या शीलसंपन्न परोपकारबुद्धींत होतें. हे कलकत्यास फार नामांकित हायकोर्ट वकील होते. वकिलीच्या प्रथम काळांतच कायद्यानें मुदतीबाहेर गेलेलें बापाचें सारें कर्ज यांनीं फेडून टाकलें. प्रत्येकाच्या घरीं जाऊन त्याचें देणें त्यास आग्रहपुरःसर देऊन हे पितृऋणांतून मुक्त झाले, अशी त्यांची थोर वर्तणुक होती. वकीलीच्या धंद्यांत तीस चाळीस हजार रुपये दरमहाची प्राप्ती असतांना त्यांची बहुतेक मिळकत परोपकारांत खर्च होत असे. १९२१ सालीं महात्मागांधींच्या फकीरी बाण्याला भुलून यांनीं व मोतिलाल नेहरू यांनीं आपली इंग्रजी पद्धतीची राहणी पार सोडून दिली व त्यांच्या असहकारितेच्या चळवळींत हे सामील झाले. दासनेहरूसारख्या अंतर्बाह्य इंग्रजमय बनलेल्या पुरुषांना आपल्या विरक्त साधुवर्तनानें व दिव्य स्वार्थशून्यतेनें महात्मा गांधींनीं देशकार्य करावयास लावलें हा महात्माजींचाही पराक्रम लहानसहान नाहीं. कौन्सिलमध्यें शिरून आह्मी असहकारितेचा विजय करून दाखवूं या उमेदीनें दास कौन्सिलप्रवेशास अनुकूल झाले तरी त्यांचा महात्माजींविषयींचा आदर कायमच राहिला. साताऱ्यास आमचे कित्येक महाराष्ट्रीय बंधु ‘ गांधींनीं कांग्रस सोडून जावें ’ ह्मणून म्हणत असतांना ‘ महात्माजी आमचे पुढारी आहेत व त्यांच्याच निशाणाखालीं आम्ही स्वराज्याची चळवळ चालविणार,’ असें दासबाबू बंगाल्यांत सांगत होते ! महात्माजी व दास यांच्यांत मतभेद एवढयापुरताच होता. दासांच्या धडाडीमुळें सरकार वचकत असे व मतभेद असून दासांच्या महात्माजीवरील प्रेमादरामुळें स्वराज्यपार्टी व महात्माजी याच्यांतला दुवा तुटला नव्हता. आतां सरकारला व स्वराज्यपार्टीला—विशेषतः महाराष्ट्रांतील स्वराज्यपार्टीला—रान मोकळें झालें आहे ! दासबाबूंचा अंत अकालीं झाला. त्यांचें मरणसमयीं वय अवघें ५४ वर्षांचें होतें. असा दांडगा मोहरा अकालीं गेल्यामुळें राष्ट्राची थोर हानी झाली आहे. नेहरू, लजपतराय व मदनमोहन मालवीय हे पुरुषही पूज्यच आहेत, पण दासांची जागा भरून काढणारा स्वार्थत्यागी व धडाडीचा कर्ता पुरुष आज दुसरा नाहीं. त्यांनीं नुकीच आपली आठ लाखांची खाजगी इस्टेट राष्ट्रीय कार्यास देऊन टाकली आहे !

## ४. 'संजीवनी' व धुळेकर देव !

आमची 'समर्थसंजीवनी' प्रगट होऊन सहाच महिने झाले. या अल्प अवधींत ती चांगलीच लोकप्रिय होऊन तिच्या १५०० प्रती खपल्या. चौंडेबुवा-सारख्या अधिकारी लोकांनीं तिला चांगलें म्हटलें. वाईच्या प्राज्ञपाठशाळेंत व तळेगांवच्या समर्थविद्यालयांत ती प्रौढ विद्यार्थ्यांस आज शिकवीत आहेत, तथापि 'नांवाजलेल्या म्हशीला टोणगा' या म्हणीप्रमाणें 'रामदासरामदासी' चे चालक रा. शंकरराव देव यांनीं—त्यांची वृत्ति ओळखून त्यांजकडे संजीवनी न पाठवितांही—आपला अनाहूत व प्रतिकूल अभिप्राय नवीन अंकांत प्रगट केला आहे ! "श्री समर्थांच्या वाङ्मयाचें संक्षिप्त रूप केलेलें मला खपत नाहीं," तथापि "श्रीसमर्थवाङ्मयाच्या अभ्यासाची आवड उत्पन्न होण्यास असल्या वेंच्यांचा उपयोग होत असल्यास" तसा उपयोग होऊं देण्यासही देवांची हरकत नाहीं ! ह्या विरोधाचा आह्मांस उलगडा होत नाहीं. देवांसारख्या श्रीसमर्थवाङ्मयांत निरंतर पोहणाऱ्या पुरुषासाठीं वेंचे नाहींत, समग्र ग्रंथ वाचण्याची ज्याला सवड नाहीं अशांसाठींच वेंच्यांचा संग्रह असतो. "श्रीसमर्थवाङ्मयाचें संक्षिप्त स्वरूप ह्मणजे एखादी सावयव सालंकृत मूर्ति छिन्नभिन्न झालेली पाहण्यासारखें मला वाटतें, मला अशी मूर्ति पाहवत नाहीं." देवांच्या या कोमल मनोभावनेबद्दल आह्मांला कौतुक वाटतें, त्यांचा दृष्टांत काव्यमय व गोड आहे; पण देवांस असें विचारावेंसें वाटतें कीं, समर्थांच्या अफाट कवितेपैकीं सर्व कविता उपलब्ध झालेली आहे काय ? मग त्यांच्यापुढेंही जी कविता आज आहे ती 'श्रीसमर्थवाङमयाचें संक्षिप्त स्वरूपच' नाहीं काय ? समर्थांच्या अफाट कवितासमुद्राचा कितवा भाग आजवर उपलब्ध झाला आहे ? समर्थ एकांतांत रामरायापाशीं जें कवित्व बोलले असतील तें आज कोठें आहे ? यापुढें समर्थवाङ्मय उपलब्ध होणारच नाहीं, आजवर जी उपलब्ध झाली तेवढाच समर्थांची कविता होय, असें देव निश्चयानें सांगण्यास तयार आहेत काय ? व ते एक तयार असले तरी उत्तम ग्रंथकाराच्या कवितेंतील वेंचे काढूं नयेत, वेंचे काढले कीं मूळची मूर्ति (समग्र ग्रंथ) छिन्नभिन्न होते, हें त्यांचें मत समंजस लोकांस मान्य होईल असें आह्मांस वाटत नाहीं. इंग्रजी कवींच्या काव्यांचे वेंचे काढलेले त्यांच्या कॉलेजांतील अभ्यासांत त्यांच्या खास पाहण्यांत असतील. ज्ञानेश्वरीचे वेंचे महिपतबावा ताहाराबादकर यांनीं काढलेले प्रसिद्ध आहेत—चित्रशाळेंत ते छापले आहेत. देवही व्याख्यानांतून दासबोधांतल्या प्रसंगानुसार ओव्या ह्मणत असतात, त्यांनीं वेचक ओव्या न ह्मणतां समा-

साचे समास तेथें पाठ ह्मगत जावें! तात्पर्य, वेंचे काढले कीं मूळ ग्रंथमूर्ति छिन्नभिन्न होते ही देवांची कल्पना अचाट आहे!! 'छिन्नभिन्न मूर्ति मला पाहवत नाहीं, मला वाईट वाटतें' मग दोन रुपये टाकून वेंच्यांचें पुस्तक विकत घेतलेंत कां व त्यावर चार ओळी लिहिल्यांत कां? निवडक श्लोक काढलेले पाहून देवांच्या 'अंगावर शाहरे येतात' ही तर फार नवलाची गोष्ट आहे. लोक बोलण्यांत, कथाकीर्तनांत निवडक श्लोक ह्मणत नाहींत तर काय ग्रंथचे ग्रंथ किंवा समासचे समास पाठ ह्मणत सुटतात? निवड ही व्हायचीच. "वेंचे काढण्याच्या भरीस पांगारकर कां पडले, सांगतां येत नाहीं. त्यांची योग्यता यापेक्षां फार मोठी आहे" निवडक वेंचे काढणें ही गोष्ट कमीपणाची आहे असें आम्हांस वाटत नाहीं. 'मोरोपंती वेंचे' 'रामदासी वेंचे' अशा वेंच्यांची लोकांस गरज आहे. 'तुकारामांचे, ज्ञानेश्वरांचे, एकनाथांचे' असे वेंचे कां काढीत नाहीं? अशीं आम्हांकडे पत्रें येत आहेत. "पांगारकरांसारख्या प्रेमळ आणि मार्मिक भक्ताच्या लेखणींतून उतरलेल्या ८० पानांच्या प्रस्तावनेंत मतमतांतराचें खंडणमंडण नाहीं, वेंच्यांचा नुस्ता गोषवाराच आहे" वेंच्याच्या प्रस्तावनेंत वेंच्यांचें मर्म वाचकांस सहजरीत्या समजेल असा गोषवारा द्यायचा नाहीं तर मतमतांतराचें खंडणमंडण करीत सुटायचें ही देवांची कल्पना फारच विचित्र आहे! त्यांनीं संप्रदायाचे जे १०।१२ ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यांच्या प्रस्तावनांतून हा खंडणमंडणाचा प्रकार त्यांनीं कोठेंही कां अवलंबिला नाहीं? आपण नामानिराळे राहून पाहुण्याच्या हातून साप मारविण्याचा हा वकिली डाव तर नसेल? केळुसकर भाटेप्रभृतींस—वचन देऊनही—उत्तर न देतां वर्षानुवर्षे देव स्वस्थ कां बसले आहेत? ते खंडणमंडणाच्या मार्गांत कां पडले नाहींत? रामभाऊ जोशी व देवशास्त्री यांच्याशां त्यांनीं दोन हात केले आहेत, पण मुख्य मुद्दयांवर त मौनच धरून आहेत. वादविवाद परमार्थानुकूल नाहीं, तथापि वाङ्मयाच्या क्षेत्रांत क्वचित् खंडण करण्याचा प्रसंग येतो. 'श्रीसमर्थचरित्रांत' तसें एखादें प्रकरण येण्याचा संभव आहे; तथापि 'वेंच्यांच्या प्रस्तावनेंत मतमतांतराचें खंडणमंडण कां नाहीं' हा प्रश्न विलक्षण आहे! प्राचीन मराठी कविता वाचण्याचा व संप्रदायपद्धतीनें समजून घेण्याचा प्रघात कमी झाला आहे, तरुण पिढीला हें वळण फार कमी लागलेलें आहे, त्यांना कवितेची गोडी लागावी, कविता समजण्याच्या कामीं साह्य व्हावें या हेतूनें गोषवारा दिलेला आहे, व तो उपकारक झाला आहे असें अनेकांनीं आम्हांस कळविलें आहे.

---

## ५ इंदोर व ग्वाल्हेर.

महाराष्ट्रीयांचीं प्रमुख देशी संस्थानें चार. कोल्हापूर, बडोदा, इंदोर व ग्वाल्हेर. त्यांपैकीं कोल्हापूरचे माजी कर्तृत्ववान् व शूर महाराज दिवंगत झाल्यापासून तिकडचें वातावरण शांत झालेलें दिसतें. बडोद्याचे सयाजीराव महाराज प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं बहुधा सर्वकाल विलायतेकडेच असतात. ग्वाल्हेरचे श्री. माधवराव महाराज हे राज्यकारभार जातीनें पाहत असून मोठे दक्ष व हुशार होते, ते गेल्या मे महिन्यांत फ्रान्समध्यें जाऊन मरण पावले. अल्पवयी राजपुत्रास महाराज करून महाराणीसाहेबांनीं आपले हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें घेतलीं आहेत. मुंबईस बावलाप्रकरण उपस्थित होऊन गेल्या ४।५ महिन्यांत त्यानें आपल्याकडे लोकांचीं मनें ओढून घेतलीं होतीं. मुंबईस कित्येक इंग्रजी व मराठी पत्रांनीं पहिल्यापासून एककल्लीपणाचे लेख लिहून व अचकटविचकट चित्रें देऊन हें प्रकरण चिघळायला लावलें होतें. शेवटीं हायकोर्टांत तीन असामींस फांशीची व चौघांस जन्मठेपीची शिक्षा होऊन हें प्रकरण मिटल्यासारखें दिसत आहे. मुमुक्षुवाचकांस ह्या प्रकरणाची खरीखोटी हकीकत वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळालीच आहे. खटल्याचा अद्याप पुरा सोक्षमोक्ष झाला आहे असें नाहीं, तथापि कित्येक उपद्व्यापी लोकांचा ह्या प्रकरणाशीं महाराजांचा संबंध जोडण्याचा जो प्रयत्न दिसून येतो तो अयथार्थ आहे. इंदोरचे महाराज अंतःकरणाचे भोळे, दयाळु व न्यायप्रिय आहेत. त्यांच्या नांवावर किंवा त्यांची मर्जी मिळविण्याच्या कल्पनेनें कोणीं कांहीं केलें असल्यास त्याची जबाबदारी महाराजांवर नाहीं, व त्याच्या कृत्याचा संबंध महाराजांकडे पोंचण्याचा संभव नाहीं. महाराज दयाशील आहेत. प्रजेच्या कल्याणाकडे त्यांचें चांगलें लक्ष आहे. तारुण्याच्या पहिल्या भरांतून ते बाहेर पडत असून लोकांच्या हिताकडे त्यांचें अधिकच लक्ष वेधलें जाईल, व राज्यव्यवस्था नमुनेदार होईल असें चिन्ह दिसत आहे. देवी अहिल्याबाईचें राज्य, आणि मराठमंडळांपैकी एक देशी संस्थान, उत्तम स्थितीप्रत पोंचून सर्व संस्थानांस नमुनेदार व्हावें अशी कोण इच्छा करणार नाहीं ? सर्व राज्यांत मोफत शिक्षण सुरू करून प्रजा ज्ञानसंपन्न करावी अशी योजना इंदूर दरबारांत शिजत आहे हें सुचिन्ह आहे. आमचीं देशी संस्थानें खालसांतील लोकांच्या आकांक्षा काय आहेत हें जाणून प्रजा संतुष्ट ठेवण्याचे प्रयत्न करितील अशी आम्हांस उमेद आहे.

# विवेकसुमनें.

संग्राहकः—वामन परशुराम फणसळकर, सातारा.

१ विवेकरितां स्वतः मेणबत्तीप्रमाणें वितळलें पाहिजे.

२ नदी वाहत असली तर ती चांगली, आणि मनुष्य उद्योगशील राहील तर तो चांगला.

३ निःस्वार्थबुद्धीनें केलेल्या प्रत्येक कर्मानें ईश्वर तुमचा ऋणी होतो आणि तो तुमच्या कर्जाची फेड सव्याज करण्यास चुकत नाहीं ही खात्री ठेवा.

४ सर्व शरीरांत एकच ईश्वर आहे, म्हणून ज्या शरीरावर तुम्ही उपकार केले त्याच शरीरानें म्हणजे तुमच्या उपकाराची फेड झाली पाहिजे असें नाहीं. परमेश्वर आपल्या इच्छेप्रमाणें पाहिजे त्या शरीरानें फेड करतो. दुसऱ्याचें देणें देण्यांत ईश्वराकडून कधीं हलगर्जीपणा होत नाहीं हें पक्कें ध्यानांत बाळगा.

५ विरोध आणि सूड यांनीं सुस्थिति प्राप्त होत नाहीं. आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविण्यानेंच आपलें कल्याण होतें.

६ अंतःकरणांत प्रेम ठेवा म्हणजे कोणतीही परिस्थिति तुम्हांला सौख्य-कारकच वाटेल. संकुचित बुद्धीनेंच सर्व प्रकारचीं संकटें, चित्तक्षोभ, हृद्रोग आणि आधिव्याधि उत्पन्न होतात.

७ ज्या ठिकाणीं बुद्धि निराश होते त्या ठिकाणीं प्रेम यशस्वी होतें.

८ प्रेमाच्या अभावामुळेंच दोषदृष्टि उत्पन्न होते.

९ जगांतील वस्तूंकडे, सत्य नित्य आणि अनंत अशा आत्मप्रकाशानें पाहण्यास शिका म्हणजे अक्षय्य परमात्मतत्वाशीं तुमचें तादात्म्य होईल.

१० वृक्ष बाहेरील खतांतील द्रव्यें आपलीशीं करून घेतो, व भोंवतालची माती, पाणी, हवा, प्रकाश यांचें ग्रहण करतो, परंतु त्यामुळें तो कांहीं स्वतः खत होत नाहीं किंवा माती पाणी हवा बनत नाहीं, त्याप्रमाणें आपण परकीयांपासून विद्या, कलाकौशल्य ग्रहण केलीं म्हणून आंतून परकीय बन-ण्याचें कारण नाहीं.

११ क्षणोक्षणीं बदलणारे विचार आणि आकस्मिक वृत्ती याला वश होऊन वहात जावें हें मनोदौर्बल्य व निःसत्वपण होय, आणि आपले विचार

आणि आपली साहजिक मनःप्रवृत्ती यांना कह्यांत ठेवून त्यांचा योग्य उपयोग करून घेणें हे मनोधैर्य व मनःस्थैर्य होय.

१२ दुर्बल मनाच्या मनुष्यांत आणि जोरदार मनाच्या मनुष्यांत जें अंतर आहे तें कांहीं विशिष्ट प्रकारच्या इच्छाशक्तींत आहे असें नाहीं, तर तें मनुष्याच्या विशिष्ट ज्ञानशक्तीच्या एकत्रीभवनांत आहे म्हणजे प्रबल मनाच्या मनुष्यास आपलें चित्त एकाग्र करून आपली सर्व ज्ञानशक्ति एकाच विषयाच्या विचारांकडे सहज लावतां येते, आणि ह्या विशेषावरून मनुष्य ज्ञानाच्या कोणच्या भूमिकेवर आरूढ झाला आहे हें स्पष्ट समजतें.

१३ मनुष्य जेव्हां आपल्या एकाएकीं उद्भवणाऱ्या आणि स्वार्थमूलक वृत्ति पूर्णपणें जिंकितो, आणि उच्चतर आणि प्रसादपूर्ण व सम वृत्तीचा आश्रय करून शांतपणें आपलीं वर्तनक्रमाचीं तत्वें दृढमूल करितो, तेव्हांच त्याच्या बुद्धिविकासास प्रारंभ होतो. ज्ञानविषयक आपलीं वर्तनतत्वें दृढ संकल्पानें मेरूप्रमाणें आचार केल्यानें काय अर्थनिष्पत्ति होते हें पूर्णपणें लक्षांत घेणें हेंच बुद्धिसामर्थ्याची पराकाष्ठा पावण्याचें उगमस्थान व मर्म आहे.

१४ धीर पुरुष शुद्ध परतत्वाचे ठिकाणीं विश्रांति पावला म्हणजे मग त्याचे सर्व मनोव्यापार व लौकिक व्यवहार पूर्ववत् चालले असतांही तो त्या विश्रांति सुखाचाच स्वाद घेत असतो. ज्या पुरुषाला दृढनिश्चयाचें महत्व पूर्णपणें अवगत झालें आहे, तो इतस्ततः भ्रमण करीत नाहीं. तो स्वस्थचित्त असतो, आणि त्याचें चित्त तराजूच्या कांट्याप्रमाणें नित्य समतोलच राहतें. तो मनुष्य विकाराचा दास होत नाहीं, तर तो भाग्यमंदिरांतील एक उत्तम कर्मकाराग्रणी होतो.

१५ जो पुरुष स्थिर आणि ठराविक तत्वावर आपला वर्तनक्रम चालवितो, तोच एक पुरुष कसलाहि प्रसंग गुदरला तरी शांत, निर्भय, आणि स्थिरचित्त राहूं शकतो, तोच एक पुरुष कसोटीच्या वेळीं आणि सत्य आणि स्वार्थ याच्या विरोधी प्रसंगीं, स्वार्थाला पार झुगारून देऊन सत्याचीच बळकट कांस धरून बसतो. अशा दृढ संकल्पाच्या पुरुषास छळ होण्याची भीति किंबहुना मृत्यूचीहि भीति अंगीकृत सत्कार्यापासून परावृत्त करूं शकत नाहीं, किंवा त्याच्यात कांहीं बदलही करूं शकत नाहीं.

१६ स्वार्थैकपरायण पुरुषाचें स्त्री, पुत्र, वित्त, क्षेत्र हे बहिःप्राण असल्यामुळें त्याला स्त्रीपुत्रादिकांच्या वियोगानें दुःख स्वमृत्युपेक्षांही कठिणतर होतें. आणि तो मरणाला सदा भीत असतो. उलट सत्यसंकल्प पुरुषास वरील आपत्तींचें बिलकूल भय वाटत नाहीं, तो ते प्रसंग म्हणजे नित्याच्या

श्रमांतीलच गोष्टी होत असें समजतो, आणि तो त्या प्रसंगानें सत्यापासून किंवा शीलापासुन यत्किंचितही भ्रष्ट होत नाहीं. सत्याचा त्याग करणें, सत्यापासुन पराङ्मुख होणें हाच एक काय तो त्याला दुःखाचा व अनर्थाचा प्रसंग वाटतो.

१७ जो पुरुष ऐहिक भोगसाधनांचा नाश होण्याचा प्रसंग आला असतां अब्रूवरचा किंबहुना प्राणावरचाही प्रसंग गुदरला असतां आपलीं स्वीकृत मतें व आपलीं अंगीकृत तत्वें सोडीत नाहीं, तोच एक महापुरुष होय. त्या महात्म्याचा प्रत्येक शब्द लोक फलाप्रमाणें झेलतात, आणि त्याचें प्रत्येक कृत्य कालाच्या पटावर कायम राहतें. पुढील पिढीचे लोक त्याच सत्पुरुषाचा सत्कार करितात, त्यालाच मान देतात, आणि त्याचीच देवतेप्रमाणें पूजा करितात.

१८ दैविक सात्विक तत्वांवर ज्याप्रमाणानें तुमचा विश्वास असेल, ज्या प्रमाणानें तीं तुह्मांस अवगत होतील, आणि तीं जसजशीं तुम्हांस अपरोक्ष होत जातील, त्याप्रमाणें आणि तसतसा तुम्हांस अध्यात्मशास्त्रांत अधिकार प्राप्त होईल, आणि तो तुमचा अधिकार तुमच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या निरीहता, समभाव, तितिक्षा, प्रशांति, इ. वृत्तिद्वारांनीं व्यक्त होईल.

१९ वैराग्यवृत्तीवरून उत्तम मनोनिग्रह व्यक्त होतो, उदात्त क्षांति ही अध्यात्मज्ञानाची पताकाच होय, आणि लौकिक उद्यमांत संक्षुब्धता, उद्वेग, त्रास, चिंता, भ्रम इ० उत्पन्न होणाऱ्या प्रसंगीं मनाची अविच्छिन्न प्रसन्नता राहणें हें मनुष्याच्या अध्यात्माचें द्योतक होय! महापुरुष तोच होय कीं, ज्या पुरुषाला लौकिक व्यवहारांतही कोणाचें मन यत्किंचितही न दुखवितां व कोणाचा उपमर्द न करतां एकांतांतील आपलें अपारतंत्र्य उत्तम प्रकारें कायम राखतां येतें, अर्थात् ज्या पुरुषांत लोकव्यवहारांतही आपल्या आध्यात्मिक तत्वानुसार वागण्याचें मनोधैर्य असतें तोच पुरुष महाशय होय.

२० आत्मसंयमन, तितिक्षा आणि समभाव या गुणांची वृद्धि करणें म्हणजेच मानसिक आणि शारीरिक बल वाढविणें होय, आणि मनुष्याला जेव्हां आपली ज्ञानशक्ति एकाच तत्वविचारावर एकवटतां येईल तेव्हांच त्याचें उभयविध बल वाढेल.

२१ तुम्ही एकांतांत बसा आणि आपल्या अंदरकी बातेचें पक्षपातरहित बुद्धीनें सूक्ष्म निरीक्षण करा, आणि जर जनांचे आक्षेप सर्व अगर अंशतः तरी खरे आहेत असें तुम्हांस आढळून आलें तर तुम्ही आपले दोष आणि आपलीं छिद्रें दुरुस्त करण्याच्या प्रयत्नास लागा. हें स्वात्मनिरीक्षण, हें स्वदोषदर्शन तरी तुम्हांस जर आपली विचारशक्ति एकाच केंद्रांत आणतां

आली तरच करतां येणार आहे. लोकांनीं केलेली निंदा आणि टीका ही एक आपल्या अंतःसामर्थ्याची परीक्षा पाहण्याची संधीच आहे असें समजा, आणि तुम्ही आपला आत्मविचाराचा मार्ग धृतियुक्त बुद्धीनें आक्रमण करीत रहा. तुमची सज्ञानशक्ति तुमच्याच मालकीची आहे। संवित्च्या प्रेरणेप्रमाणें वागणें हेंच स्वातंत्र्य आणि दुसऱ्याच्या विचाराधीन होऊन वागणें हें पारतंत्र्य होय.

२२ दीर्घकाल आणि सतत अभ्यास करीत गेलें असतां तुमच्या आचरणाचीं तत्वें निश्चित होतील, तुम्हांस आत्मप्रत्यय येईल आणि तुह्मांस अचल विश्रांतीचें स्थल सांपडेल.

२३ स्वार्थैकपरायणता आणि संकुचित वृत्ति, मग ती कोणत्या कां बाबतींत असेना, हीच भ्रष्टशीलता, हेंच मनोदौर्बल्य, आणि हीच मृतप्राय स्थिति होय, उलट स्वार्थत्याग आणि विश्वकुटुंबत्व हीच शीलरक्षा, हेंच औदार्य, आणि हीच जिवंत स्थिति होय.

---


# मोरोपंती वेचे.

आवृत्ती दुसरी — किं. १॥१२.

ग्रंथकारः--ल. रा. पांगारकर, बी. ए.

महाकवि श्रीमोरोपंत यांचीं पाउणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकारांनीं म्हटलें आहे " महाराष्ट्रांतलि रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहान थोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेत—

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चक्रीरामायण ८ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ. विषयांचें सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंताचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें

# साभिप्राय स्वीकार.

१ **श्रीगीता–चमत्कारी टीका:**—सुमारें तीनशें वर्षांपूर्वी होऊन गेलेले प्रसिद्ध सत्पुरुष श्रीरमावल्लभदास यांनीं केलेली भगवद्गीतेवरील ही ओवीबद्ध टीका नुक्तीच प्रगट झाली आहे. रमावल्लभदास हे प्रेमळ व साक्षात्कारी कृष्णभक्त तुकारामरामदासांचे समकालीन होत. महाराष्ट्रांतील भागवत धर्माची पताका यांनीं कोकणप्रांतांत व विशेषतः कारवार जिल्ह्यांत फडकावीत नेली. तेथें यांच्या शिष्यांत 'आवडाबाई' ही फार अधिकारसंपन्न स्त्री झाली. तिच्या बोधनार्थ 'श्रीकृष्णजयन्ती व्रतकथा' नामक पंधरा दिवसांचा उपासनाक्रम रमावल्लभदासांनीं आंखून दिला. तिकडे मल्लापूर येथें 'आवडी मठ' अद्याप प्रसिद्ध आहे. ह्या आवडाबाईंचे वंशज हुबळीचे प्रेमळ भक्त सुब्रावबावा उभयकर यांनीं आपल्या संप्रदायाचे मूळ प्रवर्तक जे रमावल्लभदास यांची बरींच कविता शोधून प्रकाशित केली असून प्रस्तुत ग्रंथही त्यांच्याच सप्रेम संशोधनाचें फळ होय. चमत्कारी टीका हा अर्थात् वरदी ग्रंथ आहे. त्याच्यावर अभिप्राय काय द्यावयाचा? भाविकांनीं तो एकवार तरी अवश्य वाचावा. ओव्या नाथांच्या वळणावर असून सरळ व प्रासादिक आहेत. गीतार्थ आबालवृद्धांत सुबोध व्हावा यासाठींच त्या लिहिल्या आहेत. संतांचें वर्म व गीतेचें रहस्य रमावल्लभदासांच्या मुखानें प्रकट झालेलें सर्वांस सुबोध देणारें आहे. ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत व त्यांचे बंधु विठ्ठल कृष्ण ऊर्फ दिगंबरदास यांनीं ग्रंथाचें सर्व बाळंतपण केलें असून 'गीतादर्श' नामक प्रस्तावना तासगांवचे कुळकर्णी यांनीं लिहिली आहे. ते सारे गृहस्थ प्रेमळ परमार्थप्रवण सज्जन असून यांनीं आपल्या लेखांचीं सुंदर लेणीं अंगावर चढवून ही 'चमत्कारी टीका' लोकांपुढें ठेविली आहे. लोक प्रेमादरानें तिला वंदन करून तिच्या संगतींत आपलें हरपलेलें निजसुख शोधून कृतार्थ होतील अशी आशा आहे. किं. १८४ ह. भ. प. दिगंबरदास, व. श्री. सुब्राव गोपाळ उभयकर, नारायणपूर, हुबळी या पत्त्यावर मागवावें.

**प्राकृत सप्तशती:**—हाही सुंदर प्रासादिक ग्रंथ वऱ्हाडांत होऊन गेलेले सत्पुरुष उत्तमश्लोक यांनीं लिहिलेला रा. सर्वोत्तम रघुनाथ पांडे व इतर

भाविक यांच्या परिश्रमानें प्रगट झालेला आहे. रमावल्लभदासांप्रमाणेंच उत्तमश्लोकही श्रीएकनाथमहाराजांच्याच परंपरेंतील होत. हरिवरदा ऊर्फ दशमस्कंदावरील टीका लिहिणारे सुप्रसिद्ध श्रीकृष्णदयार्णव यांचे उत्तमश्लोक हे शिष्य होत. ग्रंथाला यवतमाळचे प्रसिद्ध पुढारी माधवराव अणे यांनीं विद्वत्तापूर्ण सुंदर प्रस्तावना लिहिली असून छपाईचें कामही फार सुबक झालें आहे. महाराष्ट्रांत अनेकांची कुलस्वामिनी जगदंबा ही आहे. तुळजापूरची भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूर ऊर्फ मातापूर येथील एकवीरा, सप्तशृंगगडावरील देवी हीं देवीचीं महाराष्ट्रांतील चार स्थानें सुप्रसिद्ध आहेत. तुळजापुरची भवानी ही रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांची कुलस्वामिनी होती, मातापूरची एकवीरा ही एकनाथमहाराजांची कुलस्वामिनी होती. महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती हीं मूळमायेचीं तीन रूपें असून यांची उपासना सर्वत्र आहे. जगदंबेच्या उपासकांचा 'सप्तशती' हा मूळ संस्कृत ग्रंथ वेदतुल्य आहे; परंतु मराठींत यावर असा प्रासादिक ग्रंथ नव्हता ती उणीव या ग्रंथानें भरून काढली आहे. शिवभक्तांना जसा शिवलीलामृत, दत्तभक्तांना जसा गुरुचरित्र प्रिय आहे तसा देवीभक्तांना हा उत्तमश्लोकांचा प्राकृत सप्तशती ग्रंथ अत्यंत प्रिय झाला पाहिजे असें आम्हांस वाटतें. संस्कृत न जाणणाऱ्यांची संख्या केव्हांही अतिशय असणार हें जाणून मराठी संत कवींनीं संस्कृतांतलें भांडार मराठींत आणलें आहे. प्राकृत जनांच्या उद्धाराचाच हेतु सत्पुरुषांच्या ग्रंथरचनेच्या मुळाशीं असतो. गीतारहस्य जाणणाऱ्यांची जशी ज्ञानेश्वरीनें, भागवतरहस्य जाणणाऱ्यांची जशी नाथभागवतानें सोय लावली, तशी देवी उपासकांची सोय या ग्रंथानें लावली असल्यामुळें सर्वच देवी उपासक नवरात्रांत व नित्य नेमांत या ग्रंथाचीं पारायणें चालू ठेवतील अशी आह्मांस उमेद आहे. ग्रंथ सुबोध, प्रासादिक आहे एवढें लिहिलें म्हणजे पुरे. किं. रु. ३. पत्ता:— चिटणीस, उत्तमश्लोकग्रंथप्रकाशक मंडळ, उमरखेड, वऱ्हाड.

**३ माधवानुजः**—अर्वाचीन कवींत माधवानुज उर्फ कै. डॉ. काशीनाथ हरी मोडक, कल्याण, हे चांगल्यांपैकीं कवि होऊन गेले. यांचा कवितासंग्रह त्यांचे चिरंजीव रा. चिं. का. मोडक यांनीं प्रसिद्ध केला आहे, प्रकाशकः-गणेश महादेव आणि मंडळी, ६२१ गिरगांव मुंबई, किं० रु. २. माधवानुजांचा आमचा चांगला स्नेह होता, त्यांची कविता चांगलीच आहे, पण कवितेपेक्षां आम्हांला कवि आवडत असत. ते अत्यंत बाळबोध वळणाचे, साधे, सीधे व सज्जन होते. त्यांनीं कविपणाचा डौल कधींहि मिरवला

नाहीं. संसारांतल्या साध्या डोळ्यांपुढून नित्यशः घडणाऱ्या गोष्टी पाहून कधीं कधीं त्यांना त्या गाव्यात असें वाटे. आपली स्थिति आहे यापेक्षां अधिक सुधारावी, अधिक सुखानें आपल्या बुद्धिशक्तीचा उपयोग करून दाखवितां यावा, असें कोणास वाटत नाहीं ? पण हें फार थोडयांस साधतें. गरिबीशीं व इतर सांसारिक आपत्तींशीं झगडतांना व मूळच्या नाजूक प्रकृतीची विकृती होऊन शरीरांत रोगानें बिऱ्हाड ठेवलें असतांना यांची वृत्ति समाधानी व आनंदी दिसे, पण आंत जें नैराश्य पसरलें होतें त्याच्या झटा यांच्या कवितेवर सर्वत्र पसरलेल्या दिसतात. इंग्रजी कवि शेले याची अशीच स्थिति होती. कवि निष्पाप, सुजन्म, साधा, भाषा साधी व गोड; विषय नेहमींच्या प्रसंगांतले; अधिक उंचीचें उड्डाण नाहीं, पण खालच्या तमाच्या दरीचा वाराही नाहीं; मुलें बाळें, इष्टमित्र, उपवनें, चंद्रतारका, इ० निसर्ग सृष्टीवर प्रेम, पण अंतरांत औदासीन्याची छाया असें माधवानुजांचें थोडक्यांत वर्णन करितां येईल. रा. माटे यांची मार्मिक पण यथार्थ प्रस्तावना, चिरंजीवांनीं लिहिलेलें सरल चरित्र हेंही वाचनीय आहे. दीपविसर्जन, मूर्तिकार, गोड स्वप्न, वनभूमिका, कृष्णाकोयनांचा संगम, जग, अळवावरचें पाणी, इ० काव्यें सुंदर आहेत.

---

## सन्तचरित्रमाला.

### ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यापैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें या ग्रंथासाठींच लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यापैकीं सुमारें २८-३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं असून ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त तिरुमाल्वार, सूरदास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीतारामहाराज, मंगलवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव-महाराज, भटजीबापू, सोनगीरचे महाराज; मोरचे दत्तंभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु, इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा. पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्का (भालेराव) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही (का. कृ. लेले, धार) सिद्धारूढ महाराज (फणसळकर), चिदंबर दीक्षित (विठ्ठल कृष्ण कामत) दाजी महाराज टाकळीकर (काळेकर), बलभीमबोवा साडेकर (श्री. खाजगीवाले) शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघूनाथ भटजी नाशिककर. (प्रो. लक्ष्मणशास्त्री केळे) इ०. पृ. २५६. पांच फोटो किं. रु. १॥८ व्ही. पी. नें १॥१३.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ

# श्रीसमर्थसंजीवनी
## उर्फ
## रामदासी वेंचे.


महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वीं आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानां- वर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. (१) प्रपंच (२) राजकारण (३) परमार्थ व (४) विविधविषयक प्रक- रणें अशा चार भागांस मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा ' सारांश ' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समा- जोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि राष्ट्रकल्याणाची कळ- कळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बाइंडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन, व्ही. पी. नें २८६

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १८ मास १२ वा | श्रावण १८४७ आगष्ट १९२५ | नवें वर्ष ५ वें अंक ८ वा. |



संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्हीपीनें रु. ३।८।३

मुद्रक: लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.




| | | |
|---|---|---|
| १ | मंगलाचरण ... ... ... ... | १–२ |
| २ | श्रीगणेशोत्सव ... ... ... ... | ३ |
| ३ | साधूंच्यां संगतींत ... ... ... | ५–६ |
| ४ | संत माताजींची गोष्ट ... ... ... | ७–९ |
| ५ | अभिमानत्यागानें शाश्वत सुख ... ... | १०–१२ |
| ६ | श्रीजगन्नाथ यात्रा ... ... ... | १३–१८ |
| ७ | केशवस्वामींचीं पदें ... ... ... | १९ |
| ८ | सांप्रतचे वैरागी ... ... ... ... | २०–२१ |
| ९ | श्रीमद्भागवत व तुकोबाराय ... ... ... | २२–२४ |
| १० | साभिप्राय स्वीकार ... ... ... | २४–२९ |
| ११ | महात्माजींचे टीकाकार ... ... ... | ३०–३२ |
| १२ | दासबोधाचा समागम ... ... ... | ३२–३५ |
| १३ | उतावीळ ... ... ... ... | ३५–३७ |
| १४ | ताजे मननामोद ... ... ... ... | ३७–३९ |


---

## सप्टेंबरचे वर्गणीदारांस:—

सप्टेंबर पासून ज्यांचे वर्ष सुरू होतें त्याच्या नांवामागें जो आंकडा असतो त्याचा पहिला अंक ९ असा आहे. नऊ हजारी वर्गणीदार सगळे सप्टेंबरचे आहेत. त्यांनीं कृपा करून हा अंक हातीं पडतांच पुढील सालची वर्गणी **रुपये तीन मनी ऑर्डरनें पाठवावी** म्हणजे त्यांजकडे पुढील अंकाची व्ही. पी पाठविण्याचें कारण पडणार नाहीं व आमचे श्रम वांचून त्यांचे ३ आणे वांचतील. ज्यांना पुढील सालीं मासीक सुरू ठेवणें नसेल त्यांनीं तसें कळवावें. व्ही. पी परत करून आमचें व्यर्थ नुकसान कोणी करूं नये.

## पुढील अंकांत—

नागपूरचे मोतीबाबा जामदार यांचें चरित्र व २ नवविधाभक्ति हे उत्कृष्ट लेख येणार आहेत.



## मनमोहन मुरलीवाला.

अंग वक्र अधरीं धरि पावा । गोपवेष हरि तोचि जपावा ।
वामबाहुवरि गालचि डावा । तो ठसा स्वहृदयांत पडावा ॥ १ ॥
गायनीं अमर जे अभिमानी । आणि देवललना स्वविमानीं ।
त्या स्त्रियांसहित दैत्यजनारी । मोहिले म्हणति या व्रजनारी ॥ २ ॥
मोहती व्रजपशू मृग गाई । आमुचें नवल काय अगाई ! ।
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें । वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें ॥३॥
मातृस्तनीचा रस आननांत । तों होय वेणुध्वनि काननांत ।
गळे, गिळेना पय वासुरांतें । आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ ४ ॥
उचलुनी श्रवण श्रवणामृता । पशु पिती, रस जीवन तो मृता ।
जवळ दूरहि वृंद असा असे । मधुवनीं हरि जेथ उभा असे ॥ ५ ॥
मल्लवेष रचिला अभिराम । श्रीधरप्रभुसवें बलराम ।
मोरपत्र मुकुटीं तरुपत्रें । नेत्र सुंदर जसीं शतपत्रें ॥ ६ ॥
सये ! असा म्यां हरि देखिला गे । तो प्रेमरंगीं मनिं रेखिला गे !
पाचारितो वेणुरवेंचि गाई । आश्चर्य तेव्हां करितों अगाई ! ॥ ७ ॥
गोधनीं बहु पुढें न वजावें । ठाव एकाचि धरूनि थिजावें ।
वाजवी म्हणुनि जो निज पावा । कृष्ण तोचि हृदयांत जपावा ॥८॥
पशु जसे ध्वनिनें स्थिर राहती । तशिं जळेंहि नद्यांतिल वाहती ।
व्रजवधूसम होति नद्या सये । सुकृत अल्प विकल्प न यांस ये ॥९॥
लतांमाजि कांटे तरूंमाजि पानें । उभे रोम ते वेणुपीयूषपानें ।

फळीं आणि पुष्पीं तर्यी वृक्षभारीं। सुखें त्या दिसे त्यांत तो कैटभारी
गुंजारवें भ्रमर गुंजति त्यांत देवें। वेणुध्वनी मिसळला मृदु वासुदेवें।
आपादकंठ वनमाळ असी विराजे। ते सेविती मधुप होउनि देवराजे
वनीं राजहंसीं पिकांनीं शुकांनीं। ध्वनी गोड तो आइकोनी सुकानीं।
त्वरें येउनी सेविलें श्रीहरीतें। महापापही नाम ज्याचें हरीतें ॥१२॥
वदन लावुनि ते सकल क्षितीं। नयन झांकुनि अन्य न लक्षिती।
स्थिर मनें करुनी स्थिर आसना। करिति ते खग कृष्णउपासना ॥१३॥
स्वयें तुष्ट संतुष्टवी तो जगातें। अगांतें नगांतें मृगांतें खगांतें।
असें क्रीडतां काळ मध्यान्ह झाला। घनें देखिलें तों सख्या त्या अजाला
क्षणी उष्ण लागे सख्या केशवातें। म्हणोनि त्वरें येउनी लेश वातें।
मुकुंदावरी मेघ तो छत्र झाला। करी स्वात्मदेहार्पण श्रीअजाला ॥
कमलसंभव आणिक शंकर। त्रिदशनाथ सर्व सुर किंकर।
म्हणति सर्वहि त्यास 'नमो हरी'। करुनि मोहित जो मन मोहरी ॥१६॥

—वेणुसुधा.

---

# मोरोपंतांचे वेंचे.

आवृत्ति दुसरी. कि. १॥२.

ग्रंथकारः—ल. रा. पांगारकर, बी. ए.

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाउणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवातील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकारांनीं म्हटलें आहे. "महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहान थोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेतः-

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चकोरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ. विषयांचें सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंतांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# श्रीगणेशोत्सव.

भाद्रपद पूर्वपक्षांत येणारा श्रीगजाननाचा दाशाहिक उत्सव समीप येत असून ठिकठिकाणच्या लोकांची पूर्वतयारीही चालू झाली आहे. हा उत्सव चालत आहे त्यापेक्षां अधिक धर्मबुद्धीनें उपासनाबुद्धीनें चालला पाहिजे असें आम्ही सालोसाल सांगत आहों. श्रीगणेशमूर्तीची सशास्त्र प्राणप्रतिष्ठा करून सविधि पूजाअर्चा, वेदमंत्र, कथाकीर्तनें, पुराणेंप्रवचनें व व्याख्यानें वगैरे प्रकारांनीं लोकांत भगवद्भक्ति, परस्पर प्रेम व ऐक्यभाव वाढेल अशा पद्धतीनें चालला म्हणजे 'मंगलाचें मंगल' असा परमात्मा सर्वांचें मंगलच करील यांत संशय नाहीं. मेळ्यांच्या पदांत व व्याख्यानांत राजस व तामस मनोवृत्तींचा धुमाकूळ पुण्यांत यंदा घातला जाणार नाहीं असें सुचिन्ह दिसत आहे. 'आपापसांतील दुहींत मेळ्याच्या पदांनीं पडणारी भर वांचावी' म्हणून पुण्यांतील कित्येक मेळेवाल्यांनीं 'यंदाच्या उत्सवांत चालू राजकीय, धार्मिक अगर सामाजिक अशा कोणत्याही वादासंबंधाचा मनास दुखविणारा मजकूर असलेलीं पदें आम्हीं म्हणणार नाहीं किंवा करविणारही नाहीं' असें जाहीर केलें आहे ही फार चांगली गोष्ट झाली आहे. सर्वच ठिकाणचे सर्वच मेळेवाले असाच निश्चय करितील तर उत्तम होईल. मेळेवाल्यांनीं हा आपला निर्धार जाहीर केला आहे त्याप्रमाणेंच व्याख्यानांचाही बंदोबस्त होईल तर सर्वोत्कृष्ट होईल. गुदस्ता पुण्यास एका व्याख्यात्यानें महात्मा गांधीजी व गुजराथी समाज यांच्या संबंधानें जे वाईट उद्गार काढले त्याचा किती दुष्परिणाम झाला हें लोकांच्या स्मरणांत असेलच. असलीं व्याख्यानें उत्सवांत न होऊं देण्याबद्दल सर्वांनींच फार जपलें पाहिजे. मतभेद असले तरी सभ्य भाषेनें, संभावितपणानें सांगतां येत नाहींत असें नाहीं. सर्व बाजूंनीं फाटलेल्या व फाटत जाणाऱ्या समाजाला प्रेम, ऐक्य व शांती या सद्भावनांचा उठाव करणारे व्याख्यातेच पाहिजेत. व्याख्यातेच काय, वर्तमानपत्रकारही सात्विक मनोवृत्तींचेच असावेत. सांप्रत काळीं महात्माजींना राजकारणांतून किंवा लोकसेवेंतून उठविण्याचा कांहीं मराठी पत्रांनीं चंग बांधला आहे हें आमच्या मतें अत्यंत गैर आहे. थोर राजकारणी पुरुषांचे अंदाजही चुकत नाहींत किंवा ते अच्युत आहेत असें नाहीं, पण त्यांच्या खऱ्याखोटया चुक्यांचा बाऊ करून दाखविणें हें खरोखर फार वाईट आहे. थोरांचा शुद्ध हेतु ओळखून त्यांचा बोज राहील अशा बेतानें चुक्या होत असतील तर दुरुस्त करण्याचे उपाय प्रेमभावानें सुचविणें योग्य नाहीं असें कोण म्हणेल ? तात्पर्य नुसती मेळ्यांच्या पदांनीं दुरुस्ती होणारी नाहीं, व्याख्यानें व लेखही वरील पद्धतीनें सात्विकपणाचेच पाहिजेत. परस्पर प्रेमभाव वाढेल तरच चळवळ लोककल्याणकारी होईल. समाजांत शुद्धभाव वाढेल अशाचसाठीं वाणी व लेखणी खर्च झाली पाहिजे, तरच देशाचा भाग्योदय होईल.

---

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षु'चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतःस्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे.प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिलाः**--१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४ मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानाची उपपत्ति. ७ पाडव्यांची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म महोत्सव. ले. १ते४ .१०श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२होळीची मीमांसा. १३भक्तिमीमांसा. १४ भारतवीर १५श्रद्धा. १६वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७व्यसनांतून सुटावें कसें? १८ संक्रांतीचा हलवा. १९श्रीशिवलिंगाचें रहस्य. २०हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. आमचे पुढारी संतच. २६प्रेमामृतमाधुरी. २७डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसराः**—१आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४मामामामींचा संसार. ५सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतन्या थमालले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार? १३साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर १९ मातृभाषेचें प्रेम. २०दयेचे प्रकार. २१वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३वाङ्मयतप. २४अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७निंदकांचे उपकार. २८ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद (या सदराखालीं १९ स्फुटें आहेत.)

पत्ता—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# साधूंच्या संगतींत.

१

श्रीअच्युतबावा म्हणून दक्षिण हैद्राबादेंत एक सत्पुरुष कांहीं वर्षांखालीं होऊन गेले. त्यांचे दर्शनास इतर अनेक लोकांबरोबर एक विद्वान् गृहस्थ एकदा गेले होते. लोकोपचाराप्रमाणें वंदन करून ते खालीं बसले व कांहीं तरी बोलायला पाहिजे म्हणून म्हणाले : 'आम्ही आत्मस्तुति परनिंदा सोडून दिली आहे!' अच्युतबावांनीं तें ऐकलें व नेणतेपणाची मुद्रा धारण करून त्यास विचारलें, 'आपण काय म्हणालांत तें समजलें नाहीं.' सभा तटस्थ झाली. तो गृहस्थ पुन्हा म्हणाला, 'अर्थ उघड आहे.' बावा म्हणाले, 'तोच तर सांगा.' लोक उमगले व तो गृहस्थही उमगून वरमला!

आमचे कांहीं वाचक अजूनही उमगले नसतील तर त्यांचेसाठीं फोड केली पाहिजे. बावांचा भावार्थ असा कीं, 'मी आत्मस्तुति परनिंदा सोडून दिली आहे' असें म्हणण्यांत आत्मस्तुति होते व परनिंदाहि होते! मी आत्मस्तुति सोडून दिली आहे या ह्मणण्यांतच आत्मस्तुति होते व मी परनिंदा करीत नाहीं असें ह्मणण्यानें दुसरे परनिंदा करितात हा ध्वनि निघून परनिंदाही घडते! 'मौनं सर्वार्थसाधनम्!'

२

हुबळीस एक सद्गृहस्थ श्रीसिद्धारूढस्वामींच्या दर्शनार्थ एकदा गेले होते. चार दिवस राहण्याचा त्यांचा बेत होता. पांचवे दिवशीं ते निघणार तों त्यांस ताप आला व तो तीन दिवस निघाला नाहीं. आठवे दिवशीं जाण्यापूर्वीं स्वामींचे दर्शनास ते गेले. स्वामींच्या सभोंवार तीन चार हजार लोक बसले होते. हे गृहस्थ दर्शनास गेले तों स्वामींची लहर लागून यांचे हातीं विणा आला व कीर्तनाची आज्ञा झाली. कीर्तन प्रहरभर झालें. सर्वांस आनंद झाला. एक श्रोता म्हणाला, "हे तीन दिवसांमागें जाणार होते, पण मग आजचा हा आनंद कसा झाला असता?" यावर स्वामी हंसून म्हणाले, 'अहो! सज्जनांवर संकटें येतात तीं लोकांच्या कल्याणासाठींच येत असतात!'

३

पुण्यास श्रीअक्कलकोट स्वामींचे सच्छिष्य काळबोवा ओंकारेश्वराचे ओरींत राहत असत. ते मुखानें नेहमी 'काळ आला काळ आला' असें म्हणून लोकांस सावध करीत, म्हणून तर त्यांस काळबोवा म्हणत. आमची आजी पुण्यास व वडील मावळांत आमचे पौड गांवीं. एकदा आजी बोवांचे दर्शनास गेली असतां तिला पाहूनच ते म्हणाले, 'कशाला आलीस जा. नवऱ्या नदीवर गेल्या !, आजी हिर्मुष्टी होऊन घरीं गेली. सायंकाळीं वडील निवर्तल्याची बातमी आजीस कळून तिला काळबोवांच्या अतींद्रिय ज्ञानाबद्दल आश्चर्य वाटलें. साधूंच्याकडे Wireless कशी खेळत असते त्याचें हें प्रत्यंतर आहे. वरील गोष्ट आजींच्या तोंडून मीं अनेकवार ऐकली आहे. ही गोष्ट आषाढ वद्य १२ शके १७९५ मध्यें घडली.

---


प्रती फारच थोड्या शिल्लक आहेत.

# श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र.

**पृष्ठसंख्या ५२८  किंमत रु. ३  ट. ख. सह रु. ३।८.**

**ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

सतत आठ वर्षे हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या, श्रीक्षेत्र देहू येथील जुनीं दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून. आणि गाथ्यांचे व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ कालनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवीत्वस्फूर्ति ८ चित्तशुद्धीचे उपाय ९ सगुणभक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि ( उपदेशसार ) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण. अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत.

ग्रंथांत सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपर्ति पांडुरंग २ तुकोबाचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान. यांत प्रसंगानुसार तुकोबांचे अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व अवश्य तेथें विवरणही दिलें आहे.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.

# संत माताजींची गोष्ट.

१ गुलाबचंद नांवाचा एक कोट्यधीश व्यापारी मुंबईस महालक्ष्मीकडे राहत असे. आरोग्य, संपत्ति, संतति, लौकिक सर्व बाबतींत गुलाबचंदाचें घर म्हणजे संसारी लोकांस एक उत्तम नमुनाच होता. त्याची बायको मोठी दयाधर्मशील स्त्री होती. नवराबायकोचें अन्योन्य प्रेमही वाखाणण्यासारखें होतें. बायकोचें लक्ष जितकें देवाधर्माकडे व साधुसंतांकडे होतें तितकें नवऱ्याचें दुर्लक्ष होतें, मात्र तो नास्तिक नव्हता. त्याला सत्संग कधीं घडलाच नव्हता. सत्संगावांचून भगवत्प्रेम कधींही उत्पन्न होत नाहीं. भगवद्भक्त भेटल्याशिवाय जनांचीं हृदयें हरिप्रेमरसाची गोडी चाखायला पात्र होत नाहींत. लक्ष्मीबाई ( हें गुलाबचंदाच्या बायकोचे नांव होतें ) हिचा काळ हरिसेवेंत व परोपकारांत जात असल्यामुळें तिच्या चित्ताला समाधान होतें, पण हें समाधान आपल्या पतीच्या चित्ताला कधीं मिळेल एवढीच तिला तळमळ होती. गुलाबचंदाच्या चित्तांत द्रव्याशिवाय कसलाच विचार स्वप्नांतही येत नसे. बँका, शेअरबाझार, एक्सचेंज, सोन्याचांदीचे व हरएक जिनसांचे भाव, खरेदीविक्री, खर्च व शिल्लक यांशिवाय त्याच्या डोक्यांत कांहींच नसे. झोपेंतसुद्धां तो हाच व्यवहार बरळत असे !

२ गुलाबचंदाचा वाडा राजवाड्यासारखा शृंगारलेला असे. तेथें प्रत्यक्ष लक्ष्मीच नांदत असल्यामुळें ऐहिक वैभवाला कांहींच कमतरता नव्हती फ्रान्स व जर्मनी येथून उत्तम फर्निचर आणून सारा वाडा सजवलेला होता. वाड्याच्या भोंवतीं उत्तम व प्रशस्त बाग असून तींत नाना प्रकारचीं फुलझाडें व फळझाडें लावलेलीं असत. एके दिवशीं रात्रीं पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें असतांना व चोहोंकडे शांततेचें साम्राज्य पसरलेलें असतांना गुलाबचंद व लक्ष्मीबाई यांच्यांत खालीं दिल्याप्रमाणें संवाद झाला: गुलाबचंद लक्ष्मीबाईस म्हणाला:—

" आज महिनाभर मी आपल्या मुनीमाच्या साह्यानें आपल्या एकंदर जिंदगीची मोजदाद करण्यांत गुंतलों होतों. त्याचा हिसाब आज पुरा झाला. "

" मग शेवटीं काय ठरलें ? "

" आपली एकंदर इस्टेट आज आठ कोटींची आहे. हा हिसाब पाहिल्या-

पासून माझ्या मनांत एक विचार घोळत आहे तो हा कीं, दरएक पिढीस दोन कोटी याप्रमाणें चार पिढ्यांची आपणांस काळजी नाहीं इतकी संपत्ति आज आपल्यापाशीं आहे; पण पांचव्या पिढीचें कसें चालेल याची मला मोठी काळजी लागून राहिली आहे ! ”

२ लक्ष्मीबाईला पतीच्या मोहवशतेचें नवल वाटलें व मनांतून पतीची तिला कींवही आली. आपल्या पतीचें देवधर्म—साधुसंतांकडे लक्ष कसें लागेल याचा विचार तिच्या मनांत नेहमींच घोळत असे. ह्या प्रसंगीं त्या विचारानें उसळी मारली. ती नम्रतेनें विषय बदलण्याच्या हेतूनें म्हणाली:—

“ आपल्या समोर माताजी राहतात त्यांना आपण पाहिलें आहे काय ? ”

“ ओझरतां चार दोन वेळ पाहिलें आहे. येथील बरीच चांगली चांगली मंडळी त्यांजकडे जात असतात. त्या कोण आहेत ? तूं त्यांच्याकडे कधीं जातेस काय ? ”

“ होय. कधीं कधीं जात असतें. माताजी एक थोर बाई आहे. त्यांचें वैराग्य, भक्ति व ज्ञान सर्वच कांहीं अपूर्व आहे. त्यांना मुलेंबाळें नातवंडें वगैरे सर्व आहेत. त्याचा पति वारून पंधरा वर्षे होऊन गेलीं. पति ज्ञानी होता, तोच त्यांचा गुरु होय. त्याजपाशींच त्या उपनिषदें व भागवत शिकल्या. माताजींचा पति वारला तेव्हां पतीला एक लाख रुपये कर्ज होतें, तेवढीच त्याची इस्टेटही होती. पतीला सावकाराच्या ऋणांत ठेवायचें नाहीं म्हणून माताजींनीं सर्व इस्टेटीची विल्हेवाट लावली, व ‘योगक्षेमं वहाम्यहम्’ ह्या भगवंताच्या वचनावर विश्वास ठेवून राहिल्या. माताजी फार प्रेमळ भक्त आहेत. देवावर त्यांची निर्मळ निष्ठा आहे. कर्ता हर्ता भर्ता देवच आहे, देववांचून कांहींच नाहीं असें त्या नेहमीं बोलत असतात, व देवानें त्यांच्या संसाराचें ओझें वाहिलें आहे. त्यांच्या घरीं समृद्धि व शांति दोन्ही नांदत आहेत. कांहीं कमी नाहीं. चिंता त्यांना शिवत नाहीं. देवाचें नांव घेत त्या आनंदांत असतात. त्या खचित थोर भक्त आहेत. ”

“ हें सगळें खरें पण चरितार्थ कसा चालतो ? ”

“ हीच तर मौज आहे. त्या उद्यांची काळजी करीत नाहींत व आजचीही करीत नाहींत. कोठून तरी सामानसुमान येतें, शिधा येतो, कोणी कांहीं आणून देते. दर्शनेच्छु पाहुण्यांचीही गर्दी असते तरी कमतरता कधींच नसते.”

“ तर मग उद्यां तूंच २० माणसांचा शिधा त्यांजकडे नेऊन दे. ”

“ नाहीं. तें काम आपणच करा.”

४ अशी समाधानी बाई आपण स्वतःच पहावी, चार शब्द तिच्याशीं बोलावेत अशी गुलाबचंदांना इच्छा झाली. त्याप्रमाणें ते दुसरे दिवशीं सकाळीं ८ वाजतां मोठा शिधा नोकरांच्या डोक्यावर देऊन माताजींकडे गेले. माताजी शांतपणें गादीवर बसून गोष्टी करीत होत्या. घरांत शांतिसुख नांदत होतें त्याचा स्पर्श शेटजींच्या नित्य तळमळणाऱ्या चित्ताला होऊन त्यांना नवल वाटलें. 'दर्शनादेव साधवः' शेटजींना अलोट संपत्तींत लोळत असतांना जें परम शांतिसुख जन्मांत कधींच भेटलें नव्हतें तें माताजींच्या घरांत अणुरेणूंत भरलेलें दिसून परमाल्हाद झाला. 'हेंचि देवाचें दर्शन । जेथें राहे समाधान' ह्या साधुवचनाचा त्यांना साक्षात्कार झाला. एकदम् उपशमसुखांत त्यांचें चित्त निमज्जन झालें व त्यांनीं पूज्यबुद्धीनें माताजींच्या पायांवर मस्तक ठेवलें. माताजींचे त्यांचे कुशलप्रश्न झाले. शेवटीं शिधा आणल्याचें सांगून तो स्वीकारण्याची शेटजींनीं नम्र विनंति केली, तेव्हां माताजी म्हणाल्याः—

" आजची तर्तूद नारायणानें केली आहे, तेव्हां आज कांहीं शिध्याची गरज नाहीं. आणला तसा घेऊन जा, कोणी गरजू असतील त्यांना द्या. "

" पण उद्यांला तरी लागेलच ना ? उद्यांचा म्हणून ठेवून घ्या. "

" काय ? उद्यांचा विचार आज करूं ? छे ! छे ! उद्यांचा विचार उद्यां. ज्यानें आजची तजवीज केली तो काय उद्यांची करणार नाहीं ? उद्यांची उद्यां. या क्षणाचा भरंवसा नाहीं तर उद्यांचा संग्रह व काळजी आज कां म्हणून करायची ? नारायण दयाळु आहे. सर्व त्याचीं लेंकरें आहेंत. तो सर्वांचा सर्वत्र सांभाळ करितो. 'स रक्षिता रक्षति योहि गर्भे.'

शेटजींचें मस्तक पुरें लवलें. पांचव्या पिढीची काळजी करणाऱ्या शेटजींचे डोळे उघडले. माताजींनीं त्यास बोध केला. त्यांनीं त्याजपासून भागवतधर्माची दीक्षा घेतली व उदारहस्तानें द्रव्याचा परोपकारांत वेच करण्यांत व भगवच्चिंतनांत त्यांचा काळ जाऊं लागला.

---


# मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—ल. रा. पांगारकर, बी. ए.

बी. ए च्या परीक्षेला मुंबई युनिव्हर्सिटीनें नेमलें आहे.

सदर ग्रंथाच्या प्रति पुष्कळ वर्षे आमच्या आम्हासच उपलब्ध होत नव्हत्या. ह्या नुकत्याच मुंबईस एका बुकसेलरकडून मिळाल्या. रा. पांगारकर यांच्या ग्रंथाचे सेटस् पुरे करण्यास ज्यास पाहिजे असतील त्यांनीं व बी ए.च्या विद्यार्थ्यांनीं ताबडतोब मागणी करावी. ग्रंथ दुर्मीळ आहे. पृ. सं. ६२० किं. रु. २॥८ ट. ख. वेगळा ०।०.

पत्ताः—व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें.

# अभिमानत्यागानें शाश्वतसुख.

( द. ज. माहुलकर, बडोदें ).

१ एक गरीब पंधरा वर्षांची मुलगी होती. बिचारीला जगांत मायेचें असें कोणी राहिलें नव्हतें. सर्व दिवस भिक्षा मागावी आणि रात्रौ एखाद्या घराच्या आश्रयाला निजावें, अशा रीतीनें ती आपलें दुःखमय आयुष्य कंठीत होती. एके दिवशीं खेडयाच्या बाजूनें जात असतां एका खाडयांत एक गाढव पडलेलें तिला दिसलें. त्याचा एक पाय दुखवला होता, त्यामुळें तें गाढव कामाला निरुपयोगी झालें असें पाहून त्याच्या धन्यानें हांकून दिलेलें होतें. त्याच्या दुखावलेल्या पायाला औषधोपचार न झाल्यामुळें तें दुःख वाढत जाऊन शेवटीं तें गाढव मरणाधीन होऊन त्या खाडयांत पडलें होतें. त्या गरीब मुलीची दृष्टी त्याच्याकडे जातांच तिला त्याची दया आली. आपली स्थिति आणि त्या गाढवाची स्थिति सारखीच आहे असा विचार मनांत येऊन ती त्याजवळ गेली व त्याची शुश्रूषा करूं लागली. हा प्रकार जेव्हां रस्त्यानें जाणाऱ्यांच्या दृष्टीस पडला तेव्हां ते हंसूं लागले, परंतु मुलीनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. पुढें थोडया दिवसांनीं तें गाढव चांगलें झालें तिनें बाजूला एक लहानसें झोंपडें उभारून त्याच्या आश्रयांत त्या गाढवाला ठेवलें. कांहीं दिवसांनीं तें गाढव मेलें. तेव्हां त्याला जमिनींत पुरून त्यावर एक लहानसा स्तंभ उभारला. तेथें ती पूजाअर्चा करूं लागली. हा प्रकार पाहून लोक तिला विचारूं लागले तेव्हां तिनें सांगितलें कीं, " भगवान् विष्णु त्या गाढवाच्या स्वरूपांत आपली सेवा घेण्याकरितां आले होते. आपली सेवा घेणें पूर्ण होतांच विष्णूनें तो गाढवाचा देह सोडला. आतां कांहीं दिवसांनीं ते आपणांस विमान पाठविणार आहेत. " ह्या तिच्या विश्वासाप्रमाणें खरोखरीच तिला विमान आलें, आणि ती मुलगी विष्णूच्या पुढें गेली तेव्हां ते म्हणाले, " तूं केलेल्या सेवेचा तुला मोबदला मिळाला आणि तूं येथपर्यंत आलीस; परंतु विष्णुपद प्राप्त होण्याकरितां तुला पुनः मृत्युलोकीं जावें लागणार आहे. " तें ऐकून त्या मुलीनें हात जोडून विचारलें, देवाधिदेवा ! मी येथपर्यंत आलें आहें, आतां मला पुनः परत कां पाठवितां ? ' तेव्हां विष्णु म्हणाले, ' येथपर्यंत येण्याची तुझी तयारी झाली परंतु येथें अक्षय्य निवासाकरितां तुला आणखी एक जन्म घेणें अवश्य आहे. आतां-

पर्यंतच्या तुझ्या पुण्याईनें तुला पुढला जन्म राजकन्येचा मिळेल आणि तेथें तुला पूर्वस्मृति होऊन मी दर्शन देईन.' इतकें झाल्यावर त्या मुलीनें विष्णूच्या चरणाचें वंदन केलें, आणि देवाच्या सांगण्याप्रमाणें तिचा राजघराण्यांत जन्म झाला. राजाला ती एकुलती एकच कन्या असल्यामुळें तिचा बाळपणांतील काळ अत्यंत लाडांत आणि सुखांत गेला. ती उपवर झाली तेव्हां राजानें तिच्या विवाहाची तयारी चालविली. ठिकठिकाणच्या राजपुत्रांच्या तसविरी येऊं लागल्या. परंतु समारंभ होण्यापूर्वी एकाएकीं तिला पूर्वस्मृति झाली, आणि तिनें स्वतःला पूर्वीच्या भिकार स्थितींत पाहिलें. तिनें लग्नाचा विचार रद्द केला आणि बापाला सांगितलें कीं, 'मला लग्न करावयाचें नाहीं.' राजालाही आपला विचार बदलावा लागला. नंतर त्या राजकन्येच्या डोक्यांत विचार येऊं लागले कीं, 'गतजन्मीं तेवढी सेवा केली, तर ह्या जन्मीं आपणांस सुख देणारा राजकन्येचा जन्म प्राप्त झाला, तर आतां अशा अनुकूल स्थितींत जर जास्त सेवा केली तर त्याचा मोबदला फार थोर मिळेल!' असा विचार करून गरिबांना अन्न आणि वस्त्र दान देण्यास तिनें सुरुवात केली. राजानें मुलीच्या इच्छेप्रमाणें गरीबांना अन्नवस्त्र वांटण्याकरितां निरनिराळे अधिकारी नेमून मोठा धर्म सुरू केला. राजकन्या राजवाड्याच्या गच्चीवर मखमली कोचावर बसून त्या सर्व गरीबांना पाही आणि त्यांना सेवकांनीं दान केल्यावर प्रत्येकाला आपणासमोर बोलावून विचारी कीं, 'एकाकरितां इतकें झालें तर आतां ह्या इतक्यांकरितां किती होईल?' ह्या तिच्या विलक्षण प्रश्नाचें उत्तर कोणालाच देतां येईना! जो तो ह्या चमत्कारिक प्रश्नाचा विचार करी. राजानेंही तिला 'तूं प्रत्येकाला असा गूढ आणि चमत्कारिक प्रश्न कां विचारतेस?' असें विचारलें. तेव्हां ती म्हणाली, 'ह्या प्रश्नाच्या उत्तरांतच माझें जीवित सर्वस्वी अवलंबून आहे. माझ्या प्रश्नाला उत्तर देणारा कोणी तरी भेटेल तेव्हां यांतील गूढार्थ तुम्हांला कळेल.' कारण तिची खात्री होती कीं, विष्णूनीं सांगितल्याप्रमाणें ते पुनः एकदां आपणांस खास दर्शन देतील. आणि त्यांनाच ह्या गूढ प्रश्नाचें उत्तर देतां येईल

त्याप्रमाणें खरोखर कांहीं दिवसांनंतर वृद्ध भिकाऱ्याच्या वेषानें विष्णु तिच्या पुढें आले, आणि तिनें प्रश्न करतांच म्हणाले, 'हें आहे इतकेंच!' असें उत्तर मिळतांच ती एकदम दचकली. आपल्या प्रश्नाला उत्तर देणारे प्रत्यक्ष श्रीविष्णु आहेत हें तिनें तात्काळ ओळखलें. परंतु त्यांचें उत्तर ऐकून तिची चर्या खर्रकन् उतरली. गतजन्मीं आपण थोडेंसें केलें त्याचें फळ इतकें मिळालें आणि आतां एवढें धर्मकृत्य करीत असतांहि त्याचा मोबदला इतकाच मिळ-

णार हें ऐकून तिला कां बरें वाईट वाटणार नाहीं ? तिनें नम्रतेनें हात जोडून विचारलें, 'देवा ! हें इतकेंच कां ?' तेव्हां विष्णु म्हणाले, 'मुली, गरिबांना दानधर्म होत आहे तो सर्व तुझ्या बापाच्या पैशानें होत असून तो नोकरांच्या हातून होत आहे. तूं फक्त सुखासनावर बसून दानधर्म होत असलेला पहात आहेस ! आतां तुझ्याच सांगण्यावरून तो होत आहे त्याबद्दल तुला पुण्य आहे, पण तें किती ? आहे हीच तुझी स्थिति कायम राहील इतकेंच. ज्या पदाची तुला इच्छा आहे तें पद मात्र ह्या जन्मीं तुला मिळणार नाहीं. त्याकरितां आणखी एक जन्म तुला घ्यावा लागेल.' हें ऐकतांच ती राजकन्या श्रीविष्णुचरणावर मस्तक ठेवून म्हणाली, 'देवा, माझी इच्छा ह्याच चरणांजवळ अखंड वास करावा अशी आहे. मला आतां येथें ठेवूं नका ?' अशी तिची पश्चात्तापपूर्वक सद्गदित अंतःकरणानें विनंति ऐकून विष्णु म्हणाले, 'गतजन्मीं तूं जशी स्वतः कष्ट करून सेवा केलीस तशीच जर आतां ह्यापुढें करशील तर तुझी इच्छा पूर्ण होईल.' इतकें बोलून विष्णु गुप्त झाले. तेव्हां तत्काळ तिनें आपल्या राजकन्येच्या ऐश्वर्याचा त्याग केला आणि शहरांतील एक अत्यंत गरीब, लंगडा असा वृद्ध रोगी पाहून तिनें त्याची मनोभावें सेवा सुरू केली. पुढें कांहीं दिवसांनीं तो वृद्ध रोगी मरण पावला तेव्हां तिनें राजाला सांगून त्याची समाधी बांधविली आणि आपण नित्य तेथें बसून पूजा अर्चा करूं लागली. अशा रीतीनें तिच्या सेवेची पूर्तता होतांच विष्णूकडून तिला विमान आलें व ती विष्णुलोकीं गेली.

* * * *

ही गोष्ट श्रीसद्‌गुरु उपासनी महाराज ( साकुरी ) यांचे तोंडची आहे. जेथें अहंकार मुळांतूनच गळून पडला तेथें उच्च वर्ण आणि नीच वर्ण असा भेदभाव कोठून राहणार ! आपण श्रीमंत, आपण मोठे, हा अभिमान जोंपर्यंत नष्ट झाला नाहीं तोंपर्यंत संचित वाढतच राहणार ! एकदा मनुष्यानें अभिमान जिंकून विष्णुसेवा केली कीं, विष्णुलोक लांब नाहीं ! धन्य ते संत कीं जे अभिमान जिंकून विष्णुपदीं लीन झाले आहेत ! सब संतनकी जय !!!

# श्री जगन्नाथ यात्रा.

लेखक—कृ. गो. पुराणीक, बेलापूर.

१ प्रथम राशीनहून चैत्रमासीं निघून, डिकसळ स्टेशनावर बसून, सोलापूर लाइनीनें कुडूवाडी, सोलापूर, हुटगीवरून श्रीक्षेत्र गाणगापूर येथें जाण्यास त्याच स्टेशनावर सूर्योदयाच्या आंत उतरलों. स्टेशनपासून गांव दक्षिणेस १४ मैल आहे, रस्ता सडकेचा नाहीं. हद्द निजामची असून स्वतंत्र भाडयाचे घोडयास अगर गाडीस भाडें अनुक्रमें दीड व दोन रुपये पडतें. दुपारीं ११ वाजतां तेथें पोंचलों. त्या दिवशीं दैवयोगानें गुरुवार होता. ताबडतोब उपाध्याचे घरीं बिऱ्हाड ठेवून श्री भीमा व अमरजा यांच्या संगमावर स्नानास गेलों व स्नान करून पुढचा विधि आटोपून परत गांवांत आलों. संगमावर श्रीदत्तांच्या पादुका असून भाविक लोक एकांतवासांत तेथें निर्वाणसेवा व श्रीगुरुचरित्राचीं पारायणें कारितात; व तेथें कित्येकांस दृष्टांत होतात, व क्वचित चमत्कार दृष्टीस पडतात हें स्थान गांवापासून सुमारें १–१॥ मैलावर आहे. नंतर गांवांत मंदिरांत जाऊन श्रीदत्तांचें दर्शन घेऊन जेवण आटोपलें. देऊळ बरेंच मोठें असून आंत जाण्यास पूर्व पश्चिम दोन दरवाजे आहेत. पश्चिम दरवाज्यास रोगी, सेवा करणारे व यात्रेकरू यांस राहण्यास बाहेर मोठी धर्मशाळा आहे. आंतही कांहीं सेवा करणाऱ्यांस व पारायणें करणाऱ्यांस राहण्यास जागा आहेत. आंतील मंदिराचा भाग रमणीय असून सभामंडप व गाभाऱ्यांत जाण्याचें द्वार उत्तराभिमुख आहे, त्याचे आंतील गाभाऱ्यांत जाण्यास कोपऱ्यांत पश्चिमाभिमुखी दुसरें द्वार असून आंत श्रीदत्तांच्या स्वयंभू पादुका आहेत. हें स्थान फार शुचिर्भूत व कडकडीत सोंवळें आहे; बाहेरील गाभाऱ्यांत अलीकडच्या बाजूस यात्रेकरूंस पादुकांचें दर्शन घेण्यास एक गवाक्ष आहे; आंतील देवळाच्या व सभामंडपाच्याभोंवतीं फरशी केलेली असून, प्रदक्षणेचे वाटेवर दक्षिण बाजूस ओटयावर औंदुबराचा लहान वृक्ष आहे; शिवाय भोंवताली दुसरीं देवस्थानें आंतच आहेत. सेवा करणारांस व रोगी लोकांस अन्न मिळण्यास माधुकरीची सोय सभाग्य यात्रेकरू नित्य कारितात. रोगी व भूतबाधेचीं माणसें व मानसिक इच्छा धरून आलेले सेवाधारी सेवा करून संकटांतून मुक्त होऊन जातात असा नित्य क्रम चालू आहे. त्या दिवशीं गुरुवार असल्यामुळें

रात्रीं श्रीदत्तांच्या पालखीचा समारंभ पाहण्यास सांपडला. पादुकांस नित्य मुकुट, वस्त्रें, अलंकार घालितात. रात्रीं आठ वाजतां पालखीची मिरवणूक मंडप व देवळासभोंवतीं सुरू होऊन भक्तियुक्त अंतःकरणानें पुजारी, रहिवासी, यात्रेकरू, सेवेची मंडळी वगैरे समाज फारच रमणीय देखाव्यासह पदें, आरत्या, गाणीं म्हणत व जमावानें तीन प्रदक्षिणा करून, तीर्थप्रसाद सर्वांस मिळून समारंभ समाप्त होतो. देवांची नित्य त्रिकाळपूजा, अभिषेक, नैवेद्य, आरती, यांचा थाट सुरू असतो. यात्रेकरूही पूजा वगैरे करून अन्नसंतर्पणें कारितात व दानधर्म करून नवस फेडितात. येथें सतत सेवा करणारे लोक सुमारें १००–१२५ असतात; एकंदरींत श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी व भिलवडीनजीक श्रीक्षेत्र औदुंबर येथील श्रीदत्ताचे स्थानाप्रमाणें हेंही क्षेत्र पवित्र व रमणीय आहे. गांव लहानच असून, स्वच्छता कमी व दुकानें, बाजार किरकोळच आहेत.

२ दोन दिवस तेथें राहून यथाशक्ति देवब्राह्मण करून व तीर्थप्रसाद घेऊन नांदेडच्या यात्रेकरूंबरोबर निघालों व स्टेशन कुडाळी येथें येऊन मेल गाडींत दिवसा ११ वाजतां बसलों व २–३ वाजतां कलबुर्गा ( गुलबर्गा ) स्टेशनावर उतरून दोन मैल शहरांत दाखल झालों. हें शहर पूर्वीं राजधानी होती. हल्लीं निजामचे ताब्यांत आहे. पूर्वींच्या क्वचित् जुन्या इमारती असून अलीकडच्या पद्धतीप्रमाणें शहरची रचना, नळ, बाजार, दुकानें, व्यापार सुरू आहे. कांहीं सरकारी आफिसें असून मुसलमानांचीच वस्ती जास्त आहे. सर्व पाहून रात्रीं ८ वाजतां गाडींत बसून शहाबादवाडी जंक्सन-वर उतरलों. तेथें जवळच शहाबादी दगडांच्या खाणी आहेत. त्या हद्दींत ह्या दगडाच्याच भिंती व छपऱ्या बांधितात व या जातीचा दगड चोहोंकडे रवाना होतो. आम्ही पहाटेच्या प्यासेंजरनें हैदराबाद रेलवेच्या चितापूर स्टेशना-वर उतरून द्वादशीची पारणा केली. गांव मोठें व व्यापारी असून येथें धान्याचा, विशेषेंकरून जाड नामांकित ज्वारीचा जुनाट सांठा आहे. भयंकर दुष्काळाचे वेळीं येथील माल परठिकाणी रवाना होतो. धान्याचे कोठे व मोठमोठ्या व्यापारी पेढ्या असून कोठ्यांत २००–३०० खंड्या माल व्यवस्थित रीतीनें सांठवितात त्यामुळें पुष्कळ वर्षांनीं पाठविण्यासारखें धान्य सुरक्षित व चांगलें राहतें. तेथून दुपारीं २ चे मेलनें संध्याकाळीं निजामची राजधानी शहर हैदराबाद येथें दाखल झालों. विजेच्या प्रकाशानें भरून गेले-ल्या शहरांत तांग्यानें भव्य इमारती, दुकानें, वगैरे रम्य शोभा पहात पहात एका व्यापाऱ्याचे दुकानीं बिऱ्हाड ठेवून मुक्काम केला. दुसरे दिवशीं सकाळीं

एका आप्ताच्या घरीं उतरून, जेवण करून, शहराचा भव्य देखावा, दुकानें, व्यापारधंदा, मुसानदीचा भव्य पूल व मक्कामशीद वगैरे कांहीं प्रेक्षणीय स्थानें पाहून, व शहरची रचना पाहून थक्क झालें; वेळ थोडा यामुळें हा प्रवास तांग्यानें दोन तीन तासांत आटोपला, व कंटाळून बिऱ्हाडीं जेवण करून रात्रीं ७ वाजतां रेल्वेनें जुनें राजधानीचें शहर शिकंदराबाद पाहण्यास गेलों; हें शहर हैद्राबादाचे नजीक असून निजामच्या फौजेचें ठाणें आहे. हेंही हैदराबादेप्रमाणें अफाट शहर असून, भव्य इमारती, मशीदी, व्यापार, दुकानें, विजेचे दिवे, टेलिफोन वगैरे गोष्टी यथास्थित आहेत. दोन्ही शहरांभोंवतीं तलाव, बागबगीचे यांची अप्रतिम शोभा व लोक सुखी पाहून चित्त समाधान पावलें.

३. दुसरे दिवशीं बिझवाडयाचें टिकीट काढून श्रीजगन्नाथचे रस्त्यास रवाना झालों. बिझवाडा जंक्शन असून कृष्णेच्या कांठीं मोठें व्यापाराचें शहर आहे. तेथें तांदुळांचा मोठा व्यापार व सांठा असून परठिकाणीं माल रवाना होतो. तेथें उतरून शिकंदराबादचे धनत्तर व धार्मिक श्रीयुत रामगोपाळशेट यांच्या प्रसिद्ध, अफाट व सोयिस्कर धर्मशाळेंत एका खोलींत बिऱ्हाड ठेवून राखणदारापासून कुलूप घेऊन खोलीस लाविलें. नंतर कृष्णास्नान वगैरे विधी आटोपून बिऱ्हाडीं आलों; धर्मशाळेंत पाण्याचा नळ असून खाणावळ, सर्व प्रकारचीं दुकानें, स्वयंपाकांचीं भांडीं, रात्रीची पांघरुणाची सोय, इत्यादि सोई पाहून आश्चर्यचकित झालों. स्वयंपाकाचीं भांडीं व सामान घेऊन जेवण केलें व शहरांत हिंडून रचना, व्यापार, तांदुळाचे कारखाने, श्रीमंत व्यापाऱ्यांच्या भव्य इमारती, दुकानें, व्यापाराची घडामोड, वगैरे पाहून समाधान वाटलें. सोलापूरपासून येथपर्यंत मराठी भाषा कमी, व मुसलमानी व कानडी भाषेचा प्रसार जास्त आहे. कृष्णानदीस कालवा असून त्यावर तांदुळाचीं दोन व इतर एक अशीं तीन पिकें काढितात! रोगराई नसून लोक सुखी आहेत.

४. तेथून दुसरे दिवशीं दुपारीं जेवण करून २ वाजतां गाडींत बसून संध्याकाळीं सात वाजतां राजमहेंद्री स्टेशनवर उतरून एका प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या व मासिकाच्या म्यानेजरच्या घरीं बिऱ्हाड लाविलें, व एक रात्र मुक्काम केला. दुसरे दिवशीं गोदावरीचे स्नानास गेलों, उन्हाळा असून पात्र दुथडी परिपूर्ण भरलेलें, व्यापारी मचवे सतत चालू, रेलवेचा अफाट पूल व वस्ती शहराप्रमाणें बाजार, दुकानें, शहर-रचना अफाट, दिसली. मुख्य राजमहेंद्री शहर तेथून दोन तीन मैल होतें. रेल्वे स्टेशन वेगळें होतें. गंगा

स्नान करून जेवण केलें व शहररचना पाहिली, रानटीवजा दिसली; येथून गोदावरी १० कोसांवर समुद्रास मिळाली आहे. येथें गोदावरीचे सात प्रवाह वेगळे होऊन पुन्हा थोडया अंतरावर एकत्र झाले आहेत, व त्या ठिकाणीं कोटी लिंगश्वर स्थान पाहण्यासारखें आहे. नंतर दुपारचे गाडीनें निघून रात्रीं वालटेर जंक्सनवर उतरलों. वाटेंत थोडया अंतरावर डोंगरावर श्रीसरबत-नरसिंहाचें देवस्थान पाहण्याचें राहिलें. तेथील आख्यायिका चमत्कारिक ऐकिली. श्रद्धाळू यात्रेकरू व भाविकभक्त दर्शनास व नवस फेडण्यास नेहमीं येतात; जेवढे गुळाचा प्रत्येकाचा नवस असेल त्या गुळाचें प्रमाणशीर पाणी-मिश्रित सरबत करावें व तें नरसिंह देवमूर्तीस मालकानें स्वतः पाजावें; निर्मे सरबत मूर्तीनें प्राशन केले, कीं सरबत सांडावयास आरंभ होतो; मग सरबत पाजण्याचें मालक बंद करून, इतर सर्व मंडळीस तोच प्रसाद म्हणून वांटण्यांत येतो. याप्रमाणें प्रत्येक आपापले नवस फेडून जातात. हा चमत्कार ऐकून आश्चर्य वाटलें, व परमात्म्याची व्याप्ती सर्वत्र आहे, अशी साक्ष पटली; मात्र भाव व श्रद्धा असली पाहिजे. तिकडे ओढया भाषा बोलतात. क्वचित् हिंदी व मुसलमानी भाषेचा प्रघात आहे; तिकडे मुख्य पीक व खाणें भाताचें आहे. शिवाय नारळ, ताड, सुपारी, यांचीं झाडें फार आहेत; कोंवळ्या नारळाचें पाणी पिण्याची वहिवाट फार आहे, क्वचित् तंबाखूचे चिरूट ओढण्याचें व्यसन स्त्रीपुरुषांस आहे. गोदावरीचा अफाट कालवा असून त्यांत लहान लहान मचवे चालतात, व त्या पाटावर भाताचें मुख्य भरपूर पीक दोन दोन वेळां काढितात. वाल्टेर जंक्सनवर तेलंगी ब्राह्मणाचे खाणावळींत रात्रीं जेवण केलें. प्रातःकाळीं पुन्हां रेल्वेंत बसून रात्रीं खुर्दारोड जंक्सनवर उतरून, स्नान, फराळ करून मुक्काम केला.

९. दुसरे दिवशीं जगन्नाथचे गाडींत बसून सकाळीं सुमारें ९ वाजतां श्रीक्षेत्र जगन्नाथ येथें उतरलों. पंडयांचे दलाल स्टेशनावर पुष्कळ होते, त्यांनीं आपापल्या वतींचे पंडयाकडे नेण्यास ओढाताण सुरू केली, त्यामुळें मी थोडासा घाबरलों. हें पोलिसांनीं मनावर घेतलें नाहीं; तेव्हां संबलपूरचा एक व्यापारी तेथील माहितगार त्याच गाडींतून उतरला होता, त्यानें आम्हांस धैर्य देऊन, त्या दलालांस दरडावून मला घोडयाच्या टांग्यांत बसवून, आपणही मंडळीसह बसला व श्रीजगन्नाथचे मंदिरानजीक एका मोठ्या व्यवस्थित व स्वच्छ अशा धर्मशाळेंत बिऱ्हाड लाविलें. नंतर त्या हद्दीचे पंडयास घेऊन एक दलाल आला, व त्यानें पंडयाची व आमची ओळख करून दिली. नंतर आम्ही सर्वांनीं स्नानें करून पंडयाचे मनुष्याबरोबर जाऊन श्रीजगन्नाथाचें धूळदर्शन घेतलें व परत धर्मशाळेंत आलों. दुपारीं बारावाजतां पंडयाकडून देवाचे नैवे-

त्याचा प्रसाद ( भात, वरण, भाजी, व मालपोहे ) असा आम्हांस पुरेसा झाला, त्याचें जेवण केलें; संध्याकाळीं त्याचप्रमाणें. याप्रमाणें सतत तीन दिवस दोन वेळ प्रसाद मिळत होता. आम्ही नेमल्या वेळीं पूजा, नैवेद्य आरती हा समारंभ पाहून दर्शन घेऊन बिऱ्हाडीं येत होतों. तेथें देवास पूजा, नैवेद्य वगैरे सात वेळ सात भोग नियमित काळीं होत असत. नैवेद्य तेथील राजाचे मार्फत मडक्यांत तयार होऊन नेमलेल्यावेळीं त्याच्या कावडी भरून देवाच्या गाभाऱ्यांत येत. मग नैवेद्य समर्पण व धूप, दीप, आरती होऊन, तोच नैवेद्य प्रत्येकवेळीं मंदिराचे आवारांत पुजाऱ्यामार्फत विक्रीस ठेवितात, व या बाजारांत यात्रेकरू तो विकत घेऊन ब्राह्मणभोजन यथाशक्ति करितात. वेगळा स्वयंपाक करण्याची जरूर नाहीं. नैवेद्यांत वरण, भाजी, मोहनभोग, केशरीभात, मालपोहे, लाडू, वगैरे पक्वान्नें, व भाताची पावशेरपासून अच्छेर, शेर, अधोली, पायली, अशीं वेगवेगळीं मडकीं असतात. ज्यास जसें लागेल तसें त्यानें घ्यावें. बहुतेक स्वयंपाक एकावरएक मडकीं ठेवून वाफेवर शिजवितात. तेथें नैवेद्यास विटाळाचा दोष नाहीं. यात्रेकरूंस रोख पैसे भरून पूजा, नैवेद्य, राजाचे मार्फतच करावा लागतो; व त्याबद्दल त्यास पुजाऱ्यामार्फत हक्काचा प्रसाद मिळतो. नैवेद्य वगैरे खर्चास कमीतकमी निदान साडेसात रुपये लागतात. गरीब यात्रेकरू नैवेद्य करीत नाहींत, तीर्थांचीं स्नानें, दर्शनें, व प्रसाद विकत घेऊन पंड्यास यथाशक्ति दक्षणा देऊन यात्रा परिपूर्ण करितात. तेथें एकादशी करूं नये असा नियम आहे ! "जगन्नाथका भात, जग पसारे हात." प्रसादाचें महत्व जास्त आहे, व निघतेवेळीं वाळलेला भात प्रसाद म्हणून घ्यावा लागतो. तेथें दुसऱ्या मोठमोठ्या अफाट व सोयस्कर धर्मशाळा हजारों रुपये खर्च करून दोन तीन मजली कोठड्यांसह बांधिल्या आहेत. एकटे मनुष्यास बहुधा धर्मशाळेंत राहूं देत नाहींत. मी आठ दिवस तेथें मुक्काम केला. तीन दिवसांपुढें रोज नैवेद्य विकत आणून जेवण करीत असें. स्वयंपाक करण्याचें कारण कधींही पडलें नाहीं. पंडेलोक गर्भश्रीमंत असल्यामुळें इच्छेप्रमाणें दक्षिणा मिळाल्यास घेऊन तें नांव आपल्या वहींत नोंदून प्रसाद देतात; नाहीं तर दक्षणा मुळींच घेत नाहींत; यात्रेकरू गरीब असला तर बेपर्वाईनें वागतात.

श्रीजगन्नाथास 'नीलपर्वतनिवासी' असें म्हणतात. पूर्वीं इंद्रद्युम्नराजानें बलराम, सुभद्रा, व कृष्ण अशा मूर्ति स्थापून भक्तिपूर्वक सेवा केली, अशी कथा आहे. शिवाय इंद्रद्युम्न, मार्कंडेय, रोहिणी व दक्षिणबाजूस नजीक महोदधी समुद्र अशीं तीर्थें आहेत. गांवांत पाण्याचे नळ नाहींत; समुद्र नजीक असल्यामुळें विहिरींचें पाणी फारसें गोड नाहीं. श्रीजगन्नाथाचें देऊळ अफाट व

चिरेबंदी उंच शिखराचें असून, भोंवतालीं फरशीचें पटांगण आहे. आंतील आवारांत श्रीलक्ष्मी व देवी, शंकर वगैरे देवतांचीं स्थानें असून भोंवतालीं भक्कम तट असून चार दिशेस चार मोठे दरवाजे आहेत. मुख्य शिंगदरवाजा पूर्वेस आहे. देवांच्या मूर्ति मुख्य गाभाऱ्यांत उंच सिंहासनावर सुमारें दोन पुरुष उंचीच्या स्वयंभु भयंकर आहेत. वस्त्रें, अलंकार, फुलांचे हार, शिडी शिवाय घालतां येत नाहींत. गाभारा २०० माणसांचा समावेश होण्याये- वढा मोठा आहे. नियमितवेळीं दर्शनाची गर्दी होते. देवाचे समोर एक मध्यम व एक मोठा असे सभामंडप आहेत. मोठया मंडपाचें द्वार उत्तरेस असून त्यांत गरुड खांब आहे. लहान मंडपाचें द्वार दक्षिणेस आहे. तिकडे जगन्नाथास ‘ पुरी ’ ह्मणतात. हें संस्थान असून शहर बरेंच मोठें व जिल्ह्याचें ठिकाण आहे. येथें मराठी भाषा पुष्कळांस येते. श्रीजगन्नाथाचे वर्षांतून चारवेळां उत्साह होतात, त्यांपैकीं वसंतऋतूंत एक महिना देवाची पालखी, व दिंडी दररोज दुपारीं चार वाजतां निघून मोठया समारंभानें तिकडील रिवाजाप्रमाणें मिरवत चंदनतलावावर जाऊन नावेंतून वाजंत्र्यासह जलविहार करून व पूजा नैवेद्य होऊन परत मंदिरांत समारंभानें येते. रस्त्यानें यात्रेप्रमाणें मेवा- मिठाई व नानाप्रकारच्या वस्तूंच्या दुकानांचा थाट व प्रेक्षकांची गर्दी असते. हा उत्साह मीं पाहिला. आषाढमासीं रथाचा उत्साह बाहेरगांवच्या प्रेक्षकांच्या अफाट गर्दीमुळें फारच रमणीय असतो. तेथें दिंडीचें भजन ओढया भाषेंत मोठया प्रेमानें म्हणतात. तेथें गवताच्या चटया फार नामांकित व स्वस्त मिळ- तात. आठ दिवस राहून कांहीं सामान व प्रसाद घेऊन परत गेल्यारस्त्यानें हैद्राबादपर्यंत येऊन, गोदावरी रेलवेनें निजामचे हद्दींतील जिल्हा नांदेड येथें गंगास्नानास उतरलों; एकादशीस गंगास्नान करून शीखलोकांचें पवित्र गुरु- गोविंदाचें देवस्थान पाहिलें. देवस्थानचा फुलबाग, तेथील पूजा, आरती, गव- याचें गाणें वगैरेची टापटीप फारच अप्रतिम होती; शिवाय मंदिराची रचना, आंतील कुशलतेचें काम हें पाहून फारच समाधान वाटलें. एवढें खर्चाचें काम करून सर्व मंडळीचा भक्तीचा ओघ अवर्णनीय आहे. एकंदरींत स्थान पाहण्या- लायक. तेथून दौलताबादेचा किल्ला, जनार्दन स्वामींच्या समाधीचें दर्शन, औरं- गाबादचा मुकरूबा, व वेरूळचीं लेणीं व श्रीघृष्णेश्वराचें दर्शन या गोष्टी पूर्वींच घडल्यामुळें कोठें न उतरतां, औरंगाबाद, मनमाडवरून अंमळनेर येथें श्रीसखाराममहाराजांचे यात्रेस जाऊन तो समारंभ आटोपल्यावर परत राशीन येथें सुखरूप पोंचलों.

---

# केशवस्वामींचीं पदें.

## १ पद

या या गुरुला म्यां काय द्यावें ? । याला कासयानें उतराई व्हावें ? ॥ध्रु०॥ ज्ञानबोधाची दिवटी दावी । देव प्रत्यक्ष नयनीं दावी ॥ या० ॥ १ ॥ सत्य स्वरूप लोपलें होतें । तेंही पाहिलें म्यां गुरुचेनि हातें ॥ या० ॥ २ ॥ केशवस्वामी दयाळू माझा खरा । तेणें दावियलें विश्वंभरा ॥ या० ॥ ३ ॥

## २ पद.

सावध मोठी । मी सद्‌गुरुची बेटी ॥ ध्रु० ॥

चार सहा अठराजणी । आणी बारा सोळाजणी । नाहीं भरल्या माझ्या मनीं ।
उदंड हिंडती रानोरानीं ॥ गिरीकपाटीं ॥ १ ॥
उदंड केला माझा लाग । परी मज घडला नाहीं संग ।
शेवटीं झाला मनीं संग । तशाच गेल्या त्या परतोनी ॥ पाहोनी बाई हटी ॥२॥
मी होती कर्णकुमारी । माझा बाप ब्रह्मचारी ।
मायबापाची मी बहु प्यारी । नांव सत्रावी सुंदरी ॥ त्रिभुवनपदीं ॥ ३ ॥
बाई मजसह नये कांत । निर्गुण पुरुष माझा कांत ।
कोणा नकळे माझा अंत । केशव ह्मणे श्रीगुरुचरणीं सांत ॥ ४ ॥

## ३ पद.

त्याचा बालक मी बालक मी ॥ ध्रु० ॥

निःशब्द शब्दीं बोले । मीपण ग्रासोनी डोले । संशय विलया नेले । जड जीवा चिद्धन केलें ॥ त्याचा० ॥ १ ॥ मंगळ समचिर नेसे । निजपदीं निश्चल बैसे । सहजीं सहज विलासे । अपार तोषें हासे ॥ त्याचा० ॥ २ ॥ परम परात्पर सेवीं । सुखघनीं आवडी ठेवी । भोगी अद्वय देवी । न करी उठवा ठेवी ॥ त्याचा० ॥ ३ ॥ अखंड उघडा झाला । निजांगें लेणें त्याला । मुळींच्या ठाया आला । निगम स्तविता झाला ॥ त्याचा० ॥ ४ ॥ निर्मळ होउनि वागे । एकपणेंविण जागे । निजपदीं निद्रा लागे । केशव प्रभुशीं सांगे ॥ त्याचा० ॥ ५ ॥

## ४ पद.

ऐसे जाणती ते जोगी । परमानंद भोगी ॥ ध्रु० ॥

समाधि निर्णयिचा निर्धार । तोचि साक्षात्कार ॥ ऐसे० ॥ १ ॥ समाधि हरपली जे ठायीं । तोचि आत्माराम पाहीं ॥ ऐसे० ॥ २ ॥ समाधि ग्रासुनि सुख घेणें । केशवस्वामी होणें ॥ ऐसें० ॥ ३ ॥

# सांप्रतचे बैरागी.

**लेखकः—कृष्णसुत, आळंद, ( जि० सोलापूर )**

बैरागी हा शब्द मराठींतलाच असून फक्त वर्ण 'व' चा 'ब' होऊन हिंदी शब्दासारखा भासतो. बैराग्य ( वैराग्य ) या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे; पण शुद्ध विचारानें, विवेकानें आत्मानंदांत निमग्न होणारा, अथवा देश-बांधवांच्या कल्याणाकरितां, धर्माच्या संरक्षणाकरितां आपल्या बायकामुलांचें पोट भरेल इतकी संपत्ती ठेवून उरलेली संपत्ती राष्ट्रकार्याकरतां लावून, मोह-माया त्याग करून, देशकार्याच्या कामीं प्राणाची आहुती देण्याची पाळी आली तरी जिवाची पर्वा न करितां तयार होण्याचें वैराग्य ज्याला उत्पन्न झालें आहे तोच खरा बैरागी व त्याचेंच खरें वैराग्य होय! पण अलीकडे होत आहे काय? "काप गेले भोक राहिलें" या म्हणीप्रमाणें गर्भितार्थ तरी साफ निघून गेला आहे. आतां निवळ बैरागी ह्मणजे घरींबाजारीं देण्याघेण्यामध्यें अपमान व त्रास होऊं लागला व थोडेंसें क्षणिक आध्यात्मिक वैराग्य उत्पन्न झालें, कीं बनले बैरागी! घरीं आईबापांच्या हयातींत थोडीशी स्वतंत्रता न मिळाल्यास अथवा शिक्षणाच्या कामांत त्यांना योग्यशी शिक्षा त्रास होऊं लागला कीं उद्योगधंद्याला आळसून सोडलें घरदार आणि आंगाला राख फासून "वैराग्यापरतें नाहीं भाग्य" "भिक्षे ऐसें नाहीं वैराग्य" असें ह्मणत भटकत भीक मागत चाललेच; व थोडयाच दिवसांत गुप्त टपून बसलेले दारू वगैरेसारख्या दुर्व्यसनाचे नाना प्रकारचे कीटक एकदां त्यांच्या आंगांत शिरले, तर मग विचारूंच नका! जगांतल्या सर्व दुर्व्यसनांचे सरदार बनलेच! वाचक हो, खऱ्या शुद्ध अंतःकरणीय वैराग्य तपश्चर्येचीं फळें सर्वांना गोड व पूज्य वाटतात. पण वरील प्रकारांनीं झालेल्या भोंदू तपश्चर्येचीं फळें म्हणजे चोऱ्या करणें, मंत्रतंत्रांच्या खोटया हावभावांनीं भोळयाभाबडया लोकांना फसवून पैसे लुबाडणें, मादक पदार्थांचें सेवन करून कामांध बनणें, भलभलत्या कंडया उठविणें, वगैरे होत; हीं सर्वांना जाचक होणार नाहींत का? होणारच. असें पुष्कळ श्रीमंत भोळे लोक या भोंदूबैरागी वगैरे लोकांकडून आपलीं घरें धुववून घेऊन थंड बसले आहेत व बसत आहेत. अशी घरदारांची राखरांगोळी होत असलेली पाहून व ऐकूनहीं त्यांची अंधभक्ति जागृत होत नाहीं हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें आणि समाजाचें त्याकडे लक्ष जात नाहीं ही मोठी खे-

दाची गोष्ट आहे ! भाविक लोकांनो ! अस्सल बैराग्यानो ! कोठें गेली ती तुमची गोरख वगैरे समर्थांची झोळी ! कीं ज्या झोळीला पाहून भूतपिशाच्यांना देखील थरकांप सुटत असे ? झोळीच्या मालकाचे अनुयायी दरवाज्यांवर उभे राहिल्याबरोबर घराचे मालक लोटांगण घालीत येऊन त्यांच्या पायाखालची माती पूजेला ह्मणून डबींत ठेवीत असत. अशा त्या तेजाचे बैरागी केवळ उदरभरतीकरितां त्या बैराग्याचें नांव धारण करून भिक्षा मागत येणाऱ्याला " भोंदू , लुच्चे " ह्मणून शिपायाकडून हाकलून देत असतांना पाहून तुम्हांला लज्जा, दुःख वाटत नाहीं का ? वाटत नसल्यास तुमचें तें जिणें कसचें ? जर तुम्हांला त्या पूज्य व पवित्र नांवाचा, समर्थांच्या नांवानें फिरणाऱ्या झोळीचा अभिमान असल्यास दुर्व्यसनें दूर करून ईश्वर भजनीं लागण्याचे प्रयत्न कराल का ? हिंदुस्थानच्या दारिद्र्यावस्थेमुळें ह्या बैरागी लोकांची संख्या दिवसेंदिवस ज्यास्त वाढत आहे. ही जितकी आनंदाची गोष्ट आहे, तितकीच खेदाची गोष्ट ही कीं, श्रीमंत लोकांच्या पैशाचे व्यय त्यांच्या दुर्व्यसनांत व अनाठायीं भलत्याच परिणामांत त्या लोकांना दान म्हणून होत आहे. त्यांचें दान म्हणजे व्यसनींना मदत !

---


# सन्तचरित्रमाला.

## ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें ह्या ग्रंथासाठीं लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं असून ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत, आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त त्रिरुपन्नालवर, सूरदास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीतारामहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबरावमहाराज भटजीबापू सोनगिरचे महाराज; भोरचे दत्तभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्रस ( मालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( विठ्ठल कृष्ण कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहळेकर ), बलभीमबोवा साडेकर ( श्री खाजगांवाले ) शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर. ( प्रो लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ. २५६. पांच फोटो किं. रु १॥० व्ही. पी. नें १।८।३.

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु पुणें.

# श्रीमद्भागवत व तुकोबाराय.

(१)

आयुर्हरति वै पुंसां उद्यन्नस्तं च यन्नसौ ।
तस्यर्ते यत्क्षणो नीतः उत्तमश्लोकवार्तया ॥ (स्कंध २)

## अभंग.

काळाचिया लेखा ते नाहीं घटीका ।
वैकुंठनायका आठवीतां ॥ १ ॥
सदाकाळ गणना करी आयुष्याची ।
कथेची वेळेची आज्ञा नाहीं ॥ २ ॥
याकारणें माझ्या विठोबाची कीर्ति ।
आहे त्रिजगती थोरवंट ॥ ३ ॥
तुका म्हणे जन्मा आलियाचें फळ ।
स्मरावा गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

(२)

वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं हसत्यभीक्ष्णं रुदति क्वचिच्च ।
विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥१॥ (स्कंध १२)

## अभंग.

दाटे कंठ लागे डोळीयां पाझर । गुणाची अपार वृष्टी वरी ॥ १ ॥
तेणें सुखें छंद घेईन सोहळा । होऊनि निराळा पापपुण्या ॥ २ ॥
तुझ्या मोहें पडो मागला विसर । आलापें सुस्वर करीन कंठ ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें पाहिजे सौरस । तुम्हांवीण रस गोड नव्हे ॥ ४ ॥

(३)

भक्तिं मुहुः प्रवहतां त्वयि मे प्रसंगो भूयादनंत महताममलाशयानाम् ।
येनांजसोऽल्बणमुरुव्यसनं भवाब्धिमेष्ये भवद्गुणकथामृतपानमत्तः ॥ १ ॥
(स्कंद ४)

## अभंग.

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥

गुण गायीन आवडी । हेंचि माझी सर्व जोडी ।। २ ।।
नलगे मुक्ति धनसंपदा । संतसंग देयीं सदा ।। ३ ।।
तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हांसी ।। ४ ।।

( ४ )

साधवो हृदयं मह्यं साधूनां हृदयं त्वहम् ।
मदन्यं ते न जानंति नाहं तेभ्यो मनागपि ।।१।। ( स्कंध ९ )

## अभंग.

भक्त देवा घरिंचा सुना । देव भक्ताचा पोसणा ।। १ ।।
येर येरां जडलें कैसें । जीव जैसें आंगेसीं ।। २ ।।
देव भक्ताची कृपाळू माता । भक्त देवाचा जनिता ।। ३ ।।
तुका म्हणे अंगें । येकयेकाचिया संगें ।। ४ ।।

( ५ )

कलिं सभाजयंत्यार्याः गुणज्ञाःसार्वभागिनः ।
कीर्तनेनैव कृष्णस्य सर्वस्वार्थोभिलभ्यते ।। १ ।। (स्कंध ११ )

## अभंग.

युक्त आहार नलगे आणिक साधन । अल्प नारायणें दाखविलें ।। १ ।।
कलियुगामाजि करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ।। २ ।।
नलगे लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ।। ३ ।।
तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते भाव नामाविण ।। ४ ।।

( ६ )

परस्वभावकर्माणि न प्रशंसेन्न गर्हयेत् ।
विश्वमेकात्मकं पश्य न्प्रकृत्या पुरुषेण च ।। ( स्कंध ११ )

## अभंग.

येका म्हणता भला । दुजा सहजचि निंदिला ।। १ ।।
कांहीं न करिता सायास । सहजी सहज घडे दोष ।। २ ।।
बरें वाईटाचे आंगें । येकयेकां मागें लागे ।। ३ ।।
तुका म्हणे खंडोनी वाणी । सुखें राहावें सज्जनीं ।। ४ ।।

( ७ )

तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन्प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।
नामान्यनंतस्य यशोंकितानि यश्छृण्वंति गायन्ति गृणन्ति साधवः ।। १ ।।

## अभंग.

माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ रामकृष्ण ॥ १ ॥
अबद्ध वांकुडे गावूं भलतैसें । बाळ वदे जैसें मायबापा ॥ २ ॥
तुका म्हणे मज न लावा वाकुडें । मी तुझें बोबडे बाळ तान्हें ॥ ३ ॥

( ८ )

शारीरा मानुषा दिव्या वैय्यासे ये च मानुषाः !
भौतिकाश्च कथं क्लेशा बाधंते हरिसंश्रयम् ॥ १ ॥ ( स्कंध ३ )

## अभंग.

तुटे भवरोग ! संचित क्रियमाण भोग ॥ १ ॥
ऐसें विठ्ठलाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥ २ ॥
नुरे कांहीं पाप । जाय त्रिविध हा ताप ॥ ३ ॥
तुका म्हणे माया । होय दासी लागे पायां ॥ ४ ॥

---

# साभिप्राय स्वीकार.

**आत्मोन्नतिः**—लेखक सीताकांत उर्फ सीताराम शिवराम लोटलीकर, मुंबई नं. ४ किं. रु. १. नवजीवनमालेचें हें पांचवें पुष्प आहे. या मालेशिवाय लघुजीवनमाला, राष्ट्रजीवनमाला, चरित्रमाला व इतर सर्वसामान्य पुस्तकें मिळून ‘ सीताकांत ’ यांनीं सुमारें २० पुस्तकें लिहिलीं असून हीं सर्व खरो-खरीच अतिशय वाचनीय आहेत. ‘ सामर्थ्यसमृद्धि व शांति ’ ‘ संजीवनी विद्या ’ ‘ शक्तिसंरक्षण ’ ‘ सुलभ व्यायाम ’ ‘ स्वराज्याचा उषःकाल ’ ‘ आरोग्य सप्तक ’ इ० पुस्तकांच्या नांवावरूनच त्यांच्या लेखनाचें धोरण कळून येण्यासारखें आहे. लोकांचें आरोग्य उत्तम सुधरावें, त्यांच्या अंगीं सामर्थ्य व कर्तृत्व यावें, त्यांचें नैतिक बळ वाढून राष्ट्र सर्वांगसुंदर व्हावें अशा शुभेच्छेनें सीताकांत हीं पुस्तकें लिहीत असतात. कुलीन स्त्रीपुरुषांनीं व बालतरुणांनीं हीं मननपूर्वक वाचण्यासारखीं आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांनीं केलेल्या सूचना व दिलेले नियम आचरणांत आणल्यास शरीर, मन व बुद्धि तरतरीत, शुभभावनायुक्त व बलवंत होतील यांत संशय नाहीं. यांचीं सर्वच

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

पुस्तकें उपयुक्त आहेत. यांची भाषा साधी, उद्बोधक व मनोहारी आहे. विचार उदात्त व मननयोग्य आहेत. साऱ्या पुस्तकांत एकही वाक्य न वाचण्यासारखें नाहीं. प्रत्येक सभ्य कुटुंबांत सीताकांतांच्या सर्व पुस्तकांचा सेट असावा, व लहान मोठयांनीं एकत्र बसून क्रमानें सर्व पुस्तकें वाचावीत अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

२ **भगवद्गीताचंद्रिका**:—शिवरामस्वामींचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें पवित्र काम चिटगोपा येथील स्वामींचे संप्रदायी रा. हणमंत शिवराम मंकाळ यांनीं सुरू केलें असून 'भक्तिमार्गआन्हिक व प्रबोधसुधाकर' हे दोन ग्रंथ एका भागांत, व 'गुरुगीता व अपरोक्षानुभूति' ह्या ग्रंथांचीं पद्यमय भाषांतरें दुसऱ्या भागांत व 'भगवद्गीता चंद्रिका' स्वतंत्रपणें तिसऱ्या भागात छापून प्रसिद्ध केली आहे. शिवरामस्वामींसारख्या सत्पुरुषाच्या ग्रंथावर अभिप्राय तो काय द्यायचा ? स्वामींचें पुण्यस्मरण करून तें करविणाऱ्या सद्गृहस्थाचें अभिनंदन करणें एवढेंच काम उरतें. सदर चंद्रिकेचें आमचे मित्र 'मननामोद कर्ते' रा. माधव गोविंद भिडे, यांनीं पोथी परीक्षून, टीपा देण्याचें, प्रूफें काळजीपूर्वक पाहण्याचें वगैरे सर्व काम फार आस्थेनें केलें आहे. शिवरामस्वामी हे शिवरामस्वामीचे शिष्य असून यांची 'वेदांतपर भूपाळी' भक्तिमार्गप्रदीपाच्या वाचकांच्या ओळखीची आहेच. तीवरून स्वामींचा अधिकार दिसून येतो. गीताचंद्रिका मात्र गद्यांत आहे कां पद्यांत आहे, पद्य असल्यास वृत्त कोणतें व तें म्हणायचें कसें याचा बोध होत नाहीं. शिवरामस्वामी हे श्री एकनाथमहाराजांच्या मुलीचे मुलगे असें राजवाडे यांनीं लिहिलें आहे तें कशावरून कोण जाणें !

३ **बाजी प्रभु देशपांडे**:—शिवकालीन प्रख्यात वीर बाजी प्रभु देशपांडे यांचें हें चरित्र रा. बा. स. कुळकर्णी (कत्रळीची चाळ, दादर, मुंबई किं० ८१२) यांनीं लिहिलें असून तें तरुणांच्या हातीं अवश्य देण्यालायक आहे. बाजी प्रभूचें शौर्य व स्वामिनिष्ठा सर्वांस महशूर आहे. 'आपल्या जातीचें स्तोम माजविण्याकरितां प्रभूंनीं बाजी प्रभूवर केवळ गाथा रचली आहे,' हें डॉ० केतकर यांचें मत समंजस लोक मानणार नाहींत. शिवकालीं ब्राह्मण, मराठे मावळे व प्रभू या चारी जातींनीं महाराष्ट्राची सेवा उत्कृष्ट बजावली असून चारही जातींत कर्ते पुरुष निर्माण झाले आहेत असा खरा इतिहास आहे. बाळाजी आवजी, खंडोबल्लाळ, सखाराम हरि इ० शूर कर्ते व स्वामिनिष्ठ थोर पुरुष कायस्थ प्रभू जातींत निर्माण झाले आहेत. महाराष्ट्राचा इतिहास प्रभू जातीच्या थोर पुरुषांनीं अलंकृत केला आहे. रा. कुळकर्णी

हे केतकरांच्या एककल्ली विधानावर चिडले आहेत हें स्वाभाविक आहे. आपणा-व्यतिरिक्त दुसऱ्या जातींतल्या कर्त्या पुरुषांबद्दल प्रेमादर बाळगण्याचें थोरपण आमचे लोक केव्हां शिकणार कोण जाणें! वीररत्न बाजी प्रभूचा विशाळ-गडच्या खिंडीतला पराक्रम महाराष्ट्राच्या इतिहासाला चिरकालीन उज्वलपणा देणारा आहे यांत शंका नाहीं. रा. कुलकर्णी यांनीं दिलेलीं अस्सल पत्रेंही महत्वाचीं असून त्यावरूनही वरील गोष्टच सिद्ध होत आहे.

**४. अर्वाचीन मराठी वाङ्मय व ५ बडोद्याचे मराठी साहित्य** ही छोटीं पुस्तकें महाराष्ट्र साहित्याचे व्यासंगी रा. गणेश रंगनाथ दंडवते यांनीं शोधपूर्वक लिहिलीं आहेत. पहिल्यांत १८५७ तें १८८५ च्या मराठी ग्रंथांचीं व लेखकांची सनवार व उताऱ्यांसह उपयुक्त माहिती दिली आहे. दुसऱ्यांत बडोद्यानें महाराष्ट्र वाङ्मयाची केव्हां कशी व किती सेवा केली आहे याचें सविस्तर विवेचन केलें आहे. दोन्ही पुस्तकांवरून रा. दंडवते यांचा महाराष्ट्र साहित्यावर व्यासंग फार दांडगा आहे व त्यांचे संशोधन कार्यांतले परिश्रमही कौतुकावह आहेत असें दिसतें.

**६ वत्सहरण**—'महाराष्ट्रसारस्वत' ह्या ग्रंथाचे प्रख्यात लेखक ठाण्याचे रा. विनायक लक्ष्मण भावे यांनीं मानभावपंथांतलें प्राचीन मराठी वाङ्मय परिश्रमपूर्वक मिळविलें असून त्यांतील कांहीं ग्रंथ प्रकाशित करण्याचें आरंभिलें आहे. रा. भावे यांचा संशोधकपणा, चिकाटी व उद्योग प्रशंसनीय आहे. त्यांची प्रस्तुत ग्रंथाची सुंदर प्रस्तावनाच ह्या गुणांची साक्ष पटविणारी आहे. सदर ग्रंथ दामोदर पंडित यानें शक ११९४ ते १२०७ च्या दरम्यान केव्हां तरी रचला. अर्थात् हा ज्ञानेश्वरीच्या पूर्वींचा आहे. याची भाषा ज्ञानेश्वरीसारखी आहे, कित्येक शब्दप्रयोग व दृष्टांतादि ज्ञानेश्वरीं-तले आहेत, यावरून ज्ञानेश्वरकालीन भाषेचें अनुमान बांधण्यास आणखी साह्य होतें.

**७ महाराष्ट्र सारस्वतः**—रा. भावे ह्यांच्या ह्या ग्रंथाच्या सुधारून वाढविलेल्या तिसऱ्या आवृत्तीचा पहिला भागही आमच्याकडे नुकाच आला आहे. महाराष्ट्रसारस्वताचा हा इतिहासग्रंथ मराठी भाषेंत चिरकाल राहणारा असून भावे यांचें नांव त्यामुळें अजरामर होऊन राहील यांत संशय नाहीं. ह्या पहिल्या भागांत मराठी भाषेची मूळ पीठिका, ग्रंथकर्तृत्वाची सुरवात, श्रीचक्रधर व मानभाव पंथ, त्या पंथाचा आद्य ग्रंथ, ज्ञानेश्वरादि चार भावंडें, नामदेव, तेराव्या शतकांतील कांहीं ग्रंथकार, चौदावें शतक, एकनाथ, एकनाथपंचक, नाथकालीन इतर कवि, मुक्तेश्वर, सोळाव्या शतकांतील

आणखी कांहीं कवि, तुकाराम व आणखी कांहीं संत अशीं ह्या ग्रंथाचीं १४ प्रकरणें असून ग्रंथभर ग्रंथकर्त्याची शोधकता, मार्मिकपणा, चिकित्साबुद्धि व इतिहासपरता हे गुण प्रगट दिसतात. नांवाप्रमाणें हें भावपूर्ण असतें तर दुधांत साखर पडली असती! एक प्रकारचा भाव त्यांचे ठायीं आहे. नाहीं तर प्रकरणें ५ ते ७ इतकीं उत्कृष्ट उतरलीं नसतीं. त्यांच्यांत रसवत्तेचा भाव आहे, भक्तिभाव नाहीं, ते काव्यरसिक आहेत, भक्तिरसिक नाहींत! मानवभावपंथाचें लिगाड जवळ बाळगून त्यांनीं भागवतधर्माची इमारत कशी उठत गेली हें क्रमानें सांगितलें आहे. भागवतधर्मांतील चातुर्वर्ण्यव्यवस्थेची जोपासना होईल अशा धोरणावर त्यांनीं जागोजाग जें विवेचन केलें आहे तें सुंदर वठलें आहे, पण भागवतधर्माच्या अंतरंगांत ते शिरले नाहींत. ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्याबद्दल त्यांनीं काव्यपूर्ण भाषेंत जें गौरवपर लिहिलें आहे तें यथायोग्य आहे. पण त्यांच्या कामागिरीची पुरी ओळख होण्याइतके ते त्यांच्या ग्रंथांच्या अंतरंगांत शिरले नाहींत व संप्रदायरहस्याची त्यांना माहिती नाहीं असें उघड दिसतें. 'ज्ञानेश्वर जेव्हां कल्पनातरंगांत डोलूं लागतो' 'बोलीं अरूपाचें रूप दावीन। अतींद्रिय परी भोगवीन इंद्रियाकरवीं' म्ह० जो विषय केवळ कल्पनेनेंच जाणावयाचा त्याला त्यांनीं शब्दांत बांधून टाकलें आहे' 'तो एकंदर कल्पनातरंगिणींत उतरला' 'याच्या कल्पनावृक्षाच्या बागेंतलीं फुलें कधीं कोमेजत नाहींत. इ० वाक्यांतील 'कल्पना' शब्द कानाला कसासाच लागतो! आधीं ज्ञानेश्वरादि महात्म्यांविषयीं एकेरी भाषा कानाला गोड लागत नाहीं, दुसरें ज्ञानेश्वरमहाराजांनीं जो स्वानुभव ग्रंथांत लिहून ठेवला तो काय 'कल्पनेचा' विषय आहे? कल्पना ह्म० आत्मस्फूर्ति असें ह्मणायचें असल्यास ठीक आहे. 'जेथें चातुर्वर्ण्याची कल्पना दृढमूल आहे तो प्रांत ह्मणजे तो समाज व ते लोक ज्ञानेश्वरादि भावंडांना वर्ज होऊन गेले'—येथपासून पुढचें वर्णन म्हणजे भाव्यांची केवळ कल्पना होय. 'ज्ञानेश्वरासारख्या कल्पनासृष्टींत वावरणाऱ्या चाणाक्ष पुरुषानें कानफाटया नाथपंथांत चातुर्वर्ण्याची आडकाठी नसल्यामुळें त्या पंथाचा स्वीकार केला. ज्ञानेश्वरांनीं अलवार साधूंचीं मतें, काश्मीरी शैवपंथाचीं मतें यांचा पाठिंबा आपल्या प्रतिपादनास घेतला इ० स्वकपोलकल्पित गोष्टी भावे यांनीं दडपून दिल्या आहेत! त्यांनीं 'नेवाशास येऊन एक नवा मार्ग चोखाळून नव्या पंथाची उभारणी केली' हें सिद्ध करण्यासाठीं भाव्यांनीं जो खटाटोप ५।७ पानांत केला आहे तो फोल आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं जे सिद्धांत सांगितले व जो मार्ग दाखविला त्याच्यासाठीं भावे काश्मीर व पंजाब येथपर्यंत धांवत आहेत पण तें सोडून त्यांनीं मूळ श्रीमद्भागवत ग्रंथ समग्र वाचावा ह्मणजे भागवतधर्माचें बीज कोठें आहे हें

त्यांस समजेल. अमृतानुभव, नाथभागवत, भावार्थरामायण, नाथांचे अभंग हे भावे यांनीं पाहिलेले दिसत नाहींत. 'नामदेवाची भक्ति थोडीफार भोळी व खुळी झाली' 'एकनाथ ज्ञानी असला तरी प्रतिभासंपन्न गोड रसवंतीनें गाणारा कवि नाहीं' 'एकनाथ संसार करीत होता व व्यवहार जाणत होता व ज्ञानराज कल्पनेच्या तरंगांत वाऱ्यावर वावरत होता' 'ज्यांनीं स्वर्गसुखाची कुरवंडी केली आहे अशांसाठीं ज्ञानेश्वरानें ग्रंथरचना केली व एकनाथ लुंग्यासुंग्या भोळ्याभोळ्यांकरितां लिहितो' इ० भावे यांनीं लिहिलेलीं वाक्यें अयथार्थ व कटु आहेत व याचें मुख्य कारण यांनीं ह्या महात्म्यांचे ग्रंथ आमूलाग्र न पाहतां बखर चाळून 'कल्पनेनें' लिहिलें हें होय. 'प्रत्यक्ष इहलोकापेक्षा काल्पनिक परलोकाबद्दल आवड ज्यास' हें वाक्य भावे यांचे दृष्टीनें बरोबर आहे पण संतांना 'परलोक प्रत्यक्ष व इहलोक काल्पनिक' असतो याची त्यांना 'कल्पना' नाहीं. 'ज्यांना इहलोकाची चाड नाहीं ते इहलोकीं राहण्याला थोडे अयोग्यच खरें!' (पृ० २६७). पृ० २८८ ते २९० मध्यें मुक्तेश्वराच्या चारित्र्यावर जे भावे यांनीं शिंतोडे उडवले आहेत व तुकोबाच्या साधुत्वाबद्दल (पृ. ३३७।८) जी साशंकता व्यक्त केली आहे तो भाग अत्यंत गचाळ होय. तुकोबांच्या स्वर्गारोहणाबद्दल असेंच तर्कट रचलें आहे व महाराज सदेह वैकुंठाला गेले असें ज्यांनीं लिहून ठेवलें ते 'लबाड नाहींत' (नशीब त्यांचें!) पण हें एक पूर्ण अंधश्रद्धेचें आणि गचाळ बावळेपणाचें उदाहरण आहे' असा शेरा भावे यांनीं ठोकून दिला आहे असो. महाराष्ट्र सारस्वतांत २-३ तपें पोंहत राहून अनिवार कष्ट, श्रम, शोधन, करून ज्यांनीं आपुलें आयुष्य या एका ग्रंथाची उभारणी करण्यांत खर्च केलें त्यांचे हृदयांत भागवत धर्मरहस्य खुलून उठूं नये व चिकित्सक काव्य दृष्टीपलीकडे त्यांची नजर जाऊं नये हा काळाचा महिमा होय असेंच म्हटलें पाहिजे! तुकोबांच्या अस्सल गाथ्याच्या प्रस्तावनेंत भावे यांनीं तुकोबांच्या चरित्र्यावरही मुक्तेश्वराप्रमाणें शिंतोडे उडविले होते व त्याचा मुमुक्षूनें तेव्हांच निषेध केला होता. पण ह्या ग्रंथांत तुकोबावर ते तितके घसरले नाहींत ही तुकोबांचीच कृपा समजली पाहिजे! भावे यांनीं शोध जबर केले आहेत, प्रसिद्धाप्रसिद्ध अनेक ग्रंथांची छाननी केली आहे व मराठी वाङ्मयाची हकीकत एकत्र केली आहे या त्यांच्या दीर्घ श्रमांबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. भाषा दृष्टीनें व काव्य दृष्टीनेंच त्यानीं मराठी ग्रंथांकडे पाहिलें आहे, भक्तिज्ञानाच्या दिव्यदृष्टीनें पाहण्याची परमात्मा त्यांस बुद्धि देवो अशी त्याची प्रार्थना करून हा त्रोटक अभिप्राय येथेंच पुरा करितो.

७ प्रबोध चंद्रोदय नाटकः—लेखक गोपाळ विठ्ठल सावंत तिरवडेकर, बिबवणें, सं. सावंतवाडी. किं. ०१४. कृष्णमिश्रयति यांनीं मूळ संस्कृतांत

लिहिलेल्या नाटकाची ही मराठी प्रतिकृति सुंदर वठली आहे. अध्यात्मज्ञानाचा उदय कसा होतो व त्यापुढें द्वैतभावाचे सर्व विकार कसे मावळतात हें नाटकाच्या रूपानें येथें दाखविलें आहे. नाटक मनोरंजक व बोधप्रद आहे.

८ समर्थ रत्नसंग्रह:—आमचे कऱ्हाडचे सज्जन मित्र. रा. सदाशिव खंडो आळतेकर यांनीं हा संग्रह प्रसिद्ध केला आहे. यांत समर्थांच्या कवितासमुद्रांतील निवडक रत्नें वेंचून त्यांचा हा संग्रह केला आहे तो महाराष्ट्रांत समर्थभक्तिविवर्धनाच्या कामीं उपयुक्त होवो असें आह्मी इच्छितों. याला प्रस्तावना व टीपा अधिक दिल्या असत्या तर बरें होतें. नित्य नैमित्तिक विविधसंग्रह सोपान२ मनाचे श्लोक ३राममंत्राचे श्लोक४ करुणाष्टकें, ६रामायण ७ ओव्या शतकें ८ स्फुट ओव्या ९ स्फुट प्रकरणें १० स्फुट श्लोक ११पंचकें १२प्रासंगिक १३दासबोध अशा तेरा भागांत समर्थांचीं निवडक कविता वाचकांच्या हातीं दिली आहे. सदाशिवरावांच्या चित्तांतील समर्थभक्तीचा ओलावा निःसंशय शुद्ध व सरस आहे, व त्याचा परिमळ त्यांच्या समर्थविषयक लेखांस व भाषणांस मोहकपणा आणतो. किं. रु.१८४ कमीच आहे.

९ अमृततुषार ऊर्फ आत्म्याचे बोलः—बोलणारा रा. केशव महादेव सोनाळकर, जळगांव. किं. रु.१८८ ग. सोनाळकर हे कवि व तत्वज्ञानाचे अभ्यासी ह्मणून बहुतांस परिचित असतील. हे बोल १४० आहेत व एकवार वाचनीय आहेत. कित्येक बोल मोठे सरस आहेत. विवेक, वैराग्य, मनःसंयम वगैरे संबंधानें यांचे बोल मनन करण्यासारखे आहेत.

१०. १९२४चा महाराष्ट्रः—लेखक पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे, अनसूया सदन, उमरावती, प्रकाशक के. र. काशीकर, शारदा कार्यालय, सांगली किं. रु.१ गतसालचीं राजकीय व सामाजिक स्थित्यंतरें, मतांतरें वगैरे ह्यांत पत्ररूपानें विशद केलीं आहेत. ह्यांतील समाजचित्रें गत सालांतलींच आहेत असें नाहीं, अलीकडील १०—२० वर्षांतलीं आहेत. तरुण मुलामुलींचे, विधवांचे, देशकार्य व समाजकार्य करणाऱ्यांचे विचार कसे आहेत व त्यांत काय सुधारणा व्हायला पाहिजेत हें मनोरंजक व सुबोध पद्धतीनें व समतोलपणानें पत्रव्यवहाराच्या रूपानें सांगितलें आहे. पुस्तक कुटुंबांतल्या स्त्रीपुरुषांनीं वाचण्यालायख आहे.

# महात्माजींचे टीकाकार.

मतभेद असणें हें स्वतंत्र बुद्धीचें लक्षण समजलें जातें हें जरी खरें असलें तरी तो मतभेद व्यक्त करण्याच्या कांहीं शिष्टसंमत पद्धति ह्या असतातच. ह्या पद्धतीचा अवलंब करून प्रतिपक्षावर कोणतीही टीका केली जावी. अशी टीका ही सद्भिरुचाला धरूनच केलेली असल्यानें ती विरुद्ध असली तथापि तिच्या योगानें कार्यनाश न होतां उलट थोडाफार कार्याला पोषक असाच तिचा परिणाम होतो. तसेंच विरुद्ध टीका वाटेल तितकी असावी पण तिचा पाया प्रामाणिकपणावर उभारलेला असावा. टीकाकारांनीं लिहितांना हेंच धोरण आपल्या दृष्टीपुढें नेहमीं ठेवावयास पाहिजे. परंतु अलीकडे महात्माजींवर मधून मधून ज्या टीका केलेल्या दृष्टीस पडतात त्यांतून हें अवधान सुटलेलें दृष्टीस पडत आहे. ह्याचें अगदीं ताजें उदाहरण म्हटलें ह्मणजे कलकत्त्याच्या अष्टांग आयुर्वेद विद्यालयाचा पाया घालतांना आयुर्वेदीय वैद्यांसंबंधीं त्यांचें भाषण होय. ह्याच भाषणाचा भावार्थ त्यांनीं ११ जून १९२५ च्या 'यंग इंडिया' मध्यें दिला आहे. हा भावार्थ आह्मीं अगदीं मननपूर्वक पुष्कळ वेळां वाचला असून त्यामध्यें आयुर्वेदाच्या निंदापर एकहि विधान आढळलेलें नाहीं ह्या लेखामध्यें जीं कांहीं विधानें त्यांनीं केलीं आहेत तीं आयुर्वेदीय कांहीं वैद्यांविषयीं आहेत असें असून महात्माजींनीं "आयुर्वेदावर हल्ला चढविला" "आयुर्वेदावर हल्ला चढविला" अशी ओरड करून ह्याबद्दल महात्माजींचा निषेध करण्याकरतां बृहन्महाराष्ट्रांत जोराची चळवळ चालविली जात आहे. पुण्याच्या वैद्यमंडळानें महात्माजींच्या निषेधपर एक सभा भरवून त्यामध्यें "महात्माजींचा मेंदु कुजला आहे" अशा अर्थाचेहि ठराव पास केले. ह्या ठरावाच्या छापील नकला महाराष्ट्रांतील प्रमुख प्रमुख शहरीं पाठविण्यांत आल्या असून ठिकठिकाणीं अशाच अर्थाचा महात्माजींच्या निषेधपर ठराव करा. असें आग्रहपूर्वक कळविण्यांत आलें आहे आणि ह्या त्यांच्या विनंतीला मान देऊन खामगांव, अकोला, जळगांव येथें तशा सभाहि भरविण्यांत आल्या व ह्या सभांचीं वृत्तें तारेनें पाठविण्यांत येऊन गांधीविरोधी वर्तमानपत्रांतून प्रमुख ठिकाणीं छापलींहि गेलीं !

महात्माजींनीं आपल्या ता. ९।७।२५ च्या 'यंग इंडियामध्यें' पुण्याच्या

वैद्यांस चांगलें समर्पक उत्तर दिलें आहे. त्यावरून कोणाचा मेंदु कुजला आहे आणि कोणाचा शाबूत आहे हें स्पष्टपणें कळून येत आहे. ता. ९-७-२५ च्या 'यंग इंडिया'च्या अंकांत महात्माजींचें हें उत्तर प्रसिद्ध झाल्यावर तें छापणें हें सत्यनिष्ठ वृत्तपत्रकारांचें कर्तव्य होतें. परंतु महात्माजींच्या विधानांचा विपर्यास करण्याचा आणि महात्माजींबद्दल शक्य तितका अनादर पसरविण्याचा ज्यांनीं विडाच उचलला आहे त्यांना ही न्यायबुद्धि कोठून असणार ! त्यांनीं महात्माजींचें हें उत्तर तर छापलें नाहींच पण आपण केलेला बुद्धिभेद, दिशाभूल आणि विपर्यास ह्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करण्याचा समंजसपणाही दाखविला नाहीं !

आयुर्वेदीय वैद्यांसंबंधीं महात्माजींचीं मतें काय आहेत हें पुण्याच्या वैद्यांस महात्माजींनीं जें उत्तर दिलें आहे त्यामध्यें ग्रथित झालीं असल्यामुळें तें उत्तरच आम्ही खालीं देत आहों:—

" आयुर्वेदिक व युनानी वैद्यांना माझी टीका वाचून फार दुःख झालेलें आहे. त्यांनीं माझा मेंदु बिघडला आहे व मी अहिंसेच्या विरुद्ध वागलों आहें असा मजवर आरोप केला आहे. त्यांना माझ्या हातून एवढी मोठी दुखापत झाल्याबद्दल मला दुःख वाटतें. परंतु मी अपराधी आहें असें माझ्यानें कबूल करवत नाहीं. **मी आयुर्वेदावर टीका केलेली नाहीं आपणांस जे आयुर्वेदीक वैद्य म्हणवून घेतात, त्यांजवर मी टीका केलेली आहे. त्या सर्वांवर मीं टीका केलेली नाहीं, तर त्यांच्यापैकीं ज्या पुष्कळ जणांकडून मीं म्हटल्याप्रमाणें भलत्याच हक्कांची बढाई मारण्यांत येत असते, त्यांवर मीं टीका केलेली आहे.** देशी औषधी व वनस्पति यांचें संशोधन करावयास मी एकीकडे सांगून दुसरीकडे या वैद्यांपैकीं कांहीं जणांच्या वागणुकीचा मी निषेध करणें ह्यांत विरोध कोणताही नाहीं; त्याचप्रमाणें कलकत्याच्या आयुर्वेदिक कॉलेजाचा मी पाया घालणें व कविराजांना मी इशारत देणें ह्यांत देखील कांहीं विरोध नाहीं. **मित्रभावानें मी केलेली टीका नामंजूर करण्याची पुण्याच्या वैद्यांस मुभा आहे. पण त्या नामंजुरीनें मी माझें अनुभवानें बनलेलें मत बदलणार नाहीं. मी केलेल्या प्रत्येक विधानाबद्दल मजजवळ भरपूर आधार आहे.** प्राचीन आणि उदात्त अशा सर्व गोष्टी मला आवडतात,पण त्यांचा दुरुपयोग मात्र मला अगदीं खपत नाहीं. जुन्या ग्रंथांतील बोल हे त्यांतील प्रतिपाद्य बाबतींत अखेरचेच बोल आहेत, असें मानण्याचें मी आदरपूर्वक नाकारतों. पूर्वजांच्या शहाण्या वारसाप्रमाणें आह्मांस प्राप्त झालेलें परंपरागत धन वाढविण्याची व

मंडित करण्याची मला उत्कंठा वाटत आहे. निषेधकांना मी असें कळवितों की माझ्या टीकेचा कांहीं कविराजांनीं सत्कार केला असून त्या टीकेमुळें आतां ते विचार करूं लागलेले आहेत. नम्रवृत्तीनें व वाटेल तितका स्वार्थ-त्याग करून सुद्धां जे वैद्य शास्त्रीय संशोधन चालवीत आहेत, त्यांच्या विरुद्ध माझ्या टीकेचा रोख नाहीं हें सांगण्याचें कारण नाहीं. माझें ह्मणणें इतकेंच आहे कीं असे वैद्य मोजावयास फारच थोडे आहेत. त्यांची संख्या बरीचशी वाढावी असें मी मागून घेतों." —प्रबोध.

---

# दासबोधाचा समागम.

प्रश्नः—आतां आपण उत्तर केलेंत त्यावरून ब्रह्माविष्णुमहेश हे नाहींतच असें दिसून आलें. ब्रह्मा चतुर्भुज असा पुराणांतरीं महिमा आहे, व रुद्राचा महिमा लिंगपुराणांत वर्णिला आहे त्याचा याचा मग मेळ कसा घालायचा ? मूळ मायेपासून गुणक्षोभिणी व या गुणमायेपासून ब्रह्मा विष्णु महेश हे त्रिगुणी देव झाले असें शास्त्रकार व शास्त्रानुसारी परंपरेचे लोक-ही सांगतात, पण मूळमायेस कोणीं केलें असें मी निर्भीडपणें विचारतों. कोणास हा प्रश्न विचारला तर ते 'आकांत' करितात, पण सप्रत्यय कोणी समाधान करीत नाहीं. प्रचीतिर्वाण वैद्य काय कामाचा ? तसें प्रत्यया-वांचून गुरुशिष्यांनाही अंधःकारच! देवीं माया केली म्हणावी तर देवांचीं रूपें मायेंत आलीं, मायेनें माया केली म्हणावी तर माया आणखी दुसरी धरावी लागणार! पंचमहाभूतांनीं माया केलीं असें म्हणावें तर तीं भूतांचीच वळली आहे. परब्रह्मानें केली म्हणावें तर परब्रह्माच्या ठिकाणीं कर्तृत्व नाहीं. माया सत्य असती तर तिच्या कर्तृत्वाचा संबंध ब्रह्माकडे लावतां येता, पण ती मिथ्याच असल्यामुळें तो लावतां येत नाहीं. वेदांना विचारावें तर वेद मातृकात्मक आहेत. मातृका ( अक्षरें ) ब्राह्मणमुखानें येतात, म्हणून हा सारा गोवा वाटतो. हा गुंताडा काढून टाकून मनाचें समाधान केलें पाहिजे. उत्तरः—लोकधाटी म्ह० लोकांच्या समजुती व शास्त्रनिर्णय यांत निश्चय भिन्नभिन्न सांगितले आहेत व यामुळें त्यांच्या सांगण्यांत कोठें कोठें फरक दिसतील म्हणून याच्याच अनुरोधानें पाहूं गेल्यास एक प्रत्यय येणार नाहीं. 'लोकधाटी शास्त्रनिर्णये। येथें बहुधा निश्चये। ह्मणोनियां येक प्रत्यये। येणार नाहीं.' ( २१ ) शास्त्राची भीड धरावी तर गुंतागुंत सुटत नाहीं व गुंतगुंत सोडावी तर शास्त्रभेद दिसतो.

शास्त्र रक्षून प्रत्येय आणिला । पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पहिला ॥
शाहणा मूर्ख समजाविला । येका वचनें ॥ २३ ॥

शास्त्रांत पूर्वपक्ष सांगितला असतो व पूर्वपक्ष म्हणजे लटका असतो. ( उदा० विवाह करून 'धर्मे चार्थे च' या प्रतिज्ञेप्रमाणें वागा, संतति निर्माण करा असें शास्त्र सांगतें. पण तें सांगणें पूर्वपक्षाचें आहे. निर्विषय करणें हा शास्त्राचा तरी हेतु असतो. शास्त्र प्रवृत्ति सांगतें, पण निवृत्ति हा मुख्य हेतु असतो. ज्याला स्वहित पाहिजे त्यानें पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पहावा. ) असो, शास्त्र रक्षून सांगतों. ( द. १० स. २ )

उपाधीविण जें आकाश । तेंचि ब्रह्म निराभास ।
ते निराभासीं मूळमायेस । जन्म जाला ॥ १ ॥

निरुपाधिक आकाशाचें ठिकाणीं मूळमाया जन्मली. मूळमाया वायुस्वरूप आहे व वायूच्या अंगीं पंचभूतें व त्रिगुण अशी अष्टधा प्रकृति आहे. आकाश–वायु–तेज–आप–पृथ्वी या क्रमानें सृष्टि झाली. आतां पृथ्वीच्या पोटीं पाषाण होतात हें उघड आहे; तरी ' नाना प्रचीत प्रमाण । पाषाण देवीं ' इ० पाषाण मूर्तीपासून ( दृढ उपासनाबळानें ) विश्वजनाला अनेक प्रकारचे प्रत्यय येतात, हें प्रसिद्ध व अनुभवसिद्ध आहे. पाषाणापासून वायूपर्यंत चढती परंपरा आहे हें आपण पाहिलेंच आहे. ' देव देवता देवतें भूतें । पृथ्वीमध्यें असंख्यातें । परंतु या समस्तांतें । वायुस्वरूप बोलिजे ॥९॥ वायुस्वरूप सदा असणें । प्रसंगें नाना देह धरणें । गुप्त प्रगट होणें जाणें । समस्तांसीं ॥ १० ॥ ' वायूमध्यें जाणीव, नानाविध वासना इ० रूपानें जगज्ज्योति आहे. आकाशाच्या पोटीं वायु झाला त्याचे प्रकार दोन: एक वारा विश्वांत वाहतो हा, व दुसरा वरील जगज्जोति. या वायुस्वरूप जगज्ज्योतीच्या देवदेवतांच्या अनंत मूर्ति आहेत. वायूपासून तेज झालें, त्याचेहि दोन प्रकार आहेत: उष्ण तेज व शीतळ तेज. उष्ण तेज सूर्य, अग्नि व विद्युत या रूपानें व शीतळ तेज आप, अमृत, चंद्र व शीत या रूपानें प्रगटलें. आपाचे पाणी आणि अमृत हे दोन प्रकार. पृथ्वीचे प्रकार दोन: पाषाण व मृत्तिका आणि रत्नें व सुवर्ण. मनुष्यें कोठून आलीं तें पाहूं. (द. १० स. ३).

उत्पत्तिस्थितिसंहार सृष्टीमध्यें होत असतां ' परमात्मा निर्गुण निराकार । जैसा तैसा ' असतो. होतें, वर्ततें आणि जातें, पण याचा संबंध नाहीं तेथें ! तो आदिमध्यावसानीं संचलाच आहे. विवेकी जो आहे तो सारासार विवेकानें हें आधीच जाणून असतो, त्याचे या भ्रमिष्ट लोकांत कोण ऐकतो ? 'बहुत भ्रमिष्ट मिळाले । त्यांत उमजल्याचें काय चाले । सृष्टीमध्यें उमजले । ऐसे थोडे ! ' ( ६ ) तो मात्र या भ्रमांत नसतो. एका परब्रह्मावांचून बाकी विका-

रवंत जेवढें ह्मणून दिसतें भासतें तें भ्रमरूप होय ! ‘ भ्रमेणाहं भ्रमेणत्वं भ्रमेणोपासका जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ ’ दूरदेशीं भ्रमण करितां दिशाभूल होणें, जिवलगांची ओळख विसरणें, दशावतार खेळांत ( किंवा नाटक तमाशांत ) धाटिंगण स्त्रीरूप घेऊन आले असतां मन कामाकार होणें, जागची ठेव किंवा वस्तु विसरणें, किंवा जवळ असून चोहींकडे शोधीत बसणें व खिन्न होणें, दुश्चिन्हें किंवा अपशकून पाहून बिचकणें, कांहीं हडबडलें कीं भूत आलेसें वाटणें, कांच म्हणून उदकांत पडणें ( मयासुराच्या सभेंत दुर्योधन पडला तसे ), एक असतां एक दिसणें, मिथ्या वार्ता ऐकून दचकणें, प्राण्यांच्या प्रेमपाशांत गुंतणें, पुढच्या जन्मीं यंव करीन त्यंव होईन अशा वल्गना करणें, मृत मनुष्यानें स्वप्नांत येऊन अमुक मागितलें तेंच मनीं धरून बसणें, अवघें मिथ्या म्हणून तोंडानें बोलत असतां धनाचा व ऐश्वर्याचा लोभ सुटणें, कर्मठपणानें ज्ञानाला विटणें, ज्ञातेपणानें भ्रष्ट होणें, अमर्याद वागणें, न्यायान्याय न कळतां उगाच अभिमानाच्या भरी भरणें, प्रचीतीवीण औषध घेणें व पथ्य करणें, शरीरभोगीं मन ठेवणें, ‘ ब्रह्मा लिहितो अदृष्टीं आणि वाचून जाते सटी ’ असल्या गोष्टीवर विश्वास ठेवणें हे सारे भ्रम होत. ‘ देहाभिमान कर्माभिमान । जात्यभिमान कुळाभिमान । ज्ञानाभिमान मोक्षाभिमान । या नांव भ्रम ॥ २९ ॥ भ्रमरूप विश्व स्वभावें । तेथें काय म्हणोन सांगावें ? । निर्गुण ब्रह्मावेगळें अवघें । भ्रमरूप ॥३६॥ ’ (द० १० स० ६)

‘ मोक्ष लाभे किती दिवसां ’ याचें उत्तर समर्थ ‘ मुक्ति लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ’ असें देतात. ‘ मनाच्या तोडून ओढी । श्रवणीं बैसावें आवडीं. ’ श्रवणाचें मनन करावें, अर्थांतर ध्यानीं आणावें, दुश्चितपण आलें तरी पुन्हां श्रवण करावें. ‘ अर्थप्रमेय ग्रंथांतरीं । शोधून ध्यावें अभ्यंतरीं । दुश्चितपण आलें तरी । पुन्हां श्रवण करावें. ’ अर्थांतर पाहिल्याशिवाय व दोष टाकून अर्थाला झगटल्याशिवाय जो नुस्तें श्रवण करील तो श्रोता नव्हे, पाषाण होय ! ‘ टांकीनें खपली फोडिली । ते मागुती नाहीं जडली । मनुष्याची कुबुद्धी झाडिली । तरी ते पुन्हां लागे ! ’ दुश्चितपणा टाकून द्यावा. त्यानें कार्यनाश होतो, प्रपंच ना परमार्थ—कांहींच लाभ न होतां हानि मात्र होते. ‘ निद्रा, आळस, दुश्चितपण । हेंच मूर्खाचें लक्षण ! ’ हे तीनही दोष टाकून, अध्यात्मश्रवणमनन करावें, व तें संतश्रीगुरुसंगतींत करावें म्हणजे मोक्ष तत्काळ मिळतोः—

लोहो परिसेसीं लागला । थेंबुटा सागरीं मिळाला ।
गंगे सरिते संगम झाला । तत्क्षणीं ॥ ४३ ॥
सावध साक्षेपी आणि दक्ष । तयास तत्काळचि मोक्ष ।

इतरांस तें अलक्ष्य । लक्षिलें न वचे ॥ ४४ ॥

शिष्यप्रज्ञाच मुख्य आहे. ‘ प्रज्ञावंत आणि अनन्य । तयास न लगे एक क्षण ’ प्रज्ञाही पाहिजे व गुरुवचनीं विश्वासही पाहिजे. ‘ प्रज्ञेवीण अर्थ न कळे । विश्वासेवीण वस्तु ना कळे । प्रज्ञाविश्वासे गळे । देहाभिमान ॥४७॥ देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तु प्राप्ति । ’ तात्पर्य सावध, साक्षेपी, दक्ष, प्रज्ञावंत व अनन्य हे पांच गुण ज्याचे अंगीं आहेत त्याला मोक्ष सहज, सुलभ व तात्काळ आहे ( द. ८ स. ६ ). मोक्ष कोणता ? ‘ प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध जाला । तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं । ’ ‘ मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ’ असा संकल्प धरल्यानें बद्ध झालेला जीव दुर्लभ नरदेह प्राप्त झाला असतांना ‘ पुढील जन्माची आशा धरून ’ सुसंधि घालवील तर तो मूर्ख होय. आत्मा स्वानंदघन एकच आहे. सकळ उपाधि निरसून ‘ तेचि वस्तु ते आपण ’ असा निश्चय होणें हाच मोक्ष. ( द. ८ स. ७ ).

---

# उतावीळ

( लेखक – विद्यार्थि , अमळनेर. )

देवा ! दोरी तुटेपर्यंत ती ताणण्यांत काय अर्थ आहे ? शक्तीच्याबाहेर ताण दिल्यास विण्याची तार दुभंग होते, तेव्हां संगीताची अपेक्षा तिच्यापासून कशी करावी ? माझ्या कुवतीप्रमाणें माझ्यापासून सेवा घ्या; जास्त मी कोठून देऊं ? दयेवांचून न्यायनिष्ठुरपणाला प्रेमाच्या साम्राज्यांत किंमत नाहीं. मला माहित आहे मी अपात्र आहें, न्याय्यान्याय्याच्या कांटयांत मी हलका ठरेन, परंतु मातेचें अपत्यप्रेम लायकी पहात नाहीं. उन्हानें करपून जाण्यापूर्वी देवाच्या पायीं स्थान मिळालें तरच फुलाचें जीवित साफल्य !

२

देवा ? तुम्हाला तरी कोणता आनंद असें करण्यापासून मिळतो तें मला कळत नाहीं ? सुटलेला बाण परत बोलावितां येत नाहीं. पिंजऱ्यांतून उडालेला पक्षी पुन्हां पिंजऱ्यांत येऊं शकत नाहीं. तुमच्या ठिकाणीं रमलेलें मन मला फिरवितां येत नाहीं. पण येवढ्या करितां कां तुम्हीं निष्ठुर व्हावें ? या निष्ठुरपणाचें वर्म

मला कळत नाहीं. यांत तुमचा कोणता मोठेपणा आहे ? मी अनन्यगतिक बनलों, जीवाचें कर्तव्य संपलें; आतां तुम्हीं तुमचें कर्तव्य बजाविलें पाहिजे. कां मला फक्त अनन्यगतिक करून सोडण्यांतच तुम्हांला मोठेपणा वाटतो ? नाहीं, तसें असतें तर मी अनन्यगतिक झालोंच नसतों. ही तरी तुमचीच देणगी आहे नां?

३

कडकडित तपाच्या सामर्थ्यानें तुह्मांला माझ्याकडे ओढण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं नाहीं. तीव्र जिज्ञासेनें तुम्हांला हुडकून काढणारी निग्रहाची व धीराची बुद्धि माझ्याजवळ नाहीं. माझा आर्तस्वर हा जर तुमच्या कानावर जाण्यास समर्थ नसेल तर तो तुमचाच दोष आहे असें मी समजेन ! 'आणि वस्तुमात्रीं गगन । जैसें असें संलग्न । तैसें शब्दजातीं कान । सर्वत्र जया' असें ज्ञानोबांनीं वर्णन केलें आहेना ?

४

पोकळ आशेवर जीव किती दिवस ठेवणार ? आशेची केवळ धुगधुगी किती दिवस टिकणार ? दुःख तरी स्पष्टपणें मिळूं द्या. निराशेनें पोळून निघाल्यावर जीव राहिलाच तर तो जास्त सामर्थ्यवान तरी होईल.

५

अंधाऱ्या रात्रीं निर्जन वनांत अहेतुकपणें भटकत असतां, काळोखानें तुडुंब भरलेल्या आकाशांतून प्रकाशमय ज्योती वरून खालीं येत आहे असा भास वेडी आशा उत्पन्न करिते व त्या आभासाचें असत्यत्व पटून मी केविलवाणेंपणें हंसतों, माझीच मला दया येते चांदण्यारात्रीं तुमचें हास्य चोहोंकडून कानावर येतें व दुसऱ्याच क्षणीं निराशा मला वेडावते. सकाळच्या अर्धवट झोपेंत तुमच्या गळ्यांत रुळणारी वैजयंती दिसते. तिच्या सुवासानें रोमरोमांत चैतन्य भिनतेंसें वाटतें. माझ्याकरितां तुह्मांला तिष्ठत उभें रहावें लागलें ह्मणून लाजेनें मी तसाच डोळे मिटून पडून रहातों. दुष्ट जागृति येते ती सुखस्वप्नाचा नाश करण्याकरितांच येते. सकाळचा थंडगार व सुवासिक वायु, मला फसविल्याच्या आनंदानें हंसत हंसत खिडकींतून माझ्या खोलींत शिरतो.

६

असें वाटतें कीं, संथपणें वहाणाऱ्या नदीच्या खोल डोहांतून ओंकाराचा गंभीर ध्वनि बाहेर येत आहे तोंच गुडपदिशीं आंत उडी टाकावी व त्या नादब्रह्मांत विलीन व्हावें ! संगीताच्या आनंदानें अंगावर रोमांच उभे राहतात व देहाचे अणुरेणु विगलित होऊन जीव बंधमुक्त होतोसें वाटतें व तो खूप वेगानें तुमच्याकडे धांव घेतो.

७

वाऱ्यावर सूर विरून जातो. वाट पहाण्यांतच आशेची परिसमाप्ति होणार काय ? आकांक्षा शून्यांत विलीन होणार काय ? वाट चुकलेला जीव निराशेच्या खोल अंधाऱ्या दरींत पडून गडप होणार कीं उद्धरणार ? काय तें एकदा निश्चित होऊं द्या.

---

# ताजे मननामोद

लेखकः—माधव गोविंद भिडे.

१

बाळ आणि बाळक एकच. तरी बाळक शब्दाच्या उच्चाराबरोबर बर्फाच्या खोलींत ठेविलेल्या सोडावाटरच्या बाटली प्रमाणें तेंच मूल आपल्या मनास गारेगार करून सोडतें ! आंतील पेयास बर्फ सगुण पण निराकार अशी आपली शीतळाई देतें. त्याच प्रमाणें बाळक शब्दांतील " क " हें अक्षर आपल्यातील कोमळपणा मात्र देतें. एरव्हीं " क " हें अक्षर बर्फाप्रमाणेंच स्वतां कठीण आहे !

२.

हिरा कठिण असतो. गारही कठिग असते. पण हिऱ्यांतील कठिणपणा आपल्या अनुभवास येत नाहीं. हातांत हिरा घेतला खरा पण डोळ्यांनीं हाताला हिऱ्याच्या स्पर्शाविषयींची माहिती मनास पोंचवूं दिलीच नाहीं. तेच गारेकडे डोळ्यांनीं पाहिलें, परंतु आपण त्याविषयीं मनाकडे बातमी पाठविणार नाहीं असें त्यांनीं हातास सांगितलें. त्या बरोबर हात पुढें सरसावले. मनाला गारेचें स्पर्शज्ञान मात्र झालें. याच प्रमाणें कोणत्याही इन्द्रियानें मनास ज्ञान दिल्याशिवाय मनाला वस्तूचें आभान होत नाहीं. नजर बंदीचा खेळ खेळण्यास गारूडीच बनलें पाहिजे असें नाहीं.

३.

स्त्रीची भूमिका घेणाऱ्या नटाचें पुरुषपण प्रेक्षकाच्या दृष्टीनें मिथ्याच असतें. मिथ्या ह्मणजे अनुभवास न येणारें.

४

नटाची बायको प्रेक्षकगणांत बसून स्त्रीवेषांत असलेल्या आपल्या नवऱ्यास पुरापुर ओळखीत असते. ती त्याच्या अभिनय नैपुण्याची वाहवा करीत असूनही तिला त्याच्या मूळस्वरूपाचा विसर पडत नाहीं.

५

स्वराच्या मागील कठोर व्यंजनही त्याच्याशीं संधि करितांना मृदु होतें. त्याच प्रमाणें गुरु जर स्वतःसिद्ध परीपूर्ण, निरपेक्ष असेल तर त्याच्या समागम प्रसंगीं उद्धट, उर्मट कठोरवृत्तीचा हीनबुद्धि शिष्यसुद्धां मृदु, मवाळ बनतो. शिष्याशिवाय जेव्हां गुरु केविलवाणा असहाय होईल तेव्हां त्याला पूर्ण कोण म्हणेल ? गुरु म्हणजे परमार्थाचा प्रबोध करणारा असा गुरु शद्बाचा संकुचित अर्थ करूं नये. पुढारी सुद्धां तेव्हांच आपल्या अनुयायांना मुठींत ठेवूं शकतो कीं जेव्हां त्याला स्वतः कर्तव्य अनुयायांच्या साह्यावांचूनही करितां येते.

६

दाराच्या फटींतून जातांना वारा शद्ब करतो आधीं आणि अंतीं निःशद्ब असणारा वारा फटींतच बोलूं लागतो. संकोचांतच शब्दविस्तार आहे. संकोच आणि उत्कटता समानार्थकच आहेत. काव्यप्रसव सुद्धां विकाराच्या उत्कट स्थितींतच शक्य होतो.

७

मोहोरेंत जे किडाळ असतें तें आनंदित मिरवतें. याचें कारण तें हिणकसपण सुवर्णास व्यवहारसुखार्थ हेतुपुरःसर आणिलें असतें. शुद्ध अव्यक्त राजसत्ता अशुद्ध व्यक्त हीनधातुमिश्रणाच्या रूपानें अवतरते. याच न्यायानें पाहतां ब्रह्मसत्ता प्रकृतीच्या नश्वर स्वरूपांतही अनिंद्यच ठरते.

८

राजसत्ता संपुष्टांत आली किंवा येणार असा प्रजेस संशय आला तर तावडतोब कृत्रिम नाण्यांचें खरें स्वरूप बाहेर पडतें. चलनी हुंडया म्हणजे मूळची चामडयाचीं चिटोरीं परंतु त्यांची स्वरूपस्थिति सरकार समर्थ असेतों कांहीं प्रत्ययास येणार नाहीं. मायामोहाचें साम्राज्य डळमळूं लागल्याबरोबर दृश्याचा भाव खाडदिशीं उतरतो. तावत्कालपर्यंत मात्र नाहीं. मायेच्या बुडाशीं असलेली ब्रह्मसत्ता वर डोकें काढण्याचा अवकाश कीं मायेच्या सत्तेला ओहोट वळलीच.

९

बहुजिनसी जिनगरी बाहुली कोठेंही मोडा तिच्या अंतःस्वरूपाचा

तेंव्हांच बोजवारा उडतो. त्याचप्रमाणें दृश्यांतील कोणत्याही भागास विवेकाचा धक्का लागो. धक्क्याबरोबर समग्र सत्ताच नाहींशी होते.

१०

म्हाताऱ्या बैलाच्या वेसणीप्रमाणें जीवन्मुक्ताची कर्तव्यबुद्धि जाणावी. ज्याला वेसण घातली ती शक्ति देहाला सोडून गेली. तथापि, वेसण आपली नाकांत आहे ती आहेच! हेतुशून्य कर्तव्यतत्परता पाहणें यासारखा सोहळाच नाहीं.

११

मागून आणून घरीं रांधल्यावर कोरान्नाच्या स्मरणानें सिद्धान्नास भिक्षेकरी भिक्षाच म्हणत असतो. तद्वत् आत्मज्ञानी शब्दज्ञानाचा परिपाक झाल्यावरही त्या अनुभवाला ज्ञान म्हणूनच वाखाणीत असतो. ही गोडवी ओशाळगत रसिकाला फार फार मानवते.

१२

मंडईंतून फळफळावळीनें भरलेला हारा डोक्यावर घेऊन चाललेली ओझेवाली वरचेवर " घर कोठें आहे दादा ? किती लांब आहे तरी अजून ? " म्हणून सारखी विचारीत असते. हाऱ्यांत काय आहे हें पुरतेपणीं ती जाणत असुनही तिला रसास्वादाची इच्छा उत्पन्न होत नाहीं. तिला केवळ हमालीचे चार सहा पैसे दिसत असतात. दिसून अदेखणेपण म्हणतात तें हेंच.

१३

साखरेला गोडीसाठीं दुसरीकडे जावें लागत नाहीं. या दृष्टीनें ती मधुररसस्वतंत्र असते. बिचारी सर्व लोकांना अत्यंत अभिलषित वस्तु असून ही स्वकीय रसास्वादन संबंधीं अत्यंत परतंत्र आहे. पूर्णगुरु निःशब्द स्थितींत निराभान असतात. त्यांच्या त्या अद्वैत–निद्रेतून जागें होणें हें केवळ अधिकारी शिष्यांच्या प्रबल प्रारब्धावर अवलंबून असतें.

ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ

# श्रीसमर्थसंजीवनी
# उर्फ
# रामदासी वेंचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वी आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. **(१) प्रपंच (२) राजकारण (३) परमार्थ व (४) विविधविषयक प्रकरणें** अशा चार भागांस मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा ' सारांश ' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बाइंडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन. व्ही. पी. नें २८६

पत्ता:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीप:**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्यपाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पीनें. ॥१२

२ **संतचरित्रमाला:**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १॥८.

३. **श्रीएकनाथचरित्र:**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापिली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॥१२

४. **कविरामायण:**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४

५. **आनंदलहरी:**—(कवितासंग्रह) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्‌ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२

६. **नारदभक्तिसूत्रें:**—हीं ८४ संस्कृत सूत्रें,त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८ व्ही.पी. नें ॥११

७. **नवविधाभक्ति:**—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥४

८. **निरंजनमाधवांची कविता:**—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्र:**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें [illegible] संग्राह्य झाला आहे. किं. रु. १॥८.

१०. **भक्तिमणिमाला:**—श्रीभागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८.

मुमुक्षु REG. No. B. 662

# पांगारकरांची पुस्तकें.

११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५

१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध (भाग १-२) –किं प्रत्येकीं रु १०८

१४ मोरोपंती वेंचे (दुसरी आवृत्ति):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयावरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं० रु. १०१२.

१५ पारिजातकाचीं फुलें (तिसरी आवृत्ति):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं० ०८.

१६ श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने ग्रंथ पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं० रु० ३

१७ श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं० ०५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख—विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं० ०१०.

१९ मुक्तेश्वर (चरित्र आणि काव्यविवेचन):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १

२० मारुतिउपासना. (चौथी आवृत्ति):—किं. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु ४. व्ही. पी. नें. ४०१०.

२२ सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२

२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे.—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणाचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २


२४ मोरोपंत (चरित्र आणि काव्यविवेचन)—किं. रु. २०८

२५ श्री एकनाथी भागवत (निर्णयसागर प्रेसचे आवृत्ति तिसरी):—किं रु ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


जुनें वर्ष १९ } भाद्रपद १८४७ { नवें वर्ष ५ वें
मास १ ला } सप्टेंबर १९२५ { अंक ९ ला.



संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. २ व व्ही. ने रु. २।३

मुद्रकः लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. २००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| | | |
|---|---|---|
| १ | मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ | नवविधाभक्ति ... ... ... ... | ३–२० |
| ३ | मोतीबाबा जामदार ... ... ... | २१–२७ |
| ४ | त्रिगुण विभाग ... ... ... ... | २७–२९ |
| ५ | स्फुट विचार ... ... ... ... | ३०–३५ |
| ६ | भक्ताचे उद्गार ... ... ... ... | ३६–३७ |
| ७ | सत्पुरुषदर्शन ... ... ... ... | ३८–४० |



# सन्तचरित्रमाला.

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें या ग्रंथासाठीं लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं आहेत व ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुळशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त तिरुपन्नालवर, सूरदास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीताराममहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबरावमहाराज भटजीबापू, सोनगिरिचे महाराज, भोरचे दत्तभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्खा ( मालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ. लेले, धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( विठ्ठल कृष्ण कामत ) दासी महाराज टाकळीकर ( काहळेकर ), बलभीमशेवा साडेकर ( श्री. खाजगीवाले ) शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर. ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ. ५५६ पांच फोटो किं. रु १॥८ .व्ही. पी. नें १॥१३.

पत्ताः—व्यवस्थापक ‘ मुमुक्षु ’ पुणें.

# मंगलाचरण.

[ वर्ष ५ अंक ९



विश्वविकासित मुद्रा । जया सोडवी तुझी योगनिद्रा ।
तया नमो जी गणेंद्रा । श्रीगुरुराया ॥ १ ॥
त्रिगुणत्रिपुरीं वेढिला । जीवत्वदुर्गी आडिला ।
तो आत्मशंभूनें सोडविला । तुझिया स्मृती ॥ २ ॥
म्हणोनि शिवेंसी कांटाळा । गुरुत्वें तूंचि आगळा ।
तऱ्ही हळु मायाजळा-। माजी तारुनी ॥ ३ ॥
जे तुझ्याविखीं मूढ । तयांलागीं तूं वक्रतुंड ।
ज्ञानियांसि तरी अखंड । उजूचि आहासी ॥ ४ ॥
दैविकी दिठी पाहतां सानी । तऱ्ही मीलनोन्मीलनीं ।
उत्पत्ति प्रळय दोन्ही । लीलाचि करिसी ॥ ५ ॥
हें असो विस्मयदातारा । तूं होसी जयाचा सोयरा ।
सोयरीकेचिया व्यवहारा । मुकेचि तो ॥ ६ ॥
तूंतें सिद्धाचि जो नेणे । तो नांदे सर्वज्ञपणें ।
वेदांही येवढें बोलणें । नेघसी कानीं ॥ ७ ॥
मौन गा तुझें राशिनांव । आतां स्तोत्रीं कें बांधूं हांव ।
दिसती तेतुली माव । भजों काई ? ॥ ८ ॥
जें सर्वथा सर्वही नोहिजे । तें अद्वया तूतें लाहिजे ।
हें जाणें मी वर्म तुझें । आराध्यलिंगा ॥ ९ ॥
तऱ्ही नुरोनि वेगळेपण । रसीं भजिन्नलें लवण ।
तैसें नमन माझें जाण । बहु काय बोलों ? ॥ १० ॥

—ज्ञानेश्वरी अ० १७

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षु'चा समागम केल्याचा लाभ होणार आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रां-सह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे.प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्त-कांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला:**--१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—ले-खांक १।२।३. ४ मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटाना-दाची उपपत्ति. ७पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म महोत्सव. ले. १ते४ .१०श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीचो यात्रा व पालख्यांचे समारंभ.१२होळीची मीमांसा. १३भक्तिमीमांसा.१४ भारतवीर १५श्रद्धा.१६वेदांताचा व्यवहारांत उपयोग.१७व्यसनांतून सुटावें कसें?१८ संक्रांतीचा हलवा.१९श्रीशिवलिंगाचें रहस्य.२०हिंदुधर्म.२१निंदकांचे उप-कार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट.२४ सत्संगाची आवड. आमचे पुढारी संतच.२६प्रेमामृतमाधुरी.२७डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा:**—१आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट.४मामामामींचा संसार.५सती आवडाबाई.६ योग्याची भेट. ७सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतन्या थमालले थमाल आपुल्या गाई.'१० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार? १३साधुकथा.१४ पतिपत्नीसंबंध. १५गोपाळराव आगर-कर.१६ नामदार गोखले.१७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर १९ मातृभाषेचें प्रेम.२०दयेचे प्रकार.२१वेदांताचीं चार मतें.२२ सर्वांघटीं राम. २३वाङ्मयतप. २४अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७निंदकांचे उपकार. २८ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९गीतारहस्य. ३० काळाचा काळ.३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहे-त्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद ( या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. )

पत्ता—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# नवविधा भक्ति.

तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥ १ ॥

भक्तिसुख अवीट आहे. इतर सर्व वैषयिक सुखें त्रिपुटींतली आहेत, नश्वर आहेत व सेवनोत्तर वीट आणणारीं आहेत; पण भक्तिसुख मात्र त्रिपुटीला ग्रासून उरणारें, अविनाशी व अवीट आहे. त्याचें कितीही सेवन केलें तरी पुनःपुन्हा ' सेविलेंचि सेवावें वाटे ' असें तें आहे. हें सुख अंतर्यामीं अखंड नांदत आहे. मायेच्या प्रभावामुळें तें आपलें आपल्यापाशीं असून दुरावलें आहे. त्याच्या प्राप्तीसाठीं म्ह० ओळखीसाठीं नवविधा भक्ति सांगितली आहे. ही प्रल्हादाच्या मुखानें जगाला मिळाली आहे. श्रीसमर्थांनीं दासबोधादि ग्रंथांत ती विशदरीत्या सांगितली आहे. त्यांच्या संगतींत ती आपण पाहूं.

## श्रवणभक्ति.

गणेश, शारदा व सद्गुरु यांना वंदन करून व ' श्रवणं कीर्तनं ' हा ' सच्छास्त्रींचा पावन ' श्लोक देऊन समर्थांनीं श्रवणभक्ति सांगण्यास प्रारंभ केला. श्रवणभक्तींत ' हरिकथापुराणश्रवण । नाना ( अथवा ) अध्यात्मनिरूपण ' या दोनही गोष्टी येतात. देव जर सगुण निर्गुण उभयरूप आहे तर ' सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां ते निर्गुण अध्यात्में शोधावीं । श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ' हें ओघानेंच आलें. श्रवणभक्तीचें हें वर्म सांगून समर्थ म्हणतात कीं सर्व कांहीं ' ऐकावें. ' कर्ममार्ग, उपासनामार्ग, ज्ञानमार्ग, योगयाग, वैराग्य यांचीं लक्षणें, नानाव्रतांचे, तीर्थांचे, दानांचे महिमे, ' नाना मंत्र नाना साधनें । नाना तपें पुरश्चरणें । ऐकत जावीं ' दुग्धाहारी, निराहारी, पर्णाहारी, तृणाहारी ' कैसे ते ऐकावे. ' नाना मुद्रा, नाना आसनें, पिंडज्ञानें, तत्वज्ञानें, नाना पिंडांची रचना, नाना भूगोल रचना, नाना सृष्टिरचना, रागज्ञान, ताळज्ञान, नृत्यज्ञान, वाद्यज्ञान, हे सर्व ' ऐकत जावें. ' चौदा विद्या, चौसष्ट कळा, सामुद्रिक लक्षणें, ' ऐकावीं. ' ' मंत्र मोहरे ( औषधी मणि ) तोडगे सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी ॥ धातुरसायण बुद्धी । नाडिज्ञानें ऐकावीं ॥ २२ ॥ कोण्या दोषें कोण रोग । कोणा रोगास कोण प्रयोग ' हें सर्व ऐकून ठेवावें:—

कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती ॥
कैसी पाविजे उत्तम गती । ऐसें हें ऐकावें ॥ २५ ॥
पिंडब्रह्मांडाची रचना । नाना तत्वविवंचना ।
सारासार विचारणा । कैसी ते ऐकावी ॥ २६ ॥
वेद शास्त्रें आणि पुराणें । महावाक्यांचीं विवरणें ।
तनुचतुष्टय निर्शनें ( निरसनें ) । कैसीं ते ऐकावीं ॥ २८ ॥

अमुक ऐकूं नये असें कांहीं नाहीं. श्रवण किंवा अवलोकन सर्वांगीण व व्यापक असावें. ' ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ' याचें नांव श्रवण भक्ति ! श्रवणभक्तीची सारभूत ओवी पुढील आहे.

ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें ।
विभक्ती सांडूनि भक्तीचें । मूळ शोधावें ॥ ३३ ॥

श्रवणाभ्यासानें विभक्ती म्ह० वेगळेपण सांडून देवाशीं भक्ती म्हणजे तादात्म्य साधायचें आहे, जीवपरमात्मसंयोग करायचा आहे हें न विसरतां श्रवण करावें.

श्रोता कसा असावा, श्रोत्यानें कोणते अवगुण टाकावे, श्रवण कशाचें व कसें करावें याबद्दल दासबोधांत कित्येक समास आले आहेत व श्रवणभक्ती-बद्दल समर्थांनीं प्रसंगोपात्त आणखी कांहीं उद्गार काढले आहेत त्या सर्वांचा येथेंच एकवट विचार करूं. अधिकारी श्रोत्यांचें गौरव ( द० १ स० ६ ) केलें आहेच. श्रोत्यांचीं अवलक्षणेंही ( द० १८ स० १० ) समर्थांनीं सांगितलीं आहेत.

ऐकिल्यावीण कळलें । शिकविल्यावीण शाहणपण आलें ।
देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ॥ ६ ॥
सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे ।
नेमस्त मनामधें आकळे । सारासार ॥ ७ ॥

याप्रमाणें श्रवणाचें महत्व सांगून पुढें ' श्रवणआड विक्षेप ' कोणते येतात तें सांगितलें आहे. श्रवण चालू असतांना जे उशिरानें ' नूतन येतात ते एकाग्र ' होत नाहींत म्हणून प्रारंभापासून आस्थेनें श्रवण करावें. असे उशीरां येणारे श्रोते स्वतःचेंच अनहित करितात असें नाहीं तर ' बाहेर उदंड ऐकून येऊन गलबला करितात, उगे राहत नाहींत ' यामुळें आधीं आलेल्या श्रोत्यांनाही त्यांजपासून त्रास होऊन सर्वांच्याच श्रवणांत मोठा विक्षेप येतो. यांचीही एकाग्रता होत नसल्यामुळें यांना गोडी लागत नाहीं. यांचें शरीर तेथें असलें तरी मन ' मागें होतें ऐकिलें नाना । तेंचि धरून बैसलें. ' यांचें मन नाना कल्पना कल्पीत बसतें; इतरांना काय करितां येणार ? यांचें मन

कांहीं दिसत नाहीं कीं त्यांना आवरितां येईल. मन हें 'ज्याचें त्यानें आवरावें। आवरून विवेकें धरावें । अर्थांतरीं.'

जें कांहीं श्रवणीं पडिलें । तितुकें समजोन विवरलें ।
तरीच कांहीं सार्थक जालें । निरूपणीं ॥ १६ ॥

उशीरां येण्यानें सर्वांच्या एकाग्रतेचा भंग होतो हा श्रवणाला पहिला विक्षेप सांगितला. आतां दुसरा पहा. श्रवणाला जाणारानें युक्ताहारविहार असावें नाहींतर 'उदंड जेवून आला । बैसतांच कासावीस जाला । तृषाक्रांत.' मग काय पाणी पाहिजेच! तें 'घळघळां उदंड घेतलें । तेणें मळमळूं लागलें । उठोनि गेला.' 'कपट ढेकर उचक्या देती । वारा सरतां मोठी फजिती । क्षणक्षणां उठोनि जाती । लघुशंकेसी ॥ दिशेनें कासावीस केला' इ०—आकंठ जेवून किंवा थालपिठें, भजीं, चिवडा, उसळी, इ० तामस अन्न आणि तेंही अतिरिक्त खाऊन जाणारे श्रोते श्रवणाला योग्य नाहींत. अधाशी, खादाड, जीभ स्वाधीन नाहीं अशांना श्रवणाचा फायदा घेतां येत नाहीं. तात्पर्य मनाप्रमाणेंच शरीर स्वाधीन असेल तरच श्रवणलाभ होईल. तिसरा विक्षेप. 'दृष्टांतीं कांहीं अपूर्व आलें । अंतःकरण तेथेंचि राहिलें' श्रोता दृष्टांतांतच गुंगून राहिला तर श्रवण कोठवर गेलें तें ध्यान न राहतां पुढें श्रवण फुकट जातें. वक्त्याबरोबर चालावें, मागें पुढें मन भटकूं देऊं नये. याशिवाय विषयी श्रोते 'बायकांकडेच पाहती । चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा' ( २६ ) यांना काय श्रोते म्हणावें? कांहीं वादक, छळक श्रोते श्रवणांत वाद उकरून काढतात, भांडाभांडी उत्पन्न करितात, निरूपण चाललें असतांना गप्पा ठोकतात, आणि पोटभरू असले तर 'हरिदासही रें रें करिती पोटासाठीं!' श्रोता असो वक्ता असो 'अंतर राखों नाहीं शिकला' तर श्रवणाचा उपयोग काय? असो. श्रवणाचा ज्ञानवर्धनाच्या कामीं उपयोग करून घ्यावा हें भल्याचें काम आहे. श्रोत्यानें वरील अवगुणांचा त्याग करावा व नेणपण घेऊन वक्तशीर श्रवणास जाऊन एकाग्रतेनें श्रवण करावें तरच त्याला श्रवण म्हणतां येईल. श्रवणापासून कोणकोणते लाभ होतात याचें विवरण द० ७ स० ८ मध्यें केलें आहे. 'श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती । श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ॥ २ ॥' श्रवणानें अभिमानाची उपाधि सुटते, दृढबुद्धि होते, निश्चयाचें समाधान मिळतें, पूर्वगुण पालटतात, प्रज्ञाप्रबोध वाढतात, मोह नासतो, स्फूर्ति प्रकाशते, विषयांची ओढ तुटते—असें हें श्रवण प्रपंचांत व परमार्थांत अत्यवश्यच आहे. 'प्रवृत्ति अथवा निवृत्ति । श्रवणेंवीण न घडे प्राप्ती' हें तों प्रत्यक्षच आहे. 'ऐकिल्यावीण कळेना' म्हणून प्रयत्नाच्या आधीं श्रवणच घडलें पाहिजे. श्रवणावांचून कांहींच कळत नाहीं

म्हणून सर्वांआधीं श्रवण घडलें पाहिजे. सन्मुखानें श्रवण झालें कीं प्रतीति तात्काळ होते.

सत्संगांवरी श्रवण । तेणें कळे निरूपण ।
श्रवणें होइजे आपण । तदाकार ॥ ९ ॥

नित्यनेमाचें श्रवण ठेवावें. श्रवणाचें मनन व मननाचा निदिध्यास होऊन निदिध्यासें साक्षात्कार होतो. म्हणून सर्व साधनांचें सार, सर्वश्रेष्ठ असें हें श्रवणच आहे. श्रवणावांचून परमार्थस्वार्थ कोणाला साधला आहे? श्रवणाचा अनादर जो आळसानें करितो त्याची थोर हानि होते. श्रवणानें दुरात्माच पुण्यात्मा होतो.

सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ॥ ४७ ॥

श्रवण पुनःपुन्हा करावें, नित्य करीत असावें, रोजरोज अन्नपाण्यासारखें तें अवश्य सेवावें. आतां श्रवण कशाचें आणि कसें करावें हें सांगतांना (द. ७ स. ९) 'अद्वैत ग्रंथ परमार्थीं । श्रवण करावे' असें समर्थ सांगतात. ज्याला मोक्षाची तळमळ आहे त्यानें अद्वैत ग्रंथ पहावे. परस्परविरोधी ग्रंथ आणि पंथ बहुत आहेत, पण 'जेणें जालें समाधान मोडे । केला निश्चय विघडे' असले ग्रंथ वाचूं नयेत व ऐकूं नयेत. साधकानें अद्वैतशास्त्रीं विवेक पहावा. भलता ग्रंथ भलत्यापुढें उघडूं नये. 'मल्हारमाहात्म्य द्वारकेशी । द्वारकामाहात्म्य नेलें काशी' असा प्रकार न करितां—

ज्याची उपासना जैसी । त्यासी प्रीति वाटे तैसी ।
तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वाटे ॥ १० ॥
प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें ।
पाणी पाणवाटे जैसें । आपणचि धांवे ॥ ११ ॥

ज्याला त्याला आपली उपासना प्रिय असते म्हणून वक्त्यानें श्रोत्यांच्या उपासनेला संभाळून निरूपण करावें. आत्मज्ञान्यांपुढें आत्मचर्चा व भक्तांपुढें सगुणकथा सांगावी. अंतर्निष्ठापुढें शृंगार सांगणें अप्रयोजक होईल. तात्पर्य ज्याला स्वहित साधणें आहे 'तेणें सदा विवरावें । अद्वैतग्रंथीं.' प्रपंचिक, हास्यविनोद, नवरसिक 'हित नव्हे तें पुस्तक परमार्थासी!' ग्रंथ कशाला म्हणावें? जेणें परमार्थ वाढे, जेणें भक्तिसाधन आवडे, जेणें धारिष्ट चढे, जेणें परोपकार घडे, जेणें विषयवासना मोडे व भगवंतीं प्रीति जडे 'तया नांव ग्रंथ' जेणें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथचि नव्हे.'

दुराशेचीं भूतें सर्वत्र पसरलींच आहेत म्हणून फळाशेची लालूच दाखवून दुराशा वाढविणारे ग्रंथ यांना ग्रंथच ह्मणूं नये. अनुताप वाटून अवगुण जातील असेच ग्रंथ वाचावे. संसारिकांना फळाशेचे, व हास्यविनोदाचे नवरसिक ग्रंथ आवडतात, परीं ‘ जे भगवंताचे अंश । ते भगवंतचि इच्छिती. ’

परत्रसाधनेंवीण । ह्मणों नये तें श्रवण ।
जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणा ॥ ५७ ॥

कर्मणा=काळ घालवणें, कालक्रमणा. ज्यांत कांहीं परत्रसाधन नाहीं तें श्रवण नव्हे. तात्पर्य मोक्षसाधनाचा विचार ज्यांत सांगितला आहे असा अद्वैतशास्त्राचा ग्रंथ पहावा. बाकी वेळ घालविण्याचे किंवा करमणुकीचे ग्रंथ परमार्थ्यांनें पाहूं नयेत. आतां अद्वैताचे ग्रंथ प्राकृत भाषेंत असले तरी अवश्य पहावेत हें द० ७ स० २ मध्यें सांगतात. ‘ सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार. ’

या कारणें अद्वैतग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ ।

पण अध्यात्मग्रंथ पाहण्यास अधिकारही ‘ जो सर्वांगें श्रोता ’ असेल त्याचाच आहे. संस्कृत भाषेचे अभिमानी मराठीची हेळणा करितात. ‘ एक ह्मणती मऱ्हाटें काय ’ पण ‘ हें तों भल्यानें ऐकों नये. ’ लोखंडाच्या पेटींत नाना रत्नें असून तीं कोणी त्यागील तर त्याला अभागीच ह्मटलें पाहिजे. धनाकडे लक्ष ठेवावें, सांठवणीकडे पाहूं नये.

तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणी सप्रचित ।
अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ३७ ॥

जें व्युत्पत्तीनें कळत नाहीं तें सत्समागमानें कळतें व कार्यसिद्धी अर्थापाशींच आहे. ह्मणून संस्कृतच्या ऐवजीं प्राकृत भाषा आली म्हणून कांहीं हानि होत नाहीं. लक्ष्यांश मुख्य, वाच्यांश गौण, हें जर सत्य आहे तर तो मराठी ग्रंथांत मिळाला म्हणून काय बिघडतें ? ‘ अर्थ सार भाषा पोंचट ’ पण लक्ष्यांश ह्म० मुकेपणाचें बोलणें कळायला स्वानुभवी श्रोता पाहिजे.

अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा ? ।
जयासि बोलतां वाचेचा । हव्यासाचि पुरे ॥ ४७ ॥
परीक्षावंतापुढें रत्न । ठेवितां होय समाधान ।
तैसें ज्ञानियांपुढें ज्ञान । बोलावें वाटे ॥ ४८ ॥

असा श्रोता पाहिजे. ‘ मायाजाळें दुश्चित ’ असें श्रोते निरूपणीं काय कामाचे ? व्यवसायांत गुंतल्यामुळें मळिण बुद्धि झालेले श्रोते परमार्थश्रवणास

निरुपयोगी होत. ‘ येथें पाहिजे सावधपण । अतिशयेसीं. ’ दुश्चित श्रोत्याला मराठीही कांहीं कळत नाहीं.

जेथें निरूपणाचे बोल । आणि अनुभवाची वोल ।
तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ॥ ५३ ॥

तात्पर्य अनुभवाचा जिव्हाळा ज्यांत आहे असें अध्यात्माचें श्रवण होण्यास (मराठींत वा संस्कृतांत) दुश्चित श्रोता उपयोगी नाहीं तर श्रोता सावधान पाहिजे. ब्रह्म अत्यंत सखोल, तें इंद्रियांच्या द्वारें जाणतां येत नाहीं. ‘ परी तें श्रवण अभ्यासें । पाविजे ब्रह्म. ’ अद्वैतश्रवण नित्य करीत असलें म्हणजे मधें निश्चय चळतो व द्वैत उफाळतें पण निश्चयदृढतेसाठीं ‘ श्रवण अखंड असावें. ’ श्रवणाला, व मुख्यतः अध्यात्मश्रवणाला बुद्धि अत्यंत सूक्ष्म केली पाहिजे, ह्मणजे श्रवणमननद्वारें मोक्ष तात्काळ मिळतो.

श्रवणामध्यें सारश्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण ।
सुचित करुनि अंतःकरण । ग्रंथामध्यें विवरावें ॥ १७-३-२ ॥
श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार ।
रोकडा,—मोक्षाचा उधार । बोलोंचि नये ॥ १७-३-३ ॥

सोन्याची, रत्नांची, अश्वांची परीक्षा करितांनाही फार सावध असावें लागतें आणि:—

येकांतीं नाजूक कारबार । तेथें असावें अतितत्पर ।
त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रंथीं ॥ १७-३-७ ॥

आत्मज्ञान गहन आहे. अष्टांगयोग व पिंडज्ञान यापेक्षां तत्वज्ञान थोर व तत्वज्ञानापेक्षांही आत्मज्ञान थोर आहे. म्हणून तें अत्यंत सूक्ष्म बुद्धीनेंच पाहिलें पाहिजे.

संसारसंगतीमुळें श्रवणमनन एकाग्रतेनें होत नाहीं व चित्त वारंवार दुश्चित्त होतें—यासही श्रवणावांचून उपाय नाहीं हें पुनःपुन्हा ( द० ८—६ ) सांगतात. ‘ मुक्ति लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ’ श्रद्धापूर्वक अध्यात्मनिरूपण ऐकतां ऐकतां श्रवणमननद्वारें रोकडा साक्षात्कार होतो. मोक्ष श्रवणानेंच होतो. श्रवणांत चित्तविक्षेप झाला तरी तोही श्रवणानेंच घालविला पाहिजे. नित्य श्रवणमनन हेंच परमार्थाचें पहिलें व महत्त्वाचें साधन आहे: —

मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडीं ।
सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा ॥ ५ ॥

अर्थप्रमेय ग्रंथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यंतरीं ।
दुश्चितपण आलें तरी । पुन्हां श्रवण करावें ॥ ६ ॥
अरे हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें ।
वाचिलेंचि वाचावें । पुनःपुन्हां ॥ ११-८-९ ॥
नर तोचि नारायण । जरी प्रत्ययें करी श्रवण ।
मननशीळ अंतःकरण । सर्वकाळ ॥ २८ ॥
जेणें स्वयेंचि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें ।
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ २०-५-२९ ॥

अधिकारी वक्ता भेटला नाहीं व स्वतःच्या बुद्धीनें ग्रंथ लावतां येऊं लागला तर वाचन ठेवावें. वाचन हा श्रवणाचाच एक भाग आहे. ग्रंथवाचन श्रवणांतच येतें, तथापि श्रवणाची सर वाचनास येणार नाहीं. सन्मुखानें अध्यात्म-श्रवण हें खरें श्रवण होय. श्रवण प्रत्ययानें ह्म. आत्मप्रत्यय घेत घेत, अनुभव घेत घेत, करावें. तलवारीला रक्षण जसें म्यानाचें तसें श्रवणाला पुरें साह्य मननाचें. मननेंवीण श्रवण व्यर्थ होय.

## २. कीर्तनभक्ती.

दीर्घकाल सत्संगांत श्रवणमनन झाल्यावर कीर्तनभक्तीचा अधिकार येतो. कीर्तनकाराचा अधिकार थोर आहे. तो समाजाचा गुरुच आहे. आपल्या प्रबोधशक्तीनें समाजाला धर्म, सदाचार, परोपकार इ० गोष्टींचा उपदेश करणारा मनुष्य थोर योग्यतेचा पाहिजे. विद्वत्ता, वक्तृत्व, बहुश्रुतपणा, गायन, मनुष्यस्वभावाचें व परिस्थितीचें ज्ञान, स्वाचार व सदाचार यांचें बळ व स्वानुभव इतक्या गुणांची कीर्तनकारांत सांठवण पाहिजे. कीर्तनानें स्वार्थ व परार्थ दोन्ही साधतात. भगवद्गुणानुवादांत स्वतः रंगणें व श्रोत्यांस रंगवणें ह्या दोन्ही गोष्टी कीर्तनानें साधतात. ' आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा ' स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं, आनंदासाठीं, हरिप्रेमासाठीं कीर्तन करावें. बाह्यांगांकडे फारसें लक्ष देऊं नये. ' बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर ' कां कीं त्याशिवाय श्रोत्यांना तो सांगणार काय ? ' आधीच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ' म्हणून कीर्तनकाराचें ग्रंथावलोकन व पाठ-पाठांतर चांगलेंच पाहिजे. त्याला सत्संगाचा, सद्ग्रंथांचा, पाठशक्ती वाढविण्याचा हव्यास पाहिजे व सततश्रम करण्याची संवय पाहिजे.

नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा ।
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ॥ ५ ॥

एकांताची आवड पाहिजे. ग्रंथगर्भीचें अर्थांतर शोधण्यास अवश्य अशी सूक्ष्मबुद्धि अभ्यासानें वाढविली पाहिजे. ' ध्यानमूर्ति अंतःकरणें । लक्षून कथा करावी. ' उपास्य चित्तांत ठेवून त्याच्या संतोषार्थ निःस्वार्थपणें आवडीनें कथा करावी. देवाचें रूपगुण प्रेमभरानें गावेत. ' यश कीर्ति प्रताप महिमा । आवडीं वर्णावा परमात्मा ' असा कीं हरिभक्तांना संतोष व्हावा. मधून मधून कथा, धात ( कल्पित गोष्टी ) माता ( घडलेल्या गोष्टी ) नेमस्त (पाल्हाळानें नव्हे) सांगून भक्तिज्ञानवैराग्याचा परिपोष करावा. कथानुसंधान सोडून बहकूं नये. करताळिका, टाळमृदंग, तानमान, गीतनृत्य यांचा कामापुरताच उपयोग करावा.

करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥ १२ ॥
कंप रोमांच स्फुरणें । प्रेमाश्रुसहित गाणें ।
देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ॥ १३ ॥

सहजानंदानें सप्रेमभरित अंतःकरणानें कीर्तन करावें. लज्जा व कृत्रिमपणा यांचा लवलेश त्यांत नसावा. पदें, दोहरे, श्लोक, ओव्या, वीरभाटीव ह्म. वीरश्रींचीं भाषणें, गद्यपद्याचे, नवरसांचे प्रसंग, प्रास्ताविक भाग हे सर्व मधून मधून आणावे. अस्ताव्यस्त बोलूं नये. कीर्तनांत विषय कोणते आणावेत ?

भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावे ॥ १६ ॥

पूर्वपक्ष मोडून सिद्धांताचें बोलणें बोलावें. शंकाकुशंका यांचे खंडण करून निश्चयाचें ज्ञान सांगावें. सगुण प्रसंगानें हरिप्रेम व निर्गुण प्रसंगानें अध्यात्म वाढवावें.

ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावीं ॥ २० ॥

वर्णाश्रमधर्म, उपासनामार्ग व गुरुपरंपरा यांचें रक्षण होईल, अशाच प्रकारें प्रतिपादन करावें. ' सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणजे निरूपण ' कीर्तन म्हणजेच रामकृष्णादि सगुणावतारांचे गुणानुवाद. हें कीर्तनांत मुख्य आहे. कीर्तनांत अध्यात्म बोलावें पण ' सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ' ह्म० निर्गुणप्रतिपादनाच्या भरांत सगुणभक्तीला यत्किंचितही धक्का लावूं नये. सगुण रक्षून ज्ञान सांगावें.

असो वक्तृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर ।
वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥ २४ ॥

हें सर्व संभाळून बोलणारा वक्ता पाविजे. हा एवढा लोकसंग्रहाचा अधिकार नसेल तर केवळ गुणानुवादकीर्तन करावें. कीर्तनानें वाचा पवित्र होते, अव्यग्रता घडते, श्रोत्यावक्त्यांचे संदेह नष्ट होतात, परमात्मा प्रसन्न होतो.

तात्पर्यः—परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद ।
तेणें करितां आनंद । उदंड होतो ॥ १८–२–२४ ॥

हरिकथेविषयीं द० १४स० ५मध्यें विवरण केलें आहे. हरिदास आणि (असून) विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त । व्युत्पन्न आणि वादरहित " असा कीर्तनकार असावा. कीर्तनांत ' स्त्रियादिकांचें कौतुक वर्णूंच नये ' क कीं श्रोत्यांचें मन कामाकार होऊन ते धारिष्टापासून चळण्याचा संभव असतो" सगुणमूर्तीपुढें देवाचे प्रताप, गुणलीला वर्णाव्या. ज्ञात्यांपुढें निर्गुण आणावें. ' निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें । दोहींकडे अभिमानें । वोस केलें ' असा गोंधळ करूं नये. ' देव सांडून वादांत मग्न होऊं नये. विद्या कळाकुसरी गायन असलें तरी भक्तिमार्गाचा जिव्हाळा भक्तच जाणता त.

लाज सांडून जनाची । आस्था सांडून धनाची ।
नीच ( नित्य ) नवी कीर्तनाची । आवडी धरावी ॥ १६ ॥
ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन ।
निःशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे ॥ २७ ॥

## ३. स्मरणभक्ति.

' स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ' ही नामस्मरण भक्ति. नामस्मरण सर्वकाळीं करावें. निदान प्रातःकाळीं, माध्यान्हकाळीं, सायंकाळीं अशा ठरीव वेळीं तरी नित्यनेमानें करावें. सुखांत अथवा दुःखांत, हर्षकाळीं किंवा विषमकाळीं, पर्वकाळीं ( एकादश्यादि ), प्रस्तावकाळीं ( कोणत्याही कार्याच्या आरंभीं ), कोडें, सांकडें, संकट आलें असतां, अवस्था, ( उदासीनता ) आली असतां, अशा विशेष प्रसंगीं तरी देवाचें स्मरण करावें. वास्तविक—

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरूं नये ॥ ७ ॥

संपत्ति अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ।
नामस्मरणाची स्थिती । सांडूंचि नये ॥ ८ ॥
नामें संकटें नासतीं । नामें विघ्नें निवारती ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥

भूतपिशाच्च समंधादिक हे नामनिष्ठाचें कांहीं वांकडें करूं शकत नाहींत. ‘ नामें विषबाधा हरती ’ ( प्रल्हादाचें उदाहरण आहेच ). नामें अंतकाळीं उत्तमगति होते. ‘ उफराटया नामासाठीं । वाल्मीक तरला उठाउठी.’ प्रल्हाद नाना आघातापासून सुटला. अजामीळ पापी नारायणनामानें पावन झाला. ‘ नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले. ’ नामाचा महिमा अगाध आहे. ‘ हळाहळापासुन सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ( शंकर ) ’

चहूं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं ल्हानथोर ।
जड मूढ पैलपार । पावती नामें ॥ २४ ॥

यासाठीं ‘ नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें.’ ही स्मरणभक्ति होय.

## ४. पादसेवनभक्ति.

‘ सद्‌गुरुकृपेवीण कांहीं । भवतरणोपाय नाहीं ’ यास्तव जन्ममरणरूप संसार निस्तरावयास सद्‌गुरूला शरण जाऊन सद्‌गुरूचे पाय सेवणें ही पाद-सेवन भक्ति होय. ‘ सद्‌गुरूपदीं अनन्यपण । या नांव पादसेवन. ’

पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्‌गुरूचे पाय सेवावे । सद्गतीकारणें ॥ २ ॥

सद्गुरु कोण, त्यांचे पाय, पाद, पद, चरण कोणते; त्यांचें सेवन करणें ह्म० त्यांशीं अनन्य होणें हें कसें याचें विवेचन पांचव्या दशकांत पहावें. देव व गुरु एकरूप आहेत, त्यांचें पद एकच आहे व त्या पदाशीं अनन्य व्हाव-याचें आहे, याचें वर्म पुढेंही आत्मनिवेदन भक्तिप्रसंगीं कळणार आहे. सद्‌गुरु हे सद्वस्तु दाखवितात. जी परब्रह्मवस्तु दृष्टीस दिसत नाहीं ह्म० जी दृश्य नाहीं, जी मनास भासत नाहीं ह्म० परावाणीसगट मनही जेथें पोंचत नाहीं, ‘अहंमम’ता संग सोडल्याशिवाय जिचा अनुभव होत नाहीं, तिची प्रचीती सद्‌गुरुप्रसादानें होते.

अनुभव घेतां संगत्याग नसे । संगत्यागें अनुभव न दिसे ।
हें अनुभवियासीच भासे । येरा गथागोवी ॥ ७ ॥

या ओवीचा पूर्वार्ध थोडा विचारांत घेतला पाहिजे. अनुभव म्हटला कीं त्रिपुटी आली. अनुभव ज्याचा घ्यायचा ती वस्तु, अनुभव घेणारा व अनुभव अशी त्रिपुटी अनुभवांत असते, म्हणून वस्तुरूप होण्यापेक्षां अनुभव खालचा ठरतो. संगत्याग ह्म० वस्तुरूप होणें. या अर्थानेंच कुबडीकारांनीं 'अनुभव म्हणजे सुख घेणें। संगत्यागें सुखरूप होणें' असे म्हटलें आहे. याचा विचार अनुभवी पुरुषांसच कळेल, केवळ शाब्दिकांस हा गोवा कळणार नाहीं. संगत्याग, आत्मनिवेदन, विदेहस्थिति, अलिप्तपण, सहजस्थिति, उन्मनी, विज्ञान–'हें सप्तही एकरूप' आहेत. ह्या सातही पदांचा लक्ष्यांश एकच आहे. हीं 'समाधानाचीं संकेतवचनें' आहेत. स्वरूपस्थिति, ब्रह्मरूपता दर्शविणारीं एकाच अर्थाचीं हीं नांवें आहेत. हीं पदें सात आहेत पण पदार्थ–पदांचा अर्थ, लक्ष्य, एकच सद्वस्तु आहे. हें सकळ कांहीं 'सद्गुरुपादसेवनें उमजों लागे.' अनुभवाचीं सकळ अंगें संतसंगतींत कळतात. पादसेवनभक्तीचें गौप्य तें प्रगट होतें, प्रतीत होतें. सद्वस्तु 'प्रगट असून (अहंमम हा संग सुटला नाहीं तोंवर) नसे' ह्म० नाहींसारखी वाटते. उलटपक्षीं 'गौप्य असून (सद्गुरुकृपा झाली कीं) भासे' ह्म० प्रत्यक्ष होते. ती भास आणि अभास यांहून निराळी असून गुरुगम्य आहे. गुरुमार्गानें जाणाऱ्यासच कळणारी आहे. हा मार्ग अंतरिक्ष [गुप्त] आहे. कां कीं इंद्रियें, मन, बुद्धि यांच्या पलीकडचा असल्यामुळें यांच्या साह्यानें तो मिळणारा नाहीं. ती सद्वस्तु सिद्धांत ह्म० नित्य सत्य असल्यामुळें तिच्या हद्दीवरून पाहतां 'सर्वही पूर्वपक्ष' आहे ह्म० सकल शास्त्रें, मतें, संप्रदाय इ० सर्व दृश्य भासात्मक जगत् मिथ्या मायिक आहे. 'पाहों जातां अलक्ष्य लक्षवेना' ह्म० ती अलक्ष्य असल्यामुळें पाहायला जातां (पाहणें ह्म० त्रिपुटी आली) आकळत नाहीं, ती त्रिपुटीपर आहे.

लक्ष्यें जयासी लक्षावें। ध्यानें जयासी ध्यावें॥
तें गे तेंचि आपण व्हावें। त्रिविधा प्रचीती॥ १४॥

लक्ष्याचें जें लक्ष्य, ध्यानाचें जें ध्यान अशी ती सद्वस्तु आपणच होऊन रहावें. शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती व आत्मप्रचीती अशा त्रिविध प्रचीतीनें वस्तुरूप व्हावें. वेदशास्त्रांच्या आज्ञा, गुरूचा उपदेश व स्वतःचा अनुभव या तिहींचा मेळ पाडावा व परमात्मवस्तु अंगें व्हावें. सत्संगानें हें होतें. पाहण्याची वस्तु (दृश्य), पाहणारा (द्रष्टा) व पाहणें (दर्शन) ही त्रिपुटी मावळून तद्रूपता पावणें हेंच समाधान होय. हें सद्गुरुसंगतीनें प्राप्त होतें. विद्याभ्यास किंवा इतर साधनें दारापर्यंत नेतील, पण सद्वस्तु केवळ गुरुगम्य आहे ह्मणून सद्गुरु-

पादसेवनरूप चौथी भक्ति करावी: देव, ब्राह्मण, महानुभाव यांच्या ठिकाणीं सद्भाव ठेवावा. 'परंतु सद्‌गुरुपाय सेवणें ' या नांव पादसेवन. या भक्तीच्या योगानें सायुज्यप्राप्ति होते.

## ५. अर्चनभक्ति.

'अर्चन म्ह० देवतार्चन । शास्त्रोक्त पूजाविधान । ' हें केलें पाहिजे. नाना आसनें उपकरणें । वस्त्रालंकार भूषणें ' घेऊन मानसपूजा, मूर्तिध्यान करणें व शास्त्रोक्त पूजाविधि करणें याचें नांव अर्चनभक्ति. देव, ब्राह्मण, अग्नि, साधुसंत अतीतअभ्यागत, यति, गायत्री ( गाय ) यांचें पूजन, नाना देवतांच्या प्रतिमांचें पूजन, आपलें गृहींचें देवतार्चन ही अर्चनभक्ति होय. पंचायतनपूजा करावी. परमेश्वराच्या उदंड मूर्ति आहेत तितक्यांची पूजा करावी. 'याहीं वेगळे कुळधर्म । सोडूं नयेत अनुक्रम ' सर्व कुळधर्म यथाक्रम अवश्य करावेत.

नाना तीर्थक्षेत्रांस जावें । तेथें त्या देवाचें पूजन करावें ।
नाना उपचारीं अर्चावें । परमेश्वरासीं ॥ १७ ॥
काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवंत अर्चणें । या नांव अर्चनभक्ती ॥ १९ ॥

शाळिग्राम, बाण, भैरव, भगवती, मल्हारी, गणेश, शारदा, विठ्ठल, मत्स्यकूर्मादि दशावतारांच्या मूर्ति, अश्वत्थनारायण, सूर्यनारायण, शेषशायी, हरिहरांच्या अनंतमूर्ति—या सर्वांचें सद्भावानें पूजन करावें. ही भगवंताची, एका परमेश्वराचीच पूजा होय. पूजा शास्त्रविधीप्रमाणें समंत्रक करावी. पंचामृतें, पुष्पें, परिमळद्रव्यें, धूपदीप, सुंदर नाना खाद्यांचे नैवेद्य, तांबूल इ० सर्व साहित्य घेऊन मनोभावें देवाची पूजा करावी. शिबिका, छत्रें, सुखासनें, सूर्यपानें ( अबदागिरी ), दिंडया, पताका, निशाणें, टाळ, मृदंग, नानाप्रकारचीं वाद्यें, अशाप्रकारें आपल्या भक्तिभावासाठीं देवाचें ऐश्वर्य वाढवावें. भक्तसमुदाय मिळवून महोत्सव करावे. धनाचें आनुकूल्य असेल त्यांनीं देवालयें, वापीकूपसरोवरें, मठ, मडया ( मढया ) धर्मशाळा, नक्षत्रमाळा, वृंदावनें, वनें उपवनें, पुष्पवाटिका, वगैरे बांधावींत किंवा तयार करून देवाला समर्पावींत. गाई, म्हशी, वृषभ इ० पशु किंवा शुकसारिका, मयूरें, कोकिळा, वगैरे पक्षी देवाला वहावेत. तात्पर्य कायावाचामनधन यथाशक्ति देवाला अर्पावें ही अर्चनभक्ति होय. ही प्रत्यक्ष नाहीं घडली तरी मानसपूजा करावी. सद्‌गुरूचें अर्चनही याच प्रकारें करावें.

जें जें आपणांस पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानस पूजा ।। ३३ ॥

## ६. वंदनभक्ति

सहावी नमनभक्ति होय. ' नमन भक्ति ' न मन ' होऊन म्ह. मन मागें सारून, मन न उरवून करावी !

साहवी भक्ती ते वंदन । करावें देवासी नमन ।
संत साधु आणि सज्जन । नमस्कारीत जावे ॥ २ ॥
साष्टांग नमस्कारास अधिकारु । नाना प्रतिमा देव गुरु ।
अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा ।। ४ ॥

देव आणि सद्गुरु यांना साष्टांग नमस्कार करावा, इतरांना त्यांच्या अधिकाराप्रमाणें करावा. श्रीविष्णुमूर्ति, शंकर, मारुति व सूर्य यांना विशेषतः नित्य नेमानें साष्टांग नमस्कार घालावे. भक्त, ज्ञानी, विरक्त, तापसी, योगी इ० सत्पात्र पाहून ' नमस्कार घालावें ' व वेदज्ञ, शास्त्री, पंडित, पुराणिक, याज्ञिक हे पवित्रजन ' नमस्कारीत जावे ' तात्पर्यः—

जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान ।
याकारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ ९ ॥

सर्व देवांना भावानें नमस्कार करावे, ते एका भगवंतालाच पावतात. 'नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे । नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रांसी ' नमस्कारानें अन्यायाची क्षमा होते, दोष जातात, प्रसन्नता वाढते, कृपा उचंबळते.

सिसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड ।
याकारणें अखंड । देवभक्त वंदावे ॥ १६ ॥

संत साधूला नमस्कार घालतां तो ' सुगमपंथें नेऊन घाली । जेथील तेथें ' ह्म० आत्मपदावर नेऊन बसवितो. अशी ही वंदनभक्ति सुलभ आहे.

## ७. दास्यभक्ति.

दास्यभक्ति मारुतिरायांनीं केली तशी कोणी केली नाहीं.

सातवें भजन दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।
सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ॥ २ ॥

देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें ।
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें ॥ ३ ॥

जयंत्या पर्वें महोत्साह । असंभाव्य चालवी वैभव ।
जे देखतां स्वर्गींचे देव । तटस्थ होती ॥ १८ ॥

देवद्वारीं जें जें देवाचें काम पडेल तें तें अंगचुकारपणा न करितां कष्ट सोसून अत्यंत उत्साहानें करणें ही दास्यभक्ति होय. कायावाचामनानें व धनानें दास्य करावें. देवालयाचे जीर्णोद्धार करणें; धर्मशाळा व सोपे बांधणें; शिबिका मंचक, डोल्हारे, छत्रचामरें तयार करून देवकार्यार्थ देणें; देवांस उत्तमोत्तम अलंकार अर्पण करणें; पशुपक्षी यांच्या शाळा बांधणें; स्वयंपाकगृहें, भोजन शाळा, पडशाळा बांधून देणें, इ० प्रकारचे देवाचे महोत्सव थाटानें सतत चालतील अशा प्रकारें देवाचें दास्य करितां येतें. 'सर्वांठायीं अतिसादर । आणी दास्यत्वासहि तत्पर ॥ कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं' हें दास्य-भक्तीचें लक्षण होय. कोठें न्यून पडूंच द्यायचें नाहीं असी तत्परता असावी. देवपूजेचें सर्व साहित्य पुरवणें व देवदर्शनार्थ येणाऱ्या भाविकांचें पारपत्य करणें इ० समाचार घेणें व देवाची मनोभावें प्रार्थना करणें हें दास्यभक्तीचें लक्षण आहे.

वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं ।
अंतरें निवतीं सकळांची । ऐसें वदावें ॥ २६ ॥

येणेंप्रकारेंच सद्गुरुचें दास्य करावें व 'प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेंचें करीत जावें.'

## ८. सख्यभक्ति.

'देवासीं परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें' हें सख्यभक्तीचें लक्षण होय. 'देवास जयाची प्रीती । आपण वर्तावें तेणें रीती' हें सख्य जडण्याचें मुख्य साधन आहे. दोघांचें सख्य समानत्वामुळें जडतें हें उघड आहे. देवाला जें आवडतें तेंच ज्याला आवडतें तो देवाचा सखा. 'मनासारखें होतां सख्य घडे नेमस्त.' देवाला काय आवडतें ? 'भक्तिभाव आणि भजन । निरूपण आणि कथाकीर्तन । प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा.' मग हेंच ज्याला आवडेल तोच देवाचा सखा होईल हें ओघानेंच आलें. देवाला एकांतिक भक्ति आवडते, अनन्यता आवडते, यासाठीं:--

देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंही वेंचावें ॥ ६ ॥

संसारचिंता सोडून देवाचेंच चिंतन करावें, निरूपण कीर्तन कथा-वार्ता देवाच्याच कराव्या.

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥ ८ ॥
आपलें अवघेंचि जावें । परी देवासी सख्य रहावें ।
ऐसी प्रीती जीवेंभावें । भगवंतीं लावावी ॥ ९ ॥

आपलें सर्वस्व देवाला द्यावें, आपलें वेगळें ह्मणून कांहीं नसावें अशी अमायिक ह्म० निष्कपट सख्यभक्ति करावी. भक्त झाल्यावर 'देवास लागे भक्ताची चिंता.' लाखाजोहरीं जळतां पांडवांना त्यानें विवरद्वारें बाहेर काढलें तो कसल्याही आघातांपासून भक्तरक्षण करण्यास समर्थ आहे, व भक्तवत्सलही आहे.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥ गीता ४–११ ॥
ह्म०—जैसें जयाचें भजन । तैसा देवही आपण ।
म्हणोनि हें अवघें जाण । आपणाच पासीं ॥ १४ ॥

आपल्या मनासारखें न झालें व निष्ठा मोडली तर हा आपलाच कचेपणा आहे असें समजावें. मेघ ओळला नाहीं तरी चातक पालटत नाहीं, 'चंद्र वेळेसी उगवेना । तरी चकोर अनन्य,' अशी अनन्यता असली तरच तें सख्य. 'सखा मानावा भगवंत.' मातापिता, गणगोत, विद्या, लक्ष्मी, धनवित्त 'सकळ परमात्मा' याप्रमाणें देवाला अंतरीं सदृढ धरावें. असें निश्चयानें सख्य हवें.

देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ॥ १० ॥

असें वरपंगी सख्य काय कामाचें ?

आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥ २१ ॥
देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ॥ २५ ॥
देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।...

देवाचें निरपेक्ष व निराकांक्ष भक्त व्हावें. आपले वेगळे मनोरथच ठेवूं नयेत. देवाचें जें मनोगत तेंच आपलें उचित असें मानावें. पूर्ण शरणागति पाहिजे. देवाला जें आवडलें तें आवडून घ्यायला शिकावें. देव अच्युत आहे,

समर्थ आहे. दयाळु आहे, यावर अचळनिष्ठा ठेवून देवाचें केलें सर्व आवडावें हे सख्यभक्तीचें मुख्य, लक्षण आहे. ' देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी ' हें अनेक भक्तकथांवरून उघड आहे. देवाशीं अतूट अवीट अखंड सख्य असावें ' देव तैसा गुरु ' हें सांगायला नकोच.

' राजी है हम् उसीमे जिस्मे तेरी रजा है. ' ज्यांत तुझी मर्जी आहे त्यांत मी संतुष्ट आहें. ' अल्ला करेंगा वैसेहीभी होना । अल्ला रखेंगा वैसेभी रहना ' ही सख्यभक्ति.

## ९. आत्मनिवेदनभक्ति.

नवविधाभक्तींत ही मुख्य आहे. ' नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण. ' सायुज्यता देणारी हीच भक्ति होय. आत्मनिवेदन कशाला हाणावें ? ' देवासि वाहावें आपण. ' तें वहावें कसें ? ' करावें तत्वविवरण म्हणजे कळे. ' दारासुत गृहप्राण हे देवाला अर्पण करायला सत्पुरुष सांगतात, तें थोडें सुलभ आहे, पण देवाला ' आपण वाहणें ' म्हणजे काय ? आपण कोण ? आपण बहुधा देहसंघातालाच ' आपण ' म्हणतों. हा देह किती तत्वांचा केला आहे, तीं तत्वें ' आपण आहोंत का तत्वांहून 'आपण' वेगळे आहोंत याचा विचार करावा.

तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ७ ॥

या पांचभौतिक पिंडांत किती तत्वें आहेत व तीं ब्रह्मांडांतील तत्वांप्रमाणेंच अव्यक्तांतून कशीं आलीं आहेत, या तत्वांच्या गलबल्यांत ' आपण ' कसा नाहीं, अव्यक्तांतल्या तत्वांचेच नानाविध पिंड कसे बनतात व तत्वें तत्वांत मिसळून पिंडब्रह्मांडांची रचना कशी मायिक होत जाते, याप्रमाणें तत्वझाडा किंवा तत्वनिरसन होतांच 'आपण' नाहीं हें कसें उमजतें व 'आपण नाहींसा झाल्यावर एक आत्माच कसा उरतो हा विचार मुख्यतः झाला पाहिजे.

तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ? ।
आत्मनिवेदन येणेंप्रकारें । सहजचि जालें ॥ ९ ॥
तत्वरूप सकळ भासे । विवेक पाहतां निरसे ।
प्रकृति निरासें आत्मा असे । आपण कैंचा ? ॥ १० ॥
येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा ' आपण ' कैंचा चोरु । आणिला मध्यें ॥ ११ ॥

विवेकानें तत्व तत्वांत मिसळून टाकलें व हें नीट ओळखलें म्हणजे 'आपण' उरतच नाहीं. पिंडब्रह्मांड व त्यांतल्या नाना व्यक्ति तत्वरूप कशा आहेत हें पाहिलें म्हणजे सकळ विश्व तत्वरूप भासतें व हा सारा विस्तार प्रकृतीचा

आहे हें ध्यानांत येऊन एक मुख्य परमेश्वर ह्म० आत्मा व दुसरी अखिलनामरूपात्मक प्रकृति हे दोनच विवेकदृष्टीनें उरतात. त्यांत ' आपण ' कोठेंच सांपडत नाहीं.

तत्वें साक्षत्वें वोसरतीं । साक्षत्व नुरे आत्मप्रचिती ।
आत्मा असे आदिअंतीं । आपण कैंचा ? ॥

मी तत्वांचा साक्षी आहें, त्यांना पाहणारा व त्यांहून भिन्न आहें हें जाणलें कीं तत्वें खालीं राहतात. अर्थात् मी तत्वें नाहीं हें निश्चित होतें. 'सर्वं खल्विदं ब्रह्म ' ह्म० हें सकळ ब्रह्मरूप आहे, हा आत्मप्रत्यय आल्यावर ' साक्षित्व ' वृत्ति हेंही एक तत्वच आहे हा बोध होऊन ( समर्थांनीं ' त्यांत साक्षत्वाचा दोरा तोही तत्वरूप ' असें अन्यत्र म्हटलें आहे ) साक्षित्वाहूनही आपलें वेगळेंपण प्रतीत होतें, याप्रमाणें आदिमध्यावसानीं एक आत्माच आहे त्याहून दुसरें कांहींच नाहीं. तत्वरूप पिंडब्रह्मांड नाहीं व ' आपण 'ही नाहीं असा अनुभव होतो. हा ' देवासि वाहावें आपण ' याचा अर्थ होय.

आत्मा येक स्वानंदघन । आणि ' अहमात्मा ' हें वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ॥ १५ ॥

' सोहं हंसा ' म्हणजे ' सः अहं अहं सः ' ( द० १७ स० ४ अजपानिरूपण ) याचा विचार केला म्हणजे एक स्वानंदघन आत्माच आहे व तो ' मी-आपण ' आहे. याप्रकारें आत्मनिवेदन आहे. निर्गुण निरंजन आत्म्याशीं अनन्य असल्या ( अनन्य म्हणजे नाहीं अन्य ) वर 'आपण' उरतच नाहीं. आत्मा अद्वैत, त्याला जीवाची वेगळीक नाहीं. आत्मा गुणातीत, परिपूर्ण आहे तेथें दुसरेपणाची वार्ताच नाहीं.

त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ।
वस्तु ठायींची अभेद । आपण कैंचा ? ॥ २० ॥

त्वंपद ( जीव ) व तत्पद ( परमात्मा ) यांचा भेद ' असि ' पदानें काढून टाकल्यावर व दोघांची अभिन्नता झाल्यावर एक परमात्मवस्तुच उरते तेथें ' आपण ' उरतच नाहीं. पिंड व तच्चालक जीव आणि ब्रह्मांड व तच्चालक शिव या अज्ञांच्या समजुतीखातर सांगितलेल्या उपाधि काढून टाकल्यावर दृढबुद्धि होते. ' अहमात्मा ' आत्मा मीच आहें असा बोध झाल्यावर ' मी-आपण ' कोठें उरला ? तात्पर्य ' आपण मिथ्या साच देव । देवभक्त अनन्य भाव ' हें आत्मनिवेदनभक्तीचें वर्म आहे. याप्रमाणें देवासी ज्यानें ' आपण ' वाहिला, जो देवाशीं अनन्य झाला, देवाहून विभक्त-वेगळा राहिला नाहीं तो मुख्य देवाचा भक्त.

मी भक्त ऐसें ह्मणावें । आणि विभक्तपणेंचि भजावें ।
हें अवघेंचि जाणावें । विलक्षण ॥ ४ ॥
भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणि विभक्त ह्मणिजे भक्त नव्हे ।
विचारेंवीण कांहींच नव्हे । समाधान ॥ ६ ॥

देवाहून विभक्त राहून ह्म० अनन्य न होतां, वेगळेपणानें जो देवाला भजेल तो भक्त नव्हे. भक्त तो कीं, जो विभक्त ( वेगळा, भिन्न ) नाहीं व जो विभक्त आहे तो भक्त नाहीं. आत्मनिवेदन भक्तीनें देवाशीं अनन्य झालेला भक्त मुक्तच होय. नवव्या भक्तीचें निरूपण संपलें.

---

प्रती फारच थोड्या शिल्लक आहेत.

## श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र.

**पृष्ठसंख्या ५२८ किंमत रु. ३ ट. ख. सह रु. ३।०७.**

**ग्रंथकार:—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

सतत आठ वर्षे हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या, श्रीक्षेत्र देहू येथील जुनीं दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून आणि गाथ्यांचें व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ कालनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवीत्वस्फूर्ति ८ चित्तशुद्धीचे उपाय ९ सगुणभक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि ( उपदेशसार ) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण. अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत.

ग्रंथांत सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपति पांडुरंग २ तुकोबांचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान. यांत प्रसंगानुसार तुकोबांचे अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व अवश्य तेथें विवरणही दिलें आहे.

पत्ता:—व्यवस्थापक ‘ मुमुक्षु ’ पुणें शहर.

# मोतीबाबा जामदार.

लेखकः—नारायण रघुनाथ कोठेकर, नागपूर.

१ आपण आपल्या लोकमान्य ' मुमुक्षु ' मासिकांत श्रीसद्गुरु मोतीबाबा-साहेब जामदार महाराजांच्या चरित्रास स्थळ द्यावें अशी प्रार्थना करून हा अल्प चरित्रलेख पाठवीत आहें.

२ नागपूर प्रांतांत पूर्वीं भोंसले सरकारचें राज्य होतें, तेव्हां त्यांच्या पदरीं जे थोर थोर मानकरी होते, त्यांत जामदार घराण्याची गणना होत असे. ह्याच घराण्यांत आत्मारामपंत उर्फ तात्यासाहेब जामदार हे भोसल्यांचे कर्तबगार व इमानी नौकर होते. त्यांच्या कुटुंबाचें नांव उमाबाई. ही स्त्री अत्यंत सुशील व पतिसेवापरायण होती. आत्मारामपंत स्वतः कर्मठ असून त्यांची ईश्वरनिष्ठा वाखाणण्यासारखी होती. ह्यांच्या पोटीं मोतीबाबासारखें रत्न जन्माला आलें. साधूंच्या चरित्राकडे पाहिलें तर त्यांचे पूर्वज ईश्वरभक्तच होते असें सर्वत्र आढळून येतें.

३ बाबासाहेबांचा जन्म इ० स० १८४४ च्या नोव्हेंबर महिन्यांत झाला. त्यांचें मौंजीबंधन वयाच्या सातवे वर्षीं झालें. तेव्हांपासून त्यांच्या प्रातः-स्नानाचा नियम आमरण अव्याहत चालू होता. जुन्या वैदिक व शास्त्री पंडितांजवळ त्यांचें संध्यादिक आन्हिक व संस्कृत भाषेचें अध्ययन झालें होतें. इ० स० १८५३ मध्यें नागपूरचे तिसरे रघुजी ह्यांचें देहावसान झालें. त्याच वेळीं बाबांचे वडील कैलासवासी झाले. त्यांच्या पालनपोषणाचा भार त्यांची मातुश्री व त्यांचे चुलते श्री. शंकरराव उर्फ दादासाहेब यांचेवर पडला. त्यानीं तो फार चांगल्या रीतीनें पार पाडला हें सांगणें नलगे. पुढें त्यांनीं कालानुसार संस्कृत अध्ययन कायम ठेवून फारशी, हिंदी व इंग्रजी भाषेच्या अभ्यासास सुरवात केली. इंग्रजी शिकण्याचे वेळीं त्यांचें वय २३—२४ वर्षांचें होतें. ते वयाच्या २८-२९ व्या वर्षीं कलकत्ता विश्वविद्यालयाची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले.

४ प्रवेश परीक्षा पास झाल्यानंतर ते सरकारी नौकरींत शिरले. प्रथम त्यांना नायब तहसिलदारीची जागा मिळाली. पुढें वाढत वाढत ते मुन्सफ व तहसिलदारीपर्यंत वाढले. कांहीं दिवस सरकारनें त्यांना भोंसला इस्टेटीचे म्यानेजर नेमले. त्यांनीं सरकारी नौकरी फारच दक्षतेनें, प्रामाणिकपणें बजा-

वली. कोणाच्या कपर्दिकेला स्पर्श केला नाहीं. त्यांचें आचरण फारच कडक होतें. अव्वल इंग्रजी अमदानींत लहान नौकरापासून तों थेट तहसिलदार, बडेसाहेबापर्यंत अधिकाऱ्यांनीं लाखों रुपये मिळविले, स्थावर इस्टेटी केल्या, पण ह्या गृहस्थानें द्रव्याचा मुळींच लोभ धरिला नाहीं. त्याविषयीं पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत, स्थलाभावास्तव एकच गोष्ट नमूद करितों.

५ सावनेर तहसिलींत पाटण सांवगीजवळ भेंडाळा नांवाचें एक खेडें आहे. तेथील पाटलानें नवस केला कीं मी बरा झालों म्हणजे मोतीबाबास २—३ शेतें देईन. त्याची प्रकृती सुधारली व त्याप्रमाणें त्यानें ३०—४० एकर उत्कृष्ट कापूस पिकणारी जमीन महाराजांस दिली. ती त्यांनीं त्याला परत दिली व सांगितलें कीं तूं ती तेथील विठ्ठलमंदिरास अर्पण कर म्हणजे ती मला मिळाली असें होईल. त्याप्रमाणें त्या पाटलानें केलें. महाराज स्वतः सांगत असत कीं मला नौकरींत असतांना पुष्कळ शेतें व हजारों रुपयांचें वित्त मिळालें असतां तें तसेंच परत केलें. ते फारच निस्पृह होते. दौऱ्यावर फिरतांना त्यांनीं स्वतःचा शिधा न्यावा. आपण, स्वयंपाकी, मोहरीर व चपराशी ह्यांचा स्वयंपाक होई व तेथेंच सर्वांचीं जेवणें होत असत. लोक त्यांना फार आग्रह करीत पण त्यांचें म्हणणें बाबा मिनतवारीनें नाकारीत असत. मोठमोठ्या हुद्यांवर असतांना त्यांनीं प्रातःसंध्या व सायंसंध्यादिक कर्में व्यवस्थित रीतीनें व नियमितपणें करावीं. कालातिक्रम होऊं देऊं नये. ज्या दिवशीं झाला त्या दिवशीं उपोषण करावें. एकदा दौऱ्यावर असतां डेप्युटीकमिशनर काम पाहण्यास आले होते. संध्याकाळपर्यंत साहेबांनीं काम पाहिलें. संध्यांकाळ होतांच बाबांनीं सूर्याकडे पाहिलें तेव्हां साहेब म्हणाले, 'It is your prayer time, you should go now; Work will be inspected tomorrow. महाराज तसेच निघून गेले. साहेबाच्या मनावर काय बरें परिणाम झाला असेल ? मि. फ्रेफेअर नांवाचे युरोपियन अधिकारी होते. त्यांची कारकीर्द दडपशाहीविषयीं प्रसिद्ध होती. साहेब अत्यंत तापट स्वभावाचे होते. परंतु महाराजांच्या सद्वर्तनाचा व निस्पृहतेचा साहेबांच्या मनावर इतका परिणाम झाला कीं ते मी मोतीबाबांचा चेला आहें, असें म्हणत ! येथील बुक्यानन सिव्हिलसर्जनला फ्रेफेअरसाहेबांनीं असें सांगितलें कीं "Motibaba was revered as God by people where-ever he served the Government."

६ त्यांची मातृसेवाही वाखाणण्यालायक होती. ते दररोज मातेला विचारल्याशिवाय कोणतेंच काम करीत नसत. नित्यनियमाप्रमाणें एका रात्रीं आईला 'मी निजावयास जातों' असें विचारण्याकरितां गेले. रात्र झाल्यामुळें आईला

झोप लागली होती. मातेचें पादसंवाहन करीत बाबा रात्रभर जागे राहिले. सकाळीं तीन वाजतां मायबाई उठल्या व म्हणाल्या 'बावा! तूं कां निजला नाहींस?' बावा म्हणाले 'आई! तुला झोप लागल्यामुळें मला तुझी आज्ञा मिळाली नाहीं म्हणून मी तसाच बसलों.' नंतर त्यांनीं शौचमुखमार्जन करून स्नान केलें व आपल्या आन्हिकास सुरुवात केली. नोकरींत असतांना त्यांनीं आपला काळ वेदांतविद्या, संस्कृत वाङ्मय, पुराणें, ज्ञानेश्वरादि सत्पुरुषांचे ग्रंथ, मोरोपंततुकारामादिक साधूंच्या ग्रंथांचें अवलोकन करण्यांत व त्याचप्रमाणें जिज्ञासु लोकांना शिकविण्यांत घालविला. तोच व्यासंग पेन्शन घेतल्यावर आमरण चालू होता. इंग्रजी, हिंदी, उर्दू व इतर वाङ्मयाभिरुची त्यांना होतीच. पाश्चात्य तत्वज्ञान, बायबल व कुराणादि धर्मग्रंथ त्यांनीं चांगले पाहिले होते. मॉरिस कॉलेजचे प्रो. राजु हे महाराजांकडे कधीं कधीं येत असत व आपल्या शंकांचें निवारण करून घेत असत. कांहीं मुसलमान विद्वानांना महाराजांकडे येऊन कुराणावर गोष्टी करितांना मीं पाहिलें आहे. नोकरींत असतांना त्यांना कविता करण्याचा बराच नाद होता. पुढें पुढें तो सुटत गेला आणि अध्यात्म विषयाचा नाद वाढूं लागला. न्यायशास्त्राचा ग्रंथ त्यांनीं येथील एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना उत्तम रीतीनें शिकविला होता. स्वधर्मनिष्ठा व परधर्मसहिष्णुता हे गुण त्यांच्यांत प्रामुख्यानें नांदत असत.

७ त्यांच्या उपाध्यायानें एका सन्मान्य विद्वानाचा त्यांच्या देखत अनादर केला. महाराजांनीं दोघां ब्राह्मणांना साष्टांग नमस्कार किती वेळां तरी घातले व शेवटीं त्या उच्छृंखल ब्राह्मणाची वृत्ति कांहीं दिवस बंद केली. शेवटीं तो ब्राह्मण महाराजांकडे येतांक्षणींच त्याची वृत्ति सुरू केली. महाराजांचे पुष्कळच चमत्कार आहेत, परंतु स्थलसंकोचामुळें त्यांचें वर्णन करितां येत नाहीं. पुण्याहून एक ब्रह्मचारी महाराजांकडे आला होता. त्याच्या पोटांत फारच मोठा गोळा होता. त्यानें पुष्कळ उपाय केले, डॉक्टरास दाखविलें, पण 'हें दुखणें असाध्य आहे, ऑपरेशन केलें तरी वांचणार नाहीं,' असें त्यांचें मत पडलें. पण महाराजांनीं त्यांस दत्तसेवा सांगितली व त्यांच्या कृपेनें तो गोळा अवघ्या आठ दिवसांत बसला व ब्रह्मचारी बरा झाला.

१९१८ सालीं बोरीगांवाहून महाराज गाणगापूरच्या यात्रेस जाण्यास निघाले. कुणवी व इतर बरोबरीचे शूद्र लोक 'चला जाऊं दत्ताच्या गांवाला। गाणगापूर पाहयाला' असें मोठ्यानें ह्मणत ह्मणत व भजन करीत स्टेशनपर्यंत आले. महाराजांच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला, सद्गदित कंठ झाला, व आबालवृद्धांना महाराजांनीं आलिंगन दिलें. आमच्या पाहण्यांत महामहोपाध्याय भट्टजी शास्त्री घाटे, केशवराव ताम्हन व ह. भ. प. गुलाबराव

महाराज व बाबा गर्दे वगैरे सत्पुरुष त्यांच्या आचरणानें थक्क होत असत व त्यांच्याविषयीं अत्यंत प्रेम बाळगीत असत. ह भ.प.गुलाबराव म्हणतातः—

इच्छिसी अखंड चित्ता परम शांतींत रमावें ।
तरि गुरु मोतीबाबाचरणसलिलरुहयुगुल प्रणमावें ॥ १ ॥

म. म. केशवराव ताम्हन म्हणतातः—

मोहव्याधिरसायनं श्रुतिवचो येनानिशं सेव्यते ।
तीव्रपासनयाच संततमपाकीर्णं समस्तं रजः ।
बालार्कः कमलाकरानि वसतां वृंदान् समुल्लासयन्
वाढं शिष्टशिखामणिर्विजयते श्रीमान् मयूरेश्वरः ॥

९ त्यांनीं वयाच्या ५५ वर्षी पेनशन घेतलें तेव्हांपासून अखेरपर्यंत वर सांगितल्याप्रमाणें आयुष्य अध्यात्मचिंतनांत व हरिभक्तींत घालविलें. त्यांच्या कुटुंबांतील माणसें लहान मोठीं मिळून सरासरीं २५।३० जण आहेत. लहान मुलांची शाळेंत जाण्यापासून तों रात्रीं निजेपर्यंत महाराज काळजी वाहत असत. येणाऱ्या जाणाऱ्या मंडळींचा समाचार महाराज प्रेमानें घेत असत. त्यांचे घरीं दररोज रुद्राभिषेक व पंक्तीला एकदोन ब्राह्मण राहत असत. महाराज ब्राह्मणाशिवाय कधींच भोजन करीत नसत. महाराजांचें उपास्य दैवत श्रीदत्त असे. गाणगापुरला ते तीन चार वर्षांतून एकदां जात असत व शास्त्रीय पद्धतीनें तेथील यात्रा करीत. भगवान् नृसिंहसरस्वती, गाणगापूरचे महाराज, ह्यांनीं महाराजांना खुद्द उपदेश केला असें महाराज स्वतः सांगत असत.

१० त्यांच्या दर्शनास हजारों लोक येत असत. महाराज सर्वांशीं प्रेमानें बोलत. लहानथोर हा भाव त्यांच्या मनाला शिवलाच नाहीं. त्यांचेपुढें जी प्रतिष्ठा दादासाहेब उर्फ गंगाधरराव चिटणवीस किंवा श्रीमंत रामकृष्णपुरी यांची तीच अडाणी मनुष्याची. माझ्या हाताला कुष्ठ आहे, मी पामर आहे, माझ्या अधमाच्या दर्शनास येऊं नका असें ते नेहमीं म्हणत, परंतु ते अस्सल बावनकशी सोनें असल्यामुळें मंडळी नेहमीं दर्शनास येतच असत. निस्पृहता, सदाचार, परोपकार व ईश्वराचे ठिकाणीं निस्पृह प्रेम इत्यादि गुणांमुळें लोक त्यांना यशवंतराव देवमामलेदारांप्रमाणें देवतहसिलदार असें ह्मणत असत.

११. महाराजांचा शिष्यसमुदाय मोठा नसला तरी या प्रांताची जनता त्यांना सद्गुरु मानीत असे. त्यांच्या शिष्यवर्गांत ह. भ. परायण विनायकबोवा देव, नरहरपंत वाडेकर, नारायणराव कोठेकर, बाबाजी परमार्थ, नानाजी व तात्याजी येरकुंठवार वगैरे मंडळींची गणना प्रामुख्येंकरून करण्यांत येते. त्यांचे चिरंजीव श्री. बळवंतराव उर्फ भाऊसाहेब हे देखील महाराजांचे सत्पुत्र असून सच्छिष्य आहेत. रामदासांचा कल्याण, जनार्दनाचा एकनाथ, शंकरा-

चार्यांचा पद्मनाथ त्याचप्रमाणें मोतीबाबामहाराजांचे सर्वांत श्रेष्ठ शिष्य विनायकबोवा देव हे होत. महाराजांच्या आज्ञेनें ते हल्लीं काशीवास करीत आहेत.

१२. १९२२ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ३० वे तारखेस मोतीबाबा समाधिस्थ होणार अशी वदंता नागपुरशहरांतच नव्हे तर बरीच दूरपर्यंत पसरली. हां हां म्हणतां हजारों लोक दर्शनास आले. त्या दिवशीं त्यांच्या घराजवळ प्रचंड लोकसमूह लोटला होता. दर्शन होणें दुर्लभ होऊं लागलें. महाराज समोरच्या गच्चीवर बसले, सर्वांना दर्शन झालें तरी लोक जाईनात. महाराजांनीं दुसरें स्नान ९॥ वाजतां केलें. तो दिवस मार्गशीर्ष शु॥ एकादशी ( मोक्षदा एकादशी ) चा होता. स्नान करून औदुंबर वृक्षाखालीं देवासमोर ते बसले. हजारों लोकांची गर्दी होतीच. पण महाराजांजवळही २०० लोक बसले होते. दुपारीं १२, १२॥ वाजतां जीभ ओढूं लागली, डोळे खोल गेले, घरघरा लागला. तरी पण महाराजांचें ध्यान चाललें होतें. प्रस्तुत लेखक तेथेंच होता. ती वेळ जातांच सर्व कारभार व्यवस्थितपणें चालूं लागला. तेव्हां महाराज म्हणाले ' ह्या देहाला दोन वर्षें कांहींच हरकत नाहीं.' १९२४ नोव्हेंबर महिन्यांत ह्या गोष्टीस २ वर्षें पूर्ण झालीं. मागील वैशाख महिन्यापासून ते ' माघमास ह्या देहाकरितां आहे' असें नेहमीं म्हणत असत.

१३. डिसेंबरचे २४ तारखेस व्यावहारिकरीत्या महाराजांची प्रकृती बिघडली. त्या दिवशीं दुपारीं बारावाजतां ते आंगणांत उभे राहिले, त्यावेळीं त्यांची नासाग्र दृष्टी होती. हातपाय लटलट कांपूं लागले. दोघांनीं त्यांना घरांत आणलें तरी ते देवाकडे तोंड करून उभे होतेच. त्यांना जबरदस्तीनें बिछान्यावर निजविलें,तरी ते पुन्हां बिच्छान्यावर उठून उभे रहात.सरासरीं दोन अडीच तासांनीं त्यांनीं आपले डोळे उघडिले. त्यावेळीं ते म्हणाले " मी आपल्या आनंदांत आहें. ' दुसऱ्या दिवशीं ते नेहमीं ' चोंहोकडे महाराज आहेत, ही श्रीकृष्णाची रासक्रीडा आहे, हा कैलास आहे, शंकरपार्वती मला बोलावीत आहेत ' इत्यादि गोष्टी बोलत असत. मुखांतून मानसपूजेचे मंत्र अव्याहत चालू असत शेवटीं शेवटीं ' ब्रह्माहमस्मि, सर्वं खल्विदं ब्रह्म ' इत्यादि महावाक्यें मोठमोठ्यांनीं उच्चारीत असत. त्यांचें संसारांतून पूर्ण लक्ष निघालें, देहाची आसक्ति गेली, खाणेंपिणें वगैरे सर्वस्वी जाऊं लागलें, स्नानसंध्येचा त्याग झाला. महाराज संध्या करा असें त्यांना म्हटलें तर ' मीं ज्ञानगंगेंत स्नान केलें, माझा संदेह गेला ' असें ते ह्मणत. 'मी गाणगापूरला जाईन व नंतर देहत्याग करीन.' त्याप्रमाणें ते गाणगापुरास गेले. २१ दिवसपर्यंत तेथें त्यांचा मुक्काम होता. गाणगापुरास एक तपस्वी नृसिंहसरस्वती नांवाचे संन्यासी आहेत. ते फार विरक्त व दत्तसेवातत्पर आहेत. " मी येथें नाहीं,

बाबा येथें येत आहेत तर त्यांच्या समाचारास जातों" असा दृष्टांत त्या स्वामींस झाला. माघवद्य चतुर्थीस त्यांनीं विनायकराव देव यांस व आपल्या इतर चिरंजीवांस बोलाविले. महाराज ह्मणाले, "मी येथें देहत्याग करणार तुमचें ह्मणणें काय आहे?" शिष्य वगैरे मंडळी ह्मणाली 'महाराज, सर्वजण नागपुरास आहेत तेथें देहत्याग करावा' 'बेटेहो! तुमची माझ्या पाठीमागें एकसारखी कटकट चालू आहे' असें महाराज ह्मणाले. नागपुरासच चला अशी त्यांनीं सर्वांना आज्ञा दिली. फेब्रुवारी १५ तारखेस आदितवार होता. त्या दिवशीं रात्रीं ८॥ वाजतां ते सर्व मंडळीसुद्धा घरीं आले. चारपांच दिवसांपासून त्यांनीं अन्नत्याग केला होता. मंगळवारीं संध्याकाळीं ५॥, ५॥। वाजतां माझा काळ आला, देवघराजवळ मला न्या असें महाराजांनीं सांगितलें. त्यांच्या आज्ञेप्रमाणें विनायकरावादि शिष्यमंडळींनीं त्यांना खालीं आणिलें. त्या रात्रीं त्यांनीं स्वतः देवाची आरती ऐकिली व ब्राह्मणांना ५।५ रुपयांचीं गोप्रदानें दिलीं. सरासरी १२।१३ ब्राह्मण होते. रात्रीं त्यांना घरघरा लागला. रात्रीं २॥ वाजतां उठून त्यांनीं देवाला नमस्कार केला. त्यांच्या आज्ञेप्रमाणें त्यांचे घरची मंडळी व शिष्यसमुदाय जवळच होता. दत्तनामाचा गजर सुरू झाला. 'माझ्या गळ्यांत रुद्राक्ष घाला' असें महाराज म्हणाले. रुद्राक्षांच्या माळा गळ्यांत घालण्यांत आल्या. घरघरा लागल्यामुळें त्यांना स्पष्ट बोलतां येईना तरी ते दत्त दत्त ह्मणत. अशा प्रकारें दत्तनामाचा गजर चालला असतां महाराज सकाळीं ५॥ वाजतां दत्तस्वरूपीं लीन झाले! मृत्यु दिवस माघ वद्य दशमी.

१३. त्यांच्या मृत्यूनें ह्या प्रांतांतील अत्यंत तेजस्वी, स्वधर्मनिष्ट, विद्वान् व सदाचरणी सत्पुरुष गमावला ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. अशा थोर महात्म्याची जागा भरून येणें शक्य दिसत नाहीं. त्यांच्या दर्शनास पुष्कळ मंडळी आली होती, त्यांत सर गंगाधरराव चिटणवीस, राजे रघुजीराव व बुटी इत्यादि ठळक मंडळी होती. अंत्यसंस्कार फारच उत्तम तऱ्हेनें झाला. चंदन, कापूर, तूप व राळ वगैरे सुगंधित परिमळद्रव्यांनीं त्यांच्या चितेचें दहन करण्यांत आलें. त्यांच्या मृत्यूची बातमी लोकांस माहीत नसल्यामुळें आम्ही अंत्यदर्शनास आंचवलों असे लोकांच्या तोंडांतून उद्गार बाहेर पडतात.

१४. त्यांनीं दामाजी चरित्र, सद्गुरुप्रार्थना, तुकारामादि संतांचीं स्तवनें वगैरे काव्यग्रंथ व पुष्कळशीं पदें केलीं आहेत. त्यांनीं वेदांतावर ८।१० पत्रें लिहिलीं आहेत. तीं सर्व अप्रकाशित आहेत.

नमन माझें मोरेश्वरा। ब्रह्मविद्येच्या सागरा ॥ १ ॥
सदा दत्तपदीं भाव। भेटे तया दत्तदेव ॥

वृत्ति 'ब्रह्मास्मि' ची झाली । अहंता देहाची हरपली ॥
ध्यानीं मनीं स्वप्नीं दत्त । झाला मोतीबाबा दत्त ।
शरण आलों तव पायीं । दास्य चरणांचें देईं ॥-

अशा प्रकारें गुरुमहाराजांच्या पायीं मस्तक ठेवून हा लेख मी संपवितों:

# त्रिगुणविभाग.

जग हें त्रिगुणात्मक आहे. सत्व, रज व तम या तीन गुणांनीं प्राणिमात्र बद्ध आहे. सागरावर अनंत लाटा एकसारख्या उठतात त्याप्रमाणें जीवांच्या चित्तावर जे असंख्य बरेवाईट तरंग उठतात त्यांचें शास्त्रीयदृष्ट्या वर्गीकरण करून सात्विक, राजस व तामस या तीन वर्गांत त्यांचा अंतर्भाव केला आहे. या त्रिगुणांचा उद्भव व वाढ कशी होते, आणि त्यांचा निरोध कसा करावयाचा यासंबंधानें गीतेंत ( अ. १४ ) व भागवतांत ( स्कं. ११ अ. १३ ) विवेचन झालें आहे. तमोगुण व रजोगुण हें अविद्येचें कार्य आहे. व सत्वगुणाचा वरील दोन गुण नष्ट करण्याचे कामीं उपयोग करून घेऊन तीनही गुणांच्या अतीत व्हावें म्ह० निस्त्रैगुण्य व्हावें हा शास्त्रांचा उपदेश आहे. वस्तुतः तीनही गुण बंधकारक आहेत, पण लौकिकांत एकादा माफीचा साक्षीदार वश करून फोडतात व त्याच्या साह्यानें इतर गुन्हेगारांवर खटला भरतात त्याप्रमाणें तीन गुणांपैकीं सत्वगुणाला त्यांतून फोडून आपलासा करावा व त्याच्या मदतीनें बाकीचे दोन गुण जिंकावेत म्ह० अविद्येचा नाश होतो असें शास्त्राचें व संतांचें सांगणें आहे. त्याला अनुसरूनच समर्थांनीं येथें ( द० २ समास ५।६।७ ) त्रिगुणांचें स्वरूप वर्णिलें आहे.

सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती ।
तमोगुणें अधोगती । पावती प्राणी ॥ २–५–२ ॥

गुणांत शुद्ध व सबळ असे भेद असतात. शुद्ध म्ह० निर्मल, परमार्थी व सबळ म्ह० बाधक, सांसारिक.

**रजोगुण**

आधीं रजोगुणाचें कर्तृत्व पाहूं. माझें घर, माझा संसार, माझे आईबाप, माझी बायकापोरें, माझा देह व त्याप्रमाणें मी आणि माझें याविषयीं चित्तांत ममत्व वाटणें, त्यांच्या सुखदुःखांचा व चरितार्थाची चिंता वाहणें, गृहधनाची आसक्ति असणें, शरीराच्या सुखभोगोपायांच्या साधनसंपादनांत निमग्न असणें, विषयविलास आवडणें, हें रजोगुणाचें लक्षण आहे. रजोगुणाला देवधर्माची भीति नसते. ' देवकारणीं लाजाळु, उदरालागीं कष्टाळु,

प्रपंचीं जो स्नेहाळु, तो रजोगुण ' ( ३० ) गोडग्रासी आळकेपण ( लोभ ) व उपवास तीर्थव्रतादिकीं कंटाळा हा रजोगुण. 'नेणोनियां परमात्मा। सकळ पदार्थीं प्रेमा। बळात्कारें घाली जन्मा। तो रजोगुण.' ( ३२ ). देवधर्मावांचून बाकी सारा प्रपंच व प्रपंचसंबंधीं विषय आवडणें तो रजोगुण. हा अर्थात् दारुण दुःख भोगायला लावतो व जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत पाडतो. या गुणापासून सुटलें पाहिजे. सुटायचा उपाय काय? 'उपाय एक भगवद्भक्ती.' पुरसें वैराग्य अंतरीं नसलें तरी यथानुशक्ती भजन करावें.

**तमोगुण**

आतां तमोगुण ऐका. अत्यंत अनावर क्रोध, क्षुधातृषा प्रबळ, जीव घाताविषयीं तत्परता इ० क्रूरपणा, कलहप्रीति. पापबुद्धि' प्रमाद द्वेष, इ० काळेकुट्ट अंतराचे दोष तो तमोगुण. तमोगुणाला दया—कळवळा नाहीं.

अखंड भ्रांती पडे। केला निश्चय विघडे।
अत्यंत निद्रा आवडे। तो तमोगुण ॥ ८ ॥
युद्ध देखावें ऐकावें। स्वयें युद्धचि करावें।
मारावें कीं मरावें। तो तमोगुण ॥ १६ ॥
ब्रह्मवृत्तीचा उच्छेद। जीवमात्रांस देणें खेद।
करूं आवडे अप्रमाद ( प्रमाद )। तो तमोगुण ॥ १९ ॥

चेटकविद्या, मल्लविद्या, उन्मत्तपणा, यांची आसक्ति तो तमोगुण. अघोर मंत्रतंत्रपूजा हा तमोगुण. 'देवास शिर वाहावें, कां आंग समर्पावें' हा तमोगुण व 'क्रोधें देवासि फोडावें' हाही तमोगुण. हा तमोगुण 'पतनासी कारण' आहे. जन्माचें खंडण व्हावें यासाठीं या दोन्ही गुणांस मोडून सत्वगुणाचा आश्रय करावा.

**सत्वगुण**

जेणें भगवंतीं मार्ग फुटे, जेणें दुःखमूळ संसार आटे असा एक सत्वगुण आहे मोक्षलक्ष्मीचें हें चिन्ह आहे. सत्वगुण हा परमार्थाचें मंडण व महंतांचें भूषण आहे. हा देहीं उमटतां कशीं चिन्हें होतात तें पहा:—

ईश्वरीं प्रेमा अधिक। प्रपंच संपादणें लौकिक।
सदा सन्निध विवेक। तो सत्वगुण ॥ ९ ॥
संसारदुःख विसरवी। भक्तिमार्ग विमळ दावी।
भजनक्रिया उपजवी। तो सत्वगुण ॥ १० ॥

दयाक्षमाशीलता, परोपकाराची आवड व तांतडी, दानपुण्याचरण, देवाचे महोत्सव व ऐश्वर्य वाढविण्याविषयीं प्रीति, सदाचार, सात्विक धैर्य, बुद्धीची निश्चयात्मकता, व संतसाधुसज्जनांविषयीं प्रेम इ० गुण सत्वगुणामुळें उत्पन्न होणारे व वाढणारे आहेत. भक्तिज्ञानवैराग्याचा लाभ सत्वगुणानेंच होतो. दानपुण्यादि सत्कर्मे कामनेनें होत असलीं तर तो रजोगुण व निष्काम होत असतील तर तो सत्वगुण. भक्तिज्ञानवैराग्य दिखाऊ हा. दंभार्थ असतील तर तीं तारक नाहींत, पण 'निकट अंतरंग भक्तीचीं' असतील तर तीं तारक आहेत.

अंतरीं स्फूर्ती स्फुरे । सस्वरूपीं तर्क भरे ।
नष्ट संदेह निवारे । तो सत्वगुण ॥ ५० ॥
होणार तैसे होत जात । प्रपंचीं जाला आघात ।
डळमळिना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ ५७ ॥
आपकार्याहून जीवीं । परकार्यसिद्धी करावी ।
मरोनि कीर्ती उरवावी । तो सत्वगुण ॥ ६५ ॥
पराव्याचे दोषगुण । दृष्टीस देखे आपण ।
समुद्राऐसी सांठवण । तो सत्वगुण ॥ ६६ ॥
नीच उत्तर साहणें । प्रत्योत्तर न देणें ।
आला क्रोध सांवरणें । तो सत्वगुण ॥ ६७ ॥
अन्यायेवीण गांजिती । नानापरी पीडा करिती ।
तितुकेंही सांठवी चित्तीं । तो सत्वगुण ॥ ६८ ॥
मन भलतीकडे धांवे । तें विवेकें आंवरावें ।
इंद्रियें दमन करावें । तो सत्वगुण ॥ ७० ॥
कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी ।
जीव बंधमुक्त करी । तो सत्वगुण ॥ ७५ ॥

भक्तीचा हव्यास भारी । ग्रंथसामुग्री करी । तो सत्वगुण. तात्पर्य 'देवीधर्मी ज्याचें चित्त' आहे, जो जितेंद्रिय असून परोपकाररत आहे तो सत्वगुणी होय. सत्वगुणीं संतजनाविषयीं प्रेम असणे हाही सत्वगुणच होय. सत्वगुण हा संसारीं तारक असून ज्ञानभक्तिदायक आहे म्हणून त्याचा आश्रय केल्यानें सद्विद्या प्राप्त होते.

---

# स्फुट विचार

## १ राष्ट्रीय शिक्षण व जाणिवेचें कार्य.

गेल्या श्रावण शुद्ध ६ स नाशीक येथील संस्कृत विद्यापीठ या संस्थेचा वार्षिक समारंभ नाशिक येथें रा.रा.पांगारकर यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें झाला. अध्यक्ष या नात्यानें भाषण करितांना रा. पांगारकर ह्मणाले, " श्रीशंकराचार्य डॉ.कुर्तकोटी यांच्या खटपटीनें सदर विद्यापीठ अस्तित्वांत आलें आहे. किंबहुना अद्याप तें गर्भावस्थेंत आहे असेंच म्हटलें तरी चालेल. संस्थेस स्थापना होऊन आज वर्ष झालें. एक दोन शास्त्री व प्रिन्सिपाल काळे, एम्. ए. यांसारखे विद्वान् आस्थेनें काम करणारे मिळाले आहेत. १५।३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्कृत विद्या उर्जितावस्थेस आणण्याचा हेतु आहे तो फार स्तुत्य आहे. यांत तयार झालेले विद्यार्थी श्रीधरशास्त्री पाठक किंवा अभ्यंकरशास्त्री यांसारखे नामांकित होऊन लोकांच्या पुढें आले ह्मणजेच संस्था खरी अस्तित्वांत आली असें ह्मणतां येईल. प्रि. काळे यांनीं म्हटल्याप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींतूनच सदर संस्था निघाली आहे हें खरें, तथापि राष्ट्रीय शाळाही अद्याप राष्ट्रीयत्वाच्या कसोटीस लागावयाच्या आहेत. राष्ट्रीय शाळांतून तयार झालेले विद्यार्थी राष्ट्रकार्य करून दाखवीपर्यंत त्यांना चिरस्थायित्व आलें आहे असा लोकांचा विश्वास बसणार नाहीं. उद्योग चांगला चालला आहे याविषयीं वाद नाहीं. सरकारी शाळा व कॉलेजें यांतून बाहेर पडलेले लोकच आज ५०।७५ वर्षे लोककार्य करून दाखवीत आहेत. तेंच कार्य अधिक चिकाटीनें, धिम्मेपणानें, निःस्वार्थ बुद्धीनें व राष्ट्राची परंपरा शुद्ध व कायम राखण्याच्या धोरणानें चालविणारे पुरुष राष्ट्रीय विद्यापीठांतून निघाले व त्यांची कामगिरी जनमान्यतेस पावली ह्मणजे या संस्था निघाल्याचें सार्थक झालें असें लोक मानतील, तोंपर्यंत हे प्रयत्न स्तुत्य आहेत इतकेंच ह्मणतील. शाळाकॉलेजांत मिळणारें शिक्षण अपुरें, दूषित व बरेंचसें निरर्थक आहे हें सकलसंमत आहे. विष्णुशास्त्रीबोवांनीं यावर तोडगा म्हणूनच न्यू स्कूल काढलें. अण्णा विजापूरकर यांचें समर्थ विद्यालय, वाईची प्राज्ञपाठशाळा, महात्माजींचा सत्याग्रहाश्रम, टागोर यांचें शांतिनिकेतन, व गेल्या पांच चार वर्षांत निघालेल्या राष्ट्रीय शाळा व अमदाबाद व पुणें येथील विद्यापीठें हीं सर्व सरकारी संस्थांतील दोष काढून टाकून आपला देश, आपला धर्म, आपला समाज, आपलें

राजकारण, आपलीं शास्त्रें व कलाकौशल्य यांचा आपलेपणाच्या बुद्धीनें विकास व प्रसार करणारे तरुण तयार करण्याच्या हेतूनें अस्तित्वांत आलीं आहेत. हेतु उदात्त आहे, कार्य थोर आहे, थोरांनींच हें करायचें आहे, व करीत आहेत. " इतकें सांगितल्यावर विद्येचें स्वरूप काय यावर रा. पांगारकर यांनीं समर्थांच्या वचनाधारें विवरण केलें.

ते म्हणाले, " विद्यापीठ, शारदामंदिर, सरस्वतीनिकेतन काय वाटेल तें नांव दिलें तरी विद्या, शारदा, सरस्वती या नांवानीं प्रसिद्ध असलेल्या ज्ञानकलेचें स्वरूप एकच आहे. समर्थ म्हणतातः—

जिवामधील जाणती कळाचि ते सरस्वती ।
मनांतरीं वसे सदा प्रसन्नरूप शारदा ॥ १ ॥

जीवांतील जाणती कळा हेंच शारदेचें रूप सर्व जीव जाणिवेनें वर्ततात, म्हणून तिचें अधिष्ठान सर्वत्र आहे. जाणीव, ज्ञानकला, चैतन्य, जेथें वास करितें तेथें ' मनांतरीं प्रसन्नता ' च असते. ज्ञानाबरोबर आनंद, सुखसमाधान शांति नांदत असते. बाह्य प्रसन्नता हें आंतरज्ञानाचें चिन्ह आहे. रडकेपणा दिसतो तेथें ज्ञान नाहीं, असेंच समजावें. येथें ज्ञान ह्म० लौकिक ज्ञान हें समजायचें नाहीं, तथापि ज्या मानानें ज्ञान सूक्ष्म व शुद्ध, त्यामानानें समाधान असतें.

कळा कळाचि वीकळा । समर्थ जाणतीकळा ।

इतर विद्या व कळा ह्या कळा कसच्या, विकळाच त्या. एक जाणती कळा मात्र समर्थ आहे. सर्व शक्ति जाणिवेंत आहे. तेथें दुर्बलता नाहीं, दुःखदारिद्र्य-उद्वेग नाहीं.

अनेक सौख्यदायका अनेक लोकनायका ।
अनेक धारणा धरी अनेक चाळणा करी ॥
अनेक पंथ चालवी अनेक मत्त हालवी ।
निशब्द खूण पालवी मनें मनास मालवी ॥

जाणीवेच्या बळावर अनेक प्रकारचीं सुखें प्राप्त करून घेतां येतात, तिच्या सत्तेनें लोकांचीं मनें हातीं घेतां येऊन लोकनायकत्व मिरवितां येतें, धारणा-धृतिमति सर्व जाणीवेच्या योगानें विकास पावतात, अनेक चाळणा व चळवळी करितां येतात, अनेक धर्मपंथ व संप्रदाय उच्च जाणीवेचे पुरुषच उभे करितात, जाणीवेच्या सामर्थ्यावरच अनेक उन्मत्त पुरुषांना उलथून पाडतां येतें, जाणीवेच्या योगानेंच मनावर दाब ठेवतां येतो व निःशब्द परमात्मस्वरू-

घाप्रत पोंचतां येतें ! जाणीवेचें किंवा शारदेचें इतकें उत्कृष्ट वर्णन इतक्या थोडया शब्दांत कोठेंही केलेलें आपणास आढळणार नाहीं. ह्यांत समर्थांचें सर्व चरित्रच सांठवलेलें दिसतें किंबहुना समर्थांसारख्या कार्यकर्त्या थोर विभूतींचा व राष्ट्रांचा इतिहास यांत संकलित केलेला आढळतो ! जगाचा इतिहास ह्मणजे अधिक जाणीव असलेल्या पुरुषांचीं चरित्रेंच होत. जेथें उदंड जाणीव तेथें उदंड भाग्य. जाणीव अल्प तर भाग्यही अल्प. अंतःकरण ह्मणजे जाणीव ह्मणजे विष्णूचा अंश. जाणीवेनें आत्मप्रत्यय येतो, विघ्नें दूर करितां येतात. तात्पर्यः—

चतुर जाणते जनीं । करा विचारणा मनीं ।
सरस्वतीस वोळखा । उगे भरीं भरूं नका ॥

---

## २ गोकुळाष्टमीचा आनंद.

भगवान् श्रीकृष्णाचा अवतार होऊन गेल्या गोकुळाष्टमीस बरोबर ५११० वर्षें झालीं. शकपूर्व ३२६३ श्रावण वद्य ८ बुधवारीं रोहिणी नक्षत्रावर अजन्म्याचा जन्म झाला. घरोघरीं व मंदिरांतून सालाबादप्रमाणें लोकांनीं आपापल्या भक्त्यनुसार हा आनंद भोगला. यंदा नाशीक क्षेत्रीं अष्टमीचे दिवशीं सायंकाळीं न्यू इंग्लिश स्कूलाच्या थोरल्या चौकांत विद्यार्थ्यांस रा. पांगारकर यांनीं श्रीकृष्णावताराची कथा समजावून सांगितली. कथाभाग सर्वश्रुतच आहे. विद्यार्थ्यांस बालकृष्णाचें चरित्र सांगून त्यांनीं उपदेश केला तो असाः " शुद्ध व सात्विक आहार, शक्तिवर्धनाचें महत्त्व, सर्वांशीं प्रेमाची वागणूक, सर्वांचें अतरंग होऊन जाणें इ० गोष्टी कृष्णभक्तीबरोबर तरुणांनीं शिकल्या पाहिजेत. दूध तूप दहीं लोणीं हें असलें सात्विक व श्रेष्ठ अन्न खाऊन, विटी दांडू, चेंडू, हुतुतू, हमामा इ० खेळ खेळगडयांशीं खेळन, लहान थोरांशीं अत्यंत प्रेमानें वागून श्रीकृष्णानें दुष्ट दमनाची शक्ति कमावली हें लक्ष्यांत ठेवा. चहा, कॉफी चिवडा असले पदार्थ आणि तेही बाजारी, बिलकूल खाऊं नका. त्यांचा सर्वथा त्याग करायचा निश्चय करा. निर्मळ आहार हा उत्तम शरीर बळाचा पाया आहे. निर्व्यसनितां हें महत्वास चढण्याचें मुख्य साधन आहे. आधी आचारशुद्धि मग विचारशुद्धि हवी. ' आचारविचारें पैलपार । पाविजेतो अस समर्थ ह्मणतात. आचरण पायाशुद्ध शास्त्रशुद्ध असेल तरच प्रपंच काय किंवा परमार्थ काय साध्य होईल. गाईचें दूध तूप ताकदही यासारखें निर्मळ, पौष्टिकारक दुसरें अन्नच नाहीं हें मी अनुभवानें सांगतो.

मोकळ्या हवेंत प्रेमळ, सवंगड्याच्या संगतींत व्यायाम कसा घ्यावा, हें श्रीकृष्णाच्या बालचरित्रापासून शिका. उत्तम अन्न व उत्तम व्यायाम यांच्यां योगानें शक्तिबळ कमवून त्याचा धर्मरक्षणार्थ व्यय करावा हें आयुष्याचें ध्येय ठेवा. इंग्रजी विद्येनें एक प्रकारचा उन्माद चढून धर्मशून्यतेकडे कल झुकतो हें इतिहासच सांगतो, म्हणून स्वधर्मनिष्ठा सतत जागरूक राहील तें करा. श्रद्धाविश्वासाची शक्ति पुढें उपयोगी पडेल म्हणून धर्मप्रीति निरंतर जागृत ठेवा. चार बुकें कमी वाचलींत किंवा दोन परीक्षा कमी पास झाल्या तरी चालेल–पुढें येणाऱ्या काळावरून विद्या पोट भरण्याच्या कामीं अपुरी ठरत आहे–पण शक्तिबळ कमावून धर्मवंत व्हा " इ० इ० दुसरे दिवशीं लासलगांव येथील मारवाडी व्यापारीमंडळीच्या आग्रहावरून रा. पांगारकर हे लासलगांवास गेले. तेथें लक्ष्मीनारायणाच्या नूतन मंदिरांत जन्मोत्सवाचें प्रवचन झालें. मूर्ति फार सुंदर असून मंडळी भाविक आहेत. विंचूर येथून कांहीं मंडळी मुद्दाम नेण्यास आली होती म्हणून रा. पांगारकर विंचूर येथें गेले. स्वराज्याच्या काळांत विठ्ठल शिवदेव विंचुरकर (दाणी) हे पहिल्या प्रतीच्या वीरपुरुषांत गणले जात असत. विंचुरकरांचे वाडे वगैरे माजी ऐश्वर्य पाहून ' कालाय तस्मै नमः ' ह्मणून स्वस्थ बसावें लागलें. तथापि विंचुरकरांच्या वाड्यांत एक अपूर्व चीज पाहण्यांत आली तिचा उल्लेख केलाच पाहिजे. तेथें पूजेंत ' चंद्रशेखर ' आहे. त्याच्या अंगभूत नागाकृति असून वर चंद्र आहे. अद्याप एक मौज पाहण्यासारखी आहे. चंद्राच्या कलांत जसजशी वृद्धि किंवा क्षय होत जातो त्यात्याप्रमाणें या चंद्राच्या कला कमीजास्त होत असतात ! स्वराज्यांतली निष्ठावंतांची ही पूजेंतली शिवमूर्ति आहे. सिंहगडावर राजाराममहाराजांच्या समाधिस्थळीं तळहातावर ठेवतांच पाझरणारें शिवलिंग पुष्कळांनीं पाहिलेंच असेल.

---

## २ निलगिरीकडील वार्ता.

आमचे मित्र रा. रामचंद्र कृष्ण कामत हे कुंजूर ( निलगिरी ) हून लिहितात, " आकस्मिक कारणानें माझें इकडे येणें घडलें. युरोपियन लोकांस निलगिरी उर्फ उटकमंड हें हिंदुस्तानांतलें इंग्लंड वाटतें. समुद्रसपाटीपासून कुंजूरगांव ५६०० फूट उंच आहे व निलगिरि ७५०० फुटांवर आहे ! महाबळेश्वर सारा ४४०० फूट उंच आहे. इकडील मुख्य उत्पन्नाचे जिन्नस ह्मणजे निलगिरि तेल, बटाटे व चहा. निलगिरि तेलाचीं झाडें इकडे लाखांनीं मोजण्यासारखीं आहेत. अश्वत्थ, औदुंबर, वट यांचें नांवही नाहीं. तुळस तर तेथें तगतच नाहीं ! वैश्यवृत्तीचा प्रांत दिसतो. येथें खोबऱ्याचें तेल

बर्फाप्रमाणें कापून तुकडे करून विकायला ठेवतात व तराजूंत घालून रत्तलानें तोलून कागदांत घालून देतात ! असें हें बाराही महिने चालतें ! हिंदुस्तानचें निरनिराळें हवामान, चालीरीति, वेष भाषादिभेद वगैरे पाहिले कीं मोठें आश्चर्य वाटतें. पण या सर्व भेदांतही अभेदत्वानें नांदणारें हिंदुत्व एकरूप आहे हेंही नजरेस येतेंच ! ”

---

## ४ दोन मृत्यु.

दोन सज्जनांच्या मृत्यूच्या वार्ता दोघांकडून प्रसिद्धीसाठीं आह्मांकडे आल्या आहेत. ( १ ) “ओरगांवपेठ, जिल्हा उमरावती, येथें श्रीयुत हरिबावा नांवाचे विदेही पुरुष आषाढ वद्य ९ रोजीं समाधिस्थ झाले. दोन हजारांवर समाज होता. ” ( २ ) “ मडगांव, गोवा येथें गुरुपुत्र व सज्जनस्नेही श्री. वैकुंठ रामचंद्र पै आंगले यांचा अंत रामनामस्मरणपूर्वक आनंदांत झाला. हे कृष्णंभट बांदकर यांचे पट्टशिष्य होते. आपलें स्मरण सानंद करून आपले ग्रंथ वाचण्याची मुलांस अखेर आज्ञा केली.”

---

## ५ सुरेंद्रनाथ बानर्जी.

मागील महिन्यांत चित्तरंजन दास हे बंगालचे पुढारी मृत्युवश झाल्याबद्दल आम्हीं एक स्फुटलेख लिहिला होता. ह्या महिन्यांत बंगालचा तसाच दुसरा मोहरा गमावल्याची दुःखद वार्ता प्रसिद्ध करणें भाग आहे. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे बंगालचे टिळक होते हें सांगितल्यानें त्यांचें थोडक्यांत वर्णन आलें. दास, अरविंद घोष व सुरेंद्रनाथ बानर्जी हे तिघे आय्. सी. एस्‌ची परीक्षा उत्तीर्ण झाले असून तिघेही लोकपक्षाच्या तर्फेनें सरकारशीं यावज्जन्म झगडण्यांत कामी आले ही नवलाची गोष्ट आहे. सुरेंद्रनाथ, अरविंद व दास हे १८७५ पासून १९२५ पर्यंतच्या ५० वर्षांच्या काळांत बंगाल्यांतच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानभर लोकपक्षाचे धुरीण म्हणून अत्यंत गाजले. सर सुरेंद्रनाथ हे कांग्रेसच्या मूळ संस्थापकांपैकीं असून दोन वेळ कांग्रेसचे अध्यक्ष होते. कलकत्त्याचे ‘ रिपन ’ कॉलेजचे व ‘ बंगाली ’नामक नाणावलेल्या इंग्रजी पत्राचे ते उत्पादक होते. १९०६ सालीं त्यांच्या लोकसेवेचा कळस होऊन बंगालचे ‘ अनभिषिक्त राजे ’ म्हणून त्यांच्या मस्तकावर मुकुटही ठेवला गेला होता ! सुरतेच्या कांग्रेसनंतर ते मवाळ उर्फ प्रागतिक पक्षाचे पुढारी झाले व शेवटीं ‘ मिनिस्टर ’ होऊन सरकारपक्षीय बनले. हीं अलीकडील पंधरा वर्षे सोडून दिलीं तर पूर्वींच्या ३६ वर्षांत त्यांनीं बंगाल्यांत—जशी टिळकांनीं महाराष्ट्रांत—तशीच आणि तेवढी बहुमोल राष्ट्रसेवा केली आहे. दादाभाई नव-

रोजी, सर फेरोजशहा मेथा, माधवराव रानडे, नामदार गोखले, सुरेंद्रनाथ बानर्जी, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष, चित्तरंजन दास व महात्मा गांधी हे स्वराज्यपूर्व काळांतील स्वराज्याची जमीन तयार करणारे दशावतार होत. यांनीं लोकजागृतीचें काम केलें आहे. स्वराज्य अजून दूरच आहे. त्यासाठीं रामदास शिवाजींची जोडी पाहिजे आहे व ती यापुढें येणार आहे! वरील दहांतले गुणदोष कालांतरानें लोक विसरून जातील. पण स्वराज्याची पूर्व तयारी करणारे हे महारथी म्हणून यांचीं नांवें पुढील पिढयागात राहतील.

---

## आठवणींचा दुसरा खंड.

रा. सदाशिवराव बापट यांनीं 'लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका' ह्या पुस्तकाचा दुसरा खंड नुकताच प्रसिद्ध केला असून त्याची एक प्रत आह्मांकडे आली आहे. ७०० पृष्ठांचा, उत्तम छपाई व बाइंडिंगचा हा खंड अवघ्या तीन रुपयांत दिला आहे. यांत ३७० लोकांनीं लहानमोठया अनेक आठवणी व आख्यायिका लोकमान्यांवरील विशुद्ध प्रेमानें लिहिल्या आहेत. बापट यांची टिळकभक्ति उत्कट, निर्मळ व निरपेक्ष असून त्यांनीं आपल्या गुरूची सेवा उत्तम बजावली आहे यांत शंका नाहीं. या खंडांत वळंवतरावांच्या मुलींचे लेख आहेत. गंगाधरराव देशपांडे, बामणगांवकर, डॉ. बेलवलकर, गुर्जर, शिवरामपंत परांजपे, डॉ. भडकमकर, ह. भ. प. दत्तोपंत पटवर्धन, उभय करंदीकर, डॉ० मुंजे, बापटशास्त्री, बार्शीचे रामभाऊ साने वगैरेंचे मराठी लेख व बाप्टिस्टा, अरविंद घोस, परांजपे, सरोजिनी नायडू वगैरेंचे इंग्रजी लेख वाचण्यासारखे आहेत. शिवरामपंत परांजपे यांचा लेख मौजेचा आहे. त्यांची खोंचदार व मनोरंजक भाषा येथेंही पाहण्यास सांपडते. कांहींही विशेष सांगावयाचें नसून आपल्या मनोरंजक वर्णनशैलीनें वाचकांस गुंग करण्याची अजब हातवटी शिवरामपंतांशिवाय कोणालही साधलेली नाहीं. येवल्याचे डॉ० भट हे २० वर्षांपूर्वींचे परांजप्यांच्या मेळ्यांतले, पण त्यांनीं अप्रासंगिकपणा करून परांजप्यांवर (नांव न घेतां) उगाच कोरडे ओढले आहेत. आतां शिळ्या कढीला ऊत आणण्याचें हे लोक सोडतील तर बरें. पुस्तकाला रा० अणे यांनीं सुंदर प्रस्तावना जोडली आहे. त्यांनीं व दा. वि. गोखले यांनीं महात्माजींबद्दल जे उल्लेख केले आहेत ते केले नसते तर बरें होतें!

# भक्ताचे उद्गार.

१

बाजारांत व जनसमर्दांत तसाच गुहेंत व पर्वतशिखरावर, एकांतांत व लोकांतांत मला देव सर्वकाळीं दिसतो. संकटकाळीं अथवा संपत्तिकाळीं, देव माझ्या संन्निध असतो. पूजाकाळीं व व्यवहारकाळीं, घरीं व दारीं, जागृतींत व स्वप्नांत, देहांत व देहाबाहेर माझ्या देवावांचून कोणीच नाहीं. निर्गुण तो व गुणांत तोच, कार्यकारण सर्व कांहीं माझा राम आहे. शत्रुमित्र, आपपर हा भेदभाव गळून गेला, कां कीं सर्व डोळ्यांत मला त्याचीच ओळख पटते.

२

मिठाचा खडा पाण्यांत विरघळतो किंवा मेणबत्ती अग्नींत जळून जाते तसाच देवाच्या स्वरूपचिंतनांत माझा 'मी' नाहींसा झाला आहे.

३

माझ्या डोळ्यांनीं मला आजवर माझा देहच दिसत होता, पण देवाच्या डोळ्यांनीं मी मजकडे पाहूं लागलें तों 'मी' पार ओसरून गेला व सारा देवच देव भरून राहिला.

४

देव लपून बसला असून कोठेंच दिसत नाहीं असें मी मागें म्हणत होतों, देव उघडा असून सर्व तोच आहे असें आतां जाणतों!

५

देव आणि देवाचें नांव! दोन्ही एकच आहेत. नाम आणि नामी—साखर आणि गोडी, पारिजातपुष्प आणि सुगंध, डोळा आणि दृष्टि—काय दोन आहेत?

६

शास्त्र व गुरु मीच आहें. माझ्यांतला लघु 'मी' मेला व व्यापक 'मी'नें जग भरलें आहे. दारिद्र्य टाकून श्रीमंत झालों, जन्ममरण टाकून अमर झालों, घोंगडी टाकून पीतांबरधारी झालों.

७

सर्व मीच आहें, माझें—तुझें ही भाषा संपली.

८

सर्व ग्रंथांत, पंथांत, संप्रदायांत, धर्मांत मीच आहें. सर्व रूपें माझींच आहेत. मला द्वेष्य कोणी उरला नाहीं. मूर्त मी, अमूर्त मीच. निराकार मी व साकार मीच, प्रपंच मद्रूपच आहे.

९

आतां जाउनि कोठें पाहूं ? । जेथें पाहूं तेथें देवू ॥
गिरिकपार्टी कंदरीं । जंव जंव पाहें तंवतंव हरी ॥

१०

वाटेल ती शिक्षा मी भोगेन पण देवाच्या विस्मरणाची भयाण शिक्षा मला पळभरही सोसवणार नाहीं. म्हणून ' तुझा विसर न व्हावा ' अशी माझी माझ्या आत्मारामाला निरंतर प्रार्थना आहे. देवाच्या स्मरणांत सर्व आपत्ति सुसह्य होतात, पण देवाच्या विस्मरणांत--नको, तो विचारच मला भयाण वाटतो !

११

देवाच्या तन्मयतेचें क्षणभर सुख भोगणें हें त्रैलोक्याचें राज्य मिळविण्यापेक्षां अधिक भाग्याचें आहे.

१२

देवाच्या प्रेमानें माझें अंतरंग उचंबळूं लागल्यापासून जे स्त्रीपुत्रदाराजन मला माझे परमार्थांत शत्रु वाटत असत तेच आतां मित्र वाटूं लागले आहेत. ते अहर्निश माझी प्रेमकला वाढवीत आहेत.माझ्या विश्वव्यापी प्रेमांत त्यांचाही समावेश झाला आहे.

१३

साधुदर्शनांत आत्मदर्शनच होत असतें.

१४

पूर्वीं संतदर्शनाचें मला वेड फार होतें पण त्यावेळीं साधूंच्या पायां पडण्यांतच मला कृतार्थता वाटे. द्वैतभावाची ती भेट होती. आतां संतभेटीची गोडी निराळी कळूं लागली, संतदर्शनांत मला माझ्या भेटीचाच अद्वयानंद भोगतां येतो.

१५

देवाचें अखंड प्रेम—अपारसुखाची ती ठेव आहे. हरिप्रेम बाजारांत विकत नाहीं, शेतांत पिकत नाहीं, निर्मल हृदयाला हें सहज सुलभ आहे. विषयांचे खळगे व शास्त्रांचे खडक भरून काढून हें त्यावरून वाहत असतें.

१६

देवा! माझ्या सर्व प्रेमाचा तूं सागर आहेस. माझीं सारीं नातीं तुझ्या ठायींच एकवटलीं आहत. माता, पिता, बंधु, धनी सर्व तूं आहेस. माझा सखा, तूं, माझें भाडंवल तूं, माझ्या वासनांचा शेवधि तूं. तुझ्या इच्छेला येईल तें तूं कर, मी त्याला राजी आहें. तुझ्यावांचून मी दुसरी वासनाच ठेवली नाहीं, अथवा तूंच माझ्या सर्व वासना हिरावून नेल्या आहेस.

# सत्पुरुषदर्शन.

[ लेखकः—माधव गोविंद भिडे. ]

१. " सत्संगः सर्वसंगापहः " म्हणजे साधूंची संगति मनाला इतर सर्व संगतीपासून सोडवून अंतीं संगरहित करिते. श्रीमद्भागवतांतील या उक्तीचा व्यवहारांत कसा काय अनुभव येतो ? साधुसमागमाचा एवढा महिमा खरोखरच आहे असें मनाला जर पटत नसेल तर या सूत्राचा अर्थ मनच कांहीं तरी विपरीत करीत असलें पाहिजे. कारण या सिद्धांताला ज्यांच्या कुशाग्र, सूक्ष्मदर्शी, सखोल, मार्मिक बुद्धिविषयीं अत्यंत तर्ककुशल गाढया पक्क पंडितालासुद्धां शंका येणार नाहीं अशा श्रीसमर्थ रामदासस्वामी, श्रीतुकाराम महाराज, श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथ वगैरे सत्पुरुषांनीं शपथा आणा वाहून अनंत मुखांनीं स्वानुभवपूर्वक दुजोरा दिला आहे. अर्थात् सत्पुरुषसंगतीपासून असा अनुभव आलाच पाहिजे

२. विषयसंगाची मगरमिठी सोडवून जीवगजाला मुक्त करणारा आज या भरतखंडांत कोणीच नाहीं काय ? कोणी नाहीं ! अगदीं एक सुद्धां नाहीं ? अगदी एक सुद्धां नाहीं !! असें जर नसतें तर सत्पुरुषसमागमाचें अमोघ फळ जीवाच्या पदरांत पडल्याविना राहतेंचना. आजकाल असा महा-लाभ होत असलेला तर दिसत नाहीं. व आमचा सिद्धांत तर निरपवाद अबाधित आहे. मग आम्हीं प्रस्तुत काळीं भरतखंडांत सत्पुरुष नाहींत म्हटलें यांत काय वावगें केलें ? " हिशेबें आलें तें सकळां प्रमाण " असा तुकोबांचा कायदा. आमच्या हिशोबीं संगत्यागाचा मासलाच जर कोठें पहावयास मिळत नाहीं तर आम्हीं कोणाची भीड मुर्वत न ठेवतां सर्वसंगापह असा सत्संग आजमितीला उपलब्धच नाहीं असें कां म्हणूं नये ?

३. असें तर कोणाचें म्हणणें नाहींना कीं हल्लींच्या काळांत शिमग्यांतले खेळिये ज्याप्रमाणें परीटघडीच्या ऐटबाज अंगरख्यावर शिंतोडा उडवावयाच्या भानगडींत पडत नाहींत त्याप्रमाणें सांप्रतचे सत्पुरुष अहंकाराच्या होळीवर आदियोनीच्या नांवें महाशंख करीत बसत असले तरी आपल्या अनुभवाच्या चिखलाचा शिंतोडा आमच्यासारख्या सुधारलेल्या पोषाखी लोकांच्या मनावर उडविण्याच्या मोहास बळी पडत नाहींत. आज सत्पुरुष पांडवाप्रमाणें अज्ञात-वास तर भोगीत नाहींत ? द्यूताला आव्हान केलें असतां द्यूतकर्म केलेंच पाहिजे या श्रीमनुप्रणीत आज्ञेचा उपमर्द करण्याचें नाकारून धर्मराज हरले त्याप्रमाणें हल्लींच्या प्रकाशनसाधनसमर्थ एखाद्या दुर्योधनानें बिचाऱ्या कार्या-कार्य व्यवस्थेंत शास्त्राला प्रमाण मानणाऱ्या आजच्या धर्मराजाला सर्व श्रुति-स्मृत्यादि प्रमाणवैभव पणाला लावावयास भाग पाडून जिंकून हद्दपारीची शिक्षा तर भोगावयास लाविली नसेल ? द्रु ह्मणजे झाड व पद ह्मणजे शब्द किंवा पदवी. संसार म्हणजे प्रपंच ह्मणजे अश्वत्थ वृक्ष. अर्थात् प्रपंचरूपी पंचांच्या

भोगवटयास मिळालेली आत्मारामाला वेळीं अवेळीं हांका मारणारी द्रौपदी अथवा बुद्धि. ही द्रौपदी तर आमच्या हल्लींच्या धर्मराजांनीं पणास लावून गमाविली नसेल ? असें झालें असेल तरी चिंता नाहीं. कारण अज्ञात असणें आणि अविद्यमान असणें यांत फलतः कांहीं भेद नाहीं. ह्मणजे सत्पुरुष अज्ञातवासांत असले तर ते नाहींत असें म्हणण्यास आमची जीभ यत्किंचितही चाचरत नाहीं. "माझ्या लेखीं देव मेला । असे त्याला असो द्या ।।" असें तुकाराम महाराजाप्रमाणें संसारस्वानुभवसंपन्न अशा आह्मांस ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

४. आतां या आमच्या स्वतःच्या मतीं मजबूत झालेल्या प्रमाणदुर्गावर कोणी असा हल्ला चढवील कीं पूर्वींच्या काळच्याप्रमाणें दऱ्यादरकुटें सेवण्याचें सोडून देऊन आजच्या विलासी साधकांसाठीं सत्पुरुष सुद्धां विलासी बनले आहेत. आगगाड्या, तारायंत्र, टपाल, वगैरे साधनांच्या अगदीं टप्प्यांत नेहमीं सत्पुरुष राहूं लागले आहेत. प्रजापति वरुण वगैरे साध्या डोळ्यांना न दिसणारे ग्रह जसे दुर्बिणी आज आमच्या फलज्योतिषांच्या फलवर्तविण्याच्या कामीं वेठीला धरून आणून देत आहेत तसे श्रीरामदासादि सत्पुरुषांच्या साध्यासीध्या अनुभवावरून बसविलेल्या सत्पुरुषलक्षणांच्या टप्याच्या पलीकडे असलेल्या नवग्रहाहून सूक्ष्म असें सत्पुरुष आहेत. ते अर्थातच आह्मांस दिसले नसणार !

५. " आज वाटी उद्यां नरोटी " बनणाऱ्या आमच्या तकलादू संततिसंपत्तीचा आह्मांस संग घडणार कोठून ? मूळ असेल तर माता ओढून धरणार. बिऱ्हाड करून राहिल्यामुळें गृहसंग नाहीं, विद्याग्रहणदक्ष गृहिणीमुळें दारासंगवर्ज्य, पुत्रांविषयीं तर नांव ठेवण्यापर्यंत मजल मारण्याइतकेंही ते चिरंजीव नसतात, वित्ताविषयीं आमच्या वाण्याउदम्यास आमच्यापेक्षां जास्त माहिती, विद्येविषयीं आज वाचून खालीं ठेवण्यास घेतलेल्या पुस्तकास संध्याकाळीं चूक ठरविणारी ताज्या तारेची खबर ! उरतां उरलों आह्मी स्वतः त्या आह्माला आमचा संग घडणार कसा ? कारण आम्ही जीवंत आहोंत असें आह्मास आमच्या वैद्यास रोज दिवसांतून सतरा वेळा वजावावयास लागतें. त्यांनीं निर्णय दिला म्हणजे दवाखान्याचा जिना उतरून खालीं येईपर्यंत जेमतेम आम्ही जीवंत ! अशा परिस्थितींत देहसंग तरी आह्मांस घडावा कसा ? यामुळें आम्ही संगाभावीं स्वयंभूच निसंग बनलेले. तेव्हां आमच्या सारख्या असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ या दत्ताला भिऊन सर्व सत्पुरुष आम्हाला अदृश्य तर झाले नसतील ? यावर आमचे ह्मणणें एवढेंच कीं आम्ही स्वतः सत्पुरुष नाहीं आहोंत. आणि सत्पुरुषाशिवाय संगराहित्य संभवत नाहीं. तेव्हां आमच्या मोजदादींत न आलेला जो संग तो हरण करून आह्मास सर्वसंगमुक्त करणारा जर

भेटला नाहीं तर आम्ही सत्पुरुष नाहींत असें ह्मणण्यास काय हरकत आहे ?

६. आतां असें तर कदाचित घडलें नसेल कीं खायालाच कांहीं नसलेल्याचा उपवास आणि पारणें दोन्ही अगम्य त्याप्रमाणें आह्माला संग आणि असंग यांचा अनुभवच अगम्य असें कांहीं घडलें असल्यास देव जाणे ! म्हणजे आमच्यावर पंचागी ग्रहणाचाच प्रसंग ओढवला ह्मणावयाचा ! पंचागांत लिहिल्यावरून आम्ही ग्रहण ग्रहण घोकावें आणि अखेर जाहीर केलेल्या दिवशीं ग्रहणाचा पत्ताच नाहीं. अशा कांहीं अद्भूत ग्रहलाघवीयांच्या पाशांत आम्ही फसलों असल्यास नकळे ! एवढें मात्र खरें आहे कीं ग्रहणाच्या बाबतींत पंचांगबली आणि निर्बली यांचा ग्रहणविषयक अनुभव न जुळला तरी सूर्याच्या अस्तित्वाविषयीं एकमत असतें त्याप्रमाणें संसार प्रसवणारा आमचा अहंसूर्य त्याला ग्रहण लागो कीं न लागो असल्याविषयीं आह्मास भ्रांति नाहीं. अर्थात् दुर्दैवी राजाचें राज्य गेल्यावर राजा ही पदवी त्याच्याजवळ शिल्लक रहावी त्याप्रमाणें विद्यावैभवादिकांचा संग आह्मास नसला तरी नुसत्या अहंपदाचा संग तरी आहेच आहे. आणि तो ज्यापक्षीं कोणी नाहींसा करीत नाहीं त्यापक्षीं सत्पुरुष नाहींत, हें आमचें ध्रुवपद अप्रतिबंध चालूच राहणार.

७. भल्या लेखका, अरे पाणी आटल्यामुळें मासोळी गाळांत डोकें खुपसूं लागली तरी तिचें उद्दिष्ट गाळ नसून गाळांतील द्रवांशच असतो, त्याप्रमाणें दीन दुर्बल झालेल्या तुझ्यासारख्या उथळ, जलाशयामुळें सत्पुरुष सुधारणेच्या गाळांत डोकें खुपसल्यासारखे दिसले तरी त्यांचें उद्दिष्ट तुझा उद्धारच आहे ! तसेंच विलायती गवताप्रमाणें वाळ्याच्या पात्यांचे भारे कापून आणून त्यांत कितीही वेळ नाक खुपसलेंस तरी वाळ्याचा वास जसा तुझ्या नाकाला लाभणार नाहीं त्याप्रमाणें सत्पुरुषांचें फोटो, नारळ वगैरे प्रसाद व्ही. पी. नें मागवणाऱ्या तुला त्यांची भेट कशी व्हावी ? शिवाय चंदनाचे जसें गाभ्यांत दर्शन तसें सत्पुरुषांचें असल्यामुळें तूं त्यांच्या हृदयांत हृदय मिळविण्याइतका त्यांचा दृढ परिचय करून घेतला आहेस कां ? चंदनाचा गाभा जसा पिवळा तसाच त्याचा वरचा रंग नसतो. अर्थात् ज्ञानगर्भ संसारी सत्पुरुष तुला कसे ओळखतां येणार ? याखेरीज संग करण्याची जबाबदारी तुजवर आहे सत्पुरुषावर नाहीं.

८. पिसाऱ्याच्या डौलांत दंग होऊन गुह्य दाखविणारे सत्पुरुष कांहीं मोर नाहींत. शिवाय मोराचें गुह्य ह्मणजे सौंदर्य हें तुझ्या ध्यानांत येईल तर मोर आनंदांत येऊन आपल्या चेतोहर पिसाऱ्याची गूढ रमणीयता जेव्हां दाखवील तेव्हां तूं त्या मोराच्या पाठीमागें पाहतोस आणि प्रतिबिंब दिसत नाहीं म्हणून ओरडतोस ! आरसा साध्या कांचेप्रमाणें राहील तर सारख्या पाठपोटाच्या कांचेंत तुला प्रतिबिंबानुभव कसा मिळणार ? तेव्हां सत्पुरुषांचें दर्शन घेण्यास तूं शीक.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्यपाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पीनें. ॥१२

२ **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ ।किं. रु. १॥८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत किं. ॥१२

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४

५. **आनंदलहरीः**—(कवितासंग्रह) ह्यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—हीं ८४ संस्कृत सूत्रें,त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८ व्ही.पी. नें ॥११

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥४

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १॥८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध के० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५

१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध (भाग १-२):—किं. प्रत्येकीं रु.१०८

१४ मोरोपंती वेंचे (दुसरी आवृत्ति):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे किं० रु. १०१२.

१५ पारिजातकाचीं फुलें (तिसरी आवृत्ति):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं० ०८.

१६ श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकाठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलं आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं० रु० ३.

१७ श्रीतुकारामचरितामृत:— तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी किं० ०५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख—विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं० ०१०.

१९ मुक्तेश्वर (चरित्र आणि काव्यविवेचन):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं.रु. १

२० मारुतिउपासना. (चौथी आवृत्ति):—किं. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु. ४. व्ही. पी. नें. ४०१०.

२२ सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२

२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें अशा चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २


२४ मोरोपंत (चरित्र आणि काव्यविवेचन). किं. रु. २०८

२५ श्री एकनाथी भागवत (निर्णयसागर प्रेसची आवृत्ति तिसरी):—किं रु ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होऊन निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १९. | आश्विन १८४७ | नवें वर्ष ५ वें |
| मास २ रा. | आक्टोबर १९२५ | अंक १० वा. |



संपादक व प्रकाशक,

## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, पुणे सिटी.



**वार्षिक वर्गणी रु. २ व व्हीपीनें रु. २।३**

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणे पेठ सदाशिव घ. नं. ३००
येथे आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ नारायणमहाराज जालवणकर यांचीं पत्रें ... ... | ३-५ |
| ३ स्फुट विचार ... ... .. ... | ६ ७ |
| १ श्रीगणेशोत्सव | |
| २ डॉ० भांडारकर | |
| ४ इंदूरचा श्रीमहल्योत्सव ... ... ... | ८-१२ |
| ५ यात्रा प्रवासवर्णन .. ... ... ... | १३-२४ |
| ( मातृगया व द्वारका ) | |
| ६ श्रीगोंदवलेकर महाराजांचे अभंग ... ... | २५-३२ |
| ७ शिवाजीकालीन स्वस्नाई ... ... ... | ३२-३३ |
| ८ तुलसीदासांचें रामायण ... ... ... | ३३-३५ |
| ९ ताजे मननामोद ... ... ... | ३५-३८ |
| १० ईश्वरभजन ... ... ... | ३८-४० |


## सूचना.

नोवेंबर डिसेंबरचा जोड अंक पुढें एकदम वाचकांच्या हातीं पडेल.


# मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—ल. रा. पांगारकर, बी ए.

बी. ए च्या परीक्षेला मुंबई युनिव्हर्सिटीनें नेमलें आहे.

सदर ग्रंथाच्या प्रति पुष्कळ वर्षें आमच्या अल्पासच उपलब्ध होत नव्हत्या. त्या नुकत्याच मुंबईस एका बुकसेलरकडून मिळाल्या. रा पांगारकर यांच्या ग्रंथाचे सेटस् पुरे करणास ज्यास पाहिजे असतील त्यांनीं व बी ए.च्या विद्यार्थ्यांनीं तावडतोब मागणी करावी. ग्रंथ दुर्मीळ आहे. पृ सं. ६२० किं. रु. २॥८ ट. ख. वेगळा ०।०.

पत्ताः-व्यवस्थापक, ‘ मुमुक्षु ’ पुणें.



### १ पद.

पांडुरंग स्मर अभंग भंग या भवा ।
संतसंग साधि रंग नीज वैभवा. ॥ ध्रु० ॥
योग याग तपन चांग साध्यता घडे ।
करिसि सांग साधनांग देह कोरडे ॥
वदसि वाग्विलास शब्दज्ञान चोखडे ।
आत्मप्राप्तिविना जाण नुगवि सांकडें. ॥ पांडु० ॥ १ ॥
करिसि साधनासि आस धरुनियां मना ।
श्रमासि व्हावयासि हेतु पूर्ण कामना ॥
शीण व्यर्थ गमत सर्व श्रमासि सज्जना ।
स्मर हरीस पाश तुटति चुकति यातना. ॥पांडुरंग० ॥२॥
सजल जलदश्यामल हरि अंतरीं स्मरे ।
गुरु कृपाळ चुकवि काळ वांछिलें पुरे ॥
भव ढिसाळ हा विशाळ भास तैं नुरे ।
देवनाथ जपत नाम निजसुखा भरे. ॥ पांडुरंग० ॥ २ ॥

### २ पद.

तूं नाम जप रे ! वाचे । भय नाहीं मग काळाचें.॥ ध्रुवपद ॥
नश्वर देह शाश्वत मानुनी । वय गमाविसी व्यर्थ फुकाचें॥भय०॥१॥
आशातृष्णा त्यागुनि सर्वही । सार्थक करीं बापा! जन्माचें॥भय० ॥२॥
रामकृष्णहरिध्यास हृदिं धरीं। तुटतिल पाशहि सर्व यमाचे॥भय०॥ ३॥
प्रार्थितसें मना लागुनि सुंदर । नाम सदा मुखिं गाइं हरीचें॥भय०॥४॥
देवनाथप्रभु नाथसखा रे ! काय उणें मग आहे सुखाचें ?॥ भय ०॥५॥

ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ

# श्रीसमर्थसंजीवनी
# उर्फ
# रामदासी वेंचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वीं आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. (१) प्रपंच (२) राजकारण (३) परमार्थ व (४) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा 'सारांश' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बाइंडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन. व्ही. पी. नें २॥८

पत्ताः — व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# नारायणमहाराज जालवणकर यांचीं पत्रें.

प्रसिद्ध सत्पुरुष सप्तसागरांचे कर्ते श्रीदत्तभक्त नारायणमहाराज जालवणकर यांचा करुणासागर ग्रंथ व कांहीं पत्रव्यवहार गेल्या भाद्रपदमासीं इंदूर मुक्कामीं आमचे पाहण्यांत आला. त्यांनीं आपल्या शिष्यांस लिहिलेलीं कांहीं पत्रें पूर्वीं मुमुक्षु साप्ताहिक असतांना त्यांत छापून प्रसिद्ध केलीं होतीं. सांप्रत पाहिलेल्या पत्रांतून महाराजांचीं कांहीं सुंदर वाक्यें वाचकांसाठीं उतरून घेत आहें. महाराजांचा शिष्यसमुदाय धार, देवास, इंदोर या बाजूंस फार होता. रघुनाथ भाऊ देवासचे दिवाण यांस व इतरांस हीं पत्रें लिहिलीं आहेत. गंगातीरीं धूमारण्य क्षेत्रीं राहावयास गेल्यावर तेथून हीं पत्रें लिहिलीं आहेत.

१

शके १७७६ च्या चैत्रांत लिहिलेल्या एका पत्रांत महाराज लिहितातः—

“ बहुकाळाचा बीजरूप संकल्प होता कीं बद्रिकाश्रमीं निवासार्थ जावें. तो विचार हल्लीं योजला आहे. येथें दोन तपें जालीं. आयुष्यमानही क्षीण, उत्तरावस्था निर्गमन...जाणत्यानें आधींच साधला पाहिजे. आपलेकडोन बुद्धिबलानुसार प्रशस्त योजावें. सारांश ‘ अहं काश्यां गमिष्यामि ’ ऐसा आपला तीव्र संकल्प अंतरापासोन नित्य असावा. होणार विधिनियम असेल तैसेंच होतें...मुख्य परमार्थ इतुकाच कीं अखंडात्मानुसंधान, दृश्यमिथ्याप्रतीति, प्रौढ वैराग्यपूर्ण ब्रह्मबोध, अंतरीं शीतळ समाधान ठेवावें. बाह्य केवळ परमार्थास सहायभूत व्यवहार तारतम्यें अहंधर्मसंबंधक कर्तृत्वभोक्तृत्व लागों न देतां सर्वत्र मृदु वाक् सौम्यशील प्रसंगीं धीर बहु सावध सत्संग वेदांतश्रवणमननाभ्यासें प्रेमें भावुकें गुरुभजनांत काळ आनंदें सारावा. याहून आणिक कांहीं लिहावें तर अपार आहे............कोणी उद्विग्न होऊं नये. गुरु जवळच आहे.

न सदैकत्र संवासः कर्ममार्गानुवर्तिनाम् ।<br>यथा प्रवाहपतितः प्लवानां सरितां यथा ॥

धूमक्षेत्रींही दोन तपेंवर वर्षें जालीं. पुरग्रामीं जनप्रसंगें परमार्थ यज्ञसंकल्पही पूर्ण जाला. आतां दुसरा कांहीं योग पहावा. निर्याणप्रकारही पाहिला पाहिजे. ईश्वराकरितां बुद्ध्यनुसार त्याचेच प्रेरणेंकरोन योजिलें तें सिद्धीस नेणार भाविकांची माता सद्गुरु सहाय तुम्हांस आम्हांस सर्वांस सारिखा आहे. विशेष लिहावें ऐसें नाहीं. कळावें हे आशीर्वाद. ”

२

" लक्ष्मणादि वेषधारी यांनीं ऐसें रहावें. स्त्रियांहातीं सेवा घेणें व एकांत भाषणादि न करावें. अभ्यंग दिपवाळीव्यतिरिक्त न करावा. तैलमर्दन औषधोपचारीं मात्र करावें. गृहस्थाश्रमीं तत्संबंधीं न रहावें. क्षेत्रीं ग्रामीं मधुकरी मागावी. वेदांत श्रवण मनन अभ्यास ठेवावा. "

( हें पत्र लक्ष्मणमहाराजांस आहे. यांचा मठ इंदूर येथें आहे. यांचे शिष्य बलभीमबुवा साडेकर. सं. मु. )

३

" पराधीन न होतां शरीरयात्रा स्वतंत्र राहोन परमार्थसमाधान किंचितही न्यून न होय ऐसिये बाह्य रहाणीचा परिणाम नीट व्हावा. आधीं आपली संस्कारस्थिती लक्षोन पारमार्थिक अभ्यासाचा परिपाक करावा. परिपाक म्हणिजे मनाचे नानासंकल्प, हौसी, रुचि इ० उद्भवल्या असतां दिव्य ज्ञान–वैराग्यखड्गें त्या छेदोन आपली राहणी शुद्ध निर्भवीन ऐसी मनाची खंबीरता. मग ज्यास जो प्रकार बाह्य रहाणीचा प्रशस्त वाटेल तो त्यानें योजावा. "

४

" स्वरूपस्थिति सहज असावी. सहज असतां दृश्यदर्शन नसतां अविद्यमान भुजंगभास नसावा. याविषयीं साधन उपायापेक्षा नसावी. उपाय हाच अपाय होतो. उपायापेक्षारहित राहणें हाच उपाय !

मा किंचित्त्यज मा गृहाण विरम स्वस्थो यथावस्थितः ।

लोहकार्य घडायास लोखंडच साधन, सहजस्थिति रहायास सहज राहणेंच साधन ! तें सहज आपणच आहे, स्थिति म्हणण्याचा आरोप आहे ! साधन दिसलें नाहीं ह्मणोन लेखन आटोपलें. "

५

" तुह्मांस आतां या वयांत या काळांत चार दिवस तरी गृहांधकूपांतून पाय बाहेर काढणें समुचित आहे. जन्मभर त्यांतच डोई घालोन त्याचा भार वाहोन त्याचीच मजुरी करावी हें अति अनुचित ! त्यांत फार दिवस पाय राहिला, दिवसेंदिवस अधिक फसों लागला, विकास होईनासा झाला, ' किं करोमि ' ' कथं भविष्यति ' ऐसे परिश्रम बुद्धीस होतात. अवसानाचा भरंवसा नाहीं. बाहेर पडोन काशीक्षेत्रीं गंगेची मजा तरी कधीं पहावी ? मी चार दिवस गेलों तर मागें कसें होईल हा मोह आतां नसावा ! पुत्र धुरंधर, सून कर्ती–सर्व अनुकूल असतां हा गुंता तो गुंता–जन्म सरेल, हें सरत नाहीं ! पूर्वीं बंधूचे प्रतिकूळतेमुळें त्यागेच्छा होती, आतां मनाजोगा संसार–

थाटला म्हणोन ती त्यागेच्छा गेली, गुंते अनेक कर्तव्यें आलीं. आतां तरी निर्गम पहावा ! आप्तविषयीं त्यांणीं जागवावें तर ते खेही–हितशत्रु, प्रसिबंधच करणार ! पस्तावाल, मग पस्तावेन काय ? गेला बाण हाता नये. काशींत गंगातटीं चातुर्मास्य करावा.

घरीं नासतें काम हा घोर वाहे
गेला तरी चित्त घरींच राहे ।
कधी घरीं जाइन व्यग्र होतो
त्या वोढिनें स्वस्थ घरासि जातो ॥

ऐसें येण्यांत सुख नाहीं ! येथें आल्यानें भार उतरेल, सुख होईल. हा उपदेश तुह्मांस, ऐसें नाहीं, जो घेईल त्यास !

---


पृ. सं. १४४ **कविवर्य मुक्तेश्वर** किं. १ रु.

**चरित्र आणि काव्यविवेचन.**

ग्रंथकारः—**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**, बी. ए.

या ग्रंथांत मुक्तेश्वराचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतींतील विशेष गुण:–सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्याच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वराची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. कि. रु. १. ' मुक्तेश्वरनीतिरत्नमाला ' ही शेवटीं जोडली आहे.

———

**मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति )**––सुधारून वाढविलेली छापून विक्रीस तयार आहे. किं. ८४.

पत्ताः—**व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.**

# स्फुट विचार.

## श्रीगणेशोत्सव.

भाद्रपद शुद्धाचा पंधरवडा सर्वत्र श्रीमंगलमूर्तींच्या उत्सवांत गेला. कथा-कीर्तनें, प्रवचनें, पुराणें, व्याख्यानें यांच्या साह्यानें हें ज्ञानसत्र समाप्त झालें. कोठें कोठें नाटकें, प्रहसनें यांचीही जोड उत्सवास दिली गेली होती! आणि एके ठिकाणीं तर मिरवणुकीबरोबर कोल्हाटणीचे नाचही चालविल्याचें ऐकिवांत आलें आहे!! गणपतीसमोर बसून अचावचा बोलणें, सोंगट्या व पत्ते खेळत बसणें, विडया फुंकीत मंडपांतून फिरणें, चहाकॉफीपानाचे समारंभ देवासमोर करून मोकळ्या भाषेनें हास्यविनोद करणें हे प्रकार तर बऱ्याच ठिकाणीं होतांना दिसतात! वडिलधाऱ्या माणसांसमोर किंवा वरिष्ठांसमोर ज्या गोष्टी करायला भीति वाटते त्याच गोष्टी देवतेसमोर बेदरकारपणानें माणसें करितांना पाहिलीं म्हणजे यांना देवाधर्माची कल्पना व चाड आहे कीं नाहीं याचाच संशय वाटतो. सामान्य माणसांना जो मान देतां तेवढाही देवतेचा मान ठेवण्याची बुद्धि जर नसेल तर तो देवतेचा उत्सव नसून एक करमणुकीचा प्रकार आहे एवढेंच म्हणतां येईल. शास्त्रशुद्ध प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर तेथें देवतेचा वास असून तिच्या साक्षित्वाखालीं आपण वागत आहोंत एवढी बुद्धि नसेल तर उत्सव न करणेंच चांगलें! केवळ लौकिक विषयांवरच्या व्याख्यानासाठीं देवतेचे उत्सव नसतात. पक्षप्रतिपक्ष हा प्रकार देवतेसमोर न व्हावा. कलहपर्यवसायी सामाजिक व राजकीय विषय शक्य तितके देवतेसमोर न आणविण्याची खबरदारी उत्सवप्रवर्तकांनीं अवश्य घ्यावी. लौकिक विषयांसाठीं इतर स्थानें व प्रसंग आहेत. देवतेपुढें देवाच्या, संतांच्या, भक्तिज्ञानवैराग्याच्या, धर्माच्याच गोष्टी व चर्चा व्हाव्यात. कोणी ह्मणतील लो. टिळकांनीं हा उत्सव राजकारणासाठींच काढला आहे. पण त्याचें पर्यवसान पुण्यास काय झालें आहे याचा दोन वर्षांपुरता तरी विचार करावा. यंदा पोलिसच्या दंडुक्याखालीं उत्सव, मेळे व मिरवणुकी निघाल्या हें फार लांछनास्पद आहे! गुदस्तां पुण्यास महात्मा गांधी व गुजराथी समाज यांवर तोंडसुख घेणारे भालाकार भोपटकर यांना दादरला लोकांनीं बोलूं दिलें नाहीं, त्यांना तेथून पळ काढावा लागला! समाजाची हानी, स्वतःचें हंसें व उत्सवाचा उपमर्द अशांत फायदा काय? तात्पर्य, देवता समोर आहे

तिच्यापुढें आपलीं गाऱ्हाणीं व दुःखें नम्रतेनें भक्तिपूर्वक मांडावीत, पोरखेळ होऊं नये. पराक्षेप न करितां गोडीनें, प्रेमानें, लोकजागृति करण्याच्या सात्विक उपायांचें अवलंबन यापुढें झालें तरी ठीक आहे. झालेल्या चुका दुरुस्त करण्यापुरती बुद्धि अनुतापाची उत्पन्न झाली तरी कांहीं व्यर्थ गेलें नाहीं.

---

## २ डॉ. भांडारकर.

त्रिखंडपंडित डॉ. भांडारकर हे आगष्टच्या शेवटच्या पंधरवडयांत ९० वर्षांचे होऊन गेले. इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढींतले हे विद्वान् दुसऱ्या व तिसऱ्या पिढींतल्या बहुतेक विद्वानांचे गुरु होते. डॉ. भांडारकर हे विद्वान्, व्यासंगी, करारी, प्रेमळ व शुद्धाचरणी होते. त्यांच्या तारुण्यांत न्या. रानडे व मोडक यांच्या संगनमतानें त्यांनीं प्रार्थनासमाज काढला. प्रार्थनासमाजाचीं कांहीं मतें आम्हांस संमत नसलीं तरी या त्रयींच्या ठिकाणीं जो भक्तीचा जिव्हाळा होता तो त्यांच्या पुढील दोन पिढ्यांत उतरला नाहीं असें आमचें अनेक वर्षांचें मत आहे. गेल्या १०।२० वर्षांत सुशिक्षितांच्या विचारांत पुन्हां क्रांति झाली आहे व होत आहे तथापि मधल्या दोन पिढ्यांनीं धर्मशून्यतेचें जें एक पाप केलें त्याच्या छटा आमच्या सर्व चळवळींवर अजूनही उमटल्या आहेत. आमच्या कित्येक 'देशभक्तांनीं' तर साधुसंत व भक्तिमार्ग हा प्रच्छन्न उपहासाचा विषय केला आहे. डॉ. भांडारकर हे हाडाचे प्रेमळ भक्त होते, सच्चरित्र व टापटिपीचे विद्वान् होते यांत शंका नाहीं. त्यांच्या घराण्यांत मुलामुलींत व नातनातींतही नवीन विद्या त्यांच्या उदाहरणानें शिरली. त्यांचीं मतें कशींही असोत तीं प्रामाणिकपणाचीं होतीं. संस्कृत भाषेच्या प्रसारास त्यांनीं फार मोठें चालन दिलें, संशोधनकार्याचा ओनामा घालून दिला. हीं कामें त्यांचें स्मरण दीर्घकाल टिकण्यास कारण होणारींच आहेत. संतति, विद्या, अधिकार, यश हीं पुण्याईवांचून प्राप्त होत नाहींत व याप्रमाणें पाहतां डॉ. भांडारकर हे एक पुण्यवान् पुरुष होऊन गेले ही गोष्ट उघड आहे.

---

# इंदूरचा श्रीअहिल्योत्सव.

लेखकः—वे. शा. सं. रामकृष्णशास्त्री मणूरकर, इंदूर.

१ देवी श्रीअहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथीचा सार्वजनिक उत्सव गेल्या श्रावण वद्य १४ स येथें मोठ्या समारंभानें इंदूरच्या ऐश्वर्याप्रमाणें साजरा करण्यांत आला. दरसालप्रमाणें अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस हे अधिकारी व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकी होऊन उत्सव शक्य तितक्या थाटानें साजरा करण्याची तजवीज अगाऊच झालेली होती. यंदाचे वर्षी येथील नवकोटिनारायण, राज्यभूषण, दानवीर, सर हुकुमचंद हे उत्सवाचे अध्यक्ष होते. कार्यकारी मंडळांत सरदार किबे, सरदार चांगण, मि. अझीझुर्रहमानखान, रा. त्र्यंबकराव गोगटे, सरदार खासगीवाले, रा. फडके, रा. मादूलाल, सरदार भागवत वगैरे प्रमुख गृहस्थ होते. उत्सवाच्या आदल्या दिवशीं शहरांतील मुख्य मुख्य ठिकाणीं प्रसिद्धीपत्रकें व तपशीलवार कार्यक्रम लावण्यांत आले होते.

२ श्रावण वद्य १४ मंगळवार हा श्रीअहिल्योत्सवाचा मुख्य दिवस. या दिवशीं सकाळीं गोपाळमंदिरांत देवी श्रीअहिल्याबाईच्या सुंदर व भव्य तसबिरीची ब्राह्मणांकडून विधीपूर्वक स्थापना होऊन सर्वारिष्टशांत्यर्थ शांतिपाठ करण्यांत आला. इंद्रेश्वरप्रभृति प्रसिद्ध देवालयांतून देवास अभिषेक व पूजन वगैरे गोष्टी झाल्या सकाळच्या वेळचा धार्मिक कार्यक्रम यथासांग पार पडला.

३ सामाजिक कार्यक्रमांत सकाळच्या वेळीं तोफखानाथिएटरांतील शाळांतील मुलींचीं गाणीं, संवाद, भाषणें आणि तिसरे प्रहरीं टाऊन हॉलांतील चरित्रकथन या गोष्टी मुख्यत्वें करून होत्या. एकीकडे वर सांगितलेला धार्मिक कार्यक्रम चालू असतांच थिएटरांतील मुलामुलींचाही कार्यक्रम सुरू झाला. सुशिक्षित श्रोतृवर्गाची थिएटरांत फारच दाटी झाली होती. रंगभूमीवर मध्यभागीं श्रीअहिल्याबाईची तसबीर उच्चासनावर मांडलेली असून आरासही छानदार केली होती. चंद्रावती महिलाविद्यालय, फीमेल ट्रेनिंग स्कूल, व्हर्न्याक्युलर फायनल स्कूल्स, आणि प्राथमिक शिक्षणाच्या मराठी, हिंदी व उर्दु मुलामुलींच्या शाळा, संस्कृत महाविद्यालय वगैरे शिक्षणसंस्थांनीं यांत भाग घेतला होता. आरंभीं मुलींनीं गोड गाणीं म्हणून ईशस्तवन केल्यावर देवी श्रीअहल्याबाईच्या प्रशस्तिपर पदें म्हणून कार्यक्रमास प्रारंभ केला. नंतर संस्कृत

महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा अहल्याबाईंची दानप्रियता दर्शविणारा बोधपूर्ण संवाद झाला. नंतर क्रमानें वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींनीं तयार केलेली भाषणें व संवाद म्हणून दाखविले. ते सर्व गंभीर व अर्थपूर्ण होते. या प्रसंगीं कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना बक्षिसें मिळणार असल्यामुळें रा. पंतवैद्य, रा. गोगटे, रा. जोशी व सरदार चांगण यांची परीक्षक म्हणून योजना करण्यांत आली होती. हा कार्यक्रम मोठा मनोरम झाला. एक वाजण्याच्या सुमारास परीक्षकांनीं निकाल जाहीर केल्यावर सरदार चांगण यांच्या हस्तें उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांना गुणानुक्रमें चांदीचीं पदकें बक्षीस देण्यांत आलीं व कार्यक्रमांत भाग घेतलेल्या बाल-बालिकांना पेढे वांटण्यांत आले.

४ ह्या बौद्धिक कार्यक्रमांत विद्यार्थिवर्ग अधिकाधिक उत्साह दाखवीत आहे. यामुळें बुद्धीची प्रगल्भता वाढून सभाधीटपणा अंगीं येण्यास चांगली मदत होते यांत शंका नाहीं थिएटरांत हा कार्यक्रम सुरू असतांच पंढरि-नाथाच्या धर्मशाळेंत आंधळे, लंगडे, लुले, पांगळे, दीन, दुबळे अशा लोकांना पक्वान्नाचें आकंठ भोजन घालण्यांत आलें. सुमारें हजार गरीब लोक यावेळीं हजर असावेत. याप्रमाणें सकाळचा व दुपारचा असे दोन्ही कार्यक्रम आटोपल्यावर मंडळी तिसऱ्या प्रहरच्या **मुख्य कार्यक्रमासाठीं** टाऊन हॉलांत जमूं लागली. कार्यक्रमास साडेतीन वाजतां सुरुवात व्हावयाची होती तरी लोकांच्या झुंडीच्या झुंडी अगोदरपासूनच टाऊन हॉलकडे जाऊं लागल्या. टाऊनहॉल ही जागा सदाशृंगारित व प्रशस्त असून तींत पुष्कळ लोकांचा समावेश होतो तरी उशीरां आलेल्यांना बसावयास जागा मिळेना इतकी लोकांची दाटी झाली होती. उच्चासनावर श्रीअहल्यादेवीची सुंदर तसबीर पुष्पहारांनीं मंडित करून स्थापन केली होती. जवळच श्रीमंत महाराजसाहेब व श्रीमंत युवराज बाळासाहेब यांच्या गाद्या लाविलेल्या होत्या. उच्चासना-समोरील गॅलरींत श्रीमंत सौ. महाराणीसाहेब प्रभृति खाशा स्त्रियांच्या गाद्या व गाद्ये लागलेले होते. सरदार, मानकरी, अधिकारी वगैरे लोक सेकंडक्लास दरबारी पोषाकांत हाजर होते. रा. पुरंदरेसाहेब हाऊसहोल्ड ऑफिसर व त्यांचे सहाय्यकारी लोक, उत्सवकमिटीची मंडळी व बॉयस्काउट्स्मधील तरुण उत्साही विद्यार्थी यांनीं तेथील व्यवस्था फार चांगली ठेविली होती.

५ या ठिकाणीं एक विशेष गोष्ट घडून आली. ती म्हटली म्हणजे आपल्या प्रेमळ हरिकीर्तनांनीं सर्व श्रद्धालु जनांस आदरणीय म्हणून प्रसिद्ध असलेले हरि-भक्तिपरायण **दासगणूमहाराज** आणि महाराष्ट्रांतल्या मोठमोठ्यांच्या हवेल्या-

पासून गरिबांच्या झोपडीपर्यंत प्रत्येक घरीं 'भक्तिमार्गाचा प्रदीप' प्रज्वलित करणारे "मुमुक्षु" संपादक हरिभक्तिपरायण श्रीलक्ष्मणमहाराज पांगारकर या उभयतांचें आगमन व त्यांचा समागम, ही होय. या उभयतांच्या मुखानें आपणांस धर्मोपदेश ऐकावयास मिळणार असें वाटून सर्व श्रोतृवर्गाचीं मनें आनंदानें अत्यंत उत्सुक झालीं. त्यांतल्यात्यांत श्रीपांगारकरमहाराजांचा व इंदूरचा अधिक जवळचा व जिव्हाळ्याचा संबंध भगवदिच्छेनें जुळून आलेला असून अलीकडे कित्येक वर्षांत त्यांचें लोकांस दर्शनही घडलें नव्हतें तो योगही श्रीमंत महाराजसाहेबांच्या कृपेनें त्यांनीं मुद्दाम मनुष्य पाठवून त्यांस त्याच दिवशीं येथें बोलावून आणल्यामुळें आला. यामुळें सर्व श्रद्धावान् लोकांस तर विशेषच आनंद वाटला. देवीचरित्रावर स्वतंत्र कीर्तन होणार असल्यामुळें अहल्यादेवीचें चरित्र व्याख्यानद्वारा कथन करावयाचें नाहीं असा पक्का निश्चय झाला व तो श्रीमंतांस श्रुत सुद्धां करण्यांत आला, पण ऐनवेळीं श्रीपांगारकरमहाराजांचें शुभागमन होऊन देवी श्रीअहल्याबाईच्या अनर्घ्यगुणपरिपूर्ण सच्चरित्राचें निरूपण व्याख्यानद्वारा होण्याचा सुयोग जुळून आला.

६ ठरीववेळीं श्रीमंत महाराजसाहेबांसह सर्व खाशांच्या स्वाऱ्या टाऊन हॉलांत येतांच बँडची सलामी झाली आणि जमलेल्या सर्व लोकांनीं खडी ताजीम देऊन लवून त्यांस प्रेमपूर्वक मुजरे केले. त्यांचा स्वीकार करीत स्वाऱ्या देवीच्या तसबिरीस प्रणाम करून आपआपल्या गादीवर विराजमान झाल्यानंतर शाळांतील मुलींनीं मधुरस्वरानें स्वागतगीत गाऊन देवी श्रीअहल्याबाईची स्तुति केली. नंतर उत्सवमंडळाचे अध्यक्ष सर हुकुमचंद यांनीं आपलें छापील भाषण दणदणित रीतीनें वाचून दाखविलें. संपत्ति अपार, राजा व प्रजा दोघांकडूनहीं सन्मानीत यामुळें अंगीं आलेला निर्भयपणा हा गुण सरसाहेबांच्या अंगीं सहज आहे असें भाषण वाचतांना कोणासही वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. सरसाहेबांचें भाषण सुंदर विचारांनीं भरलेलें असून त्याला त्यांच्या स्पष्ट उच्चारामुळें अधिक भारदस्तपणा आला होता. नंतर सुप्रसिद्ध विद्वान् सरदार माधवराव किबे यांनीं अल्पविस्तर व बव्हर्थक भाषण करून देवासच्या छोटया पातीचे कारभारी रा. बाळकृष्ण नारायण भाजेकर यांनीं श्रीअहल्यादेवीच्या उत्सवाचें क्षेत्र कसें वाढविलें व त्यांच्या प्रयत्नानें बाहेर प्रदेशांतून शेंपन्नास हार देवीच्या तसबिरीस घालण्यासाठीं कसे आले याची हकीकत सांगून योग्य शब्दांनीं रा. भाजेकरांचा गौरव केला. यावेळीं रा. भाजेकरांनीं बाहेरून आलेले हार श्रीअहल्याबाईच्या तसबिरीस वाहिले. श्रीमंतांनीं श्रीमंत बाजीराव पेशवे यांचा उत्सवही दरसाल अशाच थाटानें होत जाईल असें सांगितल्याचें ऐकतों. श्रीमंत पेशवेसरकारशीं असलेल्या आपल्या प्राचीन स्वामिसेवक संबं-

घाची जागृति श्रीमंतमहाराज साहेबांना कशी व किती आहे व आज मितीसही स्वामिनिष्ठेनें त्यांचें अंतःकरण कसें ओथंबलेलें आहे हें यावरून दिसून येतें.

७ यानंतर ह. भ. प. पांगारकर महाराजाचें प्रभावशाली व्याख्यान झालें. ते म्हणालेः—" श्रीदेवी अहल्याबाई यांचा उत्सव आपण येथें सुरू केल्यास ८।९ वर्षें झालीं. पहिल्या वर्षाच्या उत्सवांत याच टाऊन हॉलांत माझें व्याख्यान झालें होतें. त्या वेळीं अहल्याबाईंच्या राजकार्यधुरंधरत्वाच्या, धर्मशीलतेच्या व औदार्याच्या अनेक गोष्टी इतिहासाधारें मीं आपणांस ऐकविल्या होत्या. देवींचें चरित्र सर्वांस माहीत आहेच, तें नव्यानें सांगायला नको आहे. हें इंदोरचें राज्य, हिंदुस्थानांतलीं तीर्थक्षेत्रें देवीचें दिव्य चरित्र आज गाऊन राहिलीं आहेत. हरिद्वारापासून रामेश्वरपर्यंतचीं तीर्थक्षेत्रें, धर्मशाळा व हजारों कुटुंबें देवीचें गुणगान करीत आहेत. त्या आपल्या दिव्य गुणांनीं अजरामर होऊन राहिल्या आहेत. अफाट संपत्ती व अनियंत्रित सत्ता तारुण्यांत हातीं आलीं असून देवीनें आपल्या प्रखरतर वैराग्यानें सर्व मोह दूर सारून केवळ परोपकारार्थ ३० वर्षें राज्य चालवून, सर्वांवर दरारा बसवून, व पुन्हां सर्वांचें चित्त प्रेमानें वेधून घेऊन, पुन्हां सर्वकाळ हरिभजनांत घालविला त्या अहल्यादेवीच्या तुलनेला या देशांतील किंवा परदेशांतील कोणती स्त्री अगर पुरुष येणार आहे ? बाईंचे समकालीन कविवर्य मोरोपंत, अनंतफंदी, प्रभाकर किंवा मालकमसारखे परदेशीय पुरुष यांनीं मुक्तकंठानें देवीचें स्तोत्र गाइलें आहे. उपनिषदांत स्थूलापेक्षां मन श्रेष्ठ, मनापेक्षां बुद्धि श्रेष्ठ, बुद्धीपेक्षां पुरुष श्रेष्ठ आहे असें म्हटलें आहे. स्थूलापासून परपुरुषापर्यंत सर्वांचें एकत्व ओळखून पुन्हा त्या त्या भूमिकेवरचीं प्राप्त कर्में निष्काम बुद्धीनें करणारा पुरुषच वंदनीय होय. पहिलें हरिभजन, दुसरें राजकारण, तिसरें सर्वविषयीं सावधपण असें कर्म त्रिविध आहे. या समर्थांच्या उपदेशाप्रमाणें पाहतां मराठ्यांच्या इतिहासांत शिवाजी महाराज व अहल्याबाई या दोन व्यक्ति इतर सर्व व्यक्तींहून श्रेष्ठ वाटतात. त्यांच्या चारित्र्यांत कांहीं अलौकिकपण आहे. बाईंचे मोहपाश देवानें ऐन तारुण्यांत तोडले असून ' सक्त इव ' सक्ताप्रमाणें अनासक्तपणें त्यांनीं आपलें कर्तव्यकर्म चोख बजावलें. भूतदया, स्वधर्माचार, नीतिनिपुणता, लोकवेधित्व इ. गुणांची ओळख आपणाला अशा विभूतींच्या चारित्र्यावरून होते. त्यांचा उत्सव, त्यांचें गुणानुवाद, त्यांचे पुण्यपावन चरित्र आपण आपल्या कल्याणार्थच गायचें आहे. गंगानदीप्रमाणें अहल्योत्सवाचा आरंभ-उगम आपल्यापासूनच आठ वर्षांपूर्वी झाला. आतां बंडोपंत भाजेकरांनीं या कल्पनेचा फैलाव अधिक करून पन्नास गांवच्या हारांचा लोंढा त्यांत मिळवून दिला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. देवीचा उत्सव सर्व हिंदुस्थानभर सार्वत्रिक होईल अशी मला उमेद

आहे. त्यांच्या पुण्यपावन स्मरणानें सर्व विघ्नें, संकटें, अडचणी अभाळासारख्या दूर होतील यांत संशय नाहीं. " हें सर्व व्याख्यान सर्व श्रोतृवृंद चित्रासारखा तटस्थ होऊन ऐकत होता व शेवटीं टाळ्यांच्या प्रचंड गजरांत पांगारकरांचें व्याख्यान संपलें. नंतर दासगणूंचें प्रेमळ कीर्तन झालें. पुढें मिरवणुकीचा समारंभ झाला. देवीची हारयुक्त तसबीर पालखींत ठेवली होती. संपूर्ण सरकारी लवाजमा, भजनी मेळे, दांडपट्टेवाले, वगैरे लोकांचा खूप मोठा समाज पालखीपुढें चालला होता. पालखीच्या मागील भागीं प्राइम मिनिस्टर प्रभृति सरकारी अधिकारी, सरदार, मानकरी, शेटसावकार, वकील, डॉक्टर, व्यापारी व पाहुणे लोक चालले होते. मिरवणुकीची लांबी जवळ जवळ पाऊण मैल होती. देवी श्रीअहल्याबाईच्या बोधपूर्ण शब्दांची निशाणें मिरवणुकींत सर्वांपुढें होतीं. मिरवणूक टाऊन हॉलमधून निघाली ती शहरांतील मुख्य मुख्य रस्त्यांवरून मिरवित मिरवित गोपाळमंदिरांत आली. गुलालबुका उधळीत चाललेल्या मिरवणुकीचा तो देखावा मोठा अपूर्व दिसत होता. श्रीअहल्याबाईंच्या नामोच्चारानें चोंहीकडचें वातावरण शुद्ध होऊन गेलें. रस्त्यांवरील दुतर्फा घरांच्या माड्याखिडक्यांतून देखील प्रेक्षकांची गर्दी होती. पालखीस सर्व लोक मोठ्या भक्तीनें हात जोडून नमस्कार करीत. हा प्रेममय देखावा पाहून देवी श्रीअहिल्याबाईंच्या थोरवीची जाणीव आबालवृद्धांना होई व धन्य अहल्यादेवी, धन्य! धन्य!! धन्य!!! असे सर्वांच्याच तोंडून उद्गार निघत.

८ एकंदरीनें श्रीअहल्योत्सवाचा हा समारंभ थाटदार व प्रोत्साहक असा झाला यांत शंका नाहीं.

९ येथें माधवनाथ महाराज आले असून त्यांचा मुक्काम सरदार किबेसाहेबांकडे आहे. दासगणू महाराजांचीं कीर्तनें चालू आहेत. पांगारकर महाराजांची स्पेशल व्यवस्था गेस्ट हाऊसच्या एका स्वतंत्र बंगल्यांत केली असून त्यांना महाराजसाहेब लवकर सोडणार नाहींत असें म्हणतात. श्रीगणेशोत्सवांत त्यांचीं राजवाड्यांत व बाहेरच्या सार्वजनिक समारंभांत मिळून पांच चार प्रवचनें झालीं. त्यांच्या ज्ञानाचा व भक्तीचा लाभ राजा व प्रजा यांस सारखाच होऊन इंदोर रियासतीचे सर्व लोकांस त्यांचें चिरस्मरण राहणार आहे.

---

# मातृगया व द्वारका
# यात्रा प्रवासवर्णन.

लेखकः—कृ० गो० पुराणिक, पेन्शनर मास्तर, बेलापूर.

१ श्रीक्षेत्र पुणतांबें येथून निघून प्रथम केडगांवास उतरून, सत्पुरुष श्रीनारायणमहाराज यांचें दर्शन केलें; व पुढें श्रीसाधु तुकाराममहाराज यांचे फाल्गुन वद्य २ चे प्रयाणयात्रेचे सुमारास श्रीक्षेत्र देहू येथें पोंचलों. तेथील

## देहू.

उत्साह पाहण्यास ८ दिवस मुक्काम केला. रोज अन्नसंतर्पण सुरू होतें. नेहमीं भजनाचा गजघाट चालून सकाळसंध्याकाळ देऊळाचे नजीक व डोहावर रोज कीर्तनें चालू होतीं. दुपारीं श्रीज्ञानेश्वरी व भागवताचीं पुराणें, वाचण्याचा कित्येकांचा परिपाठ असतो. एकंदरींत ही पुण्यभूमी ८–१० दिवस नामघोषानें रात्रंदिवस दुमदुमून जाते. व स्थानमाहात्म्य सर्वांचे मनास रममाण करून सोडितें; यात्रा सुमारें ४०–५० हजार असते. प्रयाणाचा दिवस फाल्गुन वद्य २. दुपारीं बारा वाजतां दिंडया, कीर्तनें, पालखी वगैरे सोहळा प्रेक्षणीय असतो. पुढें बरीच यात्रा कमी होऊन, फाल्गुन वद्य ८ स दिवसा रथाची मिरवणूक व रात्रौ दिंडयांची मिरवणूक पाहण्यासारखी असते. दिंडया आजुबाजूच्या आळंदी, पुणें, देहू वगैरे ठिकाणच्या पांचसहा असतात; सर्व दिंडया एकत्र होऊन आळीपाळीनें ठिकठिकाणीं उभे राहून पेटी, सुंदरी वगैरे वाद्यांचे घोषांत भजनाचा प्रेमरस चाखून तल्लीन होतात. मधून मधून गारुड होऊन सारी रात्र पार पडून सकाळीं ८ ते १० वाजतां प्रत्येक दिंडीची मंदिरांत हजिरी होऊन आरती, तीर्थप्रसाद सर्वांस मिळून उत्साह समाप्त होतो व देवब्राह्मण करून यात्रा रवाना होते. यात्रेस कर एक आणा द्यावा लागतो; येथें यात्रेच्या वेळीं नामस्मरणानें जागा पवित्र होऊन प्राणी आनंदसागरांत बुडून जातात. एरवीं येथें आलें असतां उदास व भयाण वाटतें. नंतर महाराजांचीं भंडाराडोंगर, भामनाथ वगैरे तपश्चर्येचीं स्थळें पाहून शेलारवाडी स्टेशनावर दुपारीं ५ वाजतां दाखल झालों. खऱ्या प्रवासास सुरुवात करण्याची वेळ, आणि प्रकृतींत एकाएकीं बिघाड झाला, पण धैर्य धरून " निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेंचि फळ " या तुकारामांच्या उक्ती-

प्रमाणें गाडींत बसून मुंबईकडे रवाना झालों. बडोदें लाइनीचे गाडींत बसून वांद्रें, वसईची खाडी, पालघर, सुरत, भडोच वगैरे स्टेशनांवरून बडोदें स्टेशनावर दुपारीं चार वाजतां उतरलों.

## बडोदा.

शहरांत सूरसागर तलावाजवळ उतरून नजीक सिद्धनाथावर गणपतिमंदिरांत बिऱ्हाड लाविलें. बडोदे शहरीं २०-२५ वर्षांपूर्वीं आलों होतों. श्रीगणपतीचें दर्शन करून सत्पुरुष श्रीगणपतिमहाराजांचे भेटीचा लाभ घेऊन स्नान व भोजन आटोपून रात्रौ यथेच्छ विश्रांती घेतली. तेथें दोन दिवस राहून शहरसुधारणा पाहिली; फक्त विजेची ट्राम व नवीन मार्केट एवढाच विशेष शहररचनेंत दिसला. पूर्वींच्या व आतांच्या परिस्थितींत मात्र महदंतर दिसलें. त्यावेळीं एकंदर संस्थानची व्यवस्था वेदशाळा, गायनशाळा, प्रत्येक देवस्थानाची भरभराट, विद्वान् व गुणवानांची परीक्षा व त्यांस देणग्या, धर्मसंस्था, खिचडी, दक्षिणा, गोप्रदानें, शास्त्री, वैदिक, पुराणिक, वगैरेंची योग्य संभावना, व दक्षणेचा रमणा वगैरे दानधर्म ह्या गोष्टी बंद होऊन, त्याऐवजीं शिक्षण व उद्योगधंदे यांस जास्त उत्तेजन मिळालें आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें. श्रीखंडेरावमहाराज गायकवाड यांच्या आश्रयाखालचीं सर्व देवस्थानें वृद्धावस्थेस आलीं होतीं; फक्त इंदुमती महालांत रोज दोन गोदानें प्रत्येकीं रुपये ५ प्रमाणें व दर गुरुवारीं अनाथ, अंध, पंगु व शाळेंतील गरीब विद्यार्थ्यांस साह्य देण्याचा क्रम पंचांच्या मतें चालून धर्मकृत्य सुरू होतें. पूर्वींच्या वेळची स्नानसंध्या, आचारविचार, शास्त्रीय विषयांवर चर्चा करण्याच्या सभा, व एकंदरींत धार्मिक कृत्यांवरील श्रद्धा लोपल्याप्रमाणें दिसत होती.

## डाकूर.

बडोद्यानजीक डाकूर येथें श्रीरणछोडजीचें देवस्थान आहे. तें पूर्वींच पाहिलें होतें; तेथें दर महिन्यास पंढरपूरचे वारीप्रमाणें गुजराथी लोकांची मोठी यात्रा भरते. गोमती कुंडाचें स्नान व श्रीरणछोडरायाचें दर्शन फार प्रेमानें घेतात. तेथें जाण्यास आनंद स्टेशनापासून वेगळा रेल्वेचा फाटा आहे. सबब बडोद्याहून निघून मारवाड रेल्वेनें रात्रीं चारवाजतां सिद्धपूर स्टेशनावर उतरून नव्याच उपाध्यायाबरोबर शहरांत जाऊन त्याचे घरीं

## सिद्धपूर

बिऱ्हाड लाविलें. दुसरे दिवशीं सरस्वती नदीचे कांठीं क्षौर, स्नान वगैरे विधी आटोपून तीर्थउपवास केला. श्रीकाशीयात्रेच्या वेळीं पितरांचा उद्धार

होण्यासाठीं गयाक्षेत्रीं जाऊन गयावर्जन करावें लागतें त्याप्रमाणें येथें मातेचा उद्धार होण्यासाठीं श्राद्धपिंडदान वगैरे सर्व विधी करावा लागतो, म्हणून या क्षेत्रास सिद्धपूर उर्फ मातृगया म्हणतात. येथून सुमारें दोन मैलांवर कर्दमऋषींचा आश्रम आहे त्याबद्दल श्रीमद्भागवतांत कथा आहे. कर्दमऋषींनीं पत्नीसह येथें तपश्चर्या करून श्रीविष्णूस प्रसन्न करून पुत्ररूपानें अवतार घेण्याचें वरप्रदान मिळविलें; पुढें देवहूतीस गर्भसंभव होऊन कपिल महामुनींचा अवतार प्रगट झाला. नंतर कर्दम ऋषी महा पंथास निघून गेले, व कपिल महामुनींनीं मातुश्रीस उपदेश करून परमात्म-स्वरूपाची प्राप्ती करून दिली. नंतर योगसामर्थ्यानें मातुश्रीनीं देहविसर्जन केल्यावर पुत्रवात्सल्यानें कपिलमहामुनींनीं त्यांची उत्तरक्रिया यथासांग करून ते मातृऋणांतून मुक्त झाले, व आपणही तपश्चर्येस निघून गेले; व तेंव्हांपासून मातेचें गयावर्जन येथें होऊं लागलें. मी त्या कर्दमऋषींच्या आश्रमास जाऊन ज्ञानवापी, अल्पा, व बिंदु या तीर्थांचीं स्नानें करून विधियुक्त श्राद्ध व पिंड-दान केलें; नंतर तेथें कर्दमऋषी, देवहूती, कपिलमहामुनी, कृष्णगरुडेश्वर, सूर्यनारायण या देवतांचीं दर्शनें घेऊन शहरांतील श्रीसरस्वती देवी, केदारेश्वर, गोविंदजी, माधवजी वगैरे प्रसिद्ध देवतांचीं दर्शनें घेतलीं. हीं शहरांतील मंदिरें अफाट व प्रेक्षणीय असून पूजा वगैरेंची व्यवस्था फारच उत्तम होती; येथें गोविंदजी व माधवजी या देवतांचें विशेष महत्त्व व पूज्यभाव दिसत होता. येथील लोकही फार भाविक दिसले; हें क्षेत्र गायकवाड सरकारच्या ताब्यांत आहे. येथें बेसनाचें पक्वान्न फार नामांकित व पुष्कळ तयार होतें, व त्याचा प्रसादास फार खप होतो; सरस्वती नदी मोठी असून प्रवाह मात्र लहान ओढ्याप्रमाणें आहे. नदीचे दोन्ही बाजूंस वाळवंटांत धान्याचीं पिकें होतात. नदीचे प्रवाहांत सर्प ७ असून विषारी नाहींत. लहान मुलें हातांत घेऊन खेळतात ! त्यांस कोणी भीत नाहीं. एखादा सर्प एखादे वेळीं धुण्यांत गुंडाळून येता, पण त्यास कोणी मारीत नाहींत; यात्रेकऱ्यांस मात्र भय वाटतें. अशा तऱ्हेनें मातृगयेची यात्रा यथाशक्ती परिपूर्ण झाली

## श्री सोरटी सोमनाथ.

चैत्र शुद्ध १ स सिद्धपुराहून स्नान व फराळ करून सकाळीं ९ वाजतां स्टेशनावर जाऊन १ तासानें काठेवाड प्रांतांत द्वारकेस जाण्यास गाडींत बसून १ तासानें मेसाणा जंक्सनवर उतरून पुन्हां दुसरे रेल्वेंत बसलों; पुन्हां संध्याकाळीं ७ वाजतां विरमगांव जंक्सनवर उतरून थेट वेरावळ बंदरावर उतरणाऱ्या गाडींत बसलों. विरमगांव जंक्शनवर अंमली व विशेष महत्त्वाच्या पदार्थांची तपासणी होते, व तेथून काठेवाडांतील प्रत्येक संस्थानाचे हद्दींत

वेगवेगळे कामगार व कंदील बदलतात. त्या गाडीनें राजकोट, जुनागडवरून दुसरे दिवशीं रात्रीं १० वाजतां गाडींतून उतरून ट्रामवेनें वेरावळनजीक प्रभासपट्टण येथें एका वेदशाळेवरील शास्त्रीमहाराजांचे घरीं बिऱ्हाड ठेविलें. हे बडोद्याचे राहणारे होते, यांची गाडींत ओळख झाली. हा प्रवास एक-सारखा रेल्वेनें ३५ तास फार कंटाळवाणा झाला; पूर्व दिवसाच्या जागरणानें व वाटेनें स्नान न झाल्यानें रात्रीं स्नान व जेवण करून विश्रांती घेतली. प्रभासपट्टण येथें सोरटीसोमनाथाचें प्रसिद्ध ज्योतिर्लिंगाचें देवस्थान आहे. या देवस्थानाची बादशाही राज्याचे वेळीं मंदिर व मूर्ति छिन्नभिन्न करून बरीच नासाडी झाली, ती इतिहासप्रसिद्ध आहे; त्या वेळचा मंदिराचा छिन्नभिन्न भाग अवशेष अद्याप पाहण्याकरितां राखिला आहे, तो अगदीं समुद्रकांठीं कोटासह असून नवीन अफाट मंदिर ईशप्रेरणेनें अहल्याबाई होळकरीण यांनीं मोठ्या पूज्य भावानें व व्यवस्थित बांधून त्यासंबंधानें पूजा वगैरे व्यवस्था कायम करून ठेविली आहे. श्रीसोमनाथाची स्थापना भुयारांत केली आहे. येथें गुजराथी लोकांची यात्रा चालू असते. व श्रीत्र्यंबकेश्वर क्षेत्राप्रमाणें संकट व भूतपीडा निवारणार्थ आणि मनेप्सित कामनासिध्यर्थ नारायणबळी शास्त्रोक्त रीतीनें करितात. येथ त्रिवेणीसंगम व समुद्र आहे. वेरावळ बंदर हें मुंबईहून द्वारकेच्या रस्त्यावरील आगबोटीचें प्रसिद्ध स्टेशन आहे, व काठेवाडचें दक्षिण टोंक आहे; येथून श्रीद्वारका बारा तासांचे रस्त्यावर आहे. बोटींत बसण्यास एक कोस मचव्यांत बसून पुढें शिडीनें वर चढावें लागतें. नवीन प्रवाशास भीतिदायक आहे. इकडे सर्वत्र भाषा गुजराथी असून आपणांस साधारण गोषवारा समजण्यांत येतो. दिवसेंदिवस मराठी भाषेचा प्रसार जास्त होत आहे. दुसरे दिवशीं सकाळीं त्रिवेणीसंगम व समुद्रस्नान करून श्रीसोम-नाथाचें दर्शन व अभिषेक पूजा करून यथाशक्ती देवब्राह्मण केला. येथें अहम-दाबादेची यात्रेकरू मंडळी भेटली, ते खटल्यासह तेथील यात्रा संपल्यावर पाय-रस्त्यानें श्रीद्वारका यात्रेस जाणार होते, कारण त्या वेळीं महायुद्धामुळें आग-बोटींचा प्रवास धोक्याचा होता, व त्यामुळें मीही त्यांचे सोबतीनें बैलगाडीनें जाण्याचा विचार आणून त्यांस विचारिलें तर त्यांनीं येथून परत जुना-गडास गेल्यावर नक्की बेत ठरवून मग तुम्हांस कळवूं असें सांगित-ल्यावर पुन्हां त्रिवेणी व समुद्रस्नान करून श्रीसोमनाथाचे पुजारी दाक्षिणी ब्राह्मण असल्यामुळें त्यांचे निमंत्रणावरून दुपारीं त्यांचे घरीं भोजन करून रात्रीचे गाडीनें जुनागडास जाण्यास रवाना झालों; काठेवाडांत वेगवेगळीं पुष्कळ संस्थानें असल्यामुळें त्यांच्या राजधान्या व बागबगीचे, ट्रामवे, उंटांचे समुदाय वगैरे शोभा पाहण्यासारखी होती व लोक सुखी भासले.

# गिरनार.

१. जुनागड येथें केशवराव केसकर रेल्वेकडील स्टोअरकीपर यांचे घरीं मुक्काम केला. ते पुण्याकडील राहणारे होते. काठेवाडांत दक्षिणी ब्राह्मण नौकर फार कमी आहेत, व त्यामुळें नगर, पुण्याकडील यात्रेकरू भेटले असतां त्यांचा फार प्रेमपूर्वक आदरसत्कार करून उत्तम व्यवस्था राखितात. मीं तेथें तीन दिवस मुक्काम केला. तेथें संस्थानच्या कालेजावर माधव मल्हार जोशी प्रोफेसर होते; त्यांची ओळख झाली; ते मोठे पगारावर असून पूर्वी नगर हायस्कूलमध्यें हेड मास्तर होते. जुनागड हे मुसलमानी संस्थान आहे. तेथून गिरनार पर्वत तीन कोस असून तेथें श्रीदत्ताचें प्रसिद्ध स्थान आहे; जुनागड हें रमणीय शहर असून मशीदी व कबरस्थानें फार प्रेक्षणीय आहेत. तेथें प्रसिद्ध साधु नरसी मेहता यांचें मंदिर आहे. दुसरे दिवशीं दुपारीं जेवण करून टांग्यानें गिरनारचे पायथ्याशीं पोंचलों व तटाच्या दरवाज्यानें चिरेबंदी सुरेख पायऱ्या चढावयास लागलों प्रथम नवा दम आणि पर्वताचा रमणीय देखावा मोठ्या उल्हासानें पहात पहात व पायऱ्या मोजीत तीन हजार पायऱ्या चढून थकल्यामुळें विश्रांती घेतली व थोडया वेळानें पुन्हा चढूं लागलों. वाटेंत पाणपोया व एकादे घराची व देवस्थानची वस्ती ठिकठिकाणीं भेटली. अशा तऱ्हेनें हजार-दीड हजार पायऱ्या पुन्हां चढून गिरनारचें पहिलें नेमीनाथ टोंक गांठलें. तेथें जैन लोकांचें अफाट मंदिर, धर्मशाळा, तीर्थ टाकीं व फराळाचीं दुकानें आढळलीं; बराच वेळ तेथें थांबून चौकशी केली. श्रीकाशीयात्रेप्रमाणें श्रावक पंथाचे यात्रेकरू नेहमीं येथें येऊन तीर्थविधी करून देवास केशराचे भोग चढवून दानधर्म करितात; या देवस्थानास सत्रंज्या म्हणतात. हिंदु लोक या देवाचें दर्शन घेत नाहींत; पुन्हां पायऱ्या चढण्यास सुरवात केली व सुमारें हजार पायऱ्या चढल्यावर दुसऱ्या गोमुखी टोंकावर पोंचलों. तेथें एक सुंदर चिरेबंदी टाकें बांधलें असून त्यांत गायमुखांतून स्वच्छ पाणी पडत आहे व यात्रेकरूंकरितां एक पाण्याची तोटी आहे. जवळच एक लहान टुमदार श्रीशंकराचें उंच शिखराचें मंदिर बांधलें आहे. पलीकडे पांच चार घरांची वस्ती व धर्मशाळा आहे. देवाचें दर्शन करून अस्तमान झाल्यामुळें मुक्काम केला, व फराळपाणी करून धर्मशाळेंत यथेच्छ विश्रांति घेतली. धर्मशाळेंत अंथरुणाची सोय होती. सकाळीं उठून सर्व विधि आटोपून आजुबाजू सभोंवतालीं असलेल्या तपस्वी लोकांच्या गुहा व देवस्थानें पाहिली तपस्वी तेजःपुंज व आनंदसागरांत निमग्न असून देवस्थानची पूजा वगैरे व्यवस्था अप्रतिम पाहून मनास फार समाधान वाटलें. व तपश्चर्येस एकांतवासाचें योग्य स्थळ भासलें. अशा ठिकाणीं उंच पहाडांत योगिजनांची व भगवद्भक्तांची योग्य

सोय होऊन परामर्ष उत्तम तऱ्हेनें चालत आहे हें पाहून ईश्वरीलीलेचें कौतुक करून एका मंदिरांत तीर्थ प्रसाद (खडीसाखर, बेदाणा बदाम बीज) घेतला, व सुमारें आठ वाजतां पुन्हा पायऱ्या चढण्यास आरंभ केला. डोंगरांत भुयाराकडे व देवस्थानाकडे जाण्यास लहान लहान फरसबंदी रस्ते बांधिले आहेत; पायऱ्या मोजण्याचें बंद करून पुढील कार्यक्रम जलद उरकण्यास झपाटयानें चढन तिसरें श्रीअंबाजीचें टोंक थोडया वेळांत गांठून श्रीजगदंबेचें दर्शन घेतलें. येथेंहि पांचचार घरांची वस्ती होती. येथून पुढें भयंकर डोंगरांच्या कांहीं पायऱ्या उतरुन पुन्हां वर चढून चौथे गोरखनाथाचें टोंकावर पोंचलों. या दुसरे दिवसाचे प्रवासास दहा पंधरा यात्रेकरू मंडळी बरोबर होती, यामुळें हुरूप येऊन रस्ता क्रमग होऊन प्रवास सुखमय झाला. पुढें श्रीगोरक्षाचें दर्शन घेऊन सर्व मंडळीसह पुढें चालू लागलों; पुढच्या कांहीं पायऱ्या उतरून पुन्हां चढावयास लागलों व अखेर सुमारें पन्नास पाऊणशें पायऱ्या फार लहान व उरावर असून दोन्ही बाजूंनीं कड तुटलेल्या भयंकर देखाव्याच्या हात टेकून फारच जपून चढून पांचवें श्रीदत्ताचे टोंकावर पोहोंचलों; या पांच टोंकापर्यंत एकंदर सुमारें दहा हजार पायऱ्या घडीव चिरेबंदी होत्या. एवढ अफाट खर्चाचें व धाडसाचें काम परमेश्वर प्रेरणेशिवाय व कृपेशिवाय पार पडणें शक्य नाहीं, व ही त्याची अगाध लीला पाहून मन थक्क होऊन गेलें, व अशीं स्थलें पाहण्यासुद्धां आम्ही पामर द्रव्यहीन व शक्तिहीन आहों, याबद्दल खेद वाटला. कांहीं श्रीमान् लौक पैसे खर्च करून डोल्या करून वर जातात. गिरनार व गिरीबालाजी हे चढाव श्रीबदरीनारायणाचे चढावाशीं एक रुपयांत ५ आणाप्रमाण नमुन्यादाखल आहेत. श्रीदत्ताचे पादुकांवर लहान चक्रीचें चुनेगची आच्छादन असून जवळ एक लहान पाण्याचें टाकें आहे, व सुमारें पंचवीस माणसें बसण्यापुरता चिरेबंदी कठडासह चुनेगची चौथरा आहे. आम्ही सर्वांनीं बरोबर नेलेल्या पूजासाहित्यानें श्रीदत्ताच्या पादुकाची पूजा करून सुमारें नऊ वाजतां परतलों. आतां बहुतेक उताराच्या पायऱ्या असल्यामुळें विशेष श्रम न पडतां खूप सपाटयानें चालून दोन तासांत ११ वाजतां पायथ्याशीं आलों, व वेशीवर एक आणा कर देऊन एका विहीरीवर फराळ पाणी करून एका झाडाच्या छायेस दोन तास विश्रांती घेतली. गिरनारावर श्रीदत्ताचें पुढें सहावें कालिका नामें टोंक आहे तेथें हिंसक प्राणी फार व चढण्यास बिकट पाऊल वाट आहे; सबब कोणी यात्रेकरू जाण्याचें धैर्य धरीत नाहीं; व त्यामुळें आम्हीही गेलों नाहीं. गिरनारवरून पर्वताचा व जुनागड शहरचा देखावा फार अप्रतीम दिसत होता. पायथ्याशीं कांहीं देवस्थानें व धर्मशाळा आणि शेंपन्नास घरांची

वस्ती होती. दोनतीन वाजतां टांग्यानें शहरांत दाखल होऊन शहररचना, देवस्थानें, कबरस्थानें वगैरे पहाण्यासारखीं स्थळें पाहिलीं; त्याच रात्रीं आम्हास भेटलेले अमदाबाद येथील श्रीसोमनाथचे यात्रेकरू तेथें दाखल झाले.

## सुदामपुरी.

४ ते गिरनार पाहून आल्यावर त्यांचे आमचे विचारें सुदामपुरी उर्फ पोरबंदरपर्यंत रेल्वेनें व पुढें तीस कोस बैलगाडीनें श्रीद्वारका यात्रेस जाण्याचा बेत नक्की ठरला. शहरांत हिंडत असतां खर्चीवर बसून कीर्तन करीत असलेल्या हरिदासाचें गुजराथी भाषेंतील कीर्तन ऐकलें. नंतर ठरल्याप्रमाणें सर्व मंडळी दुसरें दिवशीं भोजनोत्तर निघून रेलवेनें जवळच जे तळसर जंक्सनवर उतरून रात्रीं तेथें मुक्काम करून सकाळीं पोरबंदरचे गाडींत बसून दुपारीं बारा वाजतां पोरबंदरवर उतरून स्वयंपाक, भोजन वगैरे आटोपलें. नंतर थोडी विश्रांती घेऊन चार पांच वाजतां शहर रचना, बाजार, प्रसिद्ध देवस्थानें, भक्त सुदामजींचें मंदिर, समुद्रकांठीं असलेलें उंच दीपगृह, तसेंच मोठमोठीं तारवें बांधण्याचे कारखाने पाहिलें. कारखान्यांत हजारों माणसें खपत असून नवीं तारवें तयार होतात. शहर रमणीय असून व्यापाराचें मोठें बंदर आहे. हें संस्थान असून नजीक तांबडया कापीव मोठाल्या इमारतीदगडांच्या खाणी आहेत; त्या खाणींकडे रेल्वेचा वेगळा फांटा आहे. दगड काढण्याचे कारखाने असून तेथेंही हजारों लोक कामें करितात. हे दगड करवतानें कापून परप्रांतीं रवाना होतात. येथें दोन भाडयाच्या बैलगाडया करून निघालों, रस्ता सडकेचा होता. याच रस्त्यावर थेट द्वारकेपर्यंत रेल्वेचें काम चालणार असें ऐकिलें. तिकडे निरनिराळे संस्थानिक व त्यांचें आपसांत तंटे यामुळें काम तहकूब होतें. आम्हीं वाटेंत स्वयंपाक व जेवण करून सुमार १० कोसांवर पहिले दिवशीं रात्रीं मुक्कामास उतरलों. तेथें एका संस्थानिकाचा दर माणसीं चार रुपये प्रमाणें कर द्यावा लागला. पुन्हां दुसरे दिवशीं मार्गस्थ होऊन रात्रीं १०–११ कोसांवर मुक्काम केला. तिकडील धर्मशाळा व्यवस्थित असून, अंथरूण पांघरुणांची उतारूंची सोय होती. व रखवालदार यात्रेकरूंचा आदर करून व नम्रपणानें वागून सरपण दूध वगैरे सामानाची व्यवस्था करितात. तिसरे दिवशीं सकाळीं निघून वाटेंत स्वयंपाक न करितां सुमार २–३ वाजतां थेट मूळ द्वारकेस पोंचलों, व श्रीभद्रकाळीचे मंदिरानजीक अफाट धर्मशाळेंत उतरून जेवण वगैरे विधी आटोपला.

## श्रीमूळ द्वारका.

५ अस्तमानाचे सुमारास दिवे लावल्यावर श्रीद्वारकाधीशाचे मंदिरांत अगदीं शांतपणानें श्रीभगवंताचें दर्शन घेतलें. येथें त्यावेळीं यात्रेकरूंची फारशी गर्दी नव्हती. धूळीदर्शन झाल्याबरोबर आनंदभरांत इतका गुंग झालों कीं, क्षणभर देहभान विसरलों आणि सावध झाल्यावर वाटलें कीं, मजसारख्या क्षुद्र माणसाला दर्शन घडण्यास व जन्मासफल होण्यास परमात्म्याची फार मोठी कृपा मिळाली असें वाटून मंदिरांतून उठूं नये, अशी वृत्ति बनली. इतका रमणीय देखावा, बत्त्यांचा दिव्य प्रकाश, व्यवस्थित वस्त्रेंभूषणें, व टापटीप पाहून व श्रीकृष्णरूप पाहून मन तन्मय झालें. नंतर सभोंवतीं बलराम, प्रद्युम्न, देवकीमाता, वसुदेव, रुक्मिणी राधा वगैरे पट्टराण्यांचीं दर्शनें शांतपणे घेऊन रात्रीं बिन्हाडीं सर्वांनीं विश्रांति घेतली; दुसरें दिवशीं सकाळीं गोमतीकुंडांत प्रत्येकानें एक रुपया कर देऊन स्नान केलें. देवस्थान गायकवाडांचें हद्दींत असल्यामुळें करावर त्यांचा हक्क आहे. गोमतीकुंड समुद्राच्या भागाचें व चिरेबंदी पायऱ्यांचें बांधलें असून भरती ओहोटीमुळें पाणी कमजास्त होतें म्हणून यात्रेकरूंस भीती न वाटण्यासारखें सोईचें केलें आहे. नंतर श्रीचे मंदिरांत येऊन आठ आणें प्रत्येकी कर देऊन श्रीप्रभू गोपालकृष्णाचें दर्शन पाद्यपूजा, वंदन यथासांग केलें. पुढें भगवंताचें ऐश्वर्य, शेजमंदिर, सारिपाट खेळण्याची जागा व सामान पाहिलें, व मती गुंग होऊन माझ्या भाग्योदयाचें मीच मनांत वर्णन करूं लागलों; व स्थानमाहात्म्याचें वर्णन आद्य कवींनीं रमणीय व प्रेमानें केलें आहे तें योग्य आहे, व त्यावरून हा पूर्ण अवतार आहे ही साक्ष सर्वांस पटण्यासारखी आहे. ज्या ज्या लीला केल्या, त्यास योग्य द्वारकापुरी अप्रतिम आहे. प्रत्येक देवतेचे पुजारी श्रीमंत व वेगवेगळे असून, प्रत्येक देवाचे गाभाऱ्यांत जाऊन पाद्यपूजा, दर्शन करण्यास दोन आण्यापासून आठ आण्यापर्यंत कमजास्त कर असून त्यावर ज्या त्या पुजाऱ्याचा हक्क असतो. सर्व देवतांना वस्त्रेंभूषणें बहुमोल किंमतीचीं व व्यवस्थितपणें घालून सर्व भोग, नैवेद्य, आरती, पुजाऱ्याचे हातानें नियमितवेळीं होते. व दर्शन सुद्धां नेमलेल्या वेळाशिवाय होत नाहीं; रोज तीन वेळ शास्त्रोक्त गायन होतें. व सुवासिक फुलांचीं मखरें गुंफून देवास लावितात. आरतीचेवेळीं मोठा समुदाय जमून पुजारी दोन हात उंचीचें सुमारें शेपन्नास ज्योतींचें धातूचें सुशोभित झाड घेऊन प्रथम वाद्यघोषांत श्रीद्वारकाधीशाची आरती करितात, व मागाहून सर्व देवतांची याच नमुन्यानें आरती होते. हा देखावा फारच रम्य असतो; या स्थानीं कितीही दुःखी प्राणी असला तरी मंदिरांत आहे तोंपर्यंत सर्व दुःख विसरल्यावांचून राहणार नाहीं, अशी माझे मनाची खात्री आहे. देवास

भोग चालू असतो त्यावेळीं गाभाऱ्यांचीं द्वारें बंद असतात व कोणी श्रीमान यात्रेकरूस यथासांग देवाची पूजा करणें असल्यास ती सुद्धां पुजाऱ्यामार्फत करावी लागते गाभाऱ्याचे बाहेर द्वारापासून सुमारें पांच सहा हातांचे अंतरावरून कितीहीवेळां दर्शन घेतां येते, त्यास कर पडत नाहीं; येथील नैवेद्याची व्यवस्था श्रीशारदापीठाचे अधिकारी श्रीमत् शंकराचार्य यांचे मार्फत होते; श्रीशंकराचार्य हल्लीं येथें न राहतां श्रीक्षेत्र डाकूर येथें राहतात. फक्त सिंहासन गादी द्वारकेस असून कारभाऱ्यामार्फत सर्व देवस्थानाची व्यवस्था होते. कारभाऱ्याचे आफिसास श्रीलक्ष्मीभांडार म्हणतात; यात्रेकरूस नैवेद्य यांचे मार्फत करवावा लागतो,व देवास देणगीदाखल जिन्नस अगर रोख रक्कम लक्ष्मीभांडारांत जमा करावी लागते, व मग यात्रेकरूस प्रसाद मिळतो. तेथें नजीक एक गोरक्षणसंस्था असून तिची व्यवस्था उत्तम होती; श्रीशंकराचार्य येथें आल्यावर सिंहासनावर बसतात. एरवीं रक्षणास पाहरा असतो.हीं द्वारावती सप्तपुऱ्यांपैकीं एक पुरी असल्यामुळें श्रद्धावान् लोक तीर्थविधी, श्राद्ध, पिंडदान वगैरे करितात; कित्येक नुसता देवब्राह्मग करितात. येथें दक्षिणी ब्राह्मणांची वस्ती बरीच असून कोर्ट, कचेऱ्या वगैरे आफिसें व व्यापाराचें मोठें बंदर असल्यामुळें वस्ती बरीच मोठी आहे. बाजारपेठ, दुकानें, दवाखाना वगैरे सर्व सोई आहेत; वैदिक, शास्त्री, पुराणिक, वगैरे असून वेदशाळा, व इंग्रजी मराठी शाळाही आहेत; इकडील लोक सुखी व सात्विक वृत्तीचे असून भाविक आहेत. इकडे उंट पुष्कळ असल्यामुळें शेतीकडे, ओझ्याकडे व घाण्याकडे त्यांचा उपयोग करितात. शहरची रचना साधारण असून समुद्र नजीक असल्यामुळें पिण्याकरितां विहीरी आहेत पण पाणी विशेष गोड नाहीं. द्वारका हें बेटवजा असून आजुबाजूस रेतीचें मैदान आहे. तीन बाजूंस पाणी व एकबाजूस जमीन काठेवाड प्रांत आहे. येथें विशेष महत्त्व श्रीद्वारकानाथाचें आहे. भद्रकालीचें मंदिरही अफाट असून पुष्कळ मोठ्या व व्यवस्थित धर्मशाळा आहेत. देवास कायमच्या देणग्या, अन्नसत्रें, सदावर्तें चालू आहेत, त्याबद्दल सविस्तर माहितीचें व बेट द्वारका येथील देवस्थानांच्या माहितीचें मराठी व गुजराथी भाषेचें पुस्तक यात्रेकरूस फुकट मिळतें. तें अगोदर मिळविल्यास सर्व देवस्थानें पाहण्यास सोपें पडतें. येथील तीर्थविधि वगैरे आटोपून व तीन दिवसांत सर्व यात्रा संपवून १० कोस बेटद्वारकेस जाण्यास भाड्याच्या दोन बैल गाड्या करून आम्ही सर्व निघालों; सुमारें पांच सहा कोसांवर गोपीतलाव क्षेत्रावर १० वाजतां उतरून स्वयंपाक जेवण केलें. तेथें मोठी धर्मशाळा व सदावर्त आहे. जवळच शेंपन्नास घरांचें गांव आहे; गोपीतलाव म्हणून एक मोठा तळ्यासारखा खड्डा

आहे, त्यास पूर्वी पाणी होतें. हल्लीं तो कोरडा असून आंत कांहीं पाण्याच्या आडविहिरी आहेत; याच तलावांत गोपीचंदनाच्या खाणी असून माहितगारांस तें पुष्कळ व फुकट मिळतें. इकडील कृत्रिम गोपीचंदनापेक्षां तें उत्तम असतें. आम्ही परत जातांना त्यांतील कांहीं बरोबर घेतलें. जेवण झाल्यावर एक वाजतां नजीक समुद्रकांठचे धक्क्यावर जाऊन प्रत्येकीं एक आण्याचें तिकिट काढून शिडाचे मचव्यांत बसलों, व पांच कोस भयंकर व अफाट समुद्रांतून एक तासांत बेटद्वारकेच्या किनाऱ्यावर उतरलों. समुद्रांत कांहीं भित्र्या यात्रेकरूंनीं डोळे बांधिले होते; पण मचव्यावरील खलाशी फार हुषार, पाण्यांतील केवळ मासे याप्रमाणें वागून मोठ्या दक्षतेनें माणसांची नेआण करीत होते.

## बेट द्वारका.

बेट द्वारका हें बंदर वादळांत सांपडलेल्या तारवांस फार सोईचें आहे. येथें तालुक्याचें ठाणें असून कोर्ट, कचेऱ्या, दवाखाना, शाळा वगैरे बेटाच्या हद्दींतील सर्व कामें चालतात. वस्ती बरीच मोठी आहे व चोहोंबाजूंस समुद्र असल्यामुळें पाण्याच्या विहिरी आहेत, त्यांचें पाणी विशेष गोड नसतें. बाजार दुकानें सर्व आहेत; ग्रंथांत द्वारका समुद्रांत बुडाली असें आहे परंतु परमात्मा जागृत असल्याची साक्ष ह्मणून हा त्या द्वारकेचा अवशेष भाग उरला आहे असें येथील एकंदर रचना व लीला पाहून कोणासही वाटल्याशिवाय राहत नाहीं. व मूळ द्वारकेपेक्षां येथील मंदिरांची रचना वेगळ्याप्रकारची आहे. मूळ द्वारकेस मंदिरास कोट व चार दिशेस चार दरवाजे असून प्रत्येक देवतेचें, उंच शिखराचें मंदिर वेगवेगळें बांधिलें आहे. व बेट द्वारकेस फक्त दक्षिण दिशेस महादरवाजा व भोंवतालीं कोट आहे. आंत गेल्यावर मोठ्या चौकाच्या वाड्याप्रमाणें चार दिशेस मोठ्या पडसाळा व त्यांतच चारी बाजूंस कोठड्यांनीं मूळ द्वारकेप्रमाणें प्रत्येक देवतेची स्थापना केलेली आहे. प्रत्येक देवतेचे गाभाऱ्याचें द्वार रुप्याचे पत्र्यांनीं मढविल्यामुळें व हंड्याझुंबरें वगैरे शोभेमुळें यात्रेकरू आंत गेल्याबरोबर गुंग होऊन जातो व मृत्युलोक सोडून वैकुंठास आलों, असा त्यास भास होतो. व परत मंदिराबाहेर जावें अशी त्यास इच्छा होत नाहीं; इतका तो आनंदसागरांत बुडून जन्म साफल्यता मानतो. आम्ही महादरवाज्यावर प्रत्येकीं एक रुपया कर देऊन श्रीद्वारकानाथाचें धूळदर्शन घेतलें व धर्मशाळेंत बिऱ्हाड ठेवून विश्रांति घेतली. येथील पूजाअर्चेची, आरतीची व दर्शनाचा व्यवस्था देवाचे वस्त्र अलंकार वगैरे सर्व टापटीप मूळ द्वारकेप्रमाणेंच पण वरच्या दर्जाची होती. बलराम व प्रद्युम्न यांचीं मंदिरें दोन बाजूस व मध्यभागीं श्रीगोपाल

कृष्णाचें व भोंवतालीं देवकी, वसुदेव व पट्टराण्यांचीं मंदिरें व राधेचें एक जास्त मंदिर होतें. येथील पुजारी वेगवेगळे, श्रीमंत व मानी असून मूळ द्वारकेप्रमाणें गाभाऱ्यांत जाऊन पाद्यपूजा व पायांवर मस्तक ठेवण्यास कर पडतो व त्यावर पुजाऱ्यांची व दरवाज्यावरील करावर गायकवाडांची मालकी होती. पुजारी गर्भश्रीमंत असून यात्रेकरूंच्या उत्पन्नाची विशेष परवा बाळगीत नाहींत. श्रीगिरीबालाजी फार श्रीमंत देव आहे; पण त्यापेक्षांही एकंदर व्यवस्थेवरून हें स्थान प्रेक्षणीय व श्रीमंत आहे. शास्त्रोक्त रीतीनें चित्तशुद्धीकरितां तीर्थयात्रा करणें कर्तव्यच आहे, पण त्यांत श्रीद्वारकायात्रा फारच रमणीय आहे. ती प्रत्येकानें एकदां तरी करावी, अशी माझी आग्रहाची सर्वांस नम्र विनंती आहे. मुंबईहून थोडया वेळांत (चार सहा दिवसांत) आगबोटीनें व थोडया खर्चानें (२०–२५ रुपयांत) आणि आगगाडीनें काठेवाडांतून एक महिन्यांत व ५०-७५ रुपयांत ही यात्रा घडण्यासारखी आहे. आगगाडीनें सातृगया, जुनागड, गिरनार, सोरटीसोमनाथ व सुदामपुरी या क्षेत्रांचा लाभ जास्त घडतो. बेटद्वारकेस गायन, फुलांचीं मखरें, रोषणाई या गोष्टी फार अप्रतिम होतात; तीर्थें व देवस्थानें एकंदर ६४ असून शिवाय अन्नसत्रें, सदावर्तें व कायम देणग्या जहागिरीप्रमाणें देवास पुष्कळ आहेत. येथें समुद्रकांठीं शंख, चक्रें, पद्में, वगैरे पुष्कळ सांपडतात. व एक मैलावर प्रसिद्ध शंखोद्धारतीर्थ आहे, त्यांतही क्वचित् शंख सांपडतात. तेथील स्नानाचें महत्त्व आहे; पण उन्हाळ्यांत त्यास बहुधा पाणी नसतें आह्मीं सर्व तीर्थें व देवस्थानें सवडीनें पाहून देवब्राह्मण करून समुद्रकांठीं धक्क्यावर आलों व पुन्हा एकेक आण्याचें प्रत्येकीं तिकीट काढून शिडाचे मचव्यांत बसून परत गोपीतलावानजीक समुद्रकिनाऱ्यावर उतरलों. यात्रेकरूंकरितां भाडयाच्या पोरबंदरच्या गाडया तयार असतात त्यांपैकीं दोन गाडया ठरवून, मूळ द्वारकेस न जातां परभारें दुसऱ्या रस्त्यानें तीन दिवसांत सुदामपुरीस दाखल झालों व यात्रेचा बहुतेक क्रम संपत आल्यामुळ अमदावादचे मंडळीसह रेलवेंत बसून, जेतलसर, राजकोट रस्त्यानें विरमगांव जंक्सनवर पोंचलों; तेथून अमदावादचे दुसरे गाडींत बसून दुसरे दिवशीं सकाळीं ९ वाजतां 'अमदावादेस' उतरून बरोबर असलेल्या शास्त्रीबोवांच्या घरीं बिऱ्हाड ठेविलें, व दुपारीं जेवण करून शहर पहाण्यासाठीं निघालों; शहरची रचना शोभिवंत नसून कापडाचे पेठेंत विशेष घडामोड व व्यापार दिसला. येथें साबरमती नदीचे पाण्यावर कापडाच्या ८०–९० गिरण्या चालत असून त्यांत हजारों लोक कामें करितात. व्यापारी लोक श्रीमान असून कापड पांढरें उत्तम, मध्यम, कनिष्ट तयार होतें. पुढें प्रसिद्ध स्थळें, देवस्थानें, बाजार व

दुकानें पहात चार वाजतां घरीं आलों. फराळ पाणी आटोपून पांच वाजतां तेथील मंडळीचा प्रेमानें निरोप घेतला व स्टेशनावर बी–बी रेलवेचे गाडींत बसून मुंबईजवळ सकाळीं सहा वाजतां दादर जंक्सनवर उतरलों व नजीकच्या खाणावळींत जेवण करून दहा वाजतां नाशीककडे जाणाऱ्या गाडींत बसून मनमाडास उतरून नगरचे गाडींत बसून चैत्र वद्य ११ चे वारीस श्रीचांगदेवदर्शनास पुणतांबे येथें सुखरूप दाखल झालों. श्रीकाशी-यात्रा, रामेश्वर यात्रा, सेतूयात्रा, व द्वारका आणि मातृगया यात्रा, निर्विघ्नपणें पार पडल्या. वाटेनें प्रवासांत गार पाण्याचीं स्नानें, जागरणें व अवेळीं जेवण यामुळें प्रकृतीस बिघाड होईल, बरोबर कित्येक वेळीं कळवळ्याचीं व ओळखीची सोबत नव्हती म्हणून फार भीति वाटत होती, पण कांहीं दुखणेंबाणें न येतां व "निश्चयाचें बळ" या उक्तीप्रमाणें त्या प्रभूच्या पूर्ण कृपेनें व साह्यानें हा सर्व प्रवास समाधानकारक होऊन नित्य स्मरणीय झाला. तो मुमुक्षूच्या वाचकांचे सेवेशीं यथामति सादर केला आहे. अशीं प्रवासवर्णनें मागें आलीं असतील. व पुढेंहि येतील, परंतु प्रत्येकाची दिशा, दृष्टि, व अनुभव निराळा असल्यामुळें वाचक या लेखांचा अनादर करणार नाहींत अशी पूर्ण आशा आहे.

---


# सन्तचरित्रमाला.

## ग्रंथकार:—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहे. त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यातला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें ह्या ग्रंथासाठीं लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे यांत ४२ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं आहेत व ८–१० चरित्र अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य मोरया गोसावी, राजा कुळशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त त्रिरुवन्नालवर, सूर-दास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर गोंदवलेकरमहाराज. सीताराममहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव महाराज भटजीबापू, सोनगिरचे महाराज, भोरचे दत्तभट, अक्कलकोटस्वामी, माणिक-प्रभु इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्खा (मालेराव) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही (का. कृ. लेले, धार) सिद्धारूढ महाराज (फणसळकर), चिदंबर दीक्षित (विठ्ठल कृष्ण कामत) दासी महाराज टाकळीकर (काहळेकर), बलभीमबोवा साडेकर (श्री. खाजगीवाले) शुभरायसोला-पूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर. (प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले) इ० पृ. २५६.पांच फोटो किं. रु १॥८ .व्ही. पी. नें १॥१३.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

श्रीराम समर्थ.

# श्रीगोंदवलेकर महाराजांचे अभंग.

उद्धारकः—त्र्यंबक नारायण देशपांडे, पुणें.

१

हाक मारुनि सांगे तुका । नाम घेतां राहूं नका ॥ १ ॥
रामदास ह्मणे लोकां । रामनाम तुम्ही घोका ॥ २ ॥
सकळ संतांचें हें मत । एक भजा भगवंत ॥ ३ ॥
रामदास सांगे तुह्मां । नामीं सोडूं नका प्रेमा ॥ ४ ॥
दीनदास ह्मणे स्वामीसत्ता । भ्रम नासे पाहतां पाहतां ॥ ५ ॥

२

कांहीं नाहीं तालगळा । नका करूं हा कंटाळा ॥ १ ॥
करा नामाचा गजर । भवसिंधु उतरा पार ॥ २ ॥
नाम ध्यावें सर्वकाळ । पुन्हां नाहीं ऐशी वेळ ॥ ३ ॥
काय आहे तालापाशीं । नाम जपा अहर्निशीं ॥ ४ ॥
नका पाहूं गळाताल । रामराम वाचे बोल ॥ ५ ॥
दीनदासाचे हे बोल । तुम्ही मानूं नका फोल ॥ ६ ॥

३

प्रेमावांचुन गळासूर । देव अंतरला दूर ॥ १ ॥
नाहीं तालाचें हें काम । नामीं ठेवा सदा प्रेम ॥ २ ॥
देव भावाच भांवावला । धांवुनि भक्तापाशीं आला ॥ ३ ॥
दीनदास म्हणे भाव । कृपा करि रामराव ॥ ४ ॥

४

भजनाचा शेवट आला । एकवेळा राम बोला ॥ १ ॥
आजी पुण्यपर्वकाळ । पुन्हां नाहीं ऐशी वेळ ॥ २ ॥
रामराम वाचे बोला । आत्मसुखामाजी डोला ॥ ३ ॥
दीनदास सांगे निका । रामनाम स्वामीशिका ॥ ४ ॥

५

आजवरी तुम्हां सांगितली मात । नामाविणें हित समजूं नका ॥ १ ॥

मानूं नका नाम साधन हें लहान । तुम्हां माझी आण जीवेंभावें ॥ २ ॥
मानूं नका सार संसार हा थोर । दृश्य हा जोजार मानूं नका ॥ ३ ॥
सोडूं नका नाम धरूं नका काम । नाहीं नाहीं नेम आयुष्याचा ॥ ४ ॥
दीनदास म्हणे सांगतों तें ऐका । अभ्यास वैखरी सोडूं नका ॥ ५ ॥

६

रामनामांकित शिक्का । धाक पडे ब्रम्हादिकां ॥
ऐसा शिक्का ज्याचे हातीं । तेथें काळा नाहीं गती ॥
ऐशा शिक्कयाचा जो धनी । त्यासी साहाय चापपाणी ॥
ऐसा शिक्का मूर्तिमंत । तोचि जाणावा जीवन्मुक्त ॥
दीनदास म्हणे ऐसा शिक्का । मानव देहीं सोडूं नका ॥

७

जेथें नाम अखंडित । तेथें वेद मूर्तिमंत ॥
जेथें नामाचा हा चाळा । तेथिल पापें होति धुराळा ॥
निष्काम नाम घेतां । तोचि जाणावा ब्रम्हवेत्ता ॥
दीनदास म्हणे नामरुपीं चित्त । तोचि जाणावा जीवन्मुक्त ॥

८

सरली आयुष्याची गणना । आतां नाहीं येणें पुन्हां ॥
तुझ्या पायीं मन राहो । हेंचि सुख आम्ही घेवों ॥
तुझ्या पायीं पडली मिठी । आतां जातों उठाउठी ॥
दीनदास म्हणे रघुनाथा । आज्ञा द्यावी मज आतां ॥

९

बाळ गोपाळ लहान थोर । भाऊबंद वतनदार ॥
ज्याचे कुळीं जन्म झाला । त्याचा अपाय म्यां केला ॥
माझ्या कुळींचे हो जन । सकळ तुम्ही मोठे लहान ॥
जन्मा आला जीव । नाहीं वहिवाटिला गांव ॥
कर्म माझें नाहीं भलें । तुम्हां सुख नाहीं दिलें ॥
नाहीं झालों द्रव्यवान । जन्म घेऊनि झाला सिण ॥
काय दाखवूं वदन । रामा अर्पण केला प्राण ॥
आतां नाहीं नाहीं धोका । राम नेईल परलोका ॥
आज्ञा द्यावी सकळ लोक । पायां पडतों मी रंक ॥
आतां पुन्हां न येई गांवा । दीनदासीं कृपा ठेवा ॥

१०

काय माझ्या रामा ! पाहतोसी अंत । काय मी पतित करूं आतां ॥
हिरा टाकोनीयां गारा देती हातीं । तेथें माझी मती काय चाले ॥
सांडुनियां नाम दावीतसे काम । काढीं माझा भ्रम रामराया ॥
दीनदास तुज येतो काकुळती । शुद्ध करीं मती रामराया ॥

११

पतितपावना नामनारायणा । येऊं दे करुणा बालकाची ॥
तूंच माझी माय तूंच माझा बाप । तुह्मांवीण ताप कोण वारी ? ॥
त्रिविध तापानें तापलों मी रामा । धांव मेघश्यामा त्वकरी ॥
दीनदास तुज येतो काकुलती । काढीं माझी भ्रांती रामराया ॥

१२

तुह्मी दयावंत संत । माझा पाहूं नका अंत ॥
पोटीं लागलीसे भूक । मज झालें असे दुःख ॥
नाना पक्वान्नें तुमचे घरीं । द्वारीं उभा मी भिकारी ॥
तुमच्या उच्छिष्टाचा लेश । मज द्यावा भिकाऱ्यास ॥
षड्रस पक्वान्नांच्या पंक्ती । जात पाहोनि पंक्तिसि घेती ॥
दीनदास म्हणे हें खरें । मज एकचि शीत पुरें ॥

१३

तुझें पाहतां ध्यान । सुखावलें माझें मन ॥
तुझे स्वरूपाची गोडी । ब्रह्मदेवाशीं आवडी ॥
तेंचि रूप वेळोवेळां । राहो माझे दोन्ही डोळां ॥
कोटी सूर्याची प्रभा । जैसा लावण्याचा गाभा ॥
इच्छामात्रें सृष्टी करी । धनुष्यबाण घेई करीं ॥
तुळशी वैजयंती माळा । मुक्तमणी शोभे गळां ॥
हृदयावरीं वच्छलांछन । ऋषी मुनींचेंही ध्यान ॥
सूर्यप्रभेसम जानकी । सीता शोभे वामांकीं ॥
दीनदासाचा कैवारी । उभा तिष्ठे ब्रह्मचारी ॥

१४

माझी वाईट ही मती । कामक्रोधांची संगती ॥
गर्व अभिमान मोठा । इच्छा भ्रम असे खोटा ॥
निंदक दुर्जन मती । पापकर्मी जडली वृत्ती ॥
आपले दुर्गुण न आठविले । दोष परांसीं लाविले ॥
आतां कळेल तैसें करीं । ब्रीद सांभाळावें हरी ॥

देवा तुम्हा शरण आला । त्याचा अंगिकार केला ॥
दीनदास जोडी हात । राम नामीं लागो चित्त ॥

१५

बहु पापाची ही खाण । जगामाजी झाली दीन ॥
सौभाग्याची हानी । आतां मज नाहीं कोणी ॥
कोणा समोरी जातां । नाक डोळे मोडी आतां ॥
पूर्व दोष बहु गहन । नाहीं नाहीं हो संतान ॥
लज्जाधीन जिणें । स्वतंत्रपणा आलें उणें ॥
ऐसें जाणोनी रहावें । त्यांनीं रामनाम ध्यावें ॥
दीर भाऊ सज्जन । त्यांचें राखा समाधान ॥
मुलाबाळांचें रक्षण । आल्या अतीतांसी अन्न ॥
रामनामाचा चाळा । नाहीं सत्याचा कंटाळा ॥
दीनदास म्हणे मायबाई । आपल्या घराला जाई ॥

१६

कलियुगाची खूण । पुण्यवर्जित होती जन ॥
दुराचारी दुर्जन । पापकर्मीं राहे मन ॥
ब्राह्मण स्वधर्मवैरी । शूद्र वेद पाठ करी ॥
अर्थ अनर्थी घालती । ऐसे पंडित बहू होती ॥
अवघे सत्य विसरले । पंडित मिथ्याभरीं भरले ॥
ऐसा कलीचा महिमा । कोठवर सांगूं तुह्मां ॥
दीनदास म्हणे एक मात । नाम रूपीं भरीं चित्त ॥

१७

तोचि प्राणी भला भला । चित्त देई एकया बोला ॥
विषय टाकीं अंतरीचा । पुढें मार्ग परमार्थाचा ॥
विषय सोडी सोडी भ्रम । मग संतसमागम ॥
विषयीं न भुले वृत्ति । मग सहज गुरुप्राप्ती ॥
विषय जाळी जाळी मना । सुख संपन्नाचा राणा ॥
दीनदास म्हणे विषय सांडी । रामनाम ठेवी तोंडीं ॥

१८

मानवाची न धरा माया । शरण जावें रामराया ॥
पोटासाठीं काम करा । सुखीं जावें आपुले घरा ॥
दयाशांती जतन करा । रामनामीं प्रेमपुरा ॥

रामनाम जपा एक ॥ उभय कुळांचें तारक ॥
दीनदास म्हणे संतसंग घ्यावा । गर्व दंभ सोडून द्यावा ॥

१९

काम क्रोध हे पाठी । रामभजनीं पडे तुटी ॥
कुमती श्वासोश्वास । आयुष्याचा होय नाश ॥
काय मायेचा हा रंग । दुष्टदुर्जनांचा संग ॥
दीनदास म्हणे जीवा । मुक्त करिसी तूंचि देवा ॥

२०

मतिमंद नाहीं शुद्धी । कोणी द्यावी सुबुद्धी ॥
द्रव्यबुद्धि बहु भारी । सत्यसुखा लाथ मारी ॥
दीनदास म्हणे कलिमहिमा । ऐसे प्राणी येती जन्मा ॥

२१

मानव जन्म आला मज । काय देवा सांगूं तूज ॥
संपत्ति मागूं जरीं । सोडूनि जाति नर नारी ॥
कन्यापुत्र मागूं भारी । अंतीं राहति दूरच्या दुरि ॥
आयुष्य मागूं जरी । भूमीभार होय तरी ॥
कीर्ति मागूं आटाआटी । देह जाईल उठाउठी ॥
राज्य मागूं जरी आतां । त्यासि वाहे सदा चिंता ॥
दीन दास म्हणे भक्तिभाव । तुझ्या चरणीं देई ठाव ॥

२२

गर्भवासाची यातना । प्राणी झाला केविलवाणा ॥
दिवसेंदिवस थोर झाला । विषयामाजीं हो गुंतला ॥
आप्तगोताची माया । रक्षितसें आपुली काया ॥
द्रव्य सुत विषय थारा । जन्म वृथा गेला खरा ॥
दुःख भोगी तळमळ । अवघीं झाली निरफळ ॥
दास म्हणे लोक आले । मज जाळूनि हो गेले ॥

२३

कृपा करी नारायणा । तोडीं विषयवासना ॥
आग लागो उत्तम काया । नाशिवंत गेला वाया ॥
देह रक्षणार्थ यत्न केला । परि काळ घेऊन गेला ॥
रामनामीं झालों चोर । नित्य विषयाचा घोर ॥
दीनदास ह्मणे देवा देवा । आतां सोडवीं केशवा ॥

२४

रामकृपा करि सांभाळ । राम दीनाचा दयाळ ॥
राम लावण्याची खाणी । राम निर्गुण निरंजनीं ॥
राम भक्तांचें भूषण । राम जानकीजीवन ॥
दीनदास म्हणे रामचरण । सदा राहो लोटांगण ॥

२५

कामासाठीं बाळ मारी । कामासाठीं प्रेम धरी ॥
कामासाठीं जळी देहें । कामासाठीं दुःख पाहे ॥
कामासाठीं द्रव्य हानी । बेअब्रू दरखाणीं ॥
दीनदास म्हणे जे जें करिती । कामसवें घेउनि फिरती ॥

२६

कामासाठीं देवधर्म । कामासाठीं बहु श्रम ॥
कामासाठीं तीर्थव्रत । कामासाठीं देशप्रांत ॥
कामासाठीं हितगुज । कामासाठीं प्रेम लाज ॥
कामासाठीं प्रेम भारी । काम फिरवी दारादारीं ॥
काम नीचा काकुलती । ऐशी अंतरींची गती ॥
दीनदास ह्मणे कामासाठीं । दुःख उचंबळे पोटीं ॥

२७

सर्व सुखाचा सागर । विषय सोडुनि राहीं दूर ॥
विषयाचा मारी लहर । तोचि शांतीचा आगर ॥
ऐसी खूंग लागे ज्यासी । आत्मबोध होय त्यासी ॥
दास म्हणे आनंद तुजपाशीं । वृथा विषयीं गुंतलासी ॥

२८

विषय जाळी भला । सुखसागर तोचि झाला ॥
कामविषय विषबिंदु । आत्मबोध थोर सिंधु ॥
कामसुखीं सुख । कामाअंतीं होय दुःख ॥
दास म्हणे क्षण सुख झालें । त्याचें घर शोधीं भलें ॥

२९

न करी तीर्थाटन । भूतदया होय लीन ॥
मानवाची न धरीं आशा । नाम घेई श्वासोश्वासा ॥
न पडें साधनाचें भरीं । राम बोलें गा वैखरी ॥
दीनदास म्हणे न भुलें भ्रमासी । लक्ष लावी रामापाशीं ॥

३०

रामनामघोष । मनामाजी अति उल्हास ॥
राहे उपाधी वेगळां । नाम घेई वेळोवेळां ॥
चिंता नसे कांहीं । मुखीं रामराम गाई ॥
रामभक्ताची खूण । विषयामाजी नांहीं मन ॥
रामनाम जेथें वसे । विषय काम तेथें नसे ॥
रामनामाची प्रीती । विषयत्रास वाटे चित्तीं ॥
दास म्हणे हें लक्षण । नामीं काम नुमजे खूण ॥

३१

काय स्त्रीसुखाची मात । मुख पाहतां होतो घात ॥
नेत्रीं वसे कामरूप । त्याचें सुखा आली झोंप ॥
स्त्रिया जातीचा विटाळ । बुडलें बुडलें सत्य कुळ ॥
परस्त्रीसवें विषय करी । आत्महत्या बहु बरी ॥
तिचा होता अंगसंग । कोटी शिवपुजा भंग ॥
दास म्हणे परद्वारीं हीत । जैसें नरकीं लोळे जंत ॥

३२.

ज्ञानदेव सांगे गीताभाष्य । भक्तिज्ञान धरा आस ॥
रामदास सांगे लोका । वृथा जन्म घालवूं नका ॥
एकनाथ सांगे ज्ञानकोटी । घाला हरीपायीं मिठी ॥
हाका मारुनि बोले तुका । नाम घेतां राहूं नका ॥
नामदेव सांगे सोय । धरा देवाचें ते पाय ॥
कबीर म्हणे ऐका । रामनाम विसरूं नका ॥
संत बोलिले अनुभव । भक्तिभावें आला देव ॥
दास म्हणे ऐसे संतांचे पायवण । त्यासी माझें हें नमन ॥

३३

संत आले महीवर । त्यांसी काय हा जोजार ॥
त्यासि जन्ममृत्यु काय । जगासाठीं धरला देह ॥
आम्ही पतित दुर्धर । आम्हासाठीं अवतार ॥
दास म्हणे संतचरणीं । मज टाका ओवाळूनी ॥

३४

माय बाळापाशीं चित्त । तैसे संत करिती हित ॥
स्तनीं पान्हा दाटला । हाका मारी बाळकाला ॥

त्याची सदा चिंता वाहे । ऐशी कृपाळू ती माये ॥
दास म्हणे संत माये । मुमुक्षूंची वाट पाहे ॥

---

# शिवाजीकालीन स्वस्ताई.

इंग्रज सरकारनें हिंदुस्थानचें जर सर्वांत अधिक नुकसान केलें असेल तर हिंदुस्थानला अत्यंत दरिद्री बनविलें हें होय. आज नाण्यांचा फाजील सुळसुळाट झाला आहे. परंतु त्यामुळें नाण्यांची किंमत बाजारांत पुष्कळच कमी झाली असून सर्वत्र महागाई झाली आहे. आणि जीवनकलह अत्यंत तीव्र झाला आहे. आजची महर्गता किती परमावधीची आहे. ह्याची कल्पना नागपूरच्या गोरक्षणसभेच्या विद्यमाने प्रसिद्ध होत असलेल्या 'गोधन' मासिकाच्या जुलै १९२५ च्या अंकांत शिवाजीच्या कारकीर्दीतील जें स्वस्ताईचें आणि सुबत्तेचें वर्णन करण्यांत आलें आहे त्यावरून होणार आहे. हें वर्णन खालील प्रमाणें आहे:—

## माणसांची मिळकत.

| दरमहा पगार | रु. आ. पै. | दरमहा पगार | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| सुतार | २–९–३ | गवंडी | १–४–४ |
| लांकुड तोडया | ०–९–३ | स्वयंपाकी | १–१०–५ |
| साधारण मजूर | १–२–२ | | |

## खाण्याच्या पदार्थांचे दर.

| दर मणास | रु. आ. पै. | दर मणास | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| (१ मण=४० शेर | | | |
| गहूं | ०–४–९ | जवस | ०–३–२ |
| जोंधळें | ०–२–४ | तांदूळ उत्तम | १–०–० |
| साधारण | ०–८–८ | तुरीची डाळ | ०–४–९ |
| कणीक | ०–६–० | तूप | २–१०० |
| तेल | २–०–० | दूध | ०–१०० |
| साखर | १–६–४ | खादीचें कापड दरवारास | ०–१–७ |

शिवाजी महाराजांच्या कारकीर्दींत एका जवान गड्याला महिना सहा आण्यांत उत्तम निर्वाह करतां येत असे. ५ मनुष्यांच्या कुटुंबाला दरमहा २ रुपये रगड होत असत. ७५ वर्षांपूर्वींच्या लोकांना स्वतःचा असा अनुभव आहे कीं ५–७ रुपयांत ४–५ माणसांच्या कुटुंबाला चैनींत राहतां येत होतें.

ह्या स्वस्ताई आणि सुबत्ते वरून आपले पुर्वज अधिक सुखी होते, कीं आपण आज अधिक सुखी आहोंत ह्याचा विचार वाचकांनींच करावा. सुख ह्याचा सर्व साधारण अर्थ "मानसिक किंवा आत्मिक शांति असा" आहे.

प्रबोध.

---

श्रीरामसमर्थ

# श्री तुलसीदासांचें रामायण.

( लेः-- कृ. वि. सरंजामे, नागपूर )

१ ' महाराष्ट्र वाङ्मयांत अपूर्व भर ' म्हणून ज्या ग्रंथाचा गौरव झाला त्या तुलसीरामायण भाषांतराला प्रसिद्ध होऊन आज १२ वर्षें होऊन गेलीं. एवढ्या अवधींत मराठी वाचकांचें लक्ष हिंदुस्थानच्या या जगप्रसिद्ध काव्याकडे कितपत गेलें आहे हें अजमावण्यास खात्रीचा असा रस्ता नाहीं. उद्यां हिंदी भाषा हीच राष्ट्रभाषा होणार आहे यासाठीं व हिंदी भाषेंतील या पहिल्या प्रतीच्या ग्रंथाची माहिती मराठी वाचकांना व्हावी म्हणून वरील भाषांतर प्रसिद्ध झालें होतें.

२ श्री तुलसीरामायण हा हिंदी भाषेंत पहिल्या प्रतीचा ग्रंथ आहे अशी सर्वांनीं सारखी कबुली दिली आहे. परदेशीय पंडितांनींहि या ग्रंथाचा गौरव बराच केला आहे. वास्तविक या ग्रंथाचें नांव श्रीरामचरितमानस असें आहे. परंतु त्याचा प्रचार तुलसीरामायण या नांवानेंच झाला आहे. तुलसीदासांच्या नांवावर म्हणून आज कमींत कमी ३०–३२ ग्रंथांची यादी पुढें येते. त्यांतहि कित्येकांचे मतभेद आहेत. परंतु हा एकच ग्रंथ उत्तर हिंदुस्थानभर ८–९ कोटी लोकांवर वेदतुल्य स्थान पटकावित आहे. हा एवढाच ग्रंथ जरी त्यांच्या नांवावर राहिला तरी तुलसीदासांच्या योग्यतेची पुरी ओळख देण्यास तो पूर्ण समर्थ आहे.

३ मुकुंदराय ज्ञानेश्वरादि साधुसंतांना आपल्याकडे प्राकृत ग्रंथ लेखनाबद्दल जसा त्रास सोसावा लागला तशीच स्थिति तुलसीदासांचीहि झाली होती;

परंतु अंगीं संस्कृत ग्रंथ निर्माणाची योग्यता असतांहि केवळ लोकोद्धारार्थ व रामप्रेमप्रसारार्थ ग्रंथ हिंदी भाषेंतच लिहून पुरा करण्याचें श्रेय त्यांनीं पत्करिलें. सर्व प्रकारचे दोषारोप सहन करून त्यांनीं तत्कालीन समाजांत जें चैतन्य उत्पन्न केलें व हिंदुसमाजाची जी बहुमोल कामगिरी केली त्यावरून पहातां आज त्यांच्या ग्रंथाला वेदतुल्य स्थान मिळत आहे हें अगदीं योग्य होय.

४ तुलसीदासांचा असा कोणताच निराळा संप्रदाय नव्हता. उलट त्यांनीं तत्कालीन मतांमतांच्या गलबल्यांचा पूर्ण विचार करून निरनिराळ्या पंथ भेदांचें एकीकरण करण्याचाच प्रयत्न केला आहे. यामुळें त्यांच्या ग्रंथाकडे शैव, वैष्णव व शाक्त या सर्वांनीं सारखेंच लक्ष दिलें. कोणत्याहि एका पंथाची निर्भर्त्सना अथवा वैगुण्य न दर्शवितां प्रत्येकानें आपलें अंतःकरण भक्तिभावानें पुनीत करून घ्यावें असा त्यांचा मुख्य कटाक्ष होता. पोकळ वेदांत अगदीं प्रत्येक घरीं ऐकावयास सांपडत असून भक्तिरसानें थबथबलेलें असें अंतःकरण त्यांना कोठेंच दिसेना म्हणून त्यांनीं आपल्या रामचरितमानसद्वारां प्रथम रामप्रेमप्रसाराचा आरंभ केला. समाजाची तत्कालीन स्थिति त्यांनीं अगदीं मार्मिकपणानें निरीक्षण केली होती; कावेबाजपणानें हिंदुधर्मीयांची सहानुभूति मिळविण्याचा तत्कालीन मोंगल अकबरबादशहाचा प्रयत्न हा त्यांच्या लक्षांत चटकन येऊन त्यांनीं हिंदुधर्माचें व्यापक स्वरूप जनतेला समजावून दिलें. त्यांचें ध्येय लोकोद्धार होतें व यासाठीं त्यांनीं रामप्रेमप्रसार हें साधन स्वीकारलें.

५ बहुतेकांचा समज असा आहे कीं तुलसीरामायण म्हणजे एक भक्तिकाव्य; त्याचीं जीं पारायणें होतात तीं याच भावनेनें. हें खरेंच आहे ? परंतु याच काव्यांत सर्वांगीण समाजोन्नतिबद्दल जे नाना उल्लेख आले आहेत, वेळोवेळीं जो सदुपदेश केला आहे त्यावरून हें काव्य-लोकोद्धारार्थच जन्मास आलें हें स्पष्ट दिसतें. मराठी वाङ्मयांत दासबोधाचें जें विशिष्टत्व दिसतें तेंच हिंदी वाङ्मयांत या ग्रंथाचें आहे. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानी संस्कृतीचे जे जबर तडाखे बसले, त्यांची जी तीव्रता होती, तशी स्थिति दक्षिणेंत नव्हती. तिकडे मोंगलादि मुसलमानांचें प्रत्यक्ष वास्तव्यच असल्यामुळें त्या समाजावर जो अनिष्ट परिणाम होणार होता तो तुलसीदासांनीं बऱ्याच प्रमाणांत कमी केला. राजकारण, राजनीति, समाजनीति, लोकशिक्षण वगैरे प्रश्नांवर तुलसीदासांनीं त्यावेळीं दिलेलीं मतें आजहि लोकादराला पात्र असून त्यांचा अभ्यास प्रत्येक लोकसेवकानें करावा.

६ अशा या राष्ट्रीय ग्रंथाकडे महाराष्ट्रीयांचें फारसें लक्ष गेलें नाहीं हें एक-

प्रकारें योग्य नाहीं; परंतु आतां मूळ भाषांतरकर्ते श्रीमंत यादवराव जामदार हे मानसहंस अथवा तुलसीरामायणरहस्य या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथच प्रसिद्ध करीत असल्यामुळें या ग्रंथाचा अभ्यास महाराष्ट्रीय आतां तरी करतील असा भरंवसा वाटत आहे.

---

# ताजे मननामोद.

लेखक—माधव गोविंद भिडे.

१

धुकें पडलें असतां धोका चुकविण्यास एकच उपाय असतो. तो म्हणजे लक्षक आणि लक्ष्य यांतील अंतर कमी करणें हा होय. इष्ट वस्तूच्या जवळ जवळ जाण्याशिवाय तिच्या अवलोकनास दुसरा मार्गच नाहीं. ब्रह्मसाक्षात्कारास मोहाचा मधला अडथळा दूर करण्याच्या खटाटोपांत न पडतां अनुसंधानाच्या उजू वाटेनेंच जाणें श्रेयस्कर आहे.

२

ज्याचें लक्ष्यच निश्चित नाहीं त्याला मध्यान्हीचा सूर्य झाला तरी काय दाखविणार ? अर्थात् लक्ष्यनिश्चय हा प्रधानप्रकाश होय. सूर्याचे तर दूरच राहो पण प्रत्यक्ष पाहणाऱ्याचे नेत्र तरी त्यास काय दाखविणार ?

३

पाहतीकळा ज्याच्या त्याच्या अंतःकरणांतच सांठविली असते. मूळ प्रकाशक शक्ति येथेंच दिसेल. सूर्य, चंद्र, अग्नि आणि नेत्रेंद्रिय हीं त्या शक्तीचीं बाह्य साधनें आहेत. स्वप्नादि अवस्थांत या साधनांपैकीं एकही उपलब्ध नसतां पाहणारा मनमुराद दर्शनाचें सुखदुःख अनुभवितच असतो.

४

अक्षरशत्रु आणि निरक्षर दिसण्यांत सारखे असतात. त्यांची वागणूक मात्र अगदीं भिन्न असते. निरक्षर प्रकाशकसन्मुख असतो, अक्षरशत्रु प्रकाशाकडे पाठ फिरवून बनतो. निरक्षर दुसऱ्याच्या दृष्टीचा उपयोग करून आपण सहज डोळस बनतो, पाहतीकळा तो वश करून घेतो. अक्षरशत्रु या पाहत्या कळेस डावलतो.

५

अस्वलीचा केसाळपणा अस्वलीला झांकीत नाहीं. किंबहुना ती जितकी अधिक केसाळ त्या मानानें ती अधिकच प्रकाशित होते. तिला प्रकाशित करणारी प्रकाशिकाही पाहणाऱ्याजवळ असते.

६

पांढरे केस म्हातारपणा दाखवितात. परंतु त्यांनीं दाखविलेला भाव ग्रहण करणें न करणें या पाहत्याकलेवरच अवलंबून असतें. पांचव्या बायकोला म्हातारपणा दिसतच नाहीं! पांचवी बायको आपल्या पतिराजांकडे पाहूं लागली म्हणजे तिला तिची पाहतीकळा वार्धक्य दाखवीतच नाहीं! अर्थात् म्हाताऱ्याच्या केसांचें पांढरें धुकें कोणता सूर्य नाहींसें करील?

७

चोराला दिवाच अंधार करितो! परकीय वस्तु त्याची पाहतीकळा त्या प्रकाशांत पाहूंच शकत नाहीं.

८

धुकेंच पाहवयास निघाल्यावर धुकें काय करणार? पाहतीकळा जें लक्ष्य ठरवील तें ती स्वतः प्रकाशित करूं शकते!

९

माळी झाडांत सौंदर्य पाहूं शकतो. मात्र त्याला झाडाची स्वाभाविक रचना माहीत असावी लागते. तटस्थ वृत्तीनेंच लक्ष्यनिश्चय होतो.

१०

वस्तुतंत्र ज्ञान होण्यास ही तटस्थ वृत्तिच आवश्यक असते. साधुसंतांनीं स्वतः अनुभवून लिहून ठेविलेल्या वर्णनाचा मागोवा घेऊन साक्षात् वस्तु पाहूं जाणारास ताटस्थ्यवृत्ति येईतों वाट पाहत बसावें लागतें. कारण त्याची पाहतीकळा एरवीं आपलें काम करूं शकत नाहीं.

११

बोकड आपल्या लघुशंकेचें मोठ्या प्रेमानें प्राशन करितो. वास्तविक मूत्र हा मल आहे तरी बोकडाला त्याची रसत्वानें प्रतीति होते. ही बुद्धि स्वाभाविक आहे. हीच श्रद्धा.

१२

सरकारी टपालखात्याचे लिफाफे वापरणारास महसूल छापी ( Postage

Stamp) डकवावी लागत नाहीं कीं गोंद लावावा लागत नाहीं. याचा अर्थ काय? याचा अर्थ येवढाच आकारणीचा छाप त्यावर आधींच छापलेला असतो. लिफाफा बंद करितांना आपण पाणी लावून गोंद ओलवला म्हणजे झालें! व्यवहारज्ञास या वर्णनांत नवल करण्यासारखं कांहींच आढळणार नाहीं. पण तेंच तत्त्वज्ञास पुनर्जन्मरहस्य उलगडून देईल. या जन्मीं नुसत्या पठनाबरोबर अर्थानुभव येतो असें दिसल्यास श्रवण, मनन, निदिध्यास एवढीं कर्में त्याचीं पूर्वींच्याच जन्मीं झालीं असलीं पाहिजेत हें त्याच्या सहज अटकळींत येतें. कर्मांत हप्तेबंदी चालते, काटकसर किंवा संक्षेप चालत नाहीं.

१३

लिफाफ्याच्या झाकणीचा गोंद सर्द हवेंत पघळतो आणि लिफाफा कायमचा बंद होतो असाच प्रकार घोकीव शाब्दिक वेदांत्याचा होतो. श्रवणादि समयीं वक्त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर पडण्याचा अवकाश कीं श्रोत्याची स्मरणशक्ति त्याला पठितग्रंथाचें स्मरण करून देते व त्यामुळें त्याचें श्रवणेंद्रिय लागलीच मिटून डुलक्या खाऊं लागतें. कानाला लावून वाळवलेला शब्दांचा गोंद मनावर चिकटून अंतःकरणाचा लिफाफा आंत रिकामाचा रिकामा!

१४

पिठूळलेली भाकरी दुधाच्या दशमीसारखी दिसते. मात्र चव घेण्याच्या ती निरुपयोगी. सुखदुःखांच्या पाण्याशिवाय शाब्दिक वेदांती दिसण्यांत फाकडा जीवन्मुक्तासारखा दिसतो पण समागमांत त्याचा पाणचटपणा तेव्हांच अनुभवास येतो.

१५

कुत्री व्यायला झाली ह्मणून घरचा रतीब काय बंद करावा? अनुमानाच्या पोथ्या बाहेर पडूं लागणार म्हणून ज्ञानेश्वरी बंद करतां येणार नाहीं.

१६

चिलटावरही चवरी वारतात पण ती त्याचा गौरव करण्यासाठीं नसून त्याला निजधामाला पाठविण्यासाठीं असते. क्षुद्रचित्तांना रिझविण्यापेक्षां त्रिझविण्यासाठींच सुज्ञ त्यांचा गौरव करीत असतात. परंतु ही गोष्ट त्या मंदबुद्धि मुरकुटांच्या लक्ष्यांतच येत नाहीं!

१७

धुल्याच्या पावसाप्रमाणें ऐहिक जीवन आहे. त्यांत भोगाबरोबरच रोग येत असतात.

१८

पुलावरून गेला कीं पोहून गेला याची कोण चौकशी करतो ? नदीपार गेल्याशीं कारण. सद्गुरुनिष्ठाला गुरुसेवेचा सेतु मिळतो. भक्ताला प्रभुप्रसाद तारतो तर योगी तरून जातो.

१९

दुसऱ्यावर्गाचीं भाडीं उतरलीं म्हणून तिसऱ्या वर्गाच्या उतारूला पेढे वाटण्यासारखें काय झालें ! मंदप्रज्ञाला ज्ञान सुलभ झाले म्हणून काय हर्ष होण्याचें कारण !

२०

जागचा हालूच इच्छित नसेल त्याला आगगाडीचा प्रवास अगदीं फुकट होण्यासारखा काळ आला म्हणून काय लाभ ? नामस्मरणानें कलींत सर्व तरतील खरें, पण तरण्याची इच्छा तर हवी ना !

---

# ईश्वरभजन.

" ईश्वरभजन—प्रार्थना—कशी आणि कोणाची करावी हें समजत नाहीं. आणि तुम्ही वारंवार प्रार्थना करण्याविषयीं लिहितां; ही कशी करतां येईल हें समजावून द्याल काय ? " असें एकजण विचारतो.

ईश्वरभजन म्हणजे ईश्वराचें गुण—गान; प्रार्थना म्हणजे आपल्या अयोग्यतेविषयींचा, आपल्या दुबळेपणाविषयींचा स्वीकार ईश्वराचीं सहस्र म्हणजे अनेक नांवें आहेत किंवा असें म्हणा पाहिजे तर कीं तो अनाम आहे. जें नांव आपल्याला आवडेल त्या नांवानें आपण ईश्वराला भजावें, त्याची प्रार्थना करावी. कोणी त्याला राम या नांवानें ओळखतात, कोणी कृष्ण नांवानें; कोणी त्याला रहीम म्हणतात, तर कोणी त्याला गॉड म्हणतात. हे सर्व एकाच चैतन्याला भजतात. पण ज्याप्रमाणें सर्व प्रकारचें अन्न सर्वांना आवडत नाहीं, तशीं सर्व नांवें सर्वांना पसंत पडत नाहींत. ज्याला ज्याचा सहवास असतो त्याच नांवानें तो ईश्वराला ओळखतो, आणि तो अंतर्यामी, सर्व शक्तिमान् असल्यामुळें आपल्या हृदयाचा भाव ओळखून आपल्या योग्यतेप्रमाणें आपल्याला जबाब देतो. म्हणजे प्रार्थना किंवा भजन जिभेनें नाहीं होत पण

हृदयानें होतें. म्हणूनच मुके, तोतरे, मूढहि प्रार्थना करूं शकतात. जिभेवर अमृत आहे पण हृदयांत हालाहल असेल तर जिभेवरील अमृत काय कामाचें? कागदाच्या गुलाबांतून सुगंध कसा मिळेल ? म्हणून ज्याला सरळपणानें ईश्वराला भजावयाचें असेल त्यानें आपल्या हृदयाला ठिकाणीं आणलें पाहिजे. हनुमानाच्या जिभेवर जो राम होता तोच त्याच्या हृदयाचा स्वामी होता, आणि म्हणूनच त्याच्यांत अपरिमित बळ होतें. विश्वासानें गलबतें चालतात, विश्वासावर पर्वत उचलले जातात, विश्वासानें समुद्र उल्लंघून जातां येतें; याचा अर्थ हा कीं ज्याच्या हृदयांत सर्व शक्तिमान् ईश्वर वसत असतो तो काय नाहीं करूं शकत ? तो महारोगी नाहीं तर क्षयरोगी असला म्हणून काय झालें ? ज्याच्या हृदयांत रामाचें अधिष्ठान आहे त्याच्या सर्व रोगांचा सर्वथा नाश होऊन जातो.

असें हृदय कसें होईल ? हा सवाल प्रश्न करणाऱ्यानें विचारलेला नाहीं. पण माझ्या जबाबांतून तो उद्भवतो. तोंडानें बोलण्यास आपल्याला कोणीहि मनुष्य शिकवूं शकेल, पण हृदयाची भाषा कोण शिकवील ? ही गोष्ट तर भक्तजनालाच साध्य होईल. भक्त कोणाला म्हणावें हें गीतेमध्यें तीन ठिकाणीं खास आणि सर्वत्र सामान्य रीतीनें सांगितलें आहे. पण त्याची संज्ञा किंवा व्याख्या शिकल्यानें कांहीं भक्तजनाची गांठ पडत नाहीं. ह्या जमान्यांत हें दुर्लभ आहे म्हणून मी सेवा-धर्म सुचविला आहे. जो दुसऱ्याची सेवा करतो त्याच्या हृदयांत ईश्वर आपण होऊन, स्वतःला गरज वाटून वास करतो. म्हणूनच अनुभवानें ज्ञान मिळविलेले नरसिंह मेहता म्हणतात कीं—

'वैष्णव जन तो तेने कहिए जे पीड पराई जाणे रे'

किंवा तुकाराम महाराज म्हणतातः—

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

आणि हे पीडित, रंजले गांजलेले कोण आहेत ? अंत्यज आणि कंगाल. ह्या दोघांची सेवा कायावाचामनानें केली पाहिजे. अंत्यजांना जो अस्पृश्य समजतो तो त्यांची शरीरानें सेवा काय करणार ? जे गरीबासाठीं चरखा चालविण्याइतकें शरीर हालविण्यास आळस करतात, अनेक सबबी सांगतात, ते सेवेचें मर्म समजतच नाहींत. गरीब अपंग असेल तर त्याला धर्मार्थ भोजन घालतां येईल; पण जो हातापायानें धट्टाकट्टा आहे त्याला मेहनतीशिवाय खायला घालणें म्हणजे त्यांत त्याची अधोगति करण्यासारखेंच आहे. कंगाल मनुष्यासमोर बसून जो चरखा कांततो आणि

त्याला तें काम करण्यास प्रवृत्त करतो तो ईश्वराची अनन्य सेवा करतो. 'जो मला पत्र, पुष्प, पाणी, इ. भक्तिपूर्वक अर्पण करतो तो माझा सेवक आहे' असें भगवन्तांनीं म्हटलें आहे. भगवान गरिबाच्या घरीं जास्त वास करतात हें आपण निरंतर ऐकत आलों आहोंत. यावरून गरिबासाठीं कातणें ही महाप्रार्थना आहे, हा महायज्ञ आहे, ही महासेवा आहे.

आतां पृच्छकाला उत्तर देतां येईल. ईश्वराची प्रार्थना वाटेल त्या नांवानें करतां येते. करण्याची रीत हृदयापासून प्रार्थना करण्यांत आहे. हृदयापासूनची प्रार्थना शिकण्याचा मार्ग सेवाधर्म आहे. ह्या युगांत जे हिंदु अंत्यजांची सेवा हृदयापासून करतात ते शुद्ध प्रार्थना करतात. हिंदु तसेच हिंदुस्थानांतील इतर धर्मीय लोक जे गरिबासाठीं मनापासून चरखा चालवितात, तेहि सेवाधर्माचें आचरण करतात आणि हृदयापासूनची प्रार्थना करतात.

(नवजीवन) मो. क. गांधी.

---


पृ. सं. ३२० सार्थ व सभाष्य किं. ०।१२

# मनोबोध उर्फ मनाचे श्लोक.

प्रकाशकः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

श्रीसमर्थ रामदासस्वामींचे मनाचे श्लोक सर्व लोकप्रिय आहेत. हे दिसतात तितके सोपे नाहींत. श्रीदासबोध, व समार्थाची सर्व कविता यांत प्रगट झालेल्या तत्वज्ञानाच्या अंतर्मुख दृष्टीनें ते लावले पाहिजेत व तसे ते येथें लावले आहेत. पदाचा अर्थ न सोडतां व संदर्भ व कथानकें देऊन अर्थविवरण केलें आहे. प्रथम प्रस्तावनेंत श्लोकांचा प्रसंग, मनाचें स्वरूप व श्लोकसंगति दिली आहे व श्लोक समन्वयानें लावले आहेत.

खिशांत ठेवण्यासारखा आकार, कागद ग्लेज.

पृ. सं. ३२० किंमत बारा आणे.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून बरोबर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्यपाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें. ०१२

२ **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडो स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४

५. **आनंदलहरीः**—(कवितासंग्रह) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८ व्ही.पी. नें ०११

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४ ( तूर्त शिल्लक नाहीं )

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

# पांगारकरांची पुस्तकें

११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध ह० विष्णुबुवा जोग यांनी केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५

१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध (भाग १-२):—किं. प्रत्येकीं रु १०८

१४ मोरोपंती वेंचे (दुसरी आवृत्ति):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रातील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं० रु. १०१२.

१५ पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचाराची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे किं० ०८.

१६ श्रीतुकारामचरित्र:—तुकारामांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने ग्रंथ पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचा यांचे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं० रु० ३

१७ श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र आगगाडींत भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी किं० ०५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख—विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं० ०१०

१९ मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातू प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत.यांच्या कवितेचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखवले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं.रु. १

२० मानसिउपासना. ( चौथी आवृत्ति ):—किं. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु. ४. व्ही. पी. नें. ४०१०.

२२ सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२

२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें अशा चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून आरंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. १


२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु २०८

२५ श्री एकनाथी भागवत (निर्णयसागर प्रेसचें आवृत्ति तिसरी):—किं रु ६

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारी होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १९ | कार्तिक मार्गशीर्ष १८४७ | नवें वर्ष ५ वें |
| मास ३।४ | नोव्हेंबर डिसेंबर १९२५ | अंक ११।१२ |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



**वार्षिक वर्गणी रु. ३ व व्हीपीनें रु. ३०३**

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... ... | १—२ |
| २ रा. पांगारकर यांचा दक्षिण महाराष्ट्रांतील संचार... ... ... ... | ३–१४ |
| ३ मकरसंक्रमण ( कविता ) ... ... ... ... | १५–१६ |
| ४ कार्तिकीचा सोहळा... ... ... ... ... | १७–१८ |
| ५ पापाण पोवळी ... ... ... ... ... | १८–२१ |
| ६ संध्या ... ... ... ... ... | २१–२३ |
| ७ विवाह ... ... ... ... ... ... | २४–३३ |
| ८ थोरांच्या समागमांत ... ... ... ... | ३३ |
| ९ श्रीखंडोजी महाराज यांचें भाषण ... ... ... | ३४–४३ |
| १० श्री समर्थ गोवर्धन मंदिर ... ... ... ... | ४४ |
| ११ भक्तिसुधामृत ... ... ... ... ... | ४५–५० |
| १२ स्त्रियांची भक्ति ... ... ... ... | ५१–५४ |
| १३ वादानें ऐक्यभावाचा बिघाड ... ... ... | ५४–५७ |
| १४ महात्माजींचा उपवास व त्याचा धडा ... ... | ५८–६२ |
| १५ प्रार्थना ... ... ... ... ... | ६२–६४ |
| १६ माताजी ... ... ... ... ... | ६४–६५ |
| १७ देवाचें पारतंत्र्य ... ... ... ... ... | ६६ |
| १८ सूक्तिसुधा तरंगिणी ( अभिप्राय ) ... ... ... | ६७–६८ |
| १९ मुकुरास व प्रसुप्त चैतन्य ( कविता ) ... ... ... | ६९–७० |
| २० असमर्थ गुरु ... ... ... ... ... | ७१–७२ |
| २१ पांगारकरांचीं पुस्तकें... ... ... ... ... | ७३–८० |


## सूचना

जानेवारी १९२६ चा अंक पाठोपाठ येत आहे. जानेवारींत ज्यांचें वर्ष सुरू होत आहे त्यांनीं हा अंक पावतांच म. ऑ. नें रु. ३ पाठवावे. ज्यांचकडून म. ऑ. नें वर्गणी येणार नाहीं त्यांजकडे व फेब्रुवारीच्या वर्गणीदारांकडे फेब्रुवारीचा अंक व्ही. पी. नें पाठविला जाईल.



# दत्तभेटीची उत्कंठा

दत्ता ! अनंत दुर्दोष घडो । कांहीं साधनही मज न घडो ।
सर्वस्व विघडो देह पडो । अनंत विघ्नें जरी आलीं ॥ १ ॥
देवा ! कांहीं जरी न जालें । अथवा कैंसेंही जरीं जालें ।
तथापी तुझीं पाउलें । पाहीन अभीष्ट देशील तूं ॥ २ ॥
तुझें अभीष्टदर्शन । तुजपासोनि अभीष्ट पूर्ण ।
येईन हा दृढनिश्चय जाण । न ढळे सत्य त्रिसत्य ॥ ३ ॥
विज्ञात तव गुण बिरुदाधार । हा निश्चय मम महानिर्धार ।
आतां न लावीं भेटीस उशीर । त्राहि नमितों भेटणें ॥ ४ ॥
करुणासागर तूं विशुद्ध । करुणासागर ग्रंथ प्रसिद्ध ।
तुझाच म्हणोनि तूंचि शुद्ध । करि घे मुळिच्याच शुद्धातें ॥ ५ ॥
अनादि ग्रंथ हा हृषीकेशी । अनादि करुणासागरवासी ।
अनादि अर्थ तूंचि असमी । अनादि क्रीडसी तूं दत्ता ॥ ६ ॥
देवा ! वेडें वांकुडें । माझे हातीं सावडें ।
जैसें जितुकें तुज आवडे । त्यांतून लेहविसी तूं प्रेरका ॥ ७ ॥
त्वद्ग्रंथ तूं तव सद्गुरु आई । मम सर्व गोड तूं करूनि घेई ।
सर्वज्ञा समर्था पडतों पाईं । शरण वेगीं अवभेटणें ॥ ८ ॥
अभीष्ट भेट मज त्वरित देशी । अलब्धपूर्वक यश लाभेल तुजशीं ।
धवल करील ब्रम्हांडाशीं । अजातपूर्वा तव कीर्ती ॥ ९ ॥
न सुटे माझा मज अवगुण । कुसंस्कारीं दोषाचरण ।
तपश्चर्यादि साधन । तेंही न करूं सके मी ॥ १० ॥
कोठें जाणें घडेना । आहे रहणी ती सुटेना ।
संग जडला तुटेना । नरनारींचा मज वस्तु ॥ ११ ॥
हें सारें तूं जाणसी । अनंत बिरुद गुण तूं असमी ।
माता।पिताही तूंच असमी । दयाळु सर्वज्ञ समर्थ ॥ १२ ॥

असच्छिष्य ते त्यागावे । असत्पुत्र काढोन द्यावे ।
खरें परंतु सर्वभावें । शरण प्रणत तो अत्याज्य ॥ १३ ॥
तरी असत्पण सोडावें । ऐसेंही त्वां न म्हणावें ।
' सोडवी ' प्रार्थिलें तुज सर्वभावें । तूं ही सोडवूं न सकसी तें॥१४॥
' निबद्धः स्वेन कर्मणा ' । तेंही मी सोडवूं सकेना ।
तू बोलसी तें नारायणा । स्वभावज सोडूं कवणेपरी ? ॥ १५ ॥
सारांश शरण्या ! कुपात्र । असच्छिष्य असत्पुत्र ।
त्वां न त्यजावा जो स्वतंत्र । शरण तवास्मि तुज याचीं ॥ १६ ॥
भगयत्न तुतें नमितों । त्राहि समर्था तुज प्रार्थितों ।
सर्वज्ञा अनंतगुणबिरुदा तो । न त्यजावा जो पदिं पडला ॥ १७ ॥
गंगा कुपंथ ओहळातें । प्रळयाग्नि अपवित्र तृणतूलातें ।
न भी तेविं मज अमंगळातें । पावना ब्रम्हाग्ने न भ्यावें त्वा ॥१८॥
कृपादृष्ट्या तूं चिन्मूर्ती । नाशिशील माझी निंद्यस्थिती ।
सर्व कांहीं तुझे हातीं । अनंतशक्ते सद्‌गुरो ॥ १९ ॥
उदयासि येतां वासरमणी । निःशेष नासे तमरजनी ।
तेंवि भेटसिल तरि तत्क्षणीं । नासतलि सारीं विरुद्धें ॥ २० ॥
जैसें खवळलिया प्रलयदहनें । दत्ता ! जळतलि तूलतृणें ।
तेवीं जळतील तव दर्शनें । मम सर्व कल्पना विक्षेप ॥ २१ ॥
सर्व संकटें आधिव्याधी । घोर चिंता सर्वोपाधि ।
दुःख सारें करुणानिधी । जळले माझें तव दर्शनें ॥ २२ ॥
शरण तवास्मि याचिलें नमिलें । विनंती प्रार्थिलें तुज सर्व कळलें ।
' दत्ता ! नमितों तव पाउलें । त्राहे वेगीं भेटणें ॥ २३ ॥
प्रपन्नें करितां नमस्कार । मानव रक्षिती अल्पसार ।
सर्वशक्ते ! तूं अतिथोर । दत्ता नमितों अवभेटणें ॥ २४ ॥
वेडीवांकुडी सेवा घ्यावी । साबडी करुणा आयकावी ।
याची आवडी तुझ्या जीवीं । यास्तव करिसी विलंब ! ॥ २५ ॥
वेगीं अभीष्ट दर्शनही । देशील मातें कळलें हेंही ।
मज आवडी सद्‌गुरु आई । प्रसन्न मजवर स्पष्ट तूं ॥ २६ ॥

—नारायण महाराजकृत करुणासागर.

---

# रा. पांगारकर यांचा
# दक्षिण महाराष्ट्रांत संचार.

---

## १ बेळगांव.

सपटंबरआक्टोबर महिन्यांत इंदुरास महाराजांचा प्रेमळ सुखकर पाहुणचार भोगीत असतांनाच गोव्याकडील मंडळींचें प्रेमाग्रहाचें आमंत्रण आलें. गोवे प्रांतीं आम्हीं पूर्वीं दोनदां (एकदा सरस्वत्युत्सवासाठीं व एकदा दासनवमीच्या उत्सवासाठीं) गेलों होतों, व मडगांव येथील बऱ्याच सज्जनांचा परिचय झाला होता. आतांच्या बोलावण्यांत रा. रामचंद्र विष्णु केणी यांनीं पुरस्कार घेतला व तेथील उत्साही पुढारी रा. दत्तोबा दलाल यांच्यामार्फत त्यांनीं पत्रें व तारा यांची गर्दी करून दिली. गोकर्णमहाबळेश्वर ह्या पुराणप्रसिद्ध क्षेत्रीं जाण्याची आमची मनीषा होतीच; तेव्हां गोकर्ण, कोल्हापूर, नरसोबाची वाडी इ० तीर्थक्षेत्रें पाहून यावें व या खेपेस सहकुटुंब सहपरिवार यात्रा करावी असें ठरवून आम्ही रुकार दिला व ता. २४ नोव्हेंबर रोजीं रात्रीं ८ च्या मेलनें सेकंड क्लास डबा रिझर्व्ह करून आम्ही पुण्याहून निघालों तों ता. २५ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां बेळगांवास पोंचलों. स्टेशनवर 'परीक्षकाचे' संपादक रा. वामनराव कानविंदे, नगरकर वकील, रामभाऊ गोखले मास्तर, ह. भ. प. शामराव गिंडे, महादेव आप्पा कुदळे, इ० प्रेमी मंडळी घ्यावयास आली होती. ते दिवशीं मारुतीचे देवळांत 'रामदास व शिवाजी' या विषयावर व्याख्यान झालें. दुसरे दिवशीं निवण्याचे ऐनवेळीं लोकांची भीड पडून राहणें झालें. तो गीताजयन्तीचा दिवस होता. बेळगांव येथील महिला विद्यालयांत रा. सोमण वकील यांचें व्याख्यान झालें तेव्हां अध्यक्ष या नात्यानें भाषण झालें. सायंकाळीं मारुतीचे देवळांत फार मोठा समुदाय जमला होता त्यापुढें 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' ह्या श्लोकावर प्रवचन झालें व भजनी मंडळीच्या आग्रहामुळें रात्रीं श्रीविठ्ठलमंदिरांत कीर्तन झालें. एका दिवसांत व्याख्यान, प्रवचन व कीर्तन असा तिहेरी कार्यक्रम झाल्यामुळें जो घसा बसला तो अद्यापही पूर्ण सुधारला नाहींच!

## २ मडगांव.

दुसरे दिवशीं लोंढा, कॅसलरॉकवरून 'दूधसागर' ची शोभा पहात व घनदाट वनराजींचा प्रांत अवलोकीत आम्हीं मडगांवला जाऊन पोंचलों. स्टेशनवर

२५।३० मंडळी मोटारी व गाड्या घेऊन सत्कार करण्यास तयार होतीच. गोवे प्रांतांत अधिक लोकवस्तीचा, व्यापाराचा व चळवळीचा गांव हाच होय. पणजी ( पंजीम ) ही राजधानी असली तरी हिंदु संस्कृतीचे अधिक लोक मडगांवींच आहेत. गोवे प्रांतांत सारस्वत ब्राह्मणांची वस्ती पांढरपेशांत अधिक आहे. हे लोक सामान्यतः मत्स्याहारी आहेत तथापि त्यांतही थोडे लोक सोवळे आहेत व दक्षिणी ब्राह्मणांचा सहवास वाढता झाल्यानें मत्स्याहाराची त्यांस खंतीही वाटते. सारस्वत उर्फ शेणवी हे ब्राह्मण असून षट्कर्मांचे अधिकारी आहेत. त्यांच्यांतही १२ प्रकार असून 'एकीबेकी'च्या परिषदा मागें भरून तो एकीचा प्रयत्न निष्फळ झाला आहे. हे लोक प्रेमळ भाविक असून प्रायः वैश्यवृत्तीचे आहेत. त्यांच्यांत कांहीं कार्यकर्ते, साधु व कवि झाले आहेत. पेशवाईंत रामचंद्रबावा शेणवी व शिंद्यांचे दिवाण जिवबादादा बक्षी हे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले. प्रसिद्ध योगी व सत्कवि सोहिरोबा आंबिये यांचे ग्रंथ व पदें वगैरे लोकमान्य आहेत. 'डोंगरी'वर कृष्णंभट बांदकर हे थोर रामदासी नुक्तेच होऊन गेले व त्यांचे चिरंजीव ह. भ. प. मुकुंदराजबाबा हेही मोठे अधिकारी आहेत. माशेलचे ह. भ. प. दिगंबरदास उर्फ विठ्ठल कृष्ण कामत व त्यांचे वडील बंधु 'नामजपाचे' पुरस्कर्ते रामचंद्र कृष्ण कामत या उभय सद्भक्त बंधूंचा परिचय मुमुक्षूच्या वाचकांस जुनाच आहे. सारस्वतांत कांहीं पट्टीचे विद्वानही होऊन गेले आहेत. पुर्तगाळ मठाचे अधिपति श्री. इंदिराकांतस्वामी यांची विद्वत्ता लोकविश्रुत आहे. मडगांवांत रा. गोविंद पै यांच्यासारखे प्रेमळ नामप्रेमीही पाहण्यांत आले. डॉ. सुब्राव नाईक ( सुब्रह्मण्यानंदतीर्थ स्वामी ) हे परोपकारी धर्मशील विद्वान् वैद्य २५ वर्षांमागें मडगांवास होऊन गेले. स्वामी विवेकानंद अमेरिकेला जाण्यापूर्वी त्यांच्या भेटीसाठीं येथें येऊन त्यांच्या सहवासांत थोडे दिवस राहून गेले होते. असो. गोव्यांत पोर्तुगीज अंमल चारशें वर्षांपासूनचा असल्यामुळें जबरीनें बाटविलेल्या किरिस्ताव लोकांची बरीच वस्ती आहे. पण त्यांचें व हिंदूंचें बरेंच सख्य आहे. मडगांवीं आमचें राहणें आठ दिवस घडलें. रा. रामचंद्र केणी यांचे प्रशस्त वाड्यांत व्यवस्था उत्तम राहिली. त्यांचे घरची व इतर ग्रामस्थ मंडळी फार अगत्यानें वागली. रोज रात्रीं प्रवचन होत असे. नवविधा भक्तीवर सातआठ प्रवचनें झालीं. बेळगांवची भजनी मंडळी तेथें आल्यामुळें दोन कीर्तनेंही झालीं.

## ३ देवस्थानें व सृष्टिसौंदर्य.

नंतर आम्ही गोवे प्रांतांतील देवस्थानें व सुंदर स्थळें दोन दिवसांत मोटारीनें पाहून आलों. बरोबर मंडळी होतीच. बहुतेक देवस्थानें मध्यवर्ती

फोंडा महालांत आहेत. इकडील देवस्थानें फार रमणीय आहेत. रामनाथ, नागेश, महालक्ष्मी, कवळे येथील शांतादुर्गा, मंगेश, म्हारदोळ ( म्हाळसा, महालसा ), वेलिंग येथील श्रीलक्ष्मीनृसिंह अशीं आठ देवस्थानें पहाण्यांत आलीं. देवस्थानें फार रमणीय व प्रशस्त आहेत. प्रत्येक मंदिराच्या समोर प्रशस्त तलाव, दोनदोन वावेंत न मावणारे प्रशस्त स्तंभ, देवतेच्या मध्यगाभाऱ्यांत ३० ते ६० पर्यंत अहोरात्र जळणारे दीप, सभोंवारची अनुपम सृष्टिशोभा, घनदाट वृक्षवनराजींची अखंड छाया, नारळींपोफळींचीं व इतर कोटयवधि झाडें, पौषाच्या महिन्यांतही पाण्यानें भरलेलीं दुसऱ्या पिकाचीं भातखाचरें, मधूनमधून अनेक खाडया व तऱ्याऱ्या त्यांतून चालणाऱ्या बोटी ह्या सर्व मनोरम दृश्यांनीं मन मोहून शांतिसुखाच्या लहरीवर लहरी येऊन काळ अत्यानंदांत गेला. गोव्यासारखी सृष्टिशोभा अन्यत्र पाहाण्यास क्वचितच मिळेल. पुढील प्रवासांत कारवार गोकर्ण वगैरेकडेही मोठमोठालीं जंगलें व दाट झाडी पाहिली, पण गोव्यांतील दाट वृक्षराजींवरील अखंड टवटवी कांहीं अनुपम आहे. मुक्तेश्वर कवीनें आपल्या भारतांत वर्णिलेली सृष्टिशोभा गोव्यांत मूर्तिमंत दिसते, कदाचित् मुक्तेश्वर गोवेप्रांत पाहूनही गेले असतील. इकडे पावसाची सरासरी १२५ इंच आहे. यावेळीं उष्माही नाहीं व थंडीही नाहीं अशी हवा फार सुखदायक आहे. देवस्थानांच्या टापूंत ‘ पावला पावला उदकें ’ व ‘ निर्झरोदकाचे सैरावैरा धांवणारे ’ पाट पाहून जें समाधान वाटलें तें आमच्या इकडील महाराष्ट्रीयांनीं अवश्य जाऊन अनुभवावें. एका पूर्वरात्रीं आह्मी मोठ्या खाडींतून बोटीबोटीनें जात होतों, खाडीच्या दोहीं बाजूंस दाटवृक्षांच्या नुसत्या रांगांवर रांगा लागून आसपासचे डोंगर वृक्षाच्छादित दिसत होते, कांठच्या वृक्षांच्या व लहानसहान टेकडयांच्या छाया खाडींत लांबवर पडल्या होता, मंद चंद्रप्रकाशानें खाडीवरच्या लाटा एकमेकांच्या अंगावर रेळत रेळत पुढें सरकत चाललेल्या दिसत होत्या, त्यावेळची आनंदोल्हासाची समाधानी कांहीं अपूर्व होती. आमचे अर्वाचीन कवि इकडे कांहींकाळ राहून व सृष्टिशोभा पाहून जातील तर त्यांच्या वर्णनाला साक्षात्काराचें तेज चढल्यावांचून राहणार नाहीं. गोवेप्रांतभर जंगलांतून व वृक्षराजींतून इतस्ततः विखुरलेलीं अनेक खेडीं आहेत. त्यांतही कित्येक घरें अशीं मजबूत, सुंदर व प्रशस्त बांधलेलीं आढळलीं कीं तशीं आमच्याकडे शहरांतूनही क्वचितच सांपडतील. मात्र हीं घरें जितकीं स्वच्छ तितकींच त्यांतून राहणारीं माणसें स्वच्छ राहणीचीं असतीं तर बरें होतें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. कासावली येथें अशाच एका घरीं आह्मी एक रात्र काढली. मात्र त्या घरांतील राहणीही स्वच्छ होती व घरधनीण एक वृद्ध बाई असून तिचा दासबोधाचा जन्माभ्यास पाहून फार समाधान झालें. आमच्या इकडे समर्थांच्या नांवाचा फुकट जयजयकार करणाऱ्या शेंकडों लोकांत त्या

बाईइतके दासबोध जाणणारे लोक थोडेच सांपडतील! मंगेश येथें आमच्या मोटारी तिनीसांजां पोंचल्या. तो दिवस अनायासें सोमवारचा होता व रात्रीं पालखीची मिरवणूक होती. लोकांच्या आग्रहावरून आह्मी रात्रीं तेथें राहिलों. मंगेशासमोर प्रवचनाची थोडी सेवाही करावी लागली. देवस्थानें पाहून आह्मीं पुढें पणजीकडे गेलों. वाटेंत पोर्तुगीज अंमलाच्या प्रारंभीं बांधलेलीं जुन्या गोव्यांतील भव्य चर्चेंही पाहिलीं. पणजी शहर छोटेंच पण सुंदर टुमदार आहे. तेथून मोठ्या बोटींतून मार्मागोवा बंदरावर जावें लागतें. मार्मागोवा हें बंदर पाहण्यासारखें आहे. तेथून अथांग महासागरच पुढें पसरलेला आहे. तेथें धक्का फारच मोठा आहे. मुंबई बंदरासही तेवढा मोठा धक्का नाहीं. तेथून वास्को-दिगामा वगैरे स्टेशन्सवरून रेल्वेनें मडगांवला आलों व तेथें एक दिवस विश्रांति घेऊन कारवारमार्गें गोकर्णाची वाट धरिली.

## ४ आमचे सोबती.

आमच्या या एकंदर यात्राप्रवासांत तिघांनीं आमची शेवटपर्यंत पाठ सोडली नाहीं. तिघेही व्यापारीपेशाचे, आपला धंदा सोडून संगतीच्या सुखासाठींच बरोबर आलेले. त्यांच्या संगतीमुळें आमचा प्रवास सुखकर झाला. एक शहापूरचे महादेवआप्पा कुदळे. हे बेळगांवापासून परत येईपर्यंत आह्मांबरोबर होते. हे श्री नारायण महाराज केडगांवकरांच्या संगतींत भक्तिप्रेमानें भिजलेले, भजनी, नामप्रेमी व प्रेमळ गुरुभक्त आहेत. हे मोठे आनंदी, विनोदी व अत्यंत कळकळीचे सज्जन आहेत. दुसरे सावडर्याचे विठ्ठल कृष्ण गुडे. हे स्वतः चांगले वाचक, पाठांतर बहुत असलेले, बहुश्रुत असून उत्तम श्रोते आहेत. अखंड बोलण्याची स्फूर्ति देणारे हे आमचे विठोबा! यांना श्रवणसुखाची गोडी फार. यांना मस्तकाच्या, पाठीच्या वगैरे शिरांची व चंपीची माहिती उत्तम असून बोलण्याचालण्याचे श्रम तात्काळ परिहार करण्याची यांची कला वर्णनीय आहे. घरचे सुखवस्तु असून केवळ प्रेमामुळें यांनीं वारंवार आमचे श्रमपरिहार फार केले आहेत. तिसरे सोबती दत्तात्रय पांडुरंग दलाल. हे मडगांवचे राहणारे असून तेथील सार्वजनिक चळवळींचे पुरस्कर्ते व नमुनेदार स्वयंसेवक आहेत. गाड्या मोटारी ठरविणें, बाजारहाट करणें, बायकापोरांची सौम्यशब्दांनीं मनधरणी करून गोडीनें प्रवासाची एकंदर व्यवस्था पाहणें हें सर्व काम अत्यंत निरलसपणें, निःस्वार्थपणें, स्वतःच्या पदराला खार लावून घेऊन निरहंकारपणानें करणें हे यांच्या अंगचे गुण खरोखर इतके बहुमोल आहेत कीं मोठमोठ्या शहरांतूनही असले गुणी राष्ट्रसेवक फार विरळ सांपडतील. हे सहकुटुंब सहपरीवार आमच्या बरोबर होते. उत्तम कार्याची सेवा कशी करावी हें त्यांच्यापासून शिकण्यासारखें आहे. यांची साध्वी स्त्री मनमोकळी, प्रेमळ व चतुर असून हें दांपत्य सुखी

आहे. महादेव आप्पांचें प्रेमळ भजन व गोड गायन यांनीं साऱ्या प्रवासभर सर्वांचा उल्हास वाढला ठेवला. त्यांच्या तोंडून वारंवार ऐकलेलीं दोन पदें खालीं देतों.

## पद पहिलें.

शिकला बातबेत सारा । जुपला बैल संसारा ।। ध्रु० ।।
सवड गुलामा नसे सलामा । सदोदीत जूं खांदीं ।
हरिभजनाच्या वाटणीस ती । न ये घडी एखादी ॥ १ ॥
करि नित्याचा सणवाराचा । खर्च बातबेतानें ।
झाडाझडती तेल मिठाची । पीठ मोजि हातानें ॥ २ ॥
पुण्यतिथीला घे पंक्तीला । व्याही आप्त जावाई ।
अतिथी द्वारामधें पाहतां । चढे मस्तकीं वाई ॥ ३ ॥
शिरिं बेताची पगडी गाडी । घोडी माडी खिडकी ।
दे धर्माला खोटा पैसा । घोटि सुपारी किडकी ॥ ४ ॥
चिरेबंदी उंच हवेली । बांधीं बळकट पाया ।
रोकडवाढी दिली वाढवी । आपण आला आटपाया ॥ ५ ॥
स्नानसंध्या जपतीर्थाटन । पुराण कीर्तन वर्जी ।
धर्म वाढिना कदा मोडिना । बायकोचि मर्जी ॥ ६ ॥
जों जों थकला पिकला सुकला । तों तों संग्रह केला ।
विष्णुदास म्हणे अखेर एकला । रडत नागवा गेला ॥ ७ ॥

## पद दुसरें

दुसरें पद श्रीकृष्ण कथापर आहे. 'गोपाळकृष्ण राधाकृष्ण' हें भजन प्रथम सर्वांनीं करावयाचें असून पुढें दरवेळीं श्रोत्यांनीं 'राधाकृष्ण' म्हणायचें.

गोपाळ कृष्ण राधाकृष्ण ॥ ध्रु० ॥
कृष्णाप्रती गोपाळ । बोलती सकळ । अकळती नकळ ।
आतां ता ता ता । ता । गो० रा० ॥ १ ॥
कान्होबाची संगती । ब्रह्मादिक इच्छिती । धन्य आह्मां म्हणती ।
हा हा हा हा हा । हा । गो० रा० ॥ २ ॥
अजगर मारीला । वणवा गिळिला । गोवर्धन उचलीला ।
अ ब ब ब ब । ब । गो० रा० ॥ ३ ॥
केशीयाशी मारिलें । शकटासी चूर्ण केलें । दोन्ही वृक्ष उन्मळीले ।
अ रे रे रे रे । रे । गो० रा० ॥ ४ ॥
मामा मारूं गेलासी । आपटीले गजासी । मल्लयुद्ध खेळलासी ।
हु तू तू तूं तूं । तूं । गो० रा० ॥ ५ ॥

यमुनाडोहीं पोहतां । काळियासर्प तेथें होता । नाचलासी त्याचे माथा ।
थै थै थै थै थै । थै०॥ गो० रा० ॥ ६ ॥
सोळा सहस्र गोपींसीं । कृष्णनाथा भोगीसी । ब्रह्मचारी म्हणवीसी ।
अ रे रे रे रे । रे० ॥ गो० रा० ॥ ७ ॥
ऐसे तुझे पवाडे । ब्रह्मादिक झाले वेडे । विष्णुदास नामा म्हणे ।
अय्यो यो यो यो । यो० ॥ गो० रा० ॥ ८ ॥

## ५ गोकर्णमहाबळेश्वरच्या वाटेंत.

मडगांवहून काणकोणमार्गें पर्तगोळपर्यंत मोटारी ठरवून आम्ही निघालों तों तिनीसांजा पर्तगोळपासून ३ मैलांवर अलीकडे आलों. नदी लागली. उतरण मोठी. मोटारीवाले आंखडले! खडकाळ उतरण ओलांडून पुढें जाण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. बायकांमुलांसुद्धां १५।२० माणसें आम्हीं, १५।२० लहान मोठे बोजे! तासभर घोळ पडून हमालांच्या डोक्यांवरून बोजे व एक मनुष्य पुढें मठांत पाठविलें व आम्हीं सर्व भजन करीत वाट चालूं लागलों. पाऊण मैल गेल्यावर नदी दुसऱ्यांदा आडवी आली. गोटे फार, अंधार पडूं लागलेला, बायका चालेनात, मुलांनीं भुकेमुळें डोक्यावर घेतलें. एक बाई गरोदर, एक पायांनीं थोडी अधू, खालीं बसल्या त्या हलेनात. पाऊण मैलाची चढण पुढें. सभोंवर सर्वत्र भयाण जंगल! अंधार पडलेला. कठिण प्रसंग असें सर्वांस वाटलें. पण सर्व मजेंत होतों. शेवटीं आमच्या विठोबांनीं कोठूनशी एक रेड्याची गाडी धुंडून आणली. त्यांत त्या बाया व चार मुलें बसविलीं व मागें नामघोष करीत आम्ही सर्वजण वाट चालूं लागलों. जंगलचा मार्ग आणि खडबडीत रस्ता. साडेनवाला मठांत पोचलों. लगेच पिटलेंभात करून जेवलों व ११ वाजतां मठाधिपति श्रीइंदिराकांत स्वामींच्या दर्शनास गेलों. स्वामी विद्वान् आहेत हें ऐकून संवादसुख मिळेलसें वाटलें होतें. पण स्वामी माध्वसांप्रदायी असून द्वैतमताचा त्यांचा विलक्षण आग्रह व अद्वैताबद्दल करडी नजर व पूर्ण असहिष्णुता पहिल्या तीन वाक्यांतच प्रगट झाली! मंडळीनीं स्वामींस ओळख करून दिली. आम्ही शांकरमतानुयायी व महाराष्ट्रीय साधुसंतांचे भक्त. आमची वादप्रवृत्ति नसल्यानें आम्हीं मौनच धरिलें. द्वैत व अद्वैत या अखेरच्या गोष्टी सोडून उभयतांना प्रिय अशा उपासनेच्या गोष्टीच प्रेमानें बोलूं असें आम्हीं सुचविलें, पण 'अद्वैताचें विष'—नकोत तो विषयच सोडून देऊं:—'अद्वैतामृतवर्षिणी' याबद्दल त्यांचा पाठ 'सद्वैतामृतवर्षिणी.' हे माध्व प्रायः असहिष्णु फार दिसतात. श्रीशंकराचार्यांना व अद्वैत सिद्धांतांना ऐकायला कटु अशीं विशेषणें ते लावतात. असो. दुसरे दिवशीं भोजनोत्तर दुपारीं आम्ही बैलगाड्या करून स्वामींचें दर्शन घेऊन निघालों तों पुन्हा काणकोणवरून

सायंकाळीं 'तर्पण' बंदरावर आलों व तेथील 'सरकारी बंगल्यात' मुक्काम केला. शेजारच्या खाणावळीण बाईच्या घरीं आमचा आम्ही स्वयंपाक करून जेवलों व पांच सहा माणसेंच गर्दीनें झोंपतील अशा त्या बंगल्यात १५।२० माणसें व १५।२० बोजे असे कसे तरी सामावून 'कलकत्त्याच्या ब्लॅक होल' ची आठवण करीत मजेनें रात्र काढली. प्रातःकाळीं प्रातर्विधी सर्वांचा उरकून बोटींतून खाडी ओलांडून पलीकडे गेलों. बैलगाडया तीन केल्या. तीन मैल गेल्यावर पुन्हां खाडी आली. पुन्हां बैलगाडया बैलसामानासह होडीवर घालून पलीकडे नेल्या. तो देखावा पाहून नवल वाटलें! पुन्हां उर्वळीचे खाडींत आमच्या दोन्ही मोटारी आम्हांसह बोटींवर घालून नेण्यांत आल्या! दोन बोटींवर मोठा लांकडी प्लॅटफार्म घालून त्यावर गाडया, मोटारी व माणसें चढवून बोटी खाडींतून वल्हवीत नेतांना पाहून घाटावरील माणसांना अत्यंत आश्चर्य व मौजही वाटेल! आंकोला येथील लक्ष्मीनारायणाचें मंदिर पाहून दुपारीं तीन वाजतां सदाशिवगड येथें आलों. तेथें ओळख काढून एका प्रशस्त घरांत सामान लावून दिलें. सर्वांनीं स्नानें केलीं, भोजन उरकलें व पुढें कारवार येथें जाण्याचें ठरविलें. सदाशीवगडपासून कारवारची खाडी फार मोठी असून गेल्या तीन दिवस वादळामुळें बोटींचा व्यवहार बंद पडला होता. तथापि आम्ही बंदरावर गेलों तों वारा अनुकूल लागल्यामुळें मौजेनें समुद्राची हवा खात कारवारचे बंदरावर रात्रीं ८ ला पोंचलों व धमन्या करून कारवारला रात्रीं ९ वाजतां पोंचलों. वाटेच्या दगदगीमुळें मंडळी जातांच झोंपली. कारवारास मुक्काम रा. हळदीपूर या सुखवस्तु गृहस्थाचे घरीं झाला. दुसरेच दिवशीं मोटारी करून दुपारीं २ वाजतां गोकर्णमहाबळेश्वर येथें जाऊन पोंहचलों. कारवार येथें श्रीतुकारामभक्त शिवराव कैकिणी, हायकोर्ट वकील, यांची भेट होऊन एक तास मोठया आनंदांत गेला. कारवारच्या मंडळींचा तेथें व्याख्यानासाठीं राहण्याचा फार आग्रह होता, पण एकादशीच्या दिवशीं गोकर्णास जाऊन समुद्रस्नान करून श्रीशिवदर्शन घेण्याचा आमचा संकल्प असल्यामुळें आम्हीं राहिलों नाहीं. मार्मागोवाहून ८ तासांत थोरल्या बोटीनें आम्हांस गोकर्णास येतां आलें असतें; पण गोवेप्रांत व कारवार जिल्हा ह्यांत फिरून गांवें, खाडया, बोटी यांचा अनुभव आम्हास घ्यावयाचा असल्यामुळें आम्हीं हा मार्ग मुद्दाम पत्करला. आमचा हा प्रवासही फार आनंदाचा झाला. वाटेंत शाहळीं, केळीं व फराळाचें जिन्नस यावर सर्वांनीं यथेच्छ ताव मारावा, गोष्टी बाता हास्यविनोद करीत मार्ग क्रमावा, मधून मधून माहादेवआप्पांनीं सर्वांस भजन करायला लावावें, मग सर्वांनीं मुक्त कंठानें गावें, बागडावें, नाचावें असा क्रम वाटभर होता. सुटया पुरुषांच्या प्रवासाची मौज वेगळी, बायकामुलांसुद्धां प्रवास करण्याची मौज वेगळी. कमीजास्त खाणें, अकालीं

भोजन व निद्रा सर्व नित्याचे निर्बंध सुटले, तरी चित्ताच्या उल्हासामुळें कांहीं एक बाधत नाहीं व सर्वांच्या प्रकृति सुधारतात असा सर्वांचाच अनुभव आहे.

## ६ गोकर्णमहाबळेश्वर.

गोकर्णास दोन दिवस राहण्याचा बेत असून सर्वांचें चित्त रमल्यामुळें पांच सहा दिवस आम्ही आनंदांत राहिलों. सुब्बाभटजी बीन शेषभटजी मुळे हे महाबळेश्वरचे मुख्य पुजारी असोन त्यांचे घरीं आम्ही उतरलों व त्यांच्या घरच्या स्त्रीपुरुषांनीं सर्वांनीं आमची व्यवस्था उत्तम ठेवली. श्रीगोकर्णमंदिराच्या पाठिमागेंच यांचें प्रशस्त घर असून त्या घराचे मागें समुद्र असें असल्यामुळें मोठें सोयीचे झालें. श्रीशंकरास गोकर्ण हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं पृथ्वीनें गाईचें रूप धरिलें तेव्हां अंगुष्ठरूपानें तिच्या कर्णांतून शंकर बाहेर पडले. शंकराची पिंडीही येथें अंगुष्ठरूप असून आंत आहे. हें क्षेत्र अतिप्राचीन आहे. गोकर्णाला रुद्रयोनी किंवा वरुणावर्त असेंही म्हणतात. रामरावणाच्या वेळीं ह्या शिवस्वरूप आत्मलिंगाची स्थापना झाली. महाबलदाता म्हणून महाबलेश. महाबलेश गोकर्ण हें मुख्य स्थान आहे तरी याचे आसपास लहान मोठीं अनेक पुण्यस्थानें आहेत. पाठीशीं गणेशमूर्ति असलेलें गणपतीचें मंदिर आहे. आधीं गणेशपूजन व मग गोकर्णपूजन असा येथें प्रघात आहे. गोकर्णापासून नजीक शतशृंग पर्वत आहे त्याचे शिखरावर चढून पाहिलें असतां समुद्राचा विशाल व भव्य देखावा फार सुंदर दिसतो. या पर्वतावर लहान मोठीं अनेक तीर्थें आहेत. त्यांत रामतीर्थ फार रमणीय आहे. त्यासमोर एक साधु सांप्रत मोठें कुंड बांधीत आहेत, त्यांत पर्वताचे मध्यांतून वाहणारे निर्मल उदकाचे दोन अखंड वाहणारे झरे घेतले आहेत; शतशृंगपर्वत फार मोठा आहे व त्यावर बरींच तीर्थें आहेत. कोटितीर्थ गांवाचे मध्यभागीं असून त्यांत स्नान करण्याचा विधि आहे. कोटितीर्थ हा बराच विस्तृत तलाव असून त्यांत स्नान करण्याचें थोर पुण्य सांगितलें आहे. ह्या तीर्थाचें स्नान व समुद्राचें स्नान अशीं स्नानें, गणेशाची पूजा व महाबलेशाची महापूजा हा येथील मुख्य विधि प्रायः सर्व यात्रेकरू करितात. आम्हीं अष्टादश धान्यांची महापूजा बांधली व देवापुढें दीपोत्सव केला. आम्हांस ह्यास अडीच तास लागले. महाशिवरात्रीस येथें ४०।५० हजार यात्रा भरते. ते वेळीं दर्शन होणेंही मुष्किलीचें होतें, पण आम्ही गेलों ते वेळीं निवांतपणें श्रीगोकर्ण महाबळेश्वराची महापूजा स्वहस्तें गीतवाद्यादिकांसमवेत आह्मांसर्वत्रास करितां आली व यात्रा यथासांग पार पडली याबद्दल मनःपूर्वक संतोष झाला. पुजारीबोवांनीं उत्तम साह्य केलें, कोणत्याही प्रकारें तसदी दिली नाहीं, इतकेंच काय पण आह्मी स्वंतोषानें दिलें तें आनंदानें घेऊन संतोष दिला, व ह्मणून मुळें

भटजीस क्षेत्रोपाध्येपण लिहून देण्यांत आह्मांस पुढें आनंद वाटला. ते दिवशीं सोमवार शिवरात्र होती (मार्गशीर्ष कृष्ण १४). समुद्रस्नानाची, सायंकाळीं वाळवंटांत लोळण्याची, मुलाबाळांना यथेच्छ बागडण्याची, महादेव आप्पांना मनमुराद गाण्याची, सर्वांना सर्व प्रकारची पूर्ण मोकळिक असल्यानें खूपच आनंदांत हे दिवस गेले. 'ॐ नमःशिवाय.' गोकर्णास प्रवचनादि हजेरी दिली. ब्राह्मणांचा घरीं वेदघोष करून यथाशक्त्या अन्नसंतर्पण झालें.

## हुबळी.

पौष शुद्ध १ स आह्मी १० वाजतां स्नानभोजनदर्शनादिक उरकून मोटारीनें गोकर्णाहून निघालों तों सायंकाळीं ६ वाजतां हुबळीस येऊन पोहोचलों. हुबळीस श्रीकृष्णभक्त सुब्रात गोपाळ उभयकर यांचे घरीं उतरलों. हे व यांचे कर्ते पुतणे गोपाळराव व पद्मनाभराव यांनीं आणखी एक दिवस ठेवून घेतले. हुबळींस दोन दिवस फार सुखांत गेले. सुब्रावबावा हे श्रीरमावल्लभदास सांप्रदायाचे असून त्यांनीं सद्भक्त 'आवडी' यांची भजनपरंपरा चालविली आहे. चुलते पुतणे खरे सत्वस्थ व प्रेमळ आहेत. सुब्रावबावांची कृष्णभक्ति अपार आहे. प्रेमळ भक्त ह्मणून एक रात्र यांचे संगतींत काढल्यास कोणासही भक्तिसुखाची माधुरी कळणार आहे. घरांत भक्तीचें गोड वातावरण यांनीं उत्पन्न केलें आहे. रमावल्लभदास यांची गीतेवरील 'चमत्कारी टीका' 'श्रीकृष्णजयन्तीव्रतकथा' इ० ग्रंथ यांनीं आस्थेनें मिळवून छापविले आहेत. यांच्या संगतींत भक्तिसुखाची लूट मिळाली. यांच्या घरचीं मुलेंबाळें व स्त्रीमंडळही यांनीं भजनांत रंगविली आहेत. यांच्या घरच्या लहान गोजिऱ्या मुलींच्या तोंडून पुढील नाथांचें पद हावभावसहित अनेकवार ऐकून सर्वांसच फार आनंद झाला.

## पद.

भिंगाचें भिंगुलें । खांद्यावरी आंगुलें ।
नाचत तान्हुलें । यशोदेचें ग बाई । यशोदेचें ॥ १ ॥
येती गवळणी । करिती बुजावणी ।
लागति चरणीं । गोविंदाच्या ग बाई । गोविंदाच्या ॥ २ ॥
कडदोरि बिंदुलीं । वाघनखें साजिरीं ।
नाचत श्रीहरी । यशोदेचा ग बाई । यशोदेचा ॥३॥
गोपीका भोळिया । वाजविति टाळिया ।
आमुचा कान्हया । देवराव बाई । देवराव ॥ ४ ॥
एका जनार्दनीं एकत्र शरण ।
भावें निंबलोण । उतरती बाई । उतरती ॥ २ ॥

सुब्राव बाबांनीं प्रेमभरांत कित्येक कवनें रचलीं आहेत त्यांतील एक श्रीकृष्णरूपावरचें ' व एक संतगौरवा'चें अशीं दोन मुलांकडून (व स्वतः) गायिलेलीं देतों.

## १ श्रीकृष्णपर पद.

चालः—आजि सगुणस्वरूप म्यां पाहिलें ।
किति सुंदर अहाहा कृष्ण रूपडें ।। ध्रु० ।।
रूप हें कृष्ण रूपडें । निरखितां जीवु आनंदीं बुडे ।। १ ।।
पूर्णब्रह्म हें सगुणरूपातें । धरुनि झालें नंदनंदन ।। २ ।।
सर्व सुखाचें ओतिव साचें । त्रिभुवनसुंदर आनन ।। ३ ।।
देहुडाचरणु ॐ आकृति तनु । विटेवरि उभा मनमोहनु ।। ५ ।।
दासाचें ब्रीद कृष्णभक्ति । परमपावन सौंदर्यभूषणु ।। ५ ।।

## २ संतस्तवनपर ( राग–सोहनी )

पहा पहा वैष्णववीर । परमपावन हरिकीर्तनरंगीं ।
रंगुनि येति समोर ।। ध्रु० ।।
टाळ वीणा मृदंग घेउनि । धुमकिट धिक्किट धिलांग म्हणुनी ।
थै थै थै थै प्रेमें नाचुनि । डुल्लत येति समोर ।। पहा० ।। १ ।।
हरिनामाचा झेंडा झेलित । नवविधभक्तीडंका वाजत ।
भक्तां प्रेमसुधारस पाजित । करिती जयजयकार ।। पहा० ।। २ ।।
कुजनीं करितां छळ अतिनिंदा । न सोडिती जगजनहितधंदा ।
शास्त्राचरणीं गोवुनि मंदा । करिती दीनोद्धार ।। पहा० ।।३।।
विषयी लोकां भाविक करुनी । आधीं सगुणीं गोडी लावुनि ।
शेवटीं स्वात्मानंदीं बुडवुनि । करिती ज्ञानी उदार । पहा० ।। ४ ।।
दासा पदरजें पावन करिती । वासुदेवकवनें आच्छादिती ।
कृष्णभक्ति दिवटा करिं देती । निरसिति जगदंधार ।। ५ ।।

सुब्रावबाबांना अलीकडे दिसणें व ऐकूं येणें कमी झालें आहे तरी चंद्रदर्शनानें समुद्राला भरती येते तशी श्रीकृष्णस्मरणाबरोबर त्यांच्या भक्तिसुखसमुद्राला भरती येऊन त्यांचें शरीर अष्टभावांनीं भरून नेत्र प्रेमाश्रूंनीं झर झर वाहत असतात. त्यांची अशी कोमल मधुर भक्ति आहे. आमच्या मोटारी त्यांच्या दारापुढें उभ्या राहिल्या व त्यांना कळलें मात्र तों 'या हो या हो...' म्हणून तटकन् उभे राहिले व जवळ येतांच त्यांनीं प्रेमपाशांनीं घट्ट आवळून वरील पदांनीं सत्कार केला. सत्कार कसला–महाबोध केला, जागृतीची संजीवनी पाजिली, जडदेहांत चैतन्य ओतलें ! उभयतांच्या व इतरांच्याही नेत्रांतून प्रेमाश्रुधारा चालल्या. दुनियेंत सर्व भेटेल, पण भक्ताची भेट दुर्लभ आहे !

सुब्रावबावा परम प्रेमळ भक्त आहेत. ह्या खेपेच्या ह्या प्रथमभेटीच्या पहिल्या क्षणाला बावांनीं जी स्फूर्तीची महालाट उठविली ती हुबळीचा मुक्काम दोन दिवसांनीं हलेतों कायम होती. अद्यापही ती ओसरली नाहीं! 'संत हीं देवाचीं रूपडीं' आहेत यांत संशय काय? हाच कृष्णभक्तीचा आनंद हुबळीस दुसऱ्या एका घरीं मिळाला. 'नागलीबाई' व त्यांचे यजमान असेच अत्यंत प्रेमळ आहेत. नागलीबाईंनीं भेट होतांच जो असाच प्रेमाचा पूर वाहविला त्याला तोड नाहीं. त्यांच्या तोंडून सहज उत्कट प्रेमभरांत जी शब्दनिर्झरी वाहिली ती लेखणीनें लिहितां येत नाहीं.'श्रीतुकारामचरित्रानें' त्यांच्या हृदयांत हा प्रेमा उभा केला.त्या ग्रंथांतील १।२ प्रकरणें तरी नित्य वाचल्याशिवाय त्यांना राहवत नाहीं. "महाराज! हा ग्रंथ तुकोबारायच आपल्या मुखानें बोलले आहेत. माझें संतप्त हृदय आपण आपल्या वाणीनें शमविलें आहे......" श्रीतुकोबारायांचे चरित्रावर अनेक विद्वानांनीं अभिप्राय दिले, टीका केल्या, तथापि त्या प्रसंगीं नागलीबाईंची ती उत्कंट भक्ति व तें प्रेममय स्फुंदणें वगैरे सात्विक भाव पाहून आम्हां सर्वांसच अत्यंत गहिंवर आला. नारायणानें आपल्या हातून खरोखरच इतकी उत्कृष्ट सेवा घेतली आहे काय असें वाटून तत्प्रीत्यर्थ झालेल्या सकल श्रमांचा परिहार झाला. ह्या प्रेमळ अंतःकरणांतून जो जिव्हाळ्याचा उद्गार अश्रुप्रातांसह निघाला त्या पुढें विद्वानांचे सर्व अभिप्राय काय होत? असो. सुब्रावबावांच्या श्रीकृष्णमंदिरांत रात्रीं कीर्तन होऊन आम्ही निघालों तों आमच्याबरोबर गोपाळराव सहकुटुंब निघाले. हुबळीस एक दिवस श्रीसिद्धारूढस्वामींचें दर्शन झालें. वय ९५ आहे. मूर्ति शांत, दृष्टि निवालेली व प्रसन्न आहे. बाबा गर्दे यांनीं स्वामींवर जें पद केलें आहे त्यांतील वर्णन यथार्थच आहे. महादेवआप्पांच्या प्रेमाग्रहास्तव बेळगांवीं एक रात्र त्यांचे घरीं भोजन समारंभास्तव उतरलों व दुसरे दिवशीं सर्व मंडळी नरसोबाच्या वाडीस गेलों.

## ८ नरसोबाची वाडी व कोल्हापूर.

बेळगांवाहून सकाळीं ८ वाजतां निघून १ वाजतां मिरजेस आलों व मोटारीनें २ वाजतां वाडीस येऊन पोंचलों. श्रीकृष्णाबाईचें स्नान व दर्शन होऊन सायंकाळीं ५ वाजतां अन्नाची आमची गांठ पडली. तो दिवस शनिवार होता. रात्रीं पालखी निघाली होती. प्रदक्षिणेस आरंभ होता.लोकांच्या प्रेमास्तव पालखीपुढें दोन प्रार्थनेचे अभंग म्हटले व रात्रीं ११ वाजतां श्रीदत्तपादुकांपुढें 'एको विष्णुर्महद्भूतं' ह्या श्लोकावर प्रवचन झालें. वाडीचें पवित्र व रम्य स्थान, हुबळीपासून प्रेमा चित्तांत दाटलेला, भाविक गृहस्थ व विद्वान् संन्यासी यांचा समाज, खूप आनंद झाला. "हें परमात्म्याच्या वस्तीचें पुण्यक्षेत्र, येथें

अंगांतलीं भूतें जातात. जीवकोटींत भूतांचीही एक योनि आहे, नाहीं असें म्हणवत नाहीं. पतितपामर भूतांनीं पछाडल्यामुळें पीडा पावून येथें येतात. येथें महद्भूत आहे. 'एको विष्णुर्महद्भूतम्' महद्भूतच भूतांना गिळून टाकतें. हीं भूतेंच पण काय ज्या पंचमहाभूतांचें पिंडब्रह्मांड बनलें आहे त्या पंचमहाभूतांनाही खाऊन टाकणारें हें महद्भूत आहे. हें भूतांच्या पलीकडचें आहे. हें एकीएक आहे, व्याप्यव्यापकभावरहित व्यापक ( विष्णु ) आहे, याला मात्र कोणी खाऊन टाकीत नाहीं. हें शाश्वत, अव्यय, अनादि आहे. साधीं भूतें पापिपामरांना पछाडतात, पंचभूतें सर्व जीवांना पछाडतात, पण दोन्ही प्रकारचीं भूतें हें महद्भूत गिळून टाकतें. आदिमध्यावसानीं हें एकमेवाद्वितीय आहे. पाप्यांना दुसरीं भूतें लागतात, पुण्यवंतांना हें महद्भूत लागतें. श्रीसमर्थ, तुकोबा, नाथ यांनीं हें महाभूत आपल्याला लागल्याचें लिहिलें आहे. हें आपल्याला लागावें म्हणून येथें यायचें व हीच त्याची प्रार्थना आहे." अशा आशयाचें येथें प्रवचन झालें. दुसऱ्या दिवशीं कोल्हापूरच्या जगदंबेच्या दर्शनास मोटारींनीं आम्ही गेलों. दोन तास देवीसन्निध काढले. बायांनीं देवीची ओटी भरली. सायंकाळच्या गाडीनें मिरजेस आलों. तेथून मंडळी कष्टी अंतःकरणानें वियोगदुःख पावून बेळगांवकडे गेली व आम्ही पुण्यास रात्रीचें मेलनें आलों. सर्व प्रवास महिनाभर अत्यंत सुखकर झाला. पुण्यामुंबईस आठवडा राहून आम्ही डिसेंबरचे अखेरीस नाशकास आलों. नाशकास मुंबईचे श्री लछमीदास यांनीं विष्णुयाग आरंभिला होता शेवटच्याच दिवशीं येतांच मंडपांत 'नामजपा'वर रात्रीं प्रवचन होऊन दुसरे दिवशीं ( पौष पौर्णिमा ) मोठी मिरवणूक निघून गंगाबाईच्या दर्शनास जाऊन तेथें अवभृतस्नान झालें. आनंदी आनंद आहे. 'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती' ह्या तुकोबारायांच्या उक्तीचें व 'आपुलीं वाटती सर्व धन्य तूं गा! रघूत्तमा' ह्या समर्थांच्या वचनाचें वारंवार स्मरण होत असे.

---

# मकरसंक्रमण.

लेखकः—माधव गोविंद भिडे.

जनिमृतिहि जयांच्या ध्यानिं येई न ऐसे
जन तिळ दिन वाढे हर्षती तेच कैसे ?
नव विषय करीं ज्या वेळि आला उदास
नृप कवडि मिळाल्या तो करी अट्टहास ॥ १ ॥
दिन नच कधिं येई सूर्यसंक्रांत नाहीं ?
परि विवरुनि चित्तीं यापरी कोण पाही ?
दिवस शुभ गणोनी वत्सरांतील एक
प्रकट करिति डौलें त्या दिवशीं हो ! विवेक ! ॥ २ ॥
विधिदिन दिधल्या जे आळसीं लोटतील
तिळभर दिन मोठा लाळ ते घोटतील
पचन न करवे ज्या पेज तो भस्मरोगी
उगिचीच बडवीतो हो ! टिऱ्या मिष्टयोगीं ! ॥ ३ ॥
मकरवदनिं जातो तो रवी धैर्यवंत
न धीर हृदयिं भीती संकटीं तोच संत !
चिडवित मकराशी तो पहा ! संथ चाले
जन नुमजुनि खाजें यांतलें हृष्ट झाले ! ॥ ४ ॥
कठिण समय येतो कालनेमिक्रमानें
गणतहि जगदीशक्षोभ लोक भ्रमानें
रवि परि सुविवेकी मार्ग तो आंखलेला
समचि सतत मानी लोपला ना उदेला ॥ ५ ॥
गगनपथ अनंत प्रेमधामासमान
नच लवभरि तेथें शोकहर्षास मान ।
रवि विततकरांनीं विश्व चुंबी विशाळ
सम विषय न लेखी काळ वा अंतराळ ॥ ६ ॥

तिळयव पितरांतें अर्पिती लोक जेव्हां
दिन दमशहि नेमें त्या रवी देत तेव्हां
तिळगुळ जन देण्या जीवमानां पहातां
रवि समय तयांना इष्ट आणोन देतां ! ॥ ७ ॥
कठिण हृदय वाटे त्या रवीचें तरी तो
निज नियमितवेगें कालपात्रा भरीतो
गमत जरि हवासा आतसा स्तव्य केव्हां
रवि तरि विरमेना मोहुनी जाण तेव्हां ॥ ८ ॥
ऋतुगत लघुता वा दीर्घता त्या न जाचे
बृहदणु नच रूपीं भेदभक्ता अजाचे
असातिल भुविं जेथें सौर मानी इमानी
सतत समचि भावें पूजिती त्या स्तवांनीं ॥ ९ ॥
रवि निजकर जेव्हां लांबवी उत्तरार्धीं
मन सहजचि तेव्हां आंखडी दक्षिणार्धीं
रविस समचि दोन्ही वाटती अर्ध गोल
सुखवि म्हणुनि आळीपाळिनें दोन्हि गोल ॥ १० ॥
स्तवित मुदभरें त्या लोक ते उत्तरार्धीं
तंव मुरडिति नाकें लोकही दक्षिणार्धीं
स्तवनिं धरि न आस्था निंदितांही न कोपे
म्हणुनि कठिण होतें भास्करां काय सोपें ॥ ११ ॥
क्रम तव रविराया ! पाहतां कंठ दाटे
विनवि तुजसि मातें आपुल्या नेई वाटे
सुख असुख गणाया शीकवी गा ! समान
विषमपण भवीं या होउंना भासमान ॥ १२ ॥

# कार्तिकीचा सोहळा.

श्रीपंढरपूरची कार्तिकी यात्रा नित्याप्रमाणें मोठ्या थाटानें पार पडली सव्वालाख यात्रा जमली होती. रोगराई कांहीं नव्हती. चंद्रभागेचें विस्तीर्ण पात्र माणसांनीं नुसतें फुलून गेलें होतें. जिकडे तिकडे अहोरात्र विठ्ठलाच्या नामाचा घोष दुमदुमून राहिला होता. ' जय जय रामकृष्ण हरी ' ' विठोबा रखुमाई ' ' ज्ञानोबा माउली तुकाराम ' या नामगजरानें कान पवित्र होत होते. निरनिराळ्या फडांवर कथाकीर्तनांची दंगल उडून नामघोषानें आकाश भरून गेलें होतें. ' चंद्रभागे स्नान विधि तो हरिकथा.' चंद्रभागेचें स्नान व हरिकीर्तन एवढाच सुलभ विधि ! असा हा सत्संप्रदाय आज शेंकडों वर्षें 'निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई । एकनाथ नामदेव तुकाराम ' यांनीं व यांच्या मार्गानें जाणाऱ्या अनेक संतसज्जनांनीं चोखाळलेला आहे. निर्धारतपणें या मार्गानें जावें. ' सकळांसी येथें आहे अधिकार.' ' जाणानेणा ' सकळांचा येथें अधिकार आहे ' या रे या रे लहान थोर । भलते याती नारीनर ' याप्रमाणें साधुसंतांनीं डांगोरा पिटून सर्वांना पाचारिलें आहे. वासकरांचा फड, देहूकरांचा फड, अजरेकरांचा फड, इ० फडांवर अनेक बुवा लोकांना हरिनामामृत पाजीत होते. वै० विष्णुमहाराज जोग यांचे शिष्य व्यंकटस्वामी व प्रो० दांडेकर यांचीं कीर्तनें चालू होतीं. खाजगीवाल्यांच्या वाडयांत केशवराव देशमुख यांचीं ज्ञानेश्वरीवरील पुराणें व कीर्तनें लोक भक्तिभावानें ऐकत होते. सातारचे दादामहाराज, बेळगांवचे नारायणबुवा, मौलाबुवा, गोधडेबुवा इ० कांहीं नवीन बोवांचे फडांवरही कथानामघोष चालू होते. भागवतधर्माच्या नामकथागंगेंत लहानथोर, स्त्रीपुरुष, जाणतेनेणते सर्वजण मज्जन करीत आपापल्या भक्तिभावानुसार प्रेमसुख चाखीत आनंदानें डोलत होते. पंढरीसारखें नामसंकीर्तनसुख पंक्तिप्रपंच न करितां देणारें महाक्षेत्र, दुनियेंत दुसरें नाहीं. पंढरीचा आनंद अतुल आहे. ' पंढरीच्या लोकां नाहीं अभिमान । पायां पडती जन एकमेकां ' असा निरहंकार होण्याचा उपदेश येथें सर्वांस मिळत असतो.

थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटे होईजे । तैं जवळिक माझी ॥

ह्या ज्ञानेश्वरमहाराजांच्या बोधामृताचे घुटके येथें घ्यावयास मिळतात.

पुंडलीक भक्तराज । तेणें साधिलें हें काज ।
वैकुंठींचें निज । परब्रह्म आणिलें ॥ १ ॥

पांडुरंग बाळमूर्ती । गाईगोपाळांसंगती ।
येऊनीयां प्रीती । उभें समचि राहिले ॥ २ ॥
महाक्षेत्र हे पंढरी । अनुपम्य इची थोरी ।
धन्य वारकरी । तुका म्हणे येथीचे ॥ ३ ॥

धन्य ही पंढरी, धन्य जीवींचा जिवलग विठोबा, धन्य पुंडलीक, धन्य चंद्रभागा, धन्य साधुसंत, धन्य हे वारकरी, धन्य ही भागवतधर्माची महागंगा व धन्य या पवित्रतम ओघांत सांपडून भक्तिसुखानंद भोगणारे आपण असे या पांच सहा दिवसांच्या महानंदांत मज्जन करणारे सर्व जीव मनासीं म्हणत असतात दशमीपासून काल्यापर्यंतच्या दिवसांत मागें टाकून आलेल्या स्त्रीपुत्रघरदारांची चुकूनही आठवण होत नाहीं! 'संसार तो कोण देखे। आम्हां सखे हरिजन' असे सहजोद्गार मुखावाटें येतात. गाडी पुलावरून गांवांत चालली कीं संसाराची पूर्ण विस्मृति पडून संसार मागेंच राहतो, व मुलीला माहेरघर दिसतांच किंवा वांसराला आई दृष्टीस पडतांच जो आनंद होतो त्या आनंदानें नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागतात. पंढरींतून बाहेर पडतांनाही कंठ गहिंवरून येऊन वियोगभयानें नेत्र असेच भिजून जातात व मधला पंढरिवासाचा काळ पळासारखा एकविध भक्तिप्रेमानुभवांत निघून जातो! हा अनुभव सहस्रावधि भक्तभाविकांना दर यात्रेच्या वेळीं येत असतो. हा सांगून समजायचा नाहीं, तेथें जाऊनच घेतला पाहिजे. एक वेळ पंढरीस जा कीं तो विठ्ठल ठक तुम्हांस मोहून आपलासा करीलच करील.

---

# पाषाण पोंवळी

( लेखक—नित्यानंद. )

## भक्ति

१ मनाचें चंचलत्व जाऊन त्याची एकाग्रता झाल्याशिवाय आनंदलाभ व्हावयाचा नाहीं. बेफाम घोडाप्रमाणें किंवा पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें स्वैर संचार करण्यामध्यें मनुष्याला सुख वाटतें; पण हा निव्वळ भ्रम आहे. ह्या स्वैर संचारांत कोणत्या वेळीं कसा दुःखदायक प्रसंग येईल याचा नेम नसतो. प्रसंगीं जीवितालाही मुकण्याची धास्ती असते. बेफाम सुटलेले घोडे अन्यांना अपघात करून स्वतः मरून गेल्याचीं उदाहरणें आहेत. यासाठीं स्वैरपणाला आळा बसला पाहिजे. त्यांतच आपलें भलें आहे. निर्बंध आचरण हें प्राणघाताला कारण होतें. निर्बंध ( उघडा ) दिवा वारा केव्हां मालवून टाकील

त्याचा नेम नाहीं. त्याच्यावर आच्छादन ( झांकण ) घातल्यास तो निर्धास्त होतो. त्याचा कंप बंद पडतो. त्याला वाऱ्याचें भय रहात नाहीं. त्यानें जें बंधन स्वीकारलें असतें तें त्याचा वाऱ्यापासून बचाव करितें. त्यामुळें तो शांत समाधानयुक्त अर्थात् आत्मानंदानिमग्न असतो. आच्छादनामुळें अर्थात् बंधनामुळें त्याला कीटपतंगादिप्राणी व वारा हे पीडा करूं शकत नाहींत. मच्छरदाणींत कोंडून घेऊन निजल्यास मच्छर झोंपमोड करूं शकत नाहींत. तात्पर्यार्थ सुखाची इच्छा करणारानें निर्बंध वागतां कामा नये. शम, दम, उपरम, तितिक्षा हे बंध होत. या बंधांनीं श्रद्धा—डोळस श्रद्धा—प्राप्त होते. श्रद्धेनंतर मन स्थिर करणें सुलभ जातें. मन स्थिर होतांच चित्तैकाग्र्य होतें. चित्तैकाग्र्य म्हणजेच समाधान आणि समाधान व आत्मानंद यांत फारसा भेद नाहीं, मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल.

२ इतर कोणत्याही साधनापेक्षां भक्तीलाच भगवान लौकर वश होतो. असें होण्याचें कारण काय ? ज्ञान, विज्ञान, योग, याग वगैरेंत कोणी पुरुष तर कोणी नपुंसक आहेत. उत्तम पुरुष नपुंसकाला अथवा पुरुषाला लुब्ध होत नाहीं. तो लुब्ध झाल्यास सुशील सुंदरीलाच लुब्ध होतो. साधारण पुरुष असेल तर तो टाकमटिकली करणाऱ्या सुंदरीला लुब्ध होतो, तो तिच्या शीलाकडे लक्ष देत नाहीं. भक्ति ही स्त्री असून भगवान हा पुरुष आहे. भक्ति जशी स्त्री आहे, तशीच माया ही पण आहे. भक्ति ही सुशील स्त्री व माया ही दुःशील स्त्री आहे. माया ही दुःशील निवडल्यामुळें मायाधीश जो भगवान त्याला वश करूं शकत नाहीं. ही मायारूपी वेश्या मायाधीशाकडून आपलें तोंड मुरडून अन्य पुरुषांकडे पाहून डोळे मारते. उत्तम पुरुष मायेला नको असें नाहीं; पण त्याच्या पुढें जावयाला तिला तोंड नाहीं. यास्तव जगझोडी बनून वेशीच्या दारीं तिनें पाल मांडिलें आहे. सामान्य अर्थात् क्षराक्षर पुरुषांची तिच्या पालांत गर्दी जमते. या पालांत गेलेला प्रत्येक पुरुष उपदेशाचा ( जनन मरणाच्या दुःखाचा ) आजार घेऊनच बाहेर पडतो. भक्ति ( अनन्य भक्ति ) ही सुशील पतिव्रता स्त्री असल्यानें ती परमेश्वरला फार आवडते. हिच्या पातिव्रत्यतेजापुढें मायेची दिखाऊ चट्टीपट्टी फिक्की पडते. क्षराक्षर सर्व पुरुषमय असल्यानें त्याला माया मोहित करिते. भक्ति ही स्त्री असल्यानें तिला ती मोहित करूं शकत नाहीं. स्त्रीला स्त्री भाळणें शक्य नाहीं. भक्ति ही भगवंताची एकनिष्ठ सेविका असल्यानें चंचला माया तिला भिऊनच वागते अर्थात् भक्ताला मायेचा उपद्रव होत नाहीं. भक्त माया मागें सारून भगवद्धाम गांठितो.

३ मोक्षप्राप्तीला भक्ति आणि ज्ञान यांचा सारखाच उपयोग आहे. भेद

एवढाच कीं, ज्ञानवानाला स्वतः तरवारीच्या धारेवरून चालावें लागतें, आणि भक्तिमानाला भगवंताच्या खांद्यावर बसून मार्ग आक्रमितां येतो. भक्ताला समर्थाचा आश्रय असल्यानें पाय घसरण्याची अर्थात् पतन पावण्याची धास्ती नसते. ज्ञानवानाला समर्थाचा आश्रय नसल्यानें या खडतर रस्त्यानें चालतांना पाय घसरण्याची अर्थात् पतन पावण्याची भीति असते. या कारणास्तव भक्त ज्ञानाला दूर सारून भक्तीचा आदर व स्वीकार करितात. भक्ताला समर्थाचा आश्रय असल्यानें समर्थाचें आश्रित जें ज्ञान तेंही आपला कठोर व रुक्ष स्वभाव टाकून मृदु व रसाळ होऊन त्याच्या घरीं पाणी भरूं लागतें अर्थात् भक्तीनंतर ब्रह्मज्ञानाची प्राप्ति सहज होते. नको नको म्हटलें तरी ब्रह्मज्ञान भक्ताच्या गळीं पडतें, त्याला येऊन कवटाळतें.

४ भाविकांना भगवत्प्राप्तीची इच्छा असते. त्यांचा भाव त्यांना भगवत्पदीं नेऊन पोंचवील पण त्यांनीं दोन गोष्टींना जपलें पाहिजे. पहिली गोष्ट—तर्कवितर्क करून वाग्जाल गुंफणारांची संगत सोडिली पाहिजे. दुसरी गोष्ट—मतमतांतरें धुंडाळणें एकदम बंद केलें पाहिजे. तर्कवितर्क आणि मतमतांतरांचा बाजार भरला कीं संशय हा उचल्या त्यांचें भावाचें गाठोडें लांबवील. हें गांठोडें हरवलें कीं, हात हालवीत बसावें लागेल एकाच ठिकाणीं दृष्टी ठेवून—एकाच देवाचे पाय घट्ट धरून—बसावें म्हणजे भीति नाहीं. कोणी आंधळा म्हटलें किंवा खुळा म्हटलें तरी त्याची भीड धरूं नये. वितर्कवाद्यांचे छंदला लागणें आणि मतमतांतरांच्या फंदांत पडणें हाच आंधळेपणा व खुळेपणा आहे असें समजावें.

५ निष्काम भक्ति कशी मिळेल ? भक्ति कांहीं वाटेवर लागली नाहीं. फार आयास करावे लागतात. ज्याला भक्तीची इच्छा असेल त्यानें प्रथम साधुसंग करावा. नंतर ईश्वरलीला ऐकून संतमुखानें रहस्य समजावून घ्यावें. इतकें झालें म्हणजे गुरूवर विश्वास बसेल व त्याची सेवा करावी असें वाटेल. गुरुसेवा घडल्यानें अमानित्व येईल. अमानित्व आल्यावर भक्तिबीजाला लागणारी कीड जी लज्जा ती मरून जाऊन ईशलीला गाण्याला व प्रेमानें नाचण्याला संकोच वाटणार नाहीं. मग मंत्र व जपजाप्य यांवर दृढ श्रद्धा बसेल. या श्रद्धेनें वेदप्रयोदित ईश्वरस्वरूपाचा ध्यास लागेल. या ध्यासानें विषयवैराग्य जन्माला येईल. तें उपजल्यावर सदाचार सहज घडूं लागेल. सदाचारांचे संवयीनें जग नारायणमय दिसूं लागेल. अनंतापेक्षां संतप्रेम अधिक वाटूं लागेल. कारण संतच अनंत दाखवितात. इतकी तयारी झाल्यावर समानता येईल. लाभहानी, जीवनमरण, सुखदुःख, मानापमान, शत्रुमित्र सारखे वाटूं लागतील. दोषैक दृष्टि नाहींशी होऊन सर्वांशीं कपटरहित सरळ वर्तन घडेल; व "वासुदेवःसर्वमिति' ही भावना दृढ

होईल. व सर्व कामनांचा नाश होऊन वासुदेवचरणीं मन रमेल. हीच निष्काम-भक्ति ! हेंच मानव जीविताचें सुफल.

---

# संध्या.

( लेखक—दत्तात्रय गोविंद काळे, बी. ए. )

संध्या हें द्विजांचें नित्यकर्म आहे. गायत्री मंत्राची दीक्षा घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें हें कर्तव्य बजावलें पाहिजे. यांत स्वार्थाची याचना नाहीं. हें ईश्वरार्पण करावयाच्या बुद्धीनेंच करावयाचें. पण अशी निष्कामकर्माची चिकाटी अंगीं बाणण्यास जगाच्या पाठीशीं असणाऱ्या सत्याचें ज्ञान लागतें. सर्व विश्वाचें नियंत्रण करणारी विभूति आहे; आपण सर्व जीव तिचेच अंश आहोंत; दृश्य सृष्टीशिवाय अदृश्य सृष्टी असून ती या सृष्टीसारखीच नियमबद्ध आहे; इतकेंच नव्हे तर आपणही तिचे एक रहिवासी आहोंत; ईश्वरी सामर्थ्य व सृष्टिनियम यांची योजना जीवमात्राच्या व पदार्थमात्राच्या विकासाकरितां झालेली आहे; मनुष्यानें स्वार्थ सोडून परहितार्थ झटण्यास सुरवात केल्यास त्याला हा ईश्वरी संकेत पूर्ण करण्यास मदत करतां येणें शक्य आहे. मनुष्याची जाणीव केवळ या स्थूल जगापुरतीच नसून सप्तलोकात्मक जगाच्या निरनिराळ्या स्थितींत त्याला कार्य करतां येतें; त्यांपैकीं भू, भुवर् व स्वर् या तीन लोकाचें आकलन करणें, त्यांच्या द्रव्यांनीं बनलेलीं आपलीं शरीरें सत्कारणार्थ उपयोगांत आणणें शक्य आहे; तें मननानें, सदिच्छेनें व मंत्रसामर्थ्यानें साधतें; वगैरे गोष्टी संध्या करणाऱ्यास मान्य आहेत असें गृहीत धरून पुढील विवेचन दिलें आहे.

सूर्योदयापूर्वीचा अर्धा तास व सूर्यास्तानंतर अर्धा तास हे संध्येचे उत्तम काल होत. संध्येंतील २४ नांवें व गायत्रीजपासह प्राणायाम यांची योजना मन स्थिर होण्याकरितां केलेली दिसते. संध्या परमेश्वराप्रीत्यर्थ करावयाची असते. तिचे तीन भाग पडतात. पहिला अर्घ्यापर्यंत, दुसरा जपापर्यंत व तिसरा त्यानंतर शेवटापर्यंत.

(१) ओज, बल, स्नेह, प्रभा, इत्यादि अध्यात्मिक सामर्थ्यें जगांत प्रकट करणाऱ्या ज्या गायत्री, सरस्वती, छंदऋषी, श्री व ऱ्ही या देवता ह्यांच्या सहायानें हा मनोयज्ञ साधावा म्हणून त्यांचें प्रथम आवाहन करावयाचें. नंतर पहिलें मार्जन व आचमन यांनीं वासनादेहाची शुद्धि करून तो तेवढ्यापुरता ईश्वरार्पण करण्यास पात्र करावयाचा. दुसरें मार्जन मनःशुद्धीकरितां

दिसतें. ईश्वरानें सृष्टिधारणाकरितां हा जो "वरेण्य ऋतु" सतत चालू ठेवला आहे, त्या कल्पनेनें आपलें मन उच्च भूमिकेवर आणून त्याला "भद्रं नो अपिवातय मनः" अशी स्थिति प्राप्त करून देणें हें दुसऱ्या मार्जनाचें कार्य दिसतें. यानंतरच्या अघमर्षणांत सृष्टिनियंत्याचा सृष्टि निर्माण करण्यांत केवढा स्वार्थत्याग आहे, व ऋत आणि सत्य हीं सर्व जीवनाधार तत्त्वें ज्या त्याच्या तपापासून होतात, त्या तपास आपणासही यथाशक्ति मदत करणें कसें शक्य आहे, ही कल्पना ग्रथित केलेली दिसते.

याप्रमाणें आत्मार्पणास आवश्यक असणारी आत्मशुद्धि होतांच बुद्धिदात्या सवित्याच्या अनुग्रहानें त्याचें अनुकरण करण्याचें जें सामर्थ्य सद्विचार, सद्वासना व सदाचारद्वारां आपण प्रकट करीत असूं तें तीन अर्घ्यांनीं सवित्याला अर्पण करून "हा आदित्य आम्हांस भूतमात्रीं दिसो" अशी मनाची धारणा करावयाची.

( २ ) अखिल विश्वांत अंतर्बाह्य खेळणारें हें दैवी सामर्थ्य सामान्य माणसाच्या ग्रहणशक्तीबाहेर असतें. गायत्रीमंत्राचा अधिकारी मनुष्य तें सामर्थ्य त्या उच्च भूमिकेवरून आवाहित देवतांच्या सहाय्यानें सामान्य माणसाच्या आटोक्यांत आणूं शकेल. हें कार्य संध्येच्या दुसऱ्या भागांत केलें जात असावें. आधीं आसनशुद्धि करून सत्कार्याला ज्याच्या सहवासानें अडथळा येईल अशा नीच जीवनकलेला इच्छासामर्थ्यानें दूर सारण्यांत येतें. ( अपसर्पंतु ते भूता० ). शरीरांतून जें मानवी चैतन्य (Magnetism) वहात असतें तें शुद्ध अशा विष्णुशक्तिप्रवाहाशीं संलग्न करण्याचा प्रयत्न "अंगुष्ठाग्रे" वगैरे मंत्रांनीं होत असावा. तसेंच, मानवी सप्ततत्त्वें निसर्गाच्या सप्ततत्त्वांशीं संलग्न केलीं जात असावींत. याप्रमाणें व्यक्ति व समष्टि एकरूप करून न्यासानें पंचचक्रांना गति देण्याची योजना आहे हीं चक्रें हृदय, मस्तक, शिखा, कवच व दोन भिवयांमध्यें अशीं स्थित आहेत. त्यांच्या गतीनें परमात्म्यापर्यंत माणसाची जाणीव पोंचूं शकते; परंतु ती किती पोंचेल हा प्रत्येकाच्या उन्नतीचा प्रश्न आहे.

या तयारीनंतर यथाशक्ति गायत्री जप करतात. प्रत्येक वेळीं जाणीव स्वर्गलोकापर्यंत न्यावयाचा प्रयत्न व्हावा. गायत्री मंत्र, पहिल्यानें तीन पादांत दुसऱ्यानें दोन पादांत, व तिसऱ्यानें एकदम म्हणावयाचा असतो. प्रत्येक प्रकारानें निरनिराळा परिणाम होतो. इच्छा, ज्ञान व क्रिया या तीन प्रकारच्या लहरी या तीन प्रकारच्या पठनानें प्रकट होत असाव्या. गायत्री जपानें विशिष्ट प्रकारचें दैवी सामर्थ्य जगाच्या उद्धारार्थ प्रकट व्हावें, व त्यानें सद्विचार, सद्वासना व सत्प्रवृत्ति सर्वत्र वाढावी अशी इच्छा संध्या करणारानें जागृत

ठेवावी. शुद्धि, बल, शांति, मैत्री, करुणा, मुक्ति, धर्म, साम्य व आनंद या नव-रत्नांनीं सर्व मानवप्राणी विभूषित व्हावेत, अशी इच्छा सर्वमान्य होईल, व गायत्री जपांत ती प्रामुख्यानें प्रकट होईल अशी आशा आहे. अर्थात इतर गुणांचा विचार या गुणांऐवजीं करण्यासही हरकत नाहीं.

( ३ ) जप संपतांच या दैवी सामर्थ्यास अवनीवर प्रकट होण्यास द्वारा-सारखा उपयोग व्हावा म्हणून उघडलेलीं हृदयादि स्थानांचीं चक्रें दुसऱ्या न्यासानें बंद करण्यांत येत असावींत. नंतर दिवसा सूर्यास व रात्रीं वरुणास उपस्थानानें या ज्ञानदानांत अशीच मदत करण्याबद्दल प्रार्थना करून हें प्रकट झालेलें सामर्थ्य दश दिक्पालांच्याद्वारें भूतमात्रांस वाटण्यांत यावें. शेवटीं स्वस्तिकाकार हस्तांनीं किंवा एका श्लोकानें ( नमो ब्रह्मण्य देवाय० ) जगाच्या धर्मसंस्थांना आधारभूत अशा जगद्गुरूंचें स्मरण करून आवाहित देवतांचें विसर्जन करतात. ( ब्राम्हणेभ्योऽभ्यनुज्ञाता गच्छ देवि० )

संध्येंतील गायत्री मंत्राशीं गाईचा कांहीं संबंध दिसत नाहीं. " गायंतं त्रायसे यस्मात् गायत्री " अशी त्या शब्दाची व्याख्या आहे. गायत्री मंत्राचा अर्थ अत्यंत गहन व अध्यात्मिक आहे. तो सारांशानें असा:—

" मन आणि वाणी यांच्या आवांक्याबाहेरील, सकलांच्या उत्पत्तिस्थितिसं-हारास कारण होणारी, जगाला आधारभूत, अविद्येचा नाश करण्यास समर्थ, ज्ञान व आनंदरूप, अशी जी सविता नामक शक्ति ती आमच्या अंतःप्रवृत्तींना सत्यज्ञानदर्शक चालना देवो. "

तसेंच संध्या करणारी व्यक्ति जरी आपल्यापुरती आपली संध्या करीत असली तरी मनानें ती सर्वांचें आकलन आपल्यांत करीत असते. कारण " भद्रं नो अपिवातय मनः " " धियो योनः प्रचोदयात् " " सर्वे कामा अभिश्रवंतु नः" इत्यादि बहुवचनी प्रयोग महत्त्वाच्यावेळीं संध्येंत वापरले आहेत.

संध्या या हेतूनें व एकाग्र मनानें केल्यास जगांत सत्प्रवृत्ति वाढण्यास पुष्कळ सहाय्य होईल अशी आशा वाटते. ज्यांना याप्रकारें नियमानें संध्या करावीशी वाटेल त्यांनीं तसा निश्चय आपलें नांव व पत्ता यासह द. गो. काळे, २०१, शुक्रवार पेठ, पुणें; यांस कळविल्यास या विषयावरील अधिक माहिती प्रसिद्ध होईल तेव्हां ती त्यांना पुरविण्यांत येईल.

ॐ तत्सत् ।

---

# विवाह.

( लेखकः—नरहर सदाशिव जोशी, खरशीकर. पो. मेढे. जि. सातारा )

१ 'बालविवाह कां प्रौढविवाह' हा प्रश्न बऱ्याच दिवसांपासून समाजापुढें आहे. प्रश्न उत्पन्न होण्यास कारणेंही बरींच झालीं आहेत. बालविवाहाची मर्यादा उतरत उतरत कोठें कोठें तर एक वर्षाच्या आंतच मुलींचीं लग्नें झालेलीं दृष्टोत्पत्तीस येतात व असा अतिरेक झाल्यामुळेंच त्याची विटंबना होऊन प्रौढविवाहाकडे समाजाचा कल होऊं लागला. हल्लीं समाजाची एकंदर परिस्थितीच अशी बनत आहे कीं, लहानपणीं लग्न होणें अशक्यच होत जात आहे. आपोआपच मुलींच्या लग्नाची मर्यादा वाढत आहे.

२ सनातन वैदिक धर्मास कोणता विवाह सम्मत आहे याचा धर्मदृष्ट्या विचार करूं. बालविवाहानें शुद्ध धर्मसंस्कार उत्पन्न होऊन स्त्रीपुरुष यांचें ध्येय ( अर्थ व काम हें न होतां ) सात्विक धर्म हेंच ध्येय कसें बनतें, व त्यामुळें कुलपरंपरा शुद्ध राहून आत्मीय ध्येय कसें प्राप्त करून घेतां येतें. हें खालील विवेचनावरून ध्यानांत येईल.

३ विवाहसंस्कार विषयप्रवृत्तीसाठीं नसून विषयनिवृत्तीसाठीं आहे हें ध्यानांत असणें अवश्य आहे. वैदिक विवाह हे चैनीचे किंवा स्त्रीपुरुष कामुक बनविणारे मुळींच नव्हेत, तर ऋतुकाळीं भार्यागमन करा "ऋतौ भार्यामुपेयात्" किंवा "यथाकालं यथाक्रमः" असें सांगून अमोघ वीर्य व सुपुत्र उत्पन्न करा म्हणून उपदेश करणारे होत. व हें जर लक्ष्यांत असेल तर गृहस्थाश्रमांतही आत्मप्राप्ती होऊन गृहस्थाश्रम परम सुखमय होईल, व आपल्या विवाह संस्काराची तशी योग्यताही आहे. प्रथम पुरुषांबद्दल विचार करून नंतर स्त्रियांबद्दल विचार करूं.

४ "जगतः स्थितिकारणानां प्राणिनां साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतुर्यः स धर्मः" ॥ हें सनातन धर्माचें मुख्य व आद्यतत्व आहे. बटूचा उपनयन संस्कार आठवें वर्षापर्यंत होतो. या संस्कारांत गायत्री मंत्राचा उपदेश होत असतो. उपदेश होतांच आत्मसाक्षात्कार होणें शक्य नसतें म्हणून पूर्ण वैराग्यस्थितींत बटूस बारा अगर अधिक वर्षें गुरुगृहीं राहून अध्ययन करावें लागतें. ब्रह्मचारी याचे नियम पाहतां त्याचे चित्तावर कामाचा संकल्प केव्हांही उठूं नये अशी शास्त्राची योजना आहे. ब्रह्मचाऱ्यावर कामाचा संकल्प उत्पन्न झाला नाहीं तर त्यानें आजन्म ब्रह्मचारीच राहावें. या ब्रह्मचाऱ्यास नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणतात.

व्रतबंध वेदाध्ययन जाल्या पाठीं । जो परमार्थी ठेवूनी दिठी ॥ गृहस्थाश्रमाची न करी गोठी । नैष्ठिक परिपाठी त्या नांव ॥ (एकनाथी भागवत अ० १७). जर नैष्ठिक ब्रह्मचर्य टिकविण्याचें सामर्थ्य नसेल तर गुरु-आज्ञेनें गृहस्थाश्रम करावा. ब्रह्मचाऱ्यात जर कामसंस्कार उत्पन्न झाला असेल तरच त्यास विवाह करून घेण्यासाठीं ब्रह्मचर्यव्रत विसर्जनाची परवानगी मिळते. भागवतांत ह्मटलें आहे:

गृहं वनं वोपविशेत्प्रव्रजेद्वा द्विजोत्तमः। आश्रमादाश्रमं गच्छेन्नान्यथा मत्परश्चरेत् ॥ ज्यासी वैराग्य नाहीं सर्वथा । हृदयीं स्त्रीकामाची आस्था । तेणें द्वितीयाश्रम संस्था । गार्हस्थ्यासी करावें ॥ (ए. भा.)

गुरु शिष्यास गृहस्थाश्रमाची परवानगी देतात त्यावेळीं हा गृहस्थाश्रमास लायख आहे कीं नाहीं हें पाहून नंतर आज्ञा देतात.

सर्वाश्रमप्रयुक्तोयं नियमः कुलनंदन । मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायसंयमः॥भा.

कायावाचामनानें जो परमात्मपर झाला आहे तो जरी गृहस्थाश्रम स्वीकारील तरी गृहस्थाश्रमांतील अनुकूल प्रतिकूल परिस्थितीविषयीं याचें चित्तचांचल्य होणार नाहीं अशी गुरूची खात्री असते व काम हा संस्कार सात्विक धर्माचरणाची आज्ञा देऊन करावयास सांगतात यामुळें त्यांचें ध्येय काम हें होत नसून धर्मच होतें.

ब्रह्मविद इव सोम्य ते मुखं भाति ॥ छां. उ.

" बाळा, ब्रह्मज्ञान्याप्रमाणें तुझ्या तोंडावर ज्ञानाची चमक दिसते, " असे धन्योद्गार गुरुजींच्या तोंडून निघतात व आतां हा गृहस्थाश्रमांत या शुद्धबोधाचें आधारानें निर्धास्तपणें संचार करून आत्मध्येयाचा साक्षात्कार करून घेईल म्हणूनच त्यास विवाहाची आज्ञा होते. या वेळीं त्याचें वय २०-२४ वर्षांचें असतें. विवाहासाठीं स्त्री सवर्णाचीच असून वयानें लहान असावी अशी शास्त्राज्ञा आहे, व हा जरी कामुक आहे तरी कामोपभोगाबद्दल शास्त्राचार फार कडक आहेत, व ते आचार यानें पाळल्यास हा विषयतत्पर न होतां विषयनिवृत्तच होतो. स्त्रीची प्राप्ती झाली तरी ऋतुकालापूर्वी गमन वर्ज्य आहे, व ऋतुकालींही शास्त्रप्रमाण दिवसाची मर्यादा आहे, व इतरही मर्यादा यानें पाळायच्या असतात.

५. शिवाय वधूपित्यानें कन्यादानसमयीं ज्या अटीवर कन्यादान केलें त्या संकल्पाचा अर्थ पाहिला असतां स्त्रीपुरुषांचे आचारापासून " उत्तम ब्रह्मवेत्ता " अशीच संतती निर्माण झाली पाहिजे. ज्या संततीचेयोगें समस्त पितृगणांस मोक्षप्राप्ती होईल अशी संतती उत्पन्न करण्याबद्दलचे दानमंत्र आहेत व वरही अशा सर्व अटी कबूल करीत असतो. यावरून पाहतां स्त्रीपुरुष जर केवळ

विषयी बनले तर हें ध्येय साध्य होणार नाहीं; म्हणून उत्तम स्वधर्माचरण व अकर्तात्मबोध पुरुषाचे ठिकाणीं असावा लागतो. अशा शुद्ध तऱ्हेनें विवाह-संस्काराचें ध्येय अमलांत आल्यास तो प्रपंच आनंदमय व परमार्थपर होतो. शास्त्राचारबंधनामुळें कामध्येयही मागें पडून शुद्ध आत्मप्राप्ती हेंच ध्येय कायम राहतें.

ऋतौ गच्छति यो भार्यां अनृतौ नैव गच्छति। यावज्जीवं ब्रह्मचारी मुनिभिः परिकीर्तितः ( महाभारत )

अनर्तुमतीभार्यायास्तु न संगमः ॥ अशी शास्त्राज्ञा असल्यामुळें पुरुष विषयी बनूं शकत नाहीं.

याप्रमाणें पुरुषाबद्दल विचार पाहतां पुरुषचें ध्येय आत्मप्राप्ती हेंच विवाहानंतर असलें पाहिजे अशी शास्त्रकारांची स्पष्ट योजना दिसते. त्याचप्रमाणें स्त्रियांचेंही केवळ काम हें ध्येय न होतां आत्मप्राप्ती हेंच ध्येय असणें जरूर आहे.

६. प्रस्तुत परिस्थिति पाहतां विवाहकाल प्रौढकालापर्यंत येऊन ठपला आहे व तो आपोआपच स्थिर होत जाणार आहे. तथापि विवाहकालमर्यादा सोळा वर्षांची मात्र उपयोगाची नाहीं. या प्रौढ विवाहानें वधूचें ध्येय काम हें होऊन सुप्रजाजनन व कुलपरंपरा यांस कसा धक्का बसतो याचा थोडा विचार करूं.

पुरुषाचा स्वधर्म सुप्रजोत्पत्ती व स्त्रीचा कुलस्त्रीत्व असून धर्माचरण हा उभयतांचा धर्म आहे. कुटुंबसंस्था व समाजसंस्था कायम राहण्यास स्त्रीपुरुष-संबंधाचें ध्येय धर्मच असणें जरूर आहे. स्त्रीपुरुषांचा संबंध राजस स्वरूपाचा असतो, तेव्हां विवाहास कराराचें रूप येतें; व शुद्धधर्माचें ध्येय सुटल्यामुळें कुलपरंपरा नीट राहाण्यास अवघड होतें. सनातन धर्माचें ध्येय प्रत्येक स्त्रीपुरुषानें आत्मिक उन्नतीच्या मार्गास लागून धार्मिक बनावें असेंच आहे, व आर्य समाजांतील षोडशसंस्कारही या शुद्ध ध्येयाकडे नेणारे आहेत. संस्कारांत दिव्यत्व आहे पण संस्काराकडे शुद्ध दृष्टीनें पाहण्याची इच्छा समाजास असणें जरूर आहे. संस्कारानें सत्वगुण प्रकट होतो व त्यामुळें राजस व तमोगुणाचें प्राबल्य कमी होते, अर्थात् कामवृत्ती वगैरे मनोविकार बेताल न होतां मनाच्या सात्विक वृत्तीला सामर्थ्य येतें. हे जर खरें आहे तर चित्तावर कामाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वींच धार्मिक संस्काराचा पगडा बसला पाहिजे, व मनाची धर्मनिष्ठा व सात्विकता वाढण्यास अंतःकरण कामादि वृत्तींनीं बेताल होण्यापूर्वींच धार्मिक संस्कार घडले पाहिजेत.

७ पुरुषावर स्वधर्माचरण व कुटुंब आणि समाज रक्षण करण्याची जबाबदारी असते. यांतून पार पडण्यासाठीं अगोदर विद्योपार्जन करून आत्मसंयमन,

विनय, धैर्य वगैरे उच्च मनोवृत्तींची वाढ करणारे शिक्षणाची जरूरी असते व हें शिक्षण ब्रह्मचर्य आश्रमांतच त्यास मिळतें; म्हणून पुरुषाच्या धार्मिक जीवनाचा आरंभक संस्कार उपनयन हाच ठरतो. हा संस्कार आठ वर्षांचे वयांत होणें जरूर आहे. शुद्ध धार्मिक ध्येय संपादण्यास गुरूचा समाश्रय लागतो. हा न होतां तारुण्य आलें तर कामवृत्तींचा जोर होऊन धर्मवृत्ती कमी होते. उपनयन काल, उपदेशग्रहण व विहिताचारपालन करण्यास जितका लौकर आरंभ होईल तितकें चांगलें. उपनयनानें द्विजत्व प्राप्त होऊन ब्रह्मचर्य स्थितींत विद्यार्जन झालें म्हणजे विवाहास पात्रता येते. जितके जास्त ब्रह्मचर्य राखतां येईल तितकें मानसिक व शारीरिक बळ व ओज वाढतें. आत्मदमनाची शक्ती वाढल्यावर त्यास विवाहाची आज्ञा आहे.

८ कुलस्त्रीत्व हा स्त्रीचा स्वधर्म व आजन्मैकपतित्व हें तिचें व्रत आहे. पतिकुलांतील ती अचल घटक आहे. अशा स्त्रीचा धार्मिक जीवनाचा आरंभक संस्कार कोणता? अर्थात् पतिकुलांत प्रवेश करून देणारा विवाहसंस्कारच होय. पुरुषाच्या उपनयनस्थानीं स्त्रीचा विवाह आहे. पुरुषाना जसें गुरुगृहीं ब्रह्मचर्य वृत्तींत अध्ययन तसें स्त्रीस श्वशुरगृहीं गृहशिक्षण होय. पुरुपास जशी गुरुसेवा तशी स्त्रीस पति व कुटुंबांतील मंडळी यांची शुश्रूषा होय. पुरुषाप्रमाणेंच कामवृत्ती उत्पन्न होण्यापूर्वी स्त्रियांस हा विवाहसंस्कार होणें अवश्य आहे. याची पूर्व मर्यादा म्हणजे यथाविधी आचार पाळण्याची पात्रता येण्यास साधारणतः आठवें वर्ष धरता येईल व उत्तर मर्यादा निसर्गनियमानें बद्ध आहे, ती रजोदर्शन होय. कामवृत्ति उत्पन्न झाल्याची ती खूण आहे. कामवृत्तीचा स्वधर्मासाठीं यज्ञ करणें म्हणजेच धार्मिक जीवन होय. म्हणून तिचा उद्भव-होण्यापूर्वींच स्त्रीचा विवाह होणें जरूर आहे, व अशावेळीं विवाह झाल्यास तिच्या धार्मिक जीवनाच्या दृष्टीनें अत्यंत हितावह आहे. यामुळेंच धर्मशास्त्रांनीं नियम केले आहेत. संस्कार शुद्ध ठेवणें, अंतरंग पवित्र व धर्मपर बनवणें हा आमच्या संस्कारांचा मूल हेतु आहे.

(रा)" सोमः प्रथमो विविदे गन्धर्वो विविद उत्तरः तृतियोऽग्निष्टे पति स्तुरीये सो मनुष्यजाः ॥ १ ॥ हे कन्ये ते त्वां सोमश्चंद्रः ते तव प्रथम आद्य पतिः विविदे जन्मदिने लब्धवान् । विद्ललाभे । ततः सार्द्ध वर्षद्वयानंतर गंधर्वः सूर्यो विविदे उत्तरः द्वितीयोयं पतिः । ततोऽग्निरपि तावता कालेन विविदे । अतोऽयं तव तृतीयपतिः । तथाते तव तुरीयश्चतुर्थः मनुष्यजः मानुष्यः अहमेवेत्यर्थः " [ पारस्कर गृह्यसूत्रे ४ कंडिकायाम् ]

( म ) " व्यंजनैस्तु समुत्पन्नैः सोमो भुंजीत कन्यकाम् । पयोधरैस्तु गंधर्वो रजसाग्निः प्रकीर्तितः " ( गोभिलाचार्य ).

औषधिनाथ चंद्र हा मुलीला वाढवून तिच्यांत तेज उत्पन्न करतो, गंधर्व हा कुचादि अवयव पूर्ण करून कामवासना हळू हळू उत्पन्न करतो, व अग्नि हा अंगांत उष्णता तयार करून ऋतुप्राप्तीस तयार करतो. ऋतुस्नात झाली कीं मनुष्य हा कन्येचा पति होतो. कन्येवर पहिल्या तिघांची दोनदोन वर्षांची सत्ता असते. यावरून कन्येचा विवाह काल आठ वर्षांपासून रजोदर्शनापर्यंत शास्त्रकारांसहि सम्मत आहे.

९ मोक्ष हा परम पुरुषार्थ आहे. व तो साधण्यास धर्म हें ध्येय समाजास अवश्य आहे. तसेंच प्रपंचासही धर्म हेंच ध्येय अवश्य आहे; कारण धर्मानेंच अर्थ व काम पूर्ण होतात. ' धर्मादर्थश्च कामश्च । '.

ज्या पुण्यवंत स्त्रिया मोक्ष पुरुषार्थाच्याच सिद्धीसाठीं सरसावलेल्या आहेत त्यांना अशा पुरुषांप्रमाणेंच विवाहाचें बंधन अवश्य नाहीं; पण ज्यांचा तसा अधिकार नाहीं, ज्यांना अर्थ व काम यांनीं सोडलें नाहीं, त्यांनीं हीं ध्येयें सद्धर्माच्या म्हणजे विवाहाच्याच मार्गें साधलीं पाहिजेत. सामान्य स्त्रियांनीं विवाह न करितां आर्थिक स्वातंत्र्य पत्करणें म्हणजे आर्यधर्म सोडणेंच आहे. धर्म हें ध्येय म्हटलें कीं, विवाहसंस्कार पाहिजे व त्याचा योग्य कालही पाहिजे. आतां आपण विचारासाठीं रजोदर्शनाचे पूर्वींचे विवाहास बालविवाह व नंतरच्यास प्रौढ विवाह म्हणूं.

१० सात्विक प्रेमोत्पत्तीस मानसिक स्थिति दोन प्रकारची पाहिजे १ जींत कामविकार उत्पन्न झाला नाहीं, व २ जींत अव्यभिचारी कामविकार राहील अशी. कामविकार उत्पन्न झाल्यावर जडलेल्या प्रेमांत विषयासक्तीचा राजस अंश जास्त असण्याचा संभव असतो म्हणून सहवासानें प्रेम आधीं जडल्यास तें सात्विक राहतें, व कामविकार अव्यभिचारी राहण्यास तें उत्पन्न होतांच प्रेमांत लीन झालें पाहिजे. कामविकार उत्पन्न झाल्यावर प्रेम एके ठिकाणीं न राहतां व्यभिचारी होण्याची भीति आहे व हें अनिष्ट होय. प्रेम केव्हां उत्पन्न झालें हें जेव्हां कळत नाहीं, अशा सहवासांत उत्पन्न झालेलें प्रेम शुद्ध व अव्यभिचारी असतें यावरून कामविकार उत्पन्न होण्यापूर्वीं मुलीचा विवाह होणें इष्ट ठरतें. ज्या समाजांत प्रौढ विवाह असतो त्यांत प्रायः कामविकारानें युवयुवती आकर्षिले जातात. शिवाय प्रथमाकर्षितांशींच विवाह होण्याची खात्री नसल्यामुळें कामसंस्कार व्यभिचारी होतात. त्यांच्या प्रेमांत कामाचा अंश जेथें नसेल तेथें अर्थाचा असतो ! कारण तारुण्यापर्यंत धार्मिक संस्कार नसल्यामुळें स्वार्थबुद्धीचा जोर वाढलेला असतो, यामुळें प्रौढविवाहांत अर्थ व काम हें ध्येय असतें. बालविवाहाचें प्रेम अर्थ व काम यांनीं रहित असतें व वधूवर तसें वळण लागण्यापूर्वींच सहवास होत असल्यामुळें एकमेकांचें मनैक्य होईल अशीच उभयतांच्या स्वभावाची वाढ होऊं लागते म्हणून त्यांचें प्रेम स्थिर

राहतें. यावरून अर्थ व काम यापासून दूर, शांत व निश्चल असें सात्विक प्रेम उत्पन्न होण्यास बालविवाहच अधिक अनुकूल आहे हें लक्ष्यांत येईल.

११ पति व पत्नी मिळून एक पुरुष निर्माण होतो, व हें अध्यात्मिक ऐक्य धार्मिक विवाहाचें मुख्यांग आहे, यामुळें परस्परांच्या स्वभावांचा परिपोष एकाच स्थितींत होणें इष्ट आहे व हे स्वभावपरिपोष लहानपणापासून उत्तम होतात. हें सहवासजन्य प्रेम इतक्या लौकर झालें पाहिजे कीं, भूतकालीन स्मृती व भविष्यकालीन आकांक्षा एकरूप होण्यासारखी त्यांची स्वभावाची वाढ होईल. असें स्वभावैक्य वंशजांच्या सुखासही कारण होतें. त्यांच्या शुद्ध प्रेमाचें संस्कार अपत्यावरही उन्नतिकारक होतात. बालविवाहांत असें शुद्ध प्रेम उत्पन्न होणें सुकर आहे; प्रौढविवाहांत असें प्रेम होणें जरा दुष्कर आहे. प्रौढविवाहांत प्रेम होतें तें प्रायः सकाम व स्वार्थी होतें, शिवाय एकमेकांच्या स्वभावास आधींच भिन्न वळण मिळालेलें असतें व दोघांचें ऐक्य होण्यास जड जातें. अशा ऐक्याभावीं घटांच्या स्फोटाची पाश्चात्य लोकांत इतकी संख्या फुगत आहे कीं, लग्नच नको असें बहुतेकांना वाटूं लागलें आहे ! आध्यात्मिक ऐक्यास प्रौढविवाह पोषक नसून बालविवाहच हितावह आहे, असें सहज ठरतें. आम्ही प्रौढविवाहाची सरास निंदा करितो असें समजूं नये. त्यानें शुद्ध प्रेम उत्पन्न होतच नाहीं असें नाहीं, तारतम्यानें हें बोलणें आहे. कुलस्त्रीत्व हा स्त्रीचा स्वधर्म आहे. यासाठीं कुलधर्मांचे संस्कार तिचे मनावर बिंबले पाहिजेत. ही वृत्ती जागृत राहण्यासाठीं कुटुंबाशीं तिचें तादात्म्य झालें पाहिजे. कुटुंब–सेवेचें पवित्र कार्य पार पाडण्याचें शिक्षण तिला गृहाचारद्वारांच मिळालें पाहिजे. कुलधर्मांचे संस्कार लहानपणीं चांगले बिंबतात. तरुणपणांत वृत्ती ताठ बनल्यामुळें हे संस्कार बिंबवण्यास जड जातें. पतीच्या कुटुंबाशीं एकजीव होण्यास कुटुंबाचें हित तें आपलें हित अशी वृत्ती बाणली पाहिजे, व ती बाणण्यास स्वार्थबुद्धी उत्पन्न होण्याचें वय प्राप्त होतांच तिला कुटुंबहितांत लय करितां आला पाहिजे. तेव्हां ज्या कुटुंबांत सर्व जन्म घालविणें आहे तेथील कुलधर्मांचें संस्कार बिंबण्यास व कुटुंबाशीं एकजीव होण्यास बालविवाहच अवश्य आहे. प्रौढविवाहांत कुटुंबसेवा लहानपणीं प्रत्यक्ष घडत नसल्यामुळें कर्तव्यभावना तितकी दृढ नसते व यामुळें स्वार्थबुद्धि जोरावते. म्हणून कुटुंबहित तेंच आपलें हित असें तादात्म्य होणें कठीण पडतें. बालविवाहांत कौटुंबिक गुरुजनांच्या हाताखालीं जास्त दिवस राहावें लागल्यामुळें त्यांच्याविषयीं वधूच्या मनांत आदर व वधूविषयीं त्यांच्या मनांत वात्सल्य उद्भवतें, त्यामुळें कुलधर्मांचे संस्कार चांगले बिंबतात. प्रौढविवाहांत वधूचा संबंध साक्षात् पतीशीं येत असल्यामुळें कुलीनसंस्कार परंपरेनें मिळण्यास प्रतिबंध होतो. सारांश, कुटुंबसेवा व कुलधर्मसंस्कार

उत्तम उतरून कर्तव्यभावना जागृत राहील असें ध्येय होण्यास पुरुषांच्या धार्मिक जीवनाचा संस्कार बालपणींच करणारांनीं स्त्रियांचाही विवाहसंस्कार त्या वयांतच रजोदर्शनाच्या पूर्वी न करणें बरें नाहीं. हा विषय १९१२ सालीं मुमुक्षु पत्रांत विस्तृत व खुलासेवार प्रसिद्ध झालेला पाहण्यास सांपडेल.

१२ स्त्रियांची सुस्थिति राहण्यास त्यांस कायमचें आश्रयस्थान जरूर आहे म्हणून "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" असा निर्बंध आहे. वर शोधून काढण्याची सर्व जबाबदारी त्यांजवर टाकणें अनर्थावह आहे प्रायः विवाहोत्तर तिचें रक्षण करण्याची जबाबदारी पतीवर आहे तशीच बालपणीं संगोपन करून योग्य रक्षणकर्ता पाहून देण्याची जबाबदारी बापावर आहे. वरशोधनाची जबाबदारी वधूकडे आल्यास तिचें धर्म हें ध्येय सुटून फक्त अर्थ व काम हेंच ध्येय होतें. वधू त्याचें स्वरूप तारुण्य व द्रव्य यांकडेसच प्रायः लक्ष्य ठेवणार यामुळें ध्येय शुद्ध राहणार नाहीं म्हणूनच आर्य समाजांत ही जबाबदारी पालकाकडे ठेवली आहे. पाश्चात्य समाजांत मुलींचे बाप हें आपलें कर्तव्य बजावीत नाहींत ह्मणजे आपल्या मुलींचा हा हक्कच बुडवितात. आजकाल त्या समाजाची भरभराट असतांना शेंकडा ५० स्त्रियांना उदरपूर्तीकरतां काबाडकष्ट करावे लागत आहेत !!

( Fifty per cent of the single women, 30 per cent of the widows, and ten per cent of the married women work for their living in Great Britain !

–Lord Courtney.

पाश्चात्य समाजांत बऱ्याच स्त्रियांना अविवाहितच राहणें भाग येतें, पतीचे पसंतीस येण्यासाठीं सौंदर्य, नखरेबाजपणा, व अन्य बाह्यांगें यांचा अधिक उपयोग करावा लागतो, यामुळें स्त्रियांचें ध्येय फक्त कामच होतें. हें आमच्या आर्य समाजास सम्मत नाहीं. संस्काररहित स्थितींत वाढल्यामुळें मनावर काम व अर्थ यांचा पगडा बसून वरशोधन याच दृष्टीनें होतें व विवाहानंतर लागलीच कामिक आचरणास सुरवात होते. या कारणामुळें विवाहाचें धर्म हें ध्येय मागें पडून त्याच्या जागीं प्रौढविवाहानें काम व अर्थ हेच येतात, यामुळें अशा विवाहास राजस स्वरूप प्राप्त होतें, कुटुंबसंस्था विस्कळित होऊन समाजहितास धोका येतो व नीति बिघडण्याचा संभव असतो. ही अनर्थपरंपरा टळण्यासाठीं कन्येचा विवाह रजोदर्शनापूर्वींच करण्याची जबाबदारी धर्मशास्त्रानें पित्यावर ठेविली आहे.

पितुर्गृहे तु या कन्या रजः पश्यत्यसंस्कृता । भ्रूणहत्या पितुस्तस्याः साकन्या वृषली स्मृता ।। १ ।। हीं वाक्येंही वरील कारणासाठीं आहेत. रजो-

दर्शनापूर्वी विवाह सर्व स्मृतींनीं एकमतानें सांगितला आहे. विवाहसंस्कारांत चतुर्थीकर्म विधि आहे, त्यांतील मंत्राकडे पाहून प्रौढविवाहाचें मंडण करतात तो मंत्र असा आहे:—

चतुर्थी होममंत्रेण त्वङ्मांसहृदयेंद्रियैः । भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा सा भवेदिति ॥ १ ॥ याचा उद्देश पत्नी सर्वांगांनीं भर्त्याचे गोत्रांत संयोग पावण्याबद्दलचा आहे. हा उद्देश सिद्ध होण्यास संभोगच अवश्य आहे असें नाहीं, कारण 'अनृतुमती भार्यास्तु न संगमः' असें वचन आहे. विवाहाचे चतुर्थदिनीं ऋतुकाल शक्य असणें प्रौढविवाहांतही अशक्य आहे हें सहज लक्ष्यांत येईल.

१३ विवाहांत पुरुषाचा हेतु सुप्रजा निर्माण करण्याचा आहे. यास ब्रह्मचर्य साह्य पाहिजे. जेथपर्यंत ब्रह्मचर्य पालन करितां येईल तेथवर विवाह लांबविण्यास हरकत नाहीं. ज्यांना असें ब्रह्मचर्य राखतां येत नाहीं त्यांचा विवाह लांबविणें बरें नाहीं. दुर्व्यसनांत पुरुष सांपडल्यास अशक्त प्रजा निर्माण होईल, यासाठीं खोटी हिम्मत व धाडस यांच्या नादीं लागून ब्रह्मचर्य बिघडवून विवाह लांबविण्यांत हांशील नाहीं.

बालविवाहांत मुलीस संस्काराचे अर्थ कळत नाहींत यामुळें तो विधि निवळ फार्स होतो यासाठीं प्रौढविवाहच करणें बरें असा मोठा आक्षेप आहे. परंतु विवाहमंत्रांचा शाब्दिक अर्थ कळणें म्हणजे खरें कळणें नव्हे. विवाहमंत्रांत पतिपत्नी ऐक्याचे मंत्र आहेत, आतां ऐक्याचा प्रत्यय नुसता अर्थ कळून होईल कां तें ऐक्य घडविणारा आचार पाळून जो अनुभव मिळेल त्यानें येईल ? शाब्दिक ज्ञानापेक्षां आचारानेंच उत्तम प्रत्यय येइल. संस्कार लहानपणीं होऊन आचारास सुरुवात झाली म्हणजे ऐक्याचें रहस्य प्रौढपणीं जसें गळीं उतरेल तसें लहानपण शाळेंतील शिक्षणांत घालवून प्रौढपणाच्या शाब्दिक ज्ञानानें उतरणें शक्य नाहीं. ऐक्याचा प्रत्यय करून देणारा अनुभव बालविवाहानें जास्त काल घडत असून तो सात्त्विक अवस्थेंत होत असतो. त्यामुळें मंत्राचा अर्थ जरी कळत नसला तरी ते मंत्र आचरण्याची पात्रता बालवधूस अधिक असते. आठ वर्षांचे मुलास गायत्री उपदेश होतो त्याचें अपरोक्ष ज्ञान त्यास होतें काय ? छे ! तें करून घेण्यास गुरुगृहीं बराच काळ वास करून तें ध्येय आचारव्यवहारांत आणावें लागतें, तद्वतच बालवधूनें जे मंत्र म्हटले त्याचा बोध तिला श्वशुरगृहीं वागण्यांत आपोआप मिळत असतो. होय, पण इतका खटाटोप करून लहानपणीं लग्न करण्यापेक्षां प्रौढविवाह केल्यास काय हरकत आहे ? त्या वयांत मंत्रार्थाचें आकलन वधूस होऊं शकेल असा आक्षेप पुढें येतो. ही युक्ति ठीक आहे, परंतु यांत

वधूचें ध्येय धर्म हें राहत नसून काम ध्येय होत असतें हें वर विवेचन आलेंच आहे. यामुळें गृहिणी व मातृपदास योग्य असणारे गुण तिच्यांत उतरण्यास कठीण जातें.

१४ बालविवाहानें शारीरिक ऱ्हास होतो असें म्हणण्याचा अर्थ बालसंभोगानें शारीरिक ऱ्हास होतो असाच असला पाहिजे. बालविवाह म्हणजे बालसंभोग नव्हे ! हा विहिताचार पालन, सात्विक भावोत्पत्ति इत्यादिसाठीं स्त्रियांचे धार्मिक जीवनाचा आरंभक संस्कार आहे. तो झाल्यानें बालसंभोग झालाच पाहिजे असें नाहीं. स्त्रीच्या सोळा वर्षांच्या आंत संभोग झाल्यास सुदृढ प्रजा निर्माण होत नाहीं असें जर खरें आहे तर पुरुषाच्या विवाहाचा हेतु सुप्रजोत्पत्ति करण्याचा असल्यामुळें पुरुषानें तसें न घडण्याबद्दल काळजी घेणें जरूर आहे. प्रौढविवाहानें सशक्त प्रजा निर्माण होणें सोपें असेल परंतु त्याबरोबर स्त्री पुरुषांचे नीतिसंबंध बिघडणें,हे व दुसरे अनीतीचे अनर्थ उद्भवणें सोपें होतें. बालविवाहानें सशक्त प्रजा निर्माण होणें थोडें अवघड पडत असेल [ हें म्हणणेंही अनुभवशीर नाहीं, कारण आतांपर्यंत मोठमोठया व पूज्य झालेल्या व्यक्ति बालविवाहाच्याच मातापित्यांच्या होत हें पूर्णपणें लक्ष्यांत ठेवावें ] परंतु त्याबरोबर वरील अनर्थ उद्भवणेंही टळतें. म्हणून आपणांस बालविवाहानें परंतु प्रौढसंभोगानें होणारीच सशक्त प्रजा पाहिजे. वास्तविक नियमित विषयसेवन हीच गोष्ट सुप्रजा निर्माण होण्यास अवश्य आहे, पुष्कळ प्रौढपणीं विवाह केला तरी यथेष्ट वागण्यानें इष्ट परिणाम होत नाहींच !

१५ बालविवाह [ धर्मविवाह ], प्रौढविवाह [ प्रीतिविवाह ] यांच्या गुणदोषांकडे दृष्टि दिल्यास आर्य संस्कृतीशीं सुसंगत असा पहिलाच ठरतो. सात्विक प्रेम, पतिपत्नींचें ऐक्य, कुटुंब संस्था, धार्मिक व कुलसंस्कारपरंपरा व सुस्थिती या सर्वांचे दृष्टीनें पाहिल्यास पहिलाच श्रेयस्कर आहे. हे गुण प्रौढविवाहांत कमी असतात. धर्म या उच्चध्येयाचे जागीं अर्थ व काम या हीन ध्येयांची स्थापना होऊं लागल्याचाच परिणाम पुनर्विवाह, अति प्रौढविवाह इत्यादि वादांच्या स्वरूपांत आपल्यांत दिसत आहे. वीस पंचवीस वर्षांपुढेंही सांप्रत कांहीं सुशिक्षित कन्यका राहतात त्यांची मनःस्थिति, त्यांच्यांत कित्येक ठिकाणीं दिसणाऱ्या क्षयादि रोगांच्या भावना याचाही विचार करावा.

प्रसिद्ध इतिहासकार " लेकी " यानें " युरोपियन समाजांतील नीतीचा इतिहास " लिहिला आहे त्यांत अशा अर्थाचा एक प्यारा आहे:—

स्त्रियांची नीति बिघडण्यास जीं कारणें होतात त्यांत मोठमोठीं शहरें व उशीरां लग्नें ( Tardy Marriages ) हीं त्याच्या मतें मुख्य होत !" दुसऱ्या कारणाबद्दल तो म्हणतो, "स्त्रियांचें" पवित्र आचरण, त्यांच्या अब्रूविषयीं अत्यंत

दक्षता, व बेअब्रूविषयीं चीड या बाबतींत सर्व युरोपियन समाजामध्यें आयरिश समाज श्रेष्ठ आहे, व तो तसा असण्यास त्या समाजांत असलेली बालविवाहाची सार्वत्रिक चाल हें एकच कारण आहे."

सदर विवेचनावरून पाहतां स्त्रियांचा विवाहकाल रजोदर्शनापूर्वी १३ अगर १४ असणें जरूर आहे व पुरुषांचा विवाहकाल ब्रह्मचर्य टिकविण्यावर जरी असला तरी वीस वर्षांचे आंत बाहेर असावा असें लेखकाचें मत आहे.

१६ सारांश, आम्हां आर्यांची शुद्ध व उत्कृष्ट संस्कृती ज्यांत कायम राहून नवीन कांहीं करतां येईल तें करण्यास हरकत नाहीं, पण असेंब्लींत संमतीवयाच्या सारखीं बिलें येतात म्हणून आपण त्याचे पूर्वीच सुधारणा कराव्या हें मत ठीक नाहीं. कारण संस्कृती उत्तम राखणें यासाठीं असेंब्लींची जरूरी आहेसें वाटत नाहीं. पाश्चात्य देशांतील संस्कृती त्यांची त्यांना लखलाभ असो. आपणांसही आपलें स्वत्व रक्षण करणें जरूर आहे. यासाठीं आपल्या शुद्ध परंपरेचा विचार प्रत्येकानें करून आपलें हित कशांत आहे हें ठरवावें.

---

# थोरांच्या समागमांत:-

' जीवित ही काय चीज आहे बरें ? संयोग आणि वियोग, पुन्हां संयोग आणि वियोग—अशी ही अखंड परंपरा याचें नांव जीवित ! जा ये, ये जा, एवढेंच संसाराचें रूप आहे !

२ आयुष्याचा किती भाग आपण व्यर्थ दवडीत असतो ! आळसांत, व्यसनांत, निद्रेंत, कलहांत, क्षुद्र विषयसंगांत बहुतेक आयुष्य व्यर्थ जातें. जो आयुष्याचा एकही क्षण व्यर्थ घालवीत नाहीं त्याला शंभर वर्षें थोडीं नाहींत ! सत्कालक्षेपांत जेवढा काळ जातो तेवढेंच जगणें, बाकीचें सर्व मरणच आहे. पामर जगून मरतात, संत मरून जगतात !

३ पामरांना जगणें ठाऊक नाहीं, संतांना मरणें ठाऊक नाहीं.

४ संतांना संकोच नसतो. महासागरासारखें त्यांचें अंतरंग विशाल असतें; हिमाचलासारखे ते धीरगंभीर असतात. ते आकाशाच्या पैलपार जातात व त्यांच्या पायांना पृथ्वी अगर पार्थिव कांहींच स्पर्शत नाहीं. गिरिशिखरावरील पठारासारखें विस्तृत, शांत, निर्मळ असें त्यांचें अंतरंग असतें, तेथें दऱ्याखोरीं किंवा डबकीं कांहीं एक नसतात! तेथें नारायणाचा एक अखंड आनंदमात्र असतो. अन्यवृत्तींचे वारे तेथें वाहतच नाहींत ! तेथें गेल्याशिवाय तेथली मौज समजायची नाहीं. वाणी तेथवर पोंचत नाहीं.

---

# श्रीसंतोजी महाराज कुकुरमुंडेकर यांचें भाषण.

( वाई येथील ब्राम्हण परिषदेपुढें ता० २१।११।२५ रोजीं झालेलें. )

आजच्या प्रसंगीं ब्राह्मण्याबद्दलचे माझे अंतःकरणांतील विचार प्रकट करण्याचा प्रसंग श्रीपांडुरंगकृपेनें मला प्राप्त झाला आहे. वास्तविक ह्या परिषदेच्या अध्यक्षपदाला मी अधिकारी नाहीं, कारण हरिभजन करीत राहणें व पूर्वजांनीं आंखून दिलेल्या मार्गानें बिनचूक चालत जाऊन कर्तव्यमुक्त होणें ही माझी कुलपरंपरा आहे. या कामीं फारशा बुद्धिचातुर्याची जरूरी नाहीं. प्रस्तुत हा प्रसंग मात्र तसा नाहीं. असें असूनहि ज्याअर्थीं आपण अध्यक्षस्थानीं माझीच योजना केली आहे यावरून निर्विवादपणें ही गोष्ट सिद्ध होत आहे कीं, जे खरोखरच थोर असतात ते प्रसंगानुरूप सामान्य पुरुषाला हातीं धरून ह्मणजेच त्याला निमित्तमात्र पुढें करून मोठमोठीं कार्यें तडीस नेतात. तद्वत् आपण मला निमितमात्र पुढाकार देऊन ह्या परिषदेचें कार्य यशस्वी करण्याचें ठरविलें असावें असें मला वाटतें. त्यामुळें आपण दिलेल्या या मानाबद्दल आपले आभार मानण्यापलीकडे कांहीं बोलतां येत नाहीं. सूर्यासारखे तेजस्वी असे जे महापंडित येथें हजर आहेत त्यांच्यासमोर ह्या उच्चासनावर बसण्यास मी खरोखर लायक नाहीं ही जाणीव मला आहे, परंतु आपल्या इच्छेपुढें माझा निरुपाय झाला आहे. माझ्याऐवजीं अध्यक्षाचे जागीं पूर्वनिमंत्रित ब्रह्मश्री पूज्यपाद श्रीनागेशशास्त्री उन्पिनबेटगिरी अथवा पूज्यपाद ब्रह्मश्री वासुदेव शास्त्री अभ्यंकर हे किंवा ब्रह्मश्री पाठकशास्त्री हे विराजमान झाले असते तर मला जेवढा आनंद झाला असता तेवढा यावेळीं होत नाहीं. आपण माझी अध्यक्षस्थानीं योजना करून कार्यास प्रारंभ केला आहे त्याचप्रमाणें पुढील कार्यही माझ्याकडून आपण तडीस न्याल अशी मला आशा आहे.

ह्या चळवळीचा जन्म श्रीक्षेत्र काशीतुल्य जें महाक्षेत्र पंढरपूर येथें खुद्द पंढरिनाथाच्या चरणांजवळ जगद्गुरु श्रीमत् शंकराचार्य श्रीमदभिनवसच्चिदानंद विद्यानृसिंहभारती स्वामी महाराज संस्थान पीठ संकेश्वर व करवीर यांच्या फलप्रद आशीर्वादानें भगवद्भक्तशिरोमणि श्री विनायक महाराज जोशी साखरे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला आहे. ब्रह्मो, आर्य, प्रार्थना, सत्यशोधक, हिंदु मिशनरी, सुधारक वगैरे लोकांकडून शास्त्रविरुद्ध ब्राह्मण्याची निराधार कल्पना हिंदू समाजांत वावरूं लागली. तिचा परिणाम ' ब्राह्मण्य ' हें ब्राह्मणांचें पोट भरण्याचें एक उत्कृष्ट साधन आहे तें अशास्त्र असून गुणमूलक ब्राह्मण्य मात्र सशास्त्र आहे, असले कुतर्क पसरत राहण्यांत व ब्राह्मणांबद्दल अनादर, तिरस्कार वगैरे वाढण्यांत घडून आला; एवढेंच नाहीं तर ब्राह्मणांना नामशेष करण्याचा जहाल सत्यशोधकांनीं विडा उचलला ! हें पाहून ब्राह्मण्य रक्षणाचीं

कल्पना पंढरपूरचे विचारी शास्त्री, वकील, पत्रकार वगैरे सद्गृहस्थांना स्फुरली व ती त्यांनीं अमलांत आणून व्यवहार्य केली. त्या आद्य अधिवेशनाच्या प्रसंगीं ब्राह्मण्याची चर्चा खुल्या दिलानें दुतर्फा व्हावी व परस्परविरोधी पक्षांत कितपत एकवाक्यता आणि कितपत मतभिन्नता राहणें शक्य आहे हें जगजाहीर व्हावें म्हणून, सत्यशोधकादि समाजांच्या प्रमुख पुढाऱ्यांना मुद्दाम आमंत्रणें देण्यांत आलीं होतीं, परंतु ब्राह्मणविरोधी पक्षांकडून जरूर तेवढी उत्सुकता, सहकारिता दर्शविण्याऐवजीं जाणून बुजून विरोध, असहकारिता वगैरे व्यक्त झाल्यानें विचारविनिमयाचा प्रसंग टळला. आणि "ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि तं नरं न रंजयति" हा न्याय सत्य ठरला. असल्या बिकट परिस्थितींत परिषदेच्या नेत्यांनीं मोठ्या चातुर्यानें स्वीकृत कार्य यशस्वीपणानें पार पाडलें. या परिषदेनें पंढरपूरचे कै० विनायकराव जोग वकील यांना कमिशनर नेमून त्यांचे मार्फत सत्यशोधकी अत्याचारांबद्दल केलेल्या चौकशीचा वृत्तांत प्रसिद्ध करून जी बहुमोल कामगिरी केली आहे, ती आजतागायत अनेकांना ब्राह्मण्याच्या बचावाचे कामीं सहाय्यक झालेली आहे व ती तशीच यापुढें हि होणारी आहे.

परिषदेचें दुसरें अधिवेशन श्रीक्षेत्र कऱ्हाड येथें सुप्रसिद्ध आचार्यभक्त वे. शा. विष्णुशास्त्री बापट यांचे अध्यक्षतेखालीं होऊन "कुलं शीलं च विद्या च त्रयं ब्राम्हण्यमुच्यते" ही ब्राह्मणाची व्याख्या आणि "जाति ब्राह्मणांतील ब्राह्मण्याचें संवर्धन करणें" हें परिषदेचें मुख्य ध्येय स्वीकारण्यांत आलें.

ब्राह्मण्य परिषदेचें तिसरें अधिवेशन ज्यानें राजकारणांत सर्व हिंदुस्तानवासी मुत्सद्यांकडून अग्रपूजेचा मान मिळविला आहे व जें महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं आहे अशा पुणें शहरीं झालें. या प्रसंगीं श्रीमच्छंकराचार्य श्रीमद्राजराजेश्वराश्रम स्वामी महाराज संस्थान पीठ द्वारका हे अध्यक्ष होते. या परिषदेंत मतभेदांचा कोलाहल माजला. परिषदेमध्यें प्राचीन अर्वाचीन मतांच्या ब्राह्मणांनीं मोठ्या उत्सुकतेनें भाग घेतला होता. या वेळच्या मतभेदाचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें.

'हल्लींचे धार्मिक व सामाजिक वादग्रस्त प्रश्न चर्चेला घेऊन त्याचा परिषदेनें निर्णय ठरवावा' असें कांहींचें म्हणणें होतें, तर काहीं 'फक्त ब्राह्मण्याशीं संबंध येणारेच प्रश्न परिषदेनें सोडवावे' असें म्हणत होते. यामुळें परिषदेच्या घटनेची तीव्र जाणीव भासूं लागली, परंतु घटना पास करण्यांत न आल्यामुळें ही परिषद कार्याच्या दृष्टीनें पुढें पाऊल न टाकतां विसर्जन झाली. नाहीं म्हणावयास कऱ्हाडच्या परिषदेनें ठरविलेली ब्राह्मण्याची व्याख्या व ध्येय हीं परिषदेकडून मान्य करण्यांत आलीं.

त्या सभेनंतर बऱ्याच लोकांकडून या सभेविषयीं गैरसमज फैलावण्याचा

प्रयत्न झाला. तो असा कीं, या परिषदेची दृष्टि संकुचित आहे, व्यापक नाहीं; ही परिषद फक्त जुन्या मताच्या शास्त्रीपंडितांची आहे; देशकालवर्तमान–ज्ञानशून्य लोक हिचे चालक आहेत, असले अनेक प्रकारचे दोषारोप करून परिषदेसंबंधानें गैरसमज उत्पन्न केला. अशा स्थितींत परिषदेच्या मूळच्या चालकांना स्वजातीच्या तीव्र विरोधामुळें कांहीं हालचाल करतां आली नाहीं. अशा सहानुभूतिशून्य अडथळ्याचे वातावरणांत परिषद भरल्यापासून आजतागायतचा काळ निघून गेला. ज्या मुंबईकरांनीं पुढील अधिवेशन भरविण्याचें कबूल केलें होतें त्यांनाहि त्याप्रमाणें करणें अशक्य झालें. हा सर्व प्रकार पाहून शूर वीर, बुद्धिमान ह्मणून त्रिखंडांत गाजलेल्या या स्वधर्माभिमानी महाराष्ट्रांत अनादि कालापासून चालत आलेल्या ब्राह्मण्याचा संरक्षक कोणीच उरला नाहीं कीं काय ! असें वाटूं लागतें. ज्या पुण्यभूमींत सनातन वैदिक धर्मरक्षणासाठीं साक्षात् श्रीशंकरावतार श्रीछत्रपती शिवाजीमहाराज, श्रीसमर्थ रामदास स्वामी व त्यांच्याच सारखे अनेक सत्पुरुष अवतीर्ण होऊन धर्मसंस्थापना करून गेले त्याच महाराष्ट्रभूमींत वैदिक धर्मरक्षणास कारणीभूत असलेले जें ‘ ब्राह्मण्य ’ त्याला थारा मिळूं नये, उलट प्रच्छन्न दयानंदीय मतांचा प्रसार होत रहावा हें खेदजनक नव्हे काय ? परंतु समाधानाची गोष्ट ही कीं, स्वयंप्रेरणेनें ब्राह्मण्यरक्षणार्थ कंबर कसून वाईकर पुढें आले व त्यांनीं आजचें चतुर्थ अधिवेशन भरवून महाराष्ट्राचें नांव राखलें, याबद्दल वाईकरांचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होणार आहे. ज्याप्रमाणें श्रीभीमाशंकरापासून निघालेली चंद्रभागा कृष्णाबाईस मिळून समुद्ररूप झाली त्याप्रमाणें ही परिषद श्रीपांडुरंगचरणारविंदापासून निघून वाईक्षेत्रीं आल्यामुळें तिला सर्व महाराष्ट्रभर पसरविणें हल्लीं क्रमप्राप्त आहे.

## परिषदेची घटना.

या परिषदेपुढें असलेलें मुख्य काम ‘ परिषदेची घटना ’ हें आहे. तरी प्रथमतः त्याबद्दल विचार करूं. हल्लीं या परिषदेचें नांव “ ब्राह्मण्य परिषद ” हें असावें किंवा “ ब्राह्मण परिषद ” हें असावें हा प्रश्न उपस्थित झाला आहे. याबद्दल विचार करितां असें वाटतें कीं, नांव कोणतेंहि असूं द्या. नांवाबद्दल अधिक वादविवाद न करितां या परिषदेंत कार्य काय केलें जाईल याचा विचार व्हावा. “ नांव सोनुबाई आणि हातीं कथलाचा वाळा ” असें होऊं नये. पूर्वीचें नांव बदलून नवीन नांव ठेवण्यास कारण काय ? याचा विचार करा. गुणवर्धनपूर्वक जातीचें रक्षण करणार, कीं केवळ जातीचें रक्षण करणार ! जर केवळ जातीचें रक्षण करणें असेल तर ब्राह्मण नांव द्या. गुणवर्धनपूर्वक जातीचे रक्षणास ब्राह्मण्य नांव योग्य आहे. जातीचें रक्षण करणें

असल्यास जोंपर्यंत मिश्रविवाह सुरू नाहींत व जोंपर्यंत सजातीय विवाहबद्ध असें ब्राह्मण स्त्रीपुरुषांचें युग्म कायम आहे तोंपर्यंत ब्राह्मणांची जात कोणा-लाहि स्वप्नांतसुद्धां नष्ट करितां येणार नाहीं. क्षत्रिय स्त्री व क्षत्रिय पुरुष यांच्या विधिपूर्वक लग्नापासून झालेल्या संततीस क्षत्रियजाति असें म्हणतात, तथापि क्षत्रियत्व मात्र शास्त्रीय संस्कारानें उत्पन्न होतें. संस्काराचे अभावीं क्षत्रियत्व नष्ट होऊन व्रात्यत्व प्राप्त होतें. तद्वत् ब्राह्मण्य व ब्राह्मण यासंबंधानेंहि आहे. आज ब्राह्मण जातीचा जो द्वेष फैलावत आहे, त्याचें मुख्य कारण ब्राह्मण्याचा अभाव हें आहे, म्हणून ब्राह्मण्य संरक्षणाची जबाबदारी ब्राह्म-णांवर येऊन पडली आहे. हें जाणून " ब्राह्मण्यां ब्राह्मणात् जातः " या वचनानुसार विवाहित ब्राह्मणीचे ठिकाणीं ब्राह्मणापासून झालेल्या ब्राह्मणा-मध्यें ब्राह्मण्याची अभिवृद्धि करणें हीच जबाबदारी ब्राह्मण जातीवर आली आहे. जगद्गुरु श्रीमदाद्यशंकराचार्य यांची आज्ञाहि अशीच आहे. ते ह्मणतात " ब्राह्मत्वस्यहि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिको धर्मः " कारण काय तर " तदधीनत्वात् वर्णाश्रमभेदानाम् " ब्राह्मणत्व हेंच वर्णाश्रमाला आधारभूत आहे. म्हणून ब्राह्मण्याचें रक्षण हेंच अत्यंत आवश्यक आहे. हें ध्येय लक्षांत घेऊन कोणतेंहि नांव ठेवलें असतां हरकत नाहीं. अगोदर कार्याची दिशा आंखा. नांवाचा विचार मागाहून केला तरी चालेल.

ह्या परिषदेनें ब्राह्मणांची सर्वांगीण उन्नति केली पाहिजे. त्यांत धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, शारीरिक, बलसंवर्धक, आणि संघटणा-त्मक, इत्यादि गोष्टींचा विचार केला पाहिजे.

म्हणजे स्नानसंध्या, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, अग्निहोम इत्यादि धार्मिक कर्मांचा व लौकिक दृष्ट्या वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या आघातास प्रतिकारयोजनादि बाबींचा विचार व्हावयास पाहिजे.

मीमांसापूर्वक धर्मशास्त्राचें अध्ययन केलेल्या पंडितांचें एक मंडळ नेम-ण्यांत यावें. महाराष्ट्राशीं संबंध असलेले जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्य, श्रीमध्वा-चार्य, श्रीरामानुजाचार्य आणि श्रीवल्लभाचार्य यांच्या धर्मपीठांशीं ह्या पंडित-मंडळाचा संबंध असावा. आचार्यपीठांनीं अनेक संकटांतून ब्राह्मण्याचें रक्षण केलें असल्यामुळें आचार्यपीठें व पंडितमंडळ यांचें नातें कायम असावें. पंडित मंडळीनें दिलेला निर्णायक शास्त्रार्थ परिषदेनें मान्य करावा. लौकिक बाबतीचा निकाल सनातन धर्मानुयायी सभासदांच्या बहुमतानें होत जावा. ज्यांना श्रुतिस्मृति, व पुराणें यांचें प्रामाण्य व मीमांसा परिपाठी तसेंच आपापल्या सांप्रदायी पीठस्थांच्या मठाम्नायांचे निर्बंध मान्य असतील तेच ह्या परिषदेचे सभासद समजण्यांत यावेत. पीठांच्या मर्यादापालनाचा समावेश ब्राह्मण्यरक्षणां-तच होतो. ब्राह्मण्य व पीठाचार्य यांचा परस्पर संबंध शेंकडों वर्षांपासून चालत

आलेला आहे, हे लक्ष्यांत घेणें अवश्य आहे. ह्या सर्व गोष्टींना धरून परिषदेची घटना व्हावी, कारण शास्त्रीय आचारांचें रक्षण व्हावें म्हणूनच आचार्यपीठांचें संस्थापन झालेलें आहे. धर्माधर्म ठरविण्याचा अधिकार शास्त्राशिवाय दुसऱ्यास नाहीं. पुरुषबुद्धीस अनुसरून धर्माधर्म ठरविल्यास अनर्थ होईल, कारण पुरुषबुद्धि अनेक आहेत. कोणाची कल्पना त्याज्य व कोणाची ग्राह्य हें ठरविण्यास कांहीं आधार न राहातां सारा गोंधळ माजेल; म्हणून भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें " तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते " हें स्वीकृत केलेंच पाहिजे. आपल्या पूर्वजांनींहि असलींच बंधनें स्वीकारून उन्नति करून घेतली आहे. त्याबद्दलचा इतिहास साक्षीरूपानें आपणां सर्वांपुढें उभा आहे. ह्या बंधनांचीं युक्तायुक्तता, ग्राह्याग्राह्यता आणि व्यवहारता हीं विचारविनिमयद्वारां ठरवावी.

चालू परिस्थितीचा विचार केला असता ब्राह्मणांना सर्व प्रकारें समर्थ करण्यासाठीं त्यांच्या संघटनाची अत्यंत जरूरी आहे. आतां ' संघटन ' या शब्दाच्या अर्थाचा विचार केला असतां ' संघटण ' म्हणजे एकदिल होणें, एकमेकांच्या विचारांचें तादात्म्य होणें असा होईल; या कार्याचा उपक्रम पुढील दिशेला अनुसरून होणें युक्त आहे.

प्रथम बृहन्महाराष्ट्रांतील ब्राह्मणांची खानेसुमारी झाली पाहिजे. शास्त्री, वैदिक, पुराणिक, कथेकरी, पुरोहित, संस्थानिक, जहागिरदार, सावकार, व्यापारी, वकील, डॉक्टर, वैद्य, नौकर, वतनदार, ग्रामजोशी, कुळकर्णी, धर्माधिकारी वगैरे कोठें कोठें किती किती व कोणच्या परिस्थितींत आहेत याबद्दलची तालुका व जिल्हावार नोंद करून त्यांचे संघ स्थापन झाले पाहिजेत. संघांचा व महाराष्ट्रांतील सर्व धर्मपीठांचा संबंध जोडला पाहिजे. आणि ठिकठिकाणच्या परिस्थितीला अनुसरून संघामार्फत ब्राम्हणोन्नतीचें कार्य विचारविनिमयानें व सहकारित्वानें तडीस नेलें पाहिजे.

शास्त्रदृष्टया, देशदृष्टया व आचारदृष्टया जे अनेक पोटभेद ब्राह्मणांमध्यें झालेले असतील त्यांचें परिगणन व संशोधन करून आपआपसांत रूढ असलेले गैरसमज नष्ट केले पाहिजेत. आणि अशा प्रकारें एकीकरणाचा मार्ग खुला केला पाहिजे. शास्त्रीय भेदाची व्यवस्था शास्त्राधारें व लौकिकी भेदाची व्यवस्था शास्त्र मर्यादा पाळून निर्मत्सर व निःपक्षपातीपणानें लावली पाहिजे, द्वेषाचें निर्मूलन केलें पाहिजे.

अलीकडे शास्त्रीय शब्दांचा अर्थ करण्याच्या अनेक पद्धती निघाल्या आहेत त्या सदोष व अपूर्ण अशा आहेत. म्हणून त्या सर्वथैव त्याज्य आहेत. तरी शास्त्रांचा अभिप्राय बिनचूक लक्षांत येण्यास फक्त मीमांसाशास्त्रच समर्थ आहे आणि शास्त्रीय शब्दांचा अर्थ करतांना कोणत्याहि पूर्वग्रहास अगर मनोविकारास बळी न पडतां शास्त्रीय निर्णय झाला पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं

अतुल सामर्थ्यानें मिळवून ठेवलेलें व जें आपलें ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण साध्य करून देणारें तें वर्णगुरुत्व व मार्गदर्शकत्व कायम टिकविण्यासाठीं ब्राह्मणांनीं उदार धोरण पत्करिलें पाहिजे. हल्लींच्या प्रसंगीं हेंच शहाणपणाचें ठरेल.

आतां 'शापादपि शरादपि' या पक्षाचा विचार करूं. पूर्वकालीन इतिहास डोळ्यांपुढें ठेवून शापप्रवृत्तीचें निरीक्षण केल्यास असें आढळून येईल कीं, हें सामर्थ्य सर्व वर्णांत होतें. शापसामर्थ्याविषयींचीं क्षत्रिय, वैश्य व स्त्रिया यांचीं अनेक उदाहरणें पुराणांतरीं आढळतात. पाश्चात्य विचारक्रांतीनें त्यांचेवरील विश्वास उडालेला आहे. तथापि अलीकडच्या ब्राह्मण व ब्राह्मणेतर साधुसंतांकडे पाहल्यास सर्व उलगडा होण्यासारखा आहे. पाश्चात्यांचें तेवढें खरें, असल्या घातुक समजुतीमुळें शापसामर्थ्यावरील विश्वासाचा लोप झाला आहे. शापसिद्धि म्हणजे तोंडावाटें निघालेला शब्द खरा होणें हें होय. वेदविहितानुष्ठानपूर्वक आजन्म ब्रह्मचर्य पालन करणें अथवा सत्यवादित्वानें वागणें अगर अहिंसा आपल्या आचरणांत आणणें या योगानें वरील गोष्टीचा अनुभव कोणालाहि घेतां येईल. तपादिकांविषयींचा विश्वास जागृत केल्यावर तत्फलाचा अनुभव आल्यावांचून रहाणार नाहीं.

> येऽसूयाऽनृतदंभेर्ष्याहिंसामानविवर्जिताः
> न तेषां सत्यशीलानामाशिषो विफलाः कृताः ॥
>
> —श्रीमत् भागवत

आतां कर्तव्यपालन किंवा उदरपोषण या प्रश्नाकडे वळूं. केव्हांहि कर्तव्यपालन किंवा उदरपोषण याची प्रवृत्ति अगर निवृत्ति अधिकारभेदानेंच होत असते. सबब त्याच दृष्टीनें या विषयाकडे पाहिलें पाहिजे. ज्याला कर्तव्यपालन हेंच अत्यंत प्रिय आहे तो उदरपोषणाचा उपदेश कधींच ऐकणार नाहीं. ज्याची निष्कलंक सात्त्विकवृत्ति आहे, तो प्रथम कर्तव्यपालन करून नंतर उदरपोषणाकडे पाहील. ज्याची वृत्ति उदरपोषणाकडे गढून गेलेली आहे, तो कर्तव्यपालनाकडे लक्ष देणार नाहीं. अर्थात् वृत्तिभेदानें अधिकारभेद ठरतो. वृत्तिभेदानें कर्तव्यपालनतत्पर ते अत्यंत उच्च व उदरपोषणतत्पर ते नीच असे दोन वर्ग कायमच रहाणार. ज्या कालांत वसिष्ठ, वामदेव यांसारखे तपस्वी ब्राह्मण होते त्या वेळीं सर्वच ब्राह्मण त्यांच्या तोडीचे होते असें नाहीं, यावरून एकाच वर्गांत एकाच वेळीं उच्च नीच व्यक्ति कायम रहाणारच, असा निसर्ग दिसतो.

कर्तव्यपालन व उदरपोषण हा प्रश्न सनातन वैदिक धर्मदृष्ट्या सोडवावा कीं, मन मानेल तसा सोडवावा ? तो मन मानेल तसा सोडवूं गेल्यास अनेक अनर्थपरंपरा ओढवण्याचा संभव आहे. कारण प्रत्येकाची विचारशक्ति स्वतंत्र असल्यामुळें त्याचे अनेक प्रकार होतील. जो तो स्वतःचें खरें व दुसऱ्याचें खोटें असें म्हणूं लागेल. त्यामुळें वाद माजेल; द्वेष, मत्सर बळावतील. म्हणून

ब्राह्मणादिकांचें कर्तव्यपालन व उदरपोषण हीं शास्त्रानें नियत केलीं असल्यामुळें शास्त्रास शरण जाण्यावांचून गत्यंतर नाहीं.

भारतीयांच्या कल्याणासाठीं विद्या, तप, शील यांनीं संपन्न अशा दीर्घदर्शी प्राचीन ऋषिमुनींनीं धर्मग्रंथ केलेले आहेत, म्हणून त्यांचे ठिकाणीं पूज्यभाव ठेवून व त्यांना मार्गदर्शक समजून त्यांच्या अबाधित सिद्धांतांचें अवलंबन करणें श्रेयस्कर आहे.

सांप्रत ब्राह्मणसमाजाचें नियंत्रण करणारें असें एकहि साधन उपलब्ध नसल्यामुळें ब्राह्मणांमध्यें बहुतांशीं शास्त्रनियत वर्तन दिसून येत नाहीं. कांहीं ब्राह्मण मद्यपी व मांसभक्षण करणारे दिसून आले, तरी त्यांच्या संबंधानें योग्य ती तजवीज ब्राह्मणसमाजाकडून होत नाहीं. ब्रह्मवृंदांमध्यें सदाचरणी मनुष्याची जी योग्यता तीच दुराचारी मनुष्याची असें प्रसंगोपात मानलें जातें. त्या कारणानें खऱ्या ब्राह्मणाचें महत्व उत्तरोत्तर कमी होत चाललें आहे. ब्राह्मणांमध्यें प्रामुख्यानें जहागीरदार, इनामदार, नोकर इत्यादिकांचा समावेश होतो. याखेरीज पुरोहिताचाहि एक वर्ग आहे. व त्याची स्थिति अत्यंत शोचनीय आहे. ती सुधारण्यासाठीं जिल्हा व तालुकानिहाय पाठशाळा काढून त्यांत वैदिक, पौराणिक अशा नित्य उपयोगी पडणाऱ्या संस्कारप्रयोगांचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे, व तें संपादन करणाऱ्या ब्राह्मणास उपाध्यायकर्म चालवितां येण्याचे लायकीबद्दल अधिकारपत्र मिळालें पाहिजे. आणि सर्वांनीं त्यांच्याद्वारें धर्मकृत्यें परिपूर्ण करून घेतलीं पाहिजेत. विद्वान, कुलशीलसंपन्न असा उपाध्यायवर्ग निर्माण करण्याची फार जरूरी आहे. याप्रमाणें ते तयार झाल्यास हल्लीं त्यांच्यावर येत असलेले आक्षेप सहज दूर होतील.

संस्थानिक, जहागिरदार, इनामदार, व्यापारी, शेतकरी वगैरे लोकांचा समावेश गृहस्थ वर्गांत होतो. यांना सांप्रत मिळत असलेल्या नव्या शिक्षणानें त्यांच्यांतील जुनें वळण सुटत चाललें आहे म्हणून अनादि कालापासून चालत आलेल्या ' ब्राह्मण्या ' विरुद्ध त्यांच्यापैकीं पुष्कळांचीं मतें बनूं लागलीं आहेत. ( सुदैवानें यालाहि कांहीं अपवाद आहेत. ) यावरून नव्या शिक्षणाचा सर्वस्वीं इनकार केला जात आहे असें मात्र कोणी मानूं नये ! तें स्वत्वरक्षणपूर्वक घेणेंच योग्य होणार आहे. या दृष्टीनें नव्या शिक्षणाबरोबर शुद्ध सनातन वैदिक धर्माचें शिक्षण देण्याची फार जरूरी आहे. तरी या सभेनें सर्व ब्राह्मण जातीला धार्मिक शिक्षण सहज रीतीनें देतां येईल अशी योजना करणें जरूर आहे. कारण धर्मज्ञानावांचून स्वाभिमान उत्पन्न होणार नाहीं. ज्ञानपूर्वक उत्पन्न झालेला स्वाभिमान परिणामीं हितकारक व स्वसंरक्षणास समर्थ होत असतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

नोकर वर्गाची स्थिति फार बिकट बनली आहे. या वर्गांतील कित्येकांना आपण कोण याचाहि विसर पडला आहे. आचार विचार बदलून गेले आहेत--

त्यांना योग्य वळण देणें अवश्य आहे. ब्राह्मणांनीं पोटासाठीं नौकरी करणें भाग झाल्यास ती निरुपाय म्हणून करावी. मात्र ती बजावितांना 'ब्राह्मण्याला' धक्का बसणार नाहीं, इतकी त्यांनीं जरूर खबरदारी घेत जावी. संध्या, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव गंधलेपन, उचितवेष, श्राद्धकर्म इत्यादि नित्य नैमित्तिक कर्मांचा व दया, क्षमा, औदार्य, सत्य इत्यादि गुणांचा लोप झाला नसल्याचें त्यांनीं प्रत्ययास आणून दिलें पाहिजे; स्वैर वर्तन टाकलें पाहिजे; मनास पटेल तोच आचार पवित्र ही समजूत सोडून देऊन शास्त्रसिद्ध आचार मान्य केले पाहिजेत.

शास्त्र कृपाळू आहे, निर्दय नाहीं. शास्त्रानें सुद्धां देशकालवर्तमानानुसार आपद्धर्मादिकांचा उपदेश केलेला आहे. याकरितां त्यास अनुसरूनच वागलें पाहिजे. आचार म्हणजे वागणुकीचे नियम किंवा कायदे असें अलीकडे समजण्यांत येतें. आणि धर्म म्हणजे ईश्वरप्रार्थना किंवा दया व अहिंसादि गुणांचें पालन असें मानलें जातें. वर्णाश्रम धर्म हे कायद्याप्रमाणें वेळोवेळीं बदलतां येतात, अशीहि कांहीं लोकांची चुकीची समजूत झालेली आहे. अशा लोकांना कर्माचें सामर्थ्य व कर्मयोगाचें रहस्य समजलें नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें ! "आचारप्रभवो धर्मः" आचार हाच धर्म होय. धर्मत्व हें वेदप्रतिपादक कर्माला आहे. म्हणजे वेदविहित कर्माचाराच्या योगानें होणाऱ्या क्रियाजन्य अपूर्वाला धर्मत्व आहे. विधिवाक्यांनीं सांगितलेलें कर्म म्हणजेच आचार व त्यालाच उद्देशून 'आचारप्रभवो धर्मः' असें म्हटलें आहे. यावरून वर्णाश्रमधर्म हे ऐच्छिक नसल्यानें देशकालानुसार बदलतां येणार नाहींत. त्या त्या कर्मापासून उत्पन्न होणारें फळ शास्त्रानाच ज्ञात असतें, सबब शास्त्रविहित आचार हाच ब्राह्मण्योत्पादक आहे, तो सुटल्यास ब्राह्मण्य नष्ट होईल, ब्राह्मण पतित होतील व सर्व धर्मकृत्यांत निंद्य व त्याज्य ठरतील. याकरितां केवळ जाति ब्राह्मणांचें रक्षण न करितां जातिनिष्ठ ब्राह्मण्याचें रक्षण होणें अगत्याचें आहे.

एकंदरींत सर्व बाजूनें पर्यालोचन केलें असतां ब्राह्मण्यरक्षणाची जबाबदारी ब्राह्मणांवर आली आहे. याचें बहुतांशीं कारण ब्राह्मण वर्गांत सनातन वैदिक धर्मसंस्कृतीच्या स्वरूपाचें व रचनेच्या हेतूचें अज्ञान हेंच होय. सत्यशोधकादि पंथानें जो धार्मिक गैरसमज फैलावला आहे, त्याचें बहुतांशीं कारण धार्मिक धर्मज्ञानाचा अभाव हेंच होय.

या सर्व गैरसमजुती दूर करण्याची जबाबदारी ब्राह्मण वर्गावर अनादिकालापासून चालत आली आहे. पूर्वकालीं असे जे धार्मिक गैरसमज फैलावून देण्यांत आले होते, ते ते तत्कालीन ब्राह्मणांनीं आपल्या अतुल विद्यावैभवांनीं व तपःसामर्थ्यांनीं दूर केल्याचीं उदाहरणें सर्वांच्या डोळ्यांपुढें प्रत्ययासारखीं उभीं आहेत.

याच पूर्वपरंपरेला अनुसरून विद्यमान ब्राह्मणांनीं आपली जबाबदारी ओळ-

खून वागलें पाहिजे याशिवाय गत्यंतर नाहीं. याचे उपाय म्हणजे ब्राह्मणांनीं तपःसंपन्न व विद्यासंपन्न झालें पाहिजे.

आतां आपण सर्वांनीं ही परिषद जेणेंकरून कार्यक्षम होऊन पार पडेल असा प्रयत्न केला पाहिजे.

या परिषदेंतून जर कार्य निष्पन्न झालें नाहीं तर हा सर्व खटाटोप व्यर्थ गेला असें होईल. सर्वांना झेपेल व पचेल, तसेंच परिणामीं हितकारक व मार्गदर्शक होईल, असाच कार्यक्रम आंखणें अत्यंत आवश्यक आहे. बारीकसारीक वादविवादाकडे व वैयक्तिक गुणदोषांकडे लक्ष न देतां कार्यनिष्ठ होऊन हें सर्व कार्य आपण पार पाडाल अशी मला आशा आहे.

चालू व्यवहारांत चहूंकडून प्रतिक्षणीं कोसळत असलेल्या संकटाकडे लक्ष देऊन सर्वांनीं एकदिल झालेंच पाहिजे. असा एकहि व्यवहार शिल्लक नाहीं कीं ज्यांत ब्राह्मणब्राह्मणेतरांचा वाद नाहीं. याचें कारण काय ? तर ब्राह्मणांत संघटण ( एकदिल होणें ) नाहीं हेंच होय.

प्राचीन सर्व विद्या व कलाकौशल्य याच ऋषिमुनींपासून जगामध्यें पसरलेलें आहे. याचे अनेक दाखले देतां येतील. ज्योतिषशास्त्र, वैद्यविद्या, धनुर्विद्या हीं याच ऋषींपासून जन्मास आलीं. अशा सर्वतोपरी उच्चशिखरावर गेलेल्या आपल्या सद्यःपूर्वजांकडे पाहून आपण आपल्या स्थितीचा विचार केला असतां आपण किती खालावलों आहों हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्यांच्या वैभवाची आठवण करून भागणार नाहीं,तर शक्य तितकें गतवैभव मिळविण्याची महत्वाकांक्षा धरून वागण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. वेदांतील, पुराणांतील अशीं अनेक उदाहरणें देतां येतील कीं, ही सर्व स्थावरजंगमात्मक सृष्टि ब्राह्मणाधीन होती, आपल्या पूर्वजांची आज्ञा इंद्र, चंद्र इत्यादि देवांनाहि अनुल्लंघ्य होती.

देख पां गा किरीटी । आश्रमधर्माचिया राहाटी । विधिमार्गा कळवटी । जे आपणच होतीं ॥ यजन करितां कौतुकें । तिहीं वेदांचा माथा तुकें । क्रिया फळेंसि उभी ठाकें । पुढां जया ॥ ऐसे दीक्षित जे सोमप । जे आपणचि यज्ञाचें स्वरूप ॥

मग वर्णामाजीं छत्रचामर । स्वर्ग जयाचें अग्रहार । मंत्रविद्येसी माहेर । ब्राह्मण जे ॥ जे पृथ्वीतळींचे देव । जे तपोवतार सावयव । सकळ तिर्थांसी दैव ॥ उदयलें जे ॥ जेथ अखंड वसिजे यागीं । जे वेदांची वज्रांगी । जयांचिये दिठीचिया उत्संगीं । मंगळ वाढे ॥

मियां लक्ष्मी डावलोनी केली परौती । फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं । मग वोढवली वक्षस्थळाची वाखती । चरणरजां ॥ —श्रीज्ञानेश्वर.

आजहि आधिभौतिक शास्त्राचे उच्च शिखरांवर गेलेले पाश्चिमात्य पंडित आपल्या वैदिक वाङ्मयाचें अवलोकन करून काय उद्गार काढितात ? याचा विचार केला असतां असें उघड उघड दिसून येतें कीं, त्यांचें वैभव आज

ग्रंथरूपानें आपल्याजवळ शिल्लक आहे. त्याचा पुनरुद्धार केल्यास अंशतः तरी गतवैभव आपणांस मिळवितां येईल, यांत शंका नाहीं. आतां पुढें न पाहतां मागें फिरून पाहण्याची वेळ जवळ आली आहे.

प्रस्तुत सभेंत जे ठराव पसार होतील ते कागदी न रहातां सर्वांनीं अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा. या सभेंतून कोणतें कार्य निष्पन्न होईल अशी जिज्ञासा सर्वांना उत्पन्न होणें स्वाभाविक आहे, त्याप्रमाणें मला ज्या आवश्यक सूचना कराव्याशा वाटतात त्या खालीं देत आहें.

१ या सभेनें वर्षभर काम चालविण्यासाठीं एक पोट कमिटी नेमून घ्यावी व सभेची घटना तयार करावी.

२ ब्राह्मणांची खानेसुमारी करावी.

३ उत्साही, विद्वान व शुचिर्भूत असा उपाध्यायवर्ग निर्माण करण्यासाठीं जिल्हा व तालुकानिहाय पुरोहित–बाल–शिक्षण–शाळा काढाव्यात.

४ ठिकठिकाणीं ब्राह्मणसंघ स्थापन करावेत.

५ धर्माधिकारी संस्थांचा पुनरुद्धार करावा.

६ धार्मिक उच्च शिक्षणासाठीं संस्कृत पाठशाळा काढण्यांत यावी अगर असलेल्या पाठशाळांना योग्य वळण देण्यांत यावें.

७ ब्राह्मणवर्गांत जागृति करण्यासाठीं प्रचारक नेमावेत.

८ ब्राह्मणांतील पोट जातींच्या आचारविचारांचें संशोधन करण्यासाठीं तज्ज्ञ लोकांची कमिटी नेमण्यांत यावी.

९ सभेच्या कार्यासाठीं लागणाऱ्या निधीकरितां फंड जमविण्यांत यावा.

१० हल्लींच्या सर्व परिस्थितीचा विचार करणारे विद्वान धर्मशास्त्रपरिनिष्ठित जमून त्यांनीं एक ग्रंथ करण्याची अवश्यकता आहे. अशा प्रकारचा एक ग्रंथ सनातन धर्मोज्जीविनी सभा करीत आहे.

येणप्रमाणें वर्षभर पुरेल असें एकादें तरी काम हातीं घेतल्यावांचून उठणार नाहीं, अशाच प्रतिज्ञेनें सभेच्या कामास आरंभ करावा व त्याप्रमाणें परम कृपाळू भगवान श्रीपांडुरंग आपणास बुद्धि देवो, अशी त्यांचे चरणारविंदीं प्रार्थना करीत आहें. व श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं श्रीपांडुरंगांजवळ धर्मरक्षणासाठीं जें वरदान मागितलें तेंच वरदान त्यांच्याच वाणीनें मागून मी आपलें भाषण संपवीत आहें.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥

# श्रीसमर्थ गोवर्धन मंदिर.

मुंबई शहरीं श्रीगोवर्धन संस्थेमार्फत श्रीरामनामाच्या त्रयोदशाक्षरी तेरा कोटींचा महामंत्राचा हा चालू सालचा दुसरा जपयज्ञ होय. मुंबईप्रमाणेंच राष्ट्रांत दादर, सातारा, वांई, सांगली, कोल्हापूर, पाटण, महाबळेश्वर, कल्याण, वर्धा, हिंगणघाट, संगमसांगवी, आर्वी (मध्यप्रांत), नागपूर, सितावर्डी, सोलापूर व भोर इ० ठिकाणीं जपयज्ञ सुरू झाले आहेत. राष्ट्रांत रामनामाची पेरणी होईल तर आपल्या धर्मावरील, राष्ट्रावरील, व गोमातेवरील आपत्ति दूर होऊन रामराज्याचीं मधुर फळें आपणास खचित चाखावयास मिळतील.

ज्या मुंबई नगरींत गेल्या दोनवर्षांत २६ कोटि रामनामाचा जयजयकार झाला, त्या नगरींत हें परमपवित्र कार्य अखंड चालू रहावें अशी अनेक भाविकांची सदिच्छा आहे व त्यासाठीं संस्थेच्या मालकीचें एक 'श्रीसमर्थ गोवर्धन मंदिर' उभारलें जावें असा सत्य संकल्प जाहीर करून गुरुस्तसालीं अल्पारंभ म्हणून ४५० रु.ची भिक्षा करण्यांत आली व त्यानंतर पारोळा व भोर येथें मिळून ३००० रुपये संस्थेच्या कायम निधीसाठीं झाले आहेत.

सदर मंदिर उभारलें गेल्यास तेथें अखंड जपयज्ञ चालेल. व कसाबांच्या सुरीपासून हजारों गाईंना प्राणदान देण्याचे कामीं सतत प्रयास करणाऱ्या गोवर्धन संस्थेचें नित्य कार्य चालून अखंड गोसेवा घडेल.

ट्रस्टी मंडळांत शेठ मोतीलाल माणकचंद उर्फ प्रतापशेठ अंमळनेरकर, शेट वल्लभदास मुरलीधर (येवलें), व शेठ गोवर्धनदास माडीवाले असे धनाढ्य सज्जन असल्यानें वाटेल तेवढी मोठ्या रकमेची मदत निःशंकपणें मिळण्यास हरकत नाहीं.

यासाठीं नामप्रेमी गोसेवकांनीं हें मंदिर त्वरित उभारण्याचे कामीं साह्य करावें अशी विनंति आहे. कोणा भाग्यवंतास आपल्या इमारतीचा अशा परमपवित्र कार्यास सदुपयोग व्हावा असें वाटत असल्यास अथवा एखादी सोईस्कर वाडी अथवा इमारत विकणें असल्यास त्यांनीं कृपा करून आमचे-कडे तसें जरूर कळवावें.

काकडवाडी नाका,
कांदेवाडी, मुंबई.

व्यवस्थापक,
**श्रीगोवर्धन संस्था.**

॥ श्री० ॥

॥ हरि ॐ ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

# भक्तिसुखामृत.

( लेखकः—विष्णु बाळकृष्ण महाडेश्वर, मुंबई. )

॥ श्लोक. ॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनं ॥
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुं ॥ १ ॥

॥ ओवी ॥

गणेश शारदा सद्गुरु । संत सज्जन कुळेश्वरू ॥
सर्वही माझा रघुवीरु । सद्गुरुरूपें ॥ १ ॥

—श्रीसमर्थ.

॥ श्लोक ॥

यत्कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणं
यद्वंदनं यच्छ्रवणं यदर्हणं ।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषं
तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ॥ १ ॥

—भागवत.

रहस्यः—ज्याचें कीर्तन, स्मरण, दर्शन, वंदन, श्रवण व पूजन केलें असतां, मनुष्याचीं सकल पातकें तत्काळ भस्म होऊन जातात, त्या मंगल आहे यश ज्याचें, अशा 'निर्गुण आत्माराम वासुदेव भगवंताला' अनंत नमस्कार असोत.

॥ श्लोक. ॥

कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान् भागवतानिह ॥
दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ॥ १ ॥
यथा हि पुरुषस्येह विष्णोः पादोपसर्पणम् ॥
यदेष सर्व भूतानां प्रिय आत्मेश्वरः सुहृत् ॥ १ ॥

—भागवत.

रहस्य:--ह्या मनुष्यजन्मांत शहाण्या माणसानें बाळपणींच भागवत-धर्माचें ( भक्तिमार्गाचें ) आचरण करूं लागावें. कारण, पुरुषार्थसाधन करून देणारी ही नरतनु दुर्लभ आहे, व तीही क्षणभंगुर आहे, केव्हां नाश पावेल याचा कांहीं नेम नाहीं. ह्या मनुष्यजन्मांत ' निर्गुण आत्माराम वासुदेवाची ' चरण सेवा ( भक्ति ) हेंच खरें कर्तव्य आहे. कारण तोच सर्व भूतांचा प्रिय आत्मा, कल्याणकर्ता व ईश्वर आहे.

॥ ओवी ॥

पावावया पूर्ण परब्रह्म । साधकांसी कोणे मार्गीं क्षेम ॥
वेदोक्त मद्भक्ति सुगम । उत्तमोत्तम हा मार्ग ॥ १ ॥

—श्री एकनाथी भागवत.

॥ ओव्या. ॥

जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्या कैंची होईल मुक्ती ॥
असो जे जे जैसें करिती । तें तें पावती तैसे ॥ १ ॥
एवं न करितां भगवद्भजन । अंतीं न होईजे पावन ॥
जरी आलें बरवें मरण । तरी भक्तीविण अधोगती ॥ २ ॥

—श्रीसमर्थ.

भक्ति केल्यावांचून मनुष्याचा जन्ममृत्यु चुकावयाचा नाहीं. भक्तीवांचून जें जें साधन मनुष्य करतो, तें तें जन्म घेण्यास साधन होतें. म्हणून मनुष्यानें भक्ति अवश्य केली पाहिजे. ज्याला ' निर्गुण—आत्माराम वासुदेव ' प्राप्ति करून घ्यावयाची आहे, त्यानें भक्ति अवश्य केली पाहिजे. भक्ति केल्यावांचून ' श्रीकृष्ण परमात्मा ' ह्याची प्राप्ति व्हावयाची नाहीं. भक्ति केल्यावांचून गर्भवासाची अधोगति चुकावयाची नाहीं. भक्ति केल्यावांचून मनुष्याचा जन्म निर्फळ होय. मागें जे थोर थोर संत, साधु, सिद्ध, महंत, व महात्मे होऊन गेले, त्यांनीं श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करून ते मुक्तिपदास गेले आहेत. श्रीरामकृष्णादिकांनीं सुद्धां भक्तीच केली आहे. ज्याला संसारसागरापासून तरून जावयाचें आहे, त्यानें श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति केली पाहिजे. भक्ति केल्यावांचून कल्पांतींही भगवत्प्राप्ति व्हावयाची नाहीं जे लोक भक्ति करतात, तेच मुक्तीचे वांटेकरी होतात. मनुष्यानें प्रपंच सुखानें करावा, पण कांहीं वेळ श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करीत जावा. मनुष्यानें श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति न केल्यामुळें, त्याचा जन्म व्यर्थ जातो.

॥ ओवी ॥

भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा ॥
अवघा वंश उद्धरावा । हरिभक्ति करूनी ॥

—श्रीसमर्थ.

भक्ति करून श्रीकृष्णपरमात्म्याची प्राप्ति झाल्यानें नरजन्माचें सार्थक होतें. भक्तानें परब्रह्मीं ऐक्यता पावतां येते. भक्ति केल्यानें देव भक्त ऐक्य पावतात. सगुणभक्ति करता करतां 'निर्गुण आत्माराम वासुदेव भक्ति' प्राप्त होते. हरिहर ब्रह्मादिक हे श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करतात, मग एकट्या मनुष्यानें भक्ति न केली, तर काय उणें होणार ! संसाराचा त्याग न करतां, व प्रपंचाची उपाधि न सोडतां, जनांमध्यें राहून, श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करून जीवन्मुक्त होतां येतें. भक्तीनें याच जन्मीं, याच वेळीं संसारदुःखापासून सुटतां येतें. श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति ही भवार्णवाचें तारूं आहे, ती केल्यानें पांच देहा वेगळें म्हणजे (१) स्थूळ देह (२) सूक्ष्म देह, (३) कारणदेह, (४) महाकारण देह, (५) कैवल्यदेह यांच्या पलीकडे 'शुद्ध चैतन्य निर्गुण. आत्माराम वासुदेवाच्या' ठिकाणीं तादात्म्य होतां येतें.

॥ ओवी ॥

भरतखंडीं नरदेह प्राप्ति । हे परम भाग्याची संपत्ती ॥
तेथही विवेकू परमार्थी । त्याचा वशवर्ती मी परमात्मा ॥१॥

—श्रीसमर्थ.

पुण्यवान् भरतखंडामध्यें परम दुर्लभ असा मनुष्यजन्म प्राप्त होणें हें थोर भाग्य समजलें पाहिजे. येथें भक्ति केल्यानें, श्रीकृष्ण परमात्म्याची प्राप्ति होते. सुदैवानें परम दुर्लभ असा नरदेह प्राप्त झालेला आहे, म्हणून तो मनुष्याला सुलभ वाटतो. पण तो अमूल्य आहे. कोटी साधनें व यत्न केले, तरी मनुष्यजन्म प्राप्त होणें नाहीं. हा अमोलिक नरदेह पुरुषार्थ सिद्ध करून देणारा आहे, तरी तो नाशिवंत आहे, हें ध्यानांत ठेवून, मनुष्यानें देहाला मृत्यु येण्यापूर्वींच श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करावयास लागावें. देह केवळ अस्थि, चर्म, विष्ठा, मूत्रांचा बनलेला आहे, तरी ह्या देहाच्या साधनानें भक्ति करून, श्रीकृष्ण परमात्म्याची प्राप्ति करून घेतां येते. देह अमंगळ व घाणेरडा म्हणून सांडला तर मोठा लाभ गमाविला असें होतें. आणि वंद्य व चांगला म्हणून रात्रंदिवस विषयसेवनांत घालविला, तर नर्क प्राप्तीचें साधन होतें. यासाठीं या नरदेहाच्या साधनानें श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करून, स्वतःचा उद्धार करून घ्यावा, हेंच मनुष्य देहाचें सार्थक होय.

॥ श्लोक ॥

जन्म दुःखं जरा दुःखं नित्य दुःखं पुनः पुनः ॥
संसारसागरे दुःखं तस्माज्जागृहि जागृहि ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

जन्म अवघा दुःख मूळ । लागती दुःखाचे विंगळ ॥
म्हणोनियां तात्काळ । स्वहित करावें ॥ १ ॥
परम मूर्खांमाजी मूर्ख । जो या संसारी मानी सुख ॥
य संसारदुःखा ऐसें दुःख । आणिक नाहीं ॥ २ ॥

—श्रीसमर्थ.

जन्म हा दुःखाचा समुद्र आहे. जन्म हें भ्रांतीचें पटल आहे. जन्म जीवाचें बंधन आहे. जन्मामुळें मनुष्याला श्रीकृष्णपरमात्म्याच्या भक्तीचा विसर पडतो. जन्म हा अनंत वासनांचा विस्तार आहे.

॥ श्लोक ॥

लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहु संभवांते मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः ।
तूर्णं यतेत न पतेदनुमृत्यु यावत् निःश्रेयसाय विषयः खलुसर्वतः स्यात् ॥ १ ॥

—भागवत.

रहस्यः—चौऱ्यांशीं लक्ष योनी जन्म पावून, शेवटीं हा अत्यंत दुर्लभ असा मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे. असा जरी हा अमोलिक मनुष्यदेह आहे, तरी ह्याच्या पाठीमागें मृत्यु लागलेला आहे असें शहण्या मनुष्यानें जाणून देहाला मृत्यु आला नाहीं, तोंच श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करून, उद्धरून जाण्याच्या प्रयत्नास लागावें. विषयसुख भोगण्याच्या नादीं लागून, असला परम दुर्लभ मनुष्यदेह व्यर्थ गमावूं नये. ( कारण, विषयभोग हे पशुपक्ष्यादि सर्व योनींत आहेतच. )

॥ अभंग ॥

काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा ॥ १ ॥
कांहीं धांवाधांव करी । जंव तो आहे मृत्यु दूरी ॥ २ ॥
देह आहे जाईजिणें । भुललासी कवण्या गुणें ॥ ३ ॥
मायाजाळीं गुंतलें मन । परि हें दुःखासी कारण ॥ ४ ॥
सत्य वाटतें सकळ । परि हें जातां नाहीं वेळ ॥ ५ ॥
रामीं रामदास म्हणे । आतां होईं सावधान ॥ ६ ॥

॥ ओव्या. ॥

मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसी सादर व्हावें ॥
भगवत्कारणींच वेंचावें । केवळ आयुष्य हें ॥ १ ॥
नाहीं देहाचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा ॥
प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ २ ॥
याकारणें सावध असावें । जितकें होईल तितकें करावें ॥
घडी घडीनें साधित जावें । सार्थक या जीवाचें ॥ ३ ॥

देह परमार्थीं लाविलें । तरीच याचें सार्थक जाहलें ॥
नाहीं तरी व्यर्थचि गेलें । नाना आघातें मृत्युपंथें ॥ ४ ॥
मृत्यु न म्हणे थोर थोर । मृत्यु न म्हणे हरिहर ॥
मृत्यु न म्हणे अवतार । भगवंतांचे ॥ ५ ॥
ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थकाचि करावें ॥
जनीं मरोनियां उरावें । कीर्तिरूपें ॥ ६ ॥
गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ॥
गेले अगाध महिमेचे । मृत्युपंथें ॥ ७ ॥

—श्रीसमर्थ.

मृत्यूचें नांव ऐकल्याबरोबर मनुष्यास थरकांप होतो. मनुष्य मृत्यूला फार भितो, पण मृत्यु माणासाच्या स्वाधीन नाहीं. तो नेमलेल्या वेळीं, व ठरलेल्या स्थळीं अचूक येतो खास. त्याला टाळतां येणें शक्य नाहीं.

॥ ओव्या. ॥

नरदेहीं आलिया एक । कांहीं करावें सार्थक ॥
जेणें पाविजे परलोक । परम दुर्लभ जो ॥ १ ॥
यालागीं मनुष्यदेहीं जाण । करोनियां भगवद्भजन ॥
चुकवावें जन्ममरण । आपणा आपण उद्धरावें ॥ २ ॥
नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ॥
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥ ३ ॥
मनुष्यदेहाचेनि ज्ञानें । सच्चिदानंदपदवी घेणें ॥
एवढा अधिकार नारायणें । कृपावलोकनें दिधला ॥ ४ ॥

—श्रीसमर्थ.

मनुष्यजन्म परम दुर्लभ आहे. बहुत जन्मांचे शेवटीं मनुष्यदेहाची प्राप्ति झाली आहे. यासाठीं या देहांत लवकर भक्ति करून ‘ नराचा नारायण बनणें, ’ हाच खरा मनुष्यजन्म देण्याचा हेतु आहे. नरदेहाची खरी सफलता जीवांनीं निरंतर प्रेमयुक्त अंतःकरणांनीं त्या श्रीकृष्णपरमात्म्याच्या गुणाचें स्वरूपाचें, चरणांचें, संकीर्तन, भजन, व वंदन करावें; व त्याच्या अनुपम अशा भक्तिप्रेमानंदसुखाचा उपभोग घ्यावा, ही होय. तो भगवंत भक्तिप्रिय आहे, व मनुष्यही प्रेमप्रियच आहे. भगद्भक्ति हाच जीवांचा परमधर्म आहे.

॥ ओव्या. ॥

पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ॥
म्हणूनी नरदेहींच प्राप्ति । परलोकाची ॥ १ ॥

या नरदेहाचेनि संमंधें । बहुत पावले उत्तम पदें ॥
अहंता सांडूनि स्वानंदें । सुखी जाले ॥ २ ॥

—श्रीसमर्थ.

मनुष्याचें बुद्धिसामर्थ्य ही देणगी पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही जीवास नाहीं. हा ज्ञानसंपन्न जीवप्राणी श्रीकृष्ण परमात्म्यानें आपलें विश्वचातुर्य व कर्तृत्वसामर्थ्य खर्चून ह्यानें आपणांस भक्ति करून ओळखावें, म्हणून निर्माण केला आहे. पुण्याईची नवी जोड करण्याचा अधिकार नरतनूखेरीज दुसऱ्या कोणत्याही देहांत नाहीं. इतर देह नीच व बुद्धिज्ञानहीन आहेत. त्या देहांमध्यें उन्नतिकारक बुद्धिज्ञानसामर्थ्य मर्यादित आहे. यामुळें त्यांना स्वतःची उन्नति करून घेतां येत नाहीं. पशुदेहीं भक्ति करतां येत नाहीं,म्हणून मनुष्यदेहांतच भक्ति करून, श्रीकृष्णपरमात्म्याची प्राप्ति करून घेतली पाहिजे. या मनुष्यदेहांतच भक्ति करून, यमयातनेचें अरिष्ट चुकवितां येतें. सर्व अवयवांनीं युक्त असा नरदेह प्राप्त झाला असतां, मनुष्यानें अतित्वरेनें भक्ति करण्यास लागावें. हा नरदेह चौऱ्यांशीं लक्ष फेरे आहे. यासाठीं भक्ति करण्यास मनुष्यानें आळस व विलंब लावूं नये.

॥ ओव्या. ॥

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पहाहो ॥
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥
बहुत जन्मांच्या शेवटीं । जेणें चुके आटाआटी ॥
तो नरदेह भेटी । करी भगवंताची ॥ २ ॥
म्हणोनि धन्य ते भाविक जन । जिहीं जोडिलें हरिनिधान ॥
अनंत जन्मांतरीचें पुण्य । फळासि आलें ॥ ३ ॥

—श्रीसमर्थ.

मनुष्यानें स्वतःच्या उद्धारासाठीं जी जी इच्छा करावी, ती ती नरदेहांत सिध्दीला पावते. अनेक पुण्याईचें फळ तो हा मनुष्य देह होय. आपण नेहमीं शेंकडों मनुष्यदेह जन्मास येतात, आणि मृत्युमुखीं पडतात, हें पहात असतों. मनुष्य देहासारखी कामधेनु आपणांस प्राप्त झाली असून, आपण त्याचा शिस्नोदरपरायण होऊन, संसारांतील विषयांची खटपट, निद्रा, मत्सर, विनोद, टवाळी आणि गंजिफा, पत्ते, बिझिक यांच्या छंदांत दुरोपयोग करतो, अमोल्य आयुष्याचा मातेरा करितों. यासाठीं श्रीकृष्णपरमात्म्याची भक्ति करण्याचा छंद मनुष्यानें लावून घेतला पाहिजे. तरच तरणोपाय होणार आहे.

# स्त्रियांची भक्ति.

भगवान् श्रीकृष्ण एकदां बळराम दादासह वनांत आहे असें पाहून देवाचे भक्त जे गोपाळ तेही त्या ठिकाणीं आले. गोपाळांना भूक लागली तेव्हां त्यांनीं श्रीकृष्णाजवळ अन्नाची याचना केली. देवांनीं सांगितलें, 'येथें जवळच ऋषि यज्ञ करीत आहेत तेथें जा व माझें नांव सांगा म्हणजे तुम्हांला भोजन मिळेल.' पण त्या गोपाळांना त्या ब्राह्मणांनीं भोजन दिलें नाहीं. तेव्हां ते निराश होऊन परत श्रीकृष्णाकडे आले. देव हांसले व म्हणाले, 'गोपाळ हो ! तुम्ही त्या ऋषींच्या पत्न्यांस भेटा व बळरामदादासह मी येथें आलों आहें असें सांगा म्हणजे त्या तुम्हांस भोजन देतील.' पुरुषांपेक्षां स्त्रिया स्वभावतः धर्मशीळ, श्रद्धाळु व आतिथ्यकर्मीं अधिक दक्ष असतात. त्यांना कृष्णदेव आपल्या आश्रमाजवळ आलेले ऐकून परमानंद झाला, व आप्तांनीं प्रतिबंध केला असतांही त्या चतुर्विध अन्न घेऊन श्रीकृष्णदर्शनास आल्या. आपल्या हातून श्रीकृष्णसेवा घडली नाहीं व आपल्या भार्यांनीं देवाच्या भक्तीचें व अतिथिसत्काराचें पुण्यकर्म केलें याबद्दल त्या ऋषींना मागाहून पुष्कळ पश्चात्ताप झाला. ही मधुर कथा भागवताच्या दशम स्कंधांत अ. २३ मध्यें दिली आहे व वामन पंडितांनीं 'यज्ञपत्न्याख्यान' म्हणून ७८ श्लोकांचें त्यावर सुंदर आख्यान रचिलें आहे.

\+ \+ \+ \+

विप्रस्त्रिया सारुनि पाक सारा, ध्याती मुकुंदा जगदेकसारा ।
अलंकृता मौक्तिकमाणिकांनीं मनीं मुखीं माधव आणि कानीं ॥२३॥

गोपाळ हे खरे हरिदासच, त्यांनीं देव आले म्हणून सांगून त्या ऋषिपत्न्यांना वंदन केलें:—

देखोनियां हे हरिदास त्यांतें, 'नमो' म्हणोनी नमिती सत्यांतें ।
सन्मान देऊनि अनेकरीती, 'आला हरी' हें श्रुत ते करीती ॥२४॥

ऋषिपत्नी देव आले हें ऐकतांच आनंदभरित झाल्या:—

ऐकतां निकट आगमनातें, नावरेच अनुराग मनातें ।
अन्न षड्रस चतुर्विधजाती, घेउनी हरिस सन्निध जाती ॥ २६ ॥

समुद्रातें उच्चस्थळिहुनि मिळों जाति सरिता,
सुखाब्धीतें जाती त्वरिताचि तशा प्रेमभरिता ।
तटीं कालिंदीच्या सुललित अशोकद्रुमवनीं,
स्वगोपालांमध्यें करि पदरजें धन्य अवनीं ॥ २८ ॥

अन्न षड्रस आहे ह्म. अन्नांत कडू, गोड, आंबट, खारट, तिखट, व तुरट असे सहा रस आहेत. खाण्याच्या पदार्थांच्या चार जाति आहेत. लेह्य, पेय, चोष्य व खाद्य. लेह्य म्ह. श्रीखंडादि चाटण्याजोगें; पेय म्ह. दुग्धादि पिण्याजोगें; खाद्य म्ह. भात पोळी लाडू इ. खाण्याजोगें व चोष्य म्ह. शेवग्याच्या शेंगा इ. चोखण्याजोगें.

सरितांची उपमा फार गोड आहे. नद्या पर्वतावरून उतरत उतरत खालीं समुद्राला येऊन मिळतात, त्याप्रमाणें त्या स्त्रिया भक्तिनम्र—निरहंकार होऊन सुखसमुद्र जो श्रीकृष्ण त्याला मिळाल्या. त्या सत्या म्ह. पतिव्रता होत्या. त्यांनीं श्रीकृष्णाला मनानें आलिंगिलें म्ह. सर्वेंद्रियांसहित त्या भगवंताला शरण गेल्या आणि लौकिकाचाराप्रमाणें त्याला वंदन केलें:—

ऐकोनि जो स्वहृदयांतचि रेखिला हो, प्रत्यक्ष तोचि नयनीं प्रभु देखिला हो।।
आलिंगिला निजमनें प्रभु त्या सत्यांनीं, केलें तयाउपरि वंदन त्यांस त्यांनीं।। ३७।।

यावर श्रीकृष्णांनीं त्यांस उत्तम बोध केला व त्यांचा गौरव करून त्यांस पतीकडे जाण्यास सांगितलें:—

हरी म्हणे कीं 'तुम्हि विप्रदारा, महासभाग्या परमा उदारा।
पहावया पातलियाचि मातें, अलभ्य जो मी त्रिदशोत्तमातें'।। ३९ ।।

त्रिदश म्ह. देव, त्यांचा स्वामी, मी इंद्रादि देवांनाही दुर्लभदर्शन आहें. माझ्या ठिकाणीं सर्वांची प्रीति निरतिशय व स्वाभाविक आहे. याचें कारण या सर्व जड व अनर्थ म्ह.नश्वर पदार्थांत मी एकच व्यापून राहिलों आहें.

जडा अनर्थांत समान साचा, जो अर्थ तो मी प्रियमानसाचा।
सर्वांसही गोडचि वाटलों कीं, प्रीतीस ही एकचि वाट लोकीं ।।४०।।

सर्व अनर्थांत अर्थ म्ह. सारभूत आत्मा मी आहें, हें जो जाणून वागेल तो सर्वांच्या प्रेमास पात्र होईल. सर्व भूतांचें प्रेम मिळविण्याचा हा एकच राजमार्ग आहे. अनर्थरूप जी प्रकृति तिच्यावरची दृष्टि काढून जो आत्मरूपीं रत होईल तोच सर्व लोकप्रिय होईल. आत्मा सर्वप्रिय आहे.

आत्माचि तो परम मी म्हणऊनि मातें, जाणोनि संत भजती पुरुषोत्तमातें।
जे हेतुवार्जित विनाव्यवधान साची, हे स्वात्मभक्ति मज अर्पिति मानसाची।। ४१।।

जे हेतुवर्जित आहेत म्ह. आत्मव्यतिरिक्त अन्य जड पदार्थांच्या ठिकाणीं ज्यांची आसक्ति नाहीं व चित्ताला आत्म्यावांचून दुसरें व्यवधान नाहीं असे आत्मनिष्ठ संत मला—परमात्म्यालाच भजतात. देव म्हणतात, "स्त्रियांनों तुमच्या प्रेमभजनांत मी आत्माराम तुम्हांला सांपडलों, आतां तुम्ही परत त्या यज्ञमंडपांत आपापल्या पतींना धर्मकर्मांत साह्य करण्यास जा."

प्रियें सारीं जेणें प्रिय परम तो वो स्वभजनीं,
असा मी त्या मातें तुम्हि गवसिलें प्रेमभजनीं ।
तुम्ही जावें जेथें स्वपति करिती देवयजन ।
स्त्रियांच्या योगें ते करितिल समाप्ती द्विजजन' ॥ ४८ ॥

हा वेळपर्यंत भगवंताचें दर्शन, त्याचें मधुर भाषण, त्याच्या मुखांतून गंगेप्रमाणें स्रवणारा तो स्वानंदबोध यांत त्या ऋषिपत्न्या इतक्या दंग होऊन गेल्या होत्या कीं त्या आपल्यासकट सर्व जग—हा संसार—विसरल्या होत्या. असेंच देवाचें रूप डोळ्यांनीं सतत पाहत असावें, असेच अमृतमधुर शब्द त्याच्या मुखांतून निरंतर ऐकत रहावेत व ही परमात्ममूर्ति सर्वेंद्रियांत भरली असतांना संसाराचें पुनर्दर्शन न होतां यांतच मरून विरून विरघळून जावें असें त्या पुण्यशील सतींना वाटल्यास नवल नाहीं. या आनंदसमुद्रांतून देवानें आपल्याला दूर ढकलून दिलें, पतींकडे परत संसारांत जा म्हणून सांगून सुख पर्वतावरून दुःखाच्या दरींत लोटलें असें त्यांना वाटलें. देवाच्या समागमापासून परत संसारवृत्तीवर यावें असें कोणा भक्ताला वाटेल? पण देवाचें करणें देवच जाणें! गीतामृत पाजून अर्जुनाला देवानें पुनः युद्धकार्याला लावलें तसाच देव भक्तांना स्वात्मानंदाचें परमामृत पाजून पुनः संसारकर्मांतच लोकरहाटीसाठीं ठेवीत असतो. देव म्हणाले:—

न प्रीतयेऽनुरागाय ह्यंगसंगो नृणामिह ।
तन्मनो मयि युंजाना अचिरान्मामवाप्स्यथ ॥ ३२ ॥

प्रत्यक्ष अंगसंग म्ह० शरीरांचा समागम हा ह्या जगांत सुखाच्या किंवा प्रेमाच्या परिपोषणाला कारण होतो असें नाहीं. ह्मणून तुम्ही आपलें मन मत्स्वरूपीं ठेवा, म्हणजे लवकरच तुम्हांला माझी प्राप्ती होईल.

ह्या सुंदर भागवती श्लोकाचें वामनांनीं कसें सरस रूपांतर केलें आहे तें पहा—

घडे भक्ति जैसी मनाच्या प्रसंगें, न साधे तशी माझिया अंगसंगें; ।
मनीं ध्या मला, शीघ्र पावाल मातें, स्मरा अंतरीं सर्व सर्वोत्तमातें, ॥५८॥

प्रत्यक्ष दर्शनाचें सुख थोरच आहे, पण त्याहूनही दर्शनोत्तर ध्यानाचें अनुसंधानाचें, स्मरणाचें सुख निरंतर अपार आहे. देवानें त्या स्त्रियांना एकवार दर्शन दिलें, बोध केला व संसारांत राहूनही त्या बोधसुखाचा रंग भंग न पावावा यासाठीं याच्या दृढीकरणासाठीं त्यांना परत संसारांतच ठेवलें. भक्ताचा संसार उधळून त्याला पूर्ण रंगांत ठेवणें देवाला काय अशक्य आहे? पण नव्हे. संसार ही परमार्थ शिकण्याची उत्कृष्ट शाळा आहे; येथें परमार्थबोधाची कसोटी लागते; येथें परमार्थभावना दृढ होतात; येथें त्यांचें महत्व कळतें. संसाराच्या विविध वृत्तींशीं घसवटतां घसवटतां वैराग्य उत्पन्न होतें व ज्ञानबोध आस्ते आस्ते जिरत पचत जातो.

असो. आपल्या पत्न्यांनीं श्रीकृष्णदेवाचा सत्कार केला, त्याचा प्रसाद जोडला हें कळल्यावर त्या ऋषींना अनुताप झाला, त्यांना दुःख वाटलें व आपल्याहातून नाहीं तर नाहीं, पण आपल्या धर्मपत्नींकडून तरी हरीचा व हरिदासांचा योग्य सन्मान केला गेला यांतच त्यांनीं सुख मानून घेतलें. अनुतापाच्या भरांत ते ऋषि म्हणाले कीं " हा आमचा जन्म, ही आमची विद्या, हें ब्रह्मचर्य, हा बहुश्रुतपणा, हीं आमचीं कर्में ह्या सर्वांना आम्हीं कमीपणा आणल्यामुळें आम्हाला धिक्कार असो--कां कीं प्रत्यक्ष देव आमच्या घरीं चालून आले असून आम्ही त्याला विमुख झालों ! आम्हांला सर्व संस्कार झाले, आम्ही आपल्याला सुसंस्कृत झालों असें म्हणतों पण आम्हांला दृढ भक्तिचें वेड लागत नाहीं ! ! आणि ह्या स्त्रियाः—

नासां द्विजातिसंस्कारो न निवासो गुरावपि । न तपो नात्ममीमांसा न शौचं न क्रियाः शुभाः ॥ ४२ ॥

यांना उपनयनसंस्कार नाहीं, गुरुसहवास नाहीं, तप नाहीं, आत्मविचार नाहीं, शुद्धता किंवा संध्यावंदनादि शुभ क्रिया नाहींत असें असून यांच्या ठिकाणीं केवढें अलोट भगवत्प्रेम आहे ! "

* * *

स्त्रियांच्या ठायीं विद्या, तप गुरुसमागम, कर्माचरण इ. गुण नसूनहि शुद्ध हरिप्रेम असल्यामुळें त्या तरल्या, व पुरुषांच्या ठिकाणीं वरील गुण असूनहीः—

भक्तीविणें हरिचिया गुण ते उडाले, त्यांच्या स्त्रिया तरलिया, नर ते बुडाले!

पुरुषांनीं ह्या कथेवरून फार बोध घेतला पाहिजे. पुरुषांचे व्यवसाय व व्यवहार सामान्यतः ज्यास्त राजस असतात आणि म्हणून ते परमार्थाला तितके दुरावतात. सत्व गुण हा भक्तीला जवळ करितो, म्हणून स्त्रीपुरुषांनीं प्रपंचव्यवसाय करीत असतांना सुद्धां रजोगुणाचा विटाळ अंतर्वृत्तीला होऊं न देण्यासाठीं फार दक्ष रहावें. पुरुष काय किंवा स्त्रिया काय भगवत्प्रेम असेल तरच त्यांचें जिणें धन्य होय.

---

# वादानें ऐक्यभावाचा विघाड.

१

ऐक्याचें बीज एकपणाच्या भावनेंत आहे, ' एकमेवाद्वितीय ' असा आत्माराम असल्यामुळें त्या एकमय आत्म्याशीं तद्रूप होण्यांत आहे. लोकांची दृष्टि सामान्यतः आत्म्याकडे नसून प्रकृतीकडे असते. प्रकृति ही गुणदोषरूप आहे-

गुण आणि दोष प्रत्येक व्यक्तींत, वस्तुमात्रांत आहेत. कोणींही मनुष्य घेतला तरी त्यांत कांहीं गुण व कांहीं दोष असायचेंच. एकाच मनुष्याकडे पाहण्याचे अनेकांचे भिन्नभिन्न दृष्टिकोन असतात. यामुळें कोणी स्तुति करणारे व कोणी निंदा करणारे उत्पन्न होतात. आत्मस्वरूपाची ज्याची बैठक स्थिर झाली त्याला गुणदोष दिसतच नाहींत म्हणजे ते प्रकृतिजन्य आहेत हें त्याला पूर्ण ज्ञान असल्यामुळें तो त्यांकडे न पाहतां आत्मारामाकडे पाहतो. असा पुरुष हाच लोकांत ऐक्यभाव वाढविण्यास समर्थ होतो. तोच खरा लोकनायक होय.

२

सांप्रत भरतखंडांत ही आत्मस्वरूपाची बैठक कायम ठेवून लोकांच्या चळवळींत पडणारे धर्मनिष्ठ पुरुष विरळ असल्यामुळें 'मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला' अशी बेदाद स्थिति झाली आहे. हिंदु संस्कृतीची घडी मोडून पाश्चात्य संस्कृति हिंदु लोकांच्या चित्तांवर आपली छाप बसवूं पाहत आहे. अशा या संक्रमणकाळीं नुसत्या जुन्यानव्यांत नव्हे, तर नव्यानव्यांत आणि जुन्याजुन्यांत भिन्नभिन्न मतें फैलावून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं हें वर्तमानपत्रें, मासिकें, सभा, मंडळें यांजकडे पाहणाऱ्या आंधळ्याच्याही लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं.

३

सांप्रतचा काळ विचारस्वातंत्र्याचा आहे, चिकित्सेचा आहे, घटनेचा आहे असें सांगण्यांत येतें व मतभेद, वाद, चर्चा हीं झालींच पाहिजेत; झगड्यांतूनच समाज टिकाव धरून राहील, सत्य बाहेर येईल इ. गोष्टी जो तो आपापल्या परीनें सांगत आहे—पण सर्वांचा परिणाम मात्र दिखाऊ होऊन अंतर्यामीं एकोपा बिघडून जात आहे ! 'सत्यशोधक' पणाचा डौल सारेच मारतात, पण सत्य बाजूला राहून वादांत असत्य, हेत्वाभास, जल्प, वितंडा, अतिवाद हे सर्व प्रकार विरोधी पक्ष सारख्याच आवेशानें एकमेकांवर भडिमार करितांना योजीत आहेत ! राष्ट्रांत ऐक्यभावनेचा प्रसार करणाऱ्या श्रीसमर्थांसारख्या महात्म्यांनीं वादांनीं कांहीं निष्पन्न होत नाहीं म्हणून त्यांत पडूं नका असें बजावलें असून त्याकडे कोणीच लक्ष देत नाहीं.

४

**वादविवाद परमार्थांत तसाच लौकिक चळवळींतहि अनर्थकारी आहे,** असा संतांचा उपदेश आहे व अनुभवहि तसाच आहे. ह्या संबंधानें मनाच्या श्लोकांत व इतरत्र बरेच ठिकाणीं सुंदर बोध केला आहे, तिकडे आपण पाहूं:

( १ ) वाद वाढला ह्मणजे ' पुढें मागुता शोक जीवीं धरावा ' लागतो ( ६१ ) वादाचा शेवट उभयपक्षीं heart-burning मध्यें होतो हें आपण पाहतोंच.

( २ ) वादापासून चार तोटे होतात. ‘ निजध्यास ’ म्ह. आत्मानुसंधान किंवा हरिचिंतन याला अडथळा येतो; ‘ अंतरीं शोकसंताप बळेंच ’ म्ह. विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करण्याप्रमाणें आपण होऊन बोलावल्यासारखा होतो; ‘ सुखानंद आनंद भेदें बुडाला ’ हा तिसरा तोटा—भेदभावना बळावते व स्वसुखाला वादमग्न पुरुष व्यर्थ आंचवतो व मनाला खेद होऊन स्वनिश्चयापासून च्युत होतो, ( ६२ ).

( ३ ) क्रिया करणाऱ्याला वादांत पडायला वेळच नसतो, वादी पुरुष ‘ क्रियेवीण वाचाळता ’ या दोषांत पडतो, ( १०८ ).

( ४ ) वादविवाद सोडून द्यावा व सुखसंवाद करावा. हा शोकसंताप हरण करणारा व हितप्रद होतो. ( १०९ )

( ५ ) ‘ अहंतागुणें वाद नानाविकारीं ’ ( ११० ). अहंकारापासून वादाची प्रवृत्ति होते आणि एकदा वादांत पडल्यावर कोणताच धरबंद राहात नाहीं आणि दोन्ही पक्षीं अपशब्द वाढून द्वेषमत्सरवैरादि दुष्ट भावनांत त्याचें पर्यवसान होतें.

( ६ ) वादांत पडूं नये हें ‘ हितार्थ ’ आम्ही सांगतों. वादाचे दुष्परिणाम काय होतात हें खाजगी किंवा सार्वजनिक गोष्टींतल्या वादांचे परिणाम ‘शोधून पहा’ म्हणजे समजेल ( १११ ).

( ७ ) जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला, परी वादवीवाद तैसाचि ठेला।
उठे संशयो वाद हा दंभधारी, तुटे वाद संवादे तो हितकारी ॥ ११२ ॥

( ८ ) वादानें अहंता वाढते व मोठमोठे पंडित व व्युत्पन्न पुरुषही शेवटीं ब्रह्मराक्षस होऊन स्वहितास आंचवतात. ( ११३ )

( ९ ) अहंकारराहू हा स्वरूपाला आच्छादून टाकतो आणि यामुळें तमाची रात्रच अधिक घनघोर होत जाते.

५

श्री समर्थांनीं मनाच्या श्लोकांत वादाविवादापासून कोणकोणते तोटे होतात तें सांगितलें आहे. त्याचा आपण सारांश काय तो पाहिला. वादापासून आपलेंच अत्यंत अनहित होतें, स्वरूपबोधाला व स्वानंदाला मनुष्य आंचवतो आणि दुर्भावना बळावतात. हें नुकसान ज्याचें त्याच्यापुरतें झालें. पण वादविवाद वर्तमानपत्रांत, मासिकांत, सभांत मंडळांत विविध संप्रदायांत व समाजांत एकदां बोकाळत चालले, कीं मतभेद व पक्षभेद तीव्र माजून राहतात; नानाप्रकारच्या वृत्तींनीं वाचकांचीं मनें आंदोलन पावतात. एकात्मभावनेचा विध्वंस होऊन समाजाची अत्यंत हानि होते! असा प्रकार सर्वत्र चालला आहे कीं नाहीं हें ज्याचें त्यानें पाहून घ्यावें, आणि वादाचा घरीं, दारीं, लौकिकांत, चळवळींत वीट मानायला शिकावें. वादबुद्धि खुंटली कीं एकोपा सहज आहे.

६

वर वाद, जल्प, वितंडा, अतिवाद ही वादाचींच चढतीं दुष्टरूपें आहेत म्हणून सांगितलें त्यांचें स्पष्टीकरण करूं:—

१ वादः—स्वपक्ष आणि परपक्ष यांच्या निर्णयासाठीं उभय पक्षांतील भाषणें.

२ जल्पः—आपलाच प्रश्न खरा असें अभिमानानें, हट्टानें, सिद्ध करण्यासाठीं केलेलें भाषण.

३ वितंडाः—येन केन प्रकारेण परपक्षाचा पाडाव करण्यासाठीं बोललेले शब्द.

४ अतिवादः—नुस्तेंच एकेरीवर येऊन अद्वातद्वा केलेलीं भाषणें; प्रमाण-रहित तर्क.

अभंग.

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । बोळखा जातीचा अंत्यज तो ॥१॥
वेदश्रुती नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठांचें वचन न मानी जो ॥ २ ॥
तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥ ३ ॥

७

ज्ञानोबारायांनीं ' वाचिकी अहिंसा ' कोणती तें सांगतांना विरोधवादबळ, तर्कयुक्ति इ. नें दुसऱ्यास कासावीस करणें, उपहास, छळ, वर्मस्पर्श, अटीचें बोलणें, आवेशानें बोलणें, पेंचाचें भाषण, आशा, शंका, प्रतारण हे नऊ गुण म्ह. दोष सज्जनानें टाळावेत म्हणून सांगितलें आहे.

८

वरील सर्व दोष टाळून भाषण, लेखन इ. वाग्व्यवहार कसे करावे ? कसें बोलावें ?

तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥

(ज्ञा. अ. १३-२७०).

# गेला उपवास

( म. गांधी–यंग इंडिया. )

परवाचा माझा सात दिवसांचा उपवास उद्या संपणार. या उपवासासंबंधानें माझ्या मनांतून लोकांस कांहीं कळवावयाचें नव्हतें, पण त्या संबंधी पुष्कळ विचारणा व कांहीं जोराचे निषेधही झाले असल्यामुळें, तसें करणें मला अशक्य झालें आहे.

लोकांनीं माझ्या प्रकृतीसंबंधी अगदीं निर्धास्त असावें. उपवासाचे सातव्या दिवशीं मला हें लिहिता यावें हें कांहीं थोडें नाहीं; परंतु वाचकांना हें वाचावयास मिळण्याच्या वेळेपर्यंत मी बहुतेक हिंडूं फिरूं लागेन व कामही करूं शकेन अशी मला आशा आहे.

कामामुळें दमून गेल्याकारणानें चौथ्या दिवशीं थोडी काळजी वाटली होती. अशा या छोटया उपवासाचे सातही दिवसांत मी सर्व दिवस काम करूं शकेन असा मला गर्व वाटत होता. पण पहिल्या साडेतीन दिवसांच्या कामाचा उपवासाचे कारणाशीं संबंध असल्यामुळें तें करणें जरूरच होतें. अहंकाराशीं त्याचा कांहीं संबंध नव्हता. परंतु शक्तीबाहेर काम झालें असें दिसून येतां-क्षणींच मीं थांबविलें, व त्यामुळें चौथ्या दिवसापेक्षां सातव्या दिवशीं मला जास्त ताकद वाटत आहे.

परंतु जनतेला माझ्या उपवासाकडे दुर्लक्ष करावें लागेल व त्याबद्दल त्रास करून घेण्याचें सोडावें लागेल. उपवास हा माझा स्वभावधर्मच होऊन बसला आहे. उदाहरणार्थ, डोळ्यांशिवाय माझें जितकें चालेल तितकेंच उपवासाशिवाय चालेल. बाह्यसृष्टीमध्यें डोळ्यांचा जितका उपयोग आहे, तितकाच अंतसृष्टीमध्यें उपवासांचा उपयोग आहे. आणि जरी मला हा माझा शेवटचाच उपवास व्हावा असें कितीही वाटत असलें तरी आंतून अशी सूचना येत आहे कीं, मला अजून किती तरी–कदाचित् याहूनही अधिक खडतर–दिव्यांतून पार पडावयाचें आहे. कदाचित् मी सर्वस्वीं चुकतही असेन, मग जगाला माझ्या पश्चात् ' मूर्खाला योग्य बक्षिस मिळालें ' असें म्हणतां येईल; पण तूर्त तरी माझी चूक असली तरी त्या चुकीवर कां होईना मला जगलें पाहिजे. खात्रीनें अप्रमादयुक्त नसलेला, प्रत्येक उपदेश–मग तो कितीहि मित्रत्वाचे भावनेनें केलेला असो–मानण्यापेक्षां, पूर्णपणें शुद्ध नसल्यामुळें कदाचित् वाट चुकलेल्या स्वतःच्याच सदसद्विवेक बुद्धीचें समाधान करणें बरें नव्हे काय ? मला जर एकादा गुरु असता आणि मी त्याची सारखी मार्गप्रतीक्षा करीत

आहें, तर मी देह आणि आत्मा दोन्ही त्याचे चरणावर वाहिलीं असतीं, पण या श्रद्धाहीनतेच्या युगामध्यें खरा गुरु मिळणें कठीण. कामचलाऊ गुरु असून फायदा तर नाहींच. उलट अपायच व्हावयाचा. ह्मणून पूर्णता न पावलेल्यांना गुरु करणाऱ्यांना माझा सावधगिरीचा इशारा आहे. आपल्या अज्ञानाचें ज्याला ज्ञान नाहीं, अशा अर्धवट मनुष्यावर विश्वास टाकण्यापेक्षां अज्ञानतिमिरामध्यें स्वतःच चांचपडत चांचपडत हजारों वेळा ठेचकळतच कां होईना सत्याचा मार्ग काढणें हें जास्त फायदेशीर आहे. आजपर्यंत गळयांत दगड बांधून कोणी पोहावयाला शिकला आहे काय ?

आणि चुकीमळें केलेल्या उपवासानें तरी कोणाचें नुकसान व्हावयाचें आहे ? अर्थात फक्त माझेंच. पण कांहींच्या मतें मी लोकांची मालमत्ता आहे. असें असेल तर लोकांनीं माझ्या बरोबर माझे दोषही घेतले पाहिजेत. मी एक नम्र सत्यशोधक आहें. माझे सत्यशोधनाचे प्रयोग हिमालय पर्वताच्या शिखरांचा शोध लावणाऱ्या सुसंघटित अशा स्वाऱ्यांपेक्षां लाखों पटीनें जास्त महत्त्वाचे आहेत अशी माझी खात्री आहे आणि या शोधांपासून फायदा काय ? जर हा शोध शास्त्रीय असेल तर मग त्या दोन शोधांची तुलनाच होऊं शकत नाहीं. म्हणून मला माझ्या मार्गानें जाऊं द्या. माझ्या सद्सद्विवेक बुद्धीचा कोंडमारा मी करूं लागलों, कीं मग माझ्यांत असलेला उपयोगीपणा नाहींसा होईल.

वास्तविक या उपवासाशीं लोकांचा कांहीं संबंध नाहीं. मी सत्याग्रहाश्रम नांवाची एक मोठी संस्था चालवीत असतों. मजवर विश्वास असणाऱ्या माझ्या मित्रांनीं आतांपर्यंत केवळ जागा व इमारत याकरितांच दोन लाखाचेवर पैसा मला दिला आहे. आश्रमाचे वार्षिक चालू खर्चाकरतां त्यांचेकडून दरसाल अठरा हजारांपेक्षां जास्त रुपये मिळतात. आश्रमामध्यें तरुण पुरुष व स्त्रिया आहेत. लहान मुलें व मुलीही आहेत. मुलींनीं शक्य तितकें जास्त दिवस अविवाहित राहावें असें शिक्षण त्यांना दिलें जातें. स्त्रियांना व मुलींना आश्रमाइतकी दुसऱ्या कोणत्याच संस्थेंत भरपूर स्वतंत्रता मिळाल्याचें माझ्या पाहाण्यांत नाहीं. आश्रम ही माझी एकच व उत्तम अशी कृति आहे. जग त्यांतून निघणाऱ्या फलावरून माझी किंमत करील. माझी खुशी नसेल तर कोणाही पुरुषास अगर मुलामुलीस तेथें राहतां येणार नाहीं. हिंदुस्थानांत असलेल्या शुद्ध जीवांपैकीं कांहीं तेथें आहेत असें मला वाटतें. ज्यांच्या आधारावर आश्रम चालला आहे त्यांच्या अढळ विश्वासाला मला पात्र व्हावयाचें असेल तर, ते आश्रमाचा जमाखर्च व कार्य यांची तपासणी करूं इच्छित नसल्यामुळें, मला दुप्पट जागरूक राहिलें पाहिजे. मुलांमध्यें कांहीं दोष मला आढ-

ळले व थोडेसें मुलींमध्येंहि दिसले. मी उल्लेख करीत असलेल्या दोषांपासून एखादी शाळा अगर दुसरी संस्था क्वचितच मुक्त असेल हें मी जाणून आहें कीड लावणाऱ्या तरुणांच्या शीलाला व राष्ट्राच्या पौरुषाच्या नाश करणाऱ्या या दोषापासून आश्रम मुक्त असावा याबद्दल मला काळजी लागून राहिली आहे. मुलांना शिक्षा करण्याचें आश्रमांत बंद आहे. माझ्या ताब्यांत असलेल्या दोन शाळांतील अनुभव असा आहे कीं, शिक्षेनें मुलें सुधारत नाहींत, उलटीं जास्तच नाठाळ बनतात. अशा बाबतींत, दक्षिण आफ्रिकेंत असतांना मी उपवासाचा उपयोग करीत असें आणि माझ्या मतें त्याच मार्गाचा थोडयाशा सौम्य प्रमाणांत मी येथें उपयोग केला आहे. या मार्गाचा मुख्य पाया म्हणजे परस्परांमधील प्रेम हा आहे.

मला माहीत आहे कीं आश्रमांतील सर्व मुलें व मुली मजवर प्रेम करितात. मला हेंही माहीत आहे कीं, जर माझ्या प्राणत्यागानें त्यांना निर्दोष करतां येईल तर, तें कारणें यासारखा मला कोणत्याच गोष्टीनें आनंद होणार नाहीं. म्हणून उपवास करण्याखेरीज, या तरुणांना त्यांच्या चुकीची जाणीव करून देण्याला अन्य मार्गाचें मला अवलंबन करणें शक्य नव्हतें. आतांपर्यंत याचा परिणाम उत्साहजनक आहे.

आणि फल माझ्या दृष्टिपथांत आलें नाहीं तरी काय हरकत आहे ! त्या जगन्नियंत्याची इच्छा माझ्या समजूतीप्रमाणें अमलांत आणणें एवढेंच माझें काम आहे. फल देणें त्याच्या हातांत आहे. लहान मोठया कामाकरितां कष्ट सहन करणें हीच सत्याग्रहाची गुरुकिल्ली आहे.

पण शिक्षकांनीं हें तप कां करू नये, असें कोणी विचारतील. मी जोंपर्यंत मुख्य आहें तोंपर्यंत त्यांना तें करतां येणार नाहीं. मजबरोबर त्यांनीं हा उपवास केला असता तर सर्वच काम अडून राहिलें असतें. लहान मोठया संस्थांचे बाबतींत एकच न्याय लागू पडतो. राजाला प्रजेच्या पुण्यांशाबरोबर पापांशाचेंहि भागीदार व्हावें लागतें, तीच माझ्यासारख्या या छोटया आश्रमांतील छोटया व निवडलेल्या राजाची गोष्ट ! आश्रमामध्यें शीलवान लोक असल्याचें जर मी अभिमानानें सांगतों तर आश्रमांतील मुलांपैकीं लहानांतल्या लहान मुलाचें पापाचेंहि मी प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. जर मला हिंदुस्थानांत शक्य असेल तर जगांतल्याही हीनांतल्या हीन बांधवांच्या दुःखाशीं समरस व्हावयाचें आहे, तर मग माझ्याच देखरेखीखालीं असलेल्या या बालकांच्या पापाशीं मला समरस व्हावयास नको काय ? आणि असें करीत असतां एकादे दिवशीं त्या सत्यस्वरूपी परमात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन घडण्याची मला आशा आहे.

---

# उपवासाचा धडा.

महात्माजींनीं उपवास सोडण्याचे वेळीं आश्रमांतील सर्व मुलांना आपल्या बिछान्याभोंवतीं बोलावून उपवासासंबंधीं खालीलप्रमाणें चार शब्द त्यांना सांगितले तेः--

" मागच्या मंगळवारीं मीं जेव्हां उपवासास सुरवात केली तो दिवस लक्षांत आणा. मी कां बरें उपवास करण्याचें ठरविलें असेन ? त्याशिवाय दुसरे तीन मार्ग मला मोकळे होते.

( १ ) शिक्षा करणें:-देहदंडाची शिक्षा करणें ही गोष्ट मला सहज करतां आली असती. सामान्यतः विद्यार्थ्यांची चूक आढळून आल्यावर त्याला शिक्षा केली म्हणजे आपलें कर्तव्य संपलें असें शिक्षक समजतात. अलीकडे जरी कामाच्या व्यापामुळें शिकविण्याचें जमत नाहीं तरी मीं पूर्वी शिक्षकाचें काम केलें आहे. शिक्षक या नात्यानें मिळविलेल्या अनुभवावरून देहदंडाची शिक्षा करणें हें निरुपयोगी आहे इतकेंच नव्हे तर अपायकारक आहे असें माझें ठाम मत झालें आहे.

( २ ) दुर्लक्ष करणें:-मी तुमच्या चुकांकडे दुर्लक्ष करूं शकलों असतों. शिक्षक नेहमीं असें करतातही ! 'मुलांनीं आपला धडा नीट केला व शिकविलेले धडे नीट तयार केले असले म्हणजे बस्स आहे. त्यांच्या खासगी वागणुकीशीं आपला काय संबंध आहे ? आणि जरी त्यांच्या खासगी वर्तनावर नजर ठेवावयाची म्हटलें तर तें शक्य तरी कुठें आहे ? असा त्यांचा युक्तिवाद असतो. पण माझें त्यानें समाधान होत नाहीं.

( ३ ) प्रेमाची योजना करणें:-तुमचें शील म्हणजे माझेजवळील एक ठेव असें मी समजतों. म्हणून मला तुमच्या अंतःकरणांत शिरून तुमचे अगदीं आंतले विचार, तुमच्या इच्छा, तुमच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत व त्यांमध्यें कांहीं अपवित्र असल्यास तें शोधून काढून त्याचा समूळ नाश करण्यास तुम्हाला मदत केली पाहिजे. कारण अंतःशुद्धि ही गोष्ट पहिल्यांदां शिकविली गेली पाहिजे. या पहिल्या व अत्यंत महत्त्वाच्या धडयानंतर बाकीच्या गोष्टी आपोआपच येतात. तुमच्यामध्यें कांहीं गैरवर्तणूक माझे आढळण्यांत आली, मग मी काय करावयाचें होतें ? शिक्षा करण्यासंबंधीं तर प्रश्नच नव्हता. मुख्य अध्यापक या नात्यानें आज सुटणाऱ्या उपवासाचे रूपानें मलाच शिक्षा घेणें जरूर होतें. या दिवसांमध्यें शांतपणें विचार करून पुष्कळ गोष्टी मी

शिकलों, तुम्ही काय शिकलां ? अशा तऱ्हेची चूक पुनः तुमचे हातून होणार नाहीं अशी खात्री तुम्ही मला देऊं शकतां काय ? तुमच्या हातून कदाचित् पुनः चूक होईल. पण त्या चुकींतून कसा मार्ग काढावा हें जर तुम्हांस समजलें नाहीं तर माझा हा उपवास निरुपयोगी झाला असें होईल. केंव्हांही सत्य हीच गुरुकिल्ली आहे. कसल्याही प्रसंगीं खोटें बोलूं नका. कोणतीहि गोष्ट लपवून ठेवूं नका. आपल्या शिक्षकांना, वडिलधाटया माणसांना विश्वासानें, खुल्या दिलानें सर्व सांगून टाका. कोणाचा हेवा करूं नका. कोणासंबंधीं त्याचे पाठीमागें वाईट बोलूं नका, आणि शेवटीं 'स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला फसवूं नका. म्हणजे दुसऱ्यास तुम्ही फसविणार नाहीं.' कसल्याही क्षुल्लक कार्यामध्यें सत्यानें वागणें हा आपलें जीवन शुद्ध करण्याचा एकच मार्ग आहे.

तुम्हांला माहीत आहेच कीं अशा प्रसंगीं 'वैष्णवजन तो तेनें कहिये' या पद्यावरून मला प्रेरणा होते. श्रीभगवद्गीता जरी मी विसरून गेलों तरी हें एकच पद्य मला माझ्या मार्गांत ठेवण्याला पुरें आहे, तथापि तुम्हाला खरी गोष्ट सांगावयाची म्हणजे त्याच्याहीपेक्षां एक सोपी गोष्ट आहे. पण ती तुम्हांला कळण्याला थोडी अवघड जाईल. ती माझ्या आयुष्यरूपी प्रवासांत ध्रुवाचा तारा झाली आहे. व ती म्हणजे परमेश्वर सत्यस्वरूपीं असून असत्य हें जगांत परमेश्वर नाहीं असें मानणें होय, याबद्दलची खात्री होय.

---

# प्रार्थना.

१ हे विघ्ननाशका ! तूं ज्या अर्थीं आह्मांस संसारांत आणून ठेवलेंच आहेस त्या अर्थीं आमचा संसार असा होऊं दे कीं, संसारांत आह्मी असून नसल्यासारखें वागावें. करून अकर्तेपणाचें वर्म आह्मास दाखवून दे. प्रारब्धवशात् विघ्नें येतील पण आह्मांला विघ्नोपहत असतांहि निर्भयपणानें वागतां येईल असें सात्विक धैर्य दे. निष्कंपचित्तानें विघ्नांकडे, आपत्तीकडे, शत्रूंकडे स्थिर पाहण्याचें सामर्थ्य आह्मांत दे. आम्हांकडे पाहतांच शत्रूंचा शत्रूभाव व विघ्नांचें विघ्नपण हतप्रभ होऊन गळून पडावें अशी आत्मप्रभा आह्मांला दे.

२ हे विघ्नान्तका ! संसारांत दुःखक्लेश अगणित आहेत, व ते आमच्या पूर्वकर्मांप्रमाणें आमच्या वांट्याला आल्याशिवाय राहणार नाहींत. ते येऊं देऊं नकोस असें ओझें आह्मी तुझ्यावर लादीत नाहीं, पण आमचा स्वरूपानंदाचा सूर्य चिदाकाशांत अखंड तळपत राहूं दे ह्मणजे त्यापुढें दुःखक्लेशांचे ढग हां हां ह्मणतां वितळून जातील.

३ हे जगन्नाथा ! आह्मांला हवे तितके जन्म दे,पण प्रत्येक जन्मांत तुझ्या चरणांचें अखंड ध्यान व सत्संग हें दे, मग जन्मांला आम्ही भीत नाहीं.

४ मंगलमूर्ते! आयुष्याची दोरी असेल तोंवर मरण येणार नाहींच पण मरणसमय येतांच तुझी मंगलमूर्ति चित्तांत उभी राहूं दे. जिवंतपणींच मरणाला मारून उरण्याची युक्ति दे. जन्ममृत्यूंचे ढग येवोत आणि जावोत, तुझ्या स्वरूपाचे अनुसंधान पळहि न सुटेल असा आत्मरामरवि स्वप्रकाशानें हृदयांत नित्य माध्यान्हकाळच्या तेजानें तळपत राहूं दे.

५ हे चित्स्वरूपा ! हृदयांतलें तम पार हुसकून लाव. सकल इंद्रियांत तुझें स्वरूप भरून ठेव.

६ हे सत्यप्रकाशा ! आमच्या वाणीला, संकल्पाला व कृतीला असत्याचे कांटे लागूं देऊं नकोस

७ हे गणनायका ! आमची प्रजा वीर्यवती निपजो. सत्ता, प्रकाश व आनंद यांचा भरतभूमीवर वर्षाव कर. संतति, संपत्ति, अधिकार जे जे चतुर्विध पुरुषार्थ तुला देणें असेल ते तूं स्वतः प्रसन्न होऊन दे. दुसऱ्यापाशीं याचना करण्याचा दुष्ट प्रसंग आह्मांवर आणूं नकोस. दुसऱ्याला संताप दिल्याशिवाय,खलांपुढें मान वांकविल्याशिवाय, साधुमार्गानें जाऊन जेवढें धनधान्य मिळेल तेवढेंच दे.

८ चारी वर्ण आपल्या धर्माला अनुसरून वागोत.भारतीय प्रजा धर्मनिष्ठ, सदाचरणी, शीलवंत होवो. स्त्रिया वीरप्रसव होवोत. दैन्य, दारिद्य, दुष्काळ, दुःसंगति यांपासून हे मंगलनिधे ! तुह्मी आमचें रक्षण करा. तुमच्या चरणावांचून आमचा वाली कोणीहि नाहीं.

९ जय भगवंत ! तूं अनंत आहेस. अनेक असून एकमेवाद्वितीय आहेस. निर्गुण व गुणसागर तूंच आहेस. सौंदर्यखनि, सुखमंदिर, अनादि, अजन्म, अनुपम, अनाम व अनेकनाम असा तूंच तूं सर्वत्र भरलेला आहेस !

१० जय मंगलनिधान ! त्रिविधतापांचा व संसारदुःखांचा नाश करणारा, त्याची आंच भक्तहृदयाला लागूं न देणारा तूंच आहेस. वेदांतवेद्य आणि स्वसंवेद्य अशा तुला म्यां निरंतर भजावें. तुझी परमपावनी भक्ति आम्हांस दे.

११ देवा ! अद्वैतसिद्धांत माझ्या बुद्धीला पटतो, पण तुझी चरणसेवा-तुझी सगुणोपासना मला सोडवत नाहीं.

१२ माझा मनरूप मत्स्य तुझ्या सगुणामृतांत पोंहण्याचें सोडीत नाहीं. तुझें सुंदर ध्यान मला पुरें. नेत्रांची धणी त्यावांचून फिटत नाहीं

१३ देवा ! विष्णु तूं, शिव तूं, ब्रह्म तूंच आहेस. जगदंबा तूंच आहेस. सर्व रूपांत मला तूंच दिसतोस. सर्व भूतांतर्यामीं तूंच एकला खेळ मांडून राहिला आहेस.

१४ श्रुतिसंत सांगतात त्यांप्रमाणें तुझ्या भक्तीपरता लाभ कोणताच नाहीं. तुझें भक्तिसुख अखंड दे.

१५ देवा! तुझ्या नामस्मरणाबरोबर शरीर रोमांचित झालें आहे, नेत्रांतून प्रेमाश्रु लोटत आहेत, साऱ्या विश्वाचा विसर पडला आहे अशा स्थितींत तुम्हीं मला केव्हां कवटाळून धरणार ?

१६ नारायणा! ज्यांना स्तुतिनिंदा समान झाली आहे व ज्यांचें चित्तच तुझ्या चरणकमलाच्या ठिकाणीं रतलें आहे असे तुझे निर्मळ भक्त भेटावेत म्हणून माझे बाहू पहा स्फुरण पावत आहेत.

१७ शांति, वैराग्य, नम्रता आणि प्रसन्नता या गुणांनीं मंडित असे तुझे भक्त मला नित्य भेटोत.

१८ देवा! तूं आज गणेशरूपानें नटला आहेस पण मला तुझ्या ठिकाणीं माझी प्रिय कृष्णमूर्तिच दिसत आहे!

१९ माझ्या डोळ्यांत कृष्णांजन घातलें गेलें आहे म्हणून मला गणेश व कृष्ण यांत कांहीं भेदच दिसत नाहीं.

२० सर्व जण जमून आज तुझ्याच ध्यानभजनांत निमग्न झालें आहेत. देवा! सर्वांना तुझ्या प्रेमाची चटक लाव, सर्व निरंतर तुझे प्रेमालाप गातील असेंच यांना प्रेम दे, यांचीं दुःखें दूर कर, प्रपंचक्लेशांतून सर्वांना सोडीव

२१ भक्तांचें राज्य, सुराज्य, स्वराज्य, स्वाराज्य, साम्राज्य सर्व तुझे चरण आहेत म्हणून भगवंता! तुझ्या चरणांची अवीट गोडी जन्मोजन्मीं दे!

---

# माताजी.

ही एक महाराष्ट्रीय महात्मा बाई कलकत्त्यास राहिली होती. हिची माहिती आपल्याइकडे फार थोडया लोकांना आहे. श्रीमंत पेशवे ब्रह्मावर्तास असतांना या बाईचे पति पेशव्यांच्या आश्रयानें होते. १८५७ ची बंडाची धामधूम उडाली त्यांत पेशवे बेपत्ता झाले व या बाईचे पतिही वारले. नंतर बाई कलकत्त्यास जाऊन राहिल्या. इकडील देशस्थ ऋग्वेदी श्री. विंचुरकरांच्या घराण्यांतील त्या असून त्यांचें आडनांव दाणी होतें असें समजतें. बाईनीं आपला सारा जन्म भगवत्सेवेंत व परोपकारांत घालविला. यांच्या मुद्रेवर तपस्विनीची कांति होती. कलकत्त्याकडे स्त्रीशिक्षणाचा प्रथम पुकारा झाला तेव्हां स्त्रीवर्गाला योग्य तें धर्मनीतीचें शिक्षण देण्यासाठीं त्यांनीं एक महाकाली कन्यापाठशाळा स्थापन केली व ती उत्तम प्रकारें चालविली. यांचा आचार, शील

व परोपकाररतता इतकी दिव्य होती कीं, बंगाल्यांत त्यांना ' तपस्विनी ' ' माताजी ' या नांवानेंच संबोधीत असत, व मोठमोठे विद्वान् लोक त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांचे आशीर्वाद मागत असत. माताजींनीं नेपाळचा प्रवास केला असून त्यांस पांच सहा भाषा येत असत. स्वामी विवेकानंद माताजींची पाठशाळा पाहण्यास गेले होते, तेव्हां तेथील एका मुलीनें रघुवंशांतील एक श्लोक घेऊन त्यावर संस्कृतांत इतकें सुंदर निरूपण केलें कीं तें ऐकून स्वामींनीं तोंडांत बोट घातलें. सर्व मुली माताजीस आईपेक्षांहि प्रिय व पूज्य मानीत तरी माताजी म्हणाल्याः-" स्वामीजी ! या मुलींनाच भगवतीचे अवतार मानून केवळ त्यांचीच पूजा मी अशा रीतीनें करीत असते. " लो. टिळक कलकत्यास गेल्यावेळीं माताजींच्या भेटीस गेले होते. त्यांचा माताजीविषयीं अत्यंत पूज्यभाव होता हें आह्मांस माहीत आहे.

---

# थोडी मौज.

एक विनोदी मित्र एकदा म्हणाला कीं, सारें जग 'ककाकिकू'ची बाराखडी सदा घोकीत असतें ! मी त्यास याचा अर्थ विचारला. तो म्हणालाः--

क=कनक
का=कांता
की=कीर्ति
कु=कुचेष्टा

पहिल्या तीनपैकीं एकही ज्याजवळ नाहीं त्याला आपला जन्म वरील तिघांच्या कुचेष्टेंत घालवावा लागतो ! मीं लगेच उत्तर केलें ' पण या चौघांच्या तावडींतून जो सुटेल त्याला याच बाराखडीचा उत्तर भाग तारायला समर्थ आहे ! ' तो म्हणाला ' कसा ? ' मी ह्मणालोंः—

के=केशव
कै=कैलासपति

केशवाला किंवा कैलासपतीला ( हरिहराला ) शरण जाणारा त्यांचा भक्त वरील चौकडील [illegible] होत नाहीं.

जो काली, केशव किंवा कैलासपति यांना निर्मळ भावानें भजेल त्याला कैवल्यपदप्राप्ति होईल.

Wealth, Wife and Wine ह्मo कनक, कांता, कादंबरी हे जगाला तीन मोह आहेत.

---

# देवाचें पारतंत्र्य.

( लेखकः—विद्यार्थी, अमळनेर. )

अनंताचीं दोन टोकें एका ठिकाणीं मिळालेलीं असतात (असा गणीतशास्त्राचा सिद्धांत आहे) तसें असल्याशिवाय तें अनंतच रहात नाहीं. आणि देवा! अनंत अनंतांना तूं आपल्या पोटांत घेतलें आहे. तेव्हां अनंताचा हा धर्म तुझ्याही ठिकाणीं कसा असणार नाहीं? किंबहुना सर्वच गोष्टींचा तुझ्यांत अंतर्भाव होतो, आणि म्हणूनच शक्यता व अशक्यता ह्या दोन्ही गोष्टी तुझ्या बाबतींत खऱ्या आहेत. तूं मिळणें शक्यही आहे व अशक्यही आहे. जागिक तर्कशास्त्राच्या दृष्टीनें हा परस्पर विरोध आहे. पण विरोधालाही तुझ्याचमुळें अर्थ आहे. तूं अप्राप्य आहेस पण प्राप्य किंबहुना मुळचाच प्राप्त असल्याशिवाय तुला अप्राप्यही होतां येत नाहीं आणि म्हणूनच दीनदयाळा! भक्ताची तुझ्यावर मात आहे. जिज्ञासाबुद्धीला अज्ञेय असें सत्य बनून तूं तिला अनादिकालापासून झुकांडया देत आला आहेस! व अनंतकाळ तिला तूं झुकवत ठेवशील. धर्मबुद्धीला व नैतिक आकांक्षेला निरंतर पुरोगामी असें ध्येय बनून त्यांनाही अनंत प्रगतीची वाट दाखवून तूं सारखा त्यांच्यापासून दूरदूर पळत आहेस! परंतु ह्या गमजा तुला भक्तापुढें दाखवितां येत नाहींत. तुझें मर्मस्थानच त्यानें घट्ट पकडून ठेवलें आहे. भक्ताला तुला झुकांडी देतां येत नाहीं. अंतःकरणांतील एकच भक्तीची उमाळी तुला घट्ट विळखा घालते. भक्ताची कैद तुला अपरिहार्य आहे. सगळ्या गोष्टींचा तुझ्यांत अंतर्भाव झालेला आहे व म्हणूनच भक्ताच्या बाबतींत तुला पारतंत्र्य आहे.

गोपाळा! भाग्यशाली गोपगोपी तुझ्या प्रत्यक्ष दर्शनानें व सहवासानें त्रिवार धन्य झाले आहेत. यशोदामाईच्या पोटीं तूं जन्म घेतलास त्या मंगलमय दिवशीं प्रत्यक्ष मांगल्यालाही आनंदाच्या उकळ्या फुटल्या असतील! दाही दिशा आनंदानें हंसल्या असतील. तसा सार्वत्रिक आनंद डोळ्यानें पहाण्याचें माझें भाग्य नाहीं, परंतु देवा! गोपांपेक्षांही माझें दैव थोर आहे; कारण त्यांचे प्रभु मला कल्पनेनें जाणून सुखी होतां येतें व त्याबरोबरच माझ्या हृदयारविंदांत विराजमान झालेल्या माझ्या नंदलालाशीं मला वाटेल तेव्हां हितगुज करतां येतें. गोपगोपींच्या श्रीकृष्णाप्रमाणें, राधेच्या मुरलीधराप्रमाणें, माझा नंदकिशोर स्थलकालानें बद्ध नाहीं, व म्हणूनच आपल्या प्रत्येक सहवासांत खेळेला तो माझ्या स्वैरवृत्तीला देहभान विसरवून सांताच्या पलीकडे नेतो. संगीताच्या सुराबरोबर उद्भूत झालेली हृदयाची ऊर्मी सुराबरोबर तरळू लागून भक्तीच्या गुंगीनें अभानस्वरूप होते, मी तुला विसरतों, मला तुझा विसर रहात नाहीं व माझें देहसार्थक्य होतें. देवा! हीच भक्ताची तुझ्यावर मात आहे व हेंच तुझें पारतंत्र्य आहे. भक्तीच्या उर्मीचे वळसे तुला घट्ट आवळून बसले आहेत, नव्हे त्या-

उर्मींच्या रुपानेंच तूं दर्शन देतोस व उर्मींची उसळलेली लाट जेव्हां अपरंपार होते तेव्हां भक्त तुझ्याशीं एकतानता पावतो. कारण तूंच भक्ति आहेस, तूं प्रेमस्वरूप आहेस व म्हणूनच परतंत्र आहेस.

---

# सूक्तिसुधातरंगिणी ( तरंग १।२ )

रा. महादेव पांडुरंग ओक, संस्कृताध्यापक, पुणें, यांनीं सूक्तिसुधातरंगिणीचे दोन तरंग प्रगट केले आहेत. इंग्रजी व संस्कृत जाणणाऱ्या ' उभयान्वयी ' रसिकांसाठीं हा स्वादिष्ट व पथ्यकर अमृतचषक त्यांनीं तयार केला आहे. रा. माधवराव ओक हे आज २० वर्षें पुण्याच्या न्यू इ. स्कूलमध्यें संस्कृत शिकवीत असून त्यांचे संस्कृत शिकविण्याचे खाजगी वर्गही चालू आहेत. शेकडों विद्यार्थी त्यांचे हाताखालीं संस्कृत शिकून तयार झाले आहेत. त्यांचें संस्कृतभाषानैपुण्य, रसिकता व कवित्व यांचा परिचय अनेकांस आहे. नांवापुढें त्यांना एखादी डिग्री लावतां आली असती तर कोणत्याही कॉलेजनें त्यांना संस्कृतचे प्रोफेसर नेमले असते व त्यांचा नांवलौकिक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं फैलावला असता; पण गुणांपेक्षां 'मार्केट व्हॅल्यू'ला कठोर जगाच्या मार्केटमध्यें प्रायः ज्यास्त किंमत येते ! कित्येक प्रोफेसरांपेक्षां त्यांचें संस्कृतभाषेवरील प्रभुत्व अधिक उच्च कोटीचें व अभिजात स्वरूपाचें आहे. रा. ओकांची 'अभिनवरत्नमाला' प्रसिद्ध आहे. त्याशिवाय त्यांनीं हे सूक्तिसुधातरंगिणीचे जे दोन तरंग प्रसिद्ध केले आहेत ते त्यांची आर्यांग्लभाषाप्रभुता चांगलीच प्रत्ययास आणणारे आहेत. पाश्चात्य तत्ववेत्ते, कवि व ग्रंथकार यांच्या उत्कृष्ट विचारांचें त्यांनीं उत्कृष्ट संस्कृत भाषेंत भाषांतर केलें असून वर मूळ व खालीं त्याची संस्कृत प्रतिकृति अशा उभयस्वरूपांत त्या विचारांचा आस्वाद घेतां येतो. पहिल्या तरंगांत ५०० व दुसऱ्या तरंगांत ७०० ह्याप्रमाणें दोन तरंगांत मिळून १२०० इंग्लिश अवतरणें ओकांनीं केलेल्या त्यांच्या संस्कृत रूपांतरासह वाचकांस आयती अवघ्या दीड रुपयांत मिळतात. सुविचारांचीं निवड चांगलीच आहे, त्यांचे संस्कृत रूपांतर तर कोठें कोठें मूळाहून सरस वठलें आहे. वाचतां वाचतां त्यांतील कित्येक सुभाषितें तोंडपाठ होऊन जातात. कर्ता कोण हें सांगितलें नाहीं तर यांतील कित्येक पद्यें कालिदासादि सत्कवींचीं आहेत असेंच त्यांतील सारल्य, प्रसाद, सौंदर्य इ० गुणांवरून कोणीही म्हणूं शकेल. हीं विद्यार्थ्यांच्याच नव्हे तर सर्व रसिक प्राज्ञांच्या आदरास पात्र आहेत. मुळांतील स्वारस्य न जाऊं देतां भाषांतर करणें हें काम कठिण आहे, व तें रा. ओक यांनीं फार सफाईनें केलें आहे.

रा. ओक यांचे हे दोन्ही तरंग मागवून जवळ करावेत, कोणत्याही वेळीं हे आपल्या ताजेपणानें मनाला आनंद व बोध दिल्याशिवाय राहणार नाहींत. पत्ताः-रा. महादेव पांडुरंग ओक, शनिवार पेठ घ. न. ४७० पुना सिटी.

## कांहीं उदाहरणें.

A handsome woman is a jewel; a good woman is a treasure ( Saadi ).

कामं रूपवती रत्नं निधिः शीलवती पुनः ।

२

Ability is of little account without opportunity ( Napolean ).

निष्फलं बुद्धिसामर्थ्यमलब्धावसरे नृणाम् ।

३

An able man shows his spirit by gentle words and resolute actions ( Chesterfield ).

सौम्यैर्वचोभिश्चरि तैः स्थिरैश्च
सत्वं समर्थः प्रकटीकरोति.

४

A mother is a mother still—the holiest thing alive ( Coleridge ).

न जातु माता विजहाति मातृतां
तया समानं किमिहास्ति पावनम् ।

५

Arrogance is the outgrowth of prosperity (Plautus)

दुर्जनस्य विभवं दिने दिने वर्धमानमतिवर्धते मदः ।

६

Beauty is an exquisite flower, and its perfume is virtue ( Ruffini ).

लावण्यरूपं कुसुमं सुरम्यं
विराजते सद्गुणसौरभेन ।

७

To read without reflecting is like eating without digesting (Burke ).

पठनं मननविहीनं पचनविहीनेन तुल्यमशनेन ।

८

The night shows stars & women in a better light (Byron).

ताराणामंगनानां च निशा कांतिविवर्धिनी ।

# मुकुरास.

लेखकः- माधव गोविंद भिडे.

मुकुरा! यथार्थ दाविसि रूप जयाचें तयास हें सत्य।
नवल गमे मज नकरे, दुजेकेही वरिति केविं तुज नित्य ॥ १ ॥
क्रोध न धरिती तुजवरि पाहत तुझियाकडे कसे नीट।
कीट नसे तुजवरि तूं स्वच्छ तरीही नये तुझा वीट ॥ २ ॥
किंबहुना तूं लाजुनि ओखटपण दाविण्यास अन्यांचें।
मालिन्य आदर्शी तरि मन कचरे न त्या अधन्यांचें ॥ ३ ॥
बघती न दावुं इच्छिसि तरि स्वतांचें अहा! महादोष।
तव निर्मलान्तरीं तरि होत सुखाचा तदीय मनिं पोष ॥ ४ ॥
स्पष्टोक्तींत तुझ्या कीं आहे कांहीं अपूर्व माधुर्य।
ज्या योगें उपदेष्टयांमाझारीं जाहलास तूं धुर्य ॥ ५ ॥
स्तुतिमिश्रित निंदाही ऐकाया लोक नसति बा! राजी।
निंदाच तव मुखीं ते निर्मळ हि बघत हे जगामाजीं ॥ ६ ॥
किंवा दोष न दिसती तुजमाजीं पाहत्यास ते मुकुरा!।
आंध्य स्वदोषविषयीं स्वगुणीं डोळसपणा जनांत पुरा ॥ ७ ॥
किंवा ज्याचे त्याला दाखविसी दोष तरि दुज्या प्रकट।
मागुनि करिसि न ते तूं यास्तव निःशंक करिति जन लगट ॥ ८ ॥
किंवा जड तुज गणिती एकान्त न मोडतो तुझ्या संगें।
द्वैताचा भास सुखद अद्वैत न वस्तुतः जिथें भंगे ॥ ९ ॥
अथवा मित्र खरोखर तूं सर्वांचा उदार कीं असती।
निज पोट उकलुनी तुज दावाया योग्य एकला दिससी ॥ १० ॥
असुनी अकर्णही तूं आकर्णनिं मूर्त गमसि मज कर्ण।
भाषण अवर्ण कळतें तुज पुरतो जनमुखावरिल वर्ण ॥ ११ ॥
नारदसा पारद तूं चंचल असतांहि घातला पाठीं।
अद्भुतसमाधिशिक्षक साधे ऐशी कुणा न परिपाठी ॥ १२ ॥
तूं वैष्णवोत्तम मला गमसी मुकुरा! खरा असामान्य।
सकला जो समभावें आलिंगिसि तूं गणोन सन्मान्य ॥ १३ ॥
साक्षात् ब्रह्मचि गमसी अरूप असतां स्वरूपिंही रमसी।
राहुनि अलिप्त अंगें सकलांसंगें दिवा निशा क्रमसी ॥ १४ ॥
नीरस पदार्थ बहुधा करिति विरस मन तसाच तूं मुकुरा!
अद्भुत रस प्रसविसी तूं रसिकांमाजि अग्रगण्य खरा ॥ १५ ॥
मुकुरा! भेटत होतों तुजसि तरी आजवर न तव चित्त।
मज दिधलें त्वां नवल न अवधानाचे दिलें न मी वित्त ॥ १६ ॥

मच्चित्तीं निजचित्त त्वां स्थापियलें अनंतगुणधामा ! ।
मद्वदनेंचि निजाशय वदलास मला समग्र अभिरामा ॥ १७ ॥
आदर्शा तव दर्शन आजच इतुक्या दिसांत मज घडलें ।
आश्चर्य! थोर कीं नच मन तव मौनीं कसें न अवघडलें ॥ १८ ॥
जडलें प्रेम तुजवरी आदर्शा! स्पर्श सुखद तव वाटे ।
धिःकारित होतों तुज मोहाच्या बैसुनी खुज्या खाटे ॥ १९ ॥
प्रेक्षिति न जन तुला जरि घेती अपुल्या करांत बहुवार ।
त्वन्मुखवीक्षणिं भेटे न कळें मुकुरा! विचार सुखसार ॥ २० ॥
निजमुख बघतां तव मुख यापुढती तरि बघोत मम नयन ।
मित्रग्रंथिंत निजहितरत होणें सुजनमान्य हा नय न ॥ २१ ॥
मुकुरा! मनोभ्रमर मम अतृप्त तव सेवितां सुमकरंद ।
धुंद प्राशन करितां झाला बहु तुंद विचरण्या मंद ॥ २२ ॥
विरघळलें मौन्याचें हिम आतां ओळखी पुरी पटली ।
न बुजेल निजेल न वा मैत्री अपुली कितीहि थोपटली ॥ २३ ॥
सन्मित्र आज जोडे नव वाटे मोद यापरी नित्य ।
जोडो स्नेही स्नेहोपार्जन नवनव जगीं प्रथम कृत्य ॥ २४ ॥
मुकुरा ! केवळ राहुनि दक्ष सदा सेवनीं पहा ! भृत्य ।
सातत्य किंकरा करि मित्र प्रभूचा असेंच कृतकृत्य ॥ २५ ॥
सेवाधर्में आहें वर्तत मीही तुझ्या परी मुकुरा!
मित्रा! स्वकर्मकौशल मज शिकउनि करिं पुरा अगा! चतुरा ॥२६॥

---

# प्रसुप्त चैतन्य.

(लेखकः-माधव गोविंद भिडे.)

झारीमाजि शिळें बघें जल अहा घाणेरडें तें असे
तेथें अल्पहि हालचाल अथवा तेजास्विताही नसे ।
नासा त्रासतसे म्हणोन जल मी ओतावया ठाकलों
त्याचा वेग अपूर्व तों निरखुनी चित्तांत चाकाटलों ॥ १ ॥
मूढां स्तब्ध असेंच भासत उगें चैतन्य लोकीं जरीं ।
आहे शक्ति अतर्क्य तेथहि सदा अक्षीण अभ्यंतरीं ॥
पाषाणासम जे अनेक जगतीं स्थाणुप्रथा पावती ।
येतां काळ समस्त ते निजबळें वाऱ्यापरी धांवती ॥ २ ॥

# असमर्थ गुरु.

लेखकः—माधव गोविंद भिडे.

१. हल्लीं पुष्कळ मुमुक्षु आपआपल्या समजुतीप्रमाणें वाचनमननांत निमग्न असलेले जागजागीं दृष्टीं पडतात. कालमानानुसार आपले आचारविचार शुद्ध ठेवण्याविषयीं त्यांच्यामध्यें आस्था आणि दक्षताही दिसून येते. अशा सज्जनांशीं वादसंवाद करीत असतां त्यांच्या अंतःकरणास खरी खरी तळमळ लागल्याचें अनुभवास येतें. अशा सत्पात्र जीवांस कृतार्थतेचा खरा मार्ग दाखविणारे न भेटल्यामुळें हे उतावळ झालेले लोक कोणत्या तरी प्रसिद्ध सत्पुरुषाकडे जाऊन त्याजपासून मंत्रोपदेश घेतात,आणि मग त्या सत्पुरुषाच्या ठिकाणीं अव्यभिचारिणी भक्ति करितात.

२. उपदेशग्रहणानंतर कांहीं काळ लोटल्यावर आपल्या मनांत उद्भवणाऱ्या शंका संधी साधून श्रीगुरूपुढें नम्रपणें मांडतात, आणि मग श्रीगुरूकडून टाळाटाळी झालेली पाहून खिन्न होत्साते आपल्या नशिबास दोष लावीत बसतात ! आपण मूढ, मंदधी, अतएव श्रीगुरु आपल्याविषयीं उदासीन आहेत अशी ते आपल्या मनाची समजूत करितात. एकीकडे मनांतील शंकांचा परिहार न झाल्यामुळें असमाधान आणि दुसरीकडे आपल्या कल्पित अपात्रतेमुळें खेद अशी त्यांच्या मनाची सर्वथा अनुकंपनीय स्थिति होते. अशा तीव्र मुमुक्षूंकरितांच पुढील कांहीं विचार येथें प्रदर्शित करण्यांत येत आहेत. वास्तविक हा विषय चव्हाटयावर मांडण्याजोगा नाहीं. तथापि हल्लींच्या कालांत सुलभ असलेलें हें प्रसिद्धीचें साधन आपद्धर्म म्हणून पत्करिल्यास फारसा दोष येणार नाहीं असें वाटतें.

३. स्वकीय तपश्चर्येनें स्वतःपुरते कृतकार्य झालेले सत्पुरुष परबोधकतेच्या सामर्थ्याच्या अभावीं शिष्यास निरस्तसंशय करण्यास असमर्थ असतात. एरव्हीं अत्यंत योग्य आणि पूज्य असलेल्या व्यक्ति बोधदानीं असमर्थ असल्यामुळें आपल्या शिष्यांची व्यर्थ कुचंबणा मात्र करितात. अर्थात् अशा सत्पुरुषांच्या समागमें राहून मुमुक्षूंचा कार्यभाग साधणें अशक्य आहे. अशा प्रसंगीं पूज्य परंतु असमर्थ असलेल्या आईच्या अर्भकाप्रमाणें वरच्या दुधावर पुष्टी मिळवून आईवर पूर्ववत् सप्रेमनिष्ठा ठेवून मुमुक्षूंनीं आपला कार्यभाग साधून घ्यावा हें त्यांस उचित होईल.

४. मुमुक्षूंच्या शंका बहुतकरून शास्त्रीय स्वरूपाच्या असतात. अर्थात् सच्छास्त्रावलोकनानें त्या दूर करून घेण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. स्वकीय

समाधान एवढाच हेतु धरून शास्त्रीपंडितांचें साह्य घेणारास त्या शास्त्र्यांच्या स्वाभाविक गुणदोषांविषयीं उदासीन राहण्यास कठिण वाटूं नये.

५. बहुभाष अशिलाजवळून आवश्यक तेवढी माहिती मिळविण्यांत चतुर वकिलाची जी निपुणता दिसते तीच शास्त्रीपंडितांकडून शंकांचे परिहार समजून घेण्यांत मुमुक्षूंची दिसून यावी. शास्त्रीपंडितांजवळ गुरूपणाची गुरुगुरी असल्यामुळें विवाद टाळण्यास फारसे आयास पडणार नाहींत. याखेरीज ज्या ज्या शास्त्र्याकडे मुमुक्षु जाईल त्या शास्त्र्याच्या मेहेनतीबद्दल त्यास उचित तें पारितोषिक देण्यास मुमुक्षूनें कृपणता दाखविली नाहीं तर शास्त्रीही स्वकीय ज्ञानाचा उपयोग मुमुक्षूस अवंचकपणें करून दिल्याशिवाय राहणार नाहीं.

६. ब्राह्मणांनीं यथावकाश गायत्रीमंत्राचा जास्तींत जास्त जप करण्याचा परिपाठ ठेविल्यास व सर्वांनींच अखंड नामस्मरणाचा अभ्यास केल्यास मनाच्या अस्थिरतेमुळेंच उत्पन्न होणाऱ्या तर्कवितर्कांचें थैमान बंद होईल. ज्या सत्पुरुषापासून अनुग्रह घेतला असेल त्याशीं वादविवाद न करतां त्यांचा उचित उपचारांनीं आणि नम्रतेनें कृपाप्रसाद संपादन करावा. म्हणजे आवरण दोष नाहींसा होऊन अनिर्वचनीय समाधानाचा मुमुक्षूस लाभ झाल्यावांचून राहणार नाहीं.

७. सत्पुरुषाचें सत्त्व पाहूं नये. त्याचा उपहास करूं नये त्याच्या चित्ताचा क्षोभ होईल असें त्याशीं वर्तन करूं नये म्हणजे इष्टार्थसिद्धि होईल.

---

# तुळशीची आरती

प्रातःकाळीं तुज उत्तम रूप । दर्शन केलिया जाईल पाप ॥
पूजन केलिया हरतिल संताप ॥ प्रदक्षणा केलियां वैकुंठ प्राप्त ॥१॥
जयदेव जयदेव जय माय तुळसी । कलियुगीं तारक तूं एक होसी ।
जयदेव जयदेव ॥
प्रातःकाळीं तुझे स्वरूप सुंदरी । तुझ्या अंगीं वेद आहेत चारी ॥
तुझी पूजापत्री करतील मुरारी । त्याची मुक्ती प्राप्ती होतील चारी ॥२॥
विशेष महिमा तुझा कार्तिक मासीं । कार्तिक शुद्ध द्वादशीचे दिवशीं ॥
वृंदावनिचे जय माय तुळसी । राधा दामोदर आहे तुजपाशीं ॥ ३ ॥
राधा राधा ऐसें लागलें ध्यान । हारपलें मन झालें उन्मन ॥
एकाजनार्दनीं राधेचा छंद । राधावृंदावनीं सदा आनंद ॥ ४ ॥

---

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए. संपादक 'मुमुक्षु' पुणें.

# यांचीं पुस्तकें.

पृ. सं. १३६.] **१ भक्तिमार्गप्रदीप.** [किं. ८८.

(आवृत्ति बारावी.)

मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांच्या घरोघर हें पुस्तक धर्मग्रंथ म्हणून मान्य झालें आहे. 'नवे जुने, सुशिक्षितअक्षित, वृद्धतरुण, स्त्रीपुरुष या सर्वांना अत्यंत प्रिय झालेलें असें कोणतें पुस्तक आहे?' म्हणून विचारल्यास "**भक्तिमार्गप्रदीप**" हाच उद्गार सर्वांच्या तोंडून निघेल यांत शंका नाहीं!! यांत साधुसंतांच्या प्रसिद्ध भूपाळ्या, आरत्या, अभंग, पदें, श्लोक वगैरे यथाक्रम दिले आहेत.

**विविधज्ञानविस्तार**—"पूर्वीची पिढी जात चालल्यामुळें तिजबरोबरच नष्ट होऊं पाहणारी जुनी भजनांची परंपरा ही रा. पांगारकरांचा प्रदीप प्रकाशित झाल्यापासून कोठें कोठें दृग्गोचर होऊं लागली आहे हें त्याचें महद्भाग्य होय. या पुस्तकामुळें धर्मशिक्षणाच्या कामगिरीला मोठीच मदत झाली आहे. मराठी भाषा जाणणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाजवळ प्रदीपाची एकेक प्रत अवश्य असली पाहिजे."

---

## २ सार्थ व सटीक नारदभक्तिसूत्रें. किं. ८८.

(आवृत्ति तिसरी.)

हीं नारदाचीं भक्तिसूत्रें मूळ संस्कृतांत असून ८४ आहेत सूत्रें अत्यंत सुबोध व गोड आहेत. यांत भक्तिशास्त्राचा सर्वांगसुंदर विचार केला आहे. ह्या ग्रंथांत सूत्रांचें वर्गीकरण मोठ्या टाईपांत सूत्रें, सरळ अर्थ व भक्तिग्रंथाधारें विस्तृत विवेचन केलें असून ग्रंथ अतिमधुर झाला आहे.

**श्रीगुलाबरावमहाराज**—"आपलीं सार्थ व सटीक सूत्रें मीं समग्र वाचलीं. सूत्रांचें विवरण फार चांगलें झालें आहे. स्पष्टीकरणार्थ श्रीसंतवचनांचा जो संग्रह केला आहे तो सोन्यावर जडावाप्रमाणें सुस्थळीं व समयोचित आहे."

**धर्मजागृतिः**—"नारदसूत्रांचें मराठींत विवरण करण्यास रा. रा. पांगारकरांसारखा सहृदय व्याख्यानकार लाभल्याबद्दल महाराष्ट्रीयांचें अभिनंदन करणें जरूर आहे."

**विविधज्ञानविस्तार**—"लक्ष्मणरावांची भाषा महाराष्ट्रसंतांच्या अमृतवाणीच्या ओलाव्यांत कशी थबथबलेली असते हें या विषद स्पष्टीकरणावरून ध्यानीं येईल."

## ३ मोरोपंत—चरित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोडया आहेत. पृ. सं. ६२५. किं. रु. २.

---

## ४ श्रीज्ञानेश्वरमहाराज—चरित्र व ग्रंथविवेचन.

( आवृत्ति दुसरी. )

१ श्रीज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र. २ कुलवृत्तांत व जन्म. ३ गुरुसंप्रदाय. ४ मुंज व वेदशास्त्रमर्यादा. ५ पैठणचे चमत्कार. ६ तीर्थयात्रा—प्रकरण. ७ चांगदेव आणि ज्ञानदेव. ८ समाधिप्रकरण. ९ उपासना आणि गुरुभक्ति. १० ग्रंथविवेचन आणि वेंचे. ११ स्तुतिसुमनांजलि. याप्रमाणें अकरा प्रकरणें सदर ग्रंथांत दिलीं आहेत. पृ. सं.२८८.किं.रु.१॥८

**१ केसरी**—“ रा. रा. पांगारकर यांच्या या ग्रंथाची भाषा भक्तिरसानें ओथंबलेली व वक्तृत्वपूर्ण आहे. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांचें विवेचन रसभरित आहे. ”

**२ ज्ञानप्रकाश**—“ चरित्रास उपयुक्त अशी बहुतेक सर्व उपलब्ध सामुग्री या ग्रंथात पांगारकरांनीं संकलित केली आहे. ”

**३ इंदुप्रकाश**—“ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें उदात्त व गंभीर चरित्र रा. पांगारकरांसारख्या श्रद्धावान् भागवताकडून लिहिलें जावें हा योग अपूर्व आहे. ”

**४ केरळकोकिळ**—‘ पांगारकरांची भाषा नेहमींच गोड व प्रेमळ असते, पण साधूंचीं चरित्रें गातांना ती अगदीं तल्लीन होऊन केवळ वागडत आहेसें वाटतें. ”

**५ चित्रमयजगत्**—“ श्रीज्ञानेश्वरांचें उदात्त चरित्र पांगारकरानीं मोहक व ओजस्वी भाषेंत वर्णिलें आहे. ही त्यांची कृति सर्वांगसुंदर उतरली आहे. ”

**६ विविधज्ञानविस्तार**—“रा. पांगारकर हे रसज्ञ आहेत, मार्मिक आहेत, विद्वान् आहेत, भाविक आहेत व माहिती मिळविण्यास लागणारे श्रम सहन करण्याची त्यांस हौस आहे. त्यांची काव्यप्रतिभा उज्ज्वल आहे, त्यांची कसलेली भाषा अभियुक्त असून मोहक आहे. महाराष्ट्र सारस्वतांत रा. पांगारकरांचीं संतचरित्रें आपल्या भाषावैभवानें अखंड चमकत राहतील यांत बिलकुल शंका नाहीं. ”

**७ वे. शा सं. विष्णुशास्त्री बापट**—“ रा. पांगारकर हे महाराष्ट्र संतांच्या वाङ्मयांत मुरलेले विद्वान् असल्यामुळें त्यांच्या इतर कृतींप्रमाणें हा ग्रंथ फार सुंदर झाला आहे. त्यांची भाषा सोपी व प्रेमळ आहे. चरित्र तन्मय होऊन लिहिलें आहे. माहितीही काळजीपूर्वक व शोधक बुद्धीनें दिली आहे. ”

## ५ श्रीएकनाथ चरित्र. ( आवृत्ति तिसरी. )

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान. ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर इतक्या प्रकरणांत नाथांचें पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून 'स्तुतिसुमनांजलि' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८. किं ८१२.

**केसरी**--" महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचें व ग्रंथांचें परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेंत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदयतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. "

---

## ६ कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन. )

या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत. मुक्तेश्वरीभारतांतील विशेष गुण:--सुंदर आख्यानें, भक्तिरस वीररस, शृंगाररस इ०कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचरित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें. त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वरनीतिरत्नमाला' ही शेवटीं जोडली आहे. पृ सं. १४४. किं. रु. १

---

## ७ आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्रमहोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ८१२.

---

## ८ श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र.

पृष्ठसंख्या ५२८ किंमत रु. ३ ट. ख. सह रु. ३८७

सतत आठ वर्षें हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या श्रीक्षेत्र देहू येथील जुनी दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून आणि गाथ्यांचें व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ कालनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवित्वस्फूर्ति ८ चित्तशुद्धीचे उपाय ९ सगुणभक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि (उपदेशसार) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण. अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत (यांत प्रसंगानुसार तुकोबांचे अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व अवश्य तेथें पूर्ण विवरणही दिलें आहे.)

ग्रंथांत सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपति पांडुरंग २ तुकोबांचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान.

**विविधज्ञानविस्तारः**—' रा. पांगारकरांची वाणी प्रसंगानुसार प्रेमळ पण सणसणित, भाविक पण चिकित्सक, सरळ पण भेदक, व साधी पण वेधक अशी आहे. ग्रंथ फार सुरस हृदयंगम झाला आहे. हा वारकरी संप्रदायाचा रहस्यग्रंथच आहे. यांत वारकरी पंथाचीं प्रमेयें व विधिनियम, ज्ञाननिष्ठ सगुणोपासनेचें तत्व, चित्तशुद्धीचे उपाय, नामसंकीर्तनाचें महत्त्व, भक्तिरसाचा आनंद इ० गोष्टींचा सांगोपांग विचार तुकोबांच्या अभंगाधारें केला आहे. पांगारकरांच्या वाणीचा ओघ अस्खलित असून तींत श्रद्धेची मोहनी आहे."

**का. कृ. लेले, धारः**—' समकालीन नसतांही आपण तुकोबारायांकडून आत्मचरित्र वदविलें आहे ही आपली कामगिरी अपूर्व आहे."

**केसरीः**—" तुकोबांचें ग्रंथाध्ययन हें प्रकरण फारच मार्मिक आहे व तुकोबांना संस्कृत येत नसावें या महाराष्ट्रीय विद्वानांच्या मताचा पांगारकरांच्या अभिनव, अपूर्व व विश्वसनीय विवेचनामुळें आतां पूर्ण निरास झाला आहे. सर्व प्रकरणांतून त्यांच्या व्यापक व विस्तृत व्यासंगाचा परिपाक अनुभवायला मिळतो."

## ९ पारिजातकाचीं फुलें.

या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति खपत आली आहे. आकारानें लहान पण अर्थगांभार्यानें मोठीं अशीं हीं दिव्य सुमनें परमार्थविचारांना स्फूर्ति देणारीं आहेत. अनेक वर्षांचा अभ्यास, अनुभव व अवलोकन यांचा मोहक संगम अशा स्फुट विचारांत झालेला असतो. पृ स. ८०. किं. ४८.

## सुधारून वाढविलेली ) १० मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति

कविवर्य मोरोपंत यांच्या पाऊण लाख कवितेतून वेगवेगळ्या विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे मोठ्या प्रयासानें यांत संग्रहीत केले आहेत. १ ईश्वरभक्तिपर. २ कवि आणि कविता. ३ उपदेशपर. ४ वर्णनपर. ५ कथानकपर. ६ चर्करामायण व ७ विविधविषयपर-अशीं या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं असून त्यांत पंतांच्या कवितेतील बहुतेक उत्कृष्ट भाग आला आहे. ग्रंथाला भरपूर टीपा, व कथासंदर्भ दिले असून पंतांच्या अजून अप्रसिद्ध अशा कांहीं कविता यांत दिल्या आहेत, व कोठें पंतांच्या हातच्या टीपाही दिल्या आहेत. प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत प्रस्तावना दिली असून तींत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे उत्तम गुण, काव्याची महती व पंतांची महाकवींत गणना होण्याचीं कारणें यांचें साहित्यशास्त्रदृष्ट्या विवरण केलें आहे व ह्या **दुसऱ्या आवृत्तींत पंतांचें त्रोटक चरित्र नवीनच जोडलें आहे.**

**केसरी**--" पंतांचा उदार, भाविक व प्रेमळ स्वभाव, त्यांची प्रतिभा व रसिकपणा यांचें या वेंच्यांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलें आहे. मराठींत या दिशेचा नांवाजण्यासारखा पहिला प्रयत्न म्ह० हाच होय. महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी धर्मनीतिव्यवहारज्ञ व बहुश्रुत अशा लहानथोर वाचकांनीं रा. पांगारकरांचे हे वेंचे संग्रह करण्यासारखे आहेत." **इंदुप्रकाश**--" वेंच्यांची निवड कौशल्यानें केली असून वैचित्र्य चांगलें साधलें आहे. रसिक, विद्वान् व विद्याखातें यांजकडून या ग्रंथाला अवश्य आश्रय मिळाला पाहिजे." ३ **ज्ञानप्रकाश**--" ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे."

---

## ११ सार्थ श्रीदासबोध

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधू शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत ४ रु.

## १२ कविरामायण.

केसरी म्हणतो:—"हें पुस्तक मुमुक्षुकर्ते रा. रा. पांगारकर यांनीं तयार केलें आहे. यांत वाल्मिकि व तुळशीदास यांचीं संस्कृत व हिंदी रामायणें व प्रख्यात कवींचीं शेंकडों रामायणें यांतील उत्कृष्ट वेंचे दिले आहेत. हे उतारे अशा रीतीनें निवडले आहेत व त्यांचा क्रम असा धरिला आहे कीं सर्व कवींचें एक 'कविरामायण' निर्माण झालें आहे! अशा दृष्टीनें उताऱ्यांची निवड करण्याचें काम जितक्या मार्मिकतेचें तितकेंच अवघडही आहे; परंतु तें रा. पांगारकर यांनीं उत्तम केलें आहे. मनोहर रामकथा व प्रमुख कवींचे उतारे यांचे लाभ एकदम घेऊं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांनीं संग्रह करण्यासारखें व वाचण्यासारखें हें पुस्तक तयार झालें आहे यांत शंका नाहीं."

प्रस्तावनेत विषयवारीनें श्रीरामचरित्रांतील सर्व महत्वाचे विषय क्रमानें दिले आहेत. किंमत चार आणे. व्ही. पी. नें ०७. ———

## १३ सार्थ मनोबोध

श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांची सर्वमान्यता प्रसिद्धच आहे. रा. पांगारकरांनीं यांत मनाचे श्लोक सार्थ दिलेच आहेत, पण प्रारंभीं मनालाच बोध कां यांत मनाचें स्वरूप दर्शविलें आहे. सर्व श्लोकांची संगति लावून त्यांचें वर्गीकरण केलें असून श्लोकांचा अर्थ समर्थांच्या एकंदर ग्रंथांच्या दृष्टीनें चोख लावला आहे. किं. ०१२.

———

## १४ सन्तचरित्रमाला

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें ह्या ग्रंथासाठींच लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं असून ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य, मारया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त त्रिरुपन्नाल्वर, सूरदास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवळकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीतारामहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव महाराज, भटजीबापू, सोनगीरचे महाराज. भोरचे दत्तभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु, इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा. पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. वार्कांचीं अक्खा ( भालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ. लेले, धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( वि. कृ. कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहळेकर ), बलभीमबोवा साडेकर श्री. खासगीवाले ), शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर. ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ. २५६. पांच फोटो. किं. रु. १०८. ———

# १५ भक्तिमणिमाला

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत–मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५०, किं. रु. १॥

# १६ श्रीसमर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेचें.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वीं आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य भरून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. ( १ ) प्रपंच ( २ ) राजकारण ( ३ ) परमार्थ व ( ४ ) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकारणांचा '**सारांश**' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्याचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सिम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे. पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बायडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन.

# १७ निबंधमाला–तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें 'सरस्वतीमंदिर' मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें ज्यास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुणदोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ०।० आणे,

## १८ मारुतिउपासना

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी. किं. ।४.

## १९ मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०–१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षू' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. प्रत्येक भाग किं. रु. १।८.

### विषयानुक्रमणिका.

**भाग पहिला**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद–लेखांक १।२।३।४. मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्ताचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ एका भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतन्या थमालले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकन्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ! १३ साधुकथा. १४ पतिपत्नी संबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताची चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गतिरहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद (या सदराखालीं १९ स्फुटें आहेत.)

---

**२० नवविधाभक्ति** ।४.

**२१ सार्थ परिपाठ व चांगदेव पासष्टी** ।५.

**२२ श्रीतुकारामचरितामृत**:—अभंगांत गाइलेलें तुकोबांचे चरित्र, नित्यपाठास उत्तम. ।५.

**२३ निरंजनमाधवांची कविता** (भाग १) रु. १.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

हनुमान प्रेस,' १०० सदाशिव पेठ, पुणें शहर,

# पांगारकरांचीं पुस्तकें.

**१. भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्यपाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८ व्ही. पीनें ८१२.

**२. संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १८.

**३. श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२.

**४. कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ८४.

**५. आनंदलहरीः**--( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४४ स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें; ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं ८१२.

**६. नारदभक्तिसूत्रें**:--हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यावरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकास भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८ व्ही. पी. नें ८११.

**७. नवविधाभक्तिः**--यांत नवविधाभक्तिचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८४.

**८. निरंजनमाधवांची कविताः**--भाग पहिला. किं. १ रु.

**९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः**--( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु १८.

**१०. भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८.

मुमुक्षु REG. No. B. 662


## पांगारकरांचीं पुस्तकें.

११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५.

१२–१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १–२ ):–किं. प्रत्येकीं रु. १८८.

१४ मोरोपंतांची वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचे संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १८१२.

१५ पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८८.

१६ श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा, पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. ३.

१७ श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ८५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ८१०.

१९ मुक्तेश्वर—( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२० मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ):—किं. ८४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु. ४. व्ही. पी. नें, ४८१०.

२२ सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ८१२.

२३ समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २.

२५ श्री एकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें आवृत्ति तिसरी )—किं. रु. ४

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.